# श्रीसाईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी)

**सभा क्र. ०६/२००८.** **दिनांक २४.०५.२००८**
**स्थळ - शिर्डी कार्यालय** **वेळ- सकाळी १०.०० वाजता**

श्रीसाईबाबा संस्थान व्यवस्थापन समितीची सभा शिर्डी येथे शनिवार दिनांक २४ मे, २००८ रोजी सकाळी १०.०० वाजता संस्थानचे शिर्डी येथील कार्यालयात आयोजित करणेत आली असलेबाबत इकडील जा. नं. एसएसएस -वशी-०४-७३२९-२००८, दि.१९.०५.२००८ रोजीचे पत्राने सर्व मा.सदस्यांना कळविणेत आले होते. त्यानुसार सदरहू सभा शनिवार दिनांक २४ मे, २००८ रोजी सकाळी १०.०० वाजता संस्थानचे शिर्डी येथील कार्यालयात मा. अध्यक्ष श्री.जयंत मुरलीधर ससाणे यांचे अध्यक्षतेखाली सुरु करण्यात आली.

या सभेस खालील मा. सदस्य उपस्थित होते.

| | | | |
|---|---|---|---|
| ०१ | मा.श्री.जयंत मुरलीधर ससाणे,अध्यक्ष | ०२ | मा.श्री.शंकरराव गेणुजी कोल्हे,उपाध्यक्ष |
| ०३. | मा.श्री.राधाकृष्ण एकनाथराव विखेपाटील | ०४ | मा.श्री.पांडूरंग गमाजी अभंग |
| ०५ | मा.श्री.सुरेश गोरक्षनाथ वाबळे | ०६ | मा.श्रीमती उर्मिला प्रदिप जाधव |
| ०७ | मा.श्री शैलेश श्रीहरी कुटे | ०८. | मा.श्री.रमाकांत गणेश कर्णिक |
| ०९. | मा.कॅप्टन सुरेश वासुदेवा | १०. | मा.श्री अशोक भिमाशंकर खांबेकर |
| ११. | मा.श्री.कृष्णचंद्र श्यामसुंदर पाण्डेय | १२. | मा.डॉ.पी.एल.तिवारी |
| १३. | मा.सौ.सुमित्रा कैलास कोते | | |

मा.श्री.किशोर रा. मोरे
कार्यकारी अधिकारी.

सभेच्या सुरुवातीस श्रीसाईबाबांची प्रार्थना करणेत येऊन शासन अधिनियमातील कलम ११ (२) नुसार आवश्यक गणपूर्ती असल्याने सभेचे कामकाज मा.अध्यक्ष,श्री.जयंत मुरलीधर ससाणे यांचे अध्यक्षतेखाली सुरु करण्यात आले.

सदरहू सभेस काही अपरिहार्य कारणास्तव उपस्थित राहू शकत नसलेबाबत मा.डॉ.एकनाथ भागचंद गोंदकर, यांनी दूरध्वनीवरुन तसेच मा.श्री.समि खतीब व मा.श्रीमती रिम्पल लोहीया यांनी पत्र व फॅक्सद्वारे कळविले आहे, त्याची नोंद घेण्यात आली व समितीने त्यांना अनुपस्थित राहणेची अनुमती दिली.

**विषय नं. ०१ दिनांक १५.०४.२००८ रोजी शिर्डी येथे झालेल्या व्यवस्थापन समितीचे सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणे**

**निर्णय क्र.४१४** दिनांक १५.०४.२००८ रोजी शिर्डी येथे झालेल्या व्यवस्थापन समितीचे सर्वसाधारण सभेचे इतिवृत्ताच्या प्रती सर्व सदस्यांना पुरविण्यात आल्या होत्या. त्याची नोंद घेत असतांना खालीलप्रमाणे दुरुस्त्या करण्यात आल्या.

**(०१) निर्णय क्र.३३६ मध्ये -**

संस्थानला प्राप्त झालेल्या मौल्यवान खडयांचे मुल्यंकनाकामी खालील विश्वस्त उपस्थित होते.

०१) मा.श्री सुरेश गोरक्षनाथ वाबळे
०२) मा.श्री उर्मिला प्रदिप जाधव
०३) मा.डॉ.एकनाथ भागचंद गोंदकर
०४) मा.श्री अशोक भिमाशंकर खांबेकर

(कार्यवाही- मुख्य लेखाधिकारी)

**(०२) निर्णय क्र.४०८ मध्ये शेवटचा परिच्छेद-**

तरी उपरोक्तप्रमाणे मा. कार्यकारी अधिकारी यांचे निवासस्थान इमारतीची दुरुस्ती व नूतनीकरण करणेस येणारे अंदाजे रुपये७,८९,६३९.०० मात्रचे अपेक्षीत खर्चास व सदरचे काम विहीत पध्दतीने मटेरीअल खरेदी करुन मजुरी ठेकेदारांमार्फत करुन घेणेस मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली.

**याऐवजी खालीलप्रमाणे वाचण्यात यावे-**

"तरी उपरोक्त प्रमाणे मा.कार्यकारी अधिकारी यांचे निवासस्थान इमारतीची दुरुस्ती व नुतनीकरण करणेस येणारे अंदाजे रुपये ७,८९,६३९.०० मात्रचे अपेक्षित खर्चास व सदरचे काम विहीत पध्दतीने मटेरिअल खरेदी करुन मजुरी ठेकेदारांमार्फत करुन घेणेस मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यानुसार प्रस्तावातील **अ** व **ब** मध्ये नमुद केलेली कामे विहीत पध्दतीने मटेरिअल खरेदी करुन मजुरी ठेकेदारांमार्फत करुन घेणेस मान्यता देण्यात आली. तसेच प्रस्तावातील **क** मध्ये नमूद केल्याप्रमाणे निवासस्थानी आवश्यक असणारे बेडस्, कपाटे, डायनिंग टेबल, टिपॉय, क्वॉयर फोम मॅट्रेसेस, किचन ट्रॉलीज् आदि फर्निचर हे दिर्घकाळ टिकाऊ व मजबूत असणे आवश्यक असल्याने ते थेट गोदरेज अथवा इतर नामांकित उत्पादक कंपन्याकडून खरेदी करणेत यावे. यापैकी जे फर्निचर गोदरेज अथवा इतर नामांकित कंपन्यांकडे उपलब्ध होणार नाही ते विहीत पध्दतीने दरपत्रके मागवुन खरेदी करण्यांत यावे. मा. कार्यकारी अधिकारी यांचे निवासस्थान

इमारतीचे दुरुस्ती व नुतनीकरणासाठी, फर्निचर आदि अनुषंगिक कारणांसाठी येणाऱ्या योग्य त्या सर्वसमावेशक खर्चास मान्यता देण्यात आली. " (कार्यवाही-बांधकाम विभाग प्रमुख)

**(०३) निर्णय क्र.४१२ - मध्ये शेवटी-**

तसेच येथून पूढे शिर्डी परिसरात होणारे कार्यक्रमासाठी शिधा देणेस मंजूरीचे अधिकार मा.अध्यक्ष महोदय यांना प्रदान करण्यात आले. (कार्यवाही-प्रशासनशाखा वशी-०५)

**(०४)** दिनांक १३.०१.२००८ चे सल्लागार समितीचे सभेत ठरलेनुसार श्री क्षेत्र तिरुपती,वैष्णो देवी व इतर ठिकाणी गर्दीच्या नियोजनाबाबत कशा प्रकारे कार्यवाही करण्यात येत आहे याबाबत श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी चे व्यवस्थापन समितीचे सदस्य, अधिकारी, स्थानिक शासकीय अधिकारी आदिंची समिती तयार करुन त्यांनी तिरुपती येथील व्यवस्थेचा अभ्यास करावा असे ठरले आहे. त्यानुसार जुन,२००८ च्या १ ल्या आठवड्यात रोजी बंगलोर,तिरुपती येथे जाण्याचे निश्चित करण्यात आले. त्यासाठी मा.अध्यक्ष, मा.उपाध्यक्ष, मा.विश्वस्त,मा.कार्यकारी अधिकारी व मा.जिल्हाधिकारी,अहमदनगर यांनी विमानाने व संस्थान अधिकाऱ्यांनी संस्थान वाहनाने प्रवास करावा त्यासाठी येणारे योग्य त्या खर्चास मान्यता देण्यात आली. (कार्यवाही-मुख्य लेखाधिकारी /जनसंपर्क अधिकारी )

**विषय नं. ०२ दिनांक १०.०५.२००८ रोजी शिर्डी येथे झालेल्या उपसमिती सभेचे इतिवृत्त**

**निर्णय क्र.४१५**दिनांक १०.०५.२००८ रोजी शिर्डी येथे झालेल्या उपसमिती सभेचे इतिवृत्ताच्या प्रती सर्व सदस्यांना पुरविण्यात आल्या होत्या, त्याची नोंद घेण्यात येऊन या इतिवृत्तातील खालील निर्णयांना पुष्टी देण्यात आली.

**०१) श्री हनुमान मंदिर जिर्णोध्दार करणेबाबत.**

शिर्डी येथिल हनुमान मंदिर हे पुरातन (श्री साईबाबांचे हयातीपासून) असून या मंदिराचे बांधकाम हे लाकडी खांब,लाकडी पट्या, व विट माती यापासून बांधण्यात आलेले आहे. यास अनेक वर्ष झालेले असल्यामुळे इमारत मोडकळीस आलेली आहे. त्यामुळे पावसाळयात मंदिरामध्ये पाण्याची गळती होते. तसेच सदर मंदिर यापूर्वी शिर्डी नगरपंचायत, शिर्डीचे ताब्यात असल्याने सदरचे मंदिराची देखभाल योग्य प्रकारे न झाल्याने भिंती व दरवाजे अस्वच्छ झालेआहेत.आता सदरचे हनुमान मंदिर हे श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांचेकडे यांचे ताब्यात असल्याने सदरचे मंदिराची दुरुस्ती व देखभाल व पुजाअर्चा संस्थानमार्फत करण्यात येते. मा. व्यवस्थापन समितीचे दि. ०५/११/२००७ नि.क्र. ६७३ अन्वये याकामी आर्किटेक्ट पॅनल वरील आर्किटेक्ट यांचेकडून प्लॅन व एस्टीमेट करुन घेण्याचे ठरले होते. त्यानुसार आर्किटेक्ट माथुर ॲण्ड काप्रे, नवि दिल्ली यांनी रु. १८,३०,२३६.०० मात्र रकमेचे एस्टीमेट व प्लॅन सादर केले आहे. साईभक्त महेश व मेहूल गुप्ता यांनी देणगी दाखल काम करण्याची इच्छा व्यक्त केली होती. मंदिराचे जिर्णोध्दाराची गावकऱ्यांचीही तोंडी मागणी आहे. याकामी रुपये १८,३०,२३६.०० मात्र खर्च अपेक्षीत असल्याने सदर साईभक्त यांनी असमर्थता दर्शविली आहे.

आता मंदिराचे कामासाठी श्री. धनजय दत्तात्रय शेळके, शिर्डी यांनी त्यांचे दि. १९ फेब्रुवारी, २००८ चे पत्रान्वये हनुमान मंदिर जिर्नोधारचे कामासाठी रु. ५.०० लक्ष मात्र देणगी देण्याबाबतची इच्छा प्रदशित केली होती. त्यानुसार त्यांनी सदर रक्कम लेखाशाखेत जमा केली आहे.

सदरचे मंदिर हे पुरातन असून बाबांचे वेळी देवीदास व जानकीदास गोसावी यांचा निवास येथे असे, श्री बाबा स्वतः तास न तास त्यांचेकडे मंदिरात जाऊन बसत असत असा साई चरित्रात उल्लेख आहे. करीता मंदिराची देखभाल संस्थानकडे आहे. त्या ठिकाणी असलेल्या दक्षिणापेटीतील पैसे संस्थानकडे जमा होतात. या मंदिराचा एकदा जिणोद्धार करण्यात आलेला आहे. मंदिराचे पुरातन महत्व लक्षात घेऊन योग्य पद्धतीने जिणोद्धार होणे आवश्यक असलेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

**यावर सविस्तर चर्चा होऊन,हनुमान मंदीर जिर्णोद्धार करणेकामी स्थानिक आर्किटेक्ट कडून प्लॅन व एस्टिमेट मागविण्यात यावे. यामध्ये भक्तांना सुलभ दर्शन व प्रदक्षिणा करणेसाठी सुयोग्य आकारात रेलींग इ.व्यवस्था असावी. याकामी देणगी मिळाल्यास ती स्विकारण्यात यावी, तसेच देणगी व्यतिरिक्त येणारा सर्व खर्च संस्थानमार्फत करण्यात यावा, अशी या उपसमिती शिफारस मान्य करण्यात आली.** (कार्यवाही-बांधकाम विभाग)

**०२) संस्थानचे गट नं.८०,८५ मधिल श्री साई प्रसादालयाकरीता गट नं.८७,८८ चे उर्वरीत क्षेत्रात पार्कीगची व्यवस्था निर्माण करणेबाबत.**

श्रीसाईबाबा संस्थानचे गट नं. ८०,८५ मधील क्षेत्रात संस्थानमार्फत भव्य अशा श्री साईप्रसादालयाचे बांधकाम पूर्ण करण्यात आलेले आहे. दि. २७/११/२००७ रोजी सदरहू प्रसादालयाचे उद्घाटन मा. महामहिम राष्ट्रपती श्रीमती प्रतिभाताई पाटील, भारत सरकार यांचे हस्ते करण्यात आले. श्री साई प्रसादालयात प्रसादासाठी एकाच वेळेस सुमारे ५००० साईभक्त प्रसाद भोजन घेऊ शकतील अशी व्यवस्था करणेत आलेली आहे. प्रसाद भोजन घेणेसाठी येणारा भक्त हा बहुतेक वाहनांतून अथवा संस्थान वाहनातून येणारा आहे. गट नं.८०, ८५ मध्ये वाहन व्यवस्थेसाठी पुरेशी जागा उपलब्ध नाही. सदरहू प्रसादालय आता सुरु करण्यात येणार आहे. तत्पुर्वी तेथे वाहनतळाची व्यवस्था होणे गरजेचे आहे.

श्रीसाईप्रसादालय येथे येणारे वाहनांसाठी संस्थान मालकीचे नजीकचे गट नं. ८७, ८८ मध्ये जागा उपलब्ध आहे. सदरहू प्लॉट हा ३.० हे क्षेत्राचा आहे. सदरचे प्लॉटचे उत्तरेस मिलिटरीकरीता व दक्षिणेस

म.रा.वि.वि.कं. करीता जागा उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. सदर प्लॉटचे मध्यावरती शिल्लक असलेल्या अंदाजे १ हे ६० आर जागेत वाहनतळाची निर्मिती करता येईल. सदर वाहनतळासाठी खडीकरण करुन मजबुतीकरण करणे गरजेचे आहे. सदर कामासाठी सन २००७-२००८ चे डी.एस.आर. मधील दरानुसार सोबतचे अंदाजपत्रकानुसार प्राथमिक ढोबळ अंदाजे रुपये ४०,०९,१३९.०० मात्र इतका खर्च अपेक्षीत आहे. सदरकामी संस्थान पॅनलवरील आर्किटेक्ट यांचेकडून सविस्तर प्लॅन, एस्टीमेट व निविदा तयार करुन घेता येतील.

तरी उपरोक्त कामास खर्चास तसेच आर्किटेक्ट यांचेकडून सविस्तर प्लॅन, एस्टीमेट व निविदा तयार करुन घेणेस व वर्तमानपत्रातील जाहिरातीव्दारे निविदा मागविणेस मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

**यावर सविस्तर चर्चा होऊन,संस्थानचे गट नं.८०-८५ मधील नविन श्रीसाईप्रसादालया करिता गट ८७-८८ चे उपलब्ध असलेल्या अंदाजे हे.१-६० आर क्षेत्रापैकी दक्षिणेकडील हे. १-२० आर क्षेत्रामध्ये WBM पार्किंग करणेकामी वर्तमानपत्रात जाहीरात देऊन,निविदा मागविण्यात याव्यात. उर्वरित ४० आर क्षेत्रामध्ये मल्टीलेव्हल पार्किंग तयार करणेकामी प्लॅन/एस्टिमेट तयार करुन त्यास व्यवस्थापन समितीची मान्यता घेण्यात यावी. तसेच प्रसादालयात काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांसाठी उत्तर बाजूस पार्किंगची व्यवस्था करण्यात यावी, अशी या उपसमिती शिफारस मान्य करण्यात आली.** (कार्यवाही-बांधकाम विभाग)

**०३) <u>शैक्षणिक संकूल परिसरात पेव्हींग ब्लॉक बसविणेबाबत.</u>**

**(अ)** मा. शैक्षणिक उपसमितीचे शिफारशींस अनुसरुन, मा. व्यवस्थापन समितीचे सभेत आय.टी.आय. व कन्या विद्या मंदिर यामधील रस्त्यांवर पावसाळयात चिखल होतो. याकरीता तेथे बांधकाम विभागामार्फत पेव्हींग ब्लॉक अथवा कॉंक्रिटीकरण करण्यात यावे, असा निर्णय झालेला आहे.

सदरहू निर्णयांस अनुसरुन, शैक्षणिक संकुल परिसरातील अंतर्गत रस्त्यांवर व मोकळया जागी पेव्हींग ब्लॉक्स बसविणे, सांडपाण्याची व्यवस्था करणे यासाठी संस्थान आर्किटेक्ट मे. निकम पा.असोसिएटस्, श्रीरामपूर यांचेकडून बांधकाम आराखडयास अंदाजपत्रक तयार करुन घेण्यात आलेले आहे.

**(ब)** मे.निकम पा.असोसिटस्,श्रीरामपूर यांनी तयार केलेल्या बांधकाम आराखडयानुसार व अंदाजपत्रकानुसार, शैक्षणिक संकुल परिसरातील रस्त्यांना पेव्हिंग ब्लॉक्स बसविणे, सांडपाण्याची व्यवस्था करणे आदि ३७२८ चौरस मीटर रस्त्याच्या कामासाठी अंदाजित रक्कम रुपये २३,६६,१७४/- मात्र इतका खर्च येईल. यामध्ये रस्त्यांची खोदाई करणे, मुरुम भरणे, कॉंक्रीटीकरण करुन पेव्हींग ब्लॉक्स बसविणे, सांडपाण्यासाठी सिमेंट पाईप टाकणे इत्यादी कामांचा समावेश आहे.

तरी उपरोक्तप्रमाणे शैक्षणिक संकुल परिसरातील अंतर्गत रस्त्यावर पेव्हींग ब्लॉक्स बसविणे, सांडपाण्याची व्यवस्था करणे आदि बांधकाम करणेसाठी येणारे अंदाजे रक्कम रुपये २३,६६,१७४/- मात्रचे खर्चास व त्यासाठी विहित पध्दतीने निविदा मागवून काम करुन घेणेस मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

**यावर सविस्तर चर्चा होऊन,तसेच प्रत्यक्ष जागेवर पहाणी करण्यात येऊन, श्रीसाईबाबा कन्या विद्या मंदीर व इंग्लिश मिडीयम स्कुलचे फक्त मुख्य प्रवेशद्वारासमोर आवश्यक त्या ठिकाणी पेव्हिंग ब्लॉक बसविण्यात यावेत. याकामी विहित पद्धतीने निविदा मागवून काम करुन घेण्यास व याकामी येणारे योग्य त्या खर्चास मान्यता देण्यात यावी, अशी या उपसमिती शिफारस मान्य करण्यात आली.** (कार्यवाही-बांधकाम विभाग)

**०४) <u>नवीन प्रसादालय लॅण्डस्केपिंग करणेसाठी कारंजा कोटेशन्सबाबत.</u>**

नविन प्रसादालय इमारत व परिसर यास शोभेल असे गार्डन करण्याचे .मा.व्यवस्थापन समितीचे सभेत ठरले आहे. यासाठी लॅन्डस्केप आर्किटेक्ट अमृता पवार ,नाशिक यांनी आराखडा व इस्टिमेट दिलेले आहे. सदर टेंडर मध्ये पाण्याचा कारंजासाठी रु.१ लाख व इरिगेशन साठी रु २२९३०/- अशी एकूण रु १२२९६०/- तरतुद केलेली आहे.

मा.व्यवस्थापन समितीचे दि.२२-०९-२००७ चे सभेत ठरलेप्रमाणे प्राप्त कोटेशन मा.व्यवस्थापन समितीच्या दिनांक १०/०१/२००८ निर्णय क्र ७ (३) ने उघडण्यात आले कारंजासाठी ३ कोटेशन प्राप्त झालेली होती .प्राप्त कोटेशन हे नविन प्रसादालयाचे दर्शनीभाग व पाठीमागील भागात कारंजा उभारण्यासाठी मागविण्यात आले होते चर्चे दरम्यान प्रसादालयाचे पाठीमागील भागात कांरजा न करता फक्त पुढील भागात करावा. यासाठी सुधारीत कोटेशन बोलविण्यात यावे व बांधकाम आय.व्ही. आर. सी.एल. कंपनीने करावे असे ठरले.

त्यानुसार फोम फाऊंटन बाबतचे दर मागविले होते. प्राप्त झालेल्या कोटेशनचा तपशिल खालील प्रमाणे-

| अ.न. | नाव | रक्कम |
|---|---|---|
| ०१ | रिप्ल इजिनरींग प्रा.लि मुंबई | ११८९२० |

| | | |
|---|---|---|
| ०२ | समीर इलेक्ट्रीकल्स,दिल्ली | १४६३०३ |
| ०३ | पलोरा इजिनरींग,दिल्ली | १५८८४० |

**उपरोक्त कोटेशन मध्ये अ.न. ०१ रिप्ल इंजिनरींग प्रा.लि मुंबई यांचे दर सर्वात न्युनत्तम (दिलेले दर सर्व करासह आहे.) आहे. यामुळे कारंजाचे काम रिप्ल इजिनरींग प्रा.लि मुंबई यांचे कडुन करुन घेणेस मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात यावी, अशी या उपसमिती शिफारस मान्य करण्यात आली.**

(कार्यवाही-बांधकाम विभाग/बगीचा विभाग)

**०५) ॲल्युमिनियम टिल्टींग टॉवर लॅडर -स्क्वेअर टाईप खरेदी करणे बाबत**

ॲल्युमिनिअम टिल्टींग टॉवर लॅडर-स्क्वेअर टाईप खरेदी करणेबाबत एकुण रक्कम रुपये ३६,०००.०० इतक्या खर्चाचा प्रस्ताव दिनांक २७-०७-२००७ चे झालेल्या मा.व्यवस्थापन समितीचे सभेत मान्यतेसाठी सादर करण्यात आला होता. हा प्रस्ताव या सभेत निर्णय क्र. ६१७ अन्वये मान्य करण्यात आला असून यासाठी कोटेशन्स मागवावेत असा निर्णय झालेला आहे. त्यानुसार पार्टीजना पत्र पाठवून कोटेशन्स मागविण्यात आली होती. त्यानुसार खालीलप्रमाणे ०३ कोटेशन्स प्राप्त झाले होते.

| अ.क्र. | कोटेशनधारकाचे नांव व गांव |
|---|---|
| १ | मे.सोहम ट्रेडींग कार्पोरेशन, अंबड, नाशिक |
| २ | मे.कालिका इलेक्ट्रीकल्स्, नाशिक |
| ३ | मे.स्वदर्शन इलेक्ट्रीकल्स्, नाशिक |

ऊपरोक्त कोटेशनधारकांनी खालीलप्रमाणे दर दिलेले आहेत.

| अ.क्र. | कोटेशनधारकाचे नांव व गांव | दर |
|---|---|---|
| १ | मे.सोहम ट्रेडींग कार्पोरेशन, अंबड, नाशिक | रु. ४८,५००.०० |
| २ | मे.कालिका इलेक्ट्रीकल्स्, नाशिक | रु. ५२,४८४.०० |
| ३ | मे.स्वदर्शन इलेक्ट्रीकल्स्, नाशिक | रु. ४५,०००.०० |

ॲल्युमिनिअम टिल्टींग टॉवर लॅडर-स्क्वेअर टाईप खरेदी करणेबाबत एकुण रक्कम रुपये ३६,०००.०० इतक्या खर्चास मा.व्यवस्थापन समितीचे दिनांक २७-०७-२००७ चे झालेल्या सभेतील निर्णय क्र. ६१७ अन्वये मान्यता मिळालेली असून प्रत्यक्षात रु.४५,००००.०० इतका खर्च येणार आहे. तरी मूळ मंजूरीच्या रु.३६,०००.०० या रक्कमेपेक्षा **रु.९,०००.०० इतका खर्च जादा येणार असून या जादा खर्चास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात यावी, अशी या उपसमिती शिफारस मान्य करण्यात आली.**

(कार्यवाही-विद्युत विभाग)

**०६) श्री साईबाबा हॉस्पिटलचे तळमजल्याचे ओ.पी.डी सेक्शनकरीता रॅम्प तयार करणे बाबत**

श्री साईबाबा हॉस्पीटलचे तळमजल्याचे ओ.पी.डी. नं. ४ ते १२ कडे गंभीर रुग्णांना नेणे-आणणेकामी स्ट्रेचर नेता येईल असे रॅम्प तातडीने बनविण्यात यावे, असे श्री साईबाबा हॉस्पीटलचे वैद्यकीय व उप वैद्यकीय अधिकारी यांनी दिनांक ०७-०२-२००८ रोजीचे राऊंडमध्ये कळविलेले आहे.

त्यानुसार सदर ठिकाणी पाहणी करुन बांधकाम विभागामार्फत मोजमापे घेण्यात आली. या ठिकाणी सध्या पेशंट व त्यांचे नातेवाईकांसाठी थांबणेकरीता वेटींग हॉल केलेला आहे व सदर ठिकाणी महागडया स्वरुपाचा ग्रेनाईट बसविण्यात आलेले आहे. त्यामुळे त्याठिकाणी तोडफोड करुन रॅम्प तयार करणे सोयीचे नाही. त्यासाठी सदर ठिकाणी एम.एस.स्ट्रक्चर मधील रॅम्प तयार करुन त्यावर फळया बसवाव्यात असे मा.वैद्यकीय संचालक यांनी सुचविले आहे. याबाबत बांधकाम विभागाने दिनांक ०९-०२-२००८ चे पत्रान्वये विद्युत विभागामार्फत पाहणी करुन व समक्ष मापे घेऊन एम.एस.अँगल फ्रेममध्ये रॅम्प तयार देणेकामी कळविले आहे.

त्यानुसार प्रत्यक्ष पाहणी केली असता श्री साईबाबा हॉस्पीटलचे तळमजल्याचे ओ.पी.डी. नं. ४ ते १२ कडे गंभीर रुग्णांना नेणे-आणणेकामी स्ट्रेचर नेता येईल असे रॅम्प तातडीने बनविणेकामी आवश्यक असणारे मटेरीअल विद्युत विभागातील वर्कशॉपमध्ये उपलब्ध नसल्याने खालीलप्रमाणे मटेरीअलची खरेदी करावी लागणार आहे. तपशील खालीलप्रमाणे :-

| अ.क्र. | मटेरीअल तपशील / साईज | मागणी | दर (अंदाजे) रु. | रक्कम |
|---|---|---|---|---|
| ०१) | एम.एस.अँगल, साईज- ५० x ५० x ६ एम.एम. | ३७५ किलो. | ५२.००(प्रति किलो) | १९,५००.०० |
| ०२) | एम.एस.अँगल, साईज- ४० x ४० x ६ एम.एम. | १८० किलो. | ५२.००(प्रति किलो) | ०९,३६०.०० |
| ०३) | एम.एस.राऊंड पाईप, साईज- १.१/२`` x ३ | ४० फूट. | ४५.००(प्रति फूट) | ०१,८००.०० |
| | | | रक्कम<br>+ वॅट १२.५ % | ३०,६६०.००<br>०३,८३३.०० |
| | | | रक्कम<br>+ लेबर चार्जेस २५% | ३४,४९३.००<br>०८,६२३.०० |
| | | | रक्कम :- | ४३,११६.०० |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | | + सर्व्हीस टॅक्स १२.५% | ०५,३९०.०० |
| | | | **एकुण रक्कम :-** | **४८,५०६.००** |

उपरोक्तप्रमाणे श्री साईबाबा हॉस्पीटलचे तळमजल्याचे ओ.पी.डी.सेक्शनकरीता रॅम्प तयार करुन बसविणेसाठी अंदाजे रक्कम रुपये ४८,५०६/- मात्र खर्च अपेक्षित असून, **याकामी येणारे खर्चास व सदरहू काम फॅब्रिकेटर्स/वर्कशॉपधारकांकडून कोटेशन बोलावून करुन घेणेस मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात यावी, अशी या उपसमिती शिफारस मान्य करण्यात आली.** (कार्यवाही-विद्युत विभाग)

**०७) <u>श्रीसाईबाबा भक्तनिवासस्थान इमारतीमधील जिन्याचे जवळ लोखंडी दरवाजे बसविणे बाबत</u>**

भक्तनिवासस्थान इमारतीमध्ये प्रत्यक्ष भक्तांचे वापरासाठी दैनंदिन ४९० खोल्या व १९८ लॉकर पध्दतीचा वापर करुन एकुण ३६२० इतक्या मोठया प्रमाणावर श्री साईभक्तांची निवासव्यवस्था केली जाते. या भक्तगणांचे सोबत त्यांची लहान-लहान मुले ही असतात. अशी लहान-लहान मुले खेळत जिन्याव्दारे वर इमारतीच्या टेरेसकडे जातात. टेरेसकडे जाण्यास मज्जाव होणे गरजेचे आहे. आलेल्या भक्तगणांमध्ये काही व्यक्ती मनोरुग्ण असण्याची शक्यता नाकारता येत नाही. अशा व्यक्तींनाही वर टेरेसच्या दिशेने जाता येऊ नये म्हणून वरचा भाग बंद ठेवणे गरजेचे आहे.

याशिवाय `अे ` विंग ३ रा माळा, अे / बी विंग ३ रा माळा, बी / सी विंग ३ रा माळा, सि / डी विंग ३ रा माळा, डि / अे विंग ३ रा माळा येथील प्रत्येक जिन्याचे वरील टेरेस जवळचा भाग हा एकांत स्वरुपात मोडतो. यामुळे तेथे काही अनुचित प्रकार घडण्याची शक्यता नाकारता येत नाही. तसेच वरचे भागावर विस्फोटक अथवा ज्वालाग्राही पदार्थ जवळ बाळगून वर जाऊन लपून बसणा-या व्यक्तीस यामुळे मज्जाव होण्यासाठी प्रत्येक विंगच्या तिस-या माळया जवळील जीन्यालगत लोखंडी भक्कम दरवाजे विद्युत विभागामार्फत बनवून घेणे गरजेचे आहे व दरवाजे बसविल्यानंतर त्यास कुलूपे घालून बंद करुन ठेवता येतील,असे साईबाबा भक्तनिवासस्थानने दि.०८-०३-२००८ चे टिपणीनुसार कळविले आहे.

त्यानुसार श्री साईबाबा भक्तनिवासस्थान इमारतीमध्ये साईजप्रमाणे खालीलप्रमाणे लोखंडी गेट बसवावे लागेल. तपशील खालीलप्रमाणे :-

| अ.क्र. | तपशील | साईज | मागणी | दर (अंदाजे ) | रक्कम रुपये |
|---|---|---|---|---|---|
| ०१) | ` अे ` विंग ३ रा माळा | १०` x ५` | ५० स्क्वेअर फूट | रु. २१०.०० (प्रति स्क्वेअर फूट) | १०,५००.०० |
| ०२) | ` अे / बी ` विंग ३ रा माळा | १०` x ५` | ५० स्क्वेअर फूट | रु. २१०.०० (प्रति स्क्वेअर फूट) | १०,५००.०० |
| ०३) | ` बी / सी ` विंग ३ रा माळा | १०` x ५` | ५० स्क्वेअर फूट | रु. २१०.०० (प्रति स्क्वेअर फूट) | १०,५००.०० |
| ०४) | ` सी / डी ` विंग ३ रा माळा | १०` x ५` | ५० स्क्वेअर फूट | रु. २१०.०० (प्रति स्क्वेअर फूट) | १०,५००.०० |
| ०५) | ` डी / अे ` विंग ३ रा माळा | १०` x ५` | ५० स्क्वेअर फूट | रु. २१०.०० (प्रति स्क्वेअर फूट) | १०,५००.०० |
| | | | | एकुण रक्कम रुपये :- | ५२,५००.०० |

उपरोक्तप्रमाणे श्री साईबाबा भक्तनिवासस्थान इमारतीमधील प्रत्येक विंगच्या तिस-या माळया जवळील जीन्यालगत लोखंडी भक्कम गेट बसविणेसाठी रक्कम रुपये २१०/- प्रति स्क्वेअर फूट प्रमाणे २५० स्क्वेअर फूटासाठी अंदाजे रक्कम रुपये ५२,५००.०० मात्र खर्च अपेक्षित असून, याकामी येणारे खर्चास व सदरहू काम फॅब्रिकेटर्स/वर्कशॉपधारकांकडून कोटेशन बोलावून करुन घेणेस मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

**यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा भक्तनिवासस्थान इमारतीमधील प्रत्येक विंगच्या तिस-या माळया जवळील जीन्यालगत लोखंडी गेट न बनविता कोलॅप्सेबल गेट बसविण्यात यावे. सदरहू काम फॅब्रिकेटर्स/वर्कशॉपधारकांकडून कोटेशन बोलावून करुन घेणेस व याकामी येणारे खर्चास मान्यता देण्यात यावी, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.** (कार्यवाही-विद्युत विभाग)

**०८) <u>पवनचक्कीचे मॉडेल देणगी म्हणून स्विकारणे बाबत.</u>**

अपारंपारिक ऊर्जेअंतर्गत २.५ मेगावॅट पवनचक्की प्रकल्प भोयरे-पठार या गावाच्या पठारावर ऊभारणेकामी मा. व्यवस्थापन समितीचे निर्णयानुसार हा प्रकल्प उभारण्यासाठी संस्थानने मे.सुझलॉन एनर्जी लि.दिल्ली यांना कार्यादेश दिलेला होता. मे.सुझलॉन एनर्जी लि. यांनी काम पूर्ण करून प्रकल्प कार्यान्वित केला आहे.

मध्यंतरी मे.सुझलॉन इंडिया लि.चे उपाध्यक्ष श्री.मंगल हे शिर्डी येथे आले असतांना त्यांनी शिर्डीत येणा-या श्री साईभक्तांना अपारंपारिक ऊर्जाबाबत जिज्ञासा निर्माण व्हावी याकरीता पवनचक्कीचे एक १५ फूटी मॉडेल (किंमत रुपये ६०,०००/-) देणगी देण्याची इच्छा व्यक्त केली.

हे मॉडेल १५ फूट उंचीचे असून साधारणतः एक टन वजनाचे आहे. याबाबत सुझलॉन कं.चे भारताच्या पश्चिम विभागाचे ऑपरेशन हेड श्री.अनिल गगवानी यांनी एक इ-मेल पाठविला असून त्यात मे.सुझलॉन इंडिया लि.चे उपाध्यक्ष श्री.मंगल हे देणगी देऊ इच्छित असल्याचे कळविले आहे.

संस्थान परिसरात हे पवनचक्कीचे मॉडेल ठेवणे योग्य दिसणार नाही, त्याऐवजी हे मॉडेल नविन प्रसादालयाकडे उभे केले तर, नविन प्रसादालयात डिस्प्ले हॉल बनविण्यात आला असून संस्थानच्या सर्व उपक्रमांवर त्याठिकाणी भक्तांना माहिती देण्यात येणार आहे. तसेच नविन प्रसादालयात प्रगत दर्जाची सोलर स्टिम कुकीग सिस्टिम बसविण्यात येणार असून या सोलर स्टिम कुकींगच्या मॉडेलबरोबरच पवनचक्कीचे हे मॉडेल ठेवल्यास सोलर स्टिम कुकीग सिस्टिमच्या माहितीसोबतच भक्तांना पवनउर्जेचीही माहिती होईल, व त्यांना एकाच ठिकाणी दोन्ही बाबी बघता येऊ शकेल .

तरी **मे.सुझलॉन एनर्जी लि. यांनी देऊ केलेले हे पवनचक्कीचे मॉडेल देणगी म्हणून स्विकारणेस तसेच सदरचे मॉडेल नविन प्रसादालयाकडे ठेवणेस मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, तो अमान्य करण्यात यावा,अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.** (कार्यवाही-विद्युत विभाग)

**०९) स्वयंसेवी भोजन व्यवस्थेकामी लोखंडी फोल्डींग टेबल तयार करणे बाबत.**

दिवसेंदिवस साईभक्तांचे गर्दीचे प्रमाण वाढत आहे. त्यामुळे सध्याचा प्रसादालयामध्ये प्रसाद भोजनचा लाभ घेतांना भक्तांना जास्त वेळ प्रतिक्षा रांगेत थांबावे लागू नये यासाठी वाढीव सेवा/सुविधा म्हणून स्वयंसेवी भोजनव्यवस्था पुरविण्यात येत आहे. त्याकामी आतापर्यंत लागणारे टेबल्स भाडयाने घेतो. परंतू सदर टेबल्स उंचीने जास्त असल्यामुळे कर्मचा-यांना सेवा देतांना त्रास होतो.

साईभक्तांना स्वयंसेवी भोजनव्यवस्था पुरविणेकामी लांबी ८` x रुंदी २.५` x उंची २.२५` मोजमापाचे २० नग लोखंडी फोल्डींग टेबल्स प्राधान्याने बनवून मिळावेत. सदर टेबल बनवितांना सर्व्हीस टेबल्सला बैठक व्यवस्था असणे गरजेचे आहे. विद्युत विभागामार्फत स्वयंसेवी भोजन व्यवस्थेकामी लोखंडी फोल्डींग टेबल तयार करणेकामी प्रसादालय विभागाने दिनांक २६-०३-२००८ चे टिपणीनुसार कळविलेले आहे.

प्रसादालय विभागातील स्वयंसेवी भोजनव्यवस्थेसाठी नविन लोखंडी २० नग फोल्डींग टेबल तयार करणेसाठी आवश्यक असणारे मटेरीअल विद्युत विभागातील वर्कशॉपमध्ये उपलब्ध नसल्याने खालीलप्रमाणे मटेरीअल खरेदी करावे लागणार आहे.

| अ.क्र. | तपशील / साईज | मागणी | दर (अंदाजे) रु | रक्कम रुपये |
|---|---|---|---|---|
| ०१) | एम.एस.आयताकृती पाईप,<br>साईज :- ५० x २५ x ३ एम.एम. | ९०० फूट. | ७०.०० (प्रति फूट) | ६३,०००.०० |
| ०२) | एम.एस. अँगल,<br>साईज :- २५ x २५ x ३ एम.एम. | ०१२ किलो. | ५५.०० (प्रति किलो) | ६६०.०० |
| ०३) | एम.एस.फ्लॅट पट्टी,<br>साईज :- २० x ५ एम.एम. | ०५० किलो. | ५५.०० (प्रति किलो) | २,७५०.०० |
| | | | रक्कम<br>+ वॅट १२.५ % | ६६,४१०.००<br>८,३०१.०० |
| | | | रक्कम<br>+ लेबर चार्जेस २५% | ७४,७११.००<br>१८,६७८.०० |
| | | | रक्कम :-<br>+ सर्व्हीस टॅक्स १२.५% | ९३,३८९.००<br>११,६७४.०० |
| | | | **एकुण रक्कम :-** | **१,०५,०६३.००** |

उपरोक्तप्रमाणे प्रसादालय विभागातील स्वयंसेवी भोजनव्यवस्थेसाठी नविन लोखंडी २० नग फोल्डींग टेबल बाहेरील फॅब्रिकेटर्स/वर्कशॉपधारकांकडून तयार करुन घेणेसाठी अंदाजे रक्कम रु.१,०५,०६३.००मात्र खर्च अपेक्षित असून या कामी कोटेशन मागविणेस मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

**यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रसादालय विभागातील स्वयंसेवी भोजनव्यवस्थेसाठी नविन लोखंडी २० नग वजनाने हलके असे फोल्डींग टेबल नमुना मान्य करुन घेऊन बाहेरील फॅब्रिकेटर्स/वर्कशॉपधारकांकडून कोटेशन मागवून तयार करुन घेणेस व याकामी येणारे अंदाजे रक्कम रु.१,०५,०६३.०० चे खर्चास मान्यता देण्यात देण्यात यावी,अशी उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.** (कार्यवाही-विद्युत विभाग)

**१०) संगणक संच व इतर साहित्य खरेदी करणेबाबत.**

श्रीसाईबाबा संस्थानचे कार्यालयीन संगणकीकरण कार्यक्रमांतर्गत संस्थान परिसरातील विविध कार्यालये, काऊंटर्स इ. एकमेकांशी जोडणारे संगणकीय जाळ्यांची उभारणी करण्यात आलेली आहे. या संगणकीय जाळ्यांतर्गत साधारणतः ११०/११५ च्या दरम्यान संगणके माहिती तंत्रज्ञान विभागातील सर्व्हरव्दारे एकमेकांशी जोडण्यात आलेले आहेत. सध्या संस्थान परिसरातील विविध कार्यालये, देणगी

काऊंटर्स, खोली वाटप काऊंटर्स, प्रसादालय व कॅन्टीन काऊंटर्स, लेखाशाखेतील मनिऑर्डर्स/चेक इत्यादी ठिकाणचे कार्यालयीन कामकाज संगणकाव्दारे करण्यात येत आहे.

विविध कार्यालयांत, काऊंटर्ससाठी वापरण्यात येणारे संगणके खरेदी करुन ४ ते ५ वर्षाचा कालावधी उलटून गेलेला आहे. तसेच सर्व काऊंटर्सवरील संगणके २४ तास चालू राहत असल्याने, ते सतत नादुरुस्त होत असतात. संगणके बंद पडल्यास देणगी काऊंटर्स, रुम बुकींग सुविधा बंद पडते. नादुरुस्त संगणकात किरकोळ बिघाड असेल तर सदर संगणक तातडीने माहिती तंत्रज्ञान विभागामार्फत दुरुस्त करुन चालू करुन देण्यात येते. परंतु, सदर संगणकातील बिघाड दुरुस्त होण्यासारखा नसेल तर सदर ठिकाणी दुसरा संगणक द्यावा लागतो. सदर प्रक्रियेमध्ये बराच वेळ जातो. त्यामुळे विनाकारण श्रीसाईभक्तांना रांगेत ताटकळत उभे राहावे लागते व त्यांची नाराजी होते. माहिती तंत्रज्ञान विभागाकडे नविन संगणक उपलब्ध नसल्याने, सदर येणाऱ्या अडचणीं तात्काळ सोडविता येत नाही.

सद्यस्थितीत जनसंर्पक कार्यालय, लेखाशाखा, नवीन भक्तनिवासस्थान, प्रसादालय विभाग, आदी विभागांनी नवीन संगणक संच, प्रिंटर व युपीएसची मागणी केलेली असून, सदर विभागांचे कामकाजाचा आवाका पाहता त्यांना खालील तपशीलाप्रमाणे नविन संगणक संच, प्रिंटर व युपीएस उपलब्ध करुन देणे आवश्यक आहे.

**नविन खरेदी करावायाच्या संगणक संच, प्रिंटर व युपीएसचा तपशील पुढीलप्रमाणे-**

| Sr.No. | Description | Qty. |
|---|---|---|
| 01. | Intel core2Duo Processior 2.0 or Higher,160 GB Hard Disk, 1GB RAM,17" LCD Monitor, Without CD ROM or Floppy Drive,Optical Mouse & Keyboard, 1 Parallel, 1 COM port & USB ports, 10/100/1000 LAN Card, Windows XP Prfessional, **3 Years on site warrenty**. ***Make-* HP** | 06 |
| 02. | **UPS- 800(+) VA or Higher,** 3 Years Comprehensive Onsite Warranty**.** **Make – APC.** | 05 |
| 03. | **HP Laserjet Printer 1020** or Higher, 3 Years Comprehensive Onsite Warranty. Make – HP | 03 |

**उपरोक्त तपशीलाप्रमाणे संगणक संच, प्रिंटर व युपीएस खरेदी करणेसाठी अंदाजे रक्कम रुपये २,७०,०००/-+ टॅक्स खर्च अपेक्षित असून, त्यास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात यावी अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.** (कार्यवाही-आय.टी. विभागप्रमुख)

**११) साईबाबा भक्तनिवासस्थान इमारतीमध्ये अंतर्गत दुरध्वनी जाळयाचे विस्तारीकरण करणेबाबत.**

**(अ)** श्री साईबाबा संस्थानचे सर्व विभाग व इतर परिसर एकमेंकाशी अंतर्गत दूरध्वनी यंत्रणेअंतर्गत जोडणेकामी सन १९९२ मध्ये मेल्ट्रॉन या कंपनीची २५६ पोर्ट क्षमता असलेली सी डॉट तंत्रज्ञानावर आधारीत अंतर्गत दूरध्वनी यंत्रणा (EPABX SYSTEM), महाराष्ट्र शासनाची अंगीकृत कंपनी मे. महाराष्ट्र इलेक्ट्रॉनिक्स कॉर्पोरेशन लिमिटेड, मुंबई (MELTRON) यांचेकडून उपलब्ध करविण्यात आलेली होती. तद्नंतर, संस्थानचा वाढता व्याप व परिसर विकास, तसेच तंत्रज्ञानात झालेले मोठया प्रमाणावरील फेरबदल लक्षांत घेऊन, मा.विश्वस्त मंडळाच्या दिनांक २९-३१ मार्च, २००४ चे सभेतील निर्णयानुसार, मे. सिमेन्स इंडिया लि., मुंबई यांचेकडून २००० एक्सटेंशनच्या क्षमतेची डिजीटल तंत्रज्ञानावर आधारीत व अद्यायवत अशी अंतर्गत दूरध्वनी यंत्रणा माहे ऑगष्ट,२००४ मध्ये कार्यान्वीत करण्यात आलेली आहे. या अत्याधुनिक अंतर्गत दूरध्वनी यंत्रणेव्दारे समाधी मंदिर परिसर, रुग्णालय व धर्मशाळा परिसर, नविन भक्तनिवासस्थान या ठिकाणी तीन एक्सचेंज बसविण्यात आलेले असून, या तिन्ही एक्सचेंजमध्ये एकूण १९ Analog कार्डस् बसविण्यात आले आहेत. या १९ Analog कार्डस्व्दारे एकूण ४५ ० अंतर्गत दूरध्वनी विविध विभागांना संदेशवहनासाठी उपलब्ध करुन देण्यात आलेले आहेत.

**(ब)** श्रीसाईबाबा भक्तनिवासस्थान इमारतीमध्ये १४ व्हिआयपी रुम्स असून, सदर रुममध्येमध्ये अंतर्गत दूरध्वनी जोडण्या देण्यात आलेल्या होत्या. परंतु, सध्या साईनिवास अतिथिगृहामध्ये व्हिआयपी रुम्स तयार करण्यात आलेल्या असल्याने, श्री साईबाबा भक्तनिवासस्थान इमारतीमधील व्हिआयपी रुम्समधील अंतर्गत दूरध्वनी जोडण्या बंद करण्यात आलेल्या आहेत. तसेच सदर ठिकाणच्या दूरध्वनी केबल्स काढून घेण्यात आलेल्या आहेत. आता, श्री साईबाबा भक्तनिवासस्थान विभागाने त्यांचे दिनांक ०१ एप्रिल, २००८ रोजीचे टिपणीनुसार तूर्त ७ दूरध्वनी जोडण्याची मागणी केली आहे. सदर इमारतीमध्ये ०७ दूरध्वनी देणेसाठी दूरध्वनी केबल व इतर साहित्य बसविणे आवश्यक आहे. ०७ दूरध्वनींसाठी सदर साहित्य बसविणेऐवजी श्री साईबाबा भक्तनिवास्थानचे पूर्वीचे मागणीप्रमाणे एकूण २३ अंतर्गत दूरध्वनी जोडण्या देण्याचे नियोजन करण्यात यावे, असे नम्र मत आहे. यासाठी सदर इमारतीमध्ये दूरध्वनी जाळेचे

विस्तारिकरण करणे आवश्यक आहे. दूरध्वनी जाळे विस्तारीकरण करणेसाठी खालीलप्रमाणे दूरध्वनी साहित्य खरेदी करावे लागणार आहे.

| Sr. No. | Perticulers | Qty. | Approx. Rate Rs | Approx. Price |
|---|---|---|---|---|
| 01. | 2 pair PVC cable (0.5mm) with cassing & capping (ISI make) | 2000 mtrs. | 34/- per running mtr. | 68,000/- |
| 02. | 10 pair heavy duty telephone cable (0.5mm) with clamp fitting. | 700 mtrs. | 70/- per mtr. | 49,000/- |
| 03. | 50 pair DP box with connector ( Krone make) | 01 | 2000/- | 2000/- |
| 04. | 20 pair DP box with connector ( Krone make) | 05 | 450/- | 2250/- |
| 05. | Rosette box | 30 | 25/- | 750/- |
| 06. | Flexible pipe | 50 mtr. | 15/- per mtr. | 750/- |
| 07. | Installation & commissioning charges | | Lum sum | 7250- |
| | | | Total | 1,30,000/- ( Tax Extra) |

**(क)** श्री साईबाबा भक्तनिवासस्थान विभागाचे मागणीप्रमाणे दूरध्वनी जोडण्या देणेसाठी उपरोक्त तपशीलाप्रमाणे साहित्य खरेदी करावे लागणार असून, यासाठी अंदाजे रुपये १,३०,०००/- (कर अतिरिक्त) पर्यंतचा खर्च अपेक्षित आहे. सदर साहित्य खरेदीची कार्यवाही दूरध्वनी साहित्यांचे विविध अधिकृत पुरवठादारांकडून सिलबंद निविदा मागवून करता करता येईल.

**उपरोक्त परिच्छेदांत नमुद केलेप्रमाणे, श्री साईबाबा भक्तनिवासस्थान इमारतीमध्ये दूरध्वनी जोडण्या देणेसाठी आवश्यक साहित्य दूरध्वनी साहित्यांचे विविध पुरवठादारांकडून सिलबंद निविदा मागवून न्यूनतम दरपत्रकधारकाकडून खरेदी करणेस व त्यासाठी येणारे अंदाजे रक्कम रुपये १,३०,०००/- (कर अतिरिक्त) पर्यंतच्या खर्चास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात यावी अशी या उपसमितीची शिफारस आहे.**

(कार्यवाही-आय.टी. विभागप्रमुख)

**१२) <u>श्रीसाईबाबा इंग्लिश मिडीयम स्कुल कडील नियमावलीमध्ये नविन नियम समाविष्ट करणेबाबत.</u>**

श्री साईबाबा इंग्लिश मिडीयम स्कूलकडे विद्यार्थी व पालकांकरिता १२ नियमांची नियमावली फॉर्मवर असुन हया नियमावली मुळे शाळेचे प्रशासन व्यवस्थित होणे कामी बरीच मदत होते. दि.२८.०७.२००७ रोजी शिरडी येथे झालेल्या मा.व्यवस्थापन समिती सभेतील निर्णय क्र.५१५ (१०) नुसार मा.व्यवस्थापन समिती सभेत विद्यार्थ्यांना प्रवेश देणेबाबत नविन नियमावली तयार करून मान्यता घेणेबाबत सुचविण्यात आलेले आहे. त्याकरीता सध्या उपलब्ध असलेल्या नियमावलीत खालील नियम समाविष्ट करणेस मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

०१) दरवर्षी फक्त ८० विद्यार्थी /विद्यार्थीनीनाच ज्यु.के.जी वर्गाकरिता प्रवेश देण्यात यावा .

०२) प्रथम नाव नोंदणी करणाऱ्या पालकास प्रथम प्राधान्य या तत्वानुसार प्रवेश प्रक्रिया असावी.

०३) ज्यु.के.जी प्रवेशावेळी पालकांनी मुळ जन्मतारीख दाखला शाळेत जमा करावा . तसेच ज्यु.के.जी संपूर्ण शुल्क (फी ) भरावी .

०४) वय वर्ष ४ पुर्ण झालेल्या विद्यार्थी/विदयार्थीनीसच शासन नियमाप्रमाणे शाळेत प्रवेश दयावा.

०५) इयत्ता ज्यु.के.जी ते इ.१० वी या वर्गा करिता इतर शाळेतील विद्यार्थ्यानां प्रवेश देऊ नये . (शासकीय कर्मचारी बदली व्यतिरिक्त ) नैसर्गिकरित्या आपल्याच शाळेतील विद्यार्थी संख्या पुरेशी असते .

०६) शाळेत विद्यार्थी /विदयार्थीनीनी कोणत्याही मौल्यवान वस्तू ( अंगठी, चेन, घडयाळ,मोबाईल वगैरे) घेऊन येऊ नये.

०७) विद्यार्थी /विदयार्थीनीना एकदा दिलेला वर्ग ( डिव्हीजन ) परत बदलुन दिला जाणार नाही .

०८) शाळेत नेमून दिलेल्या बस स्टॉपवर बस थांबेल. एकदा दिलेला बस स्टॉप वर्षभर पालकांना बदलुन दिला जाणार नाही याची पालकांनी नोंद घ्यावी .

**यावर सविस्तर चर्चा होऊन,श्री साईबाबा इंग्लीश मिडीयम स्कूलकरीता खालीलप्रमाणे सुधारित नियमावली करण्यात यावी अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.**

**अ)**

०१) दरवर्षी फक्त ८० विद्यार्थी /विद्यार्थीनीनाच ज्यु.के.जी वर्गाकरिता प्रवेश देण्यात येईल .

०२) ज्यु.के.जी प्रवेशावेळी पालकांनी मुळ जन्मतारीख दाखला शाळेत जमा करावा . तसेच ज्यु.के.जी संपूर्ण वर्षाचे शैक्षणिक शुल्क (फी ) आगाऊ भरावी अन्यथा प्रवेश दिला जाणार नाही.

०३) १ जून रोजी वय वर्ष ४ पुर्ण झालेल्या विद्यार्थी/विदयार्थीनीसच शासन नियमाप्रमाणे ज्युनिअर के.जी.मध्ये प्रवेश देण्यात यावा.

०४) इयत्ता ज्यु.के.जी ते इ.१० वी या वर्गा करिता इतर शाळेतील विद्यार्थ्यानां प्रवेश देऊ नये .(शासकीय कर्मचारी बदली व्यतिरिक्त ) जागा रिक्त असल्यास मेरिटप्रमाणेच प्रवेश देण्यात येईल.

०५) शाळेत विद्यार्थी /विदयार्थीनीनी कोणत्याही मौल्यवान वस्तू ( अंगठी, चेन, घडयाळ,मोबाईल वगैरे) घेऊन येऊ नये आणल्यास व गहाळ झाल्यास संस्था जबाबदार रहाणार नाही.

०६) विद्यार्थी /विदयार्थीनीना एकदा दिलेला वर्ग ( डिव्हीजन ) परत बदलुन दिला जाणार नाही .

०७) नेमून दिलेल्या बस स्टॉपवर बस थांबेल. एकदा दिलेला बस स्टॉप वर्षभर पालकांना बदलुन दिला जाणार नाही याची पालकांनी नोंद घ्यावी .

०८) ज्यूनिअर के.जी. या वर्गात प्रवेश घेणाऱ्या पाल्याचे जे पालक पाल्याची ने-आण करण्याची जबाबदारी स्विकारतील अशाच पाल्यांना प्रवेशासाठी प्राधान्य देण्यात येईल.

ब) सन २००८ -२००९ या शैक्षणिक वर्षापासून श्री साईबाबा इंग्लीश मिडीयम स्कुलकरीता उपसमितीने सुचविलेल्या फी ऐवजी प्रत्येक टप्प्यावर रुपये ५००/- कमी करुन खालीलप्रमाणे सुधारित शैक्षणिक फी आकारण्यात यावी.

| अ.नं. | वर्ग | सध्याची शैक्षणिक फी रुपये | सुधारित शैक्षणिक फी रुपये |
|---|---|---|---|
| ०१ | ज्युनिअर के.जी. | १३००.०० | २०००.०० |
| ०२ | सिनिअर के.जी | १३००.०० | २०००.०० |
| ०३ | इयत्ता १ ली | १४००.०० | २२००.०० |
| ०४ | इयत्ता २ री | १४००.०० | २२००.०० |
| ०५ | इयत्ता ३ री | १६००.०० | २३००.०० |
| ०६ | इयत्ता ४ थी | १६००.०० | २३००.०० |
| ०७ | इयत्ता ५ वी | २०००.०० | २५००.०० |
| ०८ | इयत्ता ६ वी | २०००.०० | २५००.०० |
| ०९ | इयत्ता ७ वी | २१००.०० | २५००.०० |
| १० | इयत्ता ८ वी | २३००.०० | ३०००.०० |
| ११ | इयत्ता ९ वी | २३००.०० | ३०००.०० |
| १२ | इयत्ता १० वी | २३००.०० | ३०००.०० |

क) तसेच सन २००८-०९ पासून बसेसच्या सध्याचे फी मध्ये ३०% वाढ करण्यात यावी.

(कार्यवाही-अधिक्षक, आस्थापना विभाग/प्राचार्य, इंग्लिश मिडीयम स्कूल)

**१३) <u>संस्थान प्रकाशित खप नसलेली प्रकाशने संस्थान प्रकाशने यादीतुन कमी करणेबाबत.</u>**

गेल्या पाच वर्षापासून संस्थान प्रकाशित विशेषतः पुस्तकाचे प्रकाशनांमध्ये वाढ झाली असून, विविध आकाराचे फोटो यात उत्कृष्ट दर्जाचे फोटो, कॅसेट, ऑडीओ, व्हीडओ सी.डी. डीव्हीडी याप्रमाणे प्रकाशनात विलक्षणीय वाढ झाली आहे. यात काही खालील दर्शविलेल्या यादीतील जुन्या प्रकाशनांच्या विक्रीस भक्तांचा प्रतिसाद मिळत नसल्याने त्यास विशेष खप नसल्याने ती पडून आहेत. तथापी खालील स्टारने चिन्हांकित केलेली पीयुबी ०८, पीयुबी १०, पीयुबी २६, पीयुबी ३७, पीयुबी ३९ या पुस्तकांना आज मागणी नसली तरीही सदरची पुस्तके बाबांच्या कालीन भक्तांनी लिहिलेली असल्याने त्यांचे महत्व वेगळे आहे, तरी सदरची पुस्तके वगळता, खालील दर्शविलेल्या तपशिलातील पुस्तके/फोटो, कॅसेट/सी.डीच्या १ एप्रिल २००७ ते ३१ मार्च २००८ अखेर वार्षिक विक्रीच्या अनुषंगाने मासिक सरासरी खप लक्षात घेता, खालील पुस्तके/फोटो व कॅसेट/सी.डी.ची पूर्णतः विक्री करुन तदनंतर ती पुर्नमुद्रण न करता सदरची खालील प्रकाशने संस्थान प्रकाशने यादीतीतून कमी करणे आवश्यक आहे.

अ) पुस्तके

| अ.नं. | पुस्तकाचे नांव | छपाई तारीख संख्या | पुस्तकाची छपाई संख्या | आज अखेर शिल्लक | सरासरी मासिक खप | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|
| पीयुबी ०८ * | श्री साईसत् चरित्र पोथी गुजराथी | १.१.२००० | ५००० | २ | -- | विक्रीस अपेक्षित प्रतिसाद नाही |
| पीयुबी ०९ | श्री साईसत् चरित्र सिंधी | १.१.२००० | २००० | ४०९ | १७ | मासिक सरासरी विक्रीचा खप पहाता विक्रीस अपेक्षित प्रतिसाद नाही. |
| पीयुबी १० * | साईलीलामृत मराठी | १६.१०.२००३ | २०००० | ७९७० | २१४ | मासिक सरासरी विक्रीचा खप पहाता विक्रीस अपेक्षित प्रतिसाद नाही. |
| पीयुबी १७ | श्री साई सगुणोपासना आरती सिंधी | ०६.२.१९९८ | ५००० | १७६८ | ५ | मासिक सरासरी विक्रीचा खप पहाता विक्रीस अपेक्षित प्रतिसाद नाही. |
| पीयुबी २६ * | श्री साईनाथ भजनमाला मराठी | ०९.४.२००१ | २००० | ११३० | ९ | मासिक सरासरी विक्रीचा खप पहाता विक्रीस अपेक्षित प्रतिसाद नाही. |
| पीयुबी ३६ | साई दी सुपरमॅन इंग्रजी | २८.१०.०२ | २५००० | २१११८ | १६७ | मासिक सरासरी विक्रीचा खप पहाता विक्रीस अपेक्षित प्रतिसाद नाही. |
| पीयुबी ३७ * | श्री साईबाबा ऑफ शिर्डी प्रधान इंग्रजी | १५.१०.०३ | १०००० | १२३९८ | १२२ | मासिक सरासरी विक्रीचा खप पहाता विक्रीस अपेक्षित प्रतिसाद नाही. |
| पीयुबी ३८ | श्री साईबाबा ऑफ शिर्डी भरुचा इंग्रजी | १५.१०.०३ | १०००० | १२९५५ | १३३ | मासिक सरासरी विक्रीचा खप पहाता विक्रीस अपेक्षित प्रतिसाद नाही. |
| पीयुबी ३९ * | खापर्डे डायरी इंग्रजी | १८.४.२००० | ५०००० | ४१३२१ | १५० | मासिक सरासरी विक्रीचा खप पहाता विक्रीस अपेक्षित प्रतिसाद नाही. |
| पीयुबी ४२ | श्री साई सतचरित्र कन्नड पोथी | १८.४.२००० | ५००० | २२९९ | ५१ | मासिक सरासरी विक्रीचा खप पहाता विक्रीस अपेक्षित प्रतिसाद नाही. |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| पीयुबी ४८ | खापर्डे डायरी मराठी | ९.०२.२००५ | ५०००० | ४७५५८ | ९२ | मासिक सरासरी विक्रीचा खप पहाता विक्रीस अपेक्षित प्रतिसाद नाही. |
| पीयुबी ५० | श्री साईबाबा १०८ नामावली झरीन इंग्रजी | ४.६.२००२ | १०००० | ६०५ | १६१ | मासिक सरासरी विक्रीचा खप पहाता विक्रीस अपेक्षित प्रतिसाद नाही. |
| पीयुबी ५१ | श्री साईनाथ स्तवन मंजरी इंग्रजी | ४.६.२००२ | १०००० | ६०५२ | ७४ | मासिक सरासरी विक्रीचा खप पहाता विक्रीस अपेक्षित प्रतिसाद नाही. |
| पीयुबी ५३ | शिर्डी साईबाबा ॲन इपिक इंग्रजी | २५.७.२००३ | १०००० | ६५१६ | १८६ | मासिक सरासरी विक्रीचा खप पहाता विक्रीस अपेक्षित प्रतिसाद नाही. |
| पीयुबी ६३ | श्री साई महात्म्य मराठी | १४.१.२००५ | ५००० | २९०७ | ७७ | मासिक सरासरी विक्रीचा खप पहाता विक्रीस अपेक्षित प्रतिसाद नाही. |
| पीयुबी ६४ | श्री साई ललित चरित्र मराठी | २३.७.२००५ | ५००० | ३००३ | १२६ | मासिक सरासरी विक्रीचा खप पहाता विक्रीस अपेक्षित प्रतिसाद नाही. |

ब) फोटो

| अ.नं. | फोटोचे नांव व आकार | छपाई तारीख संख्या | पुस्तकाची छपाई संख्या | आज अखेर शिल्लक | सरसरी मासिक खप | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|
| पीयुबी १०७ | द्वारकामाई फोटो चार रंगात७"x १०" | ३.५.२००२ | ५०००० | ६५८६ | १२२८ | मासिक सरासरी विक्रीचा खप पहाता विक्रीस अपेक्षित प्रतिसाद नाही. |
| पीयुबी १०९ | द्वारकामाईत बसलेले बाबा फोटो चार रंगात १० " x १४" | १९.०६.२००४ | १००००० | ११०३०२ | २०९५ | मासिक सरासरी विक्रीचा खप पहाता विक्रीस अपेक्षित प्रतिसाद नाही. |
| पीयुबी ११० | द्वारकामाईत बसलेले बाबा फोटो चार रंगात ७" x १०" | १२.९.२००२ | २५००० | २१०८४ | ११७२ | मासिक सरासरी विक्रीचा खप पहाता विक्रीस अपेक्षित प्रतिसाद नाही. |
| पीयुबी १११ | श्री साईबाबा चेहरा फोटो पोष्ट कार्ड साईज | ०६.१२.२००४ | ५०००० | - | २५२४ | मासिक सरासरी विक्रीचा खप पहाता विक्रीस अपेक्षित प्रतिसाद नाही. |
| पीयुबी ११२ | पालखी फोटो चार रंगात -७" x १०" | १९.६.२००४ | ५०००० | २०७१३ | ९७५ | मासिक सरासरी विक्रीचा खप पहाता विक्रीस अपेक्षित प्रतिसाद नाही. |
| पीयुबी ११५ | मुर्ती फोटो चार रंगात ७ " x १०" | २९.४.२००६ | ५०००० | ९० | १९९४ | मासिक सरासरी विक्रीचा खप पहाता विक्रीस अपेक्षित प्रतिसाद नाही. |
| पीयुबी ११८ | दगडावर बसलेले बाबा कलर २ " x ३" | ९.६.२००४ | ५०००० | १०७ | ७ | मासिक सरासरी विक्रीचा खप पहाता विक्रीस अपेक्षित प्रतिसाद नाही. |
| पीयुबी ११९ | दगडावर बसलेले बाबा चार रगांत - ४ " X ६" | ३.५.२००२ | २००००० | २३५५५७ | २७६४ | मासिक सरासरी विक्रीचा खप पहाता विक्रीस अपेक्षित प्रतिसाद नाही. |
| पीयुबी १२० | दगडावर बसलेले बाबा चार रगांत - ७ " x १०" | २२.७.२००० | ६००००० | २७५६०२ | १०६६ | मासिक सरासरी विक्रीचा खप पहाता विक्रीस अपेक्षित प्रतिसाद नाही. |
| पीयुबी १२१ | मुर्ती फोटो चार रगांत २ " x ३" | ०९.१.२००६ | ५००००० | ० | १२ | मासिक सरासरी विक्रीचा खप पहाता विक्रीस अपेक्षित प्रतिसाद नाही. |
| पीयुबी १२२ | मुर्ती फोटो चार रगांत ४ " x ६" | ९.१.२००६ | ५०००० | २३९ | २७३४ | मासिक सरासरी विक्रीचा खप पहाता विक्रीस अपेक्षित प्रतिसाद नाही. |
| पीयुबी १२३ | दगडावर बसलेले बाबा चार रगांत - १० " x १४" | २९.४.२००६ | ५०००० | ४१४५६ | ६३६ | मासिक सरासरी विक्रीचा खप पहाता विक्रीस अपेक्षित प्रतिसाद नाही. |

क) कॅसेट/सी.डी.

| अ.नं. | सी.डी./कॅसेटचे नांव | निर्मिती तारीख | निर्मिती संख्या | आज अखेर शिल्लक | सरसरी मासिक खप | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|
| पीयुबी २०१ | श्री साईबाबा आरती कॅसेट (४ कॅसेटचा संच) | २५.४.०७ | ५००० संच | १३८९ | ३२४ | श्री साईबाबा आरतीची ऑडीओ/ व्हीडीओ सी.डी. व डीव्हीडी विक्रीस उपलब्ध असल्याने कॅसेट विक्रीस प्रतिसाद नाही. |
| पीयुबी २०२ | गुरुपाठाचे अभंग कॅसेट (२ कॅसेटचा संच) | ३१.१२.२००३ | ५००० संच | १३५४ | ५८ | गुरुपाठाची ऑडीओ सी.डी. उपलब्ध असल्याने कॅसेट विक्रीस अपेक्षित प्रतिसाद मिळत नाही. |
| पीयुबी २०५ | ओंकार साधना (मार्गदर्शिका) व्हीसीडी | ०४.०९.२००४ | ५००० नग | २७०० | ७० | अपेक्षित प्रतिसाद नसल्याने सदर व्हीसीडीची पुर्ननिर्मिती करणे उचित होणार नाही. |
| पीयुबी २०६ | ओंकार साधना (मार्गदर्शिका) कॅसेट | २१.१.२००६ | १००० नग | ४४१ | ३२ | अपेक्षित प्रतिसाद नसल्याने सदर कॅसेटची पुर्ननिर्मिती करणे उचित होणार नाही. |

**उपरोक्तप्रमाणे "अ" नुसार यादीत स्टार चिन्हांकित दर्शविलेले पाच पुस्तके वगळता इतर पुस्तके व "ब" नुसार फोटो विक्रीस अपेक्षित प्रतिसाद मिळत नसल्याने त्याचे पुर्नमुद्रण न करता तसेच "क" नुसार कॅसेट/सी.डी. विक्रीस अपेक्षित प्रतिसाद मिळत नसल्याने त्याची पुर्ननिर्मिती न करता ते संस्थान प्रकाशने यादीतून कमी करणेस तसेच सध्या श्री साईबाबांचे जीवनावर आधारित बरेच खाजगी प्रकाशने खाजगी बुकस्टॉलवर विक्रीस उपलब्ध आहेत, तथापी त्यास साईभक्तांचा विशेष प्रतिसाद मिळत नसल्याने ती संस्थानने स्वीकारणेबाबत बराच पत्रव्यवहार वेळोवेळी केला जातो. संस्थान प्रकाशित प्रकाशनांना संस्थान मान्यता आहे. त्यामधील मजकूर/माहिती ही अधिकृत मानली जाते. तरी इतर कुठल्याही अन्य खाजगी प्रकाशनांचे हक्क स्वीकारण्यात येऊ नयेत असा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात यावी अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.** (कार्यवाही-प्रकाशने विभागप्रमख)

**१४) श्री साईसत्चरित्र पंजाबी भाषेतील संस्थान व्दारे प्रकाशित करणे बाबत.**

डॉ. गुनजितसिंग वालिया अमृतसर यांचे दि.१२.०३.२००८ रोजी श्री साईसत्चरित्र पंजाबी भाषेत संस्थानद्वारा प्रकाशित करणेबाबतचे विषयात्मक पत्र दाखल झाले आहे. पत्रासोबत त्यांनी त्यांचेद्वारा लिखीत पूर्णपणे श्री साईसत्चरित्र पंजाबी भाषांतराचे संगणकीकृत केलेल्या प्रतीतील डीटीपी व सी.डी. प्रकाशने विभागात दाखल केली आहे. उपरोक्त पत्रासोबत त्यांनी त्यांची वैयक्तिक माहिती व त्यांचेद्वारा पंजाबी भाषेतील रुपांतराचे प्रेस ॲण्ड पब्लीकेशन डिपार्टमेंट, गुरुनानक देव युनिव्हर्सिटी,अमृतसर यांचेकडून तपासून त्यांचेद्वारा केलेल्या परिक्षणाचे शिफारस पत्र त्यांनी पत्रासोबत अवलोकनार्थ सादर केले आहे. सदरचे शिफारस पत्रात डॉ. गुनजितसिंग वालिया द्वारा कै.गोविंद रघुनाथ दाभोलकर लिखीत मुळ मराठी ग्रंथाचे पंजाबी भाषेत भाषांतर केले असल्याचे नमुद केले आहे.

पंजाबी भाषेत संस्थानद्वारा श्री साईसत्चरित्र प्रकाशित करण्यात आलेले नाही. पंजाबी भाषिक दिल्ली शहरातही मोठ्या संख्येने आहेत. दिल्ली, हरियानात साई मंदिरे आहेत. संस्थानद्वारा पंजाबी साईसत्चरित्र प्रकाशित केलेस पंजाबी साईभक्तांना त्याचा चांगला लाभ होऊ शकेल.

डॉ. गुनजितसिंग वालिया अमृतसर यांचेद्वारा भाषांतरीत केलेले पंजाबी साईसत्चरित्र श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी मार्फत प्रकाशित करणेसाठी सदर साईसत्चरित्राचे हक्क त्यांनी संस्थानला प्रदान करण्याची तयारी दर्शविली आहे.

**तरी डॉ. गुनजितसिंग वालिया अमृतसर यांचेद्वारा पंजाबी भाषेत भाषांतरीत केलेले श्री साईसत्चरित्र संस्थानद्वारे प्रकाशित करणेस मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात यावी अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.** (कार्यवाही-प्रकाशने विभागप्रमुख)

**१५) श्रीसाईबाबा मंदीरातील आरत्या, मंत्रोच्चार,ऑडिओ,सी.डी.एम.पी.३ निर्मिती खर्चास मंजुरी मिळणेबाबत.**

मा. व्यवस्थापन मंडळाचे दि.०३-५/१०/२००३ चे सभेतील निर्णय क्र.४६५ नुसार समाधि मंदिरातील चारही आरत्याच्या कॅसेट व सी.डी. तयार करुन साईभक्तांना उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे.
श्री साईबाबा संस्थान विश्वसतव्यवस्था,शिर्डी अधिनियम २०४ मधील अधिनियम नंबर १७ (२) मधील (ठ) मध्ये "श्री साईबाबांचे जीवन, त्यांचे कार्य, त्यांच्या लीला व त्यांची शिकवण याबाबतच्या उपयुक्त माहितीचा प्रचार व प्रसार करील आणि श्री साई साहित्य ग्रंथालय चालविल व त्याचा विस्तार करील," तसेच (ड) मध्ये " श्री साईबाबांच्या भक्तांमध्ये बंधुभाव, एकता, श्रध्दा आणि समता या भावना वाढीस लावणारे उपक्रम अथवा कार्यक्रम आयोजित करील किंवा हाती घेईल," अशी तरतूद करण्यात आलेली आहे. त्या अनुषंगाने श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी निर्मित श्री साईबाबा मंदिरातील आरत्या व मंत्रोच्चार ऑडिओ सी.डी. चा साठा संपला असल्याने, नवीन एमपी३ मध्ये सी.डी. ची निर्मिती करुन घेणे गरजेचे आहे.

मा. व्यवस्थापन समितीचे दि.१०.०१.२००८ चे सभेतील विषय नं.७१ निर्णय क्र ७१ नुसार सोनी डीएडीसी मॅन्यु. फॅक्चरींग इंडिया प्रा. कंपनी, यांचेकडून सी.डी./व्हीसीडी निर्मितीसाठी असलेल्या त्यांच्या शर्ती/अटी मान्य करण्यात येऊन त्यांचेकडून वेळोवेळी कायम स्वरुपी संस्थान प्रकाशित सी.डी./व्हीसीडी निर्मितीचे काम करुन घेणेस मान्यता देण्यात आले नुसार श्री. सुधांशु , संगीत मार्गदर्शक, कन्याविद्यामंदिर, शिर्डी हे स्वतः मुंबई येथे जाऊन त्यांनी श्री साईबाबा मंदिरातील आरत्या व मंत्राच्चार ऑडीओ सी.डी निर्मिती कामाचे सोनी डीएडीसी मॅन्यु. फॅक्चरींग इंडिया प्रा. कंपनी, मुंबई यांचे दि.१८.०३.२००८ चे कोटेशन आणलेले आहे. कोटेशन मधील दर खालील प्रमाणे.

| अ.नं. | तपशिल | नग | व्हॅट व इतर करांसह प्रती दर | एकूण रक्कम |
|---|---|---|---|---|
| ०१ | श्री साई मंदिरातील आरत्या व मंत्रोच्चार ऑडीओ सी.डी. (एमपी३) | १०,००० | १४.६० | १,४६,०००/- |

उपरोक्त प्रमाणे सोनी डीएडीसी मॅन्यु. फॅक्चरींग इंडिया प्रा. कंपनी, मुंबई यांनी श्रीसाई मंदिरातील आरत्या व मंत्रोच्चार ऑडीओ सी.डी. १०,००० नग निर्मितीसाठी एकूण रुपये १,४६,०००/- इतका खर्च कोटेशन मध्ये दिला आहे. तसेच नव्याने आर्ट वर्कचे कामही करुन घेणे गरजेचे असल्याने सदचे कामासाठी रक्कम रुपये ४०००/- खर्च मिळून एकूण रुपये १,५०,०००/- (अक्षरी रुपये एक लाख पन्नास हजार मात्र) येणार आहे. सदरचे काम हे श्री सुधांशु लोकेगावकर , संगीत मार्गदर्शक, कन्याविद्यामंदिर यांचेमार्फत त्यांचे मार्गदर्शनाखाली करुन घेणे आहे. सदरचा खर्च ऑडीओ/व्हीडीओ सी.डी. निर्मितीकामी एप्रिल २००८ ते मार्च २००९ ह्या आर्थिक वर्षाचे मंजूर बजेट तरतुद रक्कमेतून करता येईल.

**तरी श्री साईबाबा मंदिरातील आरत्या व मंत्रोच्चार ऑडिओ सी.डी. १०,००० नग एम.पी.३ मध्ये तयार करणेकामी रक्कम रुपये १,५०,०००/- मात्रचे खर्चास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात यावी अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.** (कार्यवाही-प्रकाशने विभागप्रमुख)

**विषय नं. ०२ दिनांक १०.०५.२००८ रोजी शिर्डी येथे झालेल्या उपसमिती सभेचे इतिवृत्त**

निर्णय क्र.४१५दिनांक १०.०५.२००८ रोजी शिर्डी येथे झालेल्या उपसमिती सभेचे इतिवृत्ताच्या प्रती सर्व सदस्यांना पुरविण्यात आल्या होत्या, त्याची नोंद घेण्यात येऊन या इतिवृत्तातील खालील निर्णयांना पुष्टी देण्यात आली.

**१६) धर्मशाळा विभागाकडील उपहारगृह संस्थानमार्फत चालविणेबाबत.**

संस्थानचे धर्मशाळा (२००रुम) विभागाकडे साईभक्तांना चहा, कॉफी, दूध,अल्पोपहार, प्रसादभोजन, इत्यादी पदार्थ पुरविणेसाठी उपहारगृह सुरु करण्यात आलेले आहे. या उपहारगृहातून साईभक्तांना माफक दराने पुरविण्यात येणाऱ्या पदार्थांचे दर संस्थानमार्फत ठरविण्यात आलेले आहेत.

सदरचे उपहारगृह सुरुवातीपासुन ठेकेदारामार्फत वार्षिक भाडे तत्वावर चालविण्यात येत आहे. वर्तमानपत्रात जाहीरात देवून,निविदा मागणी करुन मा.व्यवस्थापन सभेपुढे निविदाधारकांशी चर्चा वाटाघाटी करुन, मासिकभाडे यांची निश्चिती करुन ठेकेदाराची निवड करण्यात येते.

उपरोक्त पध्दतीने, दि.३१ मार्च,२००७ रोजीचे मा.व्यवस्थापन समितीचे सभेतील निर्णय क्रमांक २५३ नुसार हे उपहारगृह श्री साईबालाजी सप्लायर्स एन.व्ही.गोविंदराव,शिर्डी यांना रु.७६,०००/-मासिक भाडेतत्वावर दि.२८/०५/२००७ पासुन १२ महिन्यांचे कालावधीसाठी,चालविण्यास देण्यात आलेले आहे. त्यांचे कराराचा कालावधी दि.२७/०५/२००८ अखेर संपुष्टात येत आहे.

ठेकेदार श्री साईबालाजी सप्लायर्स,शिर्डी यांचेकडून भक्तांना पुरविण्यात येणारे पदार्थांचे दर्जा बाबत तक्रार नाही. तथापि,उपहारगृह इमारत स्वच्छ ठेवणेबाबत ठेकेदाराचा कायम पाठपुरावा करावा लागतो. त्यामुळे इमारतीचा मेन्टेनन्स रहाण्याचे दृष्टीने दि.२७/०५/२००८ नंतर हे उपहारगृह ठेकेदारामार्फत न चालविता संस्थानमार्फतच या उपहारगृहातुन भक्तांना चहा,नाष्टापाकिटे व प्रसादभोजन देण्यात यावे असे मत आहे.

संस्थानचे साईबाबा भक्तनिवासस्थान (५०० रुम्स) विभागाकडे असलेले उपहारगृह गेल्या २ वर्षापासून संस्थानमार्फत चालविण्यात येत आहे. प्रसादालय विभागाचे मुख्य किचनमध्ये अन्न पदार्थ शिजवून,संस्थान वाहनाने साईबाबा भक्तनिवासस्थान विभागाकडे वाहून नेऊन रु.५/- सेवाआकार घेवून या उपहारगृहामध्ये भक्तांना प्रसादभोजन वितरीत करण्यात येते. प्रसादभोजनात पुरी / चपाती,दोन भाज्या,दाळभात,चटणी,इ.पदार्थ देण्यात येतात. याठिकाणी दररोज सुमारे ५ ते ६ हजार भक्त प्रसादभोजन घेतात.

प्रसादालयाचे मुख्य किचनमध्ये अन्न शिजवून,संस्थान वाहनाने वाहून नेऊन साईबाबा भक्तनिवासस्थान (५०० रुम्स) येथील उपहारगृहाप्रमाणेच धर्मशाळा (२०० रुम) येथील उपहारगृहात प्रायोगीक तत्वावर भक्तांना प्रसादभोजन देता येईल.

तसेच संस्थानचे मुख्य कॅंटीन विभागामार्फत साईबाबा भक्तनिवासस्थान विभागाप्रमाणे धर्मशाळा उपहारगृहामध्ये भक्तांना चहा,कॉफी,दुध,नाष्टापाकिटे पुरविता येतील.

नवीन प्रसादालयाचे इमारतीमध्ये प्रसादालय स्थलांतरीत झाल्यानंतर तेथे भक्तांना प्रसादभोजन देणे सुरु झाल्यावर आवश्यकतेनुसार सध्याचे प्रसादालयातील सामान साईबाबा भक्तनिवासस्थान (५०० रुम्स) उपहारगृहाकडे ठेवून त्याठिकाणी स्वयंपाक बनविण्यासाठी संस्थानमार्फत स्वतंत्र युनिट वाढविता येईल.

**तरी दि.२८/०५/२००८ पासून धर्मशाळा विभागाकडील उपहारगृह चालविण्यासाठी ठेकेदाराची नियुक्ती न करता हे उपहारगृह संस्थानमार्फत चालविण्यास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात यावी अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.**

(कार्यवाही-धर्मशाळा विभाग/प्रसादालय विभाग/कॅन्टीन विभाग)

**१७) धर्मशाळा इमारत नं.०१ मध्ये स्वच्छता व भक्तांना गरम पाणी पुरविणेबाबत.**

संस्थानचे धर्मशाळा विभागाकडे दोन इमारती असून,त्यातील अ.नं.२ ची पुर्ण इमारत व अ.नं.१ चे इमारतीमधील दोन हॉल व ४ खोल्या ' श्री साईनाथ रुग्णालयाचे ' वापरासाठी देण्यात आलेल्या आहेत. सध्या धर्मशाळा नं.१ या इमारतीमध्ये भक्तांचे निवासासाठी दोन हॉल व ४४ खोल्या असून,या ठिकाणची निवासक्षमता १२०० व्यक्तींपर्यंत आहे.

श्री साईनाथ रुग्णालयाचे कामकाज चालू असलेल्या धर्मशाळा नं.२ चे इमारतीमध्ये तसेच इमारतीचा परिसर,रस्त्यांची साफसफाईची तसेच इमारतीमधील संडास,बाथरुम स्वच्छतेची कामे संस्थानचे आरोग्य विभागामार्फत करण्यात येतात. आणि भक्तांचे निवासासाठी असलेल्या धर्मशाळा नं.१ या इमारतीमधील साफसफाई व स्वच्छता करण्यासाठी तसेच भक्तांना स्नानासाठी गरमपाणी पुरविणेसाठी ठेकेदाराची नियुक्ती करण्यात येते. धर्मशाळा इमारत चालू झाले पासुनची ही पध्दत आहे.

इमारतीमधील साफसफाई तसेच शौचालय,स्नानगृहाचे स्वच्छतेसाठी भक्तांना गरमपाणी पुरविणे या कारणांसाठी ठेकेदार नियुक्ती करणेसाठी वर्तमानपत्रात जाहीरात देवून लायसन्स फी पोटी दरमहा संस्थानला किती जास्तीची रक्कम देणार यासाठी ठेकेदारांकडून निविदा मागविण्यात येतात. मा.व्यवस्थापन समिती सभेसमोर चर्चा वाटाघाटीने लायसेन्स फी ची रक्कम निश्चित करुन ठेकेदाराची निवड करण्यात येते.

भक्तांना,शौचालय स्नानगृह व गरमपाणी या सेवा देण्यासाठी प्रति व्यक्तींसाठी रु.३/-सेवाआकार घेण्यात येतो. व ही रक्कम ठेकेदारास दरमहा आदा करण्यात येते. निवड केलेल्या ठेकेदाराकडून डिपॉझीटपोटी रु.२५,०००/- रक्कम ठेवण्यात येते व सर्व अटी- शर्तीस अनुसरुन ठेकेदाराकडून करारनामा करुन घेण्यात येतो.

उपरोक्त पध्दतीने दि.२० मे,२००७ रोजीचे मा.व्यवस्थापन सभेतील निर्णय क्र.२५३ नुसार, धर्मशाळा इमारत नं.१ मधील साफसफाई,शौचालय,स्नानगृह स्वच्छता व भक्तांना गरमपाणी पुरविणेसाठी श्री सिध्दीविनायक एन्टरप्रायझेस,सोलापूर यांची दि.२२/०५/२००७ पासून १२ महिन्यांचे कालावधीसाठी संस्थानला मासिक रु.४१,१८०/- लायसेन्स फी देण्याचे अटीवर नेमणूक करण्यात आलेली आहे.

ठेकेदार श्री सिध्दीविनायक एन्टरप्रायझेस,सोलापूर हे दि.२२/०५/२००७ पासून देत असलेली सेवा समाधानकारक आहे. त्यांचे ठेकेदारीचा कालावधी दि.२१/०५/२००८ अखेर संपुष्टात येत आहे.

धर्मशाळा नं.१ व २ येथील स्वच्छताविषयक कामांमध्ये सुसुत्रता येण्याचे दृष्टीने यापुढे स्वच्छताविषयक कामांसाठी ठेकेदाराची नियुक्ती न करता भक्तांना संस्थानमार्फतच ही सेवा देण्यात यावी असे मत आहे.

अलीकडे,नव्यानेच धर्मशाळा इमारतीचे टेरेसवर बसविण्यात आलेली सोलर वॉटर हिटर सिस्टीम कार्यान्वीत झाली असून,या सिस्टीमद्वारे दैनंदीन सुमारे १५,००० लिटर इतके गरमपाणी उपलब्ध होऊ शकते. गरमपाण्याचे नळ इमारतीचे प्रत्येक माळयावर काढण्यात आलेले आहेत.

साईबाबा भक्तनिवासस्थान (५०० रुम) इमारतीचे टेरेसवरही सोलर वॉटर हिटर सिस्टीम बसविण्यात आलेली आहे. गरमपाण्याचे नळ इमारतीचे माळयांचे स्टोअर रुममध्ये काढण्यात आलेले आहेत व नळापासुन खोलीपर्यंत भक्तांना गरमपाणी पुरविण्याचे काम श्री साईसंस्थान एम्प्लॉईज क्रेडीट को-ऑप सोसायटी यांना देण्यात आलेले आहे. प्रति बादलीसाठी रु.३/- या दराने गरमपाण्याचा सेवाआकर भक्तांकडून घेण्यात येतो. यातील रु.१-५० संस्थानला व उर्वरीत रक्कम रु.१-५० कामगार सोसायटीस आदा करण्यात येतात. याबाबत दि.३० जून,२००२ रोजीचे मा.व्यवस्थापन मंडळाचे सभेत निर्णय क्र.३१८ व दि.३० मे,२००४ रोजीचे मा.व्यवस्थापन मंडळाचे सभेत निर्णय क्र.२६४ संमत झालेले आहेत.

साईबाबा भक्तनिवासस्थान विभागाप्रमाणेच धर्मशाळा विभागाकडे गरम पाण्याचे नळापासून बाथरुममध्ये भक्तांना गरमपाणी पुरविण्याचे काम वार्षिक कराराने श्री साईसंस्थान एम्प्लॉईज क्रेडीट को-ऑप सोसायटीस देता येईल व त्याचा रितसर करारनामा करुन घेता येईल.

पावसाळयात वॉटर हिटर सिस्टीमद्वारे गरमपाण्याचा पुरवठा गरजेपेक्षा कमी झाल्यास एम्प्लॉईज सोसायटीमार्फत बॉयलरवर पाणी तापवून भक्तांना पुरवठा करता येईल असा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

**यावर सविस्तर चर्चा होऊन, दि.२२/०५/२००८ पासून धर्मशाळा इमारत नं.१ मधील साफसफाई तसेच संडास,बाथरुम स्वच्छता विषयक कामे करण्यासाठी ठेकेदाराची नियुक्ती न करता या सेवा संस्थानचे आरोग्य विभागामार्फत करण्यात याव्यात. तसेच भक्तांना गरम पाणी पुरविणे, गरमपाण्याचे नळापासून बाथरुमपर्यंत भक्तांना स्नानासाठी गरमपाणी पोहच करणे हे काम साईबाबा भक्तनिवासस्थान (५०० रुम) विभागाप्रमाणे श्री साईसंस्थान एम्प्लॉईज क्रेडीट को-ऑप सोसायटीस वार्षिक कराराने देणे व गरमपाण्याचे १० लिटर क्षमतेचे प्रति बादलीस रु.३/- आकारणी करुन, त्यातील रु.१-५० संस्थानला ठेवून रु.१-५० श्री साईसंस्थान एम्प्लॉईज क्रेडीट को-ऑप सोसायटीस आदा करण्यात यावी अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.**

(कार्यवाही-धर्मशाळा विभागप्रमुख)

१८) **शांतीनिवास दर्शन लाईन पहिल्या माळयासाठी टी.व्ही.खरेदी करणेबाबत.**

शांती निवास,भक्तनिवास तळमाळा व पहीला माळा दर्शन लाईन मधून साई भक्त श्रींच्या दर्शनाला जाताना त्यांना श्रींचे दर्शन टीव्हीचे स्क्रीनवर होणेसाठी लाईनमध्ये नॉर्मल कॅथॅरॉड टीव्ही बसविलेले आहेत सद्या बसविलेले टीव्ही दि.१७/०१/०१ मध्ये खरेदि केलेले आहेत. टीव्ही ठेवणेसाठी स्टीलचे वॉलस्टँडचा उपयोग केलेला आहे प्रत्येक टीव्हीच्या टयुबला ठरावीक कालमर्यादा असते दर्शनलाईनमधील टीव्ही दररोज सुमारे १८ तास चालू असतात त्यामुळे सदर टीव्हींच्या टयुबची कार्यक्षमता कमी झालेली असून सदर टीव्हींवरील दिसणारे चित्र सुस्पष्ट दिसत नाही किंवा काही टीव्हींवर एकाच कलरची शेड दिसते टीव्हींची कालमर्यादाही संपत आल्यामुळे सदर ठिकाणी नविन टीव्ही खरेदि करणे आवश्यक आहे टीव्ही ठेवलेले स्टँडही आकाराने मोठे असल्याने व्यवस्थीत दिसत नाहीत परीणामी टीव्हींवरील दर्शनाचा पुर्ण आनंद मिळत नाही.

हल्ली मार्केटमध्ये LCD टाईप टीव्ही विवीध साईजमध्ये मिळतात त्यावरील चित्र हे सुस्पष्ट व मोठया आकारात दिसते तसेच हे टीव्ही वॉल मांउटींग ब्रॅकेटसह मिळत असल्याने त्यास स्वतंत्र ब्रॅकेटची गरज लागत नाही व या टीव्हींची जाडी साधारणपणे ६" असल्याने टीव्हींसाठी जागा अंत्यंत कमी प्रमाणात लागते.

१) अशा प्रकारचे ४२" टीव्ही शांति निवास दर्शन लाईनमध्ये बसविलेले असून ते देणगी स्वरूपाने आलेले आहेत भक्त निवास तळमाळा येथे ३२" LCD टाइप टीव्ही खरेदि करून बसविणेसाठीचा दि

१०/०१/०८ प्रमाणे मा.व्यवस्थापन समितीच्या सभेत मंजुर झालेला असून त्यांच्या खरेदिची प्रक्रीया चालू आहे त्यामुळे शांति निवास व भक्त निवास तळमाळा दर्शन लाईन मध्ये नविन LCD टाइप टीव्ही बसविणेचे काम पुर्ण होत आहे.

२) शांति निवास व भक्त निवास १ला माळा येथेही नॉर्मल कॅथॅरॉड टीव्हींऐवजी LCD टीव्ही टप्प्याटप्प्याने बसविता येतील पहील्या टप्प्यात शांति निवास (१ ला माळा येथील फ्लोअरची उंची कमी असल्याने) येथे ३२" LCD टाईप १० नग टीव्ही खरेदि झाल्यानंतर ध्वनिक्षेपण विभागामार्फत फिट करता येतील त्यासाठी खालीलप्रमाणे खर्च अपेक्षित आहे.

| अ.नं. | टीव्ही वर्णन | नग | अंदाजे किंमत |
|---|---|---|---|
| ०१ | सोनी कंपनी ३२ " LCD टाईप टीव्ही | १० | ५,००,०००/- |

**तरी वरील प्रमाणे १० नग टीव्ही खरेदि करणेस व त्यासाठी अंदाजे रूपये ५,००,०००/- खर्च अपेक्षित असून त्यास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात यावी अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.**

(कार्यवाही-ध्वनीक्षेपन विभागप्रमुख)

**१९) सी.सी.टी.व्ही विभागाकडील निकामी झालेले कॅमेरे व इतर साहित्य कोटेशन्सपध्दतीने विक्री करणे बाबत**

वैधानिक लेखापरिक्षक यांनी निकामी अनावश्यक साहित्य वेळचे वेळी मंजूरी घेऊन स्टॉक मधून कमी करावे अशा सुचना दिलेल्या आहेत. डेडस्टॉकच्या वस्तू स्टॉक मधून कमी करतांना मा.व्यवस्थापन समितीची मान्यता घेण्यात यावी असे नमूद करण्यात आलेले आहे.

ध्वनीक्षेपण विभागात सन १९९२ मध्ये सीसीटीव्ही विभाग व संगणक विभाग एकत्र असताना खालील यादीतील मटेरिअल खरेदी करुन संस्थान परिसरात टि.व्ही. बसवून टि.व्ही.च्या स्क्रिनवर श्रीसाईबाबांचे मंदीरातील दृष्य दिसावे यासाठी खरेदी केले होते. ते नॅशनल पॅनासोनिक व इतर कंपन्यांचे असून बंद पडलेले आहेत.

तद्नंतर वेळोवेळी तंत्रज्ञानात बदल झाल्याने या साहित्याचे उत्पादन बंद झाले व बाजारामध्ये नवनविन कंपन्या तसेच अधुनिक तंत्रज्ञानाचे व अनेक नमुने असलेले उत्पादन आले. त्यामुळे सन १९९२ चे घेतलेले मटेरिअल दुरुस्तीसाठी आवश्यक पार्टस् बाजारात मिळत नाहीत त्यामूळे असे मटेरिअल ध्वनिक्षेपण विभागाचे स्टोअरमध्ये पडून आहे. असे **खालीलप्रमाणे खराब व निकामी झालेले मटेरिअल वापरण्यास योग्य नसल्याने त्याची अभिलेख व ध्वनीक्षेपण विभागामार्फत कोटेशन मागवून विक्री करणेस तसेच विक्री झालेल्या साहित्याची नोंद ध्वनीक्षेपन विभागाच्या मालमत्ता नोंद वहीतून (डेडस्टॉक मधुन) कमी करण्यास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता,त्यास मान्यता देण्यात यावी अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.**

| अ.नं | संगणक कोड नं | तपशिल | नग | प्रत्येकी मुळ किंमत रुपये |
|---|---|---|---|---|
| 01 | CCTV/003 | ब्लॅक ॲण्ड व्हाईट कॅमेरा | 03 | 1,05,000.00 |
| 02 | CCTV/004 | कलर कॅमेरा | 02 | 1,50,000.00 |
| 03 | CCTV/005 | ॲडप्टर फॉर कलर कॅमेरा | 02 | 20,000.00 |
| 04 | CCTV/006 | ब्रॅकेट फॉर कॅमेरा | 05 | 10,500.00 |
| 05 | CCTV/009 | पॅनिंग युनिट | 03 | 16,650.00 |
| 06 | CCTV/010 | ॲटो इरेझ लेन्स फॉर कॅमेरा | 03 | 83,250.00 |
| 07 | CCTV/015 | ॲटो सिलेक्टर स्वीच | 01 | 19,000.00 |
| 08 | CCTV/089 | चार चॅनेल ॲटो स्विचर | 01 | 800.00 |
| 09 | CCTV/090 | सहा चॅनेल ॲटो स्विचर | 01 | 1,200.00 |

(कार्यवाही-ध्वनीक्षेपण विभागप्रमुख)

**२०) नविन प्रसादालयाकरिता एल.सी.डी. टी.व्ही. खरेदीबाबत.**

नविन प्रसादालयात ऑडीओ व्हीडीओ व केबल टीव्ही वायरींगचे काम अथवा टीव्ही खरेदीचे काम टप्प्याटप्प्याने करणेबाबद दि.२८/०७/०७ च्या मा.व्यवस्थापन समितीच्या मिटींगमधील निर्णय क्र.५१७ प्रमाणे ठरले आहे. त्यापैकी वायरींगबाबदचे मटेरीयल खरेदि विभागामार्फत खरेदी होत असून थोडयाच दिवसात वायरींगचे काम पुर्ण होईल

संस्थान परीसरात असलेल्या टीव्हीच्या स्क्रीनवर साईबाबांच्या चारही मंदिरातील दृष्य दिसते तेच दृष्य नविन प्रसादालयातील भेजनालयातील भींतीवर LCD टीव्ही लावून त्याद्वारे दाखविल्यास भक्तांना प्रसाद घेतानाही श्रींच्या थेट दर्शनाचा लाभ घेता येइल व संस्थानच्या लौकीकात भर पडेल.

ऑडीओ व्हीडीओ सिग्नल पाठविणेसाठी आय.टी.विभागाने टेलीफोन व संगणक डाटासाठी जी फायबर ऑप्टीक केबल टाकलेली आहे त्याच केबलमधून सीग्नल पाठवून टीव्ही चालू करता येणार आहे

सबब नविन प्रसादालयास भक्तांच्या सोयी सुवीधांसाठी प्रथम ०४ टीव्ही खरेदि करून नंतर आवश्यक टीव्ही टप्प्याटप्प्याने खरेदि करता येतील प्रथम सोनी कंपनीचे खालील वर्णनांचे टीव्हींची आवश्यकता आहे.

| अ.नं. | टीव्ही वर्णन | नग | अंदाजे किंमत रू. |
|---|---|---|---|
| ०१ | सोनी कंपनी ४६ " LCD टाईप टीव्ही | ०४ | ५,००,०००/- |

**तरी वरील प्रमाणे ०४ नग टीव्ही खरेदि करणेस व त्यासाठी अंदाजे रूपये ५,००,०००/- खर्च अपेक्षित असून त्यास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात यावी अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.**

(कार्यवाही-ध्वनीक्षेपन विभागप्रमुख)

२१) **संस्थान वाहनांचे वापराबाबत.**

श्री साईबाबा विश्वस्त व्यवस्था, शिर्डीकडे असलेल्या वाहनांपैकी मा.अध्यक्ष सो. व मा.कार्यकारी अधिकारी यांचेकडे संस्थानचे कामाकरीता कायम स्वरूपी वाहने दिलेली आहेत.

मा.सदस्य, प्रशासकीय अधिकारी व इतर अधिकारी / कर्मचारी यांचे मागणीनुसार, संस्थान कामाकरीता वाहन पुरविण्यात येते. त्यांचेकडे कायम स्वरूपी वाहन दिलेले नाही.

**दिलेले निवासस्थान पासून रूग्णालय दुर असलेने जा.नं.एसएसएस/वशी-१/६१०/ दि.१२/०२/२००४ चे आदेशान्वये डॉ.सौ. आशा पेंडसे, वैद्यकीय अधिक्षिका यांना तसेच जा.नं.एसएसएस/वाहन/१७१/०७ दि.२४/०१/२००७ डॉ. आर.जी. ढवळे, माजी वैद्यकीय संचालक, श्री साईबाबा रूग्णालय यांना संस्थान निवासस्थाना पासून रूग्णालयात कार्यालयीन कामकाजासाठी येणे जाणे कामी उपलब्धतेनुसार दररोज संस्थान वाहनांचा वापर करण्यास मान्यता देण्यात आली आहे. त्यानुसार त्यांना वाहन पुरविण्यात येत आहे, त्याची नोंद घेण्यात आली.**

**याचवेळी वैद्यकीय संचालक व वैद्यकीय अधिक्षिका यांचे श्री साईबाबा हॉस्पिटल व श्री साईनाथ रुग्णालयावर चांगल्या प्रकारे नियंत्रण व्हावे याकरीता त्यांना साईनगर कर्मचारी वसाहतीत निवासस्थाने देण्यात यावे अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.**

(कार्यवाही-वाहन विभागप्रमुख/अधिक्षक,आस्थापना विभाग)

२२) **श्रीदत्त मंदीरातील मार्बलच्या पादुकांवर चांदीच्या पादुका बसविणेबाबत.**

साईभक्त श्री के.मधुसुदनराव व श्री मंगमुरी जगनमोहनराव, विजयवाडा यांनी श्री दत्त मंदिर येथे असलेल्या मार्बल पादुकांवर चांदीच्या पादुका बसविणेबाबत पत्राव्दारे इच्छा प्रदर्शित केली असून श्री के.मधुसुदनराव व श्री मंगमुरी जगनमोहनराव, विजयवाडा यांनी १०४८ ग्रॅम वजनाच्या रुपये २१,४९४/- किंमतीच्या चांदीच्या पादूका तयार करुन देणगी पावती क्र. ०१ दिनांक ०३.०४.२००८ अन्वये देणगी दाखल मंदिर विभागाकडे जमा केलेल्या आहेत. **सदर पादूका श्री दत्त मंदिर येथे बसविणेस मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात यावी अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.** (कार्यवाही-अधिक्षक, मंदिर विभाग)

२३) **साई संस्थान एम्प्लॉईज क्रेडिट को-ऑप सोसायटी लि.,शिर्डी यांना स्नानगृह चालविणेचे मुदतवाढीबाबत.**

साईभक्तांचे सोयीसाठी श्री साई संस्थान एम्प्लॉईज क्रेडीट को ऑप सोसायटी लिमिटेड, शिर्डी यांचेमार्फत खालील संस्थानचे इमारतीमधील स्नानगृहे लिव्ह ॲन्ड लायसेन्स तत्वावर ठेकेदारीने चालविली जातात.

०१) साई प्रसाद नं ०१ व साईप्रसाद नं ०२
०२) साईउद्यान
०३) जनरल स्नानगृह पिपंळवाडी रोडलगत (एकत्रित)

श्री साई संस्थान एम्प्लॉईज क्रेडीट को ऑप सोसायटी लिमिटेड, शिर्डी, ता- राहाता, जिल्हा अहमदनगर यांना यापूर्वी खालील कालावधीकरिता मा. व्यवस्थापन मंडळाचे निर्णयानुसार लिव्ह ॲन्ड लायसेन्स तत्वावर स्नानगृहे एकत्रित चालविण्यास देण्यात आलेले आहेत.

१) दिनांक ०१/०४/१९९८ पासून ते दिनांक ३१/०३/२००१
२) दिनांक ०१/०४/२००१ पासून ते दिनांक ३१/०३/२००४
३) दिनांक ०१/०४/२००४ पासून ते दि ३१/०३/२००७ .

मागील वर्षी म्हणजे दिनांक ०१/०४/२००७ पासून ते दिनांक ३१/०३/२००८ अखेर एक वर्षाचे कालावधीकरिता लिव्ह ॲन्ड लायसेन्स तत्वावर श्री साई संस्थान एम्प्लॉईज क्रेडीट को ऑप सोसायटी लिमिटेड, शिर्डी, यांना दरमहा मासिक लायसेन्सी रक्कम रुपये ४,४००/- मात्र (एकत्रित) प्रमाणे आकारुन गाळयास मुदतवाढ देण्यात आलेली आहे.

आता श्रीसाई संस्थान एम्प्लॉईज क्रेडीट को ऑप सोसायटी लिमिटेड, शिर्डी, ता- राहाता यांचे दिनांक १९/०२/२००८ रोजीचे पत्र इकडेस प्राप्त झालेले असून त्यात त्यांनी संस्था संस्थानचे मान्यतेने संस्थान परिसरात चालवित असलेल्या साईप्रसाद नं ०१ व ०२, साईउद्यान

व जनरल स्नानगृहे (पिंपळवाडी रोड लगत) या व्यवसायाची एक वर्षाची मुदत दिनांक ३१/०३/२००८ रोजी पूर्ण होत आहे. तरी सदर व्यवसाय संस्थेस पुढील पाच वर्षाकरिता चालविण्यास परवानगी मिळावी अशी विनंती केलेली आहे.

श्री साईसंस्थान एम्प्लॉईज क्रेडीट को ऑप सोसायटी, लि. शिर्डी ही संस्थान नोकरांची सहकार कायद्याखाली नोंदणी झालेली सहकारी संस्था आहे. सहकारी कायद्या अंतर्गत रजिष्टर्ड असल्याने व संस्थान कर्मचारी , सभासदांची सहकारी संस्था असल्याने त्यांना यापूर्वी कामाचा ठेका दिलेला आहे. व त्या पुढील कालावधीसाठी मुदतवाढ देणेबाबतचा त्यांचा अर्ज आहे.

**साईभक्तांना सदर सुविधेचा होणारा उपयोग लक्षात घेता, श्री साई संस्थान एम्प्लॉईज क्रेडीट को ऑप सोसायटी लिमिटेड, शिर्डी, यांचे मागील दरमहा लायसेन्सी फी रक्कम रुपये ४४००/- (एकत्रित) यामध्ये १० % वाढ करून म्हणजे दरमहा मासिक लायसेन्सी रक्कम रुपये ४,८४०/- मात्र (एकत्रित) (अक्षरी रुपये चार हजार,आठशे चाळीस) प्रमाणे आकारुन लिव्ह अॅन्ड लायसन्स तत्वावर गाळयास मुदतवाढ दिनांक ०१/०४/२००८ पासून ते दिनांक ३१/०३/२००९ अखेर एक वर्षाचे कालावधीकरिता पुन्हा मुदतवाढ देणेस मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात यावी अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.**

(कार्यवाही-विधी अधिकारी)

**२४) <u>डिजीटल बोर्ड, बॅनर्स इत्यादीचे वार्षिक कोटेशनबाबत</u>**

उपरोक्त विषयास अनुसरुन, श्री साईबाबा संस्थान विश्वस्त व्यवस्थेमार्फत श्री रामनवमी, श्री गुरुपौर्णिमा, श्री पुण्यतिथी असे तीन उत्सव तसेच सर्वधर्मिय सामुदायिक विवाह सोहळा, साईसच्चरित पारायण सोहळा, सत्संग, शिबीर व इतर अनेक धार्मिक व सामाजिक कार्यक्रम आयोजित केले जातात. तसेच विविध विभागवार अनेक कार्यक्रम आयोजित केले जात असतात. तसेच बोर्ड व बॅनर्स विविध कारणासाठी बनविले जातात. या विविध धार्मिक व सामाजिक कार्यक्रमाचे प्रसिध्दीसाठी डिजीटल बोर्ड, बॅनर्स हे संस्थानमार्फत तयार करीत असतो.

यासाठी दरवेळी पेंटर्सकडून कोटेशन मागविणे, नंतर स्थानिक विश्वस्तांसमोर ते कोटेशन उघडणे, नंतर त्यांचा तुलनात्मक तक्ता तयार करुन न्युनत्तम दर असलेल्या कोटेशनधारकाला डिजीटल बोर्ड व बॅनर्स तयार करणेकामी आदेश पारीत केला जातो. आदेश पारीत केलेनंतर बोर्ड / बॅनर्स बनविणेस काही कालावधी जातो, बोर्ड तयार केलेनंतर ते आणणे व विविधठिकाणी लावणे यात काही वेळ जातो, त्यामुळे साईभक्तांना व ग्रामस्थांना कार्यक्रमाचे पुर्वी फक्त एक दिवस आधी कार्यक्रमाची माहिती कळते.

या सर्व वरील कारणामुळे बराच वेळ जातो, त्यामुळे **डिजीटल बोर्डस् व बॅनर्स बनविणेकामीचे कोटेशन प्रत्येकवेळी मागविण्याऐवजी सदरबाबतीत संबंधीतांकडून वार्षिक डिजीटल बोर्डस् व बॅनर्स बनविणेकामीचे कोटेशन एकदाच मागवून घ्यावेत व वर्षभरासाठी न्युनतम दराचे कोटेशनधारकाला एकाचवेळी आदेश देणे योग्य होईल याकरीता पेंटर्सकडून डिजीटल बोर्डस् व बॅनर्स बनविणेकामीचे एका वर्षासाठीचे कोटेशन दर मागविणेस मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात यावी अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.** (कार्यवाही-प्रशासनशाखा वशी-५)

**२५) <u>महाराष्ट्र राज्य केमिस्ट अॅण्ड ड्रगीस्ट असो.राहाता यांना नवीन साईप्रसादालयामधील हॉल सभेसाठी वापरण्यास देणेबाबत.</u>**

महाराष्ट्र राज्य केमिस्ट अॅण्ड ड्रगीस्ट असोसिएशन राहाता यांनी दिनांक २१ व २२ जुन,२००८ रोजी शिर्डी येथे राज्यस्तरीय सभा घेण्याचे ठरविलेले आहे. सदरचे संघटनेचे सुमारे ४५ हजार सभासद असून सभेसाठी राज्यभरातुन सभासद येणार आहेत. त्यांनी श्रीसाईबाबा संस्थानचे नविन साईप्रसादालय इमारतीमधील हॉल वापरण्यास परवानगी मागितलेली आहे. सदरचे वास्तूचे पावित्र्य राखण्यात येईल तसेच साफ सफाई करुन हॉल देण्यात यावा असे दिनांक ९.०५.२००८ चे पत्रात नमूद केलेले आहे.

याच संदर्भात मा.विश्वस्त सौ.उर्मिलाताई जाधव, यांनी त्यांचे दिनांक २६.०४.२००८ चे पत्राद्वारे इमारत चालु होईपर्यंत नविन साईप्रसादालय हॉल मोतीचूर लाडू बनविणेकामी अगर इतर करणास्तव वापरण्यात येऊ नये, श्रीसाईप्रसादालय इमारत घाण करु नये असे नमूद केलेले आहे.

महाराष्ट्र राज्य केमिस्ट अॅण्ड ड्रगिस्ट असोसिएशन यांची सभा दिनांक २१ व २२ जून,२००८ या कालावधीमध्ये आहे. मा.विश्वस्त श्री.अशोक खांबेकर यांनी शिफारस पत्रामध्ये उपरोक्त कामी पत्रधारक जागेचे भाडे भरण्यास तयार असलेबाबत नमूद केलेले आहे. त्याकामी सार्वजनिक बांधकाम विभाग यांचे नियमानुसार किंवा व्यवस्थापन समिती ठरविल त्याप्रमाणे भाडे देण्यास तयार असलेबाबत शिफारस पत्रामध्ये लिहिलेले आहे. २ हजार व्यक्तिंची बैठक व्यवस्थेसाठी शामीयाना/कापडी मंडप टाकल्यास त्यासाठी अंदाजे १५ ते २० हजार पर्यंत खर्च येतो.

**तरी महाराष्ट्र राज्य केमिस्ट अॅण्ड ड्रगिस्ट असोसिएशन यांचे सभेसाठी दिनांक २१ व २२ जून,२००८ रोजी नविन साईप्रसादालय इमारत वापरणेस देण्यात यावे व त्यांचेकडून रुपये ३१,०००/- रकमेची देणगी पावती करुन घेण्यात यावी, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.**

(कार्यवाही-प्रसादालय विभाग)

**२६) समाधी मंदिरात देणगीदाखल मकराना मार्बल बसविणे बाबत**

सन १९९९-२००० मध्ये समाधी मंदिराचे सुदृढीकरण करण्यात आले. त्यावेळेस समाधी मंदिरात असलेली मार्बल मोझॅक टाईल्स व मार्बल बदलविण्यात येऊन त्या ठिकाणी मार्बल बसविण्यात आलेला आहे. दि. १३/०३/२००८ चे पत्रान्वये मुर्ती उद्योग प्रशिक्षण केंद्र, जयपूर यांनी समाधी मंदिरातील बसविण्यात आलेला मार्बल `मकराना मार्बल ` नसून `राजनगर मार्बल` आहे तसेच सदरचा मार्बल भक्तांच्या आरोग्याच्या दृष्टीने योग्य नसल्याचे कळविले आहे. त्यामुळे सदरचा मार्बल बदलून त्याऐवजी मकराना मार्बल देणगीदाखल बसविणेकामी त्यांनी परवानगी मागितली आहे. सदर कामासाठी येणारा सर्व खर्च मुर्ती उद्योग प्रशिक्षण केंद्र, जयपूर करण्यास तयार आहेत.

मुर्ती उद्योग प्रशिक्षण केंद्र, जयपूर यांनी मकराना मार्बल बसविणेकामी परवानगी मागितलेल्या समाधी मंदिरातील श्रींची समाधी ते नंदीपर्यंत २२०० चौ.फुट आहे.

तरी **मुर्ती उद्योग प्रशिक्षण केंद्र, जयपूर यांना समाधी मंदिरातील सध्याची मार्बल फरशी काढून त्याऐवजी मकराना मार्बल बसविणेकामी परवानगी देणेस मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता,त्यास मान्यता देण्यात यावी,अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.** (कार्यवाही-मंदीर विभाग)

**२७) गुरुस्थान निंबवृक्षाबाबत**

दिनांक १७/०२/२००७ रोजीच्या व्यवस्थापनसभेतील निर्णय क्र १२९ नुसार गुरुस्थान निंबवृक्ष सवंर्धन करणे बाबतच्या विषयावर सविस्तर चर्चा होवुन दिलेल्या अभिप्रायानुसार व आराखडयानुसार कार्यवाही करणेत यावी. याकामी येणा-या योग्य त्या सर्व समावेशक खर्चास मान्यता देण्यात आली.असे ठरले आहे.श्री साईबाबांचे समाधी मंदिराशेजारील निबवृक्षाचे जतन व संगोपन करण्यासाठी योग्य पध्दतीने श्री गुरुस्थान मंदिराची पुर्नःबाधणी करण्यात आलेली आहे.

दिनांक २३/०५/०७ रोजी इन्स्टिटयुट ऑफ फॉरेस्ट जेनेस्टिक्स ॲन्ड ट्री बिडीग,कोईमतुर येथील दोन शास्त्रज्ञ डॉ. एस मुरुगेसन व डॉ अरुण यांनी भेट दिली व त्यांचे मार्गदर्शनाखाली निंबवृक्षाचे संवर्धनाचे काम करण्यात आलेले आहे.गुरुस्थान निंबवृक्षाच्या बाजुने असलेले क्रॉक्रिटीकरण काढुन तेथे नव्याने लालमाती + नदीचा पोयटा + चांगले कुजलेले शेणखत,सेंद्रीयखत व गांडुळखत टाकुन मुबलक प्रमाणात पाणी देण्यात आले.

निंबवृक्षास आलेले फळे (निबोंळया ) गोड असल्याने पक्षी झाडांवर बसुन खातात. त्यामुळे काही बियाच तेथेच पडतात व निंबवृक्षाजवळ निंबवृक्षाची हयाच वेळी जास्त प्रमाणात रोपे उगवलेले आहे. ही उगवलेली निंब वृक्षांची रोपे आपण ग्रीन हाऊस येथील कुंडया मध्ये लावलेली आहे. उगवलेल्या रोपां पैकी एक रोप मा. माजी कार्यकारी अधिकारी सो. यांचे तोंडी आदेशाने ते गुरुस्थान निंबवृक्षा जवळ ठेवलेले आहे. त्यांची उंची ३ फुटा पर्यत झालेली आहे. भविष्यात सदरचे झाड खराब झाले तर त्यांच झाडाच्या बिंया पासुन बनलेले हे रोप आहे.सध्या असलेल्या मोठया निंबवृक्षाची स्थिती फारच खराब झालेली होती .नविन पालवी येत होती परंतु ,नविन फांदया फुटत नव्हत्या त्यामुळे त्यांचे टिश्युकल्चर पासुन रोपे काही करता आले नाही. **आता मंदिर काढुन योग्य पध्दतीने माती,खते भरल्यामुळे त्यांची पालवी नविन फांदया फुले,फळे जास्त प्रमाणात येण्यास सुरुवात झालेली असल्याने गुरुस्थान जवळील निंबवृक्ष जवळ उगवलेले नविन (छोटे) निंबरोप उपटुन दुसरीकडे लावण्यात यावे. तसेच गुरुस्थान निंबवृक्षाच्या बीजापासून नविन रोपे तयार करुन ते विक्रीसाठी भक्तांना उपलब्ध करुन देण्यात यावे, त्याची भक्तांना माहिती करुन देण्यात यावी, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.**

(कार्यवाही-बगीचा विभाग)

**२८) श्री साईनाथ रुग्णालयासाठी शेड उभारणे बाबत.**

धर्मशाळा इमारतीच्या तळमजल्यावर तात्पुरत्या स्वरुपात पार्टीशन करुन साईनाथ रुग्णालयासाठी ओ.पी.डी. केबीन बनवण्यात आल्या आहेत. सदरचे तात्पुरत्या स्वरुपातील पार्टीशन काढून ओ.पी.डी केबीनचे नूतनीकरणाचे काम ठेकेदार गोलानी बिल्डर्स यांचे मार्फत चालू आहे. सध्या रुग्णालयात गोळ्या औषधे घेण्यासाठी व बिल भरण्यासाठी रुग्णालयाच्या प्रवेश व्दाराजवळील दोन्ही बाजुच्या दोन खोल्यांमध्ये वरील व्यवस्था करण्यात आलेल्या आहेत. पेशंट व त्यांचे नातेवाईक, गोळया औषधे घेण्यासाठी व बिले भरण्यासाठी पेशंट रुग्णालयाचे पॅसेज मध्ये रांगा लावतात त्यामुळे ओ.पी.डी. मध्ये बरीच गर्दी होते. साईनाथ रुग्णालयाच्या ओ.पी.डी. केबीन नूतनीकरणाचे कामात सदरच्या दोन्ही रुमला बाहेरील बाजुने खिडक्या करुन पेशंटला गोळया औषधे व केसपेपर देण्यासाठी रुग्णालयाच्या बाहेरील बाजुने व्यवस्था होवू शकते. वैद्यकीय अधिक्षीका साईनाथ रुग्णालय यांचे दि. १८/०४/२००८ रोजीचे पत्राने त्यांनी कळविले आहे की, केसपेपर व गोळया औषधे घेण्यासाठी इमारतीच्या बाहेरील बाजुने पेशंटला रांगा लावण्यासाठी शेड बनविण्यात यावे तसेच **साईनाथ रुग्णालयातील वॉर्डमध्ये पेशंटची गर्दी असते तेथे पेशंटच्या नातेवाईकांना बसणेसाठी जागा नाही. तरी त्यांचेसाठी देखील शेड बनविणे आवश्यक आहे. गोळया - औषधे घेण्यासाठी केसपेपर काढणेसाठी तसेच पेशंटच्या नातेवाईवाकांना बसणेसाठी इमारतीच्या पुढच्या बाजुने (२०'x१७५' लांबीचे ) शेड बनवता येईल. यासाठी अंदाजे रुपये ६,६६,०००.०० मात्र**

**खर्च अपेक्षीत असून,त्यास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, तो मान्य करण्यात यावा,अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.**

(कार्यवाही-बांधकाम विभाग)

**२९) नवीन श्री साई प्रसादालय येथे पिठाची चक्की व इतर ठिकाणी वेगवेगळी सिव्हील कामे करणे बाबत**

संस्थानचे नविन श्री साई प्रसादालय येथे वेगवेगळी सिव्हिल कामे करुन मिळणेसाठी संदर्भिय पत्रान्वये अधिक्षक प्रसादालय यांनी कळविले आहे. त्यानुसार प्रसादालय विभाग यांचे प्रतिनिधी यांचे समवेत इकडील विभागामार्फत पहाणी केली असता खालील कामे करणे आवश्यक असल्याचे सांगितले आहे.

०१) पिठाच्या चक्की समोर Floor Level पासून ३ फूट खाली खोदून कॉंक्रीट करणे

०२) याच ठिकाणी ४'-०"x५'-०" या मापाची ७ फुट उंचीची एक खोली (पिठाची साठवण करणेसाठी) करणे.

०३) याच ठिकाणी चक्की युनीटचे उत्तरेस खिडकी काढून त्याठिकाणी Rolling Shutter बसविणे

०४) बॉयलर रुमचे दक्षिणेस असलेली खिडकी काढून तेथे दरवाजा बसविणे.

०५) बॉयलर रुमचे दक्षिणेस गरम पाण्याच्या टाकीवर पत्राशेड उभारणे

०६) नविन प्रसादालय पंप हाऊस समोर आर.ओ. प्लान्टसाठी पत्रा शेड उभारणे.

वरीलपैकी पिठाचे चक्कीसाठी करावयाचे कामांकरीता अंदाजे रुपये ५०,०००/- मात्र खर्च अपेक्षित आहे. तसेच बॉयलर रुम पाण्याची टाकी व आर.ओ. प्लान्टवर करावयाच्या शेडस्साठी अंदाजे रुपये २,१०,०००/- मात्र खर्च अपेक्षित आहे. अशाप्रकारे वरील सर्व कामांसाठी एकूण रु.२,६०,०००/- मात्र इतका खर्च येईल. सदरहू खर्च नविन प्रसादालय इमारत बांधकामासाठी सन २००८-२००९ चे बजेट तरतुदीतून करता येईल.

वरीलपैकी चक्की युनिटचे कामासाठी स्थानिक ठेकेदारांकडून कोटेशन्स मागवून मटेरीअलसह काम करुन घेता येईल. तसेच शेडसचे काम हे वेगळ्या स्वरुपाचे असल्याने त्यासाठी स्वतंत्र कोटेशन्स मागविता येतील.

**तरी उपरोक्त प्रमाणे खर्चास व याकामी कोटेशन्स मागविणेस मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात यावी,अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.** (कार्यवाही- बांधकाम विभाग)

**३०) नवीन साईप्रसादालय इमारत मोतीचूर लाडू प्रसाद बनविणेकामी न वापरणेबाबत मा.सौ.उर्मिला प्रदिप जाधव, विश्वस्त यांचे पत्राबाबत**

**गर्दीच्या काळात साईभक्तांना मोतीचुर लाडू कमी पडू नये म्हणून सध्याचे प्रसादालयाचे किचन शिवाय नविन साईप्रसादालयामध्ये मोतीचूर लाडु बनविणेचे काम करण्यात येत आहे. परंतू मा.विश्वस्त सौ.उर्मिला प्रदीप जाधव यांनी दिनांक २६.०४.२००८ रोजी नविन प्रसादालय इमारतीत प्रसाद लाडु न बनविणेबाबत पत्र दिले होते. त्या पत्राच्या प्रती सर्व सदस्यांना पुरविण्यात येऊन, त्याची नोंद घेण्यात आली व संस्थानचे आवश्यकतेनुसार सदरहू प्रसादालयाचा वापर करण्यात यावा अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.** (कार्यवाही-प्रसादलय विभाग)

**३१) शववाहिकेकरीता नवीन बॉडी तयार करणे बाबत**

दिनांक ४.१०.२००७ चे व्यवस्थापन उपसमितीचे सभेतील निर्णयान्वये वाहन विभागाकडील अपघातग्रस्त शववाहिका क्र.एमएच-१७/टी-७१३१ करीता नवीन बॉडी तयार करणेकामी शिवशक्ती इंजिनिअरिंग वर्क्स, बाभळेश्वर यांना जा.नं.एसएसएस-वाहन-१६१५६-२००७ दिनांक ९.१०.२००७ने आदेश तसेच जूनी बॉडी उेऊन नवीन बॉडी तयार करुन देणेकामी कोटेशन्समध्ये दिलेल्या दराच्या ५०% रक्कम रुपये ६२,५००/- मात्र डी.डी. देण्यात आलेला आहे.

दिनांक ९.१०.२००७ रोजी सदर वाहन शिवशक्ती इंजिनिअरिंग वक्स,बाभळेश्वर यांचेकडे बॉडीचे कामासाठी पाठविण्यात आलेले होते. कोटेशननुसार एक महिन्याचे कालावधीत बॉडी तयार करुन देणे त्यांच्यावर बंधनकारक होते.

सदर वाहन हे तातडीची सेवा म्हणून असलेने बॉडीचे काम लवकरात लवकर होणे गरजेचे होते. परंतू शिवशक्ती इंजिनिअरिंग वर्क्स,बाभळेश्वर यांचेकडून काम वेळेत होत नसलेने जा.नं.एसएसएस-वाहन-१३०३-२००८ दिनांक ४.०३.२००८ नुसार शववाहिका ही तातडीची सेवा म्हणून असलेने सदर वाहनाचे काम त्वरीत ३० दिवसात पूर्ण करुन देण्यात यावे अन्यथा सदर काम करण्याची आपली इच्छा नाही असे समजून आपला आदेश रद्द करण्यात येईल तसे असलेस आपणस संस्थानने आदा केलेली ॲडव्हान्सची रक्कम त्वरीत परत करावी अन्यथा तूमचे विरुध्द योग्य ती कायदेशीर कार्यवाही करण्यात येईल तसेच आपले नांव काळ्या यादीत समाविष्ठ करुन यापूढे संस्थानचे कुठलेही काम देता येणार नाही याबाबतचे पत्र देण्यात आले होते.

यावर दिनांक २९.०३.२००८ चे पत्राने शिवशक्ती इंजिनिअरिंग ॲण्ड फॅब्रीकेशन वर्क्स, बाभळेश्वर यांनी लोडशेडींग, घरी विवाह तसेच कामगार मिळत नसलेने वाहनांचे काम वेळेत होऊ शकले नाही तसेच दिनांक ३०.४.२००८ पर्यत काम पूर्ण करुन देणेबाबत लेखीपत्र दिले होते. सदर वाहन ही

तातडीची सेवा म्हणून असलेने काम लवकरात लवकर होणे गरजेचे आहे. त्यामूळे त्यांना त्यांचे पत्राप्रमाणे दिनांक ३०.४.२००८ ऐवजी दिनांक २०.४.२००८ अखेर मुदतवाढ देत असलेबाबत जा.नं.एसएसएस-वाहन-५५१-२००७ दिनांक ९.१०.२००८ दिनांक १७.४.२००८ चे पत्रान्वये कळविण्यात आले होते. तथापि प्रत्यक्ष जाऊन पहाणी केली असता शववाहिकेचे बॉडी बांधणीचे कामत प्रगती दिसून आली नाही.

शिवशक्ती इंजिनिअरिंग ॲण्ड फॅब्रीकेशन वर्क्स, बाभळेश्वर यांचेकडून अपघातग्रस्त शववाहिकेच्या बॉडी बांधणीचे काम होत नसलेबाबत त्यांचेवर योग्य ती कार्यवाही करणेस मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

**यावर सविस्तर चर्चा होऊन, शिवशक्ती इंजिनिअरिंग ॲण्ड फॅब्रीकेशन वर्क्स, बाभळेश्वर यांचेशी मा.विश्वस्त श्री पांडुरंग गमाजी अभंग व मा.श्री सुरेश गोरक्षनाथ वाबळे यांनी समक्ष चर्चा करुन अंतिम निर्णय घ्यावा अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.**

(कार्यवाही-वाहन विभाग)

**३२) श्री साई दैनंदिनी २००८ चा विक्री दर कमी करणे बाबत**

मा. व्यवस्थापन समितीचे दि.१०.०१.२००८ रोजीचे सभेतील निर्णयानुसार श्री साई दैनंदिनी २००८ चे ९०,००० नग छपाईचे काम मे. महाराष्ट्र सहकारी मुद्रणालय, पुणे यांचे वाटाघाटीतील कबुल केलेले छपाई दर रु.५०/- मान्य करण्यात येऊन, त्यांचेकडून छपाईचे काम करुन घेण्यात यावे असे ठरले. यासअनुसरुन मे. महाराष्ट्र सहकारी मुद्रणालय, पुणे यांना जा.नं.एसएसएस/वशी/प्रकाशने/१८१८९/२००७ दि.१२/११/२००७ अन्वये श्री साई दैनंदिनी ९०,००० नगांचा छपाई मंजूर दर प्रती नगास रूपये ५०/- प्रमाणे छपाई कामाचा पुरवठा आदेश देण्यात आलेला आहे. दैनंदिनीची विक्री ना नफा ना तोटा या तत्त्वावर प्रती नग दैनंदिनी विक्री किंमत रु.५०/- मात्र ठेवण्यात येऊन भक्तांना विक्रीस उपलब्ध करुन देण्यात आली.

मे. महाराष्ट्र सहकारी मुद्रणालय, पुणे यांचेकडून छपाई आदेशानुसार ९०,००० नगांचा पुरवठा पूर्ण झालेला असून, तत्संबंधीत विक्रीचा तपशिल खालील दर्शविलेल्या तपशिलाप्रमाणे सादर केला आहे.

| **एकूण आवक दैनंदिनी नग** | **विक्री अहवाल** | **विक्री** | |
|---|---|---|---|
| ९०,००० | शिर्डी कार्यालय विक्री नग | ५७७०१ | |
| | शिर्डी कार्यालय पोस्टाने विक्री | ९२६ | |
| | मुंबई कार्यालय विक्री नग | ६३९७ | |
| | | | **एकूण दैनंदिनी विक्री -६५०२४** |
| | शिर्डी कार्यालय संभावना | ४२७७ | |
| | मुंबई कार्यालय संभावना | १२२ | |
| | | | **एकूण दैनंदिनी संभावना -४३९९** |

एकूण दैनंदिनी आवक- -९०००० एकूण विक्री नग ६५०२४ + संभावना ४३९९ = ६९४२३

शिल्लक दैनंदिनी + २०५७७

एकूण छपाई आदेश - ९०,००० एकूण आवक :- ९०,०००

उपरोक्त प्रमाणे एकूण दैनंदिनी ९०,००० नगांपैकी वरील एकूण ६९४२३ नगांपैकी संभावना ४३९९ नग + ६५०२४ दैनंदिनी नगांची विक्री होऊन अद्याप दि.२१.०४.२००८ अखेर २०,५७७ शिल्लक दैनंदिनी नगांची विक्री होणे बाकी आहे. सध्या स्थितीत दैनंदिनी विक्रीस अपेक्षित प्रतिसाद मिळत नसल्याने विक्रीचा खप कमी झाल्याने सदर श्री साई दैनंदिनी २००८ ची प्रती नग विक्री किंमत रुपये ५०/- हा विक्रीचा दर कमी करणे गरजेचे आहे, जेणेकरुन जास्तीत जास्त भक्तांना श्री साई दैनंदिनीचा लाभ घेता येईल, त्यामुळे श्री साईबाबांच्या माहितीचा प्रचार-प्रसार होईल यास अनुसरुन **श्री साई दैनंदिनी विक्रीची किंमत प्रती नग रुपये ५०/- ऐवजी रुपये २५/- प्रती नग ठेवण्यात येऊन, तदनुसार विक्री किंमत रु.२५/- प्रमाणे प्रती नग दैनंदिनी विक्री करणेस मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात यावी तसेच सन २००९ ची दैनंदिनी छपाई करणेकामी माहे जुन-२००८ पासून कार्यवाही सुरु करण्यात यावी अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.** (कार्यवाही-प्रकाशने विभागप्रमुख)

**३३) साठा संपत आलेल्या पुस्तकांचे पुनर्मुद्रण करणेबाबत**

खाली दर्शविल्याप्रमाणे पुस्तके यांचा साठा भांडार विभागात सध्या स्थितीत अल्प प्रमाणात साधारणतः २ ते ३ महिने पुरेल एवढाच शिल्लक आहे. तसेच मा. व्यवस्थापन समितीचे दि.१६.०३.२००८ चे सभेतील विषय नं.३७ निर्णय क्र.२४६ नुसार संस्थान प्रकाशित पुस्तकांचे विक्रीत वाढ होऊन श्री साईबाबाचे जीवन व कार्याचा प्रचार-प्रसार जगभर व्हावा या करीता सर्व भक्तांना/खरेदीदारांना एकूण विक्री किंमतीवर २०% सुट देण्यात यावी असे ठरले आहे.तसेच सध्या विक्री किंमतीवर १५% सवलतीचे दराने विक्री कार्यवाही चालू असल्याने त्यामुळे विक्रीचा खप मोठया प्रमाणात वाढला असल्याने पुस्तके उपलब्धतेअभावी भक्तांची गैरसोय निर्माण होऊ नये यासाठी खालील पुस्तके छपाई करून घेणे गरजेचे आहे.

**अ) पुस्तके छपाई परिशिष्ट**

| अ.नं | पुस्तकाचे नांव | भाषा | मागिल छपाईची तारीख | मागिल छपाईची संख्या | मागिल छपाई दर | नवीन छपाई संख्या | छपाई अंदाजे दर | एकूण रक्कम |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ०१ | साईसच्चरित | मराठी | ०२.०६.२००७ | ४०००० | ५९.९० | ५०,००० | ७०.०० | ३५,००,०००/- |
| ०२ | श्री साईसतचरित्र | गुजराथी | ०२.०६.२००७ | ४०,००० | २८.९० | ७०,००० | ३५.०० | २४,५०,०००/- |
| ०३ | खापर्डे डायरी | हिन्दी | २६.०६.२००५ | १०.००० | ०९.०० | १०००० | १५.०० | १,५०,०००/- |
| ०४ | एक फकिर की पाठशाला | हिन्दी | १९.०१.२००७ | ५००० | ३५.०० | १०००० | ५०.०० | ५,००,०००/- |
| | | | | | | | **एकूण -** | ६६,००,०००/- |

उपरोक्त "अ" या रकान्यात दर्शविल्याप्रमाणे पुस्तके छपाई कामी अपेक्षित खर्च एकूण रू.६६,००,०००/- (अक्षरी रुपये सहासष्ट लाख ) मात्र खर्च अपेक्षित आहे.

**उपरोक्तप्रमाणे खर्च हा पुस्तके छपाईसाठी सन २००८-२००९ मंजूर बजेट तरतूद रूपये- ४००,००,०००/- मधून करता येईल. तरी वरील "अ " यात दर्शविलेप्रमाणे पुस्तकांची छपाई ही मा.व्यवस्थापन समितीचे संमत निर्णयानुसार निवडक प्रेसधारकांकडून छपाई करुन घेणेकामी छपाई कामाचे कोटेशन्स् मागविणेस तसेच याकामी अंदाजे एकूण ६६,००,०००/- मात्रचे अपेक्षित खर्चास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात यावी अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.**

(कार्यवाही-प्रकाशने विभागप्रमुख)

**३४) सिन्नर एम.आय डी.सी पालखी विसावा येथे बोअर घेणेस परवानगी मिळणेबाबत तसेच त्यांना पत्र व बोअर फी भरणेस मंजूरी मिळणे बाबत**

सिन्नर एम.आय.डी.सी. येथील पालखी विसाव्याचे उर्वरित काम चालू करण्यासाठी पाणी व्यवस्थेकरीता तेथे बोअरवेल घेणेस, मोटार बसविणे, बोअर फी या खर्चास व्यवस्थापन समितीचे दिनांक २२.९.२००७ चे सभेतील निर्णय क्र.७५१ अन्वये रुपये ३५,०००/- मात्रच्या खर्चास मंजुरी मिळालेली आहे. त्यानुसार सिन्नर एम.आय.डी.सी. बोअर परवानगीस पत्र देणे, बोअर फी भरणे, बोअर घेणे व मोटार खरेदी करणे कामे करावी लागतील. त्यांचा तपशिल खालील प्रमाणे-

| अ.नं. | तपशिल | नग | दर | एकूण रुपये |
|---|---|---|---|---|
| ०१ | बोअर फी | - | - | ५,०००/- |
| ०२ | बोअर मारणे | ३०० फूटा पर्यंत | ५० प्रती फूट | १५,०००/- |
| ०३ | पी.व्ही.सी. केसींग पाईप टाकणे | २० फूट (६ किलो) | १५० प्रती फूट | ३,०००/- |
| ०४ | ३एच.पी. सबमर्सिबल मोटार, स्टील बॉडी २१ स्टेज, V-४ सबमर्सिबल टेक्स्मो कंपनी | ०१ नग | १७,०००/- प्रती नग | १७,०००/- |
| ०५ | HDP पाईप हेवी १.१/४" साईज | ३०० फूट | १५/- प्रती फूट | ४,५००/- |
| ०६ | नायलॉन रस्सी | १५ किलो | ४५/- प्रती किलो | ६७५/- |
| ०७ | किरकोळ मटेरीयल (क्लॅम्प, नटबोल्ट, इतर) | - | - | २,०००/- |
| | - | - | एकूण | ४७,१७५/- |
| | (अ.नं.०३ ते ०७ करीता एकूण रुपये २७,१७५/- रकमेवरील व्हॅट ) | - | + व्हॅट १२.५% ३ ते ७ करीता | ३,३९७/- |
| | | - | **एकूण रुपये** | **५०,५७२/-** |

तरी वरील प्रमाणे काम करण्यासाठी कोटेशन मागवून काम करुन घेणेस व सिन्नर एम.आय.डी.सी यांना पत्र देणे मान्यता मिळावी.

व्यवस्थापन समितीचे दिनांक २२.९.२००७ चे सभेतील निर्णय क्र.७५१ अन्वये रुपये ३५,०००/- मात्रच्या खर्चास मंजुरी मिळालेली आहे. उर्वरित अंदाजे रुपये १५,५७२/-मात्र जादा होणार आहे. तरी रुपये १५,५७२/- मात्र जादा खर्चास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

**यावर सविस्तर चर्चा होऊन,सिन्नर एम.आय.डी.सी. येथील पालखी विसाव्याचे बांधकाम पूर्ण झालेनंतर याबाबत निर्णय घेण्यात यावा, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.** (कार्यवाही-बांधकाम विभाग)

**३५) ब्लिचिंग पावडर, फेरीक ॲलम क्लोरिन गॅस सिलेंडर खरेदी करणे बाबत**

पाणी पुरवठा विभागाचे कनकुरी साठवण तलाव येथे पाणी शुध्दीकरणांसाठी ब्लीचिंग पावडर- विक्रम ग्रासीम) ब्रॅन्ड डी.सी.एम (डी.एस.सी.एल.)आयएसआय मार्क ३४% क्लोरीन उपलब्ध, फेरीक ॲलम - १६ % ॲलोमिना फेरीक उपलब्ध व क्लोरीन गॅस सिलेंडर (१०० किलो सिलेंडर) यांची दैनंदिन कामांसाठी आवश्यकता भासते. मागील वर्षी आपण मा.व्यवस्थापन समितीचे मान्यतेनुसार वार्षिक खरेदीमध्ये निविदा मागवून नियमानुसार खरेदी केलेली आहे. सदरच्या मटेरियलचा चालू वर्षात झालेला खर्च तपशिल खालील प्रमाणे -

| अ.नं. | तपशिल | मागणी कालावधी | मागणी | एप्रिल ०८ अखेर खर्च | शिल्लक येणे बाकी. |
|---|---|---|---|---|---|
| ०१ | ब्लीचिंग पावडर | ०१-०८-२००७ - ३१-०७-२००८ | ३० टन. | १५ टन. | १५ टन. |
| ०२ | फेरीक ॲलम | ०१-०८-२००७ - ३१-०७-२००८ | ५० टन. | ३६.१० टन. | १३.९०० टन. |
| ०३ | क्लोरीन गॅस सिलेंडर | ०१-०८-२००७ - ३१-०७-२००८ | २५ सिलेंडर | १४ सिलंडर | ११ सिलेंडर. |

पुढील वर्षासाठी नविन निविदा मागवून वरील मटेरियल खरेदी करणे आवश्यक आहे. त्यात खालील प्रमाणे मटेरियलची आवश्यकता आहे.

| अ.नं. | तपशिल | आवश्यकता | अंदाजे दर | एकुण रक्कम |
|---|---|---|---|---|
| ०१ | **ब्लीचिंग पावडर -** विक्रम (ग्रासीम) ब्रॅन्ड डी.सी.एम (डी.एस.सी.एल.),आयएसआय मार्क ३४% क्लोरीन उपलब्ध. | ३० टन. | रु. १६,४००/- प्रती टन. १२.५ % वॅटसह. | ४,९२,०००/- |
| ०२ | **फेरीक ॲलम -** (१६ % ॲलोमिना फेरीक उपलब्ध) | ५० टन. | रु. ६,५००/- प्रती टन. १२.५% वॅटसह. | ३,२५,०००/- |
| ०३ | **क्लोरीन गॅस सिलेंडर -** (प्रत्येकी १०० किलोचे) | २५ सिलेंडर. | रु. ५,०००/- प्रती सिलेंडर. ४ % वॅटसह. | १,२५,०००/- |
| | | | **एकुण अंदाजे खर्च रुपये -** | **९,४२,०००/-** |

तरी **वरील प्रमाणे पाणी शुध्दीकरणांसाठी लागणारे मटेरियल विहित पध्दतीने कोटेशन मागवून खरेदी करणस व त्याकामी येणारे अंदाजे रक्कम रुपये ९,४२,०००/- चे खर्चास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात यावी अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.**

(अधिक्षक,खरेदी विभाग/पाणीपुरवठा विभागप्रमुख)

**३६) <u>इलेक्ट्रीक मोटारी खरेदी करणेस मंजूरी मिळणेबाबत</u>**

श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्थेचा वाढता परिसर लक्षात घेता खालील ठिकाणी पाणी पुरवठा व्यवस्थीत होणेसाठी इलेक्ट्रीक मोटारी खरेदी करणे अत्यावश्यक आहे म्हणजे त्या-त्या ठिकाणी उपलब्ध असलेला पाणीसाठा उपयोगात आणता येईल व आहे त्या पाणी साठयावर ताण पडणार नाही आवश्यक असलेल्या मोटारींची संख्या व ठिकाणे खालील प्रमाणे आहेत.

| अ.नं | मोटारी बसविणेचे ठिकाण | मोटारींचा तपशिल | नग | अंदाजे दर | एकूण किंमत |
|---|---|---|---|---|---|
| ०१ | ५०० रुम ५०० रुम येथील श्री.जगताप आपली सामाईक विहिर | ASM-०६ ५ HP ओपनवेल मोटर सबमर्सिबल पंप, टेक्स्मो कं. | ०१ नग | १६,०००/- प्रती नग | १६,०००/- |
| ०२ | साईनगर शेजारी घेतलेली श्री. लोढा यांचे जमिन व तेथील विहिरीवर | ASM-०६ ५ HP ओपनवेल मोटर सबमर्सिबल पंप, टेक्स्मो कं. | ०१ नग | १६,०००/- प्रती नग | १६,०००/- |
| ०३ | मंदीर परीसर हौदावर बसविणेस | ASM-०६ ५ HP ओपनवेल मोटर सबमर्सिबल पंप, टेक्स्मो कं. | ०१ नग | १६,०००/- प्रती नग | १६,०००/- |
| ०४ | साईप्रसाद हौदावर बसविणेस | ASM-०६ ५ HP ओपनवेल मोटर सबमर्सिबल पंप, टेक्स्मो कं. | ०१ नग | १६,०००/- प्रती नग | १६,०००/- |
| ०५ | पिंपळवाडी रोडला श्री. काटकर यांचे घेतलेल्या जमिन विहीरीवर | ASM-०६ ५ HP ओपनवेल मोटर सबमर्सिबल पंप, टेक्स्मो कं. | ०१ नग | १६,०००/- प्रती नग | १६,०००/- |
| ०७ | कनकुरी तलावाशेजारी घेतलेल्या श्री.डांगे यांचे विहिरीवर | ASM-०६ ५ HP ओपनवेल मोटर सबमर्सिबल पंप, टेक्स्मो कं. | ०१ नग | १६,०००/- प्रती नग | १६,०००/- |
| - | - | - | ०६ नग | **एकूण रुपये** | **९६,०००/-** |

वरील प्रमाणे एकूण ०६ नग ५ एच.पी. टेक्स्मो कंपनीच्या इलेक्ट्रीक मोटारी खरेदी करणे अत्यावश्यक असुन त्यासाठी अंदाजे रुपये ९६,०००/- खर्च अपेक्षित असून त्यास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

**यावर सविस्तर चर्चा होऊन, पाणीपुरवठा विभागासाठी आवश्यक असणाऱ्या टेक्स्मो कंपनीच्या वरीलप्रमाणे ६ नग ५ एच.पी. मोटार्स कोटेशन्स मागवून खरेदी करण्या व याकामी येणारे अंदाजे रक्कम रुपये ९६,०००/- चे खर्चास मान्यता देण्यात यावी अशी या उपसमितीची शिफारस आहे.**

(कार्यवाही-पाणीपुरवठा विभागप्रमुख)

**३७) <u>नवीन प्रसादालय आर.ओ प्लॅन्ट उभारणेकरीता प्लंबींग मटेरिअल खरेदी करणेस मंजूरी मिळणे बाबत</u>**

प्रसादालय विभाग यांनी त्यांचे दिनांक १८.०१.२००८चे टिपणीअन्वये नविन प्रसादालय येथे भक्तांसाठी शुध्द पिण्याचा पाण्याचा पुरवठा करण्यासाठी आर.ओ. प्लॅंट उभारणीचे काम सुरु करावयाचे असून सदरचा प्लॅंट उभारणीचे काम (प्लंबींग काम) पाणी पुरवठा विभागाकडून करून मिळावे असे

प्रसादालय विभागाकडून कळविलेवरून तेथे प्रत्यक्ष पाहणी केली असता सदरचे काम करणेसाठी खालील प्रमाणे मटेरियलची आवश्यकता आहे.

| अ.नं. | मटेरियल तपशिल | साईज | आवश्यकता | अंदाजे दर प्रती नग / फुट | एकुण किंमत |
|---|---|---|---|---|---|
| ०१ | रिलायन्स पी.पी.आर पाईप पी.एन. १६ | २" | ४५० फुट | ९०.०० | ४०,५००.०० |
| ०२ | रिलायन्स पी.पी.आर पाईप पी.एन. १६ | १.१/२" | ३५० फुट | ५७.०० | १९,९५०.०० |
| ०३ | रिलायन्स पी.पी.आर पाईप पी.एन. १६ | १" | ३०० फुट | २५.०० | ७,५००.०० |
| ०४ | रिलायन्स पी.पी.आर पाईप सॉकेट. | २" | ४५ नग. | २४.०० | १,०८०.०० |
| ०५ | रिलायन्स पी.पी.आर पाईप सॉकेट. | १.१/२" | ३५ नग. | १६.०० | ५६०.०० |
| ०६ | रिलायन्स पी.पी.आर पाईप सॉकेट. | १" | ३० नग. | १२.०० | ३६०.०० |
| ०७ | रिलायन्स पी.पी.आर पाईप एलबो. | २" | २० नग. | ८२.०० | १,६४०.०० |
| ०८. | रिलायन्स पी.पी.आर पाईप एलबो. | १.१/२" | १५ नग. | ४०.०० | ६००.०० |
| ०९. | रिलायन्स पी.पी.आर पाईप एलबो. | १" | २० नग. | १५.०० | ३००.०० |
| १०. | रिलायन्स पी.पी.आर पाईप एलबो. (ब्रास) | १" | १० नग. | ११०.०० | १,१००.०० |
| ११ | रिलायन्स पी.पी.आर पाईप टी. | २"x१.१/२" | ०३ नग. | ९५.०० | २८५.०० |
| १२ | रिलायन्स पी.पी.आर पाईप टी. | १.१/२" x १" | ०७ नग. | ६५.०० | ४५५.०० |
| १३ | रिलायन्स पी.पी.आर पाईप रेडयुसर. | २" x १.१/२६ | ०२ नग. | ७०.०० | १४०.०० |
| १४ | रिलायन्स पी.पी.आर पाईप थ्रेडर बाहेरील आटे | १" | १० नग. | ११०.०० | १,१००.०० |
| १५ | रिलायन्स पी.पी.आर पाईप क्लीप. | ४" | ६५ नग. | ०७.०० | ४५५.०० |
| १६ | पी.पी.आर पाईप फिटिंग मशिन. | १/२",३/४",१" | ०१ नग. | ४,०००.०० | ४,०००.०० |
| १७ | पी.पी.आर पाईप फिटिंग मशिन. | १.१/४",१.१/२",२" | ०१ नग. | ६,०००.०० | ६,०००.०० |
| १८ | सिंन्टेक्स टाकी. | ५००० लिटर्स. | ०१ नग. | ३०,०००.०० | ३०,०००.०० |
| | | | | **एकुण खर्च -** | **१,१६,०२५.००** |

सदरचा आर.ओ.प्लँट उभारणीकरीता वरील प्रमाणे आवश्यक असणारे मटेरियल पाणी पुरवठा विभाग तसेच भांडार विभागाकडे शिल्लक नसल्याने ते खरेदी करून काम पुर्ण करावे लागणार आहे. सदरचे मटेरियल खरेदी करावयाचे झाल्यास त्याकरीता अंदाजे रु. १,१६,०२५.०० मात्र खर्च अपेक्षित असून त्यास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

**यावर सविस्तर चर्चा होऊन,आर.ओ प्लँन्ट उभारणीकामी आवश्यक असणारे उपरोक्तप्रमाणे मटेरिअल कोटेशन्स मागवून खरेदी करणेस व त्याकामी येणारे अंदाजे रक्कम रुपये १,१६,०२५.०० चे खर्चास मान्यता देण्यात यावी अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.**

(कार्यवाही-पाणीपुरवठा विभागप्रमुख)

**३८) श्री साईबाबा कन्या विद्या मंदिर या शाळेत इयत्ता १० वीची दुसरी तूकडी सुरु करणे बाबत**

श्रीसाईबाबा कन्या विद्या मंदीर,शिर्डी या विद्यालयात सन२००७-०८ मध्ये इ.५ वी ते इ.८वी च्या प्रत्येकी दोन वर्ग तुकड्या आणि इ.१० वी च्या एका वर्ग तुकडीत खालीलप्रमाणे विद्यार्थीनी आहेत.

| अ.नं. | इयत्ता | तुकडी संख्या | विद्यार्थीनी संख्या | शेरा |
|---|---|---|---|---|
| ०१ | इयत्ता ०५ वी | ०२ | ९७ | इयत्ता ५वी ते इयत्ता ९ वी ची प्रत्येकी १ तुकडी मान्यता प्राप्त असून दुसऱ्या तुकडीचा मान्यतेचा प्रस्ताव प्रलंबित आहे. |
| ०२ | इयत्ता ०६ वी | ०२ | ७८ | |
| ०३ | इयत्ता ०७ वी | ०२ | ८४ | |
| ०४ | इयत्ता ०८ वी | ०२ | १०२ | |
| ०५ | इयत्ता ०९ वी | ०२ | १०९ | |
| ०६ | इयत्ता १० वी | ०२ | ६५ | |
| | एकुण- | ११ | ५२५ | |

सन २००७-०८ मध्ये इयत्ता ९ वी च्या वर्गात १०९ मुली शिकत होत्या. यापैकी १०८ विद्यार्थीनी इयत्ता ९ वी च्या वर्गात उत्तीर्ण झाल्या असून सन २००८-०९ या वर्षासाठी इयत्ता १० वी च्या वर्गाकरिता या सर्व १०८ विद्यार्थीनी उपलब्ध आहेत. या विद्यार्थीनींना एकाच वर्गात बसविणे शक्य नसल्याने तसेच नैसर्गिक वाढीने दोन वर्ग तुकड्या कराव्या लागतील. यामुळे सन २००८-०९ मध्ये इयत्ता ५ वी ते इयत्ता १० वी च्या प्रत्येकी दोन वर्ग तुकड्या सुरु असतील. या नव्याने सुरु करावयाचे इयत्ता १० वीच्या वर्ग तुकडीमुळे शिक्षकाचे (१.५) पद निर्माण होईल. यापैकी एक पद गणित/विज्ञान या विषयाचे आणि बी.एस्सी.,बी.एड्.(गणित/विज्ञान) या किमान शैक्षणिक पात्रतेचे आवश्यक असेल. सदरचे पद कर्मचारी आकृतीबंध (सन२००६-०७) नुसार मा.व्यवस्थापन मंडळाने मान्य केलेल्या आकृतीबंधात समाविष्ट आहे.

**रिक्त असणाऱ्या या पदावर प्रचलित पद्धतीने नियुक्ती करणेकामी, वृत्तपत्रांतून जाहीरात देऊन अर्ज मागविणे तसेच मुलाखतीस बोलाविणे व मुलाखतीद्वारे निवड झालेल्या उमेदवारांची नियुक्ती करणे या बाबी प्रचलित पद्धतीने करता येतील. त्याचप्रमाणे तरी सन २००८-०९ मध्ये उपलब्ध विद्यार्थीनी संख्येनुसार इयत्ता १० वी ची दुसऱ्या तुकडीसह इयत्ता ५ वी ते इयत्ता १० वी च्या प्रत्येकी दोन वर्ग तुकड्या सुरु करण्यास आणि नविन तुकडी करीता निर्माण होणारे पद प्रचलित**

**पद्धतीने भरण्यास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात यावी,अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.**

(कार्यवाही-कन्या विद्या मंदीर)

**३९) कलासाधना शैक्षणिक मंडळ,मुंबई यांनी मंगलकार्यालयात आयोजित केलेल्या श्रीसाईबाबांचे चरित्रावरील भव्य रंगावली प्रदर्शनाचे सेवा आकाराबाबत.**

कलासाधना शैक्षणिक मंडळ,मुंबई यांनी श्रीसाईबाबांचे चरित्रावर आधारित भव्य रंगावली प्रदर्शन दिनांक दिनांक ४.५.२००८ ते १४.५.२००८ अखेर संस्थानचे मंगल कार्यालयाचे तळ मजल्यावर आयोजित केले असून, याकामी त्यांनी रुपये १०,०००/- सेवा आकार व रक्कम व रुपये १०००/-अनामत म्हणून अशी एकून ११,०००/- संस्थानकडे जमा केलेली आहे. तथापि श्री.प्रविण वैद्य,सेक्रेटरी, कलासाधना शैक्षणिक मंडळ,मुंबई यांनी त्यांचे दि.१०.५.२००८ चे पत्राने सदरचे प्रदर्शन साईभक्तांसाठी विनामुल्य ठेवण्यात आले असून, या प्रदर्शनासाठी त्यांना रुपये ६०,०००/- खर्च झालेला असलेबाबत कळविले आहे. तरी संस्थानकडे जमा केलेला सेवा आकार कमीत कमी आकरणेबाबत त्यांनी विनंती केली आहे.

**यावर सविस्तर चर्चा होऊन कलासाधना शैक्षणिक मंडळ,मुंबई यांनी आयोजित केलेले श्रीसाईबाबांचे चरित्रावर आधारित भव्य रंगवली प्रदर्शन अत्यंत उत्कृष्ठ असल्याने त्यांना सेवा आकारात ५०% सुट देण्यात यावी, अशी या उपसमितची शिफारस मान्य करण्यात आली.**

(कार्यवाही-चौकशी निवासस्थान विभाग)

**४०) सन २००८-२००९ मध्ये कनिष्ठ महाविद्यालयातील कार्यभारानुसार होणाऱ्या शिक्षकांच्या पदांची नियुक्ती आणि प्रस्तावित कर्मचारी आकृतीबंधाबाबत**

श्रीसाईबाबा कनिष्ठ महाविद्यालयातील सन २००८-०९ या शैक्षणिक इयत्ता ११ वी व इयत्ता १२ वी या वर्गाच्या १२ मंजूर वर्ग तुकड्या असतील.

(अ) विद्यार्थीसंख्या तसेच तुकड्यांच्या संख्येनुसार उपलब्ध होणाऱ्या कार्यभाराप्रमाणे,मा.शिक्षण उपसंचालक, पुणे यांचेकडून सन २००८-०९ करीता मंजूर होऊ शकणारा अध्यापकीय कार्यभार गणन तक्त्यानुसार रिक्त पदांकरिता जाहीरात द्यावी लागेल. तथापि,मा.व्यवस्थापन समितीच्या दिनांक ११.८.२००७ चे आस्थापना उपसमितीचे सभेत सौ.वैशाली देशमुख, श्री राजेंद्र कोहोकडे, व श्री अरुण घोडके या शिक्षकांना माध्यमिक विभागाकडून कनिष्ठ महाविद्यालयाकडे नेमणूक देणेबाबत तसेच श्री विकास महादेव शिवगजे यांना सेवाजेष्ठतेनुसार कनिष्ठ महाविद्यालयाकडे उपप्राचार्य या पदावर नेमणूक देणेबाबत प्रस्ताव सादर करण्यात आलेला होता. परंतू सदरहू सभेचे इतिवृत अद्याप व्यवस्थापन समितीचे सभेत कायम होणे आहे. सदरहू निर्णय संमत झाल्यास या निर्णयानुसार नेमणूका देता येतील. सदरचे निर्णयाचा विचार करुन उर्वरित पदांचा जाहिरातीसाठी विचार करता येईल.

ब) इयत्ता ११ व इयत्ता १२ च्या सन २००८-२००९ च्या (९६०) विद्यार्थी संख्येनुसार आणि इयत्ता १२ वर्ग तुकड्यांसाठी आवश्यक असलेला प्रस्तावित कर्मचारी आकृतीबंध २००८-२००९ रिक्त असणाऱ्या पदांवर प्रचलित पध्दतीने नियुक्ती करणेकामी वर्तमानपत्रात जाहिरात देऊन अर्ज मागविणेस मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

**यावर सविस्तर चर्चा होऊन, इयत्ता ११ व इयत्ता १२ च्या सन २००८-२००९ च्या (९६०) विद्यार्थी संख्येनुसार आणि इयत्ता १२ वर्ग तुकड्यांसाठी आवश्यक असलेला प्रस्तावित कर्मचारी आकृतीबंध २००८-२००९ रिक्त असणाऱ्या पदांबरोबरच इंग्लिश मिडीयम स्कुलकडे रिक्त असलेल्या संगणक शिक्षक या पदावर प्रचलित पध्दतीने नियुक्ती करणेकामी वर्तमानपत्रात जाहिरात देण्यात यावी अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.**

(कार्यवाही-अधिक्षक,आस्थापना)

**४१) कन्या विद्या मंदिरातील विद्यार्थीनींकरीता गणवेश शिवणेबाबत.**

श्रीसाईबाबा कन्या विद्या मंदीर व कनिष्ठ महाविद्यालय,शिर्डी या महाविद्यालयातील विद्यार्थी-विद्यार्थीनींसाठी खालीलप्रमाणे गणवेशाचा वापर करण्यात येतो.

| अ.नं. | वर्ग | गणवेश |
|---|---|---|
| ०१ | इयत्ता ५ वी ते इयत्ता ७ वी विद्यार्थीनींसाठी | पिनो फ्रॉक, बेल्ट |
| ०२ | इयत्ता ८ वी ते इयत्ता १० वी विद्यार्थीनींसाठी | पंजाबी ड्रेस ओढणीसह |
| ०३ | इयत्ता ११ वी ते इयत्ता १२ वी विद्यार्थीनींसाठी | पंजाबी ड्रेस ओढणीसह |
| ०४ | इयत्ता ११ वी ते इयत्ता १२ वी विद्यार्थ्यांसाठी | फुल पॅन्ट-शर्ट |

सन २००७-०८ या शैक्षणिक वर्षात विद्यार्थी-विद्यार्थिनींसाठी खालीलप्रमाणे गणवेश शिवून घेण्यात आलेले आहेत.

| अ.नं. | वर्ग | गणवेश प्रकार | अंदाजे संख्या |
|---|---|---|---|
| ०१ | इयत्ता ५ वी ते इयत्ता ७ वी विद्यार्थीनींसाठी | पिनो फ्रॉक, बेल्ट | ३०० नग |
| ०२ | इयत्ता ८ वी ते इयत्ता १० वी विद्यार्थीनींसाठी | पंजाबी ड्रेस ओढणीसह | ३०० नग |
| ०३ | इयत्ता ११ वी ते इयत्ता १२ वी विद्यार्थीनींसाठी | पंजाबी ड्रेस ओढणीसह | ३०० नग |

| | | | |
|---|---|---|---|
| ०४ | इयत्ता ११ वी ते इयत्ता १२ वी विद्यार्थ्यांसाठी | फुल पॅन्ट-शर्ट | २०० नग |

**उपरोक्तप्रमाणे सन २००८-०९ या शैक्षणिक वर्षासाठी शालेय गणवेश शिऊन घेऊन,ते परस्पर विद्यार्थ्यांना विक्री करणेकामी पुरवठादारांकडून कोटेशन मागविण्यास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात यावी,अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.** (कार्यवाही-कन्या विद्या मंदीर)

**४२) <u>बेंचेस खरेदी करणे बाबत.</u>**

कन्या विद्या मंदीर व कनिष्ठ महाविद्यालयासाठी आवश्यक बेंचेस खरेदीबाबत पुरवठा आदेश दिलेला आहे. तथापि माल पुरवठा झालेला नाही. सबब संबंधित पुरवठादारांची अनामत रक्कम जप्त करणेत यावी. तसेच **याकामी मे.प्रगती सप्लायर्स,संगमनेर , मे.सरोदे फॅब्रिकेटर्स,अहमदनगर यांचेकडील बेंचेसची समक्ष पहाणी करुन सुधारित प्रस्ताव व्यवस्थापन समितीचे सभेत सादर करुन त्वरीत निर्णय घ्यावा,अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.**

(कार्यवाही-अधिक्षक,खरेदी विभाग)

**४३)** समाधी मंदिर परिसरात असलेले प्रसाद लाडू काऊंटर प्रसादालय इमारतीचे परिसरात सुरु करण्यात आलेले आहे. त्यामूळे भक्तांची गैरसोय होते. याकरीता संस्थानला समाधी मंदिर परिसराजवळ जिल्हा परिषद शाळेच्या मिळालेल्या १६ गुंठे जागेत लाडू कांऊटर सुरु करण्यात यावे, अशी या उपसमिती शिफारस मान्य करण्यात आली. (कार्यवाही-कँटीन विभागप्रमुख)

**४४)** श्री समाधी मंदिरात श्री साईबाबाचे मुर्तीचे वर बसविण्यात आलेली सोन्याची छत्री तिरपी बसविण्यात आलेली आहे ती व्यवस्थीत बसविण्यात यावी, याची नोंद घेण्यात आली.

(कार्यवाही-अधिक्षक, मंदिर विभाग)

**४५)** संस्थानने खरेदी केलेल्या जमिनीचे कडेने एक निंबवृक्षाचे तसेच एक पिंपळाचे झाड याप्रमाणे लागवड करण्यात यावी व या झाडांना टँकरने पाणीपुरवठा करण्यात यावा अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली. (कार्यवाही-बांधकाम विभागप्रमुख)

**४६)** सध्या जनसंपर्क कार्यालय समाधी मंदिर परिसरात आहे, त्यामूळे समाधी मंदिर परिसरात गर्दी वाढते याकरीता जनसंपर्क कार्यालय समाधी मंदिर परिसराबाहेर हलविण्यात यावे अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली. (कार्यवाही-अधिक्षक,आस्थापना विभाग)

**विषय नं. ०३ दिनांक १४.०५.२००८ रोजी शिर्डी येथे झालेल्या वैद्यकीय उपसमिती सभेचे इतिवृत्त**

**निर्णय क्र.४१६** दिनांक १४.०५.२००८ रोजी शिर्डी येथे झालेल्या वैद्यकीय उपसमिती सभेचे इतिवृत्ताच्या प्रती सर्व सदस्यांना पुरविण्यात आल्या होत्या, त्याची नोंद घेण्यात येऊन या इतिवृत्तातील खालील निर्णयांना पुष्टी देण्यात आली.

**(०१) ऑक्सीजन पाईपलाईनचे वाढीव काम करणेकामी चर्चा/वाटाघाटी करुन निर्णय घेणेबाबत**

श्रीसाईबाबा रुग्णालयात नवीन एम. आर. आय. मशिन खरेदी करण्यात येऊन कार्यान्वीत करण्यात आलेले आहे. तसेच रुग्णालयात नवीनच न्युरो ऑपरेशन थिएटरचे काम चालु असून न्युरो रिकव्हरी वार्ड तयार करावयाचा आहे. सदर विभागात ऑक्सिजन, सक्शन, व्हॅक्युम इत्यादीसाठी पाईप लाईनचे काम करावे लागणार आहे. त्याचबरोबर आय.सी.सी.यु. मध्ये दोन व जी.आय.सी.यु. मध्ये दोन खाटांची संख्या वाढवयाची आहे. त्यासाठी प्रत्येक खाटालगत ऑक्सिजन, व्हॅक्युम व सक्शनचे पॉईंट वाढवावे लागणार आहे.

वरीलप्रमाणे ऑक्सिजन पाईप लाईनचे वाढीव काम विहित पध्दतीने कोटेशन मागवून करवून घेणेकामीचा अंदाजे रु.२,५३,४५०/-चे खर्चाचा प्रस्ताव दि.२२/०९/२००७ चे मा. व्यवस्थापन समीती सभेमध्ये मान्यतेसाठी ठेवण्यात आला होता.

मा.व्यवस्थापन समिती सभेतील मंजुरी अन्वये इकडील पत्र क्र.१५७१६ दि.०३/१०/२००७ अन्वये एकूण ०८ कोटेशन धारकांकडून दि.२५/१०/२००७ अखेर कोटेशन मागविण्यात आलेले होते. त्यास अनुसरुन ०४ सिलबंद कोटेशन प्राप्त झालेले आहेत. प्राप्त कोटेशनपैकी मे.सिध्दार्थ इंजि.कंपनी, मुंबई यांना पाठविलेले पत्र पत्ता चूकीचा असल्यामुळे परत आले त्यामुळे त्यांना पुन्हा इकडील पत्र क्र.१८६७४ दि.२३/११/२००७ अन्वये पत्र पाठविण्यात आले होते त्यानुसार त्यांचे देखील कोटेशन प्राप्त झालेले आहेत असे एकूण ०४ कोटेशन प्राप्त झालेले आहे ते खालीलप्रमाणे-

०१) M/s. AL-Med Equipments, Mumbai.
०२) M/s. United Surgical, Thane.
०३) M/s. Siddharath Eng.Co., Mumbai.
०४) M/s. Jambotkar Medequip Pvt. Ltd., Mumbai.

उपरोक्त प्रमाणे चार कोटेशन उपसमिती सभेपुढे समक्ष उघडण्यात आले होते व त्याचा तुलनात्मक तक्ता तयार करुन तज्ञ समितीचे सदस्य डॉ.बापु कांडेकर, डॉ.सुभाष आगाशे, डॉ.कटारीया यांना दि.१६/०२/२००८ रोजी दाखवून घेण्यात आलेला आहे.तज्ञ समितीचे सदस्यांनी त्यांचे शिफारशींमध्ये पूणे येथील ॲडव्हॉन्स मेडिकल इंजिनिअरिंग सिस्टम, यांचेही दर मागविणेबाबत सूचना केलेल्या होत्या, त्यानुसार ॲडव्हॉन्स मेडिकल इंजिनिअरिंग यांचे दर बंद पाकीटात घेण्यात आलेले

होते. सदरचे बंद पाकीट आजचे समितीचे पूर्व परवानगीने समक्ष उघडण्यात आले व विचारात घेण्यात आले. तो तक्ता सोबत परिशिष्ट “अ” म्हणून ठेवण्यात आलेला आहे.

उपरोक्त निविदा धारकांना आजचे सभेपुढे चर्चा / वाटाघाटीसाठी समक्ष बोलविण्यात आलेले होते. त्यापैकी खालील निविदाधारक समक्ष चर्चा/वाटाघाटीसाठी उपस्थित होते.

| | |
|---|---|
| ०१. | M/s. AL-Med Equipments, Mumbai. |
| ०२ | M/s. United Surgical, Thane. |

या कोटशन्सधारकांशी समक्ष चर्चा/वाटाघाटी केल्या असता त्यांनी खालीलप्रमाणे सुट देऊ केली.

| अ.नं | कोटेशन्ससादरकर्त्याचे नांव | कोटेशनमध्ये देऊ केलेले दर | चर्चा/वाटाघाटीअंती देऊ केलेले दर रुपये |
|---|---|---|---|
| 01. | M/s. AL-Med Equipments, Mumbai. | २,६३,४५०.०० | २,३७,१०५.०० |
| 02 | M/s. United Surgical, Thane. | २,७०,४३२.०० | २,५६,९१०.०० |
| 03 | M/s. Siddharath Eng.Co., Mumbai. | २,६६,१६५.०० | अनुपस्थित |
| 04 | M/s. Jambotkar Medequip Pvt. Ltd., Mumbai | २,८७,०९०.०० | अनुपस्थित |
| 05. | Advance Medical Engg.system, Pune | २,२५,०००.०० | अनुपस्थित |

**यावर सविस्तर चर्चा होऊन, ॲडव्हॉन्स मेडिकल इंजिनिअरिंग सिस्टम, पुणे यांचे दर हे निम्मतम म्हणजे रुपये २,२५,०००/ असल्याने व तज्ञ समितीने शिफारस केलेली असल्याने त्यांचेकडून वाढीव काम करुन घेण्यात यावे अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.** (कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

**(०२) श्रीसाईनाथ व साईबाबा रुग्णालयातील मशिनरी/उपकरणे दुरस्तीकामी लागणाऱ्या कन्झ्युमेबल स्पेअर्स पार्टस खरेदीकामी चर्चा/वाटाघाटी करुन निर्णय घेणे**

श्रीसाईबाबा व श्रीसाईनाथ रुग्णालयातील विविध मशिनरी/उपकरणे दुरुस्तीकामी लागणाऱ्या Consumable Spare Parts खरेदीकामीचा अंदाजे रु. १६,५१,६३०/- चा प्रस्ताव मा. व्यवस्थापन समिती सभा दि.२२/०९/२००७ चे सभेपुढे मान्यतेसाठी ठेवण्यात आला होता.

सदरचे खरेदीकामी विहीत पध्दतीने वर्तमान पत्रात जाहीरात देऊन निविदा मागविणे बाबत निर्णय झालेला होता. त्यानुसार उपरोक्त प्रमाणे खरेदीकामी इंडीयन एक्सप्रेस- पुणे, दैनिक महाराष्ट्र टाईम्स- मुंबई, दैनिक गावकरी - नाशिक या वतर्मान पत्रात जाहिरात देण्यात येऊन दि.०५/०२/२००८ ते दि.२०/०२/२००८ अखेर संस्थानच्या शिर्डी कार्यालयात ५ निविदा विक्रिसाठी ठेवण्यात आल्या होत्या व मुंबई कार्यालयात २० निविदा विक्रिसाठी ठेवण्यात आल्या होत्या व निविदा स्विकारण्याची अंतीम मुदत दि.२२/०२/२००८ अखेर ठेवण्यात आली होती. शिर्डी येथील कार्यालयात ५ निविदांची विक्री झालेली होती, तर मुंबई येथील कार्यालयात देखील ८ निविदांची विक्री झाली होती. त्यास अनुसरुन शिर्डी कार्यालयात ४ व मुंबई येथील कार्यालयात ६ अशा एकूण १० निविदा प्राप्त झालेल्या होत्या त्या खालीलप्रमाणे -

| | | | |
|---|---|---|---|
| 01 | M/s. Siddharth Engineering Co., Mumbai | 06 | M/s. Excel Services, Mumbai |
| 02 | M/s. United Surgical, Thane | 07 | M/s. Cardio Beats, Mumbai |
| 03 | M/s. Chimco Bio-Medical Engineering Co., Mumbai | 08 | M/s. Esbee Dynamed Pvt.Ltd., Mumbai |
| 04 | M/s. Saitrons Medical Equipments, Loni | 09 | M/s. Adroit Medical System & Services, Mumbai |
| 05 | M/s. Devi Surgical, Ahmednagar | 10 | M/s. M. Shah & Co., Pune |

सदर खरेदीच्या तांत्रिक निविदा (Technical Bid) दि.१६/०३/२००८ चे मा. व्यवस्थापन समिती सभेपुढे समक्ष उघडण्यात आल्या होत्या तर Commercial Bid हे दि. १५/०४/२००८ चे मा. व्यवस्थापन समिती सभेपुढे समक्ष उघडण्यात आलेल्या आहेत. त्यांचा तुलनात्मक तक्ता तयार करण्यात येऊन तो आजचे सभेत सर्व सदस्यांना पुरविण्यात आला.

सदर कन्झ्युमेबल स्पेअर पार्ट खरेदी करताना ज्या कंपनीचे मशीन आहे त्याच कंपनीचे ॲक्सेसरीज / स्पेअर पार्ट त्या मशीनकरीता वापरता येऊ शकत असल्यामुळे एकुण १० कंपन्यांपैकी ज्या कंपन्या ओरीजनल स्पेअर पार्टचा पुरवठा करीत आहेत त्यांचा विचार करुन व जेथे एकापेक्षा अधिक कंपन्या ओरीजनल स्पेअर पार्टचा पुरवठा करु शकत आहेत तेथे यापुर्वी पुरवठा केलेल्या स्पेअर पार्टचा दर्जा यांचा तुलनात्मक विचार करुन विविध पुरवठाधारकांनी दिलेल्या विविध स्पेअर पार्टबाबत बायोमेडीकल इंजिनीअर यांनी शिफारस केलेली आहे व त्यांचे शिफारशीनुसार उपरोक्त स्पेअर पार्टस खरेदीकामी रु. १५,६८,५१७/- इतका खर्च येणार आहे. उपरोक्त निविदा धारकांना आजचे सभेपुढे चर्चा / वाटाघाटीसाठी बोलविण्यात आले असता त्यांनी खालीलप्रमाणे सुट देऊ केलेली आहे.

| Sr.No | Name of Suppliers | Discount after Negotations |
|---|---|---|
| 01 | M/s. Siddharth Engineering Co., Mumbai | Absent |
| 02 | M/s. United Surgical, Thane | Absent |

| | | |
|---|---|---|
| 03 | M/s. Chimco Bio-Medical Engineering Co., Mumbai | 3% by fax |
| 04 | M/s. Saitrons Medical Equipments, Loni | 2% |
| 05 | M/s. Devi Surgical, Ahmednagar | 5% |
| 06 | M/s. Excel Services, Mumbai | 10% |
| 07 | M/s. Cardio Beats, Mumbai | 5% |
| 08 | M/s. Esbee Dynamed Pvt.Ltd., Mumbai | Absent |
| 09 | M/s. Adroit Medical System & Services, Pune | 5% |
| 10 | M/s. M. Shah & Co., Pune | 5%. On Spares |

**यावर सविस्तर चर्चा होऊन, संस्थान बायोमेडिकल इंजिनिअर यांनी मे. एम. शहा अॅन्ड कंपनी, पुणे यांचेकडून Autoclave मशिनचे स्पेअर पार्ट, मे. सिध्दार्थ इंजिनीअरींग कंपनी, मुंबई यांचेकडून मेडीकल गॅस अॅक्सेसरीज, मे. अड्रॉईट मेडीकल सिस्टीम अॅन्ड सर्व्हीसेस, पुणे यांचेकडून L&T मॉनीटरचे अॅक्सेसरीज आणि उर्वरीत स्पेअर्स पार्टस् मे.साईट्रॉन्स मेडीकल इक्विपमेट, लोणी यांचेकडून खरेदी करण्याची शिफारस केलेली आहे, त्यानुसार खरेदी करण्यात यावे अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली. (कार्यवाही-वैद्यकीय संचालक).**

**(०३) ब्लड बँक विभागासाठी सेंट्रल मॉनिटरिंग सिस्टीम खरेदीकामी प्राप्त झालेले कोटेशन उघडून चर्चा/वाटाघाटीने निर्णय घेणे.**

श्रीसाईबाबा रुग्णालयातील रक्तपेढीमध्ये रक्त व रक्त घटक साठविण्यासाठी ५ ब्लड बँक रेफरिजेरेटर्स व ४ डिफ्रीजर सतत वापरात असतात. सदर फ्रीजर चालू असतांनी त्यांचे टेंपरेचर सतत बघणे आवश्यक असते. सदर फ्रीजरचे टेंपरेचर सतत बघणेसाठी त्यांनी डि.पी. क्रमांक ६००३ दि.२२/०९/२००७ अन्वये सेंट्रल मॉनिटरींग सिस्टीम बसवून मिळणेबाबतची मागणी केलेली आहे.

सदर सेंट्रल मॉनिटरींग सिस्टीम बसविल्यामुळे खालील फायदे होऊ शकतात.

०१) सदर CMS System मुळे टेंपरेचर मॉनिटरींग एकाच ठिकाणाहून करता येईल त्यामुळे Manpower कमी लागेल.

०२) सदर CMS System च्या वापरामुळे कोणत्या फ्रिजरला टेंपरेचर Problem आहे हे कळू शकेल.

०३) तसेच टेंपरेचर Problem मुळे रक्त खराब होण्याचा धोका असतो तो सुध्दा या सिस्टीममुळे कमी होईल.

०४) सदर CMS System मुळे प्रत्येक दिवसांचे Temperature Reporting कळू शकेल.

त्यानुसार वरीलप्रमाणे सेंट्रल मॉनिटरींग सिस्टीम बसविणे व त्यासाठी लागणाऱ्या अॅक्सेसरीज विहीत पध्दतीने कोटेशन मागवून खरेदीस व याकामी येणाऱ्या अंदाजे रु.१,२७,०००/- चे खर्चाचा प्रस्ताव दि. १०/०१/२००८ चे मा. व्यवस्थापन समिती सभेमध्ये मान्यतेसाठी ठेवण्यात आला होता.

मा.व्यवस्थापन समिती सभेतील निर्णय क्र. ३२ अन्वये इकडील पत्र क्र. २३७२ दि. १४/०२/२००८ अन्वये एकुण ५ पुरवठा धारकांकडून दि. २९/०२/२००८ अखेर कोटेशन मागविण्यात आले होते. त्यास अनुसरुन एकच कोटेशन प्राप्त झाले होते. आणखी कोटेशन प्राप्त होणेसाठी इकडील पत्र क्र. ३६६८ दि. ०८/०३/२००८ स्मरणपत्र पाठवून कोटेशन पाठविणेबाबत कळविण्यात आले होते. त्यास अनसुरुन खालीलप्रमाणे बंद कोटेशन प्राप्त झालेले आहेत ः

| Sr.No. | Name of Suppliers |
|---|---|
| 1 | M/s. Udhyamshri Services, Miraj |
| 2 | M/s. Anup Enterprises, Pune |
| 3 | M/s. Adroit Medical Systems & services, Pune |
| 4 | M/s. Biomedics, Pune |

वरीलप्रमाणे प्राप्त झालेले बंद कोटेशन आजचे सभेत समक्ष उघडण्यात येऊन कोटेशन्ससादरकर्त्यांना समक्ष चर्चा/वाटाघाटीसाठी बोलविण्यात आले असता त्यांनी खालीलप्रमाणे दर देऊ केलेले आहेत.

| Sr. No. | Description | Qty. | Udhyamshri Services, Miraj. | | Biomedics, Pune | Adroit Medical, Pune. | Anup Enterprises, Pune |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | Make/ Model | Rate Per | Rate Per | Rate Per | Rate Per |
| 1 | Central Monitoring System for Blood Bank Refrigerators | 1 | CMS 16IC (Alarm AT CMS) | 168106.50 | 138320.00 | 140625.00 | 146250 |
| | | | CMS 16IR (Remote & CMS Alarm) | 182180.25 | | | |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | **Rate After Negotiation** | | | **Absent** | **Absent** | 7% Discount - Rs. 130781.25 + Cost of Additional 16 PT senser & Cable is etc. | **Absent** |

**यावर सविस्तर चर्चा होऊन, M/s. Adroit Medical Systems & Services, Pune यांचे निम्नतम दर स्विकारणेत येऊन त्यांना पुरवठा आदेश देण्यात यावा, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.** (कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

**(०४) श्री साईनाथ रुग्णालयातील ऑपरेशन थिएअरकरीता ऑटोक्लेव्ह खरेदीकामी प्राप्त झालेले कोटेशन्स उघडून निर्णय घेणेबाबत**

श्रीसाईनाथ रुग्णालयातील ऑपरेशन थिएटरकरीता सन १९९८ साली एक नग Mediquip कंपनीचा 18 KW High speed Autoclave मे. एम. शहा कंपनी, पुणे यांचेकडून रु. १,२२,०००/- इतक्या रक्कमेत खरेदी करण्यात आला होता. सदरचे ऑटोक्लेव्ह मशिन नादुरुस्त झाल्याने जुने मशिन बायबॅक करुन नविन १८ KW High speed Autoclave Machine २०” x ३६” विहित पध्दतीने कोटेशन मागवून खरेदीकामीचा अंदाजे रु. २,५०,०००/- चे खर्चाचा प्रस्ताव दि. १३/०१/२००८ चे मा. व्यवस्थापन समिती सभेमध्ये मान्यतेसाठी ठेवण्यात आला होता.

मा.व्यवस्थापन समिती सभेचे मंजुरी अन्वये इकडील पत्र क्र. १७२६ दि. २९/०१/२००८ अन्वये एकुण १० पुरवठाधारकांकडून दि. ०९/०२/२००८ अखेर कोटेशन मागविण्यात आले होते. त्यास अनुसरुन दोनच कोटेशन प्राप्त झालेले होते, सदर खरेदीकामी आणखी कोटेशन प्राप्त होणेसाठी इकडील पत्र क्र. ३६७७ दि. १०/०३/२००८ अन्वये पुन्हा स्मरणपत्र पाठविण्यात आलेले आहेत. त्यास अनुसरुन एकही कोटेशन प्राप्त झालेले नाही. प्राप्त कोटेशन खालीलप्रमाणे -

१. मे. नॅट स्टील इक्विपमेंटस, मुंबई (बंद कोटेशन)
२. मे. एम. शहा कंपनी, पुणे (प्रशासन शाखेकडून टपलातून उघडून मिळाले)
३. मे. मोदी एंटरप्रायजेस (इं), मुंबई (बंद कोटेशन)

उपरोक्तपैकी अ.नं. २ यांचे कोटेशन हे प्रशासन शाखेकडून टपलातून उघडून मिळालेले आहे तर अ.नं. ३ मे. मोदी एंटरप्रायजेस (इं), मुंबई यांना कोटेशन मागणीचे पत्र नसताना त्यांनी स्वत:हून बंद कोटेशन पाठविलेले आहे, ते देखील विचारात घ्यावे असे मत आहे.

वरीलप्रमाणे प्राप्त झालेले बंद कोटेशन आजचे सभेत समक्ष उघडण्यात येऊन कोटेशन्ससादरकर्त्यांना समक्ष चर्चा/वाटाघाटीसाठी बोलविण्यात आले असता त्यांनी चर्चा / वाटाघाटीनंतर खालीलप्रमाणे दर देऊ केलेले आहेत.

| Sr. No. | Description | Qty. | Nat Steel Equipment, Mumbai | | | M. Shah & Co., Pune. | | | Modi Enterprises, Mumbai | | | Total Amt. in Rs. |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | Make/ Model | Rate Per | Rate after Negoti-ation | Make/ Model | Rate Per | Rate after Negoti-ation | Make/ Model | Rate Per | Rate after Negoti-ation | |
| 1 | 18 KW High speed Autoclave Machine | 1 | **Fully Automatic High Speed High Pressure Horizontal** | **591806** | **503035.10** | Medi-quip | 230625 | 207562.50 | **Fully SS** | 201875 | 175000 | 491035.10 |
| | Horizontal High Speed Sterilizer with ISI mark. | | **20 HS/E/NAT - 8** | | | HSS-12 | | | MECR - 45 | | | |
| | Chamber Size : 20” x 36” | | **20 x 36** | | | 20 x 36 | | | 20 x 36 | | | |
| | Power Consumption : 18 KW | | **36KW** | | | 18KW | | | 18KW | | | |
| | With Vaccum Presure Pump | | N.Q. | | | Yes | 10125 | 9112.50 | Access-ories with Conde-nsor | | 45000 | |
| | Buyback offer | | | **12000** | **12000** | | N.Q. | | | OR | N.Q. | |
| | **Total Value after buyback of Old machine** | | | | **491035.10** | | | | **Fully Automatic** | 450000 | 405000 | |
| | | | | | | | | | MECR - 45 | | | |

| | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | | | 20 x 36 | | | |
| | | | | | | | | | 18KW | | | |
| | | | | | | | | | Access-<br>ories | | | |
| | | | | | | | | | | | N.Q. | |
| | | | | | | | | | | **Total Amt. in Rs.** | | **491035.10** |

**यावर सविस्तर चर्चा होऊन, मे. नॅट स्टील इक्विपमेंटस, मुंबई व मे. एम.शहा ॲण्ड कंपनी, पूणे यांचे ॲटोक्लेव्ह रुग्णालयात सध्या कार्यरत आहेत. त्यामध्ये मे. नॅट स्टील इक्विपमेंटस, मुंबई यांचे ॲटोक्लेव्ह फुल्ली ॲटोमॅटीक असून, हा घेतल्यापासून चांगल्या प्रकारचे काम देत असून त्याबाबत त्याची कोणतीही तक्रार नाही. त्यामूळे मे. नॅट स्टील इक्विपमेंटस, मुंबई यांचे दर रुपये ५,०३,०३५/- जरी जास्त असले तरी ते स्विकारणेत येऊन त्यांना जुने ॲटोक्लेव्ह मशिन परत करण्यात येऊन त्याची किंमत रुपये १२,०००/- बीलातून वजा करुन त्यांना पुरवठा आदेश देण्यात यावा, तसेच त्यांना पुरवठा आदेशासोबत ६० % आगाऊ रक्कम देण्यात येऊन उर्वरीत ४०% रक्कम मशिन रुग्णालयात प्राप्त झालेनंतर अदा करणेत यावी, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.** (कार्यवाही-वैद्यकीय संचालक).

**(०५) साईनाथ रुग्णालयातील ऑपरेशन थिएटरकीरता ड्रेसिंग ड्रम खरेदीकामी प्राप्त झालेले कोटेशन्स उघडून निर्णय घेणे बाबत.**

श्रीसाईबाबा रुग्णालयातील ऑपरेशन थिएटर विभागाने डी. पी. क्र. ७६३० दि. ३१/०१/२००८ अन्वये Dressing Drum Size ८” x १०”-५० नग व १२” x १५” - ५० नग अशी मागणी केलेली होती. त्यानुसार दि. २४/०२/२००८ चे मा. व्यवस्थापन समिती सभेत सदर Dressing Drum विहीत पध्दतीने कोटेशन मागवून खरेदीकामीचा अंदाजे रु. १,७५,०००/- चे खर्चाचा प्रस्ताव मान्यतेसाठी ठेवण्यात आला होता.

मा.व्यवस्थापन समिती सभेचे मंजुरी अन्वये इकडील पत्र क्र. ३४६९ दि. ०६/०३/२००८ अन्वये एकुण १२ पुरवठाधारकांकडून दि. १६/०३/२००८ अखेर कोटेशन मागविण्यात आले होते. त्यास अनुसरुन खालीलप्रमाणे बंद कोटेशन प्राप्त झालेले आहेत -

०१) मे. वॉर्डन सर्जिकल कं. प्रा. लि., नवी मुंबई
०२) मे. पुर्निमा सर्जिकल एंटरप्रायजेस, नाशिक
०३) मे. सुयश फार्मासुटीकल्स, श्रीरामपुर
०४) मे. कांचन ड्रग्ज प्रा. लि., पुणे
०५) मे. क्वालिटी सर्जिकल कंपनी, मुंबई
०६) मे. एस. के. एजन्सी, धुळे

उपरोक्तप्रमाणे प्राप्त झालेले कोटेशन्स आजचे सभेत समक्ष उघडण्यात येऊन कोटेशन्ससादरकर्त्यांना समक्ष चर्चा/वाटाघाटीसाठी बोलविण्यात आले असता त्यांनी चर्चा/ वाटाघाटीनंतर खालीलप्रमाणे दर देऊ केलेले आहेत.

| **अ.नं.** | **कोटेशनसादरकर्त्यांचे नाव** | **Dressing Drum Stainles Still & Jointless 15 ‘x12”** | **Dressing Drum Stainles Still & Jointless 8‘x10”** |
|---|---|---|---|
| ०१ | मे. वॉर्डन सर्जिकल कं. प्रा. लि., नवी मुंबई | | |
| | **कोटेशनमधील दर** | २,१०९.०० | १,१७०.०० (11‘x9”) |
| | **वाटाघाटीअंती देऊ केलेले दर** | अनुपस्थित | अनुपस्थित |
| ०२ | मे. पुर्निमा सर्जिकल एंटरप्रायजेस, नाशिक | | |
| | **कोटेशनमधील दर** | ३,३८०.०० | १,५४०.०० (11‘x9”)<br>१,२९०.०० (9 ‘x9”) |
| | **वाटाघाटीअंती देऊ केलेले दर** | ३,२७८.६० | १,४९३.८० (11‘x9”)<br>१,२५१.३०(9 ‘x9”) |
| ०३ | मे. सुयश फार्मासुटीकल्स, श्रीरामपुर | | |
| | **कोटेशनमधील दर** | २,८००.००<br>Maxlife Jointless | १,२००.०० (9 ‘x9”)<br>१,३००.०० (9 ‘x11”)<br>Maxlife Jointless |
| | **वाटाघाटीअंती देऊ केलेले दर** | २,६००.०० | १,१७५.०० (9 ‘x11”)<br>१,२००.००(9 ‘x9”) |
| ०४ | मे. कांचन ड्रग्ज प्रा. लि., पुणे | | |
| | **कोटेशनमधील दर** | २,५००.००<br>Deepak | ९६०.०० (9 ‘x9”)<br>१,१५०.००(11‘x9”)<br>Deepak |
| | **वाटाघाटीअंती देऊ केलेले दर** | अनुपस्थित | अनुपस्थित |
| ०५ | मे. एस. के. एजन्सी, धुळे | | |
| | **कोटेशनमधील दर** | ३,७५०.००<br>Zenith Surgical | १,७५०.०० (9.5”x11‘)<br>Zenith Surgical |

| | | | |
|---|---|---|---|
| | **वाटाघाटीअंती देऊ केलेले दर** | अनुपस्थित | अनुपस्थित |
| ०६ | मे. क्वालिटी सर्जिकल कंपनी, मुंबई | | |
| | **कोटेशनमधील दर** | २,७९०.०० स्टील | १,२१५.०० (9 'x11") |
| | **वाटाघाटीअंती देऊ केलेले दर** | २,६५०.५० | १,१५४.२५ |

**यावर सविस्तर चर्चा होऊन, कोटेशनमध्ये मागणी करताना आपण ८" x १०" या साईजच्या ड्रमची मागणी केलेली होती, परंतु प्रत्यक्षात सर्व कोटेशनधारकांनी ९" x ११" या साईजच्या ड्रमचे दर प्राप्त झालेले आहेत, त्यामुळे ९" x ११" चे दर स्विकारण्यात यावे, असे ठरले. प्राप्त कोटेशनमध्ये मे. क्वालिटी सर्जिकल कंपनी, मुंबई यांचे ड्रेसिंग ड्रम रुग्णालयात सध्या कार्यरत असून ते चांगल्या प्रकारचे काम देत असून त्याबाबत कोणतीही तक्रार नाही. त्यामूळे मे.क्वालिटी सर्जिकल कंपनी, मुंबई यांचे दर तुलनेने जास्त असले तरी ते स्विकारणेत येऊन त्यांना कार्यादेश देण्यात यावा अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.**

**(कार्यवाही-वैद्यकीय संचालक)**

**(०६) पेशंटचे ड्रेस, बेडशीट व पिलोकव्हर खरेदीकामी प्राप्त कोटेशन उघडुन चर्चा/वाटाघाटीने निर्णय घेणेबाबत.**

श्री साईबाबा हॉस्पिटलचे विविध वॉर्ड/विभागांना लागणारे पेशंट ड्रेस ७८० नग, बेडशिट ११०० नग व पिलोकव्हर ३०० नग खरेदीकामी रुपये ३,५०,०००/- चे खर्चास व्यवस्थापन समितीचे दिनांक ८.१२.२००७ चे सभेतील निर्णय क्र. ८०७ अन्वये मान्यता देण्यात आलेली आहे.

त्यानुसार जा.नं.२३७१/२००८ दिनांक १४.०२.२००८ अन्वये ५ पुरवठाधारकांकडून दिनांक २९.२.२००८ अखेर कोटेशन्स मागविण्यात आले होते. त्यापैकी खालील ४ पुरवठादारांनी आपली कोटेशन्स सादर केलेली आहेत.

| अ.न. | कोटेशन्सधारकाचे नांव |
|---|---|
| ०१ | मे.बांठिया एंटरप्रायजेस,पूणे |
| ०२ | मे.मोता गारमेंटस्, बारामती |
| ०३ | मे.आदिनाथ टेक्स्ट केम लि.सुरत |
| ०४ | मे.बन्सल ट्रेडींग कंपनी,भोपाळ |

उपरोक्तप्रमाणे प्राप्त झालेले कोटेशन्स आजचे सभेत समक्ष उघडण्यात येऊन कोटेशन्ससादरकर्त्यांना समक्ष चर्चा /वाटाघाटीसाठी बोलविण्यात आले होते.

त्यानुसार खालील कोटेशन्ससादरकर्ते समक्ष चर्चा/वाटाघाटीसाठी उपस्थित होते.

| अ.न. | कोटेशन्सधारकाचे नांव |
|---|---|
| ०१ | मे.बांठिया एंटरप्रायजेस,पूणे |
| ०२ | मे.मोता गारमेंटस्, बारामती |
| ०३ | मे.बन्सल ट्रेडींग कंपनी,भोपाळ |

आजचे सभेत चर्चा होऊन, संस्थानने निवासस्थान विभागासाठी यापूर्वी खरेदी केलेले बॉम्बे डाईंग कंपनीचे कापड चांगल्या प्रतीचे असल्याने श्री साईबाबा हॉस्पिटलसाठी खरेदी करावयाचे बेडशिट व उशीकव्हर हे बॉम्बे डाईंग कंपनीचेच खरेदी करावे.

याकरीता उपस्थित वरील सर्व कोटेशन्ससादरकर्त्यांना समक्ष बोलावून श्री साईबाबा हॉस्पिटलसाठी खरेदी करावयाचे बेडशिट व उशीकव्हर हे बॉम्बे डाईंग कंपनीचे खरेदी करावयाचे असल्याने सध्याचे उघडण्यात आलेले कोटेशन्स रद्द करण्यात येत असलेबाबत सांगणेत आले.

**श्रीसाईबाबा हॉस्पिटलसाठी खरेदी करावयाचे पेशंट ड्रेस, बेडशिट व उशीकव्हर खरेदीकामी मा.विश्वस्त श्री पांडुरंग गमाजी अभंग व मा.श्री सुरेश गोरक्षनाथ वाबळे व मा.श्री अशोक भिमाशंकर खांबेकर यांनी मुंबई, पुणे येथे जाऊन व समक्ष पहाणी करुन खरेदी करावी अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली. (कार्यवाही-वैद्यकीय संचालक)**

**(०७)श्रीसाईबाबा हॉस्पिटलमध्ये असलेल्या विविध मशिनरीचे वार्षिक सर्व्हीस कॉन्ट्रॅक्ट करणे बाबत.**

श्रीसाईबाबा हॉस्पिटलमध्ये अंदाजे एकुण रू.२८,३१,७२,६५१.७४ इतक्या रकमेचे मेडिकल इन्स्टुमेंट व मशिनरी खरेदी करण्यात आले आहेत. आतापर्यंत खरेदी करण्यात आलेल्या मशीन्सपैकी ज्या मशीन्सचा वॉरंटी कालावधी संपला आहे व त्यांची दुरुस्ती व देखभाल पुरवठाधारक कंपन्यांकडुनच करणे आवश्यक आहे अशा विविध एकुण ०८नग मशीन्सचे मा. व्य. समितीच्या दि. २२/०९/२००७ च्या सभेतील विषय क्र. २५ निर्णय क्र. ७२६ (अ) अन्वये व ४५ नग मशीन्सचे मा. व्य. समितीच्या दि. २०/०१/२००८ च्या सभेतील विषय क्र. ०५ निर्णय क्र. १४५ अन्वये नियमीत दुरुस्ती व देखभालीकरीता विविध पुरवठाधारक कंपन्यांकडे वार्षिक सर्व्हिस कॉन्ट्रॅक्ट करण्यात आले आहे. सदर वार्षिक सर्व्हिस कॉन्ट्रॅक्ट कालावधीत कंपन्यांचे इंजिनीअर त्यांच्या नियमीत भेटी देउन दुरुस्ती व देखभाल करीत आहेत. परंतु सदर वार्षिक सर्व्हिस कॉन्ट्रॅक्ट करतेवेळी ऑपथॅल्मीक विभागात नियमीत वापरात असणाऱ्या फक्त -०५ नग मशीन्सचे वार्षिक सर्व्हिस कॉन्ट्रॅक्ट करणेत यावे

असे त्यावेळचे ऑप्थॅल्मोलॉजीस्ट डॉ. पाटील यांनी कळविले होते. त्यामुळे फक्त तितक्याच मशीन्सचे कंपनीकडे वार्षिक सर्व्हिस कॉन्ट्रॅक्ट करणेत आले आहे. परंतु श्री साईबाबा हॉस्पिटलमध्ये दि. २९/०३/२००८ रोजी नेत्ररोग विभागाने केलेल्या विविध सूचना तथा मागण्यांसंदर्भात झालेल्या सभेत चर्चेअंती घेण्यात आलेल्या निर्णयानुसार नेत्ररोग विभागातील उपलब्ध सर्व मशीन्सचे वार्षिक सर्व्हिस कॉन्ट्रॅक्ट करावे असे ठरले आहे. त्यामुळे मे. कार्ल झैस (इं) प्रा.ली. मुंबई यांनी पुरविलेल्या उर्वरीत एकुण ०६ नग मशीन्सचे वार्षिक सर्व्हिस कॉन्ट्रॅक्टचे दर मागविण्यात आले आहेत.

तसेच मे. फिलीप्स मेडीकल सिस्टीम्स, मुंबई व मे. फिलीप्स यांचे डीलर मे. सिरॉनीक्स इन्स्ट्रुमेंट प्रा. ली. यांचेकडुन कार्डीयाक रिकव्हरी, आय.सी.यु. व ऑपरेशन थिएटरकरीता मल्टीपॅरा मॉनीटर्स ३५ नग व सेंट्रल मॉनिटरींग सिस्टीम खरेदी करण्यात आली आहे. सदर मॉनीटर्स व सेंट्रल मॅानीटरींग सिस्टीम नेहमी अद्यावत असणे आवश्यक असुन त्यांचा वॉरंटी कालावधी संपला असल्यामुळे मे. फिलीप्स मेडीकल सिस्टीम मुंबई म्हणजेच सध्याची मे. फिलीप्स इलेक्ट्रॉनीक्स इंडिया ली. मुंबई यांचेकडे वार्षिक सर्व्हिस कॉन्ट्रॅक्ट करणे गरजेचे आहे. त्यामुळे मे. फिलीप्स इलेक्ट्रॉनीक्स इंडिया ली. मुंबई यांचेकडुन वार्षिक सर्व्हिस कॉन्ट्रॅक्टचे दर मागविण्यात आले आहेत.

ऑप्थॅल्मीक विभागातील एकुण ०६ नग मशीन्सचे वार्षिक सर्व्हिस कॉन्ट्रॅक्ट करणेसाठी मे. कार्ल झैस इंडिया प्रा. ली. मुंबई यांनी दिलेले दर तसेच मे. फिलीप्स इलेक्ट्रॉनीक्स इंडिया ली. मुंबई यांनी मल्टीपॅरा ३५ नग, सेंट्रल मॉनीटरींग सिस्टीम व डिफीब्रीलेटर ०१ नग चे वार्षिक सर्व्हिस कॉन्ट्रॅक्ट करणेसाठी दिलेले दर दर्शविण्यात आले आहेत. मे. कार्ल झैस इंडिया प्रा. ली. मुंबई व मे. फिलीप्स इलेक्ट्रॉनीक्स इंडिया ली. मुंबई या कंपनींच्या प्रतीनिधीशी मा.व्य. समितीसमोर प्रत्यक्ष वाटाघाटी करुन वार्षिक सर्व्हिस कॉन्ट्रॅक्टचे दर निश्चीत करता येतील असे मत आहे.

तरी श्री साईबाबा हॉस्पिटलच्या ऑप्थॅल्मीक विभागातील एकुण ०६ नग मशीन्सचे व कार्डीयाक रिकव्हरी, आय.सी.यु. व ऑपरेशन थिएटरकरीता मल्टीपॅरा मॉनीटर्स ३५ नग, सेट्रल मॉनिटरींग सिस्टीम ०१ नग व डिफीब्रीलेटर मशीन ०१ नग यांचे वार्षिक सर्व्हिस कॉन्ट्रॅक्टचे दर संबंधीत कंपन्यांच्या प्रतिनीधींशी प्रत्यक्ष वाटाघाटी करुन ठरविण्यासाठी व यापुढील एक वर्षाचे कालावधीकरीता वार्षिक सर्व्हिस कॉन्ट्रॅक्ट करणेस दर निश्चित केल्यानंतर येणाऱ्या एकुण रकमेच्या खर्चास आणि सदरची संबंधित रक्कम कंपनीस आगाऊ पाठविणेस मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

| Sr No | Dept | Company | Machine/ Equipment | Price of Machine | Contract Period | AMC/CMC Prices | Final Prices after Negotiation |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 01 | Opthal OT/OPD | M/s. Carl Zeiss India Pvt. Ltd. Mumbai. | Humphrey Field Analyzer Model- HFA 720i | 9,19,974.00 | 01/04/2008 To 31/03/2009 | **37,079.00 AMC (4.03%)** | **35,225/-** |
| 02 | Ophthal OT/OPD | M/s. Carl Zeiss India Pvt. Ltd. Mumbai. | Humphrey Corner Topography Model- ATLAS 995 | 9,94,398.00 | 01/04/2008 To 31/03/2009 | **30,899.00 AMC (3.107%)** | **29,354/-** |
| 03 | Ophthal OT/OPD | M/s. Carl Zeiss India Pvt. Ltd. Mumbai. | Fundus Imaging System Model- VISUPAC ACQUIRE | 24,68,908.00 | 01/04/2008 To 31/03/2009 | **49,438.00 AMC (2.00%)** | **46,966/-** |
| 04 | Ophthal OT/OPD | M/s. Carl Zeiss India Pvt. Ltd. Mumbai. | Slit Lamp Model- SL 115 – 02 nos. | 3,13,984.50 X2 = 6,27,969/- | 01/04/2008 To 31/03/2009 | **37,079.00 AMC (5.9%)** | **35,225/-** |
| 05 | Ophthal OT/OPD | M/s. Carl Zeiss India Pvt. Ltd. Mumbai. | Carl Zeiss Laser Model- Visulas 532s | 22,40,139.00 | 01/04/2008 To 31/03/2009 | **43,259.00 AMC (1.93%)** | **41,096/-** |
| 06 | ICCU, GICU, CRU, & OT | M/s. Philips Electronics India Limited. | Philips MP 20 Multipara Monitors - 35 Nos. MMS (Servers) – 38 Nos. Defibrillator – 01 Nos. CNS System – 01 Nos. Capnography Attachment – 01 Nos. | 1,10,63,274.00 | 01/04/2008 To 31/03/2009 | **9,45,434.00 CMC (8.54%)** | **8,99,664/-** |
| | | | **Total Machines- 82 Nos.** | **Rs.1,80,00,677.50** | **Rs.11,43,188.00** | **Rs.10,87,530/-** | |

उपरोक्त दोनही कोटेशन्सधारकांना समक्ष चर्चा /वाटाघाटीसाठी बोलविण्यात आले असता फक्त मे. फिलीप्स मेडीकल सिस्टीम्स, मुंबई यांचे प्रतिनिधी समक्ष चर्चा/वाटाघाटीसाठी उपस्थित होते. त्यांनी त्यांचे मॉनिटर्स करीता देऊ केलेली मुळ किंमत रुपये ८,४०,७००/- वर रु.४०,७००/- सुट देऊ केली

त्यानुसार रु. ८,००,०००/- + (७० % रक्कम रु. ५,६०,०००/- वर १२.५ % व्हॅट) रु. ७०,०००/- + (३० % रक्कम रु. २,४०,०००/- वर १२.३६ % सर्व्हीस टॅक्स) रु. २९,६६४/- = ८,९९,६६४/- तर कार्ल झैस (इं) प्रा.लि. मुंबई फॅक्स पत्राव्दारे एकुण रक्कमेवर ५% सुट कळविलेले आहे. सदरचे पत्र सभेत दाखविण्यात आले.

**यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्तप्रमाणे मे. कार्ल झैस (इं) प्रा.लि. मुंबई व मे. फिलीप्स मेडीकल सिस्टीम्स, मुंबई यांचे वरीलप्रमाणे दर स्विकारणेत येऊन त्यांचेकडून पूढील एक वर्षाचे कालावधीकरीता वार्षिक सर्व्हिस कॉन्ट्रॅक्ट करण्यात येऊन येणाऱ्या एकुण रकमेच्या खर्चास आणि सदरची संबंधित रक्कम कंपनीस आगाऊ पाठविणेस मान्यता देण्यात यावी अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली. (कार्यवाही-वैद्यकीय संचालक)**

**(०८) श्री साईबाबा रुग्णालयातील एम.आर.आय. विभागासाठी बॉईल्स ॲनेस्थेसिया मशिन खरेदीकामी प्राप्त झालेल्या तांत्रिक निविदा उघडणे बाबत.**

श्रीसाईबाबा रुग्णालयातील MRI विभागासाठी Boyles Anaesthesia खरेदीकामीचा अंदाजे रु. ९,५६,०००/- चे खर्चाचा प्रस्ताव दि.२२/०९/२००७ रोजीचे मा. व्यवस्थापन समिती सभेपुढे मान्यतेसाठी ठेवण्यात आला होता. सदरचे खरेदीकामी विहीत पध्दतीने वर्तमान पत्रात जाहीरात देऊन निविदा मागविणे बाबत निर्णय झालेला होता. त्यास अनुसरुन उपरोक्त खरेदीकामी सकाळ- पुणे (टुडे), टाइम्स ऑफ इंडिया - मुंबई, लोकमत - औरंगाबाद, अकोला, नागपुर इंडीयन एक्सप्रेस - पुणे, दै.गावकरी नाशिक या वतर्मान पत्रात जाहिरात देण्यात येऊन दि.२१/०२/२००८ ते दि.०६/०३/२००८ अखेर संस्थानच्या शिर्डी कार्यालयात ५ निविदा व मुंबई कार्यालयात १५ निविदा विक्रिसाठी ठेवण्यात आल्या होत्या व निविदा स्विकारण्याची अंतीम मुदत दि.०८/०३/२००८ अखेर ठेवण्यात आली होती. तसेच सदरचे जाहिरातीबाबत अवगत करणेसाठी एकुण २८ पुरवठा धारकांना इकडील पत्र क्र. २७७९ दि. २२/०२/२००८ अन्वये कळविण्यात आले होते. सदर खरेदीकामी शिर्डी व मुंबई कार्यालयात ०५ निविदाची विक्री झालेली होती व खालीलप्रमाणे दोनच सिलबंद निविदा प्राप्त झालेल्या होत्या -

१. मे. सुमित हेल्थकेअर प्रा. लि., मुंबई
२. मे. विप्रो जीई हेल्थकेअर प्रा. लि., पुणे

उपरोक्तप्रमाणे खरेदीकामी दोनच निविदा प्राप्त झालेल्या होत्या, त्यामुळे सदर खरेदीकामी दि. २०/०३/२००८ चे टिपणीन्वये जनसंपर्क विभागामार्फत वर्तमान पत्रात जाहिरात देण्यात येऊन फेर निविदा मागविण्याचा प्रस्ताव मान्यतेसाठी सादर करण्यात आला होता. सदरचे मंजुरी अन्वये उपरोक्त खरेदीकामी टाईम्स ऑफ इंडीया-मुंबई, महाराष्ट्र टाईम्स-मुंबई या वतर्मान पत्रात जाहिरात देण्यात येऊन दि.१६/०४/२००८ ते दि.२८/०४/२००८ अखेर संस्थानच्या शिर्डी कार्यालयात ३ निविदा व मुंबई कार्यालयात ७ निविदा विक्रिसाठी ठेवण्यात आल्या होत्या व निविदा स्विकारण्याची अंतीम मुदत दि.३०/०४/२००८ अखेर ठेवण्यात आली होती. तसेच सदरचे जाहिरातीबाबत अवगत करणेसाठी एकुण २० पुरवठा धारकांना इकडील पत्र क्र. ५७२६ दि. १६/०४/२००८ अन्वये कळविण्यात आले होते. त्यास अनुसरुन सदर खरेदीकामी एकुण ०५ निविदा प्राप्त झालेल्या आहेत त्या खालीलप्रमाणे-

०१) मे. उमा इंडस्ट्रीज, कलकत्ता
०२) मे. गायत्री सर्जिकल ॲन्ड इक्विपमेंट, नवापुर-ठाणे
०३) मे. विप्रो जीई हेल्थकेअर प्रा. लि., मुंबई
०४) मे. रेसकेअर मेडीसीस (इं) प्रा.लि., मुंबई
०५) मे. सर्जिलिंक, श्रीरामपुर

वरील खरेदीकामी मे. विप्रो जीई हेल्थकेअर प्रा. लि., यांनी दोन्ही जाहिरातीस अनुसरुन निविदा भरलेली आहे. त्यामुळे उपरोक्त खरेदीकामी एकुण सहाच निविदा धारकांच्या निविदा प्राप्त झालेल्या आहेत.

**तरी उपरोक्तप्रमाणे दोन्ही जाहिरातीस अनुसरुन प्राप्त झालेल्या एकुण ५ सिलबंद तांत्रिक निविदा आजचे सभेत समक्ष उघडण्यात आल्या. या निविदांचा तुलनात्मक तक्ता तयार करुन त्यावर व्यवस्थापन समितीचे दि.१६.०३.२००८चे सभेत ठरलेनुसार तज्ञ डॉक्टरांचा सल्ला घेऊन तो व्यवस्थापन समितीचे पुढील सभेपूढे निर्णयार्थ सादर करावा अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.** (कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

**(०९)श्री साईबाबा रुग्णालयातील आय.सी.यु व जी.आय सी.यु एनआयव्ही व्हेंटीलेटर खरेदीकामी प्राप्त झालेल्या तांत्रिक निविदा उघडणेबाबत.**

श्रीसाईबाबा रुग्णालयातील ICCU व GICU विभागासाठी NIV Ventilator खरेदीकामीचा अंदाजे रु. ८,००,०००/- चे खर्चाचा प्रस्ताव दि.२२/०९/२००७ रोजीचे मा. व्यवस्थापन समिती सभेपुढे मान्यतेसाठी ठेवण्यात आला होता. सदरचे खरेदीकामी विहीत पध्दतीने वर्तमान पत्रात जाहीरात देऊन निविदा मागविणे बाबत निर्णय झालेला होता.

त्यास अनुसरुन उपरोक्त खरेदीकामी सकाळ- पुणे (टुडे), टाइम्स ऑफ इंडीया - मुंबई, लोकमत - औरंगाबाद, अकोला, नागपुर इंडीयन एक्सप्रेस - पुणे, दै.गावकरी नाशिक या वतर्मान पत्रात जाहिरात देण्यात येऊन दि.२१/०२/२००८ ते दि.०६/०३/२००८ अखेर संस्थानच्या शिर्डी कार्यालयात ५ निविदा व मुंबई कार्यालयात १५ निविदा विक्रिसाठी ठेवण्यात आल्या होत्या व निविदा स्विकारण्याची

अंतीम मुदत दि.०८/०३/२००८ अखेर ठेवण्यात आली होती. तसेच सदरचे जाहिरातीबाबत अवगत करणेसाठी एकुण २८ पुरवठा धारकांना इकडील पत्र क्र. २७७९ दि. २२/०२/२००८ अन्वये कळविण्यात आले होते. त्यास अनुसरुन सदर खरेदीकामी खालीलप्रमाणे ०२ सिलबंद निविदा प्राप्त झालेल्या होत्या -

१. मे. बायोमेडीकॉन सिस्टीम (इं) प्रा. लि., मुंबई
२. मे. रेसकेअर मेडीसीस (इं) प्रा. लि., मुंबई

उपरोक्तप्रमाणे खरेदीकामी दोनच निविदा प्राप्त झालेल्या होत्या, त्यामुळे सदर खरेदीकामी दि. २०/०३/२००८ चे टिपणीन्वये जनसंपर्क विभागामार्फत वर्तमान पत्रात जाहिरात देण्यात येऊन फेर निविदा मागविण्याचा प्रस्ताव मान्यतेसाठी सादर करण्यात आला होता. सदरचे मंजुरी अन्वये उपरोक्त खरेदीकामी टाईम्स ऑफ इंडीया - मुंबई, महाराष्ट्र टाईम्स-मुंबई या वतर्मान पत्रात जाहिरात देण्यात येऊन दि.१६/०४/२००८ ते दि.२८/०४/२००८ अखेर संस्थानच्या शिर्डी कार्यालयात ३ निविदा व मुंबई कार्यालयात ७ निविदा विक्रिसाठी ठेवण्यात आल्या होत्या व निविदा स्विकारण्याची अंतीम मुदत दि.३०/०४/२००८ अखेर ठेवण्यात आली होती. तसेच सदरचे जाहिरातीबाबत अवगत करणेसाठी एकुण २० पुरवठाधारकांना इकडील पत्र क्र. ५७२६ दि. १६/०४/२००८ अन्वये कळविण्यात आले होते. त्यास अनुसरुन सदर खरेदीकामी एकुण ०२ निविदा प्राप्त झालेल्या आहेत त्या खालीलप्रमाणे-

१. मे. सायनोकेअर सर्जिकल, मुंबई
२. मे. रेसकेअर मेडीसीस (इं) प्रा. लि., मुंबई

वरील खरेदीकामी मे. रेसकेअर मेडीसीस (इं) प्रा. लि., मुंबई यांनी दोन्ही जाहिरातीस अनुसरुन निविदा भरलेली आहे. त्यामुळे उपरोक्त खरेदीकामी एकुण तीनच निविदा धारकांच्या निविदा प्राप्त झालेल्या आहेत.

**तरी उपरोक्तप्रमाणे दोन्ही जाहिरातीस अनुसरुन प्राप्त झालेल्या एकुण ४ सिलबंद तांत्रिक निविदा आजचे सभेत समक्ष उघडण्यात आल्या. या निविदांचा तुलनात्मक तक्ता तयार करुन त्यावर व्यवस्थापन समितीचे दि.१६.०३.२००८ चे सभेत ठरलेनुसार तज्ञ डॉक्टरांचा सल्ला घेऊन तो व्यवस्थापन समितीचे पुढील सभेपूढे निर्णयार्थ सादर करावा अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.** (कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

**(१०) Holter monitor खरेदीकामी प्राप्त झालेल्या तांत्रिक निविदा उघडणे बाबत.**

श्रीसाईबाबा रुग्णालयातील कॅथलॅब विभागातील कार्डीओलॉजीस्ट डॉ. बजाज यांनी डी. पी. क्र. ३२७० दि. ०५/११/२००७ अन्वये एक नग Holter Monitor ची मागणी केलेली होती. त्यानुसार Holter Monitor चे Technical Specification वैद्यकिय तज्ञ समितीतील सदस्य डॉ. कांडेकर, कार्डीओलॉजीस्ट - अहमदनगर यांचेकडून निश्चित करुन उपरोक्त खरेदीकामीचा अंदाजे रु. १४,०१,२५०/- चे खर्चाचा प्रस्ताव दि. २४/०२/२००८ चे मा. व्यवस्थापन समिती सभेत मान्यतेसाठी ठेवण्यात आला होता.

मा.व्यवस्थापन समिती सभा दि. २४/०२/२००८ निर्णय क्र. १७८ अन्वये सदरची खरेदी विहीत पध्दतीने वर्तमान पत्रात जाहिरात देऊन खरेदीस मान्यता मिळालेली आहे.

त्यानुसार उपरोक्त खरेदीकामी दैनिक सामना - पुणे, इंडीयन एक्सप्रेस - मुंबई या वतर्मान पत्रात जाहिरात देण्यात येऊन दि.१८/०३/२००८ ते दि.०२/०४/२००८ अखेर संस्थानच्या शिर्डी कार्यालयात ३ व मुंबई कार्यालयात ७ निविदा विक्रिसाठी ठेवण्यात आल्या होत्या व निविदा स्विकारण्याची अंतीम मुदत दि.०४/०४/२००८ अखेर ठेवण्यात आली होती. त्यास अनुसरुन खालीलप्रमाणे ०४ बंद निविदा प्राप्त झालेल्या आहेत -

१. M/s. Cyronics Instruments Pvt.Ltd., Pune
२. M/s. Schiller Healthcare India Pvt. Ltd., Mumbai
३. M/s. Summit Healthcare (P) Ltd., Mumbai
४. M/s. Instromedix (India) Pvt.Ltd., Mumbai

तरी उपरोक्त प्रमाणे प्राप्त झालेल्या ०४ सिलबंद तांत्रिक निविदा (Technical Bid) प्रथम समक्ष उघडण्यात आल्या.

**परंतू आजचे सभेत वैद्यकीय संचालक डॉ. आर. सी. बोबडे व उपवैद्यकीय संचालक डॉ. एन. एस. म्हस्के यांनी Holter Monitor खरेदी करण्याची आवश्यकता नसल्याचे समक्ष सांगितल्याने Holter Monitor खरेदी करु नये. सबंधित निविदाधारकांची अनामत रक्कम परत करण्यात यावी अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.**

(कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

**(११) PACS System खरेदीकामी प्राप्त झालेल्या निविदा/कोटेशन्स उघडणेबाबत.**

श्रीसाईबाबा रुग्णालयातील रेडीओलॉजी विभागासाठी PACS System विहित पध्दतीने वर्तमान पत्रात जाहिरात देऊन निविदा मागवून खरेदीकामीचा रु. ६,००,०००/- चे खर्चाचा प्रस्ताव दि.२२/०९/२००७ चे मा. व्यवस्थापन समिती सभेपुढे मान्यतेसाठी ठेवण्यात आला होता.

सदरचे सभेतील मंजुरीनुसार उपरोक्त खरेदीकामी संस्थानचे विहीत पध्दतीने दैनिक महाराष्ट्र टाईम्स - मुंबई आवृत्ती, लोकमत - नाशिक आवृत्ती, इंडीयन एक्सप्रेस - पुणे आवृत्ती इत्यादी वर्तमान पत्रात जाहिरात प्रसिध्द करण्यात आलेली होती. त्यानुसार दि.०३/०३/२००८ ते १८/०३/२००८ अखेर

संस्थानचे शिर्डी येथील कार्यालयात ५ व मुंबई येथील कार्यालयात १५ निविदा फॉर्म विक्रीसाठी ठेवण्यात आले होते. निविदा स्विकारण्याची अंतिम मुदत दि.२०/०३/२००८ अखेर ठेवण्यात आलेली होती. तसेच वर्तमान पत्रातील जाहिरातीबाबत अवगत करणेसाठी ९ अधिकृत विक्रेत्यांना देखील पत्र पाठवून कळविण्यात आले होते.

सदरच्या जाहिरातीस अनुसरुन शिर्डी येथील कार्यालयात १ निविदा विक्री झालेली आहे, तर मुंबई कार्यालयात ०२ निविदांची विक्री झालेली आहे. त्यास अनुसरुन खालीलप्रमाणे ०२ सिलबंद निविदा प्राप्त झालेल्या आहेत.

1. M/s. Medical Solution India Pvt.Ltd., Mumbai
2. M/s. Meditronic Sales & Sevices, Mumbai

तसेच उपरोक्त खरेदीकामी खालील अधिकृत विक्रेत्यांनी संस्थानची निविदा विकत न घेता स्वत:हून बंद कोटेशन दिलेले आहे. ते देखील विचारात घ्यावे असे नम्र मत आहे.

1. M/s. Infomatrix, Pune
2. M/s. Medicomsoft System, Aurangabad
3. M/s. Medsynaptic Pvt.Ltd., Pune
4. M/s. Alex System, Kalyan (W)

**तरी वरीलप्रमाणे प्राप्त झालेल्या ०२ सिलबंद निविदा व ४ बंद कोटेशन आजचे सभेत उघडण्यात आली त्यांचा तुलनात्मक तक्ता तयार करुन तो व्यवस्थापन समितीची पुढील सभेपूढे निर्णयार्थ सादर करावा अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.**

(कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

**(१२) Monosyn 3-0 सुचर्स खरेदीस कार्योत्तर मान्यता मिळणे बाबत.**

श्रीसाईबाबा रुग्णालयातील कार्डीयाक ऑपरेशन थिएटरमध्ये कार्डीयाक शस्त्रक्रिया करण्याकरीता उपरोक्त सुचर्स लागते. यासाठी सन २००७-०८ या वार्षिक औषधे खरेदीमध्ये वर्तमान पत्रात जाहिरात देऊन निविदा मागविण्यात आल्या होत्या. J&J कंपनीचे सुचर्सकरीता (Mersilk 3-0 NW 3326) मे. विशाल एजन्सी, अहमदनगर यांनी प्रती बॉक्स (१२ Foil) रु. १५०३/- असे दर दिलेले होते व त्यानुसार मे. विशाल एजन्सी, अहमदनगर यांना इकडील पत्र क्र. १६१२८ दि. ०९/१०/२००७ अन्वये १० बॉक्सचा पुरवठा आदेश देण्यात आला होता.

त्यानुसार मे. विशाल एजन्सी, अहमदनगर यांनी तीन बॉक्सचा पुरवठा केलाआहे. परंतु सदर सुचर्स (Mersilk 4-0 NW 3326) हे Mososyn 3-0 सारखे नसून त्यासारखे J&J कंपनीचे Mersilk 3-0 W 3326 हे सुचर्स Mososyn 3-0 सारखे आहे, त्यासाठी मे. विशाल एजन्सी, अहमदनगर यांनी वार्षिक निविदेत दर दिलेले नव्हते. सदर सुचर्ससाठी त्यांनी त्यांचे दि. २८/०२/२००८ चे फॅक्स पत्रान्वये रु. ३०८५/- असे दर दिलेले होते, तर Monosyn हे B.Braun कंपनीचे मे. सर्जिलिंक, श्रीरामपुर यांनी वार्षिक निविदेमध्ये प्रती बॉक्स (12 Foil) करीता रु. २०७९.३६ असे दर दिलेले होते. B. Braun कंपनीचे दर हे J & J कंपनीच्या दरापेक्षा कमी असल्यामुळे दि. २९/०२/२००८ चे टिपणीन्वये मे. विशाल एजन्सी, अहमदनगर यांचा पुरवठा आदेश रद्द करुन मे. सर्जिलिंक, श्रीरामपुर यांना इकडील पत्र क्र. ३९४१ दि. १४/०३/२००८ अन्वये खालीलप्रमाणे पुरवठा आदेश देण्यात आलेला होता.

| Sr.No. | Code No. | Description | Make | Co.Code | Qty. | Rate Per | Total Amt. |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | CDL/522 | Monosyn 3-0 | B.BRAUN | C0023215 | 02 | 6238.08 | 12476.16 |
| | | | | | | **Total -** | **12476.16** |

मे. सर्जिलिंक, श्रीरामपुर यांनी वरीलप्रमाणे मालाचा पुरवठा पुर्ण केलेला आहे. सध्या औषध भांडार विभागात सदर सुचर्स शिल्लक नसून कार्डीयाक ऑपरेशन थिएटरमध्ये त्याची अत्यंत आवश्यकता आहे, तेंव्हा वरील सुचर्स हे मे. सर्जिलिंक, श्रीरामपुर यांचेकडून वार्षिक औषधे खरेदी २००७-०८ मधील मंजुर दराने खरेदी करण्याचा प्रस्ताव आहे. त्याची तपशिलवार माहिती खालीलप्रमाणे-

| Sr.No. | Code No. | Description | Make | Co.Code | Qty. | Rate Per | Total Amt. |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | CDL/522 | Monosyn 3- | B.BRAUN | C0023215 | 10 | 6238.08 | 62380.80 |
| | | | | | | **Total -** | **62380.00** |

**तरी वरीलप्रमाणे सुचर्स मटेरीयल हे मे. सर्जिलिंक, श्रीरामपुर यांचेकडून वार्षिक औषधे खरेदीतील मंजुर दराने खरेदी करणेत आलेले असून याकामी येणाऱ्या रु.६२,३८०/- चे खरेदीस व खर्चास कार्योत्तर मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात यावी अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आल.**

(कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

**(१३) Micro Shield Pvp Solution खरेदीस व खर्चास कार्योत्तर मंजूरी मिळणे बाबत.**

श्रीसाईबाबा रुग्णालयात कार्डीयाक शस्त्रक्रियेसाठी लागणाऱ्या उपरोक्त Micro Shield - 600 नग करीता सन २००७-२००८ या वर्षाकरीता वार्षिक निविदेतील मंजूर दर रु.११०/- या दराने मे. रमन अॅन्ड वेल प्रा.लि., मुंबई यांना R & W कंपनीचे Betascurb 500ml एकूण ६०० नगांचा पुरवठा आदेश देण्यात आला होता. त्यापैकी मे. रमन अॅन्ड वेल प्रा.लि., मुंबई यांनी Betascurb 500ml - 300 नगांचा पुरवठा केलेला आहे.

रुग्णालयाचे इतर ओ.टी. व वार्ड मध्ये Betascurb हे Soultion वापरतात परंतु कार्डीयाक ओ.टी. मध्ये R & W या कंपनीचे Betascurb Soultion नको म्हणून सांगितले व त्या ऐवजी त्यांना J & J कंपनीचेच Micro Shield Pvp Soultion पाहिजे. J & J कंपनीच्या Micro Shield Pvp Soultion करीता वार्षिक खरेदीच्या तुलनात्मक दरांच्या तक्त्यात क्रमांक एकचे दर असलेले मे. महेश सर्जीकल, पुणे यांनी प्रती नग रु.२२१.८००२ असे दर दिलेले आहेत. Micro Shield Pvp Soultion च्या एकूण मागणी ६०० नगापैकी ३०० नगांचा पुरवठा झालेला आहे. उर्वरीत ३०० नगांची आपणास खरेदी करावयाची आहे. J & J कंपनीच्या दराप्रमाणे सदरचे खरेदीकामी रु.६६५४०/- इतका खर्च यईल.

**तरी उपरोक्त Micro Shield Pvp Soultion चा मे. रमन अॅन्ड वेल प्रा.लि., मुंबई यांचा ३०० नगांचा पुरवठा आदेश रद्द करणेत आलेला आहे व मे. महेश सर्जीकल, पुणे यांना Micro Shield Pvp Soultion 300 नगांचा पुरवठा आदेश देण्यास आलेला आहे. सदरचे खरेदीकामी वार्षीक निविदेतील प्राप्त दरानुसार रु.६६५४०/- इतका जादा खर्च आलेला असून त्यास कार्योत्तर मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात यावी अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.**

(कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

**(१४) मे.एअरबॉर्न क्लीनलीनेस मुंबई यांचे सेंट्रल ए.सी.चे वाढीव कामास कार्योत्तर मंजूरी मिळणे बाबत.**

श्रीसाईबाबा हॉस्पिटलमध्ये नवीन दोन न्युरो सर्जरी ओ.टी. मध्ये करावयाचे सेंट्रल ए.सी.चे काम श्रीसाईबाबा हॉस्पिटल मार्फत मे.एअरबोर्न क्लीनलीनेस,मुंबई यांना दि.०२.०१.२००७ च्या कार्यादेशनुसार देण्यात आलेले होते. याकामाचा आराखडा श्री साईबाबा हॉस्पिटलमार्फत तयार करण्यात आला होता व त्यानुसार Tender Process झाली आहे.

सेंट्रल ए.सी.चे कामाच्या वेळी मे.एअरबोर्न क्लीनलीनेस,मुंबई यांनी सदर सिस्टीममध्ये बसविण्यात येणारी Air Handling Unit (AHU) हे ऑपरेशन थिएटर व समोरील वॉर्ड यांच्यामधील पॅसेजच्या स्लॅबला नटबोल्टच्या सहाय्याने फिट केलेले होते. परंतू सदरचे AHU युनिट हे वजनदार असल्याने तसेच त्यामध्ये असणाऱ्या इलेक्ट्रीकल मोटरच्या Vibration मुळे सदरचे युनिट खाली पडून भविष्यात अॅक्सीडेंट होण्याचा धोका होता. त्यामुळे संस्थानचे न्युरो सर्जन डॉ.टिंगरे सर व मे.एअरबोर्न क्लीनलीनेस,मुंबई यांचे प्रतिनिधी यांच्या राऊंडमध्ये वरील बाब लक्षात आल्यानंतर सदरचे AHU युनिट हे हॉस्पिटलच्या बाहेरील बाजूस जनरल टॉयलेटच्या समोर बसविण्याचे ठरले . त्यामुळे सदर AHU युनिट बाहेर शिफ्ट करतांना आवश्यक असणारे Sheet Metal चे डक्ट तसेच केबल यांची Quantity वाढलेली आहे. त्याचा तपशिल खालील प्रमाणे.

अ) श्री साईबाबा हॉस्पिटलच्या टेंडरमध्ये २४ गेजच्या Sheet Metal ची Quantity १३४ स्क्वेअर मीटर दिलेली असून एकुण किंमत रु.९७,०१६.०० इतकी आहे. परंतू प्रत्यक्षात ती २५२.८०६ स्क्वेअर मीटर झालेली असून एकुण रक्कम रु.१,८३,०३१.५४ इतकी झालेली असून फरक असलेली Quantity ११६.८०६ स्क्वेअर मीटर ने वाढलेली आहे. त्यामुळे रु.८६,०१५.५४ इतकी रक्कम वाढलेली आहे.

ब) श्री साईबाबा हॉस्पिटलच्या टेंडरमध्ये १" Thermal Insulation ची Quantity ही १६१ स्क्वेअर मीटर दिलेली असून एकुण रक्कम रु.९८,२१०.०० इतकी आहे.परंतू प्रत्यक्षात ती २२९.३६ स्क्वेअर मीटर झालेली असून एकुण रक्कम रु.१,३९,९०९.६० इतकी झालेली असून फरक असलेली Quantity ६८.३६ स्क्वेअर मीटर ने वाढलेली आहे. त्यामुळे रु.४१,६९९.६० इतकी रक्कम वाढलेली आहे.

क) श्री साईबाबा हॉस्पिटलच्या टेंडरमध्ये २" Thermal Insulation ची Quantity ही १०७ स्क्वेअर मीटर दिलेली असून एकुण रक्कम रु.७३,७२३.०० इतकी आहे.परंतू प्रत्यक्षात ती १६६.८३ स्क्वेअर मीटर झालेली असून एकुण रक्कम रु.१,१४,९४५.८७ इतकी झालेली असून फरक असलेली Quantity ५९.८३ स्क्वेअर मीटर ने वाढलेली आहे. त्यामुळे रु.४१,२२२.८७ इतकी रक्कम वाढलेली आहे.

ड) श्री साईबाबा हॉस्पिटलच्या टेंडरमध्ये Aluminium Return Air Riser ची Quantity ही ४.८ स्क्वेअर मीटर दिलेली असून एकुण रक्कम रु.३७,९१५.०० इतकी आहे.परंतू प्रत्यक्षात ती

१०.०८ स्क्वेअर मीटर झालेली असून एकुण रक्कम रु.७९,६२१.९२ इतकी झालेली असून फरक असलेली Quantity ५.२८ स्क्वेअर मीटर ने वाढलेली आहे. त्यामुळे रु.४१,७०६.९२ इतकी रक्कम वाढलेली आहे.

इ) श्री साईबाबा हॉस्पिटलच्या टेंडरमध्ये ४c x २.५ स्क्वेअर मीटरची केबल ही ४० मीटर दिलेली आहे. तीचा दर रु.२९८/- मीटर असून एकुण रक्कम रु.११,९२०/- आहे. परंतू विद्युत विभाग बील चेक करीत असतांना सदर ठिकाणी ४c x २.५ स्क्वेअर मीटर केबल ऐवजी ४c x १.५ स्क्वेअर मीटरची केबल वापरलेली निदर्शनास आली. त्यानुसार श्री साईबाबा हॉस्पिटलमधील प्रतिनिधींना कळविले असता त्यांनी सदरची बाब मे.एअरबोर्न क्लीनलीनेस,मुंबई यांना कळविली. त्यानंतर दि.२३ जानेवारी २००८ च्या मे.एअरबोर्न क्लीनलीनेस,मुंबई यांचे पत्रानुसार सदर केबलचा दर रु.१९८/- इतका लावलेला आहे. एकुण Quantity २०१ मीटर झालेली असून रक्कम रु.३९,७९८/- इतकी झालेली आहे.फरक असलेली रक्कम रु.२७,८७८/- इतकी वाढलेली आहे.

ई) श्री साईबाबा हॉस्पिटलच्या टेंडरमध्ये Metalic False Ceiling ची Quantity ही ७४ स्क्वेअर मीटर असून एकुण रक्कम रु.१,७९,१५४/- इतकी आहे. परंतू प्रत्यक्षात ती ७४.२३ स्क्वेअर मीटर झालेली असून एकुण रक्कम रु.१,७९,७१०.८३ इतकी झालेली असून फरक असलेली Quantity ०.२३ स्क्वेअर मीटर असून रु.५५६.८३ इतकी रक्कम वाढलेली आहे.

वरील प्रमाणे सहाही बाबींची रक्कम वाढलेली असून ती एकुण रक्कम रु.२,३९,०७९.७६ इतकी आहे. वरील पैकी वाढलेली कामाची रक्कम रु.२,३९,०७९.७६ इतकी आहे.

अ) रु. ०,८६,०१५.५४
ब) रु. ०,४१,६९९.६०
क) रु. ०,४१,२२२.८७
ड) रु. ०,४१,७०६.९२
इ) रु. ०,२७,८७८.००
ई) रु. ०,००,५५६.८३
------------------------
एकुण रक्कम रु. २,३९,०७९.७६
------------------------

प्रत्यक्ष काम करीत असतांना दिलेल्या टेंडरमधील काही Quantiy कमी झालेली आहे. तीचा तपशील खालीलप्रमाणे.

०१. श्री साईबाबा हॉस्पिटल टेंडरमध्ये २२ Guage च्या Sheet metal ची Quantity ही ८९ स्क्वेअर मीटर असून एकुण रक्कम रु. ७२,००१/- इतकी आहे. परंतू प्रत्यक्षात ती ८५ स्क्वेअर मीटर झालेली असून एकुण रक्कम रु.६८,७६५/- इतकी वाढलेली असून फरक असलेली Quantity ४ स्क्वेअर मीटर असून रु.३,२३६/- इतकी रक्कम कमी झालेली आहे.

०२. श्री साईबाबा हॉस्पिटल टेंडरमध्ये Volume Control Dampers ची Quantity ही १.४ स्क्वेअर मीटर असून एकुण रक्कम रु.६,४०२/- इतकी आहे. परंतू प्रत्यक्षात ती ०.४८ स्क्वेअर मीटर झालेली असून एकुण रक्कम रु.,२,१९५.०४ इतकी झालेली असून फरक असलेली Quantity ०.९२ स्क्वेअर मीटर असून रु.४,२०६.९६ इतकी रक्कम कमी झालेली आहे.

०३.श्रीसाईबाबा हॉस्पिटल टेंडरमध्ये Fire Damper हा वापरण्यात आलेला नसल्याने रक्कम रु.९,७१६.०० कमी झालेली आहे.

०४.श्रीसाईबाबा हॉस्पिटल टेंडरमध्ये Aluminium Powder Coated Performeted Sheet ची Quantity ही ३.३३ स्क्वेअर मीटर असून एकुण रक्कम रु.२१,४९८/- इतकी आहे. परंतू प्रत्यक्षात ती १.६० स्क्वेअर मीटर झालेली असून एकुण रु. १०,३२९.६० इतकी झालेली असून फरक असलेली Quantity १.७३ स्क्वेअर मीटर असून रु. ११,१६८.४० इतकी रक्कम कमी झालेली आहे.

०५.श्रीसाईबाबा हॉस्पिटल टेंडरमध्ये Aluminium Powder Coated Diffusers & Grils ची Quantity ही ३.३३ स्क्वेअर मीटर असून एकुण रक्कम रु.२१,४९८/- इतकी आहे. परंतू प्रत्यक्षात ती १.६२ स्क्वेअर मीटर झालेली असून एकुण रु. १०,४५८.७२ इतकी झालेली असून फरक असलेली Quantity १ .७१ स्क्वेअर मीटर असून रु. ११,०३९.२८ इतकी रक्कम कमी झालेली आहे.

०६. श्री साईबाबा हॉस्पिटल टेंडरमध्ये Earthing Wire वापरण्यात आलेली नसल्याने रक्कम रु.९६०/- कमी झालेली आहे.

०७.श्रीसाईबाबा हॉस्पिटल टेंडरमध्ये Wall Painting ची Quantity ही ११७ स्क्वेअर मीटर दिली असून एकुण रक्कम रु.४१,५३५/- इतकी आहे. परंतू प्रत्यक्षात ती १०५.२४ स्क्वेअर मीटर असून एकुण रु.३७,३६०.२० इतकी झालेली असून फरक असलेली Quantity ११.७६ स्क्वेअर मीटर असून रक्कम रु.४,१७४.८० इतकी कमी झालेली आहे.

०८. श्री साईबाबा हॉस्पिटल टेंडरमध्ये Air Light Clean room Light Fixture ची Quantity ही १६ नग असून एकुण रक्कम रु.७८,४००/- इतकी आहे. परंतू प्रत्यक्षात ती ११ नग Fixture बसविलेली असून एकुण रु.५३,९००.०० इतकी आहे. फरक असलेली Quantity ५ नग असून रक्कम रु.२४,५००/- इतकी रक्कम कमी आहे.

०९. श्री साईबाबा हॉस्पिटल टेंडरमध्ये Alu.Covings ची Quantity ही १२१ मीटर दिले असून एकुण रक्कम रु.३३,८८०/- इतकी आहे. परंतू प्रत्यक्षात ती ९७.३४ मीटर असून असून एकुण रु. २७,२५५.२० इतकी झालेली आहे. फरक असलेली Quantity २३.६६ मीटर असून रु.६,६२४.८० इतकी कमी झालेली आहे.

१०. श्री साईबाबा हॉस्पिटल टेंडरमध्ये Clean room Flooring ची Quantity ही ७४ स्क्वेअर मीटर दिले असून एकुण रक्कम रु.९९,५३०/- इतकी आहे. परंतू प्रत्यक्षात ती ७०.४२ स्क्वेअर मीटर असून असून एकुण रक्कम रु.९४,७१४.९० इतकी झालेली असून फरक असलेली Quantity ३.५८ स्क्वेअर मीटर असून रु.४,८१५.१० इतकी कमी झालेली आहे.

(अ) उपरोक्त अ.नं.०१ ते १० पर्यंतची कमी झालेली असून ती रक्कम रु.८०,४४१.८२ इतकी आहे. ती खालील प्रमाणे :-

| | |
|---|---|
| ०१) | रु.०३,२३६.०० |
| ०२) | रु.०४,२०६.९६ |
| ०३) | रु.०९,७१६.०० |
| ०४) | रु.११,१६८.४० |
| ०५) | रु. ११,०३९.२८ |
| ०६) | रु. ००,९६०.०० |
| ०७) | रु.०४,१७४.८० |
| ०८) | रु.२४,५००.०० |
| ०९) | रु.०६,६२४.८० |
| १०) | रु.०४,८१५.१० |
| एकुण रक्कम | रु.८०,४४१.३४ |

(ब) उपरोक्त प्रमाणे अ.क्र. A ते F पर्यंतची जादा असलेली रक्कम रु.२,३९,०७९.७६ इतकी आहे. तसेच अ.क्र. ०१ ते १० कमी झालेली रक्कम रुपये ८०,४४१.३४ आहे.

| | | |
|---|---|---|
| जादा झालेली रक्कम | :- | रु.२,३९,०७९.७६ |
| कमी झालेली रक्कम | :- | रु.०,८०,४४१.३४ |
| एकुण रक्कम | :- | रु.१,५८,६३८.४२ |
| Less Disconut ३.५% | :- | रु.०,०५,५५२.३४ |
| एकुण रक्कम | :- | रु.१,५३,०८६.०८ |

वरील सर्व कारणांमुळे रक्कम रु.१५३०८६.०८ इतकी रक्कम वाढलेली आहे.

**मे.एअरबोर्न क्लीनलीनेस,मुंबई यांनी केलेल्या संपुर्ण कामाचे (वाढीव कामासह) एकुण बील रु.१८,९३,०३२/- इतके सादर केले होते. परंतू संस्थान विद्युत विभाग व बांधकाम विभागामार्फत प्रत्यक्षात मोजमापे घेतल्या नंतर त्यांना रु.१८,०९,९२९.०० इतकीच प्रत्यक्षात देय होत होती. मे.एअरबोर्न क्लीनलीनेस,मुंबई यांना आतापर्यंत एकुण रु.१६,१७,०३६/- मात्र आगाऊ दिलेली आहे.आता त्यांना वाढीव कामाची रक्कम रु.१,५३,०८६/- इतकी अदा करणेस कार्योत्तर मान्यता देणेबाबचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात यावी अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.**

(कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

**(१५) गाऊन, ड्रॉ शिट व होलशीट खरेदी करणेबाबत.**

श्रीसाईबाबा हॉस्पिटलमध्ये सर्व वॉर्ड/ओ.टी करीता ड्रॉ शिट,बिग होलशीट व गाऊन आवश्यक असल्याने एकूण ८०० गाऊन, ८०० ड्रॉ शिट, व ८०० होलशीट खरेदी करणे अत्यंत आवश्यक आहे. तसेच

**१)** ओ.टी व आय.सी.यू व जी.आय.सी.यू मधील सर्व स्टाफला वेगवेगळया रंगाचे ओ.टी.ड्रेस देणे फार गरजेचे आहे. कारण सध्या पेशंट व स्टाफ नर्स वापरत असलेले कपडे एकाच रंगाचे असलेने स्टाफ आहे की, पेशंट हे लवकर कळत नाही.

**२)** ओ.टी.मध्ये सर्जनसाठीही वेगळ्या रंगाचे सर्जन ड्रेस आवश्यक आहेत.

त्यासाठी खालीलप्रमाणे गाऊन,ड्रॉ शिट व होलशीट खरेदी करणे आवश्यक आहे.

| अ.नं. | तपशील | कपडयांचा रंग | साईज | प्रत्येकी किंमत | आवश्यक नग | एकूण किंमत |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | सर्जन ड्रेस | स्काय ब्ल्यू (आकाशी) | S M L | २२५/- | ५० नग | ११२५०.०० |
| २ | सर्जन गाऊन | हिरवा | S M L | २२५/- | ८०० नग | १८००००.०० |
| ३ | फिमेल ओ.टी.ड्रेस | पिंक (गुलाबी)-बटन | S M L | २२५/- | ५० नग | ११२५०.०० |
| ४ | ड्रॉ शीट | हिरवा | २.५ x ३.५ | ६५/- | ८०० नग | ५२०००.०० |
| ५ | मोठे होलशीट Long Holesheet | हिरवा | ४x६.५ | १२०/- | ८०० नग | ९६०००.०० |
| ६ | मेल ओ.टी.ड्रेस | पिंक (गुलाबी)V नेक | S M L | २२५/- | ५० नग | ११२५०.०० |
| | | | | | | ३६१७५०.०० |

कॅथलॅबमध्ये स्टाफ व डॉक्टरकरीता घेतलेले ड्रेस बन्सल ट्रेडींग कंपनी यांचेकडून खरेदी केले असून त्यांचे लिनन वापरुन पाहिले असता त्यांच्या कपडयांचा दर्जा चांगला असल्याचे आढळले.

तरी उपरोक्तप्रमाणे श्री साईबाबा हॉस्पिटलकरीता आवश्यक असणा-या लिननची खरेदी बन्सल ट्रेडींग कंपनी, भोपाळ किंवा इतर दुस-या चांगल्या कंपनीकडून विहीत पध्दतीने कोटेशन्स मागवून करण्यास व त्याकामी येणारे अंदाजे रक्कम रुपये ३,६२,०००/- चे खर्चास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

**यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा हॉस्पिटलसाठी आवश्यक असणारे गाऊन, ड्रॉ शिट व होलशीट खरेदी कामी कोटेशन्स मागविण्यात यावेत अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.** (कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

**(१६) श्रीसाईनाथ रुग्णालयाकरिता फर्निचर खरेदीबाबत.**

श्रीसाईनाथ रुग्णालयातील फर्नीचर हे वापरुन खराब झालेले असून श्री साईनाथ रुग्णालयाचे शस्त्रक्रिया गृहामध्ये तसेच विविध वार्ड / विभागामध्ये लागणारे इन्स्ट्रुमेंट ट्रॉली, स्ट्रेचर ट्रॉली, ड्रेसींग टॉली व इतर फर्निचर इत्यादी वापरुन खराब झालेले असल्यामुळे त्यांना दैनंदिन कामकाजात ते वापरता येत नाही म्हणून श्री साईनाथ रुग्णालयाने डि.पी. क्रमांक ८००२ दि.२३/०२/२००८ अन्वये फर्निचरची मागणी केलेली आहे. त्याचा तपशिल खालीलप्रमाणे -

| Sr. N | Description | Qty. | App. Rate Per | App. Total Amt. |
|---|---|---|---|---|
| 1 | Trauma Care – Crash Cart Trolley (9003) | 04 | 24000.00 | 96000.00 |
| 2 | Stretcher Trolley(1703) | 6 | 9600.00 | 57600.00 |
| 3 | S.S. Dressing Trolley (1068) | 16 | 10800.00 | 172800.00 |
| 4 | Single Step Stool S.S. (1603) | 04 | 1720.00 | 6880.00 |
| 5 | Revolving Stool S.S. (1602) | 19 | 1884.00 | 35796.00 |
| 6 | Monitor Trolley (9010) | 03 | 26140.00 | 78420.00 |
| 7 | S.S. Dressing Trolley With S.S Bowel & Tray (1067) | 02 | 10860.00 | 21720.00 |
| 8 | S.S. Instrument Trolley With S.S Bowel & Tray (1024) | 06 | 8000.00 | 48000.00 |
| 9 | S.S. Ortho. Instrument Trolley 3x2 Large Wheel (1068) | 04 | 11644.00 | 46576.00 |
| 10 | Revolving Surgeon Chair | 05 | 4800.00 | 24000.00 |
| 11 | Shoe Racks for 2 Dozen Pairs | 03 | 13416.00 | 40248.00 |
| 12 | Locker overall size 1981mm x 914mm x 483mm (1719) | 02 | 11200.00 | 22400.00 |
| 14 | Iron Rack | 33 | 4000.00 | 132000.00 |
| 15 | Air Mattresses | 07 | 6000.00 | 42000.00 |
| 16 | Dressing Drum | Small – | 1600.00 | 80000.00 |
| | | Big – 5 | 1600.00 | 80000.00 |
| | | Medium | 1600.00 | 99200.00 |
| 17 | Cardiac Bedside Table | 06 | 2000.00 | 12000.00 |
| 18 | Fowler Position Bed (303) | 35 | 18000.00 | 630000.00 |
| 19 | Ward Care Bed Side Locker (1001) | 20 | 2500.00 | 50000.00 |
| 20 | Coir Mattresses for Fowler Bed | 35 | 5000.00 | 175000.00 |
| 21 | I.V.Stand S/S without caster | 20 | 1000.00 | 20000.00 |
| | | **Total Amt. In Rs.-** | | **1970640.00** |

**उपरोक्तप्रमाणे फर्निचर खरेदीकामी अंदाजे रु.१९,७०,६४०/- इतका खर्च अपेक्षित आहे. सदरची खरेदी हि विहित पध्दतीने वर्तमान पत्रात जाहिरात देऊन निविदा मागवून करणेस मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात यावी अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.**

(कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

**(१७) MP-२० मल्टीपॅरा मॉनिटरकरीता ETC०२ सेन्सर खरेदी करणेबाबत.**

श्रीसाईबाबा हॉस्पिटलच्या कार्डीयाक रिकव्हरी, आय.सी.यु, व विविध ऑपरेशन थिएटर्स येथे पेशंटचा हार्ट रेट, इ.सी.जी., एस. पी.ओ. टु, ब्लड प्रेशर पाहण्याकरीता मे.फिलीप्स मेडीकल सिस्टीम (इं) प्रा.लि.मुंबई व त्यांचे अधिकृत डीलर मे.सिरॉनिक्स इन्स्ट्रुमेंट्स प्रा. लि.,पुणे यांचेकडून एकुण ३५ नग MP-20 मल्टीपॅरा मॉनिटर्स खालीलप्रमाणे खरेदी करण्यात आले आहेत.

| अ.क्र. | कंपनी | मा.व्य.समिती सभा | पुरवठा आदेश क्रमांक / दिनांक | नग | एकुण रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| १ | मे.फिलीप्स मेडीकल सिस्टीम (इं) प्रा.लि.मुंबई | दि.१८/०७/०५ | ८३७३/०५ दि.०८/०८/०५ | १२ | ३९,००,०००.०० |
| २ | मे.फिलीप्स मेडीकल सिस्टीम (इं) प्रा.लि.मुंबई | दि.०६/०८/०५ | ९७६०/०५ दि.०८/०९/०५ | ०१ | २,५०,०००.०० |
| ३ | मे.फिलीप्स मेडीकल सिस्टीम (इं) प्रा.लि.मुंबई | दि.०४/०३/०६ निर्णय क्र.१२६ | ४६७१/०६ दि.०८/०४/०६ | ०४ | १०,००,०००.०० |
| ४ | मे.सिरॉनिक्स इन्स्ट्रुमेंट्स प्रा. लि.,पुणे | दि.१६/०९/०६ निर्णय क्र.७४३ | १४९०६/०६ दि.२४/१०/०६ | १८ | ४३,४७,७७४.० |

वरीलप्रमाणे मे.फिलीप्स मेडीकल सिस्टीम (इं) प्रा.लि.मुंबई यांचे एकुण ३५ नग मॉनिटर्सपैकी आय.सी.यु.विभागात ०९ नग, सहा ऑपरेशन थिएटर विभागात प्रत्येकी एक व कार्डीयाक रिकव्हरी आय.सी.यु.येथे एकुण २० नग मॅानिटर्स बसविण्यात आले असून सध्या सर्व मॉनिटर्स व्यवस्थित काम देत आहेंत. सदरचे सर्व मॉनिटर्सने पुढील कालावधीत व्यवस्थित काम देणे करीता मे.फिलीप्स मेडीकल सिस्टीम (इं) प्रा.लि.मुंबई यांचेकडे वार्षीक सर्व्हीस कॅान्ट्रॅक्ट करणेत येत आहे.

सध्या जनरल ओ. टी. विभागातील एका MP-20 मल्टीपॅरा मॉनिटरचा ETCO2 सेन्सर खराब झाला आहे. ETCO2 सेन्सरने मॉनिटर्सवर पेशंटने उच्छश्वासाद्वारे सोडलेल्या CO2 गॅसचे प्रमाण दाखविले जाते. सदरचे CO2 चे प्रमाण मोजणे शस्त्रक्रिया करतेवेळी अॅनेस्थेटीक डॉक्टरांच्या दृष्टीने आवश्यक असते. त्यामुळे सदर ETCO2 सेन्सर तातडीने बदलुन मिळावा याकरीता जनरल ओ. टी. विभागाने मागणीपत्र पाठविले आहे. त्यानुसार सदर ETCO2 सेन्सर करीता मे.फिलीप्स मेडीकल सिस्टीम (इं) प्रा.लि.मुंबई यांचे अधिकृत डीलर मे.सिरॉनिक्स इन्स्ट्रुमेंट्स प्रा लि.,पुणे यांचेकडून दर मागविण्यात आले असुन त्यांनी त्यांचे पत्र क्र. GJM/CMS/2008/04/04 दि. ०४/०४/२००८ अन्वये खालीलप्रमाणे कोटेशन पाठविले आहे.

| Sr. No | Description | Qty. | Amount in Rs. |
|---|---|---|---|
| 01 | Mainstream ETCO2 Sensor | 01 | 98,000.00 |
| | | Discount | 3,000.00 |
| | | **Total in Rs.** | **95,000.00** |

वरीलप्रमाणे ETCO2 सेन्सर ०१ नग खरेदी करणेकरीता एकुण रु. ९५,०००/-(अक्षरी रु. पंच्यान्नव हजार मात्र) इतका खर्च अपेक्षित आहे. सदरचा ETCO2 सेन्सर मे.फिलीप्स मेडीकल सिस्टीम (इं) प्रा.लि.मुंबई यांच्या विविध सर्व्हिस डीलर्स कडुन कोटेशन मागणी करुन निम्नतम दराने खरेदी करता येईल असे मत आहे.

**तरी जनरल ओ. टी. विभागातील MP-20 मल्टीपॅरा मॉनिटर्सचा ETCO2 सेन्सर ०१ नग खरेदी करणेस्तव मे.फिलीप्स मेडीकल सिस्टीम (इं) प्रा.लि.मुंबई यांचे विविध अधिकृत डीलर्सकडुन कोटेशन मागवुन निम्नमत दराने खरेदी करणेस व त्यासाठी येणाऱ्या रक्कम रुपये ९५,०००/- वे खर्चास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात यावी अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.** (कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

**(१८) मुदतबाह्य औषधे नष्ट करणेबाबत.**

श्रीसाईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयाचे औषध भांडार व विविध वॉर्डमध्ये दि.०१/०४/२००७ ते ३१/०३/२००८ या कालावधीमध्ये एकुण रु. १,७६,१०६.८२ ची औषधे मुदतबाहय झालेली आहे. त्याची तपशीलवार माहिती खालीलप्रमाणे-

**अ)** औषधे भांडारामध्ये एकुण -

| Sr.No. | Name of Wards | Total Amt.in Rs. |
|---|---|---|
| 1 | Donation | 23400.43 |
| 2 | Not Replaced by Comp. | 20395.28 |
| 3 | Physician Sample | 41.00 |
| 4 | Contaminated | 701.55 |
| 5 | Store | 109544.4112 |
| | **Total Amt.in Rs** | **154082.6712** |

**ब)** दोन्ही रुग्णालयाचे विविध वॉर्डमधून जमा झालेले एकुण

| Sr.No. | Name of Wards | Total Amt.in Rs. |
|---|---|---|
| 1 | All Wards | 12818.1126 |
| 2 | Sub-Stores | 9206.04 |
| | **Total Amt.in Rs.** | **22024.1526** |
| | **अ + ब** | **१७६१०६.८२३८** |

सदरची औषधे हि औषध भांडार व दोन्ही रुग्णालयाचे विविध वार्ड /विभागात मुदत बाह्य झालेली आहे. गत वर्षी रु.२२०१८.६२४ ची औषधे मुदत बाह्य झालेली होती. परंतु त्यावेळेस फक्त श्री साईनाथ रुग्णालयातीलच औषधे होती यावेळेस श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयाचे विविध वार्ड / विभागात औषधे मुदत बाह्य झालेली आहे. उपरोक्त औषधामध्ये जास्त रक्कमेची औषधे मुदत बाह्य झालेली आहे. त्याचा तपशील खालील प्रमाणे :-

०१) Tab.Medase :- रक्कम रु. २२०१२.६५ हे औषधे M/s.Maxamus International, New Dehli या कंपनीने स्वत: होऊन देणगी दिलेली आहे. परंतु त्याचा रुग्णालयात खप झालेला नाही म्हणून ती मुदत बाह्य झालेली आहे.

०२) Tab.Doxygee :- रक्कम रु. १४४०६.६ या गोळया चिकणगुण्याचे रोगासाठी एकूण १,६०,००० गोळ्या मे. विजय मेडीकल स्टोअर्स, शिर्डी यांचेकडून विहीत पध्दतीने खरेदी करण्यात आलेल्या होत्या त्यापैकी जिल्हा परिषद अहमदनगर यांनी २४००० गोळया नेल्या नाहीत त्या मुदत बाह्य होणेपूर्वी मे. विजय मेडीकल स्टोअर्स, शिर्डी यांना गोळ्या परत घेणेबाबत कळविले होते परंतु सदरच्या गोळ्या जनरीक असल्यामुळे कंपनी बदलून देत नाही असे सांगितले म्हणून मुदत बाह्य झाल्या आहेत.

०३) Tab.Perigard २mg & ४mg :- रक्कम रु. ४८३६३.७६ एकूण गोळ्या ८६४० नग ह्या मे. ग्लेनमार्क,मुंबई या उत्पादक कंपनीकडून सन २००५ साली खरेदी केल्या होत्या त्यांना मुदतबाहय होण्यापुर्वी म्हणजे आठ महिने अगोदर इकडील पत्र क्रमांक १६७३१ दि.०१ डिसेंबर २००६ च्या पत्रान्वये कळविण्यात आले होते. तसेच कंपनीचे आलेले प्रतिनिधी यांना देखील वेळोवेळी सांगितले होते. परंतु त्यांचेकडून कोणताही अद्याप प्रतिसाद आलेला नाही व त्यामुळे त्या मुदत बाह्य झाल्या आहेत. याबाबत कंपनीकडे Credit Note किंवा बदली औषधे मिळणेकामी पाठपुरवा चालू आहे. तेंव्हा सदरच्या गोळ्या फक्त संगणकातून निर्लिखीत करण्यास मान्यता असावी.कारण कंपनीने सदर गोळयांची मागणी केल्यास त्या त्यांना परत द्याव्या लागणार आहे.

०४) Tab.Ethambutol Hydrochloride ४००mg :- रक्कम रु.२२९७६.०० या गोळया सन २००४ साली मे.हाफकिन बायोफार्मा,मुंबई यांचेकडून खरेदी केल्या आहेत. परंतु सध्या बाजारात DOT Therphy Combi Pack गोळ्या उपलब्ध झाल्यामुळे सदरच्या गोळ्या कोठेही वापरत नाहीत. मे.हाफकिन बायोफार्मा,मुंबई यांना सदर गोळ्या परत घेणे बाबत इकडील पत्र क्र.३१७८ दि.२९ मार्च २००५ अन्वये विचारणा केली असता त्यांनी सदरच्या गोळ्या आम्ही परत घेत नाहीत असे दि.०७एप्रिल२००५ चे पत्रान्वये कळविलेले आहे. तसेच याबाबत जिल्हा परिषद अहमदनगर यांना देखील इकडील पत्र क्रमांक-११५७९ दि.११ ऑक्टोबर २००५ अन्वये त्यांचेकडील ग्रामीण रुग्णालयातील रुग्णांना वापरण्यासाठी घ्याव्यात म्हणून कळविले होते. परंतु त्यांनी Dot Therphy मुळे सदरच्या गोळ्या घेतल्या नाहीत त्यामुळे त्या मुदत बाह्य झाल्या आहेत.

औषध भांडारात एकूण रु.१०९५४४.४११२ इतक्या रक्कमेची औषधे मुदत बाह्य झाली आहे त्यापैकी उपरोक्त अ.नं. १ ते ४ मध्ये नमूद केलेल्या औषधांची रक्कम रु.१,०७,७५९.०१ इतकी आहे. व त्या उपरोक्त कारणास्तव मुदतबाहय झाल्या आहे. उर्वरित औषधांची एकुण किंमत रु.६६५६२.०० ची औषधे मुदतबाहय झालेली आहे. सदरची औषधे मुख्यत्वे २००५-०६ व २००६-०७ मध्ये खरेदी करण्यात आली होती. सन २००५-०६ या वेळेमध्ये एकुण रु.६,७०,००,०००/- ची औषधे खरेदी केलेली आहे.त्यानुसार मुदतबाहय औषधांची टक्केवारी ०.२६२८% इतकी आहे. सदरची यादी अंतर्गत लेखापरिक्षक (ऑडीटर्स) श्रीयुत कोठारी साहेब यांचेडून तपासून घेतलेली आहे.

तसेच श्री साईबाबा रुग्णालय हे मे २००६ मध्ये कार्यान्वित झालेले आहे व ते नविनच असल्यामुळे सुरुवातीस काही औषधे / सर्जिकल साहित्य इत्यादीची मागणी हि त्या त्या डॉक्टरांच्या/ विभागातील मागणी प्रमाणे मागविण्यात आली होती. परंतु त्यावेळेस बाहयरुग्ण व अंतरुग्णांचा अंदाज माहित नव्हता त्यामुळे त्याचा वापर झालेला नाही व ती मुदत बाह्य झालेली आहे.

सन २००६-२००७ मध्ये मागणी करतांना मागील वर्षाचा खप माहिती नसल्यामुळे अंदाजे मागणी करण्यात आलेली होती कारण त्यावेळेस साईबाबा रुग्णालय हे नविनच होते सन २००७-०८ मध्ये औषधे मागणी करतांना २००६-०७ या वर्षामधील झालेला खप व मागणी इत्यादीचा विचार करुन पुरवठा आदेशात Delivery Schedule निश्चित करण्यात आलेली आहे.

**तरी उपरोक्त प्रमाणे औषधे, गोळ्या Perigard २mg & ४mg वगळता उर्वरित औषधे जमिनीत खोलवर खड्डा घेऊन नष्ट करण्यास व औषध भांडारातील संगणकामधुन कमी**

**करणेस मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात यावी अशी याउपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली. तसेच भविष्यात अशा प्रकारे औषधे, गोळ्या मुदतबाह्य होणार नाही याची दक्षता घ्यावी.**

(कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

**(१९) श्रीसाईनाथ व श्री साईबाबा रुग्णालयाकरीता फर्निचर खरेदीकामी येणाऱ्या जादा खर्चास मंजूरी मिळणेबाबत.**

श्रीसाईनाथ रुग्णालयातील कार्यालयीन फर्निचर खरेदीकामीचा अंदाजे खर्च रु.५,१२,३०१.८०/- चा प्रस्ताव व श्री साईबाबा रुग्णालयाकरीता फोर सिटर बेंच खरेदीचा अंदाजे खर्च रु.२,४३,०००/- चे प्रस्तावास दि.२५/११/२००६ चे मा. व्यवस्थापन समिती सभेत निर्णय क्र.९०७ व ९२१ अन्वये मान्यता मिळालेली होती.

उपरोक्तप्रमाणे खरेदीकामी वर्तमान पत्रात जाहिरात देण्यात येऊन निविदा मागविण्यात आल्या होत्या. त्यास अनुसरुन प्राप्त झालेल्या निविदा मा. व्यवस्थापन समिती सभा दि.१३/०१/२००८ रोजीच्या सभेत समक्ष उघडण्यात आल्या होत्या त्याचा तुलनात्मक तक्ता तयार करण्यात येऊन सदरहू निविदाधारकांना त्यांनी निविदेमध्ये नमूद केलेल्या मालाचा नमुना शिर्डी येथे समक्ष घेऊन दि. २४/०२/२००८ चे मा. व्यवस्थापन समिती चर्चा / वाटाघाटीसाठी बोलविण्यात आले होते.

त्यानुसार दि. २४/०२/२००८ चे मा. व्यवस्थापन समितीचे सभेत उपरोक्त कार्यालयीन फर्नीचर मे. उषा ट्रेडींग कं., नाशिक यांचेकडून समक्ष पाहणी करुन खरेदी करणेस मान्यता मिळालेली आहे. त्यानुसार मे. उषा ट्रेडींग कं., नाशिक यांना इकडील जा.क्र.३६६६ दि. ०८/०३/२००८ अन्वये पुरवठा आदेश तयार करण्यात आला होता.

दि. १९/०३/२००८ रोजी उपवैद्यकिय संचालक श्री. एन.एस. म्हस्के, श्री. जोशी साहेब, प्रशासकीय अधिकारी व मा. विश्वस्त श्री. शैलेश कुटे साहेब यांनी मा. व्यवस्थापन समिती सभेत ठरलेप्रमाणे नाशिक येथे समक्ष फर्नीचर पाहणी करण्यासाठी गेले होते. परंतु पुरवठा आदेशात नमुद केलेल्या फर्नीचरची प्रत्यक्ष पाहणी केल्यानंतर सदरचा नमुना समाधानकारक वाटला नाही. तेंव्हा Godrej कंपनीचे दुसऱ्या मॉडेलचे फर्नीचर हे उत्तम दर्जाचे वाटल्यामुळे नाशिक येथून गोदरेज कंपनीचे अधिकृत विक्रेते यांचेकडून समक्ष नमुना पाहून तीन फेर दर आणलेली आहेत. उपरोक्त कोटेशनचा तुलनात्मक तक्ता खालीलप्रमाणे-

| Sr.No | Name of Item | Qty. | Seva Finvest (I) Pv Nashik | Godrej Boyce Mfg.Co.Ltd., Nash | Usha Trading Co.,Nashik | Total in Rs. |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | Godrej Chair PCH-7001 | 15 | Model - PCH-7001 | Model - PCH-7001 (**Transport Charg extra**) | Model - PCH-7 | |
| | | | **9450.00** | 9756.00 | 10289.00 | 141750.00 |
| 2 | Godrej Chair PCH-7001 D | 20 | Model - PCH-7001 | Model – PCH-700 (**Transport Charg extra**) | Model - PCH-7 D | |
| | | | **10800.00** | 11000.00 | 11600.00 | 216000.00 |
| 3 | Godrej Chair 3 Seater + Arm BPM Profrometal | 60 | | BPMIx3 Seater on Beam with Arms (**Transport Charg extra**) | Size 1435W x x 800 H | |
| | | | **5500.00** | 6711.00 | 5832.00 | 330000.00 |
| 4 | Godrej Storewel Glass Door | 15 | | N.Q. | Model STPL 4 Glass Door | |
| | | | **15200.00** | | 15322.00 | 228000.00 |
| 5 | Slotted Rack 3 Side Closed with 12 Partition | 25 | 4600.00 Maxima M | N.Q. | **4190.00** Maxir Make | 104750.00 |
| | | | | **Transportation Charges Rs.5000 extra** | | |
| | | | | **Total Amt. in Rs.-** | **1020500.00** | |

**वरील तुलनात्मक तक्त्यात अ.नं.१,२,३,४ करीता मे. सेवा फिनव्हेस्ट, नाशिक यांचे दर निम्नतम आहे. तर अ.नं. ५ करीता मे.उषा ट्रेडींग यांचे पुर्वीचेच दर निम्नतम आहे. उपरोक्त प्रमाणे निम्नतम दराने सदरच्या खरेदीकामी एकुण रु.१०,२०,५००/- इतका खर्च येणार आहे. मे. उषा ट्रेडींग, नाशिक यांचे पुर्वीचे दरापेक्षा सदरचे खरेदीकामी रु.८२,९७०/-(रु.१०२०५००-रु.९३७५३०= रु. ८२९७०) इतका जास्तीचा खर्च येणार असून त्यास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात यावी अशी या उपसमितीची शिफारस आहे.** (कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

**(२०) 2D Echo मशिनचे UPS दुरुस्तीबाबत.**

श्री साईबाबा हॉस्पिटलकरीता मा.व्य.समिती सभा दि.१८/०७/२००५ च्या विषय क्र. ०१ निर्णय क्र. ३३२ (१०) अन्वये मे. फिलीप्स इलेक्ट्रॉनीक्स सिस्टीम इंडिया प्रा. ली. मुंबई यांचेकडुन एक 2 D Echo मशीन (मॉडेल - Sonos 7500) दोन प्रोब व 3KVA UPS (APC make) सह एकुण रु. ४०,००,०००/- इतक्या रकमेत खरेदी करण्यात आले आहे. सदरचे मशीन श्रीसाईबाबा हॉस्पिटलमध्ये दि. १४/११/२००५ रोजी बसविण्यात आले असुन दि. १३/११/२००६ रोजी सदर मशीनचा वॉरंटी कालावधी संपला आहे. पुढील काळात दुरुस्ती व देखभाल करणेकरीता फक्त 2 D Echo मशीनचे मे. फिलीप्स मेडीकल सिस्टीम इंडिया प्रा.ली. मुंबई यांचेकडे एकुण रु. ४,९४,१९३/- इतकी रक्कम अदा करुन कॉम्प्रेहेंन्सीव्ह मेंटेनन्स कॉन्ट्रॅक्ट करण्यात आले आहे. सदर कॉन्ट्रॅक्ट कालावधीत दुरुस्ती व देखभालीकरीता आवश्यक असणारे स्पेअर पार्ट कंपनी स्वखर्चाने बदलणार आहे. परंतु 3KVA UPS (APC make) हे मे. फिलीप्स मेडीकल सिस्टीम इंडिया प्रा. ली. मुंबई यांचे उत्पादन नसल्यामुळे कंपनी त्याची दुरुस्ती व देखभाल करीत नाही.

आतापर्यंत दोन वर्षांच्या कालावधीत सदर यु.पी.एस. ने व्यवस्थीत काम दिले आहे परंतु दि.१९/१२/२००७ रोजी सदर यु. पी. एस. खराब झाला असुन तो तातडीने दुरुस्त करणे आवश्यक आहे. कारण 2 D Echo मशीन यु.पी.एस. शिवाय वापरल्यास सदर मशीनचा एखादा बोर्ड खराब होउ शकतो. यु.पी.एस. न वापरल्याने मशीन खराब झाल्यास मशीनचे पार्ट कंपनी स्वखर्चाने बदलुन देणार नाही, असे मे. फिलीप्स इलेक्ट्रॉनीक्स सिस्टीम इंडिया प्रा. ली. मुंबई यांचे इंजिनीअरने कळविले आहे.

मे.ए.पी.सी. इंडिया प्रा. ली. मुंबई या यु. पी.एस. पुरवठा करणाऱ्या कंपनीचे अधिकृत डिलर मे. रोलेक्स लॉजिस्टीक्स प्रा. ली.पुणे यांच्या दि. २६/१२/२००७ च्या पत्रानुसार इकडील दि. २९/१२/२००८ च्या मंजुरी अन्वये सदर यु.पी.एस. दुरुस्तीच्या सर्व्हिस चार्जची रक्कम एकुण रु. २,१०७/- आगाउ पाठविण्यात आली होती. त्यानंतर कंपनीचे इंजिनीअर सदर यु.पी.एस. दुरुस्तीकरीता आले असता त्यांनी यु.पी.एस. च्या बॅटरीज खराब झालेल्या असुन बदलणे आवश्यक असल्याचे त्यांचे दि. ०१/०३/२००८ च्या पत्रान्वये कळविले आहे. सदर बॅटरीजकरीता त्यांनी त्यांचे पत्र क्र.CHOICE/QTN/2008-09/03 दि. ०२/०४/२००८ अन्वये खालीलप्रमाणे कोटेशन पाठविले आहे.

| Sr.No. | Description | Qty. | Rate (in Rs.) | Total Price (in Rs. |
|---|---|---|---|---|
| 01 | 12V, 18AH Rocket make battery | 16 | 2300.00 | 36,800.00 |
| | | | VAT 12.50% | 4,600.00 |
| | | | **Total Amount in Rs.** | **41,400.00** |

वरीलप्रमाणे 2 D Echo मशीनच्या यु.पी.एस. दुरुस्तीकरीता आवश्यक असणाऱ्या १६ नग बॅटरीज खरेदी करणेसाठी सर्व करांसहीत एकुण रु. ४१,४००/- (अक्षरी रु. एक्केचाळीस हजार चारशे मात्र) इतका खर्च अपेक्षित आहे. परंतु सदर बॅटरीज अशाप्रकारच्या बॅटरीचा पुरवठा करणाऱ्या अन्य पुरवठाधारक कंपन्यांकडुन कोटेशन मागवुन निम्नतम दराने खरेदी करता येतील असे मत आहे.

**तरी 2 D Echo मशीन यु. पी. एस. दुरुस्तीसाठी आवश्यक असणाऱ्या १६ नग बॅटरी खरेदी करण्यास विविध पुरवठाधारक कंपन्यांकडुन कोटेशन मागविण्यास व त्यासाठी येणाऱ्या अंदाजे रु. ४१,४००/- खर्चास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात यावी अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.**

(कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

**(२१)** श्री साईबाबा रुग्णालयात अंर्तरुग्ण व बाह्यरुग्ण म्हणून उपचार घेत असलेल्या रुग्णांना डॉक्टरांनी लिहून दिलेली औषधे खाजगी दुकानातून महागड्या दराने खरेदी करावी लागतात तेव्हा रुग्णालयातील मेडिकल स्टोअर भाडे तत्त्वावर चालविण्यास देण्यात यावे व त्यासाठीची नियमावली वैद्यकीय संचालक यांनी तयार करुन ती व्यवस्थापन मंडळाचे सभेपूढे मान्यतेसाठी सादर करावी अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली. (कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

**(२२)** श्री.कैलास सुकदेव गिते, हे श्री साईबाबा रूग्णालयात सध्या कंत्राटी फार्मासिस्ट म्हणून काम करत आहे. श्री. गिते यांची दि. २७/१०/२००६ रोजी मुत्रपिंडरोपण शस्त्रक्रिया झालेली आहे. त्या शस्त्रक्रियेनंतर मुत्रपिंड सुरळीत कार्यरत राहणेकामी काही औषधे नियमित घ्यावी लागतात. ते कंत्राटी कामगार असल्याने त्यांना संस्थानची कोणतीही वैद्यकीय सेवा मिळत नसलेने व घरची परिस्थीती अत्यंत नाजूक असल्याने त्यांनी दि. १४/०५/२००८ अर्जान्वये संस्थानकडे औषधे दरमहा खरेदी करुन मिळणेबाबत विनंती केली आहे. सदर अर्जावर चर्चा होऊन श्री. गिते यांना संस्थानतर्फे औषधे खरेदी करुन देण्यात यावी अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.

(कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

**(२३)** सुपरस्पेशालिटी रुग्णालय बांधणेकामी सुधारित प्लॅन व एस्टिमेट तयार करण्यात यावे. ते तयार झालेनंतर सध्या असलेल्या श्री साईबाबा हॉस्पिटलचे जागेवर श्री साईनाथ रुग्णालय हलविण्यात यावे, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली. (कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

**विषय नं.०४ (अ) नोंद घेण्याचे विषय.**

**०१. (अ) जमा खर्च तक्ता मार्च व एप्रिल- २००८.**

**(ब ) माहे एप्रिल- २००८ या महिन्यात दक्षिणा पेटीत जमा झालेल्या देणगीची नोंद घेणे.**

**(क) माहे एप्रिल - २००८ मध्ये श्री साईबाबांना अर्पण झालेली वस्त्रे व इतर वस्तूंच्या अहवालाची नोंद घेऊन मान्यता देणे.**

**निर्णय क्र. ४१७**(A) माहे मार्च-एप्रिल २००८ मधील जमा रु २७,३७,५५,५२७.६० व रु.१४,६०,४७,३०६.९६ आणि खर्च रुपये २१,६२,५४,०८३.१० व रुपये ३,७८,७९,७८६.०० चा तक्ता, माहे मार्च-एप्रिल, २००८ मध्ये मा.कार्यकारी अधिकारी यांनी रुपये २५,०००/-चे मर्यादेत केलेल्या खर्च रुपये ५,५६,०२८.०० व रुपये ४९,३१६.०० खर्चाचा तक्ता, दिनांक २०.०५.२००८ अखेरीस रुपये २,६९,३३,३६,७१२.०० गुंतवणूकीची परिस्थिती दर्शविणारा तक्ता, माहे एप्रिल- २००८ या महिन्यात दक्षिणा पेटीत जमा झालेल्या सोने चांदी, कापड व इतर वस्तूसह एकुण रुपये ५,३६,७७,३४३.७५ व देणगीचा तक्ता, माहे एप्रिल-२००८ मध्ये श्रीसाईबाबांना अर्पण झालेली वस्त्रे व इतर वस्तुचा रुपये २,२२,२७८/- चा अहवाल, ज्यांच्या प्रती सर्व मा. सदस्यांना पुरविण्यात आल्या होत्या, त्याची नोंद घेण्यात येऊन मान्यता देण्यात आली.

**०२. श्रीसाईबाबा हॉस्पिटमध्ये माहे मार्च, २००८ मध्ये देण्यात आलेल्या वैद्यकीय बीलातील सवलतीची नोंद घेऊन मान्यता देणे.**

**निर्णय क्र. ४१७**(B)श्री साईबाबा हॉस्पिटलमध्ये आर्थिकदृष्ट्या दुर्बल व कुमकुवत रुग्णांचे बिलामध्ये माहे मार्च,२००८ मध्ये देण्यात आलेल्या रुपये १७,६४,०४१.००सवलतीच्या तक्त्याच्या प्रती सर्व मा. सदस्यांना पुरविण्यात आल्या होत्या, त्याची नोंद घेण्यात येऊन, मान्यता देण्यात आली.

**०३. साईनाथ रुग्णालयात माहे एप्रिल,२००८ या महिन्यात देण्यात आलेल्या वैद्यकीय अनुदानाची नोंद घेणे.**

**निर्णय क्र. ४१७ (C)** साईनाथ रुग्णालयात माहे एप्रिल,२००८ मध्ये देण्यात आलेल्या वैद्यकीय अनुदान रु.८४,९१,०९५/- चा तक्ता, ज्यांच्या प्रती सर्व मा. सदस्यांना पुरविण्यात आल्या होत्या, त्याची नोंद घेण्यात येऊन, मान्यता देण्यात आली.

**०४. साईनाथ रुग्णालयातील गरीब रुग्णांना माहे एप्रिल,२००८ मध्ये देण्यात आलेल्या वैद्यकीय बीलातील सवलतीची नोंद घेऊन मान्यता देणे.**

**निर्णय क्र. ४१७ (D)** साईनाथ रुग्णालयात माहे एप्रिल,२००८ मध्ये साईनाथ रुग्णालयातील रुग्णांना अंतररुग्ण रुपये ९८,२४५/- बाह्य रुग्ण रु.६२,४६९/- थॅलसेमिया व हिमोफेलिया रुपये ५२,५५०/- वैद्यकीय बीलांमध्ये देण्यात आलेल्या सवलतीची माहिती दर्शविणाऱ्या तक्त्याच्या प्रती सर्व मा. सदस्यांना पुरविण्यात आल्या होत्या, त्याची नोंद घेण्यात येऊन मान्यता देण्यात आली

**०५. माहे एप्रिल,२००८ मध्ये लावलेल्या ठेकेदारी कर्मचारी संख्येची नोंद घेऊन मान्यता देणे.**

**निर्णय क्र. ४१७**(E) माहे मार्च-२००८ मध्ये संस्थानमधील कामांसाठी कंत्राटदारांमार्फत वेळोवेळी रोजंदारीवर लावलेल्या ३३९३९ कर्मचाऱ्यांच्या/कामगारांच्या संख्येची माहिती दर्शविणारे तक्ते, ज्यांच्या प्रती सर्व मा.सदस्यांना पुरविण्यात आल्या होत्या, त्याची नोंद घेण्यात येऊन मान्यता देण्यात आली

**०६. बांधकाम प्रगती तक्त्याची नोंद घेऊन मान्यता देणे.**

**निर्णय क्र. ४१७ (F)** बांधकाम प्रगती अहवाल दर्शविणारा तक्ता "अ" व "ब" त्याच्या प्रती सर्व मा.सदस्यांना पूरविण्यात आल्या होत्या, त्याची नोंद घेण्यात आली. "ब" तक्त्यातील खालीलप्रमाणे अंतिम बिले आर्किटेक्ट यांचे शिफारशीप्रमाणे आदा करणेस मान्यता देण्यात आली.

०१) नवीन श्री साईप्रसादालय इमारत पाणीपुरवठयासाठी डी.आय. पाईपलाईन करणे कामाचे ठेकेदार आर.एल. भुतडा, कोपरगाव यांचे अंतिम बील रक्कम रु.२१,७१,६३८.००.

०२) मौजे येसगाव येथे निवासस्थानाचे बांधकाम कॉन्ट्रॅक्टर्स,मे.वाघ बिल्डर्स , कोपरगाव यांचे अंतिम बील रक्कम रु.४३,२८,०४०.००. (कार्यवाही-बांधकाम विभागप्रमुख)

**०७.पाणी तपासणी अहवालाची नोंद घेऊन मान्यता देणे.**

**निर्णय क्र. ४१७ (G)** माहे एप्रिल-२००८ मध्ये संस्थान पाणीपुरवठा योजने अंतर्गत पुरविण्यात येणाऱ्या संस्थानचे परिसरातील पिण्याच्या पाण्याचे नमूने (सॅम्पल्स) मे.एनव्हायरो लॅब, नाशिक यांचेकडे तपासणीसाठी पाठविण्यात आले होते. त्यांचेकडून आलेले तपासणी अहवाल, ज्यांच्या प्रती सर्व मा. सदस्यांना पुरविण्यात आल्या होत्या, त्याची नोंद घेण्यात आली.

**विषय नं. ०५ नवीन श्री साईप्रसादालयाकरीता सोलर स्टीम कुकींग यंत्रणा उभारणीकामी आलेल्या फेरनिविदा (दरपत्रक) उघडून चर्चा/वाटाघाटीव्दारे निर्णय घेणे.**

**निर्णय क्र.४१८** नविन श्री साई प्रसादालयाकरीता सोलर स्टीम कुकींग यंत्रणा उभारणी व त्याकामी येणा-या अंदाजे रु.१,३६,००,०००/- चे खर्चास तसेच वृत्तपत्रात जाहिरात प्रसिध्द करुन निवीदा मागविणेस मा.व्यवस्थापन समिती दि.०६/०१/२००७ चे सभेतील निर्णय क्र.५४ नुसार मान्यता मिळालेली होती. त्यानूसार वृत्तपत्रातील जाहिरातीप्रमाणे खालील ३ एजन्सींनी निवीदा खरेदी केलेल्या होत्या.

| अं.नं. | निवीदाधारकांचे नांव | पत्ता |
|---|---|---|
| १. | मे.सुप्रिम रे सोलर सिस्टीम्स | पुणे |
| २. | मे.शारदा इनव्हेंशन्स | नाशिक |
| ३. | मे.गढीया सोलर सिस्टीम्स प्रा.लि. | बलसाड (गुजरात) |

वरीलपैकी अ.नं. २ व ३ या २ एजन्सींनी दरपत्रक सादर केलेले होते. संस्थान नियमानुसार कमीत कमी ३ दरपत्रक गरजेचे आहे. दोन एजन्सींनी वेगवेगळया डीश साईजचे दरपत्रक सादर केलेले असल्याचे आढळून आले होते. तसेच निवीदाफॉर्ममध्ये अन्य तांत्रिक त्रुटी आढळून आल्याने मा.व्यवस्थापन समिती सभा दि.२०/०१/२००८ मध्ये फेरनिवीदा मागविणेबाबत निर्णय झालेला आहे. नविन साईप्रसादालयाकरीता उभारण्यात येणा-या सोलर स्टीम कुकींग यंत्रणा अद्यायावत व दोष रहीत असावी म्हणून मा.श्री अजित के गुप्ता, ॲडव्हायझर, नविन व नवीकरणीय उर्जा मंत्रालय, नवी दिल्ली यांचे मार्गदर्शन घेण्यात यावे. त्याकामी मा.व्यवस्थापन समिती सदस्य, संस्थान अधिकारी व मा.श्री अजित के. गुप्ता, ॲडव्हायझर, नविन व नवीकरणीय उर्जा मंत्रालय, नवी दिल्ली यांची संयुक्त सभा घेण्यासाठी नवी दिल्ली येथे जाणेस मान्यता देण्यात आलेली होती.

मा.व्यवस्थापन समिती दि.२०/०१/२००८ चे सभेतील निर्णयानुसार दि.२७/०१/२००८ रोजी उर्जा मंत्रालय नवी दिल्ली येथे मेडाचे अधिकारी, मा. व्यवस्थापन समिती सदस्य व संस्थान अधिकारी यांची सोलर स्टीम कुकींग यंत्रणा उभारणीकामी सभा झालेली आहे. उर्जा मंत्रालय नवी दिल्ली व मेडा यांचे संयुक्तीक मार्गदर्शन व सल्ल्यानुसार नविन श्री साई प्रसादालयासाठी सोलर स्टीम कुकींग यंत्रणा उभारणीकामी निवीदा तयार करण्यात आलेली आहे.

दि.०७/०३/२००८ चे मंजूर टिपणीनुसार सोलर स्टीम कुकींग यंत्रणा उभारणीकामी वृत्तपत्रात जाहिरात प्रसिध्द करण्यात आली होती. वृत्तपत्रातील जाहिरातीनुसार खालील ४ एजन्सींनी निवीदा घेतलेल्या आहेत.

| अं.नं. | निवीदाधारकांचे नांव | पत्ता |
|---|---|---|
| १. | मे.शारदा इनव्हेंशन्स | नाशिक |
| २. | क्लीक डेव्हलपमेंट | मुंबई |
| ३. | मे.गढीया सोलर सिस्टीम्स प्रा.लि. | बलसाड (गुजरात) |
| ४. | थर्मेक्स लिमीटेड | पुणे |

दि.२७/०३/२००८ रोजी मा.व्यवस्थापन समिती सदस्य मा.श्री सुरेशराव वाबळे, मा.सौ.उर्मिलाताई जाधव, मा.श्री अशोकराव खांबेकर यांचे उपस्थीतीत टेक्नीकल बीड निवीदा उघडणेत आलेल्या आहेत. सदर टेक्नीकल बीडची मेडा, पुणे, सौर उर्जा सल्लागार यांचेकडून तपासणी करण्यात आलेली असून सल्लागार यांनी वरील ४ निवीदाधारक पात्र असल्याचे अहवालात नमूद केलेले आहे.

सल्लागार यांनी वरील चारही निवीदाधारकांना पात्र ठरविलेले आहे. तरी नविन श्री साई प्रसादालयातील सोलर कुकींग यंत्रणा उभारणीकामी आलेल्या निवीदा (दरपत्रके) उघडून / चर्चा वाटाघाटीने निर्णय होणेबाबतचा प्रस्ताव मा. कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

उपरोक्तप्रमाणे निवीदा / दरपत्रके उघडून चर्चा / वाटाघाटीद्वारे निर्णय घेणेपूर्वी निवीदासादरकर्त्यांशी तांत्रिक बाबी विषयी सविस्तर चर्चा करुन अभिप्राय देणेसाठी सौर उर्जा क्षेत्रातील तज्ञ श्री सी.एम.देशपांडे मॅनेजर सोलर, मेडा, पुणे व मा.श्री प्रा.एम.जी. ताकवाले, माजी कुलगुरु शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर तसेच मा.प्रा.सौ.ए.एम.पाठक, पुणे विद्यापीठ एनर्जी विभाग प्रमुख यांना मा.श्री ए.के. सिंघल, सेक्रेटरी, अपारंपारिक उर्जा मंत्रालय नवी दिल्ली भारत सरकार यांनी सुचित केलेनुसार आमंत्रित करणेत आलेले होते. त्यानुसार वरील तज्ञ सल्लागार यांनी ४ निवीदासादरकर्त्यांशी स्वतंत्रपणे व मा.व्यवस्थापन समितीचे सभेमध्ये सविस्तर चर्चा केली असता चर्चेअंती खालीलप्रमाणे निदर्शनास आले.

१) निवीदेमध्ये १७००० व्यक्तीसाठी अन्न शिजविणेकामी ४२०० कि.ग्रॅम प्रति दिन स्टीमची निर्मिती क्षमता नमूद केलेली आहे. मात्र निवीदासादरकर्त्यांनी टेक्नीकल बीडमध्ये स्टॅण्डर्ड सौर रेडीएशननुसार सोलर प्रोजेक्टची डिझाईन केलेली होती. प्रत्यक्षात शिर्डीचे भौगोलिकदृष्टया सोलर रेडीयशन पुणे, निफाड सारखे असल्याने प्रत्यक्षात मिळणा-या स्टीम जनरेशनमध्ये तफावत आढळून आली.

२) सध्याचे निवीदा / दरपत्रकामध्ये सोलर स्टीम साठविणेकामी यंत्रणेचा विचार केलेला नाही. प्रसादालयामध्ये अन्न शिजविण्याचे काम सकाळी ७.०० वाजेपासून सुरु होते. मात्र सोलर स्टीम

सकाळी ११.०० वाजेच्या पूढे तयार होते. त्यामुळे सदर सोलर यंत्रणेचा वापर ठरावीक काळापूरताच होत असल्याने प्रसादालयाचे गरजेनूसार जास्तीत जास्त सोलर स्टीम उपलब्ध व्हावी म्हणून सौर उर्जा यंत्रणा उभारणी करतांना स्टीम साठविणेकामी यंत्रणा असणे आवश्यक आहे.

सबब सर्व निवीदासादरकर्त्यांना लेखक ए. मनी यांचे "सोलर रेडिऐशन" या पूस्तकाच्या जंत्रीमध्ये पुणे व निफाड समोर दर्शविल्याप्रमाणे कॅल्क्यूलेशन करुन तसेच स्टीम स्टोअरेज यंत्रणा उभारणीचा अंतर्भाव करुन आठ दिवसात फेरदरपत्रके व डिझाईन सादर करण्यास सांगणेत आलेले होते. त्यानुसार उपरोक्त चारही निवीदासादरकर्त्यांनी टेक्नीकल बीड व प्राईजबीड उघडून घेउन मा.श्री प्रा.एम.जी. ताकवले, माजी कुलगुरु शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर, मा.सौ.प्रा.ए.एम. पाठक, पुणे विद्यापीठ, एनर्जी विभाग प्रमुख व मा.श्री सी. एम. देशपांडे, मॅनेजर सोलर (मेडा) पुणे या सोलर क्षेत्रातील तज्ञ सल्लागार यांचेकडे अभ्यास, तपासणी करुन पात्र, अपात्र, गुणवत्ताक्रमाचा अहवाल सादर करणेसाठी पुणे येथे पाठविण्यात आलेले होते.

उपरोक्तप्रमाणे तज्ञ सल्लागार यांनी चारही निवीदासादरकर्त्यांचे टेक्नीकल बीडचा अभ्यास / तपासणी करुन अहवाल सादर केलेला आहे. तज्ञ सल्लागार यांनी तपासणी अहवालामध्ये निवीदासादरकर्त्यांना गुणवत्तेनुसार खालीलप्रमाणे गुणानुक्रम दिलेले आहेत.

१) मे. गढीया सोलर सिस्टीम प्रा.लि. वलसाड.

२) मे. शारदा इन्हेशन्स, नाशिक.

३) मे. थर्मक्स लिमीटेड, पुणे.

४) क्लीक डेव्हलपमेंट, मुंबई यांचे सौरउर्जा यंत्रणा (डिशबाबत) निर्णय संस्थान व्यवस्थापनाने घ्यावा असे म्हटलेले आहे.

मा. व्यवस्थापन समिती दि.१५/४/२००८ चे सभेतील निर्णय व तज्ञ सल्लागार यांचे अभिप्रायानुसार मागविणेत आलेले फेरदरपत्रक आजचे सभेत समक्ष उघडण्यात येऊन तज्ञ सल्लागार व निविदासादरकर्त्यांना आजचे सभेपुढे चर्चा/वाटाघाटीसाठी बोलविण्यात आले असता त्यांनी खालीलप्रमाणे दर देऊ केलेले आहेत.

| **अ.नं** | **निविदासादरकर्त्यांचे नांव** | **निविदेतील दर रुपये** | **वाटाघाटीअंती देऊ केलेले दर रुपये** |
|---|---|---|---|
| ०१ | मे. गढीया सोलर सिस्टीम प्रा.लि. वलसाड | अ) १,४२,००,०००/-<br>ब) १,८२,५०,०००/- | १,३३,००,०००/- |
| ०२ | मे. शारदा इन्व्हेशन, नाशिक. | ९९,७३,०८०/- | - |
| ०३ | मे. थर्मक्स लिमीटेड, पुणे. | १,४७,३२,८०१/- | १,३७,३२,८०१/- |
| ०४ | मे.क्लीक डेव्हलपमेंट, मुंबई | १,६५,००,०००/- | १,६५,००,०००/- |

**कन्सल्टंट मे.मेडा,पुणे,प्रा.एम.जी.ताकवले, माजी कुलगुरु शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर व मा व्यवस्थापन समिती यांनी वरील सर्व निविदासादरकर्त्यांची सविस्तर चर्चा /वाटाघाटी करुन मे. शारदा इन्व्हेशन, नाशिक यांचे सिस्टममधुन तांत्रिक दृष्ट्या आवश्यक उर्जा निर्मिती होणे शक्य नसल्याने,त्यांचे दर निम्नतम असले तरी स्विकारणेत येऊ नये, त्याऐवजी गुणवत्तेनुसार योग्य असल्याने मे. गढीया सोलर सिस्टीम प्रा.लि. वलसाड यांची निविदा स्विकारणेत यावी, असे ठरले.**

(कार्यवाही-अधिक्षक,प्रसादालय)

**विषय नं.०६** **सेवाधाम इमारतीतील गॅलरीला ग्रील बसविणेकामी आलेली कोटेशन्स उघडून चर्चा/ वाटाघाटीने निर्णय घेणे.**

**निर्णय क्र.४१९** सेवाधाम इमारतीचे गॅलरीला ग्रील तयार करणेबाबत व येणाऱ्या रुपये २,४६,६३९/- इतक्या खर्चाचा प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीचे दिनांक १६-०३-२००८ चे झालेल्या मा.व्यवस्थापन समितीचे सभेत मान्यतेसाठी सादर करण्यात आला होता. हा प्रस्ताव या सभेत विषय क्र.५० निर्णय क्र. २६० अन्वये मान्य करण्यात आला असून या कामासाठी कोटेशन मागविणेचा निर्णय झाल्यानुसार कोटेशन मागविण्यात आले होते. खालीलप्रमाणे ०६ कोटेशन्स प्राप्त झाले आहेत. कोटेशन्सचा तपशील खालीलप्रमाणे :-

| अ.नं. | कोटेशन्ससादरकर्त्याचे नांव |
|---|---|
| ०१ | मे. साईनाथ फॅब्रिकेशन, श्रीरामपूर |
| ०२ | मे.रुचा इंजिनिअरींग वर्क्स, नवी मुंबई. |
| ०३ | मे. अंकुर फार्मा स्पेअर्स अॅड सर्व्हिसेस, नासिक |
| ०४ | मे. अक्षय मशिनस प्रा.लि. , नासिक |
| ०५ | मे. आकार मशिन्स प्रा.लि., नाशिक |
| ०६ | मे.साई इंजिनिअर्स , अंबड |

**उपरोक्तप्रमाणे सेवाधाम इमारतीचे गॅलरीला ग्रील तयार करणेबाबत प्राप्त झालेली कोटेशन्स आजचे सभेतउघडण्यात येऊन कोटेशनसादरकर्त्यांना चर्चा/वाटाघाटीसाठी बोलविण्यात आले होते. परंतू सेवाधाम इमारतीतील सर्व कर्मचाऱ्यांना नविन बांधण्यात आलेल्या निमगाव कोऱ्हाळे येथील गट नं.१६९ मध्ये बांधण्यात आलेल्या निवासस्थानमध्ये स्थलांत्तरीत करावयाचे असल्याने या कामाची आवश्यकता नसल्याने सदरहू विषय रद्द करण्यात यावा,असें ठरलें.** (कार्यवाही-बांधकाम विभाग प्रमुख)

**विषय नं.०७** **कॅन्टीन विभागासाठी लाडू वाहतूकीकरिता ट्रॉली व क्रेट खरेदी करणेकामी आलेली कोटेशन्स उघडून चर्चा/ वाटाघाटीने निर्णय घेणे.**

**निर्णय क्र.४२०** लाडू वाहतूकीसाठी ट्रॉलीज व एस.एस.क्रेट खरेदी करणेबाबत व येणाऱ्या रुपये १,५३,०००/- इतक्या खर्चाचा प्रस्ताव दिनांक २२-०९-२००७ चे झालेल्या मा.व्यवस्थापन समितीचे सभेत मान्यतेसाठी सादर करण्यात आला होता. हा प्रस्ताव या सभेत विषय क्र. ३६ निर्णय क्र. ७३७ अन्वये मान्य करण्यात आला असून या कामासाठी कोटेशन मागविणेचा निर्णय झाल्यानुसार कोटेशन मागविण्यात आले होते. खालीलप्रमाणे ०४ कोटेशन्स प्राप्त झाले आहेत. कोटेशन्सचा तपशील खालीलप्रमाणे :-

| अ.नं. | कोटेशन्ससादरकर्त्याचे नांव |
|---|---|
| ०१ | मे.साई इंजिनिअर्स , अंबड |
| ०२ | मे. आकार मशिन्स प्रा.लि., नाशिक |
| ०३ | मे.रुचा इंजिनिअरींग वर्क्स, नवी मुंबई. |
| ०४ | मे. आशय मशिनस प्रा.लि. , नासिक |

उपरोक्तप्रमाणे लाडू वाहतूकीसाठी ट्रॉलीज व एस.एस.क्रेट खरेदी करणेबाबत प्राप्त झालेली कोटेशन्स आजचे सभेत उघडण्यात येऊन, कोटेशनसादरकर्त्यांना समक्ष चर्चा/वाटाघाटी बोलविण्यात आले असता, त्यांनी खालीलप्रमाणे दर देऊ केले.

| **अ.नं.** | **कोटेशन्ससादरकर्त्याचे नांव** | **कोटेशनमधील दर रुपये** | **वाटाघाटीअंती देऊ केलेले दर रुपये** |
|---|---|---|---|
| ०१ | मे.साई इंजिनिअर्स , अंबड | २,६१,२२४/- | २,४८,१६२.८० |
| ०२ | मे. आकार मशिन्स प्रा.लि., नाशिक | २,९७,२१९/- | २,९७,२१९.०० |
| ०३ | मे.रुचा इंजिनिअरींग वर्क्स, नवी मुंबई. | ३,२५,१७६/- | ३,०८,९१७.२० |
| ०४ | मे. आशय मशिनस प्रा.लि. , नासिक | ३,३३,११०/- | २,९९,७९९.०० |

**यावर सविस्तर चर्चा होऊन,मे.साई इंजिनिअर्स,अंबड यांचे निम्नतम दर स्वीकारणेत येऊन, त्यांना कार्यादेश देण्यात यावा,असे ठरले.** (कार्यवाही-विद्युत विभाग प्रमुख)

**विषय नं.०८** **कियॉक्स सिस्टम खरेदीकामी प्राप्त निविदा उघडुन चर्चा/वाटाघाटीने निर्णय घेणेबाबत.**

**निर्णय क्र.४२१** संस्थान परिसरामध्ये (नविन भक्तनिवासस्थान, नविन प्रसादालय इमारत, स्वागत कक्ष (माहिती सुविधा केंद्र, बसस्टॅन्ड समोर), म्युझियम हॉल कियॉस्क सिस्टिम्स बसविणेसाठी, चार कियॉस्क सिस्टिम्स CMS व इतर नामांकित कंपन्यांची दरपत्रके मागवून खरेदी करणेस व त्यासाठी येणारे अंदाजे रुपये ६,००,०००/-(कर अतिरिक्त) पर्यंतचे खर्चास मा. व्यवस्थापन समितीचे दिनांक १० जानेवारी, २००८ रोजीचे सभेतील निर्णय क्रमांक ८७ नुसार मान्यता देण्यात आली आहे.

उपरोक्त निर्णयास अनुसरुन, कियॉस्क सिस्टिम्स खरेदीकामी सिलबंद निविदा मागविणेसाठी वर्तमान पत्रांत जाहिरात प्रसिध्द करणेसाठी माहिती तंत्रज्ञान विभागामार्फत जाहिरात नमुना तयार करुन, सदर जाहिरात संस्थानचे जनसंपर्क कार्यालयामार्फत महाराष्ट्र टाईम्स (मराठी), मुंबई आणि पुणे आवृत्ती या वर्तमान पत्रामध्ये व संस्थानचे www.sai.org.in या अधिकृत वेबसाईटवर प्रसिध्द करण्यात आली होती. सिलबंद निविदा संस्थानला सादर करण्याची अंतिम मुदत दिनांक १७ एप्रिल, २००८ अखेर ठेवण्यात आली होती.

सदर जाहिरातीनुसार, खालील पुरवठादारांनी कियॉस्क सिस्टिम्सचे दरपत्रकांबाबत सिलबंद निविदा दिलेल्या मुदतीत संस्थानला सादर केलेल्या आहेत. त्यांचा तपशील पुढीलप्रमाणे-

| **Sr. No.** | **Party Name** |
|---|---|
| ०१. | Axis Software Pvt. Ltd., Pune |
| ०२. | Minitek Systems (I) Pvt, Ltd.,m Nashik |
| ०३. | CMS Computer Ltd., Pune |
| ०४. | Sinic Electronics Pvt. Ltd., Mumbai |
| ०५. | Intellvisions Software Ltd., Mumbai |
| ०६. | Shri Swami Samarth Enterprises, Navi Mumbai |

उपरोक्तप्रमाणे प्राप्त झालेल्या निविदा आजचे सभेत उघडण्यात येऊन,निविदासादरकर्त्यांना समक्ष चर्चा/वाटाघाटीसाठी बोलविण्यात आले असता, त्यांनी खालीलप्रमाणे दर देऊ केले.

| **Sr.** | **Party Name** | निविदेतील दर रुपये | वाटाघाटीअंती देऊ |
|---|---|---|---|

| No. | | | केलेले दर रुपये |
|---|---|---|---|
| ०१. | Axis Software Pvt. Ltd., Pune | ५,५४,०००.०० + टॅक्सेस +सिपिंग चार्जेस | ५,००,०००.०० |
| ०२. | Minitek Systems (I) Pvt, Ltd.,m Nashik | २,४७,९६०.०० + टॅक्सेस | २,३०,०००.०० |
| ०३. | CMS Computer Ltd., Pune | ४,०९,४००.०० + एक्साईज ड्युटी | अनुपस्थित |
| ०४. | Sinic Electronics Pvt. Ltd., Mumbai | ३,४०,०००.०० | २,८०,०००.०० |
| ०५. | Intellvisions Software Ltd., Mumbai | २,३८,३८२.१६ | २,३८,०००.०० |
| ०६. | Shri Swami Samarth Enterprises,Navi Mumbai | ३,५६,०९६.०० | ३,५६,०९६.०० |

**यावर सविस्तर चर्चा होऊन, Minitek Systems (I) Pvt, Ltd.,m Nashik यांचे निम्नतम दर स्वीकारणेत येऊन, त्यांना कार्यादेश देण्यात यावा, असे ठरले.**

(कार्यवाही-आय.टी.विभाग प्रमुख)

**विषय नं.०९ श्रीसाई प्रसादालय इमारतीमध्ये फायर फायटिंग यंत्रणा बसविणेकामी आलेल्या निविदा उघडून निर्णय घेणे**

**निर्णय क्र.४२२** दि.१७/०२/२००७ रोजी शिर्डी येथे झालेल्या मा. व्यवस्थापन समितीचे बैठकीत निर्णय क्र. १३५ अन्वये नविन प्रसादालय इमारतीमध्ये फायर फायटींग यंत्रणा बसविणेकामी आर्किटेक्ट मे. शक्ती परमार ॲण्ड असो. मुंबई यांनी सादर केलेल्या प्राथमिक ढोबळ अंदाजपत्रकानुसार रुपये १९,८५,४०५/- मात्रचे खर्चास तसेच सदर कामासाठी वर्तमानपत्रातील जाहिरातीव्दारे निविदा मागविणेस मान्यता देण्यात आली. त्यानुसार दि. ०६/०६/२००७ रोजीचे टिपणी अन्वये निविदा मागविण्यात आल्या होत्या. दि. २६/०६/२००७ पर्यंतच्या मूदतीत फक्त दोन सिलबंद निविदा आल्या मा. उपसमितीचे दि. ०३/०७/२००७ रोजीचे बैठकीत झालेल्या चर्चेनुसार विषयांकीत कामासाठी फेरनिविदा मागविणेस निर्णय झाला आहे.

विषयांकित कामासाठी आर्किटेक्ट शक्ती परमार, मुंबई यांनी सुधारीत निविदांनुसार आयटम रेट धर्तीवर निविदा तयार केल्या आहेत. उपरोक्त निर्णयान्वये दि. ०३/०५/२००८ रोजीच दै. लोकमत या वर्तमान पत्रात जाहिरात प्रसिध्द करण्यात आली होती. याकामी निविदा विक्रिचा कालावधी दि. ०३/०५/२००८ ते दि. १२/०५/२००८ अखेर ठेवण्यात आला होता. तसेच दि. १५/०५/२००८ अखेर सिलबंद निविदा सादर करण्याची मूदत ठेवण्यात आली होती.

वरीलप्रमाणे शिर्डी येथील कार्यालयातून एकूण पाच निविदाधारकांनी कोऱ्या निविदा विकत घेतल्या होत्या त्यांचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

| अ. नं. | निविदाधारकांचे नांव |
|---|---|
| ०१ | सांरग एन्टरप्रायजेस, नाशिक |
| ०२ | किरण एन्टरप्रायजेस, नाशिक |
| ०३ | श्रध्दा फायर प्रोटेक्शन सिस्टम प्रा.लि., नाशिक |
| ०४ | अजय इंडस्ट्रिज, मुंबई |
| ०५ | निरो फायर सर्व्हीसेस, औरंगाबाद |

यापैकी खालील एकूण चार निविदाधारकांनी सिलबंद निविदा दिलेल्या मूदतीत सादर केल्या आहेत. त्याचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

| अ.नं. | निविदाधारकांचे नांव |
|---|---|
| ०१ | अजय इंडस्ट्रिज, मुंबई |
| ०२ | सांरग एन्टरप्रायजेस, नाशिक |
| ०३ | किरण एन्टरप्रायजेस, नाशिक |
| ०४ | श्रध्दा फायर प्रोटेक्शन सिस्टम प्रा.लि.,नाशिक |

वरीलप्रमाणे आयटम रेट धर्तीवर विहीत मुदतीत प्राप्त झालेल्या एकूण चार निविदाधारकांचे सिलबंद लिफाफा क्र. ०१ व लिफाफा क्र. ०२ आजचे सभेसमोर उघडण्यात येऊन, त्यांना समक्ष चर्चा/ वाटाघाटीसाठी बोलविण्यात आले असता, त्यांनी खालीलप्रमाणे दर देऊ केले.

| अ.नं. | निविदाधारकांचे नांव | निविदेतील दर रुपये | वाटाघाटीअंती देऊ केलेले दर रुपये |
|---|---|---|---|
| ०१ | अजय इंडस्ट्रिज, मुंबई | --- | अपात्र |
| ०२ | सांरग एन्टरप्रायजेस, नाशिक | ४९,२४,६७९.०० | ३९,९५,०००.०० |
| ०३ | किरण एन्टरप्रायजेस, नाशिक | ५१,९८,७७८.०० | अपात्र |
| ०४ | श्रध्दा फायर प्रोटेक्शन सिस्टम प्रा.लि.,नाशिक | ४७,२२,५३२.०० | ४२,५०,२७९.०० |

यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्तप्रमाणे फक्त दोनच प्राप्त निविदा प्राप्त झाल्याने याकामी फेरनिविदा मागविण्यात याव्यात असे ठरले. (कार्यवाही-बांधकाम विभागप्रमुख)

**विषय नं.१० बलवान कंपनीचा ट्रॅक्टर खरेदी कामी कोटेशन्सधारकांशी चर्चा/वाटाघाटीने निर्णय घेणे**

**निर्णय क्र.४२३** यावर सविस्तर चर्चा होऊन, ट्रॅक्टरची आवश्यकता नसल्याने सदरहू विषय रद्द करण्यात आला.

**विषय नं.११ ऑनलाईन यूपीएस खरेदीकामी कोटेशन्सधारकांशी चर्चा/वाटाघाटीने निर्णय घेणे**

**निर्णय क्र.४२४** मा.व्यवस्थापन समितीचे दि.१०.०१.२००८ मधील निर्णय क्र.८(२१) अन्वये माहिती व तंत्रज्ञान विभागातील सर्व्हर रुमधील संगणके व सर्व्हर यासाठी नियमीत विदयुत पुरवठा होणेसाठी आवश्यक असणारा ऑनलाईन युपीएस खरेदीस व त्याकामी येणारे रक्कम रु.२,७०,०००/- + व्हॅट टॅक्सचे खरेदीस मान्यता मिळालेली आहे. त्यानुसार आयटी विभाग प्रतिनिधींमार्फत मागविणेत आलेल्या दरपत्रकांचा तुलनात्मक तपशील खालीलप्रमाणे-

| | | | |
|---|---|---|---|
| 01 | 3 KVA ON-LINE UPS APC make | Tower Model 50 Min Battery Back-up 18 AH x 16 nos. of SMF Battery Battery Stand & Battery connecting cable Necessary Interface Power Cord 3 Years on site warranty for UPS & One year warranty for Battery | 2 Nos. |
| 02. | Intel core 2 Duo Processor APC make | 2.0 or Higher,3 KVA Redundant switch for redundancy with automatic switchover between two UPS | 1 Nos. |

| अ.नं. | कोटेशनधारकाचे नाव व गांव | ऑनलाईन युपीएस | २ डयुओ प्रोसेसर | **एकुण रक्कम** (युपीएस-२ नग प्रोसेसर-१ नग) |
|---|---|---|---|---|
| ०१. | कॉमप्रिंट कॉम्प्युटर्स, मुंबई | रु.१,२६,९५०/-प्र.नग +४%व्हॅट = रु.१,३२,०२८/- | रु.३५,७५०/- प्र.नग +४%व्हॅट = रु.३७,१८०/- | रु.३,०१,२३६/- (व्हॅटसह) |
| ०२. | मिनीटेक सिस्टीम्स प्रा.लि., नाशिक | -- | -- | रु.२,७२,५००/- (व्हॅटसह) |
| ०३. | अथर्व मेडीआ कन्स्पेट, नाशिक | रु.१,२४,०००/-प्र.नग +४%व्हॅट = रु.१,२८,९६०/- | रु.३८,०००/- प्र.नग +४%व्हॅट = रु.३९,५२०/- | २,९७,४४०/- (व्हॅटसह) |
| ०४. | एस.के.इंटरनॅशनल, मुंबई | रु.१,७८,३००/-प्र.नग (व्हॅटसह) | रु.३८,०००/- प्र.नग (व्हॅटसह) | ३,९४,६००/- (व्हॅटसह) |

उपरोक्त कोटेशनधारकांना आजचे सभेत चर्चा तथा वाटाघाटीसाठी आमंत्रित करणेत आले असता त्यांनी खालीलप्रमाणे दर देऊ केलेले आहेत.

| अ.नं. | कोटेशनधारकाचे नाव व गांव | **एकुण रक्कम** (युपीएस-२ नग प्रोसेसर-१ नग) | वाटाघाटीअंती देऊ केलेले दर |
|---|---|---|---|
| ०१. | कॉमप्रिंट कॉम्प्युटर्स, मुंबई | रु.३,०१,२३६/- (व्हॅटसह) | अनुपस्थित |
| ०२. | मिनीटेक सिस्टीम्स प्रा.लि., नाशिक | रु.२,७२,५००/- (व्हॅटसह) | अनुपस्थित |
| ०३. | अथर्व मेडीआ कन्स्पेट, नाशिक | २,९७,४४०/-(व्हॅटसह) | अनुपस्थित |
| ०४. | एस.के.इंटरनॅशनल, मुंबई | ३,९४,६००/-(व्हॅटसह) | ३,६४,६००/-(व्हॅटसह) |

**यावर सविस्तर चर्चा होऊन,अ.नं.०२ मिनीटेक सिस्टम्स प्रा.लि.,नाशिक यांचे निम्नतम दर स्वीकारणेत येऊन,त्यांना कार्यादेश देण्यात यावा,असे ठरले.** (कार्यवाही-आय.टी.विभाग प्रमुख)

**विषय नं.१२ पुस्तके /फोटो छपाई कामाचे घेतलेल्या निर्णयास कार्योत्तर मान्यता मिळणे बाबत**

**निर्णय क्र.४२५** मा. व्यवस्थापन समितीचे दि.१६.०३.२००८ चे सभेतील विषय नं. ३७ निर्णय क्र. २४६ नुसार श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी प्रकाशित खालील तपशिलाप्रमाणे पुस्तके/फोटो छपाई करणेबाबत व त्यासाठी रु.१९,५५,०००/- मात्रचे अपेक्षित खर्चास मान्यता देण्यात आली आहे.

**अ) पुस्तके छपाई**

| अ.नं | पुस्तकाचे नांव | नवीन छपाई संख्या | छपाई अंदाजे दर रुपये |
|---|---|---|---|
| ०१ | साईसत् चरित्र, कन्नड १२ वी आवृत्ती | ५०,००० | २५.०० |
| ०२ | श्री साईबाबा १०८ नामावली (झरीन) २ री आवृत्ती इंग्रजी | ५,००० | ०६.०० |
| ०३ | चिल्ड्रेन्स् श्री साईबाबा- हिन्दी लेखक - विकास मेहता हिन्दी द्वितीय आवृत्ती | ५,००० | ६५.०० |

**ब) फोटो छपाई**

| अ.नं | फोटोचे नांव | नवीन छपाई संख्या | छपाई अंदाजे दर रुपये |
|---|---|---|---|
| ०१ | श्री साईबाबा मुर्ती फोटो चार रंगात २०” X २८” | २०,००० | ७.०० |

वरील तपशिलाप्रमाणे पुस्तके/फोटो छपाई कामाचे कोटेशन्स खालील एकूण १७ निवडक प्रेसधारकांना जा.नं.एसएसएस/ वशी/प्रकाशने/४४७०/२००८ दि.२६.०३.२००८ अन्वये पाठविण्यात आलेली असून, सदरची कोटेशन भरुन दाखल करण्याची अंतिम मुदत दि.१५.०४.२००८ अखेर देण्यात आलेली आहे.

| अ.नं. | प्रेसधारकाचे नाव | अ.नं. | प्रेसधारकाचे नाव |
|---|---|---|---|
| ०१ | मे.युनायटेड मल्टीकलर प्रिंटर्स,पुणे | १० | मे सेफ ऑफसेट प्रायव्हेट लि., मुंबई |
| ०२ | मे.अमल ऑफसेट प्रा.प्रा.सातपूर नाशिक | ११ | मे न्यू राधारमण प्रिटींग प्रेस., मुंबई |
| ०३ | मे.ब्ल्यु बर्ड (इंडिया) प्रा.लि.पुणे. | १२ | मे कल्याणी कार्पोरेशन, पुणे |
| ०४ | मे.कमर्शियल बुक बायडींग वर्क्स, मुंबई | १३ | मे ओनस प्रिंट सोलुशन (इंडिया) प्रा.लि., मुंबई |
| ०५ | मे मॅग्ना ग्रॉफिक्स (इंडिया) प्रा.लि.मुंबई. | १४ | मे ऑस्कर ऑफसेट प्रा.लि., मुंबई |
| ०६ | मे.बळवंत प्रिंटर्स, पुणे | १५ | मे दि.प्रिमियर को-ऑपरेटिव्ह प्रिंटर्स लि.चे महाराष्ट्र सहकारी मुद्रणालय, पुणे |
| ०७ | मे.विकास इले.(सकाळ पेपर्स) सातपूर, नाशिक | १६ | साई सिक्युरिटी प्रिंटर्स लि., बंगलोर |
| ०८ | मे.अजय ऑफसेट प्रा.लि.पुणे | १७ | श्रीरंग प्रकाशने प्रा.लि., नाशिक |
| ०९ | मे.चिराग प्रिंटर्स, मुंबई | | |

उपरोक्त प्रमाणे संस्थान प्रकाशित पुस्तके/फोटो छपाईकामी वरील १७ निवडक प्रेसधारकांपैकी दि.१५.०४.२००८ अखेर खालीलप्रमाणे मुदतीत ७ सिलबंद कोटेशन्स प्राप्त झाली आहेत

| अ.नं. | प्रेसधारकाचे नाव |
|---|---|
| ०१ | मे.ब्ल्यु बर्ड (इंडिया) प्रा.लि.पुणे. |
| ०२ | मे.कमर्शियल बुक बायडींग वर्क्स, मुंबई |
| ०३ | मे.अजय ऑफसेट प्रा.लि.पुणे |
| ०४ | मे न्यू राधारमण प्रिटींग प्रेस., मुंबई |
| ०५ | मे कल्याणी कार्पोरेशन, पुणे |
| ०६ | मे ओनस प्रिंट सोलुशन (इंडिया) प्रा.लि., मुंबई |
| ०७ | मे दि.प्रिमियर को-ऑपरेटिव्ह प्रिंटर्स लि.चे महाराष्ट्र सहकारी मुद्रणालय, पुणे |

उपरोक्तप्रमाणे "अ" नुसार पुस्तके व "ब" नुसार फोटो छपाईकामी प्राप्त झालेले सिलबंद कोटेशन्स दि.२४.०४.२००८ रोजी उपस्थित विश्वस्त मा. श्री. सुरेश गोरक्षनाथ वाबळे , मा. श्री. अशोक भिमाशंकर खांबेकर व मा. श्री. कृष्णचंद्र श्यामसुंदर पांण्डये यांचे समक्ष उघडण्यात आले असता, कोटेशन्स सादर कर्त्यांनी खालीलप्रमाणे दर देऊ केलेले आहेत.

| अ.नं. | कोटेशन्ससादरकर्त्याचे नांव | साईसत् चरित्र, कन्नड १२ वी आवृत्ती | श्री साईबाबा १०८ नामावली (झरीन) २ री आवृत्ती इंग्रजी | चिल्ड्रेन्स् श्री साईबाबा- हिन्दी लेखक - विकास मेहता द्वितीय आवृत्ती हिन्दी | श्री साईबाबा मुर्ती फोटो चार रंगात रंगीत |
|---|---|---|---|---|---|
| **०१** | मे.ब्ल्यु बर्ड (इंडिया) प्रा.लि.पुणे. | २९.०० | ५ .४४ | ६२ . ०० | **<u>५.२२</u>** |
| **०२** | मे.कमर्शियल बुक बायडींग वर्क्स, मुंबई | २८ .०० | **<u>४.५०</u>** | ५५. ०० | ५.७४ |
| **०३** | मे.अजय ऑफसेट प्रा.लि.पुणे | **<u>२६. ९८</u>** | ४.८१ | **<u>५३.४०</u>** | ५.७० |
| **०४** | मे न्यू राधारमण प्रिटींग प्रेस., मुंबई | ३०.५७ | ४.७७ | ५६. १६ | ५.३० |
| **०५** | मे कल्याणी कार्पोरेशन, पुणे | २७.०० | **<u>४.५०</u>** | ६३.६३ | ५.६९ |
| **०६** | मे ओनस प्रिंट सोलुशन (इंडिया) प्रा.लि., मुंबई | ३६.४० | ४.९० | ६७.०० | ७.३३ |
| ०७ | मे दि.प्रिमियर को-ऑपरेटिव्ह प्रिंटर्स लि.चे महाराष्ट्र सहकारी मुद्रणालय, पुणे | ३१.७० | ५ .८० | ५३.४३ | ८.७७ |

**उपरोक्तप्रमाणे अ नुसार पुस्तके यात श्री साईबाबा १०८ नामावली (झरिन) दुसरी आवृत्ती इंग्रजी या पुस्तकाचे विक्रीस अपेक्षित प्रतिसाद मिळत नसल्याने सदरचे पुस्तक न छापता श्री साईसतचरित्र, कन्नड १२ वी आवृत्ती व चिल्ड्रेन्स् श्री साईबाबा-हिन्दी द्वितीय आवृत्ती छपाईकामी मे. अजय ऑफसेट प्रा.लि., पुणे व ब नुसार फोटो छपाईकामी ब्ल्यु बर्ड (इंडिया) प्रा.लि., पुणे यांचे वरील तक्त्यातील अधोरेखित केलेले निम्नतम दर असल्याने त्यांना छपाई कामाचे आदेश देण्यात आलेले असून,त्यास कार्योत्तर मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही-प्रकाशने प्रमुख)

**विषय नं.१३ ऑन लाईन देणगी स्विकारणेसाठी HDFC बँकेचा पेमेंट गेटवे घेणेबाबत.**

**निर्णय क्र.४२६** सध्याच्या आधुनिक युगामध्ये श्री साईभक्तांना ऑन लाईन देणगी व ई-शॉपींग इ. सुविधा उपलब्ध करण्याच्या हेतूने संस्थानच्या अधिकृत वेबसाईटवर ICICI बँकेचा पेमेंट गेटवे घेऊन ही सुविधा सुरु

करावी असे मा. व्यवस्थापन समितीच्या ३१ मार्च २००७ रोजी झालेल्या सभेतील निर्णय क्र. २६० प्रमाणे ठरलेले आहे. सदर प्रस्ताव मान्यतेसाठी शासनाकडे पाठविण्यात आला आहे.

संस्थानला ऑन लाईन देणगी सुविधा उपलब्ध करण्यासाठी HDFC बँकेने त्यांच्या दिनांक ३ व १० मार्च २००८ च्या पत्राप्रमाणे प्रस्ताव सादर केला आहे. सदर प्रस्ताव ICICI बँकेपेक्षा किफायतशीर असल्याचे पुढीलप्रमाणे दिसून येते.

०१) ICICI बँकेच्या पेमेंट गेटवेसाठी मा. व्यवस्थापन समितीपुढे चर्चा करुन ठरलेले दर पुढीलप्रमाणे- Set Up Fee : रुपये २५,०००/-, Master/Visa Card व Netbanking Service Charge १.७०% + कर वेगळे

०२) HDFC बँकेने दिलेल्या प्रस्तावाप्रमाणे त्यांचे दर पुढीलप्रमाणे आहेत.

Set Up Fee : नाही, Master/Visa Card १.६०% + कर वेगळे, Netbanking - मोफत

उपरोक्त नमूद केल्याप्रमाणे तुलनात्मक विचार करता ICICI बँकेपेक्षा HDFC बँकेचा प्रस्ताव आर्थिकदृष्ट्या व सेवा देण्याच्यादृष्टीने आकर्षक असल्याने सदर प्रस्तावास मान्यता मिळावी. HDFC बँक जमा झालेली संपूर्ण देणगी रक्कम त्याच दिवशी संस्थानच्या राष्ट्रीयकृत बॅकेंतील बचत खात्यावर जमा करुन त्याचे साप्ताहिक तक्ते संस्थानला पाठविणार आहेत. HDFC बँकेत संस्थानचे खाते ठेवावयाचे नसून जमा रक्कम त्वरीत राष्ट्रीयकृत बॅकेत वर्ग होत असल्याने श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी) (सुधारणा अधिनियम) २००४ मधील कलम २०(३) च्या तरतुदीशी सदर बाब विसंगत ठरत नसल्याने या प्रस्तावास शासनाची मान्यता घेण्याची आवश्यकता भासत नाही. शिवाय आजअखेर कोणत्याही राष्ट्रीयकृत बँकेकडे स्वतःचा पेमेंट गेटवे उपलब्ध नसल्याने या बँकाचा पेमेंट गेटवे वापरण्याशिवाय पर्याय नाही. सिध्दीविनायक मंदिरासाठी HDFC बँकेचा पेमेंट गेटवे चालू आहे.

**वर नमूद केल्याप्रमाणे HDFC बँकेचा पेमेंट गेटवेसाठी आलेला प्रस्ताव प्रथमतः तीन वर्षासाठी स्विकारुन त्याप्रमाणे त्याच्याशी करारनामा व इतर आवश्यक त्या कागदपत्रांची पूर्तता करणेस मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही-मुख्य लेखाधिकारी )

**विषय नं.१४ श्रीसाईबाबा संस्थान मार्फत शनिशिंगणापूर -श्रीरामपूर -पिंपळवाडी ते शिर्डी रस्त्याची सुधारणा करणेकरीता निधी उपलब्ध करुन देणे बाबत.**

**निर्णय क्र.४२७** शनि- शिंगणापूर - श्रीरामपूर- पिंपळवाडी ते शिर्डी रस्त्याची सुधारणा करण्याकरीता जागतिक बँक प्रकल्प (सा. बा.) विभाग, अहमदनगर यांना श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी तर्फे रु. ५.४३ कोटी रुपयांचे अनुदान देणे बाबत मा. व्यवस्थापन समितीचे दि. ०८ मे, २००५ निर्णय क्र. २१९ अन्वये मान्यता देण्यात आली आहे. तसेच शासन निर्णय क्र. सासंवि- २००५/६०६/(११८)- का.१६, दि. २८ जून, २००६ नुसार सदरचा निधी कार्यकारी अभियंता, जागतिक बँक प्रकल्प (सा. बा.) विभाग, अहमदनगर यांचेकडे खालील तपशिलानुसार निधी वर्ग करण्यात आला आहे.

| | | |
|---|---|---|
| ०१. | इकडील दिनांक २८ नोव्हेंबर, २००६ चे टिपणी अन्वये : | रु. १,६२,९०,०००.०० |
| ०२. | इकडील दिनांक ०८ फेब्रुवारी, २००७ चे टिपणी अन्वये : | रु. २,१७,२०,०००.०० |
| ०३. | इकडील दिनांक ३१ ऑगस्ट, २००७ चे टिपणी अन्वये : | रु. १,६२,९०,०००.०० |
| | **एकुण रक्कम रुपये :-** | **५,४३,००,०००.००** |

वरिल प्रमाणे रु. ५.४३ कोटी इतका निधी कार्यकारी अभियंता, जागतिक बँक प्रकल्प (सा. बा.) विभाग, अहमदनगर यांना उपलब्ध करुन देण्यात आला आहे. कार्यकारी अभियंता, जागतिक बँक प्रकल्प (सा. बा.) विभाग, अहमदनगर यांनी सुधारीत एकुण रु. १०.०० कोटी निधी उपलब्ध करुन देणे बाबत कळविले होते. त्यानुसार सुधारीत प्रस्ताव मा. व्यवस्थापन समितीचे दि. ०४ मार्च, २००६ रोजीचे सभेत सादर केला होता. यावर सविस्तर चर्चा होऊन, सदरचा प्रस्ताव मा. विधी व न्याय विभाग, मुंबई यांचेकडे फेर सादर करण्यात यावा असे ठरले होते. त्यानुसार इकडील जा. नं. ३४३९/२००६ दि. १० मार्च, २००६ अन्वये फेर प्रस्ताव मा. विधी व न्याय विभाग, मुंबई यांचेकडे सादर करणेत आलेला आहे. त्यास अद्याप मान्यता प्राप्त झालेली नाही.

त्यास अनुसरुण कार्यकारी अभियंता, जागतिक बँक प्रकल्प (सा. बा.) विभाग, अहमदनगर यांनी दि. १७ मार्च, २००८ चे पत्रान्वये उर्वरीत निधी लवकरात लवकर उपलब्ध करुन द्यावा. व रु. १०.०० कोटीच्या निधीमधून पिंपळगांव ते मालूंजे या भागातील रस्ता सुधारण्याच्या कामाचे अंदाजपत्रक सन २००६-२००७ दरसूची नुसार मंजूर करुन निवीदा प्रक्रीया पुर्ण करण्यात आली असून त्यानुसार रु. ८,७२,८१,५०६/- किमतीच्या निवीदेस २८.६०% जादा दराने म्हणजेच चालू (२००७-०८) दरसूचीनुसार ०.१०४% कमी दराने मान्य करण्यात आली आहे. या निवीदा प्रक्रीया कालावधीमध्ये झालेल्या दरवाढीमुळे सदर कामाची कीमंत रु. ३.२४५ कोटी इतकी वाढलेली आहे. सदरचे वाढलेली रक्क्म रु. ३.२४५ कोटी निधी उपलब्ध करुन देणेबाबत विनंती केली आहे. त्याचा तपशिल खालील प्रमाणे आहे.

| | | | |
|---|---|---|---|
| ०१. | अंदाजपत्रकिय किंमत | : | रु. १०.०० कोटी |
| ०२. | मुळ निवीदा रक्कम | : | रु. ८,७२,८१,५०६/- |
| ०३. | मंजूर निवीदा (२८.६०% जादा दराने) | : | रु. ११,२२,४४,०१७/- |
| | अधिक अंदाज पत्रक व सर्वेक्षण ५% | : | रु. ५६,१२,२०१/- |
| | अधिक ऑडीट फी ०.५०% | : | रु. ५,६१,२२०/- |
| | अधिक भाववाढ व इतर १२.५०% | : | रु. १,४०,३०,५०२/- |
| | एकुण | : | रु. १३,२४,४७,९४०/- |
| | म्हणजेच | : | रु. १३,२४,५०,०००/- |

कार्यकारी अभियंता, जागतिक बँक प्रकल्प (सा.बा.) विभाग, अहमदनगर यांनी यापूर्वी मंजूर केलेल्या १०.०० कोटी मंजूर रकमे व्यतिरीक्त चालू दरसूची नुसार जादा रु. ३.२४५ कोटी इतका निधी उपलब्ध करुन देणेबाबतही विनंती केली आहे.त्यानुसार श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था शिर्डी अधिनियम, २००४ मधील कलम १७ (ण) व कलम २१ (२) चे तरतुदीस अनुसरुन शासनाचे मान्यतेसाठी सुधारित फेर प्रस्ताव सादर करावा लागेल असा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

**यावर सविस्तर चर्चा होऊन, रुपये १० कोटी मात्रचा निधी देणेबाबत यापूर्वी मा.व्यवस्थापन समितीने मान्यता दिलेली आहे. त्यापैकी शासनाच्या मान्यतेनुसार रुपये ५.४३ कोटीचा निधी मात्र कार्यकारी अभियंता सार्वजनिक बांधकाम विभाग (जागतीक बँक) यांचेकडेस वर्ग करणेत आलेला आहे. उर्वरित निधि देणेकामी शासनाच्या मान्यतेसाठी प्रस्ताव सादर करणेत आलेला आहे. प्रस्तावास मान्यता मिळालेनंतर सदरचा निधी सार्वजनिक बांधकाम विभागाकडे वर्ग करणेत यावा. तसेच रुपये १० कोटी पेक्षा जास्त रकमेचा निधी मिळणेबाबतची सार्वजनिक बांधकाम विभागाची विनंती अमान्य करणे यावी, असें ठरलें.**

(कार्यवाही-बांधकाम विभागप्रमुख)

**विषय नं.१५** **मौजे निमगांव कोऱ्हाळे येथील गट नंबर १८३ मध्ये बहूउद्देशिय हॉल बांधणेकामी आर्किटेक्ट नेमणूकीबाबत.**

**निर्णय क्र.४२८** **(अ)** मा.अध्यक्षसो. यांचे निर्देशानुसार, नामवंत आर्किटेक्ट हाफीज् कॉन्ट्रॅक्टर, मुंबई यांचे वरिष्ठ सहकारी श्री. सुरेश बाबु, श्री.जयंत केणी व इतर यांनी संस्थान अधिकाऱ्यांसह दिनांक ०४ ऑगष्ट, २००७ रोजी समाधी मंदिर परिसरासह संस्थान परिसराची तसेच शिर्डी व निमगांव कोऱ्हाळे येथील संस्थान मालकीच्या जमिनींची विकासात्मक कामांच्या दृष्टीने पहाणी केली होती. त्यावेळेस मौजे निमगांव कोऱ्हाळे शिवारातील संस्थान मालकीच्या जमिनींची / जागांची पहाणी करत असतांना, गट नंबर १८३ मधील जागेमध्ये संस्थानमार्फत साईभक्तांच्या सेवा-सुविधेसाठी तसेच स्थानिक रहिवासी-नागरिकांच्या दृष्टीने बहुउद्देशीय हॉल बांधणे योग्य व उचित राहील असे मत संबंधित प्रतिनिधींनी व्यक्त केले.

त्यास अनुसरुन, मा.व्यवस्थापन समितीचे दिनांक १० जानेवारी, २००८ रोजीचे सभेत निर्णय क्रमांक ५० अन्वये खालीलप्रमाणे निर्णय घेणेत आलेला आहे :

".. .. या बहुउद्देशीय हॉलचे सविस्तर बांधकाम आराखडे व अंदाजपत्रक हाफीज कॉन्ट्रॅक्टर, मुंबई यांचेकडून तयार करुन घेता येतील. दरम्यान आर्किटेक्ट फी बाबतचे पत्र ही उपलब्ध करवून घेण्यात येत आहे. तरी याकामी आर्किटेक्ट म्हणून हाफीज् कॉन्ट्रॅक्टर, मुंबई यांची नेमणूक करणेस व गट नंबर १८३ मध्ये बहुउद्देशीय हॉल उभारणेस मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

यावर सविस्तर चर्चा होऊन,मौजे निमगाव कोऱ्हाळे गट नं.१८३ मध्ये अद्यायावत असा बहुउद्देशीय हॉल उभारणेस मान्यता देणेत आली. याकामी आर्किटेक्ट मे.हाफीज कॉन्ट्रॅक्टर,मुंबई यांचे कडून बांधकाम आराखडा व सविस्तर अंदाजपत्रक तयार करुन घेण्यात यावे. मे हाफीज कॉन्ट्रॅक्टर,मुंबई यांची आर्किटेक्ट म्हणून नेमणूक करण्यात यावी. आर्किटेक्ट फी बाबत त्यांचेकडून प्रस्ताव घेण्यात यावा,असें ठरलें."

**(ब)** मा.व्यवस्थापन समितीच्या निर्णयानुसार श्री.जयंत केणी, मुंबई (सिध्दीविनायक असोसिएटस्, कळवा, जिल्हा ठाणे ) यांचेशी संपर्क साधला असता त्यांनी त्यांचेकडील दिनांक २१ मार्च, २००८ रोजीचे पत्रान्वये इकडील कार्यालयास खालीलप्रमाणे कळविले आहे :

चआम्ही आर्किटेक्ट हाफीज कॉन्ट्रॅक्टर यांचेशी संलग्न असून, त्यांचेसमवेत काम करीत आहोत. सदरहू प्रकल्पासाठी आवश्यक असणारे प्रेझेंटेशन आम्ही तयार केलेले आहे.

सदरहू प्रकल्पाचे प्रेझेंटेशन दाखविणेकरीता आम्हांस आपल्या कार्यालयामार्फत अधिकृत पत्र देण्यांत यावे.

सदरहू पत्राची एक प्रत त्यांनी मा.अध्यक्षसो. यांनाही अग्रेषित केलेली आहे.

**(क)** थोडक्यात **उपरोक्त परिच्छेदात नमुद केल्याप्रमाणे, श्री. जयंत केणी, मुंबई यांनी बहुउद्देशीय हॉल प्रकल्पासाठी आर्किटेक्ट म्हणून नेमणूक करण्यात यावी, असे सुचविलेले आहे. त्यास अनुसरुन, मौजे निमगांव कोऱ्हाळे शिवारातील गट नंबर १८३ मध्ये बांधावयाचे बहुउद्देशीय हॉलचे प्रेझेंटेशन देणेसाठी आमंत्रित करणेस आणि सदरहू प्रकल्पाचे सविस्तर बांधकाम आराखडे व अंदाजपत्रक श्री.जयंत केणी, मुंबई यांच्या सिध्दीविनायक असोसिएटस्, कळवा, जिल्हा ठाणे या संस्थेकडून करुन घेणेस मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही-बांधकाम विभागप्रमुख)

**विषय नं.१६ खाजगी व्यक्ती /संस्थेस हेलिपॅड वापरास सशुल्क परवानगी देणे बाबत.**

**निर्णय क्र.४२९ (अ)** श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डीने मौजे निमगांव कोऱ्हाळे हद्दीतील गट नंबर १९५ मधील मालकीच्या जागेत कायमस्वरुपी हेलिपॅड विकसित केलेले आहे. साईभक्तांना शिर्डी येथे हवाईसेवा उपलब्ध व्हावी म्हणून हेलिकॉप्टर सेवा करणेसाठी जगसन् एअरलाईन्स प्रा. लि., नवि दिल्ली यांचेशी करारनामा करणेत आलेला आहे. सदरहू करारनाम्यानुसार जगसन् एअरलाईन्स, नवि दिल्ली यांना संस्थानने विकसित केलेला हेलिपॅड वापरणेस परवानगी देण्यात आलेली आहे. त्यानुसार जगसन् एअरलाईन्स या कंपनीने मुंबई - शिर्डी अशी हेलिकॉप्टर सेवा सुरु केलेली होती. तथापि गेल्या दोन-तीन महिन्यांपासून सदरहू हवाईसेवा हेलिकॉप्टरमधील तांत्रिक बिघाडामुळे बंद आहे.

दरम्यानचे कालावधीत एकेके एन्टरमेंन्ट लि., बेंगलोर, रेमंड लिमिटेड, मुंबई आदि खाजगी मालकीच्या संस्थामार्फत संस्थान मालकीचे हेलिपॅड वापरु देणेबाबत एक-दोन वेळेस विनंती अर्ज आलेले होते. सदरहू विनंती अर्जाप्रमाणे त्यांना हेलिपॅड वापरणेबाबत प्रशासकीय पातळीवर निर्णय घेऊन विनाशुल्क परवानगी देण्यात आलेली आहे.

**(ब)**उपरोक्तप्रमाणे भविष्यात देखील देश-विदेशातील खाजगी व्यक्ती / संस्था या संस्थानचे हेलिपॅड वापरु देणेबाबत वेळोवेळी विनंती अर्ज करण्याची शक्यता आहे. त्यामुळे येथूनपुढे संस्थानचे हेलिपॅडचा वापर करु इच्छिणाऱ्या खाजगी व्यक्ती / संस्थांना हेलिपॅड वापरु द्यावे किंवा कसे, तसेच हेलिपॅड वापराबाबत शुल्क आकारण्यांत यावे किंवा कसे, शुल्क आकारावयाचे झाल्यास किती आकारणेत यावे याबाबत धोरणात्मक निर्णय होणेकामी तसेच हेलिपॅड सरकारी / निमसरकारी / खाजगी व्यक्ती किंवा संस्था / सार्वजनिक संस्था यांना वापरु देणेबाबतचे कामकाज जनसंपर्क कार्यालय, प्रशासन शाखा यांचेमार्फत करणेस मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

**यावर सविस्तर चर्चा होऊन, संस्थान मालकीच्या हेलीपॅडचा वापर खाजगी संस्था/व्यक्ती/ सार्वजनिक संस्था यांना उपलब्धतेनुसार सशुल्क करुन देणेत यावा. एका दिवसातील एका उड्डाणासाठी/ लॅण्डींगसाठी रक्कम रुपये २,०००/- मात्र इतका दर आकारण्यात यावा. सरकारी/निमसरकारी हेलिकॉप्टरच्या उड्डाणासाठी/लॅण्डींगसाठी शुल्क आकारणेबाबत परिस्थितीनुरुप निर्णय मा.कार्यकारी अधिकारी यांनी घ्यावा. तसेच यासाठीची नियमावली मा.कार्यकारी अधिकारी यांनी तयार करावी. हेलीपॅड वापरु देणेबाबतचे कामकाज जनसंपर्क कार्यालय, प्रशासन शाखा यांचेमार्फत करण्यात यावे असे ठरले.**

(कार्यवाही-बांधकाम विभागप्रमुख/जनसंपर्क अधिकारी)

**विषय नं.१७ शिर्डी व शिर्डी परिसरातील गांवाच्या क्षेत्राचा संयुक्तीक विकास आराखडा तयार करणेबाबत.**

**निर्णय क्र.४३०** श्री क्षेत्र शिर्डी येथे महान संत श्री साईबाबांचे दर्शन घेणेसाठी देश-विदेशातून हजारो साईभक्त दररोज येत असतात. साईभक्तांना मुलभूत विविध सेवा-सुविधा विश्वस्तव्यवस्थेमार्फत उपलब्ध करुन देण्यात येत आहेत. यासाठी विविध विकास प्रकल्प संस्थानमार्फत राबविणेत येत आहे. याशिवाय साईभक्तांच्या निवास व्यवस्थेबरोबरच वाहतुकीच्या दृष्टीने वाहन तळ विकसित करणे, मनोरंजनात्मक बाग-बगिचे उभारणे, श्री क्षेत्र शिर्डीचा तीर्थस्थळाबरोबरच पर्यटन स्थळ म्हणून विकास करणे यासाठी मोठया प्रमाणावर जमिनींची आवश्यकता आहे.

शिर्डी शहराचा विकास आराखडा सन १९९२ मध्ये तयार करण्यात येऊन, तो दिनांक २३ फेब्रुवारी, ११९३ पासून अंमलात आणणेत आलेला आहे. या शिर्डी शहर विकास आराखडयात दर्शविण्यांत आलेली बरीचशी आरक्षणे ही शिर्डी नगरपंचायत, शिर्डी यांचेसाठी राखीव ठेवण्यांत आलेली आहे, त्यामानाने श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डीच्या विकास प्रकल्पांसाठी अत्यंत कमी प्रमाणात आरक्षणे राखीव ठेवण्यांत आलेली आहेत. संस्थानसाठी राखीव ठेवण्यात आलेल्या आरक्षणांमध्ये रुग्णालय, विविध उपक्रमासाठी जागा इत्यादी आरक्षित जमिनींचा समावेश आहे, तर नगरपंचायतीसाठी राखीव ठेवण्यात आलेल्या आरक्षणांमध्ये वाहनतळे, बाग-बगिचे, खेळाची मैदाने, शैक्षणिक संकुल इत्यादी महत्वाच्या उपक्रमासाठी आरक्षित जमिनींचा समावेश आहे.

श्री क्षेत्र शिर्डी येथे श्री साईंचे दर्शनासाठी येणाऱ्या साईभक्तांच्या गर्दीत दिवसेंदिवस वाढ होतच आहे. या वाढत्या भक्तांच्या गर्दीचे नियोजनासाठी, त्यांना अन्न, निवारा, वैद्यकिय सेवा या मुलभूत सोयी-सुविधा विनासायास व विनाविलंब उपलब्ध व्हाव्यात म्हणून संस्थान व्यवस्थापनामार्फत आटोकाट प्रयत्न करण्यात येत आहेत. तथापि शिर्डी शहर व परिसरात जमिनी उपलब्ध होत नसल्याने या कार्यात मोठया प्रमाणात अडचणी येत आहेत. याबाबत मा.व्यवस्थापन समितीच्या विविध निर्णयांन्वये शिर्डी शहरातील आरक्षणे विकसित करणेकामी या आरक्षणांची विकसन संस्था म्हणून श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी असा बदल करणेबाबत शिर्डी नगरपंचायत, शिर्डी यांना वेळोवेळी कळविण्यांत आलेले आहे. तथापि अद्यापपर्यन्त त्यांचाकडून याबाबत मोठया प्रमाणावर सकारात्मक प्रतिसाद मिळालेला नाही अथवा त्याबाबत काय कार्यवाही सुरु आहे याबाबतची माहिती उपलब्ध करुन देण्यात आलेली नाही.

या सर्व बाबींचा विचार करता, शिर्डी शहरासह शिर्डीपासून ०५ किलोमीटर परिसरातील गांवाचा (उदा. निमगांव कोऱ्हाळे, निघोज, साकुरी, कनकुरी, पिंपळवाडी, रुई आदि गांवाचा) सुधारीत विकास आराखडा तयार होणे अत्यंत गरजेचे आहे. जेणेकरुन संस्थानला भविष्यात साईभक्तांच्या सोयी-सुविधेसाठी मोठया प्रमाणावर विकास प्रकल्प राबविणेसाठी विनासायास जमीन उपलब्ध होऊ शकेल. अशा प्रकारचा सुधारीत विकास प्रारुप आराखडा तयार करणेसाठी, त्याचा शासन स्तरावर पाठपुरावा करणेसाठी नगररचना या खात्यांशी संबंधित असणाऱ्या व्यक्तींकडून याबाबत मार्गदर्शनपर सेवा मानधन तत्वावर उपलब्ध करुन घेण्यात यावी, असे मत आहे.

सदरहू कामाबाबत मा.अध्यक्षसाो. यांनी श्री. पाथरकर, सेवानिवृत्त संचालक, नगररचना यांचेशी चर्चा केलेली असून, श्री. पाथरकर हे अशा प्रकारचा नियोजित / सुधारीत विकास प्रारुप आराखडा शिर्डी व शिर्डी परिसराच्या सखोल अभ्यासाअंती तयार करुन देणेस तयार आहे.

तरी उपरोक्तप्रमाणे श्री.पाथरकर, सेवानिवृत्त संचालक, नगररचना यांची नियोजित / सुधारीत विकास प्रारुप आराखडा बनविणे, तो शासनास सादर करणे, त्याचे मान्यतेसाठी शासन स्तरावर पाठपुरावा करणे यासाठी मानधनतत्वावर नेमणूक करणेस मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

**यावर सविस्तर चर्चा होऊन,शिर्डी व शिर्डी परिसरातील २० कि.मी. पर्यन्तचे क्षेत्राचा विकास आराखडा तयार करुन व त्याकामी श्री.रामानंद तिवारी, सेवानिवृत्त सचिव, महाराष्ट्र शासन व श्री.पाथरकर, सेवानिवृत्त संचालक, नगर रचना यांची मानधन तत्वावर नेमणूक करण्यात यावी. याकामी मा.अध्यक्ष महोदय यांनी संबंधितांशी चर्चा करुन कामाची रुपरेषा,मानधन आदि बाबींची निश्चिती करावी, असे ठरले.** (कार्यवाही-बांधकाम विभागप्रमुख)

**विषय नं.१८** **श्री मधुकर जनार्दन भुजबळ व सौ अनुराज्ञा मधुकर भूजबळ यांची मौजे शिर्डी येथील स. न. १९/१ क्षेत्र ०१ हे ८९ आर (पोटखराब्यासह) व सर्व्हे नंबर १९/२ क्षेत्र ०१ हे ८८ आर खरेदीबाबत.**

**निर्णय क्र.४३१** **(अ)** श्री.मधुकर जनार्दन भुजबळ व सौ. अनुराज्ञा मधुकर भुजबळ यांनी त्यांचे मालकीच्या मौजे शिर्डी, तालुका राहाता येथील खाली नमुद केलेल्या जमिनी संस्थानने खरेदी कराव्यात म्हणून दिनांक ०२ एप्रिल, २००८ रोजीचे विनंती अर्जान्वये प्रस्ताव दिलेला आहे. त्याचा थोडक्यात तपशील :

| अ.नं. | खातेदाराचे नांव | सर्व्हे नंबर | क्षेत्र | आकार रुपये=पैसे | पीकपहाणी व इतर हक्कांतील नोंदी |
|---|---|---|---|---|---|
| ०१ | सौ.अनुराज्ञा मधुकर भुजबळ | १९/१ | ०१ हे ८८आर<br>०० हे ०१ आर पोख<br>**०१ हे ८९ आर** | ९=१५ | वसंतदादा शेतकरी सहकारी बँक लि. विशेष वसुली अधिकारी, वसंतदादा सह.बँक लि.सांगली जप्तीचा हुकूमनामा मिळविला. वसंतदादा शेतकरी सह. बँक लि. सांगली रु.३,९५,००,०००/- चे गहाणखत करुन घेतले. |
| ०२ | श्री. मधुकर जनार्दन भुजबळ | १९/२ | **०१ हे ८९ आर** | ९=२५ | वसंतदादा शेतकरी सहकारी बँक लि. विशेष वसुली अधिकारी, वसंतदादा सह.बँक लि.सांगली जप्तीचा हुकूमनामा मिळविला. वसंतदादा शेतकरी सह. बँक लि. सांगली रु.३,९५,००,०००/- चे गहाणखत करुन घेतले. |
| | | **एकूण** | **०३ हे ७८ आर** | | |

वर नमुद केलेल्या दोन्ही जमिनींवर वसंतदादा शेतकरी सहकारी बँक लि., सांगली यांचा दिनांक ०१ एप्रिल, २००८ रोजीचे पत्रानुसार रक्कम रुपये ४,४०,००,०००/- मात्रचा बोजा असून, सदरहू जमिनी जप्त करणेत आलेल्या आहेत, असा उल्लेख सदरहू जमिनींचे ७/१२ चे उताऱ्यात नमूद केलेला आहे.

**(ब)** उपरोक्त अर्जदारांनी / खातेदारांनी वर नमूद केलेल्या जमिनी संस्थान खरेदी कराव्यात म्हणून यापुर्वी दिनांक १३ जुलै, २००६ रोजी विनंती अर्ज दिलेला होता. त्यावर त्यांना दिनांक २१ सप्टेंबर, २००६ रोजीचे इकडील पत्राने, संस्थान वकिलांच्या अभिप्रायानुसार असे कळविणेत आले होते की, च सदर जमिनीवर असणारा कर्जाचा बोजा भागवावा. कर्जाचा बोजा भागविल्या गेल्यानंतर सदरची जमीन खरेदीकामी विचार करणे व त्यापुढील कार्यवाही करणे सुकर होईल. छ

तथापि, दिनांक ०२ एप्रिल, २००८ रोजी उपरोक्त खातेदारांनी दिलेल्या अर्जासोबत जोडलेल्या ७/१२चे उताऱ्याचे अवलोकन करता, सदरहू कर्जाचा बोजा भागविला गेल्याचे दिसून येत नाही.

**(क)** अर्जदार यांनी, सदरहू जमिनी रहिवास विभागात समाविष्ट असलेबाबत मा.मुख्याधिकारी, शिर्डी नगरपंचायत, शिर्डी यांचेकडील पत्र क्रमांक नपं/बांध/कावि-५/१७९६/२००८, दिनांक २८ फेब्रुवारी, २००८ रोजीचे प्रमाणपत्राची छायांकित प्रत अर्जासोबत जोडलेली आहे.

मा. मुख्याधिकारी, शिर्डी नगरपंचायत, शिर्डी यांचे दिनांक २८ फेब्रुवारी, २००८ रोजीचे प्रमाणपत्राचे अवलोकन केल्यावर, सर्व्हे नंबर १९ चे क्षेत्रात २४ मीटर रुंदीचा पुर्व-पश्चिम रस्ता व चारीलगत भाग नकाशानुसार १५ मीटर रुंदीचा रस्ता दाखविलेला आहे व सदरची जागा पुढे भूसंपादीत होणार आहे. सदरहू क्षेत्र रहिवास विभागात समाविष्ट असलेबाबत आणि २४ मीटर व १५ मीटर रुंदीच्या रस्त्यासाठी भूसंपादन प्रस्ताव मा.जिल्हाधिकारी, अहमदनगर यांचेकडेस सादर करणेत आलेला आहे किंवा कसे याबाबत मा.मुख्याधिकारी, शिर्डी नगरपंचायत, शिर्डी यांचेकडून माहिती मागविणेत येत आहे.

**(ड)** अर्जदार यांनी अर्जासोबत, मोजणी रजिष्टर नंबर ६६५/०७ व ६६६/०७ या सरकारी मोजणी नकाशाची छायांकित प्रत जोडलेली आहे. सदरहू जमिनीचे ७/१२ च्या उताऱ्यातील क्षेत्र व सरकारी मोजणी नकाशामध्ये दाखविलेले क्षेत्र यामध्ये खालीलप्रमाणे तफावत दिसून येत आहे :

| **अ.नं.** | **खातेदाराचे नांव** | **सर्व्हे नंबर** | **७/१२ प्रमाणे क्षेत्र** | **मोजणीप्रमाणे क्षेत्र** | **फरक** |
|---|---|---|---|---|---|
| ०१ | सौ.अनुराज्ञा मधुकर भुजबळ | १९/१ | ०१ हे ८९ आर | ०१ हे ७९ आर | १० आर क्षेत्र कमी |
| ०२ | श्री.मधुकर जनार्दन भुजबळ | १९/२ | ०१ हे ८९ आर | ०१ हे ७९ आर | १० आर क्षेत्र कमी |
| | | **एकूण** | **०३ हे ७८ आर** | **०३ हे ५८ आर** | **२० आर क्षेत्र कमी** |

सदरची मोजणी सरकारी असल्याने, संबंधित खातेदारांना प्रत्येकी फक्त ०१ हे ७९ आर क्षेत्राची रक्कम देऊन, खरेदीखत मात्र संपूर्ण क्षेत्राचे म्हणजेच प्रत्येकी ०१ हे ८९ आर चे करणे उचित होईल. तसेच जमीन खरेदी करावयाची झाल्यास, नेहमीचे विहीत पध्दतीने १० टक्के रक्कम राखीव ठेवून, संस्थानमार्फत पुन्हा सरकारी मोजणी झालेनंतर व क्षेत्राची खात्री झालेनंतर राखून ठेवलेली रक्कम आदा करता येईल. याबाबत संबंधित खातेदारांशी चर्चेअंती निर्णय घेता येईल.

**(इ)** सदरहू जमिनींवर, वसंतदादा शेतकरी सहकारी बँक लि., सांगली यांचे कर्ज आहे. संबंधित बँकेने त्यांचेकडील दिनांक ०१ एप्रिल, २००८ रोजीचे पत्रानुसार, सदर मिळकतीवर असलेले रक्कम रुपये ४,४०,००,०००/- मात्रचे कर्ज भरलेनंतर कर्जाचा बोजा बेबाक करणेस आणि खरेदी व्यवहारातून सदरहू रक्कम बँकेस आदा केल्यास कर्जबोजा बेबाक करणेसाठी रिलीज डीड करुन देणेस तयार असलेबाबत कळविले आहे.

**(ई)** सदरहू जमीन रहिवास क्षेत्रात समाविष्ट असल्याने, संस्थानमार्फत साईभक्तांकरीता राबविण्यांत येणाऱ्या विविध विकास प्रकल्पांसाठी / संस्थानचे शैक्षणिक संकुलाकरीता ही जमीन उपयुक्त ठरणार आहे. सदर जमिनींकडे जाणेसाठी चारीचा रस्ता आहे.

**(फ)** श्री. मधुकर जनार्दन भुजबळ व सौ. अनुराज्ञा मधुकर भुजबळ यांची मौजे शिर्डी येथील जमीन अनुक्रमे सर्व्हे नंबर १९/२ व सर्व्हे नंबर १९/१ या जमिनींचा दर सन २००८ च्या मुल्यांकन तक्त्यात (रेडिरेकनरमध्ये) पान क्रमांक १० वर विभाग क्रमांक १/५१ मध्ये खुली जागा या रकान्यात प्रती चौरस मीटर रुपये ३०००/- मात्र दर्शविलेला आहे.

| **अ.नं.** | **खातेदाराचे नांव** | **सर्व्हे नंबर** | **७/१२ प्रमाणे क्षेत्र** | **सन २००८ च्या मुल्यांकन तक्त्यानुसार येणारी किंमत रुपये** |
|---|---|---|---|---|
| ०१ | सौ.अनुराज्ञा मधुकर भुजबळ | १९/१ | ०१ हे ८९ आर | ५,६७,००,०००/- |
| ०२ | श्री.मधुकर जनार्दन भुजबळ | १९/२ | ०१ हे ८९ आर | ५,६७,००,०००/- |
| | | | | **टिप :** सदरहू किंमत रुपये ३,००,०००/- प्रति आर या दराने संपूर्ण क्षेत्र गृहीत धरुन काढणेत आलेली आहे. |

उपरोक्त तक्त्यात नमूद केल्यानुसार, संबंधित खातेदारांना खरेदीखताचे वेळेस प्रत्यक्ष ताब्यात मिळणारे क्षेत्राचे किंमतीतून १० टक्के रक्कम राखीव ठेवून उर्वरित रक्कम आदा करणेत येईल. राखीव ठेवलेली रक्कम संस्थानमार्फत सरकारी मोजणी झालेनंतर, ताब्यात मिळणारे क्षेत्रानुसार संबंधित खातेदारांना आदा करण्यात येईल.

अर्जदार यांनी त्यांचे दिनांक ०२ एप्रिल, २००८ रोजीचे अर्जात, सदरहू जमिनीस रुपये ५,००,०००/- मात्र प्रति गुंठा / प्रति आर किंमत अपेक्षित आहे, असे नमूद केलेले आहे.

**(ग)** उपरोक्त परिच्छेदांमध्ये विवेचन केलेनुसार, खालील बाबींवर निर्णय होणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

०१) श्री. मधुकर जनार्दन भुजबळ व सौ. अनुराज्ञा मधुकर भुजबळ यांची मौजे शिर्डी मधील अनुक्रमे सर्व्हे नंबर १९/२ क्षेत्र ०१ हे ८९ आर व सर्व्हे नंबर १९/१ क्षेत्र ०१ हेक्टर ८९ आर (पोटखराब्यासह) ही जमीन खरेदी करणे अथवा न करणे.

०२)जमीन खरेदी करावयाचा निर्णय झाल्यास, जमिनीचे किंमतीबाबत जमीनमालकांशी चर्चा तथा वाटाघाटी करुन जमिनीची किंमत ठरविणे.

०३) जमीन खरेदी करावयाचा निर्णय झाल्यास, विहित पध्दतीने कायदेशीर बाबींची पूर्तता करुन खरेदीखतासाठी येणाऱ्या योग्य त्या सर्वसमावेशक अनुषंगिक खर्चास मान्यता देणे.

**यावर सविस्तर चर्चा होऊन,सदरहू जमिनींबाबत कायदेशीर बाबींची पडताळणी करुन जमिन खरेदीची कार्यवाही सुरु करावी. सदरहू जमिन रुपये ३ लाख प्रती आर या रेडिरेकनरचे दरानुसार खरेदी करणेत यावी. खरेदीखत करताना प्रत्यक्ष ताब्यात मिळणारे क्षेत्राच्या १०% रक्कम राखुन ठेवण्यात यावी. ही राखुन ठेवण्यात आलेली रक्कम सरकारी मोजणी झालेनंतर आदा करणे यावी. सदरहू जमीन खरेदीसाठी विहित पद्धतीने कायदेशीर बाबींची पूर्तता करुन खरेदीखतासाठी येणाऱ्या योग्य त्या सर्वसमावेशक अनुषंगिक खर्चास मान्यता देण्यात यावी,असें ठरलें.** (कार्यवाही-बांधकाम विभागप्रमुख)

**विषय नं.१९** **श्री.रावसाहेब गंगाराम पवार यांची मौजे कनकुरी येथील गट नं.१२८ येथील क्षेत्र ० हेक्टर ५६।। आर जमीन खरेदीबाबत.**

**निर्णय क्र.४३२** **(अ)**श्री.रावसाहेब गंगाराम पवार, राहणार कनकुरी यांनी दिनांक २४ जानेवारी, २००८ रोजीचे अर्जान्वये त्यांच्या मौजे कनकुरी, तालुका राहाता येथील गट नंबर १२८ मधील मालकीच्या जमिनीपैकी ५५ आर जमीन संस्थानने रक्कम रुपये १,५०,०००/- मात्र प्रति आर या दराप्रमाणे खरेदी करावी म्हणून विनंती केलेली आहे.

श्री. रावसाहेब गंगाराम पवार यांनी उपरोक्त अर्जासोबत जोडलेल्या ७/१२ उताऱ्याचे अवलोकन केले असता त्यात खालीलप्रमाणे तपशील दिसून येत आहे :

| अ.नं. | भोगवटादाराचे नांव | गट नंबर | क्षेत्र | इतर हक्कांत |
|---|---|---|---|---|
| ०१ | श्री.रावसाहेब गंगाराम पवार | १२८ | ०० हे ५६ा। आर | कनकुरी सोसा. इ.क.प. घे.<br>विहीर १<br>नविन विहीर १ (स्व) |
| ०२ | विठ्ठल रामभाऊ डांगे<br>कृष्णाबाई शिवाजी डांगे<br>सिताराम रामभाऊ डांगे<br>नानासाहेब रामभाऊ डांगे<br>प्रमिला रावसाहेब पवार<br>आण्णासाहेब रामभाऊ डांगे | १२८ | ०० हे ०१ा। आर | |
| ०३ | भाऊसाहेब गंगाधर थेटे<br>किसन गंगाधर थेटे | १२८ | ०० हे ०२ आर | |
| | **एकूण** | | **०० हे ६० आर** | |

**(ब)** अर्जदाराचे अर्जावरुन खालील बाबी लक्षात येतात :

०१. अर्जात अर्जदाराने श्री. विठ्ठल रामभाऊ डांगे व इतर यांना ०० हे १।। आर जमीन विकलेली आहे, असे नमूद केलेले आहे, त्याची नोंद ७/१२ उताऱ्यावर झालेली आहे.

०२. पाणीपुरवठा विभाग प्रमुखांनी दिनांक ०१ फेब्रुवारी, २००८ रोजी दिलेल्या अभिप्रायात, अर्जात नमूद केलेली जमीन पाणी पुरवठयासाठी उपयुक्त आहे. विहीरीसह खरेदी करावी. भविष्यांत वाद निर्माण होणार नाही, असे नमूद केलेले आहे.

०३. संस्थानच्या कंत्राटी मोजणीदाराने दिनांक १६ फेब्रुवारी, २००८ रोजी जमिनीची पाहणी करुन व मोजणी करुन खालीलप्रमाणे अहवाल दिलेला आहे :

अ) अर्जदार श्री.रावसाहेब गंगाधर पवार यांची एक विहीर आहे.

ब) श्री.भाऊसाहेब गंगाधर थेटे व इतर १ यांची विहीर आहे, त्याचे क्षेत्र ०० हे ०२ आर आहे.

क) श्री. विठ्ठल रामभाऊ डांगे व इतर ५ यांची एक विहीर आहे, त्याचे क्षेत्र ०० हे १ा। आर आहे.

ड) अर्जदार श्री. रावसाहेब गंगाराम पवार यांचे क्षेत्र ०० हे ५६।। आर ऐवजी ०० हे ५० आर भरत आहे, म्हणजे ०० हे ६ा। आर क्षेत्र कमी भरत आहे.

०४. अर्जदार श्री. रावसाहेब गंगाराम पवार यांनी त्यांचे क्षेत्र ०० हे ५६।। आर असतांना फक्त ०० हे ५५ आर क्षेत्र विकावयाचे आहे, असे अर्जात नमूद केलेले आहे.

**(क)** वर नमुद केलेल्या तपशीलावरुन खालील बाबी निश्चित होत आहेत :

०१. अर्जदाराचे क्षेत्र ०० हे ५६।। आर असतांना अर्जदाराने फक्त ०० हे ५५ आर संस्थानला विकावयाचे ठरविलेले आहे. म्हणजे ०० हे १।।आर क्षेत्र अर्जदारास शिल्लक राहते. अशा रितीने जमिनीचा तुकडा होत आहे. सदरचा व्यवहार तुकडे जोड तुकडे बंदी कायद्याविरुध्द होत असल्याने मा. दुय्यम निबंधक यांचेकडेस खरेदीखत नोंदविले जाणार नाही.

०२. अर्जामध्ये अर्जदाराने विहीर संस्थानला विकत देणार किंवा नाही याबाबत खुलासा केलेला नाही. पाणीपुरवठा विभागाने अभिप्राय दिलेला आहे की, विहीरीसह जागा घ्यावी.

०३. मौजे कनकुरी येथील गट नंबर १२८ चा ७/१२ चा उतारा पाहिला असता, क्षेत्र ०० हे ५६।।आर आहे. मात्र कंत्राटी मोजणीदार यांनी मोजणी केल्याप्रमाणे क्षेत्र ०० हे ५० आर भरत आहे. त्यामुळे सदरची जागा घ्यावयाची ठरल्यास प्रत्यक्ष ताबा मिळालेल्या जमिनीच्या खरेदी किंमतीच्या १० टक्के रक्कम राखून ठेवणे. सदरहू रक्कम सरकारी मोजणी झाल्यावर व संपूर्ण क्षेत्र ताब्यात मिळालेवर आदा करणे उचित राहिल.

वर नमुद केलेल्या परिच्छेद क मधील अ.नं. ०१ ते ०३ बाबत संबंधित अर्जदाराकडून समक्ष लेखी माहिती घेणत येत आहे. तद्नंतर उपरोक्त विषयांकित जमीन खरेदीचा विषय मा. व्यवस्थापन समितीचे सभेपुढे विचारार्थ सादर करणे उचित राहील, अशी टिपणी इकडील विभागामार्फत दिनांक ०४ मार्च, २००८ रोजी सादर करण्यात आलेली होती.

**(ड)** वर नमुद केलेल्या **परिच्छेद क** मधील बाबींबाबत जमीनमालक श्री. रावसाहेब गंगाराम पवार यांचेशी सपर्क साधणेत आला होता त्यांनी दिनांक ०५ मार्च, २००८ रोजीच्या अर्जान्वये खालील बाबी नमुद केलेल्या आहेत :

०१. मौजे कनकुरी येथील गट नंबर १२८ मध्ये माझे मालकीची एक विहीर आहे. सदरहू विहीर ०१ गुंठा जागेसह माझे उपभोगासाठी ठेवावयाची आहे. सदरहू ०१ गुंठा विहीरीसह जागा सोडून उर्वरित ५५ आर जमीन श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी यांना विकत देणेस तयार आहे.

०२. सदरहू विहीरीवर मी माझे मालकची ४।। एकर बागायती शेती कसत आहे. तसेच सदरहू विहीरीवरुन माझ्या दुसऱ्या क्षेत्रातील कोरडवाहू शेतीपर्यन्त सायफन करुन पाणी नेलेले असून, सदरहू जमीन ही मी कसत आहे. सदरहू दोन्ही जमिनीवर माझे व माझे कुंटूंबाचे पालनपोषण व उदरनिर्वाह होत आहे.

०३. माझेकडे माझे मालकीच्या गट नंबर १२८ मधील क्षेत्र ०० हेक्टर ५६।।आर जमिनीचा सरकारी मोजणीचा नकाशा उपलब्ध नसल्याने, यदाकदाचित श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी ने जमीन विकत घ्यावयाची ठरविल्यास सरकारी मोजणी होऊन, विकत द्यावयाचे संपूर्ण क्षेत्र संस्थानचे ताब्यात देईपर्यन्त संस्थान नियमानुसार आवश्यक ती रक्कम राखून ठेवणेस माझी काही हरकत नाही.

**(इ)** श्री. रावसाहेब गंगाराम पवार यांनी विहीरीची ०१ गुंठा जागा सोडून ५५।। आर जमीन विकत घ्यावी, असा प्रस्ताव दिलेला आहे. अशा रितीने होणारा व्यवहार हा तुकडे जोड तुकडे बंदी कायद्याचा भंग करणारा आहे. त्यामुळे याबाबत संस्थानचे वकील श्री. जे.के. गोंदकर यांचा अभिप्राय मागविणेत आलेला होता. ॲड.गोंदकर यांनी दिनांक १८ मार्च, २००८ रोजी अभिप्राय दिलेला आहे. त्यात त्यांनी नमुद केले आहे की,

परंतु तुकडे बंदी तुकडे जोड कायद्याचा विचार करता कोणत्याही जमिनीचा तुकडा २० गुंठे क्षेत्रापेक्षा कमी विकत घेता येत नाही व २० गुंठे क्षेत्रापेक्षा कमी जमिनीचा तुकडा मागे ठेवता येत नाही. त्यामुळे सदर कायद्याचा बाध येत असल्यामुळे आपणांस अशा प्रकारे ०१ आर विहीरीचे क्षेत्र सदर मालकांना ठेवून बाकीचे ५५ आर क्षेत्र खरेदी घेता येणार नाही.

**(ई)** संस्थानच्या पाणीपुरवठा विभागाने विहीरीसह जमीन विकत घ्यावी. जेणेकरुन भविष्यात वाद निर्माण होणार नाही. प्रस्तुत जागा विहीर सोडून विकत घेतली तर भविष्यात पाणीपुरवठा तलावाचे विस्तारीकरण झालेवर सदरची विहीर संस्थानला बंद करता येणार नाही. तलावातील पाण्याची पाझरामुळे सदर विहीरीत आपोआप पाणी येईल. त्यामुळे संबंधीत जमीनमालक या विहीरीचा पुरेपूर आर्थिक फायदा घेण्याची शक्यता आहे. तसेच, यदाकदाचित संस्थानने आता विहीरीसह ०१ गुंठा जागा सोडून जमीन विकत घेतली आणि भविष्यात सदरहू विहीर भूसंपादनाच्या माध्यमातून घेण्याचे ठरविले तर अर्जदार विहीरीसह जमीन भूसंपादनाच्या माध्यमातून घेणेस वर नमुद केलेले कारण दाखवून विरोध करण्याची शक्यता आहे.

संस्थानचे वकीलांनी दिलेल्या अभिप्रायानुसार, श्री. रावसाहेब गंगाराम पवार यांना विहीरीचे ०१ गुंठा क्षेत्र ठेवून उलेले ५५ाा आर क्षेत्र तुकडे जोड तुकडे बंदी कायद्याविरुध्द व्यवहार होत असल्याने खरेदी करता येत नाही.

वर नमुद केलेल्या बाबींचा विचार करुन, अर्जदार यांची एकूण ५६।। आर जमिनीपैकी विहीरीसह ०१ गुंठा जागा सोडून जमीन विकत घेणे उचित होणार नाही.

**(फ)** श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डीने नुकतीच मौजे कनकुरी येथील श्री.बाबासाहेब रामभाऊ डांगे यांची गट नंबर १२१ पैकी मधील ०१ हेक्टर ५० आर जमीन प्रती आर रुपये ०१ लाख मात्र या दराने मा. व्यवस्थापन समितीच्या दिनांक १० जानेवारी, २००८ रोजीच्या सभेतील निर्णय क्रमांक ४७ (०१) अन्वये दिनांक १३ मार्च, २००८ रोजी खरेदी घेतलेली आहे.

उपरोक्त परिच्छेदांत विवेचन केल्यानुसार, खालील बाबींवर निर्णय होणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता

०१.श्री. रावसाहेब गंगाराम पवार यांची मौजे कनकुरी येथील गट नंबर १२८ मधील त्यांचे असलेले क्षेत्र ०० हे ५६ा आर पैकी विहीरीसह ०० हे ०१ आर जमीन सोडून उर्वरित ०० हे ५५ा आर जमीन अथवा संपूर्ण जमीन खरेदी करणे अथवा न करणे.

०२. जमीन खरेदी करावयाचा निर्णय झाल्यास, जमिनीचे किंमतीबाबत जमीनमालकांशी चर्चा तथा वाटाघाटी करुन जमिनीची किंमत ठरविणे.

०३.जमीन खरेदी करावयाचा निर्णय झाल्यास, विहित पध्दतीने कायदेशीर बाबींची पूर्तता करुन खरेदीखतासाठी येणाऱ्या योग्य त्या सर्वसमावेशक अनुषंगिक खर्चास मान्यता देणे.

यावर सविस्तर चर्चा होऊन,यापूर्वी व्यवस्थापन समितीचे दिनांक २४.२.२००८ चे सभेत निर्णय क्र. ११३ अन्वये श्री बाबासाहेब डांगे, रा.कनकुरी यांची जमीन रुपये १ लाख प्रति आर-गुंठा या दराने खरेदी केलेल आहे. त्याच दराने श्री रावसाहेब गंगाराम पवार,कनकूरी यांची जमीन विहीरीसह खरेदी करण्यात यावी, असे ठरले. (कार्यवाही-बांधकाम विभागप्रमुख)

**विषय नं.२०** **मौजे शहाजापूर ता.कोपरगाव येथे पदयात्री साईभक्तांसाठी पालखी थांबा उभारणेबाबत.**

**निर्णय क्र.४३३** **(अ)** मौजे शहाजापूर, तालुका कोपरगांव येथे श्री साईबाबांच्या पालखीसमवेत येणाऱ्या पदयात्री साईभक्तांसाठी पालखी थांबा बांधणेसाठी सरपंच, ग्रामपंचायत शहाजापूर, तालुका कोपरगांव, जिल्हा अहमदनगर यांनी दिनांक ११ फेब्रुवारी, २००८ रोजीचे पत्राने प्रस्ताव दिलेला आहे. सदरहू प्रस्तावावर खालील मान्यवरांनी, त्यांचे नांवापुढे दर्शविल्याप्रमाणे अभिप्राय दिलेले आहेत :

| अ.नं. | मान्यवरांचे नांव व त्यांचेकडील पत्राचा दिनांक | अभिप्रायाचा तपशील / गोषवारा |
|---|---|---|
| ०१ | मा.श्री.शंकररावजी काळे, कोळपेवाडी, माजी खासदार यांचे मा. अध्यक्षसो. यांना अग्रेषित केलेले पत्र क्रमांक १४१८ / दिनांक ०३ मार्च, २००८. | ग्रामपंचायत शहाजापूर, हे ग्रामपंचायत मालकीची ०५ गुंठे जागा संस्थानला बक्षीसपत्राने देणेस तयार आहेत. या जागेवर पायी दिंडी साईभक्त वारकरी यांचेसाठी पादचारी निवासस्थान थांबा मंजूर करावा. सरपंच, ग्रामपंचायत शहाजापूर यांची मागणी रास्त व योग्य आहे. |
| ०२ | मा. श्री. शंकररावजी काळे, कोळपेवाडी, माजी खासदार यांचे मा. अध्यक्षसो. यांना अग्रेषित केलेले पत्र क्रमांक १४१८ / दिनांक ०३ मार्च, २००८ रोजीचे पत्राची प्रत मा. विश्वस्त डॉ.एकनाथराव गोंदकर व मा.विश्वस्त श्री.अशोकराव खांबेकर यांना दिलेली आहे. | मा.श्री.काळेसो. यांचे उपरोक्त तपशील असलेल्या पत्रावर, मा. विश्वस्त डॉ.गोंदकर व श्री.खांबेकर यांनी, मा.अध्यक्षसो. व मा. कार्यकारी अधिकारी यांना संबोधून, सदरहू विषय व्यवस्थापन समिती बैठकीत ठेवण्यांत यावा व त्यासंबंधीचा निर्णय करण्यात यावा, असा अभिप्राय दिलेला आहे. |
| ०३ | मा.श्री.शंकररावजी काळे, कोळपेवाडी, माजी खासदार यांचे मा. अध्यक्षसो. यांना अग्रेषित केलेले पत्र क्रमांक १४१८ / दिनांक ०३ मार्च, २००८. | मा.अध्यक्षसो. यांनी मा.कार्यकारी अधिकारी यांना संबोधून, सभेपुढे ठेवणे, असा अभिप्राय दिला आहे. |
| ०४ | मा. आ. श्री.अशोक शं.काळे, विधानसभा सदस्य, कोळपेवाडी यांचे मा.अध्यक्षसो. यांना अग्रेषित केलेले पत्र क्रमांक २००७-०८/एचडी/१७२४ / दिनांक ०६ मार्च, २००८ रोजीचे पत्राची प्रत मा. विश्वस्त श्री.अशोकरावजी खांबेकर यांना दिलेली आहे. | मा. आ. श्री. अशोक शं. काळे यांचे सदरहू पत्रात ग्रामपंचायतीने ०५ गुंठे जागा दिंडी थांब्यासाठी देणेचा ठराव केलेला आहे. श्री साईभक्तांसाठी आवश्यक तो थांबा शेड व शौचालय सुविधेसह बांधणेबाबत सकारात्मक निर्णय घेणेस विनंती आहे, असे कळविले आहे.<br>सदरहू पत्रासोबत, मा.विश्वस्त श्री.खांबेकरसो. यांनी मा. अध्यक्षसो. यांना अग्रेषित केलेल्या दिनांक ०८ मार्च, २००८ रोजीच्या पत्रात बांधकाम विभागाने सर्व्हे तयार करुन व्यवस्थापन समिती बैठकीपुढे हा विषय घ्यावा, अशी विनंती केली आहे. |

**(ब)** सरपंच, ग्रामपंचायत शहाजापूर यांनी त्यांच्या दिनांक ११ फेब्रुवारी, २००८ रोजीच्या प्रस्तावात खालील बाबी नमूद केलेल्या आहेत :

०१) शहाजापूर हे गांव गुजरात ते शिर्डी या रस्त्यालगत असून गुजराथ तसेच नाशिक जिल्हयातून मोठया प्रमाणात पायी वारकरी येतात ते शहाजापूर येथे उघडयावर राहतात.

०२)यासाठी थांबा बांधणेसाठी शहाजापूर येथील दिनांक २६ जानेवारी, २००८ रोजीच्या ग्रामसभेत विषय क्रमांक ०५ अन्वये, ग्रामपंचायतीचे घरकुलाजवळील लासलगांव रस्त्यावर लगतची ०५ गुंठे ग्रामपंचायत मालकीची जागा श्री साईबाबा संस्थान यांना बक्षिस देवुन पायी वारकरी यांची सोय करावी यासाठी संस्थानला जागा उपलब्ध केलेबाबतची माहिती कळवावी, असा सर्वानुमते ठराव केलेला आहे.

०३)संस्थानमार्फत सदर जागेवरती थांबा शेड व शौचालय सुविधेसह बांधुन द्यावे. ग्रामपंचायत मोफत पाण्याची सुविधा करण्यास व इतर वेळी नियमित देखभाल करण्यास तयार आहे.

उपरोक्त बाबींस अनुसरुन, ग्रामपंचायत शहाजापूर यांचेकडून खालीलप्रमाणे माहिती मागविणेत येत आहे :

०१)पालखी थांब्यासाठी ग्रामपंचायतीने देवू केलेल्या जागेचा उतारा व कच्चा नकाशा.

०२)ग्रामपंचायतीने सदरची जागा विकत घेतली असेल तर खरेदीखताची छायांकित प्रत.

०३)ग्रामपंचायत देवू करीत असलेली जागा शासकीय / सरकारी असल्यास ज्या आदेशान्वये सदरहू जागा ग्रामपंचायतीकडे वर्ग झाली त्या आदेशाची प्रत अथवा त्यासंबंधित कागदपत्रे.

०४)सदरहू ठिकाणी किती पालख्यां थांबतात, त्यामध्ये किती पदयात्री असतात यांची पालखी मंडळाच्या नांवे व पत्त्यासह यादी.

**(क)** उपरोक्त विषयांस अनुसरुन, याच मार्गावर म्हणजे, सावळीविहीर - भरवस रस्त्यावर मौजे देर्डे चांदवड येथे पालखी थांबा बांधण्याबाबत मा. व्यवस्थापन समितीच्या दिनांक १४ ऑक्टोबर, २००६ रोजीच्या सभेत निर्णय क्रमांक ७९७ (अ) अन्वये पालखी थांबा बांधण्याचा निर्णय झालेला आहे. मौजे देर्डे चांदवड येथे पालखी थांबा उभारण्यासाठी ग्रामपंचायतीने देवू केलेली जागा शासनाने दिलेली असल्याने त्याबाबत मा.जिल्हाधिकारी, अहमदनगर यांचेकडे जागा मागणीबाबत अर्ज केलेला आहे. सदरहू जागा मागणीचा प्रस्ताव जिल्हाधिकारी कार्यालयात विचाराधीन आहे. देर्डे चांदवड ते शहाजापूर या दोन गांवातील अंदाजे अंतर ०५ किलोमीटर आहे.

उपरोक्त प्रस्तावात नमुद केल्यानुसार, खालील बाबींवर निर्णय होणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.:

०१. मौजे शहाजापूर येथे ग्रामपंचायत शहाजापूर यांनी देऊ केलेल्या ०५ आर (गुंठे) जागेमध्ये पालखी पदयात्री साईभक्तांसाठी पालखी थांबा उभारणेबाबत.

०२. मौजे शहाजापूर येथे पालखी थांबा उभारणेचा निर्णय झाल्यास, याबाबत मा.जिल्हाधिकारी, अहमदनगर यांचेकडेस संस्थानकडे जागा वर्ग होणेबाबत तसेच सदरहू जागा बक्षिसपत्राने घेणेबाबत करावयाची योग्य त्या कार्यवाहीसाठी मा. कार्यकारी अधिकारी यांना अधिकार देणे.

**यावर सविस्तर चर्चा होऊन, मौजे शहाजापूर, तालुका कोपरगांव येथे श्री साईबाबांच्या पालखीसमवेत येणाऱ्या पदयात्री साईभक्तांसाठी पालखी थांबा बांधणेकामी मा.विश्वस्त पांडुरंग गमाजी अभंग, मा.श्री सुरेश गोरक्षनाथ वाबळे, मा.डॉ.एकनाथ भागचंद गोंदकर व मा.श्री अशोक भिमाशंकर खांबेकर यांनी पहाणी करुन शिफारसींसह प्रस्ताव फेरसादर करावा असे ठरले.** (कार्यवाही-बांधकाम विभागप्रमुख)

**विषय नं.२१** **श्री क्षेत्र पंढरपूर येथे संस्थान मार्फत बांधण्यात येणाऱ्या वारकरी निवासस्थानाबाबत**

**निर्णय क्र.४३४** **(अ)** मा. व्यवस्थापन समितीच्या दिनांक १९ ऑगष्ट, २००६ रोजीच्या सभेत, "तीर्थक्षेत्रांचे ठिकाणी भक्तांच्या सोयीसाठी धर्मशाळा उभारणेबाबत "या सादर करणेत आलेल्या प्रस्तावाबाबत निर्णय क्रमांक ५४६ अन्वये खालीलप्रमाणे निर्णय झालेला आहे :

" तरी श्री क्षेत्र पंढरपूर, श्री क्षेत्र त्र्यंबकेश्वर, श्री क्षेत्र आळंदी व श्री क्षेत्र ओंकारेश्वर (मध्यप्रदेश), वणी इत्यादी ठिकाणी जागा उपलब्ध करवून, संस्थानमार्फत धर्मशाळा व श्री साईबाबा मंदिर बांधणेस मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा. कार्यकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली. "

**(ब)** श्री क्षेत्र पंढरपूर येथे भक्तनिवासस्थान बांधणेबाबत मा. ना. श्री. विजयसिंह मोहिते पाटील, ग्रामविकास व पर्यटन मंत्री यांचे अध्यक्षतेखाली दिनांक २७ मे, २००७ रोजी पंढरपूर येथे बैठक आयोजित करण्यात आली होती. सदरहू बैठकीस मा.व्यवस्थापन समितीचे काही सदस्य, मा. कार्यकारी अधिकारी, मुख्य लेखाधिकारी, शाखा अभियंता तसेच त्याचबरोबर पंढरपूर देवस्थानचे विश्वस्त, पदाधिकारी, शासनाचे प्रतिनिधी म्हणून मा.जिल्हाधिकारी, सोलापूर, मा.अधिक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, सोलापूर, तहसिलदार, पंढरपूर आदि उपस्थित होते.

सदर बैठकीत संस्थानतर्फे खालीलप्रमाणे मागण्या मांडण्यात आल्या होत्या :

०१) पंढरपूर देवस्थानने सर्व्हे नंबर ५९ मधील २ एकर जागा श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डीच्या नांवावर करण्यात यावी.

०२) संस्थान आर्किटेक्ट यांचेकडून बांधकाम आराखडे व अंदाजपत्रक तयार करुन घेण्यात यावे. सदरहू बांधकाम आराखडा दोन्ही देवस्थानचे मा.विश्वस्तांच्या सहमतीने करण्यात यावा.

०३) बांधकामाच्या निविदा मागविणे, बांधकाम ठेका देणे आदि कामे संस्थान मार्फत करण्यात येईल.

०४) भक्तनिवासस्थान बांधून झालेवर, निवासस्थानाची इमारत देखभालीसाठी पंढरपूर देवस्थानाकडे सोपवावयाची किंवा कसे याबाबत दोन्ही देवस्थानचे विश्वस्तांच्या बैठकीत निर्णय घेण्यात येईल.

**(क)** मा. मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांचे दालनात दिनांक १२ जुलै, २००७ उपरोक्त विषयाबाबत बैठक झालेली आहे. सदर बैठकीमध्ये खालीलप्रमाणे निर्णय झालेला आहे :

" .. .. पंढरपूर येथे वारकरी निवासस्थानासाठी राखीव ठेवण्यांत आलेल्या जमिनीवर शिर्डी च्या श्री साईबाबा संस्थान मार्फत निवासस्थान बांधण्यात येणार आहे. या निवासस्थानाचे व्यवस्थापन श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिर ट्रस्टकडे राहील व या भक्तनिवासमध्ये कांही खोल्या शिर्डी संस्थान करीता राखीव ठेवण्यांत येतील आणि शिर्डी संस्थानने शिफारस केलेल्या भक्तांना हया खोल्या प्राधान्याने उपलब्ध करुन देण्यांत येईल. याबाबत श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिर समिती, पंढरपूर आणि श्री साईबाबा संस्थान, शिर्डी यांच्यामध्ये करार करण्यात यावा, असे मा.मुख्यमंत्रीमहोदयांनी सुचविले. "

**(ड)** कार्यकारी अधिकारी, श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिर समिती, पंढरपूर यांनी त्यांचेकडील पत्र क्रमांक श्रीविरुमंसप/६३/०८, दिनांक १७ मार्च, २००८ रोजीच्या पत्रान्वये याकामी करावयाचा करारनाम्याचा मसुदा इकडील कार्यालयास पाठविला आहे.

सदर करारनाम्याबाबत मा.व्यवस्थापन समितीच्या दिनांक १९ ऑगष्ट, २००६ रोजीच्या झालेल्या सभेतील निर्णय क्रमांक ५४६, तसेच श्री क्षेत्र पंढरपूर येथे दिनांक २७ मे, २००७ तसेच मा. मुख्यमंत्री महोदय यांच्या दालनात दिनांक १२ जुलै, २००७ रोजी झालेल्या बैठकीतील निर्णयानुसार तुलनात्मक तक्ता सादर केला आहे. त्याचे अवलोकन होणेस विनंती आहे.

उपरोक्त तुलनात्मक तक्त्याचा विचार केला असता खालीलप्रमाणे बाबी स्पष्ट होत आहेत :

०१. श्री क्षेत्र पंढरपूर यांनी भाडेपट्टयाने फक्त ३० वर्षे मुदतीकरीता करार करणेचे योजिले आहे.

- ३० वर्षे ही फार कमी मुदत आहे. ह्या मुदतीनंतर श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी तर्फे बांधण्यात येणाऱ्या इमारतींवर संस्थानचा कोणताही हक्क राहणार नाही.

०२. मा. व्यवस्थापन समितीच्या दिनांक १९ ऑगष्ट, २००६ रोजी झालेल्या सभेत श्री क्षेत्र पंढरपूर येथे संस्थानमार्फत धर्मशाळा व श्री साईबाबा मंदिर बांधणेस मान्यता देण्यात आलेली आहे.

- श्री क्षेत्र पंढरपूर यांच्या करारनाम्यामध्ये श्री साईबाबा मंदिर बांधणेसाठी जागा देणेबाबत उल्लेख नाही.

०३. सर्व्हे नंबर ५९/१ क्षेत्र ०० हे ८५ आर या जमिनीचा उतारा पाहिला असतां, त्यावर आकार नाही म्हणजेच ही जमीन बिन आकारी पडीत आहे व ती पंढरपूर देवस्थानला मिळालेली आहे तसेच सर्व्हे नंबर ५९ क्षेत्र ०७ हेक्टर ७४ आरचा उतारा पाहिला असता या उताऱ्यात खालील नोंदी आहेत

| **सर्व्हे नंबर** | **क्षेत्र** | **जमीनमालकाचे नांव** | |
|---|---|---|---|
| ५९ | ०७ हे ७४ आर | म्युनिसीपालीटी | ०४ हे ५४ आर |
| | | श्री विठ्ठल मंदिर समिती | ०२ हे ३५ आर |
| | | उपविभागीय अधिकारी, पंढरपूर विभाग, पंढरपूर तथा कार्यकारी अधिकारी श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिर समिती पंढरपूर | ०० हे ८५ आर |
| | | **एकूण** | **०७ हे ७४ आर** |

सदर जमिनीच्या ७/१२ उताऱ्यावर देखील आकार नोंदविलेला नाही. म्हणजे ही जमीन बिन आकारी शासनाच्या मालकीची आहे. ती जमीन कोणत्या विशिष्ट कारणासाठी मिळाली हे पाहणे आवश्यक राहील. त्यानंतर सदर भाडेपट्टा श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिर समिती, पंढरपूर करुन देणार आहेत. त्यासाठी शासनाची परवानगी आवश्यक राहील. याबाबत करारनाम्याच्या मसुद्यात कोणताच उल्लेख नाही.

०४. प्रश्नाधिन जमिनीचा बिनशेती वापर करणेसाठी श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिर समिती यांनी याकामी रुपांतरीत कर भरणे आवश्यक राहिल.

०५. पंढरपूर देवस्थानने देऊ केलेल्या जागेवर श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डीने इमारत बांधली तर मालमत्ता कर, विजेचे बिल, बिनशेती आकार, पाणीपट्टी ही कोणी भरावयाची याचा उल्लेख करारनाम्यात नाही.

०६. करारनाम्यात शर्त क्रमांक ९ ही संस्थानच्या संमतीने संस्थान ठरविल त्या मुदतीकरीता संस्थानसाठी राखीव असणारी जागा पंढरपूर देवस्थानला वापरता येईल, ही अट उचित नाही. यामध्ये कालावधी ठरविणे अत्यंत अवघड बाब आहे.

सोबत, करारनाम्याची प्रत व त्यावरील कार्यालयाची टिपणी माहितीस्तव जोडली आहे.

**(इ)** मा. व्यवस्थापन समितीचे दिनांक १९ ऑगष्ट, २००६ रोजीचे सभेत निर्णय क्रमांक ५४६ अन्वये, श्री क्षेत्र पंढरपूर व इतर ठिकाणी जागा उपलब्ध करवून, संस्थानमार्फत धर्मशाळा व श्री साईबाबा मंदिर बांधणेस मान्यता देण्यात आलेली आहे. तथापि, कार्यकारी अधिकारी, श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिर समिती, पंढरपूर यांनी सर्व्हे नंबर ५९ मधील ८००० चौरस मीटर जागा भाडेपट्टयाने ३० वर्षाच्या मुदतीचे कराराने देणेबाबतचा करारनाम्याचा मसुदा पाठविला आहे. त्यामध्ये वारकरी निवासस्थान संस्थानने बांधणे व त्यातील १० टक्के जागा संस्थानकडे देणेबाबतच्या बाबी नमूद केलेल्या आहेत. तसेच निवासस्थान बांधणेबाबत आवश्यक त्या मंजुऱ्या संबंधित अधिकाऱ्यांकडून संस्थानने आणाव्यांत, असे नमूद केलेले आहे.

याठिकाणी वारकरी निवासस्थान बांधावयाचा निर्णय झाल्यास इतर अटी व शर्तीबाबत पंढरपूर देवस्थान यांचेशी पत्रव्यवहार करुन, त्या निश्चित करता येतील.

उपरोक्त परिच्छेदांत विवेचन केल्यानुसार, श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिर समिती, पंढरपूर यांनी भाडेपट्टयाने देऊ केलेल्या ३० वर्षे मुदतीच्या जागेवर वारकरी निवासस्थान बांधणेबाबत धोरणात्मक निर्णय होणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

**यावर सविस्तर चर्चा होऊन, विधी व न्याय विभागाची मान्यता घेऊन, संस्थानमार्फत पंढरपूर येथे वारकरी निवासस्थानाचे बांधकाम पूर्ण करुन ते श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिर समिती, पंढरपूर यांना देणगी म्हणून देण्यात यावे. मा.श्री पांडुरंग गमाजी अभंग, मा.श्री सुरेश गोरक्षनाथ वाबळे, मा.श्रीमती उर्मिला प्रदिप जाधव व मा.श्री अशोक भिमाशंकर खांबेकर यांनी पहाणी करुन बांधकामाबाबत पुढील निर्णय घ्यावा असे ठरले.** (कार्यवाही-बांधकाम विभागप्रमुख)

**विषय नं.२२** **मौजे शिर्डी येथील आरक्षण क्रं.३४ व ३९ मधील घरे व त्यालगतची जागा वगळणेबाबतचा अहवाल.**

**निर्णय क्र.४३५** मा.जिल्हाधिकारी, अहमदनगर यांचेकडील भूसंपादन कायदा १८९४ चे ५२ अ चे आदेशानुसार सर्व्हे नंबर १२५ व १२६ मधील क्षेत्र ०० हेक्टर १९ आर ८७ चौरस मीटर श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांच्या रुग्णालय विस्तारीकरणासाठी भूसंपादित करणेबाबतचे प्रकरण मा.उपविभागीय अधिकारी, श्रीरामपूर भाग, श्रीरामपूर यांचेमार्फत चालू आहे.

**(अ)** मा.उपविभागीय अधिकारी, श्रीरामपूर भाग, श्रीरामपूर यांचेकडील पत्र क्रमांक एलएक्यू/ एसआर/ १४/२००० क्रमांक कावि/भूसं२/१५९०/२००७, दिनांक २६ ऑक्टोबर, २००७ अन्वये आरक्षण क्रमांक ३४ बाबत खालील कारणास्तव फेरप्रस्ताव पाठविणेबाबत कळविलेले आहे

.. .. मा.जिल्हाधिकारी, अहमदनगर यांचेकडेस भूसंपादनाचा पाठविलेला प्रस्ताव, त्यावर मा.जिल्हाधिकारी, अहमदनगर यांनी ५२ अ आदेशात नमुद केलेले क्षेत्र व प्रत्यक्ष संयुक्त मोजणी केलेनंतर संयुक्त मोजणी पत्रकाप्रमाणे संपादन करावयाचे क्षेत्र यात तफावत आढळून येत आहे.

याबाबत मा.व्यवस्थापन समितीच्या दिनांक २८ जुलै, २००७ रोजी झालेल्या सभेत निर्णय क्रमांक ५२८ खालीलप्रमाणे झालेला आहे :

.. ..यावर सविस्तर चर्चा होऊन, आरक्षण क्र.३४ व ३९ मधील सलग घरांच्या पट्टयाची जागा व इतर घरांची असलेली जागा सर्वसाधारण तथा गरीब कुटूंबांची आहे. सदरची जागा भूसंपादित केल्यास सर्व कूटूंबिय विस्तापित होतील. करिता मानवतेचे दृष्टीकोनातून आरक्षण क्र.३४ व ३९ मधील सलग पट्टयातील व इतर घरांची जागा भूसंपादन प्रस्तावातून वगळण्यात यावी तसा प्रस्ताव भूसंपादन अधिकारी यांचेकडे पाठविण्यात यावा, असे ठरले.

**(ब)** मा. उपविभागीय अधिकारी, श्रीरामपूर भाग, श्रीरामपूर यांनी दिनांक २६ ऑक्टोबर, २००७ रोजी भूसंपादन क्षेत्राचा फेरप्रस्ताव सादर करणेसाठी पाठविलेल्या मोजणी नकाशाचे अवलोकन केले असता बांधीव घरांची परिस्थिती खालीलप्रमाणे आहे :

**तक्ता क्रमांक ०१**

| अ.नं. | खातेदाराचे नांव | सर्व्हे नंबर | भूसंपादीत होणारे क्षेत्र | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | बांधीव हे-आर-चौमी | खुले हे-आर-चौमी | एकुण हे-आर-चौमी |
| ०१ | हरीभाऊ गणपत बनकर | १२५/७/१ | ००-००-४८ | ००-००-५२ | ००-०१-०० |
| ०२ | अलका रावजी कोते | १२६/२७/१ | ००-००-३५ | ००-०४-१५ | ००-०४-५० |
| ०३ | सोपान मारुती लाड | १२६/२७/२ | ००-००-३८ | ००-०१-६२ | ००-०२-०० |
| ०४ | दिलीप नामदेव वाणी | १२६/२७/३ | ००-०१-१० | ००-००-४० | ००-०१-५० |
| ०५ | उत्तम कारभारी काटकर | १२६/२७/४ | ००-००-४२ | ००-००-०८ | ००-००-५० |
| ०६ | सुनील कचरु जगताप | १२६/२७/५ | ००-००-२३ | ००-००-२७ | ००-००-५० |
| ०७ | अहमद हुसेन महंमद्दीन अन्सारी | १२६/३१/१ | ००-००-२८ | ००-००-२२ | ००-००-५० |
| ०८ | अलका बाप नाथा कोते | १२६/३१/२ | ००-००-२६ | ००-००-२४ | ००-००-५० |
| ०९ | अहमद हुसेन महंमद्दीन अन्सारी | १२६/२८/१ | ००-००-०५ | ००-००-९५ | ००-०१-०० |
| १० | एकनाथ राधाकिसन महाले | १२६/२८/२ | ००-००-५० | ००-००-५० | ००-०१-०० |
| ११ | विमल सुधाकर डहाळे | १२६/२८/४ | ००-००-४७ | ००-००-५३ | ००-०१-०० |
| १२ | प्रविण बालाजी पवार | १२६/२८/६ | ००-००-५८ | ००-००-४२ | ००-०१-०० |
| १३ | गिताबाई बन्सीलाल जयस्वाल | १२६/४०/१ | ००-००-७० | ००-००-३० | ००-०१-०० |
| | | एकूण - | ००-०५-३२ | ००-०९-६८ | ००-१५-०० |

(अ.नं. ०७ व ०९ मिळून एकच घर आहे.)

मोजणी नकाशामध्ये सलग पट्ट्यामध्ये येणाऱ्या घराच्या जागेचा व घरालगतच्या जागेचा तपशील खालील प्रमाणे आहे :

| एकूण घरांची संख्या | बांधीव क्षेत्र हेक्टर-आर-चौमी | खुले क्षेत्र हेक्टर-आर-चौमी | एकूण क्षेत्र हेक्टर-आर-चौमी |
|---|---|---|---|
| १२ | ००-०५-३२ | ००-०९-६८ | ००-१५-०० |

उपरोक्त तक्ता क्रमांक ०१ मधील अ.क्र. ०१ श्री. हरीभाऊ गंगाधर बनकर यांचे घर सदरच्या मोकळया व सलग पट्ट्यात येत नाही. त्यांचे नांव सर्व्हे नंबर १२५/७ ( पूर्वीचे खातेदार श्री. जसराज अमोलकचंद लोढा यांचेकडून संस्थानने खरेदी घेतलेल्या सर्व्हे नंबर १२५/७ ) मध्ये आहे, परंतु प्रत्यक्ष घर मात्र सर्व्हे नंबर १२५/८ ( पूर्वीचे खातेदार श्री. सुवालाल अमोलकचंद लोढा यांचेकडून संस्थानने खरेदी घेतलेल्या सर्व्हे नंबर १२५/८) मध्ये आहे, त्यामुळे ते वगळतां येणार नाही.

**(क)** वर नमूद केलेल्या घरांच्या पट्ट्यांमध्ये घर बांधलेले नाही मात्र मोकळी जागा आहे :

**तक्ता क्रमांक ०२**

| अ.नं. | खातेदाराचे नांव | सर्व्हे नंबर | भूसंपादीत होणारे क्षेत्र हेक्टर-आर-चौमी |
|---|---|---|---|
| ०१ | शांताबाई बाळनाथ रायजादे | १२६/२८/३ | ००-०१-००.०० |
| ०२ | अजयकुमार आदित / प्रकाश डुबे / सुरज सत्यनारायण पाटील | १२६/२८/५ | ००-०१-००.०० |
| ०३ | नामदेव दगडू झुरंगे | १२६/२८/७ | ००-०१-००.०० |
| ०४ | महेश जगन्नाथ मेडू | १२६/४० | ००-००-२८.०० |
| ०५ | शिवाजी चांगदेव कोते | १२६/४०/२ | ००-०१-४५.०० |
| ०६ | अशोक मोहन औताडे | १२६/४२ पै | ००-०३-३५.२५ |
| | | एकूण | ००-०८-०८.२५ |

वर नमुद केलेल्या तक्ता क्रमांक ०२ मधील अ.नं. ०५ श्री.शिवाजी चांगदेव कोते व अ.नं. ०६ श्री. अशोक मोहन औताडे यांची जागा दक्षिणेस शेवटी आहे व ती मोकळी असल्याने सोडणे आवश्यक नाही, या ०२ खातेदारांचे क्षेत्र ०० हे ०४ आर ८०.२५ चौमी आहे.

म्हणजेच सलग पट्ट्यातील घरांची जागा, घरालगतची जागा व याच पट्ट्यात येणारी मोकळी जागा विचारात घेता खालीलप्रमाणे जागा सोडणे आवश्यक राहिल :

| अ.नं. | तपशील | संख्या | बांधीव क्षेत्र हे-आर-चौमी | खुले क्षेत्र हे-आर-चौमी | एकूण क्षेत्र हे-आर-चौमी |
|---|---|---|---|---|---|
| ०१ | घरे व घरालगतची जागा | १२ | ००-०५-३२ | ००-०९-६८ | ००-१५-०० |
| ०२ | घरांच्या पट्ट्यात येणारी मोकळी जागा | ०४ | ००-००-०० | ००-०३-२८ | ००-०३-२८ |
| | एकूण | १६ | ००-०५-३२ | ००-१२-९६ | ००-१८-२८ |

**(ड)** आरक्षण क्रमांक ३४ मध्ये घरे व घरालगतची जागा याबाबत परिच्छेद ब मधील तक्ता क्रमांक ०१ मध्ये दाखविलेले आहे. एकूण खातेदार १३ आहेत. परंतु त्यातील अ.नं. ७ व ९ मिळून एकच घर आहे, त्यामुळे एकंदर १२ खातेदार होत आहेत. त्यांची जागा खालीलप्रमाणे आहे :

| एकूण घरांची संख्या | बांधीव क्षेत्र हेक्टर-आर-चौमी | खुले क्षेत्र हेक्टर-आर-चौमी | एकूण क्षेत्र हेक्टर-आर-चौमी |
|---|---|---|---|
| १२ | ००-०५-३२ | ००-०९-६८ | ००-१५-०० |

म्हणजेच एकूण १५ आर क्षेत्र वगळणे आवश्यक आहे. सदरहू नमूद केलेले क्षेत्र वगळल्यास आरक्षण क्रमांक ३४ मधील उर्वरित क्षेत्र ०० हे ३८ आर २४.५९ चौमी क्षेत्राचे भूसंपादन करावे लागणार आहे.

हे उर्वरित क्षेत्र भूसंपादन केल्यावर भूसंपादित होणारे क्षेत्र पश्चिमेस व संस्थानने खरेदी घेतलेले क्षेत्र पुर्व बाजूस राहून मध्यभागी घरे व त्यालगतची जागा राहणार आहे. त्यामुळे संस्थानला दोन्ही जागेचा हवा तसा उपभोग घेता येणार नाही अथवा विकास प्रकल्प राबविता येणार नाही. याशिवाय पश्चिमेकडील क्षेत्रात जावयाचे झाल्यास डि.पी.रस्त्याचा वापर करावा लागेल.

दिनांक १३ फेब्रुवारी, २००८ रोजी मा.कार्यकारी अधिकारी, वरिष्ठ मुख्य अभियंता व इतर यांनी सादर जागेस भेट दिली. त्यावेळेस ज्यांची घरे व घराच्या जागा भूसंपादित होणार आहेत ते हजर होते. त्यांनी विनंती केली की, त्यांना तेथेच राहू द्यावे किंवा सर्व्हे नंबर १२६ मधील दक्षिण-पश्चिम कोपऱ्यात त्यांना त्यांची जशी जागा आहे तितक्याच क्षेत्राची जागा देण्यात यावी किंवा ज्यांची घरे आहेत त्यांना घरे बांधून द्यावीत किंवा रो-हौसिंगप्रमाणे इमारत बांधून त्यातील जागा देण्यात यावी. यावर मा.कार्यकारी अधिकारी यांनी सांगितले की, याबाबत त्यांचेकडून प्रस्ताव आल्यावर त्याबाबत मा.व्यवस्थापन समितीचे सभेत सदरहू प्रस्ताव सादर करुन त्यावर होणारे निर्णयांनुसार कार्यवाही करण्यात येईल. सदरहू निर्णयांबाबत सर्वांना विदीत करण्यात येईल.

**(इ)** मा.उपविभागीय अधिकारी, श्रीरामपूर भाग, श्रीरामपूर यांचे पत्राप्रमाणे आरक्षण क्रमांक ३४ बाबत सुधारीत प्रस्ताव ०० हे ५६ आर ५२.५९ चौमीचा प्रस्ताव पाठववयाचा आहे. त्यात सोडावयाची घराची जागा व मोकळी जागा यांचे क्षेत्र ०० हे १८ आर २८ चौमी विचारात घेता, फक्त ०० हे ३८ आर २४.५९ चौमीचा प्रस्ताव पाठवावा लागेल.

वर नमुद केलेले क्षेत्र भूसंपादनातून वगळण्यापूर्वी खालील बाबींचा विचार होणे उचित राहिल : **(०१)** आरक्षण क्रमांक ३४ मधील भूसंपादन करावयाच्या क्षेत्राच्या पूर्व बाजूस खालील खातेदाराच्या जमिनी श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डीने खरेदी केलेल्या आहेत :

| अ.नं. | खातेदाराचे नांव | सर्व्हे नंबर | खरेदी केलेले क्षेत्र हेक्टर-आर-चौमी |
|---|---|---|---|
| ०१ | श्री.लोढा पृथ्वीराज अमोलकचंद | १२५/६ | ०१-२०-०० |
| ०२ | श्री.लोढा सुवालाल अमोलकचंद | १२५/८ | ०१-२१-०० |
| ०३ | श्री.लोढा जसराज अमोलकचंद | १२५/७ | ०१-१६-०० |
| | | एकूण | ०३-५७-०० |

उपरोक्त क्षेत्र सोडल्यास आरक्षण क्रमांक ३४ मध्ये उर्वरित क्षेत्र ०० हे ३४ आर २४.२९ चौमी भूसंपादन केल्यावर भूसंपादीत होणारे क्षेत्र पश्चिमेस व संस्थानने खरेदी घेतलेले वरील क्षेत्र पुर्व बाजूस राहून मध्यभागी घरे राहणार आहेत. त्यामुळे संस्थानला दोन्ही जागेचा हवा-तसा उपभोग घेता येणार नाही किंवा विकास प्रकल्प राबविणेस अडचण येईल. याशिवाय पश्चिमेकडील क्षेत्रात जावयाचे झाल्यास डिपी रोडचा वापर करावा लागेल.

**(०२)** वर नमुद केलेले क्षेत्र वगळण्यापुर्वी मा. सहाय्यक संचालक, नगर रचना, अहमदनगर यांचा अभिप्राय घेणे कायद्याची त्रुटी राहू नये म्हणून उचित राहिल.

**(०३)** मा.सहाय्यक संचालक, नगररचना, अहमदनगर यांनी मान्यता दिल्यानंतर उपरोक्त जागा वगळणेबाबतचा प्रस्ताव मा.जिल्हाधिकारी, अहमदनगर यांना मा.उपविभागीय अधिकारी, श्रीरामपूर भाग, श्रीरामपूर यांचेमार्फत पाठविणे उचित राहिल.

**(०४)** सदर भूसंपादन वगळणेबाबतचा प्रस्ताव पाठविण्यापुर्वी ज्यांची घरे व घराची जागा वगळावयाची आहे त्यांच्याकडून त्यांच्या जागेचे भूसंपादनाचे प्रकरण चालू होते, आता त्यांच्या जागा वगळण्यात येत आहे परंतु केवळ भूसंपादनाचे प्रकरण चालू होते त्यामुळे कोणत्याही प्रकारची नुकसान भरपाईची मागणी करणार नाही, असे लेखी म्हणणे घेणे उचित व आवश्यक राहिल. (भूसंपादन कायदा,१८९४ चे कलम ४८(२))

**(०५)** भूसंपादनाचे प्रकरण चालू आहे. भूसंपादनातून संबंधितांच्या जमिनी वगळल्यातरी आस्थापना शुल्क शासनास द्यावे लागणार आहे. त्यासाठी आस्थापना शुल्काची रक्कम संबंधितांकडून वसूल करणे आवश्यक राहील.

**(ई)** तरी उपरोक्त बाबींचा विचार करुन, खाली बाबींवर निर्णय होणेस विनंती :

०१. आरक्षण क्रमांक ३४ मधील फक्त घर व घराची जागा विचारात घेता एकंदर १३ लोकांचे पुनर्वसन करणे आवश्यक राहील. सदरची घरे अनधिकृत असल्याने त्यांना घराची नुकसान भरपाई मिळणे संभव नाही. त्यांचे पुनर्वसन करणे ही कायदेशीर बाब नसली तरी मानवतेच्या दृष्टीने त्यांचे पुनर्वसन करणे योग्य होईल. बाधीत होणाऱ्या व्यक्तींनी समक्ष सांगितल्याप्रमाणे आरक्षण क्रमांक ३९ (क्षेत्र ४ हेक्टर ७५ आर ८७ चौमी) ही जागा भूसंपादनाने मिळणार आहे. त्यामधील सर्व्हे नंबर १२६ च्या दक्षिण पश्चिम कोपऱ्यात ज्याची घरे जाणार आहेत त्यांना त्यांची जेवढी जागा भूसंपादीत होते त्याप्रमाणे जागा देणे किंवा त्याठिकाणी रो-हाऊसिंगप्रमाणे घरे बांधून देणेबाबत धोरणात्मक निर्णय होणेची विनंती आहे. याप्रमाणे निर्णय झालेवर याबाबत सर्व्हेक्षण करुन व संबंधितांशी संपर्क साधून पुढील अहवाल मा. व्यवस्थापन समितीपुढे निर्णयार्थ सादर करणेत येईल. तसेच याबाबत शासनाची परवानगी मिळणेबाबत योग्य ती कार्यवाही करणेत येईल.

<u>अ.नं. ०१ प्रमाणे जागा देणे / घर बांधून देणेबाबतचा निर्णय झाल्यास खालील अ.नं.०२ ते अ.नं.०६ बाबत निर्णय होणेची आवश्यकता नाही .</u>

०२. मा.व्यवस्थापन समितीच्या दिनांक २८ जुलै, २००७ रोजीच्या सभेतील निर्णयानुसार आरक्षण क्रमांक ३४ मधील घरांची व घरालगतची जागा वगळून सुधारीत भूसंपादन प्रस्ताव मा.उपविभागीय अधिकारी, श्रीरामपूर भाग, श्रीरामपूर यांचेकडेस सादर करण्यांत यावा किंवा कसे.

०३. सलग पट्ट्यांत असलेली १३ घरे व त्यालगतची जागा ०० हे १५ आर अधिक त्याच पट्ट्यात येणारी ०४ खातेदारांची मोकळी जागा क्षेत्र ०० हे ०३ आर २८ चौमी असे एकूण क्षेत्र ०० हे १८ आर २८ चौमी जागा वगळणे अथवा न वगळणेबाबत.

०४. ज्यांची घरे व घरांच्या जागा वगळणेबाबत निर्णय झाल्यास, त्यांचेकडून त्यांचे जागेचे भूसंपादनाचे प्रकरण चालू होते आता त्यांच्या जागा वगळण्यांत येत आहेत परंतु केवळ भूसंपादनाचे

प्रकरण चालू होते त्यामुळे कोणत्याही प्रकारची नुकसान भरपाईची मागणी करणार नाही, असे लेखी हमीपत्र संबंधितांकडून घेणेकामी निर्णय होणेस विनंती.

०५. घरे व घरांलगतची जागा वगळावयाचा निर्णय झाल्यास संबंधितांकडून आस्थापना शुल्काची रक्कम वसूल करणे.

०६. आरक्षणातील जागा सोडणेबाबतच्या प्रस्तावात कायदेशीर त्रुटी राहू नयेत म्हणून मा. सहाय्यक संचालक, नगररचना, अहमदनगर यांचा अभिप्राय घेणेबाबत निर्णय होणेस विनंती.

**ब) आरक्षण क्रमांक ३९ बाबत**

(०१) आरक्षण क्रमांक ३९ बाबत थोडक्यात माहिती :

सर्व्हे नंबर १२४ व १२५ क्षेत्र ०४ हेक्टर ७५ आर ८७ चौरस मीटर श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांच्या विविध उपक्रमासाठी राखीव आहे. सदर क्षेत्रापैकी ०० हे ०१ आर जमीन विकत घेतली असल्याने आज रोजी ०४ हेक्टर ७४ आर ८७ चौरस मीटर जागा भूसंपादनाने घेणेबाबतचे प्रकरण मा.उपविभागीय अधिकारी, श्रीरामपूर भाग, श्रीरामपूर यांचेमार्फत चालू आहे.

मा.उपविभागीय अधिकारी, श्रीरामपूर भाग, श्रीरामपूर यांनी दिनांक ३१ जानेवारी, २००५ रोजीचे पत्रान्वये जमीनमालकांना द्यावयाच्या अंदाजित मोबदला रक्कम रुपये ६,९८,९५,७९४/- अधिक आस्थापना खर्चाची रक्कम रुपये १,७७,०२१/- मिळून एकूण रुपये ७,००,७२,८१५/- होत असून, त्याच्या ८० टक्के रक्कम रुपये ५,६०,५८,२५२/- मात्रची मागणी केलेली होती. त्यानुसार त्यांना दिनांक ०७ मे, २००५ रोजीचे पत्रान्वये मागणी केलेली रक्कम डिमांड ड्राफ्टने पाठविलेली आहे.

**(०२)** मा.व्यवस्थापन समितीच्या दिनांक १३ मार्च, २००५ रोजी झालेल्या बैठकीत घराखालील क्षेत्र न वगळण्याबाबत खालीलप्रमाणे निर्णय झालेला आहे :

आरक्षण क्रमांक ३९ मध्ये भू-संपादन क्षेत्रात येत असलेली घरे, बांधकामे व मोकळी जागा वगळणे यावर चर्चा झाली. संस्थानने भू-संपादीत केलेले क्षेत्र हे एकसारखे व चौरस असावे जेणेकरुन भविष्यात अशा चौरस जागेवरच संस्थानला सलग बांधकामे करता येतील व मोठे प्रकल्प राबविता येतील. त्यामुळे या भूसंपादन क्षेत्रात येणारी कोणतीही जागा / घरे भूसंपादनातून वगळू नयेत, असा निर्णय झाला. संस्थानने संपादीत केलेल्या क्षेत्रामुळे विस्थापीत होणाऱ्या विस्थापितांचे पुनर्वसनची जबाबदारी संस्थानवर नाही. परंतु त्यांचे पुर्नवसनाबाबत मा. नगराध्यक्ष, शिर्डी नगरपंचायत, शिर्डी यांनी असे विस्थापित होणारे लोकांशी चर्चा करुन त्यानंतर त्यांनी मा.अध्यक्ष, श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी व नगरपंचायत शिर्डी, मा.कार्यकारी अधिकारी, श्री साईबाबा संस्थान, शिर्डी व विस्थापित यांची संयुक्त बैठक घेऊन विचार विनिमय करता येईल, असे ही ठरले.

या निर्णयानुसारच सध्या मा.उपविभागीय अधिकारी, श्रीरामपूर भाग, श्रीरामपूर यांचेमार्फत भूसंपादन कार्यवाही सुरु आहे.

**(०३)** तथापि, याबाबत मा.व्यवस्थापन समितीच्या दिनांक २८ जुलै, २००७ रोजीच्या सभेत आरक्षण क्रमांक ३९ (संस्थानच्या विविध उपक्रमांसाठी अरिक्षत असलेले) मध्ये जी घरे येतात त्या घरांची जागा वगळणेबाबत तसेच संबंधीत मालकांच्या घरमालकांच्या घरालगतची मोकळी जागा वगळणेबाबत प्रस्ताव निर्णयार्थ सादर करणेत आला होता. सदर प्रस्तावाबाबत मा. व्यवस्थापन समितीचे सभेत चर्चा होऊन खालीलप्रमाणे निर्णय ५२८ अन्वये खालीलप्रमाणे निर्णय झालेला आहे

यावर सविस्तर चर्चा होऊन, आरक्षण क्र.३४ व ३९ मधील सलग घरांच्या पट्टयाची जागा व इतर घरांची असलेली जागा सर्वसाधारण तथा गरीब कुटूंबांची आहे. सदरची जागा भूसंपादित केल्यास सर्व कूटूंबिय विस्तापित होतील. करिता मानवतेचे दृष्टीकोनातून आरक्षण क्र.३४ व ३९ मधील सलग पट्टयातील व इतर घरांची जागा भूसंपादन प्रस्तावातून वगळण्यात यावी तसा प्रस्ताव भूसंपादन अधिकारी यांचेकडे पाठविण्यात यावा, असे ठरले.

**(अ) आरक्षण क्रमांक ३९ मध्ये घराबाबत सद्य:स्थिती खालीलप्रमाणे आहे :**

तक्ता क्रमांक ०१

| अ.नं. | तपशील | घरांची संख्या | मोकळया जागेसह घराचे क्षेत्र |
|---|---|---|---|
| **०१** | **ज्यांची नांवे ७/१२ ला असून त्यांची नावे मोजणीमध्ये आलेली आहेत** | **२६** | **०१ हे ३५ आर ८४ चौमी** |
| **०२** | **ज्यांची घरे आहेत परंतु त्यांचे नांवे ७/१२ ला नसल्याने त्यांचे क्षेत्र मोजणी तक्त्यात नमूद केलेले नाही** | **१०** | **--** |

**आरक्षण क्रमांक ३९ मधील सलग पट्टयांत येणाऱ्या घरांची माहिती :**

तक्ता क्रमांक ०२

| **अ.नं.** | **मोजणी नकाशा अ.क्र.** | **खातेदाराचे नांव** | **जुना सर्व्हे नंबर** | **नवा सर्व्हे नंबर** | **भूसंपादीत होणारे क्षेत्र हे-आर-चौमी** | **भूसंपादनातील बांधकाम व खुले क्षेत्र** |
|---|---|---|---|---|---|---|

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | **आरक्षण क्रमांक ३९** | | | | बांधकाम | खुले |
| ०१ | ०२ | जनाबाई दत्तात्रय तनपुरे | १२६/२अ/१ | १२६/२७ | ००-००-९४ | ००-००-९४ | ००-००-०० |
| ०२ | ०४ | जैयतूनबी दिलावरभाई बागवान | १२६/२अ/१/१ | १२६/२९ | ००-०१-०० | ००-०१-०० | ००-००-०० |
| ०३ | ०५ | समंदरखान कादरखान पठाण | १२६/२अ/१/२ | १२६/३० | ००-०१-०० | ००-०१-०० | ००-००-०० |
| ०४ | ०६ | सुर्यभान भिकाजी बढे<br>मंदाकिनी सुर्यभान बढे | १२६/२अ/१ | १२६/२७ | ००-०२-०० | ००-०१-०० | ००-०१-०० |
| ०५ | ०७ | सिंधुबाई पुंडलिक बढे | १२६/२अ/१ | १२६/२७ | ००-०१-०० | ००-००-७८ | ००-००-२२ |
| ०६ | ०८ | कमलबाई आसाराम निंबाळकर | १२६/२अ/१ | १२६/२७ | ००-०१-०० | ००-००-६५ | ००-००-३५ |
| ०७ | ०९ | भानुदास नथू भराटे | १२६/२अ/१ | १२६/२७ | ००-०१-०० | ००-००-६५ | ००-००-३५ |
| ०८ | १० | प्रकाश बाबुराव अडांगळे<br>विलास बाबुराव अडांगळे | १२६/२अ/१ | १२६/२७ | ००-०१-०० | ००-००-६५ | ००-००-३५ |
| ०९ | ११ | विजयेंद्र रामबिहार मिश्रा | १२६/२अ/१ | १२६/२७ | ००-०१-०० | ००-००-३५ | ००-००-६५ |
| १० | १२ | वासंती फकिरचंद राहाणे | १२६/२अ/१ | १२६/२७ | ००-०२-०० | ००-०२-०० | ००-००-०० |
| ११ | १३ | राजेंद्र विश्वनाथ सोनवणे | १२६/२अ/१ | १२६/२७ | ००-०२-०० | ००-०२-०० | ००-००-०० |
| १२ | १९ | महेश दत्तात्रय वैद्य | १२६/२अ/१ | १२६/२७ | ००-०१-०० | ००-००-८८ | ००-००-१२ |
| १३ | २० | सुमतीलाल पन्नालाल पिपाडा | १२६/२अ/१ | १२६/२७ | ००-०१-०० | ००-०१-०० | ००-००-०० |
| १४ | २१ | चंद्रभागाबाई नाथा कोते | १२६/२अ/१/४ | १२६/३३ | ००-०९-०० | ००-०१-०० | ००-०८-०० |
| १५ | २२ | उज्वला ज्ञानेश्वर भालेराव | १२६/२अ/१/४ | १२६/३३ | ००-००-५० | ००-००-२५ | ००-००-२५ |
| १६ | २३ | राजाराम नाथा कोते | १२६/२अ/१/४ | १२६/३३ | ००-०१-२५ | ००-००-०५ | ००-०१-२० |
| १७ | २४ | अनिल जनार्दन बटमुळे<br>मधुकर सखाराम चव्हाण | १२६/२अ/१ | १२६/२७ | ००-०१-०० | ००-०१-०० | ००-००-०० |
| १८ | २७ | मंगेश विश्वनाथ बिडकर | १२६/२अ/१ | १२६/२७ | ००-००-५० | ००-००-५० | ००-००-०० |
| १९ | २८ | अभिमन्यु खंडू डुबल | १२६/२अ/१ | १२६/२७ | ००-०१-०० | ००-०१-०० | ००-००-०० |
| २० | ३१ | मीना गिरधर इंगळे | १२६/२अ/४ | १२६/४० | ००-०२-०० | ००-००-९० | ००-०१-१० |
| २१ | ३६ | सुरेश बन्सीलाल जोशी | १२६/२अ/३ | १२६/३८ | ००-००-५० | ००-००-५० | ००-००-०० |
| २२ | ३९ | शंकर विश्वनाथ बिडकर | १२६/२अ/४ | १२६/४० | ००-००-६५ | ००-००-६० | ००-००-०५ |
| | | **एकुण -** | | | **००-३२-३४** | **००-१८-७०** | **००-१३-६४** |

( टिप : उपरोक्त तक्त्यातील अ.क्र. १४(२१) श्रीमती चंद्रभागाबाई नाथा कोते यांचे घराचे क्षेत्र वगळणे उचित होणार नाही कारण घराच्या जागेशिवाय ०८ आर जागा मोकळी आहे,ती संस्थानला मिळणे आवश्यक आहे.)

(ब) **आरक्षण क्रमांक ३९ मधील सलग पट्टयांत नसलेली घरे :**

तक्ता क्रमांक ०३

| अ.नं. | मोजणी नकाशा अ.क्र. | खातेदाराचे नांव | जुना सर्व्हे नंबर | नवा सर्व्हे नंबर | भूसंपादीत होणारे क्षेत्र हे-आर-चौमी | भूसंपादनातील बांधकाम व खुले क्षेत्र | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | **आरक्षण क्रमांक ३९** | | | | बांधकाम | खुले |
| ०१ | २२ | महेश जगन्नाथ मेडू | १२६/२अ/४ | १२६/४० | ००-०३-०० | ००-०३-०० | ००-००-०० |
| ०२ | | अनिल चंद्रकांत मेहता व इतर ०६ | १२६/१अ/५ | १२६/६ | ००-९८-०० | ००-०४-८० | ००-९३-२० |
| ०३ | ४५ | सुरेश बन्सीलाल जोशी | १२६/२अ/८ | १२६/४५ | ००-००-५० | ००-००-५० | ००-००-०० |
| ०४ | ४४ | लिलावती सुदाम शेळके | १२६/२अ/५ | १२६/३३ | ००-०२-०० | ००-००-९० | ००-०१-१० |
| | | **एकुण -** | | | **०१-०३-५०** | **००-०९-२०** | **००-९४-३०** |

(क) आरक्षण क्रमांक ३९ मधील खाली नमुद केलेल्या खातेदारांची घरे भूसंपादित होत आहेत. ती घराच्या सलग पट्टयांत नाही तसेच त्यांची नांवे ७/१२ उताऱ्यावर नाहीत. संयुक्त मोजणी नकाशा व तक्त्यात समाविष्ट नाहीत. सदरची घरे विखुरलेल्या स्थितीत आहेत :

तक्ता क्रमांक ०४

| अ.नं | खातेदाराचे नांव | सर्व्हे नंबर | भूसंपादीत होणारे क्षेत्र हे-आर-चौमी | भूसंपादनाम ध्ये घर आहे किंवा नाही | भूसंपादनातील बांधकाम व खुले क्षेत्र | |
|---|---|---|---|---|---|---|
| | **आरक्षण क्रमांक ३९** | | | | बांधकाम | खुले |
| ०१ | दुर्गाप्रसाद गोंविद पांडे | घर आहे परंतु जमीन अनिल मेहता यांचे नांवावर आहे. | | | | |
| ०२ | गणेश रामनाथ खरे | घर आहे परंतु जमीन अनिल मेहता यांचे नांवावर आहे. | | | | |
| ०३ | कैलास एकनाथ देशमुख | घर आहे परंतु जमीन अनिल मेहता यांचे नांवावर आहे. | | | | |
| ०४ | विलास एकनाथ देशमुख | घर आहे परंतु जमीन अनिल मेहता यांचे नांवावर आहे. | | | | |
| ०५ | सगुणा राजेंद्र देशमुख | घर आहे परंतु जमीन अनिल मेहता यांचे नांवावर आहे. | | | | |
| ०६ | उदय सुदाम देशमुख | घर आहे परंतु जमीन अनिल मेहता यांचे नांवावर आहे. | | | | |
| ०७ | शंकर माणिक गोसावी | घर आहे परंतु जमीन अनिल मेहता यांचे नांवावर आहे. | | | | |
| ०८ | सुमन राजकुमार अग्रवाल | घर आहे परंतु जमीन अनिल मेहता यांचे नांवावर आहे. | | | | |

| | | |
|---|---|---|
| ०९ | हिरामण वामन वारुळे | घर आहे परंतु जमीन नांवावर नाही. |
| १० | अशोक पंढरीनाथ घुगे | घर आहे परंतु जमीन नांवावर नाही. |

०१) ज्यांची नांवे ७/१२ला नाहीत परंतु त्यांची घरे आहेत अशा व्यक्तींची जमीन त्यांच्या नावावर नसली तर ज्यांच्या नांवावर आहे ती भूसंपादीत होणार आहे. त्यामुळे ज्याच्या नावावर जमीन नाही त्यांचे बाबतीत निर्णय घेणे आवश्यक आहे. ( परिच्छेद क मधील तक्ता क्रमांक ०४)

०२) आरक्षण क्रमांक ३९ च्या पुर्व बाजूस आरक्षण क्रमांक ३४ आहे. त्यातील श्री.लोढा यांची जमीन ०३ हे ६० आर खरेदी केलेली आहेत. ते आरक्षण दवाखाना विस्तारीकरणासाठी आहे. आरक्षण क्रमांक ३९ मधील ०१ हे ०९ आर जमीन श्री.झुंबरलाल चुनिलाल लोढा यांचेकडून विकत घेतली असून त्या ठिकाणी मध्यवर्ती भांडार इमारतीचे बांधकाम केलेले आहे. घराची जागा सोडल्यास आरक्षण क्रमांक ३९ चे दोन भाग होतील. त्यामुळे ज्याच्या घराची जागा सोडली आहे त्यांना संस्थान हद्दीतून पुर्वेकडे व पश्चिमेकडे रस्ता देणे आवश्यक राहिल. सदरची व्यवस्था डी.पी.रोड होत नाही तो पर्यत अंमलात ठेवणे आवश्यक राहील.

०३) आरक्षणातील जागा सोडणेबाबतच्या प्रस्तावात कायदेशीर त्रुटी राहू नयेत म्हणून मा.सहाय्यक संचालक, नगररचना, अहमदनगर यांचा अभिप्राय घेणे उचित राहील.

०४) सदर भूसंपादन वगळणेबाबतचा प्रस्ताव पाठविण्यापुर्वी ज्यांची घरे व घराची जागा वगळावयाची आहे त्यांच्याकडून त्यांच्या जागेचे भूसंपादनाचे प्रकरण चालू होते, आता त्यांच्या जागा वगळण्यात येत आहे.परंतु केवळ भूसंपादनाचे प्रकरण चालू होते त्यामुळे कोणत्याही प्रकारची नुकसान भरपाईची मागणी करणार नाही, असे लेखी म्हणणे घेणे उचित व आवश्यक राहिल. (भूसंपादन कायदा,१८९४ चे कलम ४८(२))

०५) वर नमुद केलेल्या खातेदारांची जागा भूसंपादनाने घेणेचे प्रकरण मा. उपविभागीय अधिकारी, श्रीरामपूर भाग, श्रीरामपूर यांचे मार्फत चालू आहे. भूसंपादनातून संबंधितांच्या जमिनी वगळल्यातरी आस्थापना शुल्क शासनास द्यावे लागणार आहे. त्यासाठी आस्थापना शुल्काची रक्कम संबंधितांकडून वसूल करणे आवश्यक राहील.

**(ड)आरक्षण क्रमांक ३९ मधील भूसंपादनामध्ये येणारी घरे व घरांच्या जागेबाबतचा गोषवारा**

तक्ता क्रमांक ०५

| अ.नं. | तपशील | एकूण खातेदारांची संख्या | भूसंपादनाखालील क्षेत्र | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | बांधीव हे-आर-चौमी | खुले हे-आर-चौमी | एकूण हे-आर-चौमी |
| ०१ | सलग पट्टयातील घरे - तक्ता क्रमांक (अ) ०२ | २२ | ००-१८-७० | ००-१३-६४ | ००-३२-३४ |
| ०२ | तक्ता क्रमांक (अ)०२ मधील अ.नं. १४(२१) मधील श्रीमती चंद्रभागा नाथा कोते यांचे घराचे क्षेत्र ०० हे ०१ आर विचारात घेऊन मोकळी जागा ०० हे ०८ आर भूसंपादनाने घेणे आवश्यक राहिल त्यामुळे ते वजा जाता क्षेत्र सलग पट्टयातील घरांचे क्षेत्र | २२ | ००-१८-७० | ००-०५-६४ | ००-२४-३४ |
| ०३ | सलग पट्टयात नसलेली घरे - तक्ता क्रमांक (ब) ०३ | ०४ | ००-०९-२० | ००-९४-३० | ०१-०३-५० |
| | एकूण | २६ | ००-२७-९० | ००-९९-९४ | ०१-२७-८४ |

याव्यतिरिक्त १० खातेदारांची (तक्ता क्रमांक (क) - ०४) घरे आहेत, परंतु त्यांच्या नांवाने ७/१२ उतारा नाही. त्यामुळे त्यांचे क्षेत्र माहिती नाही.

दिनांक १३ फेब्रुवारी, २००८ रोजी मा.कार्यकारी अधिकारी, वरिष्ठ मुख्य अभियंता व इतर यांनी सादर जागेस भेट दिली. त्यावेळेस ज्यांची घरे व घराच्या जागा भूसंपादित होणार आहेत ते हजर होते. त्यांनी विनंती केली की, त्यांना तेथेच राहू द्यावे किंवा सर्व्हे नंबर १२६ मधील दक्षिण-पश्चिम कोपऱ्यात त्यांना त्यांची जशी जागा आहे तितक्याच क्षेत्राची जागा देण्यात यावी किंवा ज्यांची घरे आहेत त्यांना घरे बांधून द्यावीत किंवा रो-हौसिंगप्रमाणे इमारत बांधून त्यातील जागा देण्यात यावी. यावर मा.कार्यकारी अधिकारी यांनी सांगितले की, याबाबत त्यांचेकडून प्रस्ताव आल्यावर त्याबाबत मा.व्यवस्थापन समितीचे सभेत सदरहू प्रस्ताव सादर करुन त्यावर होणारे निर्णयांनुसार कार्यवाही करण्यात येईल. सदरहू निर्णयांबाबत सर्वांना विदीत करण्यात येईल.

**(इ)** उपरोक्तप्रमाणे मा. व्यवस्थापन समितीचे झालेले विविध निर्णय व इतर बाबींचा विचार करुन खालील बाबींचा सविस्तर निर्णय होणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होताः

०१. आरक्षण क्रमांक ३९ मधील फक्त घर व घराची जागा विचारात घेता एकंदर २६ लोकांचे पुनर्वसन करणे आवश्यक राहील. सदरची घरे अनधिकृत असल्याने त्यांना घराची नुकसान भरपाई मिळणे संभव नाही. त्यांचे पुनर्वसन करणे ही कायदेशीर बाब नसली तरी मानवतेच्या दृष्टीने त्यांचे पुनर्वसन करणे योग्य होईल. बाधीत होणाऱ्या व्यक्तींनी समक्ष सांगितल्याप्रमाणे आरक्षण क्रमांक ३९ (क्षेत्र ४ हेक्टर ७५ आर ८७ चौमी) ही जागा भूसंपादनाने मिळणार आहे. त्यामधील सर्व्हे नंबर १२६ च्या दक्षिण पश्चिम कोपऱ्यात ज्याची घरे जाणार आहेत त्यांना त्यांची जेवढी जागा भूसंपादीत होते त्याप्रमाणे जागा देणे किंवा त्याठिकाणी रो-हाऊसिंगप्रमाणे घरे बांधून देणेबाबत धोरणात्मक निर्णय होणेची विनंती आहे. याप्रमाणे निर्णय झालेवर याबाबत सर्व्हेक्षण करुन व संबंधितांशी संपर्क साधून पुढील अहवाल मा. व्यवस्थापन समितीपुढे निर्णयार्थ सादर करणेत येईल. तसेच याबाबत शासनाची परवानगी मिळणेबाबत योग्य ती कार्यवाही करणेत येईल.

०२. **परिच्छेद क** मध्ये नमूद केलेली घरे भूसंपादीत होत आहेत, पण ती घरे सलग पट्ट्यांत नाहीत तसेच त्यांची नांवे ७/१२ उताऱ्यावर नाहीत. संयुक्त मोजणी नकाशात व तक्त्यात त्यांची नांवे समाविष्ट नाहीत. सदरचे १० खातेदारांची जागा / घरे वगळणे अथवा न वगळणे.

अ.नं. ०१ प्रमाणे जागा देणे व घर बांधून देणेबाबतचा निर्णय झाल्यास खालील अ.नं. ०३ ते ०५ बाबत निर्णय होणेची आवश्यकता नाही.

०३. ज्यांची घरे व घरांच्या जागा वगळणेबाबत निर्णय झाल्यास, त्यांचेकडून त्यांचे जागेचे भूसंपादनाचे प्रकरण चालू होते आता त्यांच्या जागा वगळण्यांत येत आहेत परंतु केवळ भूसंपादनाचे प्रकरण चालू होते त्यामुळे कोणत्याही प्रकारची नुकसान भरपाईची मागणी करणार नाही, असे लेखी हमीपत्र संबंधितांकडून घेणे.

०४. घरे व घरांलगतची जागा वगळावयाचा निर्णय झाल्यास संबंधितांकडून आस्थापना शुल्काची रक्कम वसूल करणे अथवा न करणेबाबत निर्णय होणेस विनंती.

०५. आरक्षणातील जागा सोडणेबाबतच्या प्रस्तावात कायदेशीर त्रुटी राहू नयेत म्हणून मा. सहाय्यक संचालक, नगररचना, अहमदनगर यांचा अभिप्राय घेणे

मा. कार्यकारी अधिकारी यांनी सादर केलेल्या आरक्षण क्रमांक ३४ व ३९ मधील भूसंपादन प्रस्तावाच्या अहवालावर सविस्तर चर्चा करणेत आली. आरक्षण क्रमांक ३४ व ३९ मध्ये जी घरे व घरालगतच्या जागा आहेत, ती घरे व जागा भूसंपादनाचे प्रस्तावातून वगळल्यास संस्थानला सलग जमिनीचा पट्टा मिळणार नाही. सदरहू घरे व जागा जमिनीच्या मध्यभागी असल्याने, ही जागा सोडल्यास जमिनीचे सरळ-सरळ दोन भागांत विभाजन होईल. त्यामुळे संस्थानला या ठिकाणी रुग्णालय अथवा इतर एखादा मोठा विकास प्रकल्प राबविणे शक्य होणार नाही.

आरक्षण क्रमांक ३४ मध्ये ज्या १३ खातेदारांची घरे व घरालगत जमिनी आहेत ती अनाधिकृत आहेत. त्यामुळे त्यांना घरांची नुकसान भरपाई मिळणे असंभव आहे. आरक्षण क्रमांक ३९ मधील ३६ खातेदारांपैकी २६ खातेदारांची घरे अनाधिकृत आहेत तर १० खातेदारांची घरे अनाधिकृत असून ७/१२ वर त्यांची नांवे देखील नाहीत. या सर्व अनाधिकृत ३६ खातेदारांना घरांची नुकसान भरपाई मिळणे असंभव आहे. या सर्व खातेदारांचे पुनःर्वसन करणे ही बाब कायदेशीर नसली तरी मानवतेच्या दृष्टीकोनातून त्यांचे पुनःर्वसन करणे उचित व योग्य राहिल. आरक्षण क्रमांक ३४ व ३९ मध्ये ज्या खातेदारांची घरे व घरालगतच्या जागा भूसंपादीत होत आहे, ते सर्व खातेदार सर्वसाधारण आर्थिक परिस्थिती असणारे आहेत. आजचे जमिनीचे बाजारभाव पाहतां या विस्थापित होणाऱ्या खातेदारांना शिर्डी व शिर्डी परिसरात पुन्हा जागा खरेदी करुन घरे बांधणे आर्थिकदृष्टया परवडणारे तर नाहीच व आवाक्याबाहेरचे आहे. या सर्व बाबींचा विचार करता, मानवतेच्या दृष्टीकोनातून सदरहू खातेदारांचे पुनःर्वसन करणे उचित ठरते.

आरक्षण क्रमांक ३९ मधील ४ हे ७६ आर ८७ चौमी जमीन संस्थानला भूसंपादनाने मिळणार आहे. या जमिनीचे दक्षिण पश्चिम कोपऱ्यामधील सर्व्हे नंबर १२६ पैकी मधील क्षेत्रामध्ये सर्व सोयींनीयुक्त अशी रो-हाऊसिंग सोसायटीप्रमाणे घरे बांधून देता येतील. तथापि यासाठी विस्थापित होणाऱ्या खातेदारांनी त्यांना मिळणारी नुकसान भरपाईची रक्कम संस्थानकडे जमा करणे आवश्यक राहिल.

वर नमुद केल्याप्रमाणे विस्थापितांचे पुनःर्वसन करण्यापुर्वी संबंधित खातेदारांकडून तसा प्रस्ताव येणे आवश्यक आहे. असा प्रस्ताव प्राप्त झालेनंतर त्याबाबत सविस्तर निर्णय घेता येईल. तसेच असा प्रस्ताव मंजूर झालेनंतर कायदेशीर बाबींची पुर्तता करणेसाठी सदरहू प्रस्ताव मान्यतेस्तव सक्षम अधिकाऱ्याकडे, शासनाकडे पाठविणे आवश्यक राहील. अशा प्रकारचे प्रस्ताव सादर करणेसाठी मा.कार्यकारी अधिकारी यांना अधिकार प्रदान करण्यात येत आहे.

आरक्षण क्रमांक ३४ व ३९ बाबत भूसंपादनाची कार्यवाही मा.उपविभागीय अधिकारी, श्रीरामपूर भाग, श्रीरामपूर यांचेमार्फत सुरु आहे. याकामी मा. उपविभागीय अधिकारी, श्रीरामपूर भाग, श्रीरामपूर यांनी कळविल्याप्रमाणे आरक्षण क्रमांक ३४ व आरक्षण क्रमांक ३९ बाबत सुधारीत भूसंपादन प्रस्ताव सादर करण्यात यावा.

(कार्यवाही-बांधकाम विभागप्रमुख)

**विषय नं.२३** **शिर्डी गावचे वेशीचे पुनरबांधणी/ नुतणीकरण करणेबाबत.**

**निर्णय क्र.४३६** शिर्डी गावातील ॲड.कोते व इतर रहिवाशी यांनी दि.३१ जुलै २००७ चे अर्जान्वये तसेच श्री.प्रमोद गोंदकर यांनी २० सप्टेंबर २००६ अन्वये " **गाव वेशीचे** " बांधकाम लवकरात लवकर सुरु करावे असे कळविले आहे.

शिर्डी गावाची वेस मारुती मंदिराजवळ होती असे समजते. याकामी वेस कोणत्या ठिकाणी होती, कशा स्वरूपाची होती, वेशीचे अंदाजे मोजमाप, वेशीची जुनी छायाचित्रे इत्यादी अनुषंगीक माहीती शिर्डी न.पं. शिर्डी यांचेकडुन घेणेस व जुनी छायाचित्रे उपलब्ध करुन माहीती संकलीत झाल्यानंतर पुरातन वास्तु क्षेत्रातील काही निवडक वास्तुविशारदाकंडून वेशीची पुर्नबांधणी / नूतनीकरण करणेसाठी बांधकाम आराखडे व खर्चाचे अंदाजपत्रके मागविणेस मा.व्यवस्थापन समितीचे दि.२८/०७/२००७ नि.क्र.५२७ अन्वये मान्यता देण्यात आली आहे.

आर्किटेक्ट बीपीन बोन्दे, हेमंत देवरे नाशिक यांनी वेशीचे प्लॅन व रु. ४,५०,५००.०० मात्रचे अंदाजपत्रक सादर केले असून त्यास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, **त्यास मान्यता देण्यात आली.**

**मंदिर परीसरास सुसंगत अशी वेस करण्यात यावी. याकामी आर्किटेक्ट यांचेकडून कोटेशन पत्र तयार करुन विहीत पध्दतीने कोटेशन मागावून काम पूर्ण करुन घेण्यात यावे, असे ठरले.** **(कार्यवाही-बांधकाम विभागप्रमुख)**

**विषय नं.२४** **मौजे पांढुर्ली येथील पालखी थांब्याचे बांधकामाकरिता मुदतवाढ मिळणेबाबत.**

**निर्णय क्र.४३७** मौजे पांढुर्ली ता. सिन्नर येथील गट नं.१९ मधील ४९ आर जमिन संस्थानला बक्षिस पत्राने मिळालेल्या जागेमध्ये पालखी थांब्याचे बांधकाम ठेकेदार मे.एन.एस.बनकर पाटील ॲण्ड कंपनी, श्रीरामपूर यांना उपरोक्त संदर्भिय कार्यादेशान्वये देण्यात आले आहे.

निविदेतील करारनाम्यानुसार काम सुरु करण्याची दिनांक ०१.१०.२००७ अशी असून काम पूर्ण करण्याची मूदत सहा महिने म्हणजेच दि. ३१.०३.२००८ अखेर होती. ठेकेदार यांची काम पूर्ण करण्याची मूदत ३१ मार्च २००८ रोजी संपुष्ठात आली असून ठेकेदार यांनी दि. १९/०४/२००८ व दि. १८.०५.२००८ पत्र्यान्वये त्यांना काम सुरु करतेवेळेस सदर कामाचा ले आऊट टाऊन प्लानींग ऑफीस मधून मंजूर होणेस विलंब झाला तसेच सदर ठिकाणी खडी, वाळू, मुरुम इ. बांधकाम साहित्य उपलब्ध करणेकरीता अडचणी आल्याने तसेच मजुरांची कमतरता याबाबींचा कामाच्या गतीवर परिणाम झाल्याने दि. ३०.०८.२००८ पर्यंत मूदतवाढ मिळणेबाबत विनंती केली आहे.

ठेकेदार यांनी पालखी थांब्याचे पूर्ण केलेली कामे व अपूर्ण असलेली कामे खालीलप्रमाणे

| अ.क्र. | कामाचे नांव | पूर्ण केलेल्या कामाचा तपशिल | बाकी असलेली कामे |
|---|---|---|---|
| ०१ | मुख्य शेड | प्लींथ लेव्हलपर्यंतचे काम पूर्ण | स्ट्रक्चरल स्टील, फ्लोरींग व रुफींग |
| ०२ | टॉयलेट ब्लॉक | आर.सी.सी., बांधकाम प्लास्टर इ. कामे पूर्ण | प्लंबींग फ्लोरींग व रंगकाम कामे बाकी |
| ०३ | किचन | प्लींथ लेव्हलपर्यंतचे काम पूर्ण | फ्लोरींग, स्ट्रक्चरल स्टील व रुफींगचे काम बाकी |
| ०४ | स्टोअर रुम | आर.सी.सी.वर्क, बांधकाम प्लास्टर इ. कामे पूर्ण | फ्लोरींग, वाटरप्रुफींग व रंगकाम बाकी |
| ०५ | कंम्पाऊंड भिंत | कम्पाउंड भिंतीचे दगडी बांधकाम पूर्ण | चेनलिंक चाळी बसविणेचे काम बाकी |
| ०६ | लॅण्ड डेव्हलपमेंट | -- | काम बाकी |
| ०७ | इलेक्ट्रीफीकेशन | -- | काम बाकी |

याबाबत मे. आर्किटेक्ट निकम पाटील यांचा मूदतवाढीबाबत अभिप्राय घेण्यात आला आहे. ठेकेदार यांना खडी, वाळू, स्टिल इ. बांधकाम साहित्य उपलब्ध करणेकरीता अडचणी आल्याने व अचानक मजुरांची कमतरता आल्यामुळे ठेकेदार यांना उर्वरीत कामे पूर्ण करणेकरीता दिनांक १५/०७/२००८ अखेर मूदतवाढ देणेबाबत आर्किटेक्ट यांनी दि. ३०.०४.२००८ चे पत्रान्वये शिफारस केली आहे.

तरी वरील अडचणी विचारात घेता तसेच आर्किटेक्ट यांचे शिफारसी नुसार ठेकेदार यांना दिनांक १५/०७/२००८ अखेर मूदतवाढ देण्यास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

**यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त ठेकेदार यांना दिनांक १५.०८.२००८ अखेर अंतिम मुदतवाढ देण्यात यावी. त्यापूढे त्यांनी मुदतवाढ मागीतल्यास दंड आकारणी करण्यात यावी, असे ठरले.** (कार्यवाही-बांधकाम विभागप्रमुख)

**विषय नं.२५** **संस्थान निधीतून पाहेगांव -सोनेवाडी ते सावळीविहीर या रस्त्याचे मजबुतीकरणासह डांबरीकरण करणेबाबत.**

**निर्णय क्र.४३८** (अ) मा.सरपंच, ग्रामपंचायत सोनेवाडी, तालुका कोपरगांव, जिल्हा अहमदनगर यांनी त्यांचेकडील दिनांक नसलेल्या परंतु इकडील कार्यालयास दिनांक १९ मार्च, २००८ रोजी प्राप्त झालेल्या पत्रानुसार खालीलप्रमाणे कळविलेले आहे :

"‥ ‥ पोहेगांव ते सावळीविहीर रस्ता हा ०८ कि.मी. असून सदरच्या रस्त्याची दयनिय अवस्था आहे. सदर रस्त्याला मुंबई, दादर, ठाणे, वसई, घाटघर, पालघर इ. ठिकाणाहून शिर्डी येथे साईबाबांच्या दर्शनासाठी येतात. सदर पालखी रस्ता हा पोहेगांव, सोनेवाडी मार्गे सावळीविहीर शिर्डी येथे जातात. सदरचा रस्त्याला पायी-पायी जाण्यासाठी सुध्दा चांगला नाही. सदरच्या रस्त्याने दरवर्षी २५ ते ३० दिंडया शिर्डी येथे जातात. प्रत्येक दिंडीमध्ये १००० ते ५००० पर्यंत लोक असतात. मुंबईहून पायी येत असल्यामुळे साई भक्त थकलेले असतात. तसेच त्यांच्या पायांना फोड आलेले असतात. रस्ता खराब असल्यामुळे साई भक्तांना पायी चालतांना त्यांना फार त्रास होतो. तरी कृपया सदरचा पालखी रस्त्याचे काम मंजुर करुन काम सुरु करण्यात यावे, ही विनंती. "

सदरहू पत्रावर सरपंच, ग्रामपंचायत सोनेवाडी यांचेसह मौजे सोनेवाडी येथील सुमारे ३४ ग्रामस्थांच्या स्वाक्षऱ्या आहेत. तसेच सदरहू पत्रासोबत विषयांकित रस्ता डांबरीकरण अथवा दुरुस्त करणेबाबत खाली नमूद केलेल्या पालखी मंडळांचे विनंती पत्रे जोडलेली आहेत :

०१. मा. सेक्रेटरी, श्री साई दर्शन मंडळ (मुंबई), परेळ, मुंबई - १२.
०२. मा. अध्यक्ष, श्री श्रध्दा सबुरी सेवा मंडळ, दादर, मुंबई - २८.
०३. श्री साईभक्त मंडळ (वरळी गांव), वरळी कोळीवाडा, मुंबई - ३०.
०४. मा.अध्यक्ष, ए.व्ही.एम.साईभक्त मित्रमंडळ, आंबेवाडी, मुंबई - ३३.
०५. मा.सरचिटणीस, साईलीला मंडळ, मुंबई (रजि.) लालबाग, मुंबई - १२.

(ब) मा.सरपंच, ग्रामपंचायत सोनेवाडी, तालुका कोपरगांव यांनी विषयांकित रस्त्याचे डांबरीकरण करणेबाबतच्या पत्राच्या प्रती खाली नमूद केल्याप्रमाणे मा.व्यवस्थापन समितीच्या सदस्यांना पाठविलेल्या असून संबंधित सदस्यांनी त्यावर खालीलप्रमाणे अभिप्राय दिलेल्या आहेत :

| अ.नं. | तपशील | पत्र क्रमांक व दिनांक | अभिप्राय |
|---|---|---|---|
| ०१ | मा. श्री. शंकरराव गेणूजी कोल्हे, उपाध्यक्ष, श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी. | संजी/कोप/२००७-०८/पीए /६/१०३९७/१३३०३, दिनांक ०४ मार्च, २००८. | पोहेगांव सोनेवाडी ते सावळीविहीर रस्त्याने मुंबई, दादर, ठाणे, वसई, घाटघार, पालघर इत्यादी ठिकाणाहून हजारो साईभक्तांच्या दिंडया येत असल्याने परंतु सदरचा रस्ता अतिशय खराब असल्याने साईभक्तांच्या सोयीच्या दृष्टीने या रस्त्याचे डांबरीकरण करणे अत्यंत गरजेचे आहे. तेव्हा आपण याकामी स्वतः लक्ष देऊन, या रस्त्याचे डांबरीकरणाचे काम करणेकामी मिटींगमध्ये मंजुरी घेऊन, निविदा बोलावून पुढील उचित कार्यवाही राबवावी. |
| ०२ | मा.आ. श्री.जयंत ससाणे, अध्यक्ष, श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी. | सरपंच, ग्रामपंचायत सोनेवाडी यांचे पत्रावर अभिप्राय दिलेला असून सदरहू पत्र दिनांक २१ मार्च, २००८ रोजी इकडील कार्यालयास प्राप्त झालेले आहे. | श्री.मोरे सो., सभेपुढे ठेवणे. |
| ०३ | मा.आ.श्री.राधाकृष्ण विखे पाटील, विश्वस्त, श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी. | जा. क्र. ३३५/१/८५ /२००८, दिनांक १८ मार्च, २००८. | पोहेगांव-सोनेवाडी ते सावळीविहीर या पालखी रस्त्याचे डांबरीकरण झाल्यास भाविकांची होत असलेली गैरसोय दूर होणार आहे. कृपया पोहेगांव-सोनेवाडी ते सावळीविहीर या रस्त्यांचे तातडीने डांबरीकरण करण्याकरीता कार्यवाही करुन सहकार्य करावे. |

(क) उपरोक्त परिच्छेदांत विवेचन केल्यानुसार, ग्रामपंचायत सोनेवाडी यांनी पोहेगांव-सोनेवाडी ते सावळीविहीर या ०८ किलोमीटर रस्त्याने मुंबई व मुंबई परिसरातून येणाऱ्या साईभक्त

पालखी पदयात्री भक्तांच्या सोयीसाठी सदरहू रस्त्याचे डांबरीकरण संस्थानमार्फत करण्यात यावे, अशी विनंती केलेली आहे.

**विषयांकित रस्त्याचे मजबुतीकरण व डांबरीकरण करणेसाठी श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी अधिनियम २००४ मधील तरतुदीस अनुसरुन शासनाची मान्यता घेणे आवश्यक राहील. यासाठी मा.व्यवस्थापन समितीची तत्वत: मान्यता मिळालेस सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत सदरहू रस्त्याचे मजबुतीकरणासह डांबरीकरण करणेसाठी अंदाजित खर्चाचे अंदाजपत्रक तयार करुन घेता येईल. तद्नंतर मा.शासनाचे मान्यतेस्तव सदरहू प्रस्ताव सादर करता येईल असा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही-बांधकाम विभागप्रमुख)

**विषय नं.२६ मौजे पांगरी येथील संस्थानचे जागेत साईभक्तांसाठी आणखी एक शेड उभारणे बाबत**

**निर्णय क्र.४३९** मौजे पांगरी ता. सिन्नर येथील सर्व्हे नं. ५१९/अ/१ पैकी,२० आर क्षेत्र हे श्रीमती बबाबाई पांडूरंग पांगारकर यांनी संस्थानला बक्षीस पत्राने दिलेली आहे. सदरचे जागेत साईभक्त श्री सुजीत समीर बॅनर्जी, न्यु दिल्ली यांनी साईभक्तासांठी पालखी विसावा उभारणेसाठी अंदाजे पाच लक्ष मात्रचे विसावा शेड, किचन शेड, स्त्री व पुरुषांसाठी टॉयलेट, स्टोअर, रुम, तसेच पिण्याचे पाण्याची टाकी इ. संस्थानचे परवानगीने बांधून दिले आहे.

उपरोक्त संदर्भिय पत्रान्वये श्री.जे. सुब्रमणियन, चेन्नई यांनी संस्थानचे पांगरी पालखी थांब्याच्या उर्वरीत जागेत रुपये ३,२५,०००.०० पर्यंतचे पत्राशेड बांधण्याची इच्छाव्यक्त केली आहे. तसेच सदरचे काम त्यांचेमार्फत खाजगी कंत्राटदार नेमून करुन घेता येईल असे कळविले आहे.पांगरी येथिल पालखी विसावा जागा मुंबई- नागपुर एक्सप्रेस हायवे लगत आहे.त्यामुळे नगररचना नियमानुसार रोड मध्यापासुन ५० मिटर अंतर सोडुन उरलेल्या जागेत नकाशाप्रमाणे (१३ मि.X ९ मि.)साईजचे शेड बांधता येईल. त्यासाठी त्याठिकाणी असलेली तिन आंब्याची झाडे (सध्या फळे देणारी) काढावी लागतील. १३ मि.x९ मि. साईजचे पत्रा शेड बनवणेसाठी अंदाजे रुपये ३,२५,०००.०० मात्र खर्च येईल.

**सदरचे शेड बांधकामासाठी ड्रॉईंग्ज व स्पेसिफीकेशन्स संस्थान पॅनेलवरील आर्किटेक्ट यांचे मार्फत तयार करुन श्री. जे. सुब्रमणियन यांना देऊन त्यानुसार शेडचे बांधकाम करणेबाबत त्यांना कळविता येईल असा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही-बांधकाम विभागप्रमुख)

**विषय नं.२७ श्री साईबाबा हॉस्पिटलमधील प्रशासकीय आणि जनसंपर्क कार्यालयातील अंतर्गत सजावट व फर्निचर काम करणे बाबत**

**निर्णय क्र.४४०** संस्थानचे श्री साईबाबा हॉस्पिटल वैद्यकीय संचालक यांनी प्रशासकीय कार्यालय, जनसंपर्क कार्यालय, मार्केटींग मॅनेजर इ. ठिकाणी फर्निचर तयार करुन मिळणे बाबत इकडील विभागास कळविण्यात आले आहे. त्यानुसार इकडील विभागामार्फत साईटवर प्रत्यक्ष पहाणी करण्यात आली असून, सदरहू काम हे मोठ्या स्वरुपाचे असल्यामुळे संस्थान पॅनलवरील आर्किटेक्ट शितल जोशी, श्रीरामपूर यांचेकडून प्लॅन एस्टिमेट निविदा तयार करुन घेण्यात आले आहे.

याकामी आर्किटेक्ट शितल जोशी यांना इकडील जा.क्र. १८६६३/२००७ दि. २२/११/२००७ रोजी प्लॅन व एस्टिमेट तयार करणेबाबत कळविण्यात आले होते. त्यानुसार आर्किटेक्ट शितल जोशी यांनी प्लॅन व एस्टिमेट तयार केले असून सदरहू प्लॅन मा. वैद्यकीय संचालक यांचेशी समक्ष चर्चा व पहाणी करुन दि. १२/०४/२००८ रोजी फायनल केले. त्यानंतर वैद्यकीय संचालक यांनी सदर कामात त्यांचे कार्यालय, दंत विभाग, पार्टीशन कॅज्युलीटीसाठी बिलींग कांउटर इ. कामांचा समावेश करावा असे कळविले होते. त्यानुसार आर्किटेक्ट शितल जोशी, श्रीरामपूर यांनी अंदाजपत्रक तयार केले आहे. त्याचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

| अ.नं. | कामाचा तपशिल | अंदाजे खर्च |
|---|---|---|
| ०१ | प्रशासकीय कार्यालय फर्निचर करणे | १०,४०,५१३.०० |
| ०२ | जनसंपर्क कार्यालय फर्निचर | २,६०,३८०.०० |
| ०३ | वैद्यकिय संचालक व इतर | २,०६,०९९.०० |
| | एकूण रुपये | १५,०६,९९२.०० |

वरिलप्रमाणे श्री साईबाबा हॉस्पिटल येथील अंतर्गत सजावट आणी फर्निचर तयार करणेसाठी आर्किटेक्ट शितल जोशी, श्रीरामपूर यांनी तयार केलेल्या अंदाजपत्रकानुसार रुपये १५,०६,९९२.०० मात्र इतका खर्च अपेक्षीत आहे.

**तरी वरिलप्रमाणे अंदाजीत खर्चास व याकामी वर्तमान पत्रात जाहिरात प्रसिध्द करुन निविदा मागविणेस मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही-बांधकाम विभागप्रमुख)

**विषय नं.२८ श्री रामनवमी उत्सव व उन्हाळी मंडपाचे येणारे वाढीव खर्चास मंजूरी मिळणे बाबत**

**निर्णय क्र.४४१ अ)**श्री साईबाबा संस्थान मार्फत सालाबाद प्रमाणे याही वर्षी शनिवार दि. १२ एप्रिल, २००८ ते दि. १४ एप्रिल, २००८ अखेर श्रीरामनवमी उत्सव संस्थान मार्फत साजरा करण्यात आला आहे. त्या निमीत्ताने मंदिर परिसरात तसेच संस्थान परिसरातही मंडप उभारणी करणेस तसेच उन्हाळी मंडपाचे दि. २०/३/२००८ ते १५/६/२००८ अखेरचे कामास मा. व्यवस्थापन समितीचे दि. १६ मार्च, २००८ रोजीचे सभेतील निर्णय क्र. २८७ (६) नुसार समाधि मंदिर परिसर, प्रसादालय परिसर, साईनगर परिसर, धर्मशाळा परिसर तसेच नविन भक्तनिवासस्थान, नविन जिल्हा परिषद प्रा. शाळा परिसरातही मंडप व इतर अनुषंगिक व्यवस्थाही करण्यात आली आहे. मंडपाची संख्या व क्षेत्रफळ मोठया प्रमाणावर असल्यामुळे एकाच ठेकेदाराकडून सदर काम वेळेवर पुर्ण होऊ शकनार नाही करीता सदरचे काम ठेकेदार यांना विभागून देण्यात यावे तसेच साईभक्तांचे गर्दीचे प्रमाण जास्त वाढल्यास या व्यतिरीक्त वाढीव मंडपाचे काम मंजूर दर असलेले ठेकेदार यांचेकडून आवश्यकते नुसार करुन घेण्यास व खालील पाच मंडप ठेकेदार यांचेकडून श्रीरामनवमी उत्सव व उन्हाळी मंडपाचे कामासाठी येणारे रु. २९,९६,५८१.०० मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली आहे. त्यानुसार मंडप उभारणी करणेत आलेली असून भक्तांचे गर्दीचे प्रमाण वाढल्याने खालील ठिकाणी उत्सव व उन्हाळी मंडप वाढीव बांधणेत आले आहेत.

**उत्सव वाढीव मंडप तपशिल :-**

| अ. नं. | मंडपाचा तपशिल / ठिकाण / साईज | एकुण चौ. फुट | कालावधी | दर प्रति दिन प्रति दिवस | रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| ०१ | साईनाथ माध्यमिक विद्यालय शामियाना मंडप ७५'x९०' व<br>३०'.७"x ६०' | <br>६७५०.००<br>१८३४.८० | १२/०४/२००८ ते १४/४/२००८ | ०.५० | १२,८७७.०० |
| ०२ | नविन जि. प. प्रा. शाळा मैदान ९१' x५९' | ५३६९.०० | १२/०४/२००८ ते १४/४/२००८ | ०.५० | ८,०५३.०० |
| ०३ | प्रसदालय पार्किंगमध्ये पाईप मंडप ७५'x७५' | ५६२५.०० | १२/०४/२००८ ते ४/०४/२००८ | ०.५० | ८,४३७.०० |
| ०४ | शांतीनिवास पूर्व बाजू कोपरा ते तलाठी कार्यालयापर्यंत कापडी मंडप (जूना पिंपळवाडी रोड) ३५०'x१७' | ५९५०.०० | १०/०४/२००८ ते १५/४/२००८ | ०.५७ | २०,३४९.०० |
| ०५ | नगर - मनमाड रोड धबधबा ते सेवाधाम इमारत ३०८'.९"x ८' | २४७०.०० | १०/०४/२००८ ते ५/०४/२००८ | ०.५७ | ८,४४७.४० |
| ०६ | जूनि जिल्हा परिषद शाळेजवळ स्टेज व्यवस्था ५' उंचीचे २०'x३२' साईज मॅटीन, फायबर खुर्ची ६०० नग इ. सह | | ११/०४/२००८ ते ११/०४/२००८ | एकत्रित | २०,०००.०० |
| ०७ | साईनगर मैदान वाढीव स्टेज व्यवस्था<br>०१. ३७'x२७'<br>०२. ३७'x३१'<br><br>०१. खुर्ची १५९९ नग<br>०२. मॅटींन ४२०० चौ. फुट | <br>९९९.००<br>११४७.०० | १२/०४/२००८ते<br>१२/४/२००८<br>१३/०४/२००८<br>ते १६/४/२००८<br>०२ दिवस<br>०५ दिवस | | <br>६,४४३.००<br>२४,४२५.००<br><br>९,५९४.००<br>२,७३०.०० |
| ०८ | नंदादिप पाठीमागे शामियाना मंडप<br>३५'x७०'<br>१८'x१७'.६" | <br>२४५०.००<br>३१५.०० | <br>१२/०४/२००८<br>ते १४/४/२००८ | <br>०.५० | <br>३,६७५.००<br>४७२.५० |

| अ. नं. | मंडपाचा तपशिल / ठिकाण / साईज | एकुण चौ. फुट | कालावधी | दर | रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| ०९ | ०१. सेवाधाम समोर लाडू काउंटर करीता शामियाना मंडप १५'x१५'<br>०२.लस्सी वाटपासाठी कनकुरी १५'x१५'<br>०१. हॉटेल संस्कृती समोर १५'x१५'<br>०२. नगर- मनमाड रोड साईराम ढाबा १५'x१५'<br>०३. चौकशी कार्यालया समोर माहीती केंद्रसाठी १५'x१५' | २२५.००<br>२२५.००<br>२२५.००<br>२२५.००<br>२२५.०० | १२/०४/२००८ ते १४/४/२००८ | ०.५० | १,६८७.५० |
| १० | नविन भक्तनिवासस्थान येथे ४४'x३३९' | १४९१६.०० | १२/०४/२००८ ते १४/४/२००८ | ०.५० | २२,३७५.०० |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ११ | ०१. चौकशी कार्यालया समोर १५'x१५'<br>०२. पुरी तयार करणेसाठी प्रसादालय येथे १८'x३०'<br>०३. नविन भक्तनिवास आतिल लॉनवर १००'x१२६' | २२५.००<br>५४०.००<br>१२६००.०० | १२/०४/२००८ ते ४/०४/२००८ | ०.५० | ३३७.००<br>८१०.००<br>१८,९००.०० |
| १२ | मॅटीन<br>साईनगर येथील FRP मंडपामध्ये टाकणेसाठी<br>६५'x४६'<br>१३४'x३५'<br>१४६'x३५' | २९९०.००<br>४६९०.००<br>५११०.०० | १२/०४/२००८ ते १४/४/२००८ | ०.४० | १५,३४८.०० |
| १३ | प्रसादालय जवळील पत्राशेडमध्ये मॅटीन | ५०००.००० | १२/०४/२००८ ते १४/४/२००८ | ०.४० | ६,०००.०० |
| एकुण रुपये.. | | | | | १,९०,९६०.४० |

**ब)**तसेच उन्हाळयाचे दिवस असल्याने साईभक्तांचे सोयीसाठीही त्याच ठरावाचे अनुशंगाने खालील ठिकाणी खालील प्रमाणे जादा मंडप उभारणी करण्यात आलेली आहे.

**<u>उन्हाळी वाढीव मंडप तपशिल :-</u>**

| अ. नं. | मंडपाचा तपशिल / ठिकाण / साईज | एकुण चौ. फुट | कालावधी | दर | रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| ०१ | नविन भक्तनिवासस्थान आतिल लॉनवर शामियाना मंडप ७५'x१८२' | १३६५०.०० | २१/०३/२००८ ते २४/३/२००८ | ०.५० | २७,३००.०० |
| ०२ | नविन भक्तनिवासस्थान आतिल लॉनवर शामियाना मंडप १५०'x१५०' | २२५००.०० | १५/०४/२००८ ते ११/०६/२००८ | ०.२५ | ३,२६,२५०.०० |
| ०३ | ०१. नगर - मनमाड रोड ते हॉटेल तिर्थ प्रसाद पर्यंत ३९०'x१८'<br>०२. गेट नं. १ ते प्रसादालय गेट नं. १ पर्यंत ९०'x१२' | ७०२०.००<br>१०८०.०० | १/०५/२००८ ते १५/०६/२००८ | ०.५७ | १,९८,५३१.०० |
| ०४ | जूनी जिल्हा परिषद शाळेजवळील रोडवर २२५'x१५' | ३३७५.०० | १/०५/२००८ ते १५/०६/२००८ | ०.५७ | ८४,६४५.०० |
| ०५ | जूना पिंपळवाडी रस्ता दर्शन रांगेसाठी<br>४००'x२०'<br>२०'x१००'<br>१०'x१००' | ८०००.००<br>२०००.००<br>१०००.०० | २०/०४/२००८ ते १५/६/२००८ | ०.५७ | ५५,१७६०.०० |
| ०६ | नविन भक्तनिवासस्थान बस पिक अप स्टँण्ड जवळ २०'x४०'<br>१५'x३०' | ८००.००<br>४५०.०० | २०/०४/२००८ ते १५/६/२००८ | ०.५० | २७,५००.०० |
| ०७ | प्रसादालय परिसरात पुरीसाठी<br>१५'x३०' | ४५०.०० | १८/०५/२००८ ते १५/६/२००८ | ०.२५ | ६,५२५.०० |
| ०८ | महाद्वार नं. १ नं. व ५ करीता<br>२५'x१५'<br>२५'x१५' | ३७५.००<br>३७५.०० | २०/०३/२००८ ते १५/६/२००८ | ०.५७ | ३७,६२०.०० |
| ०९ | गेट नं. १ ते गेट नं. ५ पर्यंत ८०'x२५' | २०००.०० | २०/०३/२००८ ते १५/६/२००८ | ०.५७ | १,००,३२०.०० |
| १० | गेट नं. ४ समोरील बाहेरील बाजूस ३०'x२५' | ७५०.०० | २०/०३/२००८ ते १५/६/२००८ | ०.५७ | ३७,६२०.०० |
| ११ | गेट नं. ४ आतिल बाजूस ५०'x२०' | १०००.०० | २०/०३/२००८ ते १५/६/२००८ | ०.५७ | ५०,१६०.०० |
| एकुण रुपये... | | | | | १४,४८,२३१.०० |

**तरी उपरोक्त अ नुसार श्रीरामनवमी उत्सव- २००८ करीता जादा मंडप उभारणी कामी रु.१,९०९६०.४० व उन्हाळी जादा मंडप उभारणीकामी रु. १४४८२३१.०० असे एकुण रु. १६,३९,१९१.४० मात्रचे जादा खर्चास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली.**

**तसेच, भक्तांची गर्दी वाढल्यास या व्यतिरिक्त मंडप आवश्यकतेनुसार मंजुर दरात टाकणेस तसेच गेट नं.१ व ५ आणि जुना पिंपळवाडी रस्त्याकडील फुटपाथवर दर्शनरांगेकरिता असलेले**

**मंडपाचे आवश्यकतेनुसार कालावधी वाढविणेस व याकामी येणारे योग्य त्या सर्व समावेशक खर्चास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही -बांधकाम विभागप्रमुख)

**विषय नं.२९ रुई येथील दर्यानानी व मुस्लीम ट्रस्ट ची जमीन संस्थानकरीता घेणे बाबत**

**निर्णय क्र.४४२ (अ)**मौजे रुई, तालुका राहाता येथील शिवारात राधाकिशन कालीनदास दर्यानानी चॅरिटेबल ट्रस्टच्या मालकीची जमीन आहे. दर्यानानी चॅरिटेबल ट्रस्टचे विश्वस्त मौजे रुई शिवारातील ट्रस्ट मालकीची गट नंबर २९४ मधील क्षेत्र १७ एकर २० गुंठे जमीन त्याच बरोबर शिर्डी शिवारातील बेगर्स होमची ०४ एकर २० गुंठे जमीन संस्थानला देणेस तयार आहेत.

**(ब)** मौजे रुई, तालुका राहाता येथील शिवारात इनाम वर्ग ३चे मस्जीद इनामाची अंदाजे ३२ हेक्टर १५ आर जमीन आहे. सदर जमिनीचे वहिवाटदार सदरची जमीन संस्थानला विकत द्यावयास तयार आहेत.

**(क)** सध्या विविध राज्यांकडून तसेच विविध संस्थांकडून शिर्डी मध्ये भक्तांना निवासाच्या व इतर मुलभूत सोयी-सुविधा उपलब्ध व्हाव्यात म्हणून धर्मशाळा अथवा निवासस्थाने उभारणेसाठी जमिनी उपलब्ध करुन देणेबाबत संस्थानकडे विनंती प्रस्ताव येत आहेत. अशा राज्यांना अथवा संस्थांना मौजे रुई शिवारात उपलब्ध होणाऱ्या सदरहू जमिनी उपलब्ध करुन देणे शक्य होईल.

सध्या संस्थानमार्फत शैक्षणिक संकुलाच्या अंतर्गत आय.टी.आय., इंग्लिश मिडियम स्कूल, कन्या शाळा, कनिष्ठ महाविद्यालय चालविले जात आहे. शिर्डी शहर व परिसरात दुसऱ्या संस्थांच्या शाळा पुरेशा उपलब्ध नसल्याने संस्थान संचलित इंग्लिश मिडियम व कन्या शाळेकडे विद्यार्थ्यांचा मोठा ओघ सुरु आहे, त्यामुळे या शैक्षणिक संकुलाची विद्यार्थी क्षमता दिवसेंदिवस वाढतच आहे. परंतु त्यामानाने शैक्षणिक संकुलासाठी जादा इमारती बांधणे जागेअभावी शक्य झालेले नाही. मौजे रुई शिवारातील उपरोक्त जागा संस्थानला उपलब्ध झाल्यास त्याठिकाणी सर्वसोयींनी युक्त असे शैक्षणिक संकुल बांधणे शक्य होईल. तसेच, या प्रकल्पाव्यतिरिक्त साईभक्तांच्या सोयी-सुविधेसाठी एखादा मोठा विकास प्रकल्प उभारणे शक्य होईल.

**(ड)** उपरोक्त सर्व बाबींचा विचार करता, सदरहू जमिनी संस्थानला घेणेबाबत मा. व्यवस्थापन समितीची तत्वतः मान्यता मिळालेस, याकामी सदरहू जमिनीचे उतारे व इतर कागदपत्रे प्राप्त करवून, याबाबतच्या कायदेशीर बाबी संस्थान वकिलांकडून तपासून घेऊन, त्यांचा अभिप्राय घेऊन याबाबतचा सविस्तर प्रस्ताव मा. व्यवस्थापन समितीचे विचारार्थ सादर करता येईल, असा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

सदरहू प्रस्तावाचे चर्चेचे वेळेस मा.अध्यक्षसाो. यांनी सांगितले की, मा.ना.श्री. शरदचंद्रजी पवार, कृषिमंत्री, भारत सरकार यांनी दिनांक २६ एप्रिल, २००८ रोजी शिर्डी येथे भेटी दरम्यान संस्थानने आंतरराष्ट्रीय पातळीवर भारतीय कर्तव्य व बुध्दिमत्ता दाखविण्यासाठी ज्ञानाचे संकुल शिर्डी परिसरात तयार करावे, विविध विषयावर ज्ञान संपादन करण्याची आधुनिक विज्ञानावर आधारीत ज्ञानार्जनाबरोबर संशोधनाची सुविधा अशा संकुलात करावी, अशी अपेक्षा व्यक्त केली आहे. त्याच अनुषंगाने सदरहू प्रस्ताव सादर करणेत आलेला आहे.

उपरोक्त प्रस्तावात नमूद केल्याप्रमाणे राधाकिशन कालियनदास दर्यानानी चॅरिटेबल ट्रस्ट यांनी मौजे रुई शिवारातील १७ एकर २० गुंठे जमीन देणगी देऊ केलेली आहे. सदरहू जमिनीमध्ये आंतरराष्ट्रीय पातळीवरचे ज्ञान संकुल उभारता येईल. सदरहू जमीन देणगी दाखल स्वीकारणेस तत्वतः मान्यता देण्यात आली. सदरहू जमीन देणगी दाखल स्वीकारणेकामी दर्यानानी ट्रस्ट यांचेकडून प्रस्ताव प्राप्त करवून घेऊन, त्याबाबतची कार्यवाही सुरु करावी.

तसेच मा.अध्यक्षसाो. यांनी असे सांगितले की, दर्यानानी ट्रस्टचे जमिनीच्या लगत व जवळपासच्या जमिनी ही विक्रीसाठी आहेत. त्यापैकी मौजे रुई येथील देवस्थान इनाम वर्ग ३ च्या काही जमिनी आहेत. सदर जमिनींच्या खातेदारांपैकी जे खातेदार जमीन संस्थानला खरेदी देणेस तयार असतील, अशा खातेदारांची जमीन खरेदी करणेसाठी आवश्यक त्या सक्षम अधिकाऱ्याची परवानगी घेऊन जमीन खरेदी करणेबाबत कार्यवाही करण्यात यावी. सदरहू जमिनी देवस्थान इनाम वर्गातील असल्याने या जमिनी खरेदी करणेपूर्वी आवश्यक त्या सर्व कायदेशीर बाबी पूर्ण करण्यात याव्यात. मौजे रुई शिवारातील जमिनीचे दर शासकीय मुल्यांकन तक्त्यानुसार अत्यंत कमी आहे. आजमितीस मौजे रुई शिवारातील जमिनीचे दर प्रती एकर रुपये ३० लाख मात्र असे आहेत. त्यानुसार संबंधीत जमीनमालकांशी चर्चा-वाटाघाटी करुन रुपये ३० लाख प्रती एकर या दराने जमीन खरेदी करण्यात यावी.

उपरोक्तप्रमाणे मौजे रुई शिवारातील दर्यानानी ट्रस्टची जमिन देणगी दाखल स्वीकारणे व देवस्थान इनामातील जमिनी खरेदी करणे याकामी आवश्यकतेनुसार कायदेशीर बाबी पूर्ण करणेसाठी येणाऱ्या योग्य त्या सर्वसमावेशक खर्चास मान्यता देण्यात यावी, असे ठरले.

(कार्यवाही-बांधकाम विभागप्रमुख)

**विषय नं.३०** **मुंबई कार्यालय इमारतीचे आतील भागतील रंगकाम करणे बाबत**

**निर्णय क्र.४४३** संस्थानचे मुंबई येथे कार्यालय असून सदरचे कार्यालयाचे दुरुस्ती व रंगकाम सन. १९९९ ला करण्यात आले आहे. सदरचे रंगकामास सुमारे सात ते आठ वर्ष झाल्याने इमारतीचे आतील / बाहेरील भागाचे रंगकाम खराब झाले आहे. या कार्यालयास मुंबई व भारतातील अन्य ठिकाणावरुन येणारे साईभक्त भेट देत असतात व शिर्डी येथील समाधि मंदिरातील माहीती घेत असतात करीता सदरचे इमारतीचे रंगकाम करणे आवश्यक आहे. याकामी खालील प्रमाणे खर्च अपेक्षित आहे.

| अ.नं. | तपशिल | रक्कम रुपये |
|---|---|---|
| ०१ | आतिल भिंती, दरवाजे, खिडक्या व ग्रील रंगकाम करणे. | १,९७,९२८.०० |
| ०२ | फर्निचरला मेलॅमाईन पॉलीश करणे.(एक कोट) | ८०,२५०.०० |
| ०३ | बाहेरील बाजूने ॲपेक्स रंगकाम करणे. | २,३६,४००.०० |
| | एकुण रु | ५,१४,५७८.०० |
| | + ५% cont | २५,७२८.९१ |
| | एकुण रु. | ५,४०,३०६.९१ |
| | **पुर्णांकीत रुपये** | **५,४०,३०७.००** |

याकामी ५% कंटीजन्सीज सह अंदाजे रु. ५,४०,३०७.०० मात्र खर्च अपेक्षित आहे.

**तरी याकामी येणारे अंदाजे रु. ५,४०,३०७.०० मात्रचे खर्चास व सदरचे काम मुंबई येथिल स्थानिक पेंटर यांचेकडून करुन घेणेस मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली.**

**तसेच मुंबई कार्यालयाचे इमारतीचे नुतनीकरण करणेकामी मा.अध्यक्षमहोदय यांनी तेथील भाडेकरुंबरोबर चर्चा करुन पुढील निर्णय घ्यावा असे ठरले.**

(कार्यवाही-बांधकाम विभागप्रमुख)

**विषय नं.३१** **संस्थानच्या जमीनींचे व्यवस्थापन महसूल वाढीचे नियोजन व शिर्डी धार्मिक स्थळ म्हणून विकास करणेकामी CRISIL या संस्थेची कन्स्लटंट म्हणून नेमणूक करणे बाबत**

**निर्णय क्र.४४४** **(अ) पूर्वपीठीका :**थोर संत श्री साईबाबा हे शिर्डी येथे मंगळवार दिनांक १५ ऑक्टोबर, १९१८ रोजी पंचत्वात विलीन झाले. साईभक्तांनी बाबांच्या समाधीचे दर्शन घेण्यास आरंभ केला. तेव्हांपासून शिर्डी येथे येणाऱ्या साईभक्तांची संख्या दिवसांगणिक वाढतच आहे. अशा या महान अवतारी पुरुषामुळे एकेकाळी छोटे खेडे असलेल्या शिर्डी गांवाची ख्याती आज देशाच्या कानाकोपऱ्यातच नव्हेतर संपूर्ण जगात पोहोचलेली आहे.

प्रतिदिनी सुमारे २५ ते ५० हजार भक्त श्री क्षेत्र शिर्डी येथे भेट देऊन, श्री साईबाबांच्या समाधीचे दर्शन घेतात. उत्सवकाळात तसेच उन्हाळी सुट्टया, दीपावली व नाताळच्या सुट्टया, गुरुवार व रविवार तसेच या दिवसांना जोडून येणाऱ्या सरकारी सुट्टया इत्यादी काळात श्री क्षेत्र शिर्डीस भेट देणाऱ्या साईभक्तांची संख्या सुमोर ३ ते ४ लाखांपर्यन्त जाते. श्री क्षेत्र शिर्डी येथे श्री साईंचे समाधी मंदिर, श्री गुरुस्थान, श्री व्दारकामाई, श्रींची चावडी, श्री खंडोबा मंदिर, ग्रामदेवतांची मंदिरे आदि पवित्र स्थाने असून, साईभक्त याठिकाणी आवर्जून भेट देऊन, आपली मनोकामना पूर्ण व्हावी म्हणून श्री साईंना साकडे घालतात.

महाराष्ट्र शासनाचे श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी अधिनियम २००४ नुसार दिनांक २३ ऑगष्ट २००४ रोजी श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्थेची व्यवस्थापन समिती अस्तित्वात आली असून, या व्यवस्थापन समितीचे अधिपत्याखाली संस्थानचे व्यवस्थापन व कामकाज चालू आहे.

सन २००६-२००७ या आर्थिक वर्षाअखेर संस्थानची एकूण गुंतवणूक रुपये २३८.२५ कोटी व उत्पन्न रुपये ११६.१९ कोटी इतके होते. त्यापैकी विविध कारणांसाठी एकूण रुपये १२४.९३ कोटी मात्र इतकी रक्कम खर्च करण्यात आलेली आहे.

**(ब) सद्यःस्थिती :** श्री समाधी मंदिर, श्री गुरुस्थान, श्री व्दारकामाई, श्रींची चावडी या पवित्र ठिकाणी दैनंदिन पूजाअर्चा करणे, निरनिराळे सण व उत्सव परंपरेनुसार साजरे करणे ही कार्ये संस्थानमार्फत पार पाडली जात आहेत. या बरोबरच भक्तांची निवास व प्रसाद भोजन व्यवस्था करण्यात येत आहे.

संस्थान विश्वस्तव्यवस्थेमार्फत चालविण्यांत येणारी रुग्णालये, शैक्षणिक संकुल व प्रसादालय या सुविधा कल्याणकारी स्वरुपाच्या असून त्यामधून कुठलाही नफा कमाविण्याचा उद्देश नाही. या सुविधांसाठी संस्थानमार्फत भरीव निधी खर्च करण्यात येतो.

याव्यतिरिक्त शिर्डी नगरपंचायत हद्दीतील तसेच शिर्डी लगतच्या रस्ते आदि विकास कामांसाठी संस्थानतर्फे मोठया प्रमाणावर अनुदानाचे स्वरुपात निधी उपलब्ध करुन देण्यांत येत आहे. त्याचबरोबर मोठया आजारांवरील उपचारांसाठी गरीब व गरजू रुग्णांना वैद्यकीय अनुदानाचे स्वरुपात निधी उपलब्ध करुन देण्यांत येत आहे.

संस्थानतर्फे भव्य अशा नवीन प्रसादालय इमारतीचे बांधकाम अलीकडेच पूर्ण करण्यात आले आहे. तसेच व्दारावती या भक्तनिवास इमारतीचे बांधकाम प्रगतीपथावर आहे. शिर्डी लगत असलेल्या मौजे निमगांव को-हाळे मधील ४५ हेक्टर ६४ आर (११४.१ एकर) जमीन शेती महामंडळाकडून संस्थानने संपादीत केलेली आहे. यापैकी गट नंबर ८० व ८५ मधील जमिनीवर नवीन प्रसादालय इमारतीचे बांधकाम करण्यात आले आहे. गट नंबर १९५ मध्ये हेलीपॅडची सुविधा निर्माण करण्यात आली आहे. तसेच गट नंबर ८७ व ८८ मधील काही क्षेत्र प्रत्येकी महावितरण (MSEB) व संरक्षण विभाग (Militery) यांना भाडेपट्टयाने देण्यात आले आहे. याठिकाणी उर्वरित क्षेत्रात मोठया स्वरुपाचा बगीचा, बहुउद्देशीय हॉल इत्यादी प्रकल्पांची उभारणी करण्याचे प्रस्तावित आहे. तसेच सध्या काही जमिनींचे भूसंपादन करण्याची कार्यवाही चालू असून नवीन जमीन खरेदीचे प्रस्तावही विचाराधीन आहेत.

अशाप्रकारे संस्थानकडे सध्या ज्या मोकळया जमिनी उपलब्ध आहेत व ज्या मोकळया जमिनी भूसंपादन अथवा खरेदीव्दारे नजीकच्या भविष्यात उपलब्ध होणार आहेत त्यांचा सुनियोजित स्वरुपात विकास होणे आवश्यक आहे. असा विकास करतांना फक्त एकाच प्रकल्पाचा विचार करण्याऐवजी साईभक्त, संस्थान व स्थानिक प्राधिकरण यांच्या गरजांचा एकत्रित विचार करुन सर्वांगिण असा बृहत् विकास आराखडा (Integrated Master Plan) तयार करणे गरजेचे आहे. विकासाचे संपूर्ण चित्र डोळयापुढे असल्यास नियोजित प्रकल्पांचा प्राधान्यक्रम ठरविणे सहजशक्य होईल व त्यासाठी अपेक्षित निर्णयप्रक्रिया सुलभ होईल. तसेच यामुळे आवश्यक पायाभूत सुविधांचे स्वरुप व तपशील ठरविण्यास मदत होईल.

**(क) प्रस्ताव :** वर नमूद केलेल्याप्रमाणे विकास आराखडा तयार करणेबाबतची आवश्यकता विचारात घेऊन मा.कार्यकारी अधिकारी यांनी या क्षेत्रातील एक तज्ञ संस्था "CRISIL INFRASTRUCTURE ADVISORY, HYDERABAD " यांचे प्रतिनिधी श्री. ब्रिजगोपाल लढ्ढा यांचेशी सविस्तर चर्चा करुन त्यांना प्रस्ताव देणेविषयी विनंती केली. त्यास अनुसरुन CRISIL यांनी दिनांक १८ एप्रिल, २००८ रोजीचे पत्राव्दारे "Preparation of Concept Plan for development of Surplus Land, Revenue Improvement Strategy and Preparation of Concept Plan to promote Shirdi as spiritual Tourist Centre " अशा विषयाचा प्रस्ताव सादर केला असून तो आजचे सभेपुढे अवलोकनार्थ ठेवला आहे. सदरहू प्रस्तावाचा संक्षिप्त तपशील खालीलप्रमाणे आहे :

**(०१) क्रिसिल इन्फ्रास्ट्रक्चर ॲडव्हायझरी बाबत :**

CRISIL Risk and Infrastructure Solutions Ltd. ही CRISIL Limited यांचे मालकीची उपकंपनी आहे. या कंपनीचे पुढीलप्रमाणे दोन विभाग आहेत (i) Risk Management (ii) CRISIL Infrastructure Advisory.

CRISIL ही धोरण, पायाभूत सुविधा आणि ऊर्जाक्षेत्रातील सल्ला-सेवा देणारी एक अग्रगण्य संस्था आहे. ही संस्था भारताबरोबरच आफ्रिका, मध्य पूर्व आणि आशिया मधील देशांमध्येही आपला व्यवसाय करीत आहे. त्यांचे व्यवसायामध्ये ऊर्जा, शहरी पायाभूत सुविधा व सार्वजनिक आणि खाजगी भागिदारी या क्षेत्रातील धोरणात्मक तसेच वाणिज्यिक व कंत्राटविषयक बाबींचा समावेश आहे. पर्यटन व पायाभूत सुविधांबाबत सल्लासेवा देण्याचा मोठया प्रमाणावर अनुभव सदर संस्थेला असून त्याचा तपशील त्यांनी उपरोक्त प्रस्तावात नमूद केला आहे.

**(०२) CRISIL यांनी त्यांचे प्रस्तावात नमूद केलेली उद्दीष्टये (Objectives) खालीलप्रमाणे आहेत :**

Phase 1 :

1) Prepare a Conceptual plan for development of surplus land
2) Identify alternate resource or avenues for resource mobilisation
3) Propose a cost recovery strategy for non temple activities

Phase 2 :

4) Assist the Trust in Bid Process in case of PPP type proposals are feasible

Phase 3 :

5) Review the Development Plan (DP) of Shirdi Town and suggest modifications for planned and controlled development.
6) Prepare a Tourism Master Plan for Shirdi taking existing facilities into account.
7) Prepare an Establishment for additional activities being carried out by the Trust.

याबाबत कामांचा सविस्तर वाव उपरोक्त प्रस्तावात नमूद केलेला आहे.

**(०३)** सदर प्रस्तावाअंतर्गत CRISIL यांनी सादर करावयाचे आराखडे, अहवाल इत्यादी कागदपत्रे (Deliverables) खालीलप्रमाणे आहेत :

Phase I

1) Concept Plan for Surplus Land
2) Revenue Improvement Strategy
3) Action Plan for implementation

Phase II

1) Project Feasibility Report for identified Projects to be developed through PPP
2) Drafting of RFP and Concession Agreement
3) Manage the Bid Processs

Phase III

1) Assessment Reprot on Tourism/Cultural centre Potential for Shirdi.
2) Tourism Master Plan
3) Project Proposal & Feasibility Report
4) Implementation Action Plan

**(०४)** CRISIL यांचे कामामध्ये समाविष्ट नसलेल्या बाबी (Exclusions), संस्थानच्या व CRISIL यांच्या जबाबदाऱ्या, CRISIL यांचेतर्फे या प्रकल्पासाठी नेमणूकीकरीता प्रस्तावित व्यक्तींची यादी व त्यांची वैयक्तिक माहिती यांचा सविस्तर तपशील प्रस्तावात नमूद केलेला आहे.

**(०५)** CRISIL यांनी सदर कामासाठी एकूण रुपये ७०,०८,७५०/- मात्र (अक्षरी रुपये सत्तर लाख आठ हजार सातशे पन्नास मात्र ) इतकी Lumpsum Fee टप्प्याटप्याने व विभागाप्रमाणे आकारणेत येईल, असे प्रस्तावात नमूद केले आहे. या व्यतिरिक्त शासनाच्या प्रचलीत दराने कर आकारण्यात येईल, असे नमूद केलेले आहे.

**(०६)** सल्लागार शुल्काबाबत तसेच इतर अटी व शर्तीचा सविस्तर तपशील प्रस्तावात नमूद केलेला आहे.

आजच्या सभेत CRISIL चे प्रतिनिधी सभेस उपस्थित होते. त्यांनी याबाबत सभेस चित्रफितीद्वारे माहिती करुन दिली.

**यावर सविस्तर चर्चा होऊन, शिर्डीस येणाऱ्या भक्तांना (पर्यटनाच्या) अधिकाधिक सोयी कशा देता येतील याबाबत अधिक माहिती घेऊन, सविस्तर प्रस्ताव व्यवस्थापन समितीचे सभेपुढे यथावकाश निर्णयार्थ सादर करावा,असें ठरले.** (कार्यवाही-बांधकाम विभाग प्रमुख)

**विषय नं.३२ प्रसादालय- सन २००७-०८ जादा माल खरेदीस कार्योत्तर मान्यता देणेबाबत.**

**निर्णय क्र.४४५** सन २००७-०८ मध्ये ( दि.०१.०५.२००७ ते दि.३१.०३.२००८ अखेर) प्रसादालय व कॅन्टीन विभागाचे दैनंदिन वापरासाठी आवश्यक असलेला किराणा माल खरेदीकामी मा.व्यवस्थापन समिती सभा दि.१७.०२.२००७ निर्णय क्र.१५० नुसार मान्यता मिळालेली असून, कृषि उत्पन्न बाजार समितीचे मोंढयावरुन मा.विश्वस्तांचे उपस्थितीत गहू, हरबरा व मोहरी खरेदी करणेत आलेली आहे. तसेच उर्वरीत किराणा मालाची खरेदी ही मा.व्यवस्थापन समिती सभा दि.३०.०४.२००७ मधील निर्णयानुसार निविदा पद्धतीने झालेली आहे.

श्री साईबाबा भक्तनिवासस्थान विभागाचे कॅन्टीनमध्ये स्वयंसेवी प्रसादभोजन कक्ष, प्रसादालय विभागामार्फत सुरु करणेत आलेला असून त्याठिकाणी दैनंदिन सुमारे ३५०० ते ४५०० साईभक्त प्रसाद भोजन घेत आहेत. तसेच श्री साईबाबा (सुपर स्पेशालिटी) हॉस्पीटलकडे रुग्णांना दैनंदिन प्रसादभोजन देण्यांत येत आहे. त्याचबरोबर दिवसेंदिवस साईभक्तांची गर्दी वाढत असून नाष्टा पाकिटे व प्रसादलाडूची जादा विक्री झालेली आहे. त्यामुळे मालाचा खप पहाता जानेवारी २००८ मध्ये वाढीव बजेट ठेवणेत आलेले होते. त्यास मा.व्यवस्थापन समिती सभा दि.१०.०१.२००८ मधील निर्णय क्र.४३ नुसार मान्यता मिळालेली आहे. तथापि मार्चमध्ये सुटया जोडून आल्याने श्रीसाईभक्तांची भोजनप्रसाद, नाष्टापाकिटे व लाडूप्रसादासाठी अडचण होऊ नये म्हणून काही माल वार्षिक मंजूर दराने जादा खरेदी करणेत आलेला आहे. सर्व मालासाठी एकुण रु.५४,३८,१७१.७८ खर्च आलेला आहे. तसेच नेहरुनगर महिला बचट गट, श्रीरामपूर या शासकीय योजनेकडून सन २००७-०८ मध्ये ४.८९ क्विंटल गरम मसाला रु.२५०/-प्रती किलो दराने खरेदी करणेत आलेला आहे. त्यास रुपये १,२२,२५०/- खर्च आलेला आहे.

**तरी उपरोक्त नमुद केल्याप्रमाणे सन २००७-०८ मध्ये खरेदी करणेत आलेल्या जादा मालाचे खर्चास तसेच मे.नेहरुनगर महिला बचत गट, श्रीरामपूर यांचेकडून खरेदी करणेत आलेल्या गरम मसाल्याचे खर्चास कार्योत्तर मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही-अधिक्षक,खरेदी विभाग)

**विषय नं.३३ विद्युत,पाणीपुरवठा,ध्वनिक्षेपण, स्वच्छता विभाग, बांधकाम व बगीचा विभाग इ. करिता सन २००८-०९ वार्षिक साहित्य तसेच स्टेशनरी खरेदीबाबत.**

**निर्णय क्र.४४६** सन २००८-०९ सालामध्ये संस्थानचे विदयुत, पाणीपुरवठा, ध्वनीक्षेपण, बांधकाम,बगीचा व आरोग्य विभागाचे दैनंदिन कामकाजासाठी आवश्यक साहित्य तसेच कार्यालयीन व संगणक स्टेशनरी खरेदी करावयाची आहे. त्यासाठी खालीलप्रमाणे खर्च अपेक्षित आहे.

०१. विदयुत, पाणीपुरवठा व ध्वनीक्षेपण विभाग रु. ७६,०९,७४४.००

| | | |
|---|---|---|
| ०२. | आरोग्य व बगीचा विभाग | रु. ११,५५,९००.०० |
| ०३. | बांधकाम विभाग | रु. ७,४६,३३०.०० |
| ०४. | कार्यालयीन जनरल व संगणक स्टेशनरी साहित्य | रु. १९,४२,२७७.०० |
| | एकुण | रु.१,१४,५४,२५१.०० |

उपरोक्तप्रमाणे सदर खरेदीस अंदाजे रु.१,१४,५४,२५१/-पर्यंत खर्च अपेक्षित आहे.

श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी) अधिनियम २००४ कलम १७ मध्ये समितीचे कर्तव्ये व अधिकार दिलेले असून त्यातील पोटकलम २ (झ) तरतुदीनुसार सर्वसाधारणपणे विश्वस्तव्यवस्थेची मालमत्ता व तिचे कामकाज यांचे योग्य प्रकारे व्यवस्थापन, देखभाल व प्रशासन करण्याच्या प्रयोजनांसाठी आवश्यक असतील अशा सर्व गोष्टी करील, असे नमुद केलेले आहे. त्यानुसार वरीलप्रमाणे साहित्य खरेदीकामी खालीलप्रमाणे कार्यवाही करणेत येईल.

०१. विदयुत, पाणीपुरवठा व ध्वनीक्षेपण विभागासाठी आवश्यक असणारे इलेक्ट्रिकल, हार्डवेअर साहित्य, प्लंबींग व मेंटेनन्स साहित्यासाठी एकत्रित निविदा मागणी करणेत येईल.

०२. आरोग्य व बगीचा विभागासाठी आवश्यक असणारे साहित्य, खते, औषधे व किटकनाशके साहित्यासाठी एकत्रित निविदा मागणी करणेत येईल.

०३. बांधकाम विभागाचे खरेदीसाठी खालीलप्रमाणे कार्यवाही करावी असे वाटते.

अ) सन २००८-०९ मध्ये मे.अल्ट्रा टेक सिमेंट लिमीटेड, पुणे कंपनीशी संपर्क साधून अस्तित्वात असलेल्या दराने किंवा आवश्यकता भासल्यास अल्ट्रा टेक, ए.सी.सी., राजश्री बिर्ला व अंबुजा सिमेंटच्या डिलरकडून कोटेशन मागवून बांधकाम विभागामार्फत खरेदी करता येईल.

ब) बांधकाम विभागासाठी आवश्यक असणारे खडी, वाळू, विटा, मुरुम इ. साहित्याचे दर सतत बदलत असल्याने वार्षिक दर कोणीही देत नाही. सबब परिसरातील पुरवठादारांकडून दर मागणी करुन किंवा अडचणीच्या वेळी अस्तित्वात असलेल्या दराने बांधकाम विभागामार्फत खरेदी करणेस तसेच इतर साहित्य खरेदी विभागामार्फत कोटेशन मागवून खरेदी करणेत येईल.

०४. कार्यालयीन जनरल व संगणक स्टेशनरी साहित्य तसेच झेरॉक्स मशीनसाठी आवश्यक असणारे टोनर इंक, ओपीडी ड्रम व डेव्हलपर हे निविदेत समाविष्ट करुन एकत्रित निविदा मागणी करणेत येईल. स्टेनशरीमध्ये श्री साईबाबा सुपर स्पेशालिटी विभागासाठी आवश्यक असणारी कार्यालयीन व संगणक स्टेशनरीचा समावेश केलेला आहे.

**उपरोक्त प्रमाणे सन २००८-०९ साठी आवश्यक असणारे वार्षिक साहित्याचे खरेदीस तत्वतः मान्यता देणेस तसेच सदर खरेदीकामी वर्तमानपत्रात जाहिरात देऊन थेट उत्पादक व त्याचे अधिकृत विक्रते यांचेकडून निविदा मागणी करणेस त्यानंतर संबंधितांशी मा.व्यवस्थापन समितीचे सभेमध्ये चर्चा तथा वाटाघाटी करुन खरेदीबाबत निर्णय घेता येईल. तसेच बांधकाम साहित्य खरेदीसाठी क्र.३ मध्ये दर्शविल्याप्रमाणे कार्यवाही करणेत येईल असा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली.**(कार्यवाही-अधिक्षक,खरेदी विभाग)

**विषय नं.३४ देणगी घेण्यात आलेल्या पाळीव घोड्याबाबत**

**निर्णय क्र.४४७ अ]** श्री अर्जुनराव विष्णु पा. चौधरी ,मु.पो- नांदुर्खी ता राहाता जि अ.नगर यांनी त्यांचे दि २०/०९/२००७ चे पत्रान्वये श्री साईबाबा पालखी सोहळयात पंढरपुरला गेलेला त्यांची अंदाजे रक्कम रु .३ लाख किमतीचा सर्वगुणसंपन्न देखना २।। वर्ष वयाचा घोडा श्री साईबाबा चरणी विनामुल्य अर्पण करीत आहे. त्यांच्या तबेल्याची व्यवस्था लेंडीबागेत श्यामसुंदर घोडयाचे समाधी जवळ करावी. म्हणजे भक्तांना दर्शनाचा लाभ होईपर्यन्त दररोज आरतीचे वेळी मंदिराचे गेटसमोर व गुरुवारी पालखीसमोर घोडयास उभे करण्याची परवानगी द्यावी अशी विनंती केली होती.

..." यावर मा व्यवस्थापन समितीचे दिनांक २५/११/२००७ रोजी निर्णय क्र ७७६ अन्वये सविस्तर चर्चा होऊन श्री अर्जुनराव विष्णु पा. चौधरी ,मु.पो- नांदुर्खी ता राहाता जि अ.नगर यांनी देऊ केलेला घोडा विनाशर्त देणार असल्यास स्वीकारणेत यावा असे ठरले. "

**ब]** मा.व्यवस्थापन समितीचे उपरोक्त निर्णयान्वये व श्री चौधरी यांचे विनंती अर्जानुसार त्यांचे मालकीचा घोडा [ अंदाजे वय २ ।। वर्ष ] दिनांक १०/०१/२००८ रोजी देणगी म्हणुन स्विकारण्यात आलेला आहे. सदहू देणगी मिळालेला घोडा सध्या संस्थानचे वाहन विभागाचे शेड मध्ये तात्पुरती व्यवस्था करण्यात आलेली आहे.

घोडयास खरारा करणे तसेच घोडयाची देखभाल करणे बगीचा विभागाने ०१ कंत्राटी कामगार कामावर घेणेस मंजूरी घेतली आहे.त्यानुसार एक कंत्राटी कर्मचारी घोडयाची देखरेख करित आहे.देणगी मिळालेल्या घोडयाच्या खुराकासाठी बगीचा विभाग मंजूर टिपणणी दि.३०/०१/०८ अन्वये ५० कि ग्रॅ घास खरेदी करणेस व दिनांक ३१/०१/२००८ अन्वये ०२ लिटर दुध घेण्यात येते.

तसेच भांडार विभागाकडून आवश्यकतेनुसार हरभरा,बाजरी खुराक म्हणून घेण्यात येते.

**क]** श्रीबाबांचे कालीन श्यामकर्ण [श्यामसुंदर] नावाचा घोडा होता त्यास योग्य ते शिक्षण देण्यात आले होते.व्दारकामाईत आरतीचे वेळेस आणले जात असे तो बाबांना नमस्कार करीत आसल्याचा उल्लेख आहे.त्यांनतर मात्र संस्थानमध्ये पालखी ,रथ मिरवणुक इ.कार्यक्रमात घोडा मिरविण्यावी अथवा फिरविण्याची पध्दत,रीत,परंपरा नाही त्यामुळे सध्या घोडया बाबत दर्शन करवून घेणे इतकाच उद्देश आहे. तसेच घोडया व्यतरिक्त कोणताही पाळीव प्राणी संस्थानकडे नाही.संस्थानचा मुख्य उद्देश येणाऱ्या साई भक्तांना दर्शन ,राहणे इ.व्यवस्था करणे आहे.

तरी संस्थान कडील घोडा मुळ मालकास परत करणेस अथवा त्यांचे मान्यतेने तीर्थक्षेत्र जेजुरी, शेगांवचे गजानन महाराज यांच्याकडे देणगी घेत असल्यास देता येईल अथवा लिलावाने विक्री करता येईल असा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

**यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री अर्जुनराव विष्णु पा. चौधरी ,मु.पो- नांदुर्खी ता राहाता जि अ.नगर यांनी देणगी म्हणून देऊ केलेला घोडा त्यांना परत देण्यात यावा. त्यांनी न नेल्यास सदरहू घोडा तिर्थक्षेत्र जेजुरी अथवा शेगांवचे गजानन महाराज संस्थान यांना देणगी म्हणून देण्यात यावा. त्यांनी न घेतल्यास त्याची जाहिर लिलावाने विक्री करणेत यावी, असे ठरले.**

(कार्यवाही-बगीचा विभागप्रमुख)

**विषय नं.३५ संस्थान कर्मचारी वैद्यकीय बीलाचा परतावा मिळणेबाबत.**

**निर्णय क्र.४४८** संस्थान कर्मचारी व त्यांचेवर अवलंबून असलेल्या त्यांचे अवलंबीतांना कर्मचारी वैद्यकीय देखभाल नियमावली सन १९९९ अन्वये जादा वैद्यकीय बीलाचा परतावा देण्यात येतो. त्याप्रमाणे ज्या कर्मचाऱ्यांची बीले एका वर्षात रुपये ५०००/- चे आत असतील त्यांचा परतावा मा.कार्यकारी अधिकारी यांचे अधिकारात मंजूर होतो व ज्या बीलांची रक्कम रुपये ५०००/- पेक्षा अधिक आहे त्यांचे बीलास मा.व्यवस्थापन समितीची मान्यता घ्यावी लागते. यापूर्वी व्यवस्थापन समितीचे दिनांक ११.०९.२००४ चे सभेतील निर्णय क्र.१९ अन्वये येथून पुढे अशा प्रकारची कर्मचाऱ्यांची वैद्यकीय बीले वैद्यकीय क्षेत्रातील तज्ज्ञ सदस्य मा.डॉ.एकनाथ भा.गोंदकर व मा.डॉ.पी.एल.तिवारी यांनी तपासून त्यांचे शिफारशीनुसार बीले अंतीम मंजूरीसाठी व्यवस्थापन समितीचे सभेपुढे सादर करण्यात यावीत, असें ठरलें आहे.

**त्यानुसार खालीलप्रमाणे कर्मचाऱ्यांची बीले सदस्य मा.डॉ.एकनाथ भा.गोंदकर व सदस्य मा. डॉ.पी.एल. तिवारी यांना दाखवून घेतली आहेत. त्यानुसार खालील देयके आदा करण्याची शिफारस केली आहे, ज्यास मान्यता देण्यात आली.**

**(अ)**

| अ.नं. | कर्मचाऱ्यांचे नाव | रुग्णालयाचे नाव | मागणी रक्कम | देय रक्कम |
|---|---|---|---|---|
| १ | डॉ.सौ.आशा श्रीराम पेंडसे | श्री साईनाथ रुग्णालय | ७५९.०० | ७५९.०० |
| २ | सौ. रेखा किरण पाटोळे | श्री साईनाथ रुग्णालय | ३१३६.०० | ३१३६.०० |
| ३ | श्री. के.यु.तुपे | सुजाता बिर्ला हॉस्पिटल, नाशिक | २९८६०.०० | २९८६०.०० |
| ४ | श्री.वाल्मीक बापुराव धरम | जीवन आशा चॅरिटेबल ट्रस्ट (पुणतांबा) | १९४६.०० | १७५१.०० |
| ५ | श्री. प्रदिप दशरथ शिंदे | श्री साईबाबा रुग्णालय | ३६७२.०० | ३६७२.०० |
| ६ | सौ. वैशाली वसंतराव सूर्वे | श्री साईबाबा रुग्णालय | ९५४.०० | ९५४.०० |
| ७ | डॉ. अ. म. केसरकर | श्री साईनाथ रुग्णालय | १३४४.०० | १३४४.०० |
| ८ | डॉ. पुनम बाबासाहेब गवळी | डॉ. वाघुरडे, हैद्राबाद | २७३६०.०० | २१८८८.०० |
| ९ | श्री. प्रदीप विश्वनाथ त्रिभूवन | श्री साईबाबा रुग्णालय | ११५३१.०० | ११५३१.०० |
| १० | श्री. अविनाश मल्हारराव अदलिंग | श्री साईबाबा रुग्णालय | १६३.०० | १६३.०० |
| ११ | श्री. सुभाष नारायण चित्रे | श्री साईनाथ रुग्णालय | ६०४.०० | ६०४.०० |
| १२ | श्री. अनिल त्रिंबकराव पोफळे | श्री साईनाथ रुग्णालय | ३५९१.०० | ३५९१.०० |
| १३ | श्री. सोमनाथ भगवान मराठे | श्री साईनाथ रुग्णालय | १०१५.०० | १०१५.०० |
| १४ | श्री. बाळासाहेब मुरलीधर गाडे | श्री साईबाबा रुग्णालय | २१२६.०० | २१२६.०० |
| १५ | श्रीमती गीता आप्पासाहेब शिंदे | श्री साईनाथ रुग्णालय | १८६५.०० | १८६५.०० |
| १६ | श्री. गुलामरसूल गुलामहबीब पठाण | श्री साईनाथ रुग्णालय | ३२७.०० | ३२७.०० |
| १७ | सौ. पुष्पलता प्रभाकर भैलुमे | श्री साईनाथ रुग्णालय / के.ई.एम. हॉस्पिटल | ७२८५.०० | ७२८५.०० |
| १८ | श्री. रामनाथ लक्ष्मण वाकचौरे | श्री साईनाथ रुग्णालय | ६९०.०० | ६९०.०० |
| १९ | सौ. अडसूळ संगिता गिरीधर | श्री साईबाबा रुग्णालय | ४८९५.०० | ४८९५.०० |
| २० | डॉ. दादासाहेब लुमा कांबळे | किलबील हॉस्पिटल, नाशिक | १११७७३.०० | ९१८३२.०० |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | के.ई.एम. हॉस्पिटल, पुणे | | |
| २१ | डॉ. पुनम बाबासाहेब गवळी | डॉ. वाघुरडे, हैद्राबाद | ९९००.०० | ७९२०.०० |
| २२ | श्री.बाळासाहेब आप्पाजी डांगे | रुबी हॉल क्लिनिक ,पुणे<br>ॲड.रक्कम वजा -<br>शिल्लक रक्कम रु. | २०८००९.००<br>१२००००.००<br>८८००९.०० | ८८००९.०० |
| | | **एकूण रक्कम रु.** | **४३२८०५.००** | **२८५२१७.००** |

**(ब)**

| अ.नं. | कर्मचाऱ्यांचे नाव | रुग्णालयाचे नाव | मागणी रक्कम | देय रक्कम |
|---|---|---|---|---|
| १ | डॉ. यशोधन अरुण पितांबरे | श्री. साईनाथ रुग्णालय | १०३३.०० | १०३३.०० |
| २ | सौ. जाधव कांचन बाळासाहेब | श्री. साईनाथ रुग्णालय | १६११.०० | १६११.०० |
| ३ | श्री.बाबासाहेब माणिकराव शिंदे | श्री. साईनाथ रुग्णालय | ५३६.०० | ५३६.०० |
| ४ | श्री. रमेश सिताराम बोधक | प्रवरा ग्रामीण रुग्णालय, लोणी | १२३७६.०० | १२३७६.०० |
| ५ | श्री.सतिष गंगाधर बकरे | श्री साईबाबा रुग्णालय | ११०६.०० | ११०६.००० |
| ६ | श्रीमती गीता आप्पासाहेब शिंदे | श्री साईनाथ रुग्णालय | ३१५३०.०० | ३१५३०.०० |
| ७ | डॉ. पुनम बाबासाहेब गवळी | श्री साईबाबा रुग्णालय | २१८.०० | २१८.०० |
| ८ | श्री रवींद्र बाळासाहेब नवले | श्री साईबाबा रुग्णालय | २५३५.०० | २५३५.०० |
| ९ | श्री. प्रदीप विश्वनाथ त्रिभूवन | जीवन आशा केंद्र, पुणतांबा | १४१८२.०० | १२७६४.०० |
| १० | कु. कमल भिमराज तांबे | श्री साईबाबा रुग्णालय | ८१४७.०० | ८१४७.०० |
| ११ | श्री. प्रदिप दशरथ शिंदे | श्री साईबाबा रुग्णालय | १५५४.०० | १५५४.०० |
| १२ | डॉ.सौ.आशा श्रीराम पेंडसे | श्री. साईनाथ रुग्णालय | २०६.०० | २०६.०० |
| १३ | श्री. बाबर सुजय आनंदराव | श्री साईबाबा रुग्णालय | ३८२२.०० | ३८२२.०० |
| १४ | श्री. श्रावण माधव चौधरी | श्री. साईनाथ रुग्णालय | २९२.०० | २९२.०० |
| १५ | श्री.विजय नारायण चोळके | उध्दव मेमोरिअल हॉस्पिटल, नाशिक | २६६९४.०० | २४०२५.०० |
| १६ | डॉ. रुपेश अशोक जडगे | श्री साईबाबा रुग्णालय | २८२८.०० | २८२८.०० |
| | | **एकूण रक्कम रु.** | **१०८६७०.००** | **१०४५८३.००** |

**विषय नं.३६ श्रीसाईबाबा हॉस्पिटलमध्ये टोकन पध्दत व Public Announcement System सुरु करणे बाबत.**

**निर्णय क्र.४४९** श्री साईबाबा हॉस्पिटलमधील विविध भागात कायमच गर्दी आढळल्याने त्यावर नियंत्रण करणेकामी विविध उपाययोजना करण्यात आल्या. परंतु अदयापही याबाबत पूर्णपणे यश प्राप्त झालेले नाही याची काही कारणे पुढीलप्रमाणे आहेत.

०१) श्री साईबाबा हॉस्पिटलमध्ये विविध विभाग पूर्ण क्षमतेने चालू आहेत आज येथे सरासरीने १५ ते २० एम.आर.आय.एवढयाच संख्येने सी.टी.स्कॅन व ४५ ते ५० एक्स-रे असे एकूण ७५ ते ८० रुग्ण साधारणत: दिवसभरात तपासले जातात. (९ ते १० तासांच्या अवधीत.)

०२) विविध ठिकाणचे अपघातग्रस्त रुग्ण येथे बऱ्याच प्रसंगी मोठया संख्येने (Mass Casualty) येत असतात.

०३) शनिवार, बुधवार, गुरुवार या दिवशी बाहेरुन येणाऱ्या व्हिजीटींग डॉक्टर्सची संख्या जास्त असल्याने या दिवशी विविध तपासण्या करणेकामी येणाऱ्या रुग्णांची संख्या अधिक असते.

०४) ओ.पी.डी. व अपघात विभागातील एकत्रित रुग्णसंख्या रोज सरासरी २०० च्या वर असून हॉस्पिटलमध्ये येणारे रुग्ण अहमदनगर, नाशिक, औरंगाबाद इ. परिसरातून येतात अशा रुग्णांबरोबर प्रत्येकी १ ते २ नातेवाईकही असतात.

०५)व्हिजीटींग कार्डिऑलॉजिस्ट,नेफ्रॉलॉजिस्ट व नेत्ररोगतज्ञ यांचे ओ.पी.डी रुग्ण पहिला मजला व दुसऱ्या मजल्यावरील ज्या त्या विभागातच तपासले जातात. यामुळे या विभागात गर्दी कायमच असते व येथील गर्दी नियंत्रणात आणणे सुरक्षा रक्षकांनाही कठीण होत आहे.

०६) ओ.पी.डी. व्यतिरिक्त या रुग्णालयातील विविध विभाग पूर्ण क्षमतेने चालू आहेत यातील मुख्य पुढीलप्रमाणे -१) CVTS, २) Cath-Lab, ३) Dialysis, ४) ICCU, ५) GICU, ६) Radiology, ७) Pathology इ.

०७) हॉस्पिटलमधील रुग्णांना औषधे व इतर गरजेनुसार डॉक्टरांनी लिहून दिलेले इतर सामान बाहेरून विकत आणावे लागते. ते वेळोवेळी आणणेसाठी रुग्णांबरोबर नातेवाईक असणे आवश्यक ठरते.

रुग्णांच्या नातेवाईकांना रुग्णांस भेटण्याच्या निर्धारित वेळे व्यतिरिक्त जाऊ न देण्याचे आदेश सुरक्षा रक्षकांना दिले आहेत. या वेळेव्यतिरिक्त फक्त पासधारक नातेवाईक रुग्णाकडे आवश्यकतेनुसार जाऊ शकत असले तरी रुग्णांना भेटणेसाठी आलेल्या नातेवाईकांमुळे तसेच उपरोक्त अ.नं. ५ मधील ओ.पी.डी. (कार्डिऑलॉजिस्ट,नेफ्रॉलॉजिस्ट व नेत्ररोगतज्ञ यांचे ओ.पी.डी.) रुग्णांची प्रत्येक दरवाजा जवळ गर्दी होते व सुरक्षा रक्षकांना ती आटोक्यात आणणेकामी प्रयत्नांची शिकस्त करावी लागते. काहीवेळा जरूर त्या व्यक्तीला औषधसामुग्री रुग्णाकडे घेऊन जाण्यास विलंब होतो. बऱ्याच वेळा भांडणाचे प्रकारही उद्‌भवतात.

या हॉस्पिटलमधील Corridors अरूंद असल्याने नातेवाईकांच्या घोळक्यामुळे बऱ्याच वेळा कोंडी झाल्याचे आढळते. सर्वच ठिकाणी खुर्च्या अथवा इतर बैठकीच्या सोयीच्या अभावा पायी नातेवाईकांना काही ठिकाणी जमिनीवरच बसावे लागते. यामुळे हॉस्पिटलच्या कामकाजातील सुव्यवस्थितपणा नाहीसा होऊन तेथे बाजाराचे स्वरूप आल्याचे भासते.

वॉर्डच्या बाहेर बसलेले नातेवाईक तेथेच भोजन करतात व त्यामुळे काही प्रमाणात अस्वच्छता होते. काहीजण वरच्या माळयावरुन खाली थुंकतांनाही आढळतात.

वरील परिस्थिती विचारात घेता यावर उपयायोजना आवश्यक आहे.सदर उपाय योजना पुढीलप्रमाणे असावी, असे नम्र मत आहे.

१. बाह्यरुग्ण विभागातील रूग्ण, नातेवाईक यांच्या बसण्याची सोय मोठया हॉलमध्ये व्हावी. यासाठी प्लॅस्टिकच्या खुर्च्या अथवा तत्सम व्यवस्था करण्यात यावी, याबाबतच्या सूचना मा. कार्यकारी अधिकारी महोदय यांनी त्यांचे राऊडमध्येही दिलेल्या आहेत. त्याबरोबरच-
२. दिनानाथ मंगेशकर हॉस्पिटल, पुणे, यांच्या धर्तीवर टोकन सिस्टिम चालू करावी. यासाठी Electronic Display Board व Public Announcement system उभारण्यात यावी.

वरील उपाययोजनेमुळे सर्व नातेवाईक खालच्या हॉलमध्ये बसू शकतील व जरूर त्यांना गरजेनुसार योग्य ठिकाणी बोलविता येऊ शकेल.

**अ) Public Announcement system** बाबत मे.गुजर इलेक्ट्रिकल्स,पुणे,यांचेशी चर्चा केली असता त्यांनी येथील संपूर्ण जागेची समक्ष पाहणी करुन पी.ए.सिस्टीमसाठी अंदाजे रुपये ५,००,०००/- खर्च अपेक्षित असल्याचे सांगितले. सदर कंपनीमार्फत दिनानाथ मंगेशकर रुग्णालयातील पी.ए. सिस्टीमचे काम करण्यात आल्याचे समजते.

**ब)** याशिवाय टोकन सिस्टीमकरिता इलेक्ट्रॉनिक डिस्प्ले बोर्ड व सी.सी.टी.व्ही. बसविणेकामी अंदाजे रुपये ५,००,०००/- (अक्षरी रुपये पाच लाख मात्र) खर्च अपेक्षित असल्याचे ई.डी.पी मॅनेजर, श्री कोते, यांनी कळविले आहे.

**उपरोक्त अ व ब सिस्टीम्स्‌साठी अंदाजे रूपये १०,००,०००/- पर्यंत खर्च अपेक्षित असून सदर खर्चास व सदरची सिस्टीम्स सुरु करण्यास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

**विषय नं.३७ कु.अरुणा चव्हाण वय वर्ष १९ रा.वेरुळ जि.औरंगाबाद या रुग्णावर झालेल्या अयशस्वी शस्त्रक्रियांच्या गुंतागुंतीबाबत.**

**निर्णय क्र.४५०** विविध वृत्तपत्रातून कु. अरुणा चव्हाण, वय वर्षे १९, रा. वेरूळ, जि.औरंगाबाद या रुग्णावर झालेल्या अयशस्वी शस्त्रक्रियांच्या गुंतागुंतीबाबत बातम्या प्रसिध्द झाल्या आहेत.

दिनांक ०३.०४.२०८ चे पत्रान्वये कु. अरुणा चव्हाण यांनी वैद्यकीय औषधोपचारासाठी संस्थान मार्फत आर्थिक मदत मिळणेबाबत विनंती अर्ज केला असून त्यात माझ्या आई वडीलांनी घरदार विकून गेल्या ४-५ महिन्यापासून मला उपचारासाठी श्री साईबाबा हॉस्पिटलमध्ये दाखल केले. दरम्यानच्या काळात माझेवर ३ शस्त्रक्रिया करण्यात आल्या त्यामुळे आमचेकडे असलेले सर्व पैसे खर्च झाल्याने सध्या आमच्याकडे एक पैसाही नाही. या शस्त्रक्रिया अयशस्वी झाल्याने मला अपंगत्व आले आहे. मात्र डॉक्टर पुढील उपचारासाठी मुंबईला जाण्याचा सल्ला देत आहेत. याकामी आमचेकडे पैसे नसल्याने सदरचा सर्व खर्च संस्थानने करावा अशी विनंती केली आहे.

दिनांक ०३.०४.२००८ चे पत्रान्वये शिवसेना शिर्डी शहर शाखेमार्फत विविध कार्यकर्त्यांनी उपरोक्त रुग्णास मानवतावादी दृष्टीकोनातून आर्थिक मदत करून मुलीस नवीन ***जीवनदान*** दयावे असे निवेदन दिले आहे.

**या रुग्णाबाबतची माहिती पुढील प्रमाणे -**

दि. २४.११.२००७ रोजी दु ३.४० वाजता श्री साईबाबा रुग्णालयात कु.अरूणा चव्हाण, वय वर्ष १९, ही महिला रुग्ण उपचारार्थ भरती करण्यात आली. तिच्या ओ.पी.डी केसपेपरवर कुठल्याही प्रकारचे डायग्नोसिस/क्लिनिकल नोट्स लिहीलेल्या नाहीत.

डॉ.म्हस्के, उप.वैद्यकीय संचालक, यांनी रुग्णाच्या ओपीडी केसपेपरवर डॉ.प्रविण शर्मा यांना ***'आवश्यक ती कार्यवाही करणेबाबत'*** लिहीलेले आहे.त्यानंतर या पेपरवर डॉ. प्रविण शर्मा यांनी Admit this patient in Female General Ward under my care for L-5 anterior approach fixation असे लिहिलेले आढळते.

**संपूर्ण ओ.पी.डी. व आय.पी.डी. केसपेपर्समध्ये या संदर्भात -**

(१) सदर रुग्णाला भरती होणेपूर्वी नेमका काय त्रास होता - Symptoms
(२) सदर त्रासासंबंधीचा पूर्वेतिहास - History of present illness
(३) वैद्यकीय तपासणी अहवाल - Clinical findings

(४) Neurological findings मज्जासंस्थेतील विकारात्मक बदल

(५) पाठीच्या कण्याला असलेला विकार

- **इत्यादी महत्त्वाच्या बाबींवर टिपण्या लिहीलेल्या नाहीत.**

अ) सदर पेशंटची तीन ऑपरेशन्स दि.०१.१२.२००७, दि.१९.१२.२००७ व दि.१६.०२.२००८ रोजी झाली.

परंतु या ऑपरेशनच्या कार्यकारण भावाचा (Diagnosis & Indications) कुठेही उल्लेख नाही.

ब) सदर केसपेपर हा न्याय व कायदा या दृष्टीने (मेडीकोलीगल) महत्वाचा असूनही त्यावरील टिपण्या (Notes) या त्रोटक, अर्थहीन व असंबध्द असल्यामुळे केसपेपरच्या अभ्यासावरुन काहीही माहिती प्राप्त होत नाही, यामुळे सदर बाब न्यायालयापर्यंत गेल्यास संस्थान रुग्णालयांचे मोठे आर्थिक नुकसान होऊ शकते.

क) सदर पेशंटला तत्कालीन वैद्यकीय संचालक, डॉ.ढवळे यांनीही अनेकवेळा तपासले असल्याचे उपलब्ध पेपरवरुन दिसते. परंतु त्यांनीही कुठल्याही प्रकारच्या सुसंबध्द व सुसंगत क्लिनिकल नोट्स/रोग निदान लिहिलेल्या नाहीत अथवा रुग्णाच्या उपचारा संदर्भात आदेश दिलेले नाहीत.

क) गेले चार महिने सदर रुग्ण कमरेखालच्या भागाला पॅरालेसिस झालेल्या अवस्थेत बेडवर खिळून आहे.

रुग्णाच्या नातेवाईकांनी (रुग्णाची आई) दिलेल्या माहितीनुसार रुग्ण कु.अरुणा चव्हाण हिला भरती करतेवेळी चालता फिरता येत होते. परंतु या विविध ऑपरेशन्सनंतर तिच्या दोन्ही पायांतील ताकद संपूर्ण नाहीशी झालेली असून आता कमरेच्या खालचा संपूर्ण भाग लुळा पडल्याने तिला कुठलीही हालचाल स्वतः करणे शक्य होत नाही. त्यांच्या मते आर्थिक नुकसानी बरोबरच डॉक्टरांनी केलेल्या चुकीच्या ऑपरेशनमुळे तिच्या आयुष्याचे पूर्णपणे नुकसान झाले आहे व तिच्या जवळच्या नातेवाईकांनाही भविष्यात रुग्णाच्या दैनंदिन विधींसह संपूर्ण देखभाल करणेसाठी फार मोठा आर्थिक, मानसिक व शारीरिक त्रास सहन करावा लागणार आहे.

या संदर्भात डॉ.प्रवीण शर्मा यांचेकडे दि.०५.०४.२००८ रोजी याबाबत चौकशी केली असता त्यांनी लेखी खुलासा सादर केला आहे. तो यासोबत आपले अवलोकनार्थ जोडलेला आहे. सदर खुलाशातील एकही बाब संदर्भीत केसपेपरमध्ये नमूद केलेली नाही.

डॉ.म्हस्के, उप वैद्यकीय संचालक, व डॉ.प्रवीण शर्मा, ऑनररी न्यूरो सर्जन यांनी मा. वैद्यकीय संचालक यांच्या कक्षात दि.०५.०४.२००८ रोजी रुग्णाच्या नातेवाईकांबरोबर चर्चा करुन सदर रुग्णाला मुंबई येथील के.ई.एम. हॉस्पिटलमध्ये उपचारार्थ संस्थानमार्फत पाठवावे व तेथील उपचारासाठी रु.२५,०००/-(अक्षरी रुपये पंचवीस हजार मात्र) संस्थानतर्फे मदत व्हावी, असे ठरले. याबाबतचा प्रस्ताव येत्या मा.व्यवस्थापन समितीचे सभेपुढे निर्णयार्थ ठेवण्याच्या सूचना कार्यालय अधिक्षक यांना मा.उप वैद्यकीय संचालक यांनी दिलेल्या आहेत.

पुढील उपचारार्थ रुग्णाला के.ई.एम.हॉस्पिटल, मुंबई,येथे पाठविण्याची गरज असतांना डॉ. प्रविण शर्मा यांनी जवळ-जवळ दीड महिना इतका प्रदीर्घ कालावधी का घालवला? याचे उत्तरही स्पष्ट होत नाही. दरम्यानचे काळात डॉ. शर्मा यांनी सदर रुग्णाला एकदाही तपासले नसल्याचे नातेवाईकांचे म्हणणे आहे.

मात्र के.ई.एम.,मुंबई येथील पुढील उपचार अयशस्वी ठरल्यास या नातेवाईकांचा व संबंधितांचा न्यायालयात जाण्याचा विचार असावा, असे चर्चेमध्ये जाणवले.

उपरोक्त सर्व बाबींचा विचार करता या संपूर्ण प्रकरणाची योग्य तज्ञांच्यामार्फत सखोल चौकशी व्हावी, असे नम्र मत आहे.

**निष्कर्ष :-**

**(अ)** मानवतावादी दृष्टीकोनातून सदर रुग्णास के.ई.एम.हॉस्पिटल, मुंबई येथे संस्थानमार्फत पुढील उपचारार्थ पाठविणेस व याकामी येणा-या अंदाजे रु.२५,०००/- ते रु.३०,०००/- पर्यतचे खर्चास मान्यता असावी,

**(ब)** संपूर्ण प्रकरणाची योग्य तज्ञांमार्फत चौकशी होऊन त्यांचे अहवालात डॉ.प्रवीण शर्मा दोषी आढळल्यास त्यांचेवरील कारवाईबाबत निर्णय व्हावा.

**(क)** डॉक्टर ढवळे,माजी वैदयकीय संचालक,यांनी सदर रुग्णास अनेक वेळा तपासूनही फिजिशियन अथवा वैदयकीय संचालक या नात्याने उपचारात योग्य ते फेरबदल केले नाहीत अथवा पुढील उपचारासाठी दुसरीकडे (के.ई.एम्.हॉस्पिटल,मुंबई, येथे) पाठविणेबाबत तजवीज केली नाही, इतकेच नव्हे तर सदर बाब दखलपात्र असूनही याबाबत वरिष्ठ प्रशासन (कार्यकारी अधिकारी महोदय) यांना काहीही न कळवून अंधारात ठेवल्याने, त्यांचेकडूनही याबाबतचा खुलासा मागविणेत यावा.

**यावर सविस्तर चर्चा होऊन, मानवतावादी दृष्टीकोनातून सदर रुग्णास के.ई.एम.हॉस्पिटल, मुंबई येथे संस्थानमार्फत पुढील उपचारार्थ पाठविण्यात यावे तसेच याकामी येणा-या योग्य त्या खर्चास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

**विषय नं.३८** **श्री पांडुरंग जिजा वाघ रा. हस्त पोखरी ता. अंबड जि. जालना या रुग्णांने डॉ.टिंगरे यांचेविरुध्द केलेल्या तक्रारीबाबत.**

**निर्णय क्र.४५१** दिनांक ०५.०१.२००८ चे पत्रान्वये श्री वाघ यांनी केलेल्या तक्रारीबाबत चर्चा होऊन निर्णय होणेकामी प्रस्ताव सादर करण्यात आला होता. त्यावर सविस्तर चर्चा होऊन दिनांक २०.०१.२००८ रोजीचे सभेत निर्णय क्र.१४९ अन्वये पुढीलप्रमाणे निर्णय घेण्यात आला.

याकामी डॉ.चारुदत्त आपटे,सहयाद्री हॉस्पिटल,पुणे,यांची समिती नियुक्त करण्यात यावी, त्यांनी याबाबत तपासणी करुन आपला अहवाल मा.व्यवस्थापन समितीचे सभेपुढे निर्णयास्तव सादर करावा, असे ठरले.

सभेतील या निर्णयानुसार कार्यवाही करणेसाठी सहयाद्री स्पेशालिटी हॉस्पिटलचे डॉ.चारु आपटे यांचेकडे या केसबाबतची सर्व कागदपत्रे सादर करण्यात आली. त्यानुसार डॉ.आपटे यांनी दि.०२.०४.२००८ रोजीचे पत्राने याबाबतचा अहवाल पाठविला, तो पुढीलप्रमाणे :-

०१) माहे नोव्हेंबर २००७ मध्ये केलेल्या MR Scan मधून सदर रुग्णाला Prolapsed disc causing anterior compression on the spinal cord असल्याचे दिसून येते.

०२)वरील विकारावरील उपचारासाठी डॉ.टिंगरे यांनी Cervical Laminectomy from C 4-6 ही शस्त्रक्रिया केली.

०३) रुग्णाला आराम न वाटल्यामुळे माहे डिसेंबर २००७ च्या शेवटच्या आठवडयात पुन्हा MR Scan केला गेला. त्यानंतर **Surgery with anterior approach** ही शस्त्रक्रिया केली व त्यानंतर रुग्णाला आराम वाटला.

०४)डॉ.चारु आपटे यांच्या मते Anterior surgery to excise the disc & fuse the spine ही शस्त्रक्रिया सुरुवातीसच करणे जास्त योग्य झाले असते.

डॉ.टिंगरे यांनी केलेली Cervical Laminectomy ची शस्त्रक्रिया अशा विकारावर अनेक न्यूरो सर्जन्स कडून केली जात असते, ही उपाययोजनासुध्दा योग्यच आहे. मात्र या शस्त्रक्रियेनंतर रुग्णाला आराम मिळणेसाठी जास्त वेळ लागू शकतो, प्रसंगी ही कालमर्यादा सहा महिन्यांपर्यंतही असू शकते. या कालावधीत रुग्णाला अधिक त्रास जाणवू लागल्यासच दुसऱ्या प्रकारे शस्त्रक्रिया करणे आवश्यक ठरते.

**निष्कर्ष :-**

०१) डॉ.भावना टाकळकर यांनी रुग्णाची दिशाभूल करुन दुसरी शस्त्रक्रिया करण्याचा सल्ला दिला व त्यासाठी रु.५५,०००/- चे कोटेशनही दिले, हा सल्ला अयोग्य वाटतो.

०२) तत्कालीन वैदयकीय संचालक डॉ.ढवळे, यांनी सदरचे रुग्णाला **तात्काळ** शस्त्रक्रियेची जरुर असल्याचा निर्णय घेऊन त्यास दि.०७.०२.२००८ रोजी श्री साईबाबा हॉस्पिटलमध्ये पुनश्च भरती करुन स्वतःच्या युनिटमध्ये दाखल करुन घेतले.

त्यानंतर डॉ.प्रवीण शर्मा, व्हिजीटींग न्युरो सर्जन, नाशिक, यांचेकडे शस्त्रक्रियेसाठी रेफर केल्याने दि.१०.०२.२००८ रोजी सदर रुग्णावर दुसरी शस्त्रक्रिया संस्थानमार्फत करण्यात आली.

डॉ.ढवळे व डॉ.प्रवीण शर्मा यांनी रुग्णावर दुसरी शस्त्रक्रिया करण्याचा घाईने घेतलेला निर्णय डॉ.चारु आपटे यांच्या अहवालानुसार अयोग्य वाटतो.

०३) सदर रुग्ण दि.०७.०२.२००८ रोजी पुन्हा श्री साईबाबा हॉस्पिटलमध्ये भरती झाला तेव्हा तो हिंडू फिरु शकत होता किंवा नाही याबाबत प्रस्तुतचे केसपेपरवर त्याच्या Neurology Status बद्दल असंबध्द व अपूर्ण नोंदी असल्याचे आढळून येते.

०४) डॉ.टिंगरे यांची या प्रकरणी प्राथमिक चौकशी तथा डॉ.चारु आपटे यांचे प्राप्त अहवालानुसार ते सदर प्रकरणात दोषी असल्याचे आढळून येत नाही.

०५) सदर प्रकरणी डॉ.ढवळे, तत्कालीन वैदयकीय संचालक व डॉ.प्रवीण शर्मा, ऑनररी न्यूरो सर्जन, यांचेकडून या संदर्भात काही बाबतीत स्पष्टीकरण मागवावे, असे मत आहे.

परंतु या संपूर्ण प्रकरणी श्री साईबाबा संस्थानचे रुपये ५,०००/- पर्यन्त नुकसान झाले ही बाब मात्र विचारात घेण्यासारखी आहे,असे नम्र मत आहे.

**व्यवस्थापन समितीचे दि.२०/०१/२००८ रोजीचे सभेतील निर्णय क्र.१४९.मधील निर्णयाप्रमाणे मा.डॉ.आपटे यांचे तपासणी अहवालासह प्रस्ताव आजचे सभेत सादर करण्यात आला, त्याची नोंद घेण्यात आली व सदर प्रकरण प्रस्तावित केलेप्रमाणे नस्तीबध्द करणेस मान्यता देण्यात आली. (कार्यवाही-वैद्यकीय संचालक)**

**विषय नं.३९** **श्री.सि.कृ.नरोडे, पाथरे यांचे डोळयाच्या शस्त्रक्रियेनंतर झालेल्या गुंतागुंतीविषयीच्या तक्रारीबाबत.**

**निर्णय क्र.४५२** श्री सिताराम कृष्णा नरोडे, वय - ६० वर्षे, रा.पाथरे, ता.सिन्नर, जि. नाशिक, यांचे डाव्या डोळयावर मोतीबिंदू शस्त्रक्रिया श्री साईबाबा हॉस्पिटलमध्ये दि.०७.११.२००७ रोजी करण्यात आली होती. सदर शस्त्रक्रिया चुकीची झाली असल्याचे रुग्णाने दिनांक १०.१२.२००८ चे तक्रार अर्जात म्हटलेले आहे.

उपरोक्त बाबतीत दि.०८.०१.२००८ रोजी चौकशी केली असता खालीलप्रमाणे वस्तुस्थिती आढळून आली.-

०१) श्री सिताराम नरोडे, यांच्या डाव्या डोळयावर झालेली मोतीबिंदू शस्त्रक्रिया दि.०७.११.२००७ रोजी डॉ.सचिन उंडे, असो.कन्स.(नेत्ररोग) यांनी यशस्वीरित्या केलेली होती व शस्त्रक्रियेनंतर सदर रुग्णाला दृष्टी देखील आली होती. रुग्ण हॉस्पिटलमधून दिनांक ०८.११.२००७ रोजी डिस्चार्ज झालेनंतर पूर्णपणे चांगल्या स्थितीत होता.

०२) शस्त्रक्रियेच्या आधी व नंतर डॉ.उंडे यांनी रुग्णाला विविध औषधांबरोबरच योग्य ती सर्व Antibiotics,eye drops देखील दिले होते त्याबरोबरच काळा चष्मा वापरण्याचा आदेश दिला होता.

३) सदर रुग्णाने ऑपरेशननंतर औषधोपचार योग्य रितीने व सूचनेप्रमाणे न केल्यामुळे तसेच योग्य ती डोळयाची निगा न राखल्यामुळे ऑपरेशन झालेल्या डाव्या डोळयात जंतुसंसर्ग (Infection) झाले असल्याची दाट शंका वाटते.

डॉ.सचिन उंडे, यांना दिनांक १२.११.२००७ रोजी दूरध्वनीवरुन रुग्णाचा डावा डोळा दुखत असल्याचे समजल्याने दिनांक १३.११.२००७ रोजी रुग्णास तातडीने इथे येण्याचे सांगून तपासणी केल्यानंतर योग्य ते निदान करुन (Endophthalmitis) चे पुढील उपचारासाठी औरंगाबाद येथील Vitreo-retinal surgeon डॉ.मनोज सासवडे, यांचेकडे रेफर करुन त्यांच्यामार्फत पुढील उपचार अत्यल्प दरात उपलब्ध करुन दिला व जंतुसंसर्ग दूर केला त्यानंतर हा रुग्ण व्यवस्थित झाला असल्याचेही समजले.

हया प्रकरणात डॉक्टर म्हणून सर्व काळजी डॉ.उंडे यांनी घेतली असल्याचे तपासात आढळून आले आहे व केवळ ऑपरेशननंतर रुग्णाने डोळयाची योग्य ती काळजी न घेतल्यामुळेच श्री नरोडे यांना जंतुसंसर्ग (Infection) झाला असल्याची दाट शंका वाटते.

मोतीबिंदूच्या शस्त्रक्रियांमध्ये (Endophthalmitis) ०.०६ ते ०.२ इतक्या टक्क्यांपर्यंत जंतूसंसर्ग होऊ शकतो असे नेत्रशल्य चिकित्सेच्या विविध संदर्भ ग्रंथांमध्ये लिहीलेले आहे. या गुंतागुंतीचे मुख्य कारण Unhygienic Habits असल्याचेही नमूद केले आहे.

**तथापि, दिनांक १०.१२.२००७ चे पत्रानुसार तक्रारदार श्री सिताराम कृष्णाजी नरोडे, यांनी पुढीलप्रमाणे कथन केले आहे.**

मी एका डोळयाची शस्त्रक्रिया करावयाची होती. तेथील डॉ.सचिन उंडे यांनी माझ्या सर्व टेस्ट घेवून डोळयाची शस्त्रक्रिया दि.०८.११.२००७ रोजी केली व नंतर दुस-या दिवशी डोळयाची पट्टी काढल्या नंतर डोळयात टाकलेली लेन्स तिरपी बसल्यामुळे त्यांनी दुस-यांदा शस्त्रक्रिया केली त्यांच्या या शस्त्रक्रिया मुळे डोळयाचे सेप्टीक झाले व फार त्रास होण्यास सुरुवात झाली.

आपल्या संस्थान मध्ये अत्याधुनिक यंत्र सामुग्री असून सुध्दा डॉ.उंडे यांनी डॉ.मनोज सासवडे नेत्र रुग्णालय, औरंगाबाद येथे चिठ्ठी देऊन शस्त्रक्रिया साठी पाठवले व सदर शस्त्रक्रियेचा एकूण खर्च रु.१४०००/- झाला व साईबाबा हॉस्पिटलमधील खर्च रु.६०००/- झाला. एकूण रु.२००००/- खर्च झ ाला आहे. मी शेतमजूरी करीत असल्याने सदर रक्कम ही ऊसनवारी गोळा करुन दिलेली आहे. एवढी रक्कम खर्च करुन सुध्दा डोळा निकामी झाला आहे.

तरी आम्हास भरीवात भरीव मदत किंवा संस्थान मध्ये माझ्या मुलास नोकरी मिळावी, ही विनंती. तरी माझे अर्जाचा सहानुभूती पूर्वक विचार करुन न्याय मिळावा, ही विनंती.

डॉ.पाटील, नेत्र सर्जन, श्री सिध्दी विनायक मल्टी स्पेशालिटी हॉस्पिटल, राहाता, यांचे दि.२७.०३.२००८ रोजी प्राप्त झालेल्या सर्टिफिकेट मधील प्रमुख मुद्दे पुढीलप्रमाणे :-

०१) दि.०७.११.२००७ रोजी डॉ.सचिन उंडे यांनी ऑपरेशन केल्यावर डोळयातील कृत्रिम भिंगाची स्थिती हलल्यामुळे दि.०८.११.२००७ रोजी पुन्हा एका ऑपरेशनव्दारे (Redialling) भिंग व्यवस्थीत ठिकाणी आणावी लागली.

०२) दि.०८.११.२००७ रोजी रुग्णाला Endophthalmits हे Complications झालेले असूनही या रुग्णाला डॉ.सासवडे यांचेकडे पाठविण्यास झालेला तीन ते चार दिवसांचा विलंब हा घातक ठरला.

०३) सदर रुग्णाला डोळा गमवावा लागलेला असून त्याठिकाणी कृत्रिम डोळा बसावा लागलेला आहे. या सर्वांचा खर्च रु.२,००,०००/- (अक्षरी रुपये दोन लाख मात्र) चे पुढे खर्च आलेला आहे.

दिनांक २९.०३.२००८ चे पत्रानुसार डॉ.सचिन उंडे, नेत्ररोग तज्ञ यांनी पुढील प्रमाणे खुलासा केलेला आहे.

श्री सिताराम कृष्णा नरोडे यांचे डाव्या डोळयावर मोतीबिंदू शस्त्रक्रिया श्री साईबाबा हॉस्पिटलमध्ये दि.०७.११.२००७ रोजी करण्यात आली होती. सदर रुग्णाला ऑपरेशन नंतर योग्य दृष्टी देखील आली होती. परंतु, ऑपरेशन झाल्यानंतर ५-६ दिवसांपर्यंत डोळयाची योग्य ती काळजी सदर रुग्णाने न घेतल्यामुळे डोळयात जंतुसंसर्ग (Infection) झाले. सदर रुग्णाला औरंगाबाद येथील नेत्ररोग तज्ञ डॉ.मनोज सासवडे, यांनी मोफत उपचार करुन दिले व रुग्णाला बरे केले.

या सर्व प्रकरणात डॉ.अजीत पाटील, यांचा काहीही संबंध नसतांना केवळ हेतुपुरस्स र ते रुग्णाला भडकवण्याचे काम करीत आहेत. डॉ.पाटील यांना संस्थान सेवेतून कार्यमुक्त होऊन पाच महिने उलटून गेले आहेत. तरीही ते पूर्व वैमनस्यातून या प्रकरणात लक्ष घालत असून रुग्णाची व श्री साईबाबा संस्थानची दिशाभूल करीत आहेत.

सदर रुग्णाला औरंगाबाद येथील ऑपरेशन करण्यास दोन-तीन हजार रुपये खर्च आला असल्याने त्याने सांगितलेले एक लाख रुपये हे फक्त संस्थेकडून पैसे उकळण्याचा त्यांचा व डॉ.अजीत पाटील यांचा डाव आहे, असेच वाटते. त्यामुळे सदर रुग्णाला पूर्ण treatment मिळाली असून त्याला मदत करण्याचा प्रश्नच उद्‌भवत नाही, असे वाटते.

यापुर्वीसुध्दा मा.उपाध्यक्ष महोदय श्री कोल्हे साहेबांतर्फे जा.क्र.एसएसएस/ वशी-७ए/४१/२००८अन्वये, हयाच पेशंटच्या संदर्भात खुलासा मागविण्यात आला होता.

तात्पर्य:-

०१) ऑपरेशन नंतर ५ ते ७ दिवसांपर्यंत रुग्णाव्दारा डोळयाची डॉक्टरांच्या सूचना डावलून योग्य ती काळजी/निगा व औषधोपचार न केला गेल्यानेच सदर रुग्णाचे डोळयास जंतूसंसर्ग झाला असावा,असे वाटते.

०२) डॉ.अजीत पाटील हे श्री साईबाबा संस्थान रुग्णालय सोडून गेलेले असून त्यांचे डॉ.उंडे व डॉ.हेतल शाह यांचेशी वैयक्तीक वैमनस्य होते हे ज्ञात आहे. त्यामुळे त्यांनी दिलेल्या सर्टिफिकेटबाबत साशंकता उद्‌भवते.

०३) त्यामुळे रुग्णाची भरीवात भरीव आर्थिक मदतीची अथवा मुलास संस्थानमध्ये नोकरीत घेण्याची मागणी अवाजवी व अव्यवहार्य असून ती पूर्ण करणे संस्थानवर बंधनकारक नसावे, असे नम्र मत आहे.

**यावर सविस्तर चर्चा होऊन क्र.०३ प्रमाणे केलेली आर्थिक मदत अथवा मुलास संस्थानमध्ये नोकरीची मागणी मान्य करण्यात येऊ नये असे ठरले.**(कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

**विषय नं.४०** **नवीन प्रसादालयाचे इलेक्ट्रीकल कामाचे फायनल बिलाबाबत.**

**निर्णय क्र.४५३** दि. ०६-०१-२००७ रोजी झालेल्या मा.व्यवस्थापन समितीचे सभेतील विषय क्र.१८ निर्णय क्र.१८ नुसार मे.आदिती इलेक्ट्रिकल्स,नासिक यांना नविन प्रसादालयाच्या इलेक्ट्रिफिकेशनच्या कामासाठी रु. ३,०३,९९,६६१.१५ इतक्या रकमेचा कार्यादेश संस्थान पत्र क्र.एसएसएस / विद्युत / ६५१ / २००७ दि.१२-०१-२००७ अन्वये देण्यात आला होता. मा.व्यवस्थापन समितीचे दिनांक १०-०१-२००८ चे सभेतील विषय क्र.६७ निर्णय क्र.६७ अन्वये मे. आदिती इलेक्ट्रिकल्स, नासिक यांना जानेवारी २००८ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली होती. त्यांनी मुदतीत काम पूर्ण केले असून कामाचे रु.३,४२,२९,८९८.५९ इतक्या रक्कमेचे फायनल बील त्यांनी सादर केले आहे. हे झालेले काम आर्किटेक्ट मे. शक्ति परमार अँड असोशिएटस, मुंबई यांनी चेक केले असून बील तपासून बीलावर लेखी स्वाक्षरी केली आहे व यानंतर या बीलाची रक्कम रु.३,३५,१६,९४५.४४ आदा करावी म्हणून तसे लेखी पत्रही दिले आहे.

सादर झालेल्या व आर्किटेक्टने चेक करून कळविलेली बीलाची रक्कम रु.३,३५,१६,९४५.४४ असून यात कार्यादेशाच्या रु.३,०३,९९,६६१.१५ या रक्कमेचा तसेच मा.व्य.समितीच्या निर्णयानुसार इतर कामाची मंजूर रक्कम रु. ८,७२,९७३.१९ मिळून रु. ३,१२,७२,६३४.३४ चा व जादा कामाच्या रु. २४,२४,००७.९५ चा समावेश आहे. बील व प्रत्यक्ष काम चेक केले असता जादा कामातील तसेच पूर्वीच्या कार्यादेशाच्या कामातील काही रक्कम कमी झाली असून त्याचा तपशील शेवटी दिलेला आहे.

काम पूर्ण करताना झालेल्या जादा कामाच्या रकमेचा समावेश या फायनल बीलात आहे. ही रक्कम महाराष्ट्र शासनाच्या सी.एस.आर. वर आधारीत असून सर्व काम महाराष्ट्र शासनाच्या सी.एस.आर.नुसार चेक केले आहे. कामात कराव्या लागलेल्या जादा कामाच्या आयटेम क्रमांकाचा व रक्कमेचा तपशील खालीलप्रमाणे :-

०१) मेन पॅनल व सब पॅनलवरील R.Y.B. फेज दाखविण्याकरीता आवश्यकता असलेल्या LED Lamp पैकी Blue LED Lampचा टेंडरमध्ये समावेश नसल्याने सदरचे LED लॅम्पची आवश्यकता होती. त्यामुळे अ.क्र.६ च्या आयटेमची रक्कम रुपये ४,६६२.०० वाढलेली आहे.

०२) लाईट पॉईंट कंट्रोलकरीता असलेल्या डि.बी.मध्ये ELCB हा सुरिक्षततेच्या दृष्टीकोनातून बसविलेला असल्याने फॉल्ट झाल्यानंतर लिकेज करंट अर्थिंग वायरमधून वाहून जाऊन ELCB Trip होत असल्याने प्रत्येक लाईट पॉईंटला अर्थिंग वायर आवश्यक होती. त्यामुळे अ.क्र.७ मधील १.५ Sq.mm.वायरची रक्कम रु.८८,५४७.०६वाढलेली आहे.

०३) अ.क्र. ५ मधील ६५ वॅटच्या CFL चा टेंडरमध्ये समावेश नव्हता. लाईटव्यवस्था करणेकरीता सदर CFL ची आवश्यकता होती. त्यामुळे रक्कम रुपये ४३,८७९.५० वाढलेली आहे.

०४) अ.क्र. ३ मधील ब्लॅकींग प्लेट हे स्वीच बोर्डमधील डमी असलेल्या खाचेकरीता बसवाव्या लागल्या. सदरचा आयटेम टेंडरमध्ये नसल्याने रक्कम रुपये ९,११४.०० वाढलेली आहे.

०५) बुंदी किचन, मेन किचन व स्टोअरमध्ये बसविण्यात येणा-या मशिनरीकरीता व उपकरणाकरीता तसेच ए.सी.च्या पॉईंटकरीता पॉवर डि.बी.ची आवश्यकता असल्याने अ.क्र. ११, १२ तसेच १३ ची रक्कम रु. १,९३,०१६.२५ इतकी रक्कम वाढलेली आहे.

०६) पोलीस स्टेशनकरीता जनरेटर रुमपासून केबल टाकण्यासाठी लेबर चार्ज रु.६,३००.०० इतका लागलेला आहे.

०७) प्रसादालयामधील किचनमध्ये तसेच इतर हॉलमध्ये असलेले लाईट पॉईंट कंट्रोल हे त्या-त्या ठिकाणच्या हॉलमध्ये एकाच ठिकाणी असल्याने प्रत्येक ठिकाणी लाईट पॉईंटची संख्या जास्त होत असल्याने लाईट पॉईंट व फॅन कंट्रोलकरीता डि.बी. बसविण्यात आल्या असून अ.क्र.९,१० व १४ ची रक्कम रुपये रु. १४,५४,३१३.०० इतकी रक्कम वाढलेली आहे.

०८) स्ट्रीटलाईटकरीता खोदलेल्या ट्रेंचमध्ये टाकलेल्या केबलवरून वीटा लावलेल्या आहे. त्यामुळे अ.क्र.१६ ची रक्कम रुपये २३,१२१.०० वाढलेली आहे.

०९) स्ट्रीट लाईट पोलच्या वरच्या बाजूचा भाग हा उघडा असल्याने पोलमध्ये पाणी साठून खराब होण्याची शक्यता असल्याने अ.क्र. १९ मधील पोल कॅपची रक्कम रुपये ४,२२७.३० वाढलेली आहे.

१०) नविन प्रसादालयामधील मेन ऑफीस तसेच डायनिंग हॉलमध्ये आवश्यक असणा-या १६A / २०A पॉवर पॉईन्टचा (मॉडयुलर टाईप) टेंडरमध्ये समावेश नसल्याने तसेच सदर पॉईंटची आवश्यकता असल्याने Extra work मधील अ.क्र. १, २ व ४ चे काम जादा झालेली आहे. सदर कामाची एकुण रक्कम रु. ६१,३२६.४० वाढलेली आहे.

११) स्ट्रीट लाईट व लॅण्डस्केपमधील लाईटींग सप्लायकरीता आवश्यकता असल्याने अ.क्र.१७ मधील Feeder Pillar ची रक्कम रुपये १,१७,०००.०० वाढलेली आहे.

१२) दोन्ही ठिकाणच्या लिफ्ट रूममध्ये मशिनरीकरीता मोकळया सोडलेल्या जागेमुळे ॲक्सीडेंटचा धोका होता, तसेच जनरेटर रुममधील खिडक्यांना सुरक्षिततेच्या दृष्टीकोनातून बसविण्यात आलेल्या ग्रील तसेच पॅनल, सब पॅनल, केबल ट्रेंचवरती ठेवण्याकरीता पॅनल खाली चॅनेल वर्क, तसेच जनरेटर रुममधील व पॅनेल रुममधील नाल्यांवर चेकर प्लेट टाकणेची आवश्यकता असल्याने अ.क्र.८ मधील Iron Work ची रक्कम रुपये ३,२७,४२३.६० वाढलेली आहे.

१३) महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनी लि.च्या एच.टी.पोलपासून ट्रान्सफॉर्मर पर्यंत टाकलेल्या केबलचे कनेक्शन पोलवरती करण्याकरीता आवश्यक असलेल्या अ.क्र.१८ मधील Outdoor Joint Kit ची रक्कम रुपये २३,३७६.०० वाढलेली आहे.

१४) स्ट्रीट लाईट पोलच्या जमिन लेव्हलला पाणी साठून पोल गंजण्याची शक्यता असल्याने पोलच्या कडेने सिमेंटकट्टा बांधणे आवश्यक होते. त्यामुळे अ.क्र.२० मधील रक्कम रु. ४०,४६२.२३ वाढलेली आहे.

१५) जनरेटर रुममधील मेन पॅनलपासून प्रसादालयामधील ठिकठिकाणी बसविलेल्या सब पॅनलपर्यंत टाकलेल्या केबलकरीता वीट काम करुन केबल ट्रेंच बांधून त्यावरती सिमेंटचे ढापे ठेवलेले आहे. या केबलला उंदीर व घुशीपासून केबलला सुरक्षितता मिळावी, याकरीता केबल ट्रेंचमध्ये वाळूची आवश्यकता होती. त्यामुळे अ.क्र. २१ ची रक्कम रुपये ५,९०६.६७ वाढलेली आहे.

१६) मेन पॅनल व सब पॅनलवरती असलेली Voltmeter व Ammeter चे प्रत्येक फेजवरती असलेले रिडींग घेण्याची आवश्यकता असल्याने अ.क्र. २२ मधील Selecter Switch ची रक्कम रुपये १०,४५८.०० वाढलेली आहे.

१७) मेन पॅनल व सब पॅनलवरील Load पाहण्याकरीता Ammeter ची आवश्यकता असल्याने व सदरच्या Item चा टेंडरमध्ये समावेश नसल्याने अ.क्र. २३ ची रक्कम रुपये ७,८७५.०० वाढलेली आहे.

उपरोक्तप्रमाणे अ.क्र. ०१ ते १७ च्या आयटेम्सची एकुण रक्कम रु. २४,२४,००७.९५ इतकी होते. मे. आदिती इलेक्ट्रीकल्स्, नाशिक यांनी सादर केलेले इलेक्ट्रीकल कामाच्या अंतिम बीलामधील **कमी झालेल्या रकमेचा तपशील खालीलप्रमाणे :-**

अ). नविन प्रसादालयाचे इलेक्ट्रीकल कामाचे टेंडरचे टेक्नीकल मंजूरी घेणेकरीता सार्वजनिक बांधकाम विभाग (विद्युत) यांचेकडील कार्यवाहीमुळे तसेच टेंडर प्रोसेसमुळे उशिर झाला. त्यामुळे प्रत्यक्षात बांधकाम ठेकेदार, मे.आय.व्ही.आर.सी.एल. यांचे काम चालू झालेले होते. सदर ठिकाणी करावयाची वायरींग ही कन्सिल्ड असल्याने आय.व्ही.आर.सी.एल. यांच्या कामात उशिर होऊ नये म्हणून मा.आर्किटेक्ट यांनी मे.आय.व्ही.आर.सी.एल.यांना स्लॅबमध्ये पी.व्ही.सी.पाईप टाकण्यास सांगितले. त्यानुसार मे.आय.व्ही.आर.सी.एल.यांनी पी.व्ही.सी.पाईप टाकलेले असून त्याची Quantity ५३३२.०२ इतकी झालेली आहे. त्याचे बील संस्थानने आदा केलेले आहे. त्या दरम्यान प्रसादालय वायरींग कामाचे टेंडर मे.आदिती इलेक्ट्रीकल्स्,नाशिक यांना दिल्यानंतर पॉईंट वायरींग, मेन वायरींग तसेच सब वायरींगमधील दरामध्ये पी.व्ही.सी. पाईपचा समावेश असल्याने व सदरचा दर मंजूर असल्याने मे.आय.व्ही.आर.सी.एल. यांनी टाकलेले PVC पाईप ५३३२.०९ मीटर मे.आदिती इलेक्ट्रीकल्स्, नाशिक

यांच्या बीलातून टेंडरमध्ये मंजूर असलेल्या रुपये ४०.९५ + ४ टक्के कॉन्टिजेन्सी + २.५ टक्के टेंडर परसेंटेज प्रमाणे होणारी रक्कम रुपये २,३२,७५७.०६ ने कमी होत आहे.

ब). मा.व्यवस्थापन समितीमध्ये मंजूर केलेल्या प्रस्तावात आर्किटेक्टने कळविलेला दर Feeder Pillar चा दर रुपये ५२,५००.०० इतका आहे. परंतू बीलामध्ये हायमास्ट लॅम्पच्या कामात रुपये ५८,५००.०० + ४ टक्के कॉन्टिजेन्सी + २.५ टक्के टेंडर परसेंटेज इतका लावलेला आहे. त्यामुळे रुपये ६,३९६.०० ने कॉस्ट कमी होत आहे

क). मे.आदिती इलेक्ट्रीकल्स्,नाशिक यांनी सादर केलेल्या बीलामध्ये High Mast, Feeder Pillar, Foundation व २५० वॅट मेटल फिटींगच्या रकमेवर + २.५% टेंडर दरांचा समावेश केलेला आहे. परंतू मा.व्यवस्थापन समितीकडून मंजूर झालेल्या वरील कामामध्ये + २.५% टेंडर दरांचा समावेश नसल्याने रक्कम रुपये २२,८७६.७० कमी होत आहे.

वरील अ.क्र. अ ते क पर्यंत एकुण कामाची रक्कम रु. **२,६२,०२९.७६ ने कमी** होत आहे.

उपरोक्तप्रमाणे कामात कराव्या लागलेल्या अन्य जादा कामाचा अ.क्र.०१ ते १७ पर्यंतची झालेली रक्कम रुपये २४,२४,००७.९५ इतकी आहे. तसेच अ.क्र. अ ते क पर्यंतची कमी झालेली एकुण रक्कम रुपये **२,६२,०२९.७६** इतकी आहे.

| | |
|---|---|
| जादा कामाची झालेली रक्कम | रु. २४,२४,००७.९५ |
| वजा कमी करावयाची रक्कम | रु. ०२,६२,०२९.७६ |
| एकुण रक्कम | रु. २१,६१,९७८.१९ |

**वरीलप्रमाणे जादा कामाच्या रक्कमेतून वजावट होऊन रुपये २१,६१,९७८.१९ इतकी रक्कम वाढलेली आहे. तरी या वाढलेल्या रक्कमेसह होणारी फायनल बीलाची रक्कम (आर्किटेक्टने चेक करून कळविलेली बीलाची रक्कम रु.३,३५,१६,९४५.४४ - वरील फरकाची रक्कम रु. ०२,६२,०२९.७६ = देय रक्कम रु. ३,३२,५४,९१५.६८ ) आदा करणेस मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही-विद्युत विभागप्रमुख)

**विषय नं.४१ श्रीसत्यनारायण हॉलमध्ये ए.सी. बसविणेबाबत.**

**निर्णय क्र.४५४** दिनांक १५-०४-२००८ रोजी झालेल्या मा.व्यवस्थापन समितीच्या सभेच्या वेळी मा.विश्वस्त श्री. पांडेसाहेब यांनी श्री सत्य नारायण हॉलमध्ये श्री सत्य नारायण विधी चालू असताना अत्यंत गरम होते. त्याठिकाणी गरम हवा बाहेर जाण्यासाठी वेन्टिलेशन नसल्याने आत सफोकेशन होते. म्हणून या श्री सत्य नारायण हॉलमध्ये एअर कंडीशनर बसवावेत म्हणून आदेश दिले आहेत.

श्री सत्य नारायण हॉलमध्ये एअर कंडीशनर बसविण्यासाठी खालीलप्रमाणे ए. सी. खरेदी करावे लागणार आहेत.

| अ.क्र. | तपशील | मागणी | दर (अंदाजे) रुपये | रक्कम रुपये |
|---|---|---|---|---|
| ०१) | व्होल्टास मेक स्प्लिट , वॉल माऊंटेड एअरकंडीशनर - रोटरी कॉम्प्रेसरसह<br>क्षमता - २ टन | ०६ नग | ४०,०००.०० | २,४०,०००.०० |
| ०२) | इलेक्ट्रिकल वायरींग वर्क | जॉब | २५,०००.०० | २५,०००.०० |
| | | | एकुण रक्कम:रुपये | २,६५,०००.०० |

**श्री सत्यनारायण हॉलमध्ये एअर कंडीशनर बसविण्यासाठी उपरोक्तप्रमाणे रक्कम रु. २,६५,०००.०० मात्र खर्च येणार असून त्यास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही-विद्युत विभागप्रमुख)

**विषय नं.४२ श्रीसाईलिला द्वैमासिक अंक छपाईबाबत.**

**निर्णय क्र.४५५** कार्यालय अधिक्षक, मुंबई यांचे दि.२३.०४.२००८ चे पत्रान्वये श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी प्रकाशित श्री साईलीला मराठी व हिंदी-इंग्रजी नियतकालीकांच्या छपाईचे काम जा.नं.एसएसएस-वशी- प्रकाशने-११९९८/२००७ दिनांक- ३१.०७.२००७ अन्वये मे. परफेक्ट प्रिंट प्रॉडक्ट प्रा.लि., मुंबई यांचे मार्फत खालील तपशिलाप्रमाणे करुन घेण्यात येत आहे.

| अ.नं. | तपशिल | अंदाजे छपाई संख्या | प्रति अंक छपाई दर सर्व करांसहीत शिर्डी पोहोचसह रुपये पैसे | अंकात ४ पानाने घट किंवा वाढ झाल्यास प्रती अंक छपाई दर रुपये पैसे |
|---|---|---|---|---|
| ०१ | साईलीला अंक मराठी ३२ + ४ पाने =३६ पाने | १५,००० नग | ११.६८ | १.३७ |
| ०२ | साईलीला अंक हिंदी-इंग्रजी ३२+४=३६ पाने | २५,००० नग | ११.६८ | १.३७ |
| ०३ | दसरा विशेषांक मराठी ६४ +४ = ६८ पाने | १५,००० नग | २०.०३ | १.३७ |
| ०४ | दसरा विशेषांक हिंदी-इंग्रजी ६४+४=६८ पाने | २५,००० नग | २०.०३ | १.३७ |

उपरोक्त छपाईचे आदेशाची **मुदत दि.३० जून २००८ रोजी संपत आहे.** नवीन वर्षाकरीता माहे जुलै-ऑगस्ट २००८ पासून वर्षभराच्या प्रत्येकी ६ अकांचे सध्याच्या छपाई स्वरुपानुसार छपाईचे

काम करुन घेण्यासाठी कार्यक्षम मुद्रंकाकडून टेंडर मागविणेकामी विद्यमान सभासद संख्याची माहिती तपशिल पुढील प्रमाणे श्री साईलीला मराठी अंकाच्या ७६०० प्रती छपाई करुन घेण्यात येत आहे. तसेच श्री साईलिला हिंदी-इंग्रजी अंकाच्या १४,५०० प्रती छपाई करुन घेण्यात येत आहे, असे कळविले आहे तसेच यापूर्वी सन २००५-२००६, सन २००६ -२००७ व सन २००७-२००८ चे या तीन वर्षात माहे ३०,जुन २००८ अखेर श्री साईलीला मराठी व हिंदी-इंग्रजी नियतकालीकांच्या छपाईचे काम मे.परफेक्ट प्रिंट प्रॉडक्ट प्रॉ.लि., मुंबई यांचेकडून छपाई करुन घेण्याची कार्यवाही चालू आहे.

श्री साईलीला अंक छपाई काम मे. परफेक्ट प्रिंट प्रॉडक्ट प्रा.लि., मुंबई यांना जा.नं.एसएसएस/वशी/प्रकाशने ११९९८/२००७ दिनांक- ३१.०७.२००७ अन्वये देण्यात आलेला असून, सदर आदेशाची मुदत माहे ३० जून २००८ अखेर संपत आहे. पुढील अंकाचे छपाईकरिता मुंबई कार्यालय अधिक्षक यांचे छपाई प्रतिंचा विचार करता खालील तपशिलाप्रमाणे साईलीला अंक मराठी व हिंदी-इंग्रजी अंकांची छपाई करुन घ्यावी असे वाटते. सन २००८-२००९ करीता श्री साईलीला द्वैमासिक अंक मराठीचे ५ अंक व हिन्दी-इंग्रजी चे ५ अंक तसेच दसरा विशेषांक मराठी १ व हिन्दी-इंग्रजी विशेषांक १ असे एकूण वर्षाकरीता ६ अंकाची छपाई करुन घ्यावयाची आहे. त्याचा खर्चाचा तपशिल खालील प्रमाणे.

| अ.नं. | तपशिल | अंदाजे छपाई संख्या प्रती महिना | वर्षाकरीता छपाई करावयाचे अंक | प्रति अंक अंदाजे छपाई दर रुपये पैसे | एकूण अंदाजे खर्च |
|---|---|---|---|---|---|
| ०१ | साईलीला अंक मराठी ३२ + ४ पाने =३६ पाने | १०,००० नग | ५ अंक | १५.०० | ७,५०,०००/- |
| ०२ | साईलीला अंक हिंदी-इंग्रजी ३२+४=३६ पाने | १५,००० नग | ५ अंक | १५.०० | ११,२५,०००/- |
| ०३ | दसरा विशेषांक मराठी ६४ +४ = ६८ पाने | १०,००० नग | १ अंक | २५.०० | २,५०,०००/- |
| ०४ | दसरा विशेषांक हिंदी-इंग्रजी ६४+४=६८ पाने | १५,००० नग | १ अंक | २५.०० | ३,७५,०००/- |
| | | | | एकूण खर्च रु. | २५,००,०००/- |

श्री साईलीला मराठी/ हिन्दी-इंग्रजी अंक छपाईकामी एका वर्षाकरीता अंदाजे रु.२५,००,०००/- इतका खर्च अपेक्षित आहे

**तरी श्री साईलीला मराठी/हिन्दी-इंग्रजी अंकांची छपाई करुन घेणेकामी मुंबई येथील निवडक यादीतील १४ व सन २००६-२००७ व २००७-२००८ चे श्री साईलीला अंक छपाईधारक मे. परफेक्ट प्रिंट प्रॉडक्ट प्रा.लि., मुंबई अशा एकूण १५ प्रेसधारकाकडून छपाई कामाचे कोटेशन मागविणेस व त्याकामी येणारे अंदाजे रु. २५,००,०००/- (अक्षरी रुपये पंचविस लाख) मात्र चे खर्चास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता त्यास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही-प्रकाशने विभागप्रमुख)

**विषय नं.४३ श्रीसाईबाबा मंदीरातील आरत्या व मंत्रोच्चार डी.व्ही..डी. तयार करणे बाबत**

**निर्णय क्र.४५६** श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी निर्मित श्री साईबाबा मंदिरातील आरत्या व मंत्रोच्चार डीव्हीडी साठी भक्तांचा चांगला प्रतिसाद मिळत असून, सध्या श्री साईबाबा मंदिरातील आरत्या व मंत्रोच्चार डीव्हीडी नग १४३७ आज अखेर शिल्लक आहेत. सदरचा साठा फक्त तीन महिने पुरेल एवढा शिल्लक असल्याने नव्याने डीव्हीडी १०,००० नग तातडीने तयार करुन साईभक्तांसाठी विक्रीस उपलब्ध करुन देणे गरजेचे आहे.

तरी श्री साईबाबा मंदिरातील आरत्या व मंत्रोच्चार डीव्हीडी ची १०,००० नगांची निर्मिती करुन घेणेसाठी प्रती नग अंदाजे दर रु.४०/- या प्रमाणे एकूण रुपये ४,००,०००/- इतका अंदाजे खर्च अपेक्षित आहे. सदरची डीव्हीडी निर्मिती ही मा. व्यवस्थापन समितीचे दि.१०.०१.२००८ चे सभेतील विषय नं. ७१ निर्णय क्र.७१ नुसार सोनी डी.ए.डी.सी मॅन्युफॅक्चरींग इंडिया प्रायव्हेट लि. कंपनी, मुंबई यांचेकडून संस्थान प्रकाशित सी.डी./व्हीसीडी, डीव्हीडीचे कामे करुन घेणेबाबत मान्यता मिळालेनुसार त्यांचेकडून सदरचे काम करुन घेता येईल.

तरी श्री साईबाबा मंदिरातील आरत्या व मंत्रोच्चार डीव्हीडी ची १०,००० नगांची निर्मिती करुन घेणेसाठी प्रती नग अंदाजे दर रु.४०/- या प्रमाणे एकूण रुपये ४,००,०००/-(अक्षरी रुपये चार लाख) मात्रचे अेपक्षित खर्चास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यानी सादर केला होता.

**यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा मंदिरातील आरत्या व मंत्रोच्चार डीव्हीडी ची १०,००० नगांची निर्मिती करुन घेणेसाठी प्रती नग अंदाजे दर रु.४०/- या प्रमाणे एकूण रुपये ४,००,०००/- खर्चास मान्यता देण्यात आली. तसेच श्री साईबाबा मंदिरातील आरत्या गायनासाठी श्रीमती लता मंगेशकर यांना भेटून मा.अध्यक्ष महोदय यांनी विनंती करावी असे ठरले.** (कार्यवाही-प्रकाशने विभागप्रमुख)

**विषय नं.४४ संस्थान प्रकाशित श्री साई सत् चरित्र -हिंदी वर आधारित ऑडीओ सी.डी निर्मीतीबाबत**

**निर्णय क्र.४५७** श्री निरज कुमार,मॅनेजिंग ट्रस्टी, प्राचिन साईधाम टेम्पल,नवी दिल्ली यांनी त्यांचे दि.११.०४.२००८ चे पत्रान्वये संस्थान प्रकाशित श्री साई सत्चरित्र - हिन्दी वर आधारित ऑडिओ सी.डी. ची एमपी ३ मध्ये निर्मिती केली आहे, सदरचा दोन सीडीचा एक संच त्यांनी नमुना म्हणून प्रकाशने विभागात जमा केला आहे. त्यांनी श्री साईसतचरित्र हिन्दीची ऑडीओ मास्टर तयार केली असून, सदर ऑडीओ सी.डी. संबंधीत कॉपीराईटसहीत सर्व निर्मितीचे अधिकारी त्यांनी संस्थानला देऊ केले आहेत. संस्थानने त्याच्या प्रती तयार करुन भक्तांना उपलब्ध करुन देण्याबाबत त्यांनी वरील संदर्भिय पत्रात विनंती केली आहे.

श्री साईबाबा संस्थान विश्वसतव्यवस्था,शिर्डी अधिनियम २०४ मधील अधिनियम नंबर १७ (२) मधील (ठ) मध्ये "श्री साईबाबांचे जीवन, त्यांचे कार्य, त्यांच्या लीला व त्यांची शिकवण याबाबतच्या उपयुक्त माहितीचा प्रचार व प्रसार करील आणि श्री साई साहित्य ग्रंथालय चालविल व त्याचा विस्तार करील," तसेच (ड) मध्ये " श्री साईबाबांच्या भक्तांमध्ये बंधुभाव, एकता, श्रध्दा आणि समता या भावना वाढीस लावणारे उपक्रम अथवा कार्यक्रम आयोजित करील किंवा हाती घेईल," अशी तरतूद करण्यात आलेली आहे. त्या अनुषंगाने संस्थान प्रकाशित श्री साई सत्चरित्र - हिन्दी वर आधारित ऑडिओ सी.डी. एमपी ३ मध्ये निर्मिती करुन घेतल्यास त्याचा हिन्दी भाषिक भक्तांसाठी चांगला उपयोग होऊ शकेल सदरची ऑडीओ सी.डी. ही मुळ चरित्रावर आधारित आहे.

तरी साईभक्त श्री निरज कुमार,नवी दिल्ली यांनी संस्थानसाठी सदरचे श्री साई सत्चरित्र - हिन्दी वर आधारित ऑडिओ सी.डी.निर्मिती ची मास्टर कॉपी कॉपीराईटसह स्वीकारण्यात येऊन सदर मास्टर कॉपीच्या आधारे श्री साईसत् चरित्र हिन्दीचे आधारे एमपी ३ ऑडीओ सी.डी ची निर्मिती करावयाची झाल्यास सदर सी.डीचे प्रथम प्रकाशन असल्याने ५००० संच (दोन सीडीचा १ संच) याप्रमाणे निर्मिती करावयाची झाल्यास तत्संबंधीत आर्टवर्क , वगैरे निर्मितीसंबंधी अनुषंगाने एका संचासाठी रु.६०/- याप्रमाणे एकूण रु.३,००,०००/- मात्रचे अपेक्षित खर्च येणार असून त्यास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

**यावर सविस्तर चर्चा होऊन, संस्थान प्रकाशित श्री साई सत् चरित्र -हिंदी वर आधारित ऑडीओ सी.डी निर्मितीबाबत मा.विश्वस्त पांडुरंग गमाजी अभंग, मा.श्री सुरेश गोरक्षनाथ वाबळे व मा.श्री अशोक भिमाशंकर खांबेकर यांनी अंतिम निर्णय घ्यावा असे ठरले.**

(कार्यवाही-प्रकाशने विभागप्रमुख)

**विषय नं.४५ शिर्डी दर्शन व साईबाबा मंदिरातील आरत्या व मंत्राच्चार व्हीसीडी सुधारित आवृत्ती निर्मितीबाबत**

**निर्णय क्र.४५८** संस्थान मार्फत "शिरडी श्री साईबाबा की " व "श्री साईबाबा मंदिरातील आरत्या व मंत्रोच्चार " अश्या दोन व्हीसीडी प्रकाशित करण्यात आलेल्या आहेत. यामध्ये श्री साईबाबाचे मंदिर, शिरडीतील संस्थानशी निगडीत असलेली मंदिरे, बाबांचे चरीत्र, तसेच संस्थानकडून भक्तांना पुरविण्यात येणा-या सुविधा, समाधी मंदिरातील नित्याचे कार्यक्रम, उत्सव इत्यादी समाविष्ट केलेले आहेत.

या दोन्हीही व्हीसीडी ची निर्मिती आपण विभागाअंतर्गत केलेली आहे. त्यासाठी झालेला निर्मिती खर्च फक्त रु.५,००,०००/- एवढा असून दोन वर्षात २,००,००० व्हीसीडी ची विक्री करण्यात आली आहे. या विक्रीतून संस्थानला रु.८६,००,०००/- एवढा निव्वळ नफा झालेला आहे.

दोन वर्षापूर्वी संस्थानने सुपर स्पेशॉलीटी दर्जाचे श्री साईबाबा हॉस्पीटल सुरु केले आहे. तसेच श्रीं चे सिंहासन सुद्धा सुवर्णाचे करण्यात आले असून, समाधी मंदिराच्या कळसालाही सोन्याचा मुलामा चढविण्यात आला आहे. सध्या वितरीत होत असणा-या व्हीसीडीत ह्या बाबींचा समावेश करणे आवश्यक आहे. तसेच वेळोवेळी झालेल्या अन्य सुधारणांचा देखील समावेश करणे गरजेचे असल्याने या बाबींचे पुनश्च चित्रीकरण करावे लागणार आहे.पूर्वी केलेले चित्रिकरण हे उच्चतंत्राने ( डिजीटल ) केले असल्याने नविन करावयाचे चित्रिकरण सुद्धा त्याच कॅमे-याने करावे लागणार आहे.

पूर्वी केलेली शिरडी दर्शन ही व्हीसीडी फक्त हिंदी भाषेत आहे. पण आता ही व्हीसीडी इंग्रजी व हिंदी या दोन्ही भाषेत वेगवेगळी करावयाची आहे. यासाठी महाभारत या मालीकेत आवाज दिलेले सुप्रसिद्ध श्री हरीष भिमानी याचेशी चर्चा झाली असून, त्यांनी लेखी संमती दिली आहे. तरी पुन्हा कराव्या लागणा-या चित्रिकरणास व ध्वनिमुद्रणास अंदाजे रु.६,३६,०००/- (सहा लाख छत्तीस हजार मात्र) खर्च अपेक्षित असून त्यास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

**यावर सविस्तर चर्चा होऊन, शिर्डी दर्शन व साईबाबा मंदिरातील आरत्या व मंत्राच्चार व्हीसीडी सुधारित आवृत्ती निर्मिती श्री हरीष भिमानी यांचेऐवजी दुसऱ्या गायकाकडून करुन घेण्यात यावे. याकामी मा.विश्वस्त पांडुरंग गमाजी अभंग, मा.श्री सुरेश गोरक्षनाथ वाबळे व मा.श्री अशोक भिमाशंकर खांबेकर यांनी निर्णय घ्यावा असे ठरले.** (कार्यवाही-प्रकाशने विभागप्रमुख)

**विषय नं.४६ धर्मशाळा विभागाकडील हॉल जागा व परिसर धार्मिक, सार्वजनिक कार्यक्रमासाठी देणे बंद करणे बाबत.**

**निर्णय क्र.४५९** दि.११ मार्च,२००२ रोजीचे मा.व्यवस्थापन समिती सभेतील निर्णय क्र.१२९ अन्वये,संस्थानचे श्री साईनाथ मंगलकार्यालय,धर्मशाळा तसेच धर्मशाळा परिसर धार्मिक,सार्वजनिक कार्यक्रमासाठी देण्यात

यावा त्यासाठी संस्थान कर्मचारी व अन्यत्र यांचेकडून प्रति २४ तासांकरीता खालीलप्रमाणे अनामत रक्कम व सेवाआकार घेण्यात यावा असा निर्णय संमत झालेला आहे.

| | | **अनामत रक्कम रुपये.** | | **सेवाआकार रक्कम रुपये.** | |
|---|---|---|---|---|---|
| **अ.नं.** | **तपशिल.** | **इतरांसाठी.** | **संस्थान कर्मचारी.** | **इतरांसाठी.** | **संस्थान कर्मचारी.** |
| ०१. | धर्मशाळा हॉल (प्रत्येकी) | १००१-०० | -- | १००१-०० | ५०१-०० |
| ०२. | धर्मशाळा परिसर. | १००१-०० | -- | १००१-०० | ५०१-०० |
| ०३. | मंगल कार्यालय. | २००१-०० | -- | २००१-०० | १००१-०० |

उपरोक्तप्रमाणे निश्चित केलेल्या दराने धर्मशाळा इमारतीमधील हॉल,परिसरातील मोकळी जागा विवाह,धार्मिक व सार्वजनिक कार्यक्रमासाठी देण्यात येत आहे.

सन २००३ मध्ये श्री साईनाथ रुग्णालयाचे जुन्या इमारतीचे नुतनीकरण करण्याचा निर्णय झाल्यामुळे रुग्णालयासाठी पर्यायी जागेची व्यवस्था म्हणून तात्पुरत्या स्वरुपात " श्री साईनाथ रुग्णालय " धर्मशाळा नं.२ या इमारतीमध्ये स्थलांतरीत करण्यात आले. व ते आजपर्यंत धर्मशाळा नं.२ या इमारतीमध्येच चालू आहे. धर्मशाळा नं.२ या इमारतीमधील जागा या रुग्णालयासाठी कमी पडत असल्याने अलीकडे धर्मशाळा नं.१ इमारतीचे तळमाळयावरील दोन हॉल व चार खोल्याही रुग्णालयाचे वापरासाठी देण्यात आलेल्या आहेत.

**धर्मशाळा विभागाकडील मोकळी जागा विवाह व सार्वजनिक कार्यक्रमासाठी वापरण्यास देण्यात येत आहे. त्यामुळे विवाह समारंभामध्ये साऊंड रेकॉर्डर,वाद्य,फटाके याचे मोठया प्रमाणात आवाज होऊन त्याचा रुग्णालयातील दाखल असलेल्या रुग्णांना त्रास होतो. ध्वनी प्रदुषण टाळण्याचे दृष्टीने यापुढे धर्मशाळा पसिरात लग्नासाठी जागा देण्यात येऊ नये अशी लेखी मागणी काही रुग्ण,वैद्यकीय अधिक्षिका तसेच वैद्यकीय संचालक यांचेकडून करण्यात आली असल्याने धर्मशाळा विभागाकडील जागा,परिसर यापुढे धार्मिक,सार्वजनिक कार्यक्रमासाठी देणे बंद करण्यात यावे असा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही-धर्मशाळा विभागप्रमुख)

**विषय नं.४७** **श्रीसाई भक्तांचे निवासव्यवस्थेकरिता गादी, गादीखोळ,चादर खरेदी करणेबाबत.**

**निर्णय क्र.४६०** संस्थानकडे साईभक्तांचे निवासासाठी सध्या खालीलप्रमाणे खोल्या आहेत.

| **अ.नं.** | विभागाचे नांव | खोल्या संख्या | हॉल संख्या | निवास क्षमता |
|---|---|---|---|---|
| ०१ | साईबाबा भक्तनिवासस्थान | ५०८ | १५ | ३७०० |
| ०२ | चौकशी व निवासस्थान कार्यालय | २३६ | १४ | २५०० |
| ०३ | धर्मशाळा | ०४४ | ०२ | १३०० |
| | एकूण | ७८८ | ३१ | ६५०० |

शिर्डीस येणाऱ्या साईभक्तांच्या संख्येच्या प्रमाणात वरीलप्रमाणे असलेली निवासव्यवस्था अपूरी आहे ज्यावेळी दोन किंवा अधिक सुट्टया सलग येतात अशावेळी तसेच श्री साईंचे उत्सवाचे वेळी शिरडीमध्ये भक्तांची प्रचंड गर्दी होते अशावेळी संस्थानच्या शैक्षणिक संकुलाचे वर्ग/हॉल श्री साईनाथ माध्यमिक विद्यालय, जिल्हा परिषद मराठी शाळा, नगरपंचायत हॉल या ठिकाणच्या जागा ताब्यात घेण्यात येतात त्याचबरोबर संस्थानच्या मोकळया जागेत कापडी/शामियाना मंडप, कनात व बिछायतीसह उभारणी करुन गाद्या चादरी भाडोत्री घेऊन साईभक्तांची अतिरिक्त निवासव्यवस्था करण्यात येते.

संस्थानकडे सध्या उपलब्ध असलेल्या गाद्या चादरी/रग इ.कपडे यांची संख्या इमारतीमध्ये निवास करणाऱ्या साईभक्तांपुरतीच आहे त्यामूळे गर्दीचे काळात शाळा इमारती ताब्यात घेऊन व कापड मंडप उभारणी करुन करण्यात येणाऱ्या अतिरिक्त निवासव्यवस्थेच्या ठिकाणी भाडोत्री गाद्या चादर घेऊन भक्तांची निवासव्यवस्था करावी लागते.

शिर्डीस येणाऱ्या श्री साईभक्तांच्या संख्येत दिवसेंदिवस होणारी प्रचंड वाढ व त्यामूळे भक्तंच्या अतिरिक्त निवासव्यवस्थेच्या कामी भोडोत्री घ्याव्या लागणाऱ्या गाद्या चादर आणि त्यासाठी होणारा खर्च इत्यादी विचारात घेता भक्तांची अतिरिक्त निवासव्यवस्था करणेसाठी संस्थानकडे स्वतःच्या गादी चादर असणे आवश्यक आहे. त्यामूळे १० ते १२ हजार साईभक्तांची त्यापासून निवासव्यवस्था होऊ शकते. त्या दृष्टीने विभागवार खालीलप्रमाणे गाद्या चादरी खरेदी करणे आवश्यक आहे.

| **अ.नं.** | विभागाचे नांव | कापड व कापूस खरेदी करुन तयार करावयाच्या गाद्या | कापड खरेदी करुन तयार करावयाच्या गादी खोळ | खरेदी करावयाच्या चादर |
|---|---|---|---|---|

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ०१ | साईबाबा भक्तनिवासस्थान | ३००० | ६००० | १५०० |
| ०२ | चौकशी व निवासस्थान कार्यालय | ३००० | ६००० | ३००० |
| ०३ | धर्मशाळा | ३५०० | ७००० | १५०० |
| | एकूण | ९५०० | १९००० | ६००० |

उपरोक्तप्रमाणे गाद्या, गादी खोळ तयार करणेसाठी तसेच चादरी खरेदी करणेसाठी पूढीलप्रमाणे खर्च अपेक्षित आहे.

अ) गादी पाट, कापड,कापूस,गादीखोळ कापड, सोलापूर चादर खरेदी करणेकामी अपेक्षित खर्च

| तपशिल | तयार करावयाचे एकूण नग | प्रति नग कापड मिटर | त्यासाठी लागणारे एकूण कापड मिटर | दर रुपये | एकूण रुपये |
|---|---|---|---|---|---|
| कापूस गादी<br>०१) गादीपाट कापड ६०" पन्हा<br>०२) कापूस (चांगल्या प्रतीचा ) | ९५०० | २.५०<br><br>७ किलो | २३७५०<br><br>६७००० किला | ६८.००<br><br>३५.०० | १६,१५०००/-<br><br>२३,४५,०००/- |
| गादी कव्हर (खोळ)<br>प्रिंटेड कापड ७२"पन्हा प्रकाश कॉटन मिल्सचे | १९००० | २.५० | ४७५०० | ७०.०० | ३३,२५,०००.०० |
| सोलापूर चादर<br>०१) साईज ६०"x९०"<br>०२)वजन अंदाजे १५०० ग्रॅम पर्यत<br>०३) श्री साईबाबा संस्थान ट्रस्ट,शिर्डी, सा.भ.नि.धर्मशाळा, चौकशी व निवासस्थान हे नांव असलेले | ६००० | | | २५०.०० | १५,००,०००.०० |
| | | | | एकूण | ८७,८५,०००.०० |

ब) कापूस गादी गादीखोळ इत्यादी तयार करणेकामी अंदाजे मजूरी खर्चृ

| अ.नं | वस्तूचे नांव | कामाचा तपशिल | तयार करावयाचे नग | दर रुपये | एकूण रुपये |
|---|---|---|---|---|---|
| ०१ | कापूस गादी | गादीपाट कापड कापणे शिवणे,कापूस पिंजणे गादी भराई टाके टाकणे इत्यादी | ९५०० | ५०.०० | ४,७५,०००.०० |
| ०२ | गादी कव्हर (खोळ) | कापड कापणे,शिलाई करुन खोळ तयार करणे | १९००० | १२.०० | २,२८,०००.०० |
| | | | | एकूण | ७,०३,०००.०० |

गादी पाट कापड, कापूस गादीखोळ कापड, सोलापूर चादर खरेदीकामी उपरोक्त "अ" मध्ये नमूद केल्याप्रमाणे रुपये ८७,८५,०००.०० खर्च अपेक्षित आहे. तसेच कापूस गादी, गादीखोळ इत्यादी तयार करणेकामी "ब" मध्ये नमूद केल्याप्रमाणे अंदाजे रुपये ७,०३,०००/- असा एकूण रुपये ९४,८८,०००/- खर्च अपेक्षित असून त्यास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

**यावर सविस्तर चर्चा होऊन, गादी पाट कापड, कापूस गादीखोळ कापड, सोलापूर चादर विहीत पध्दतीने निविदा मागवून तसेच कापूस गादी, गादीखोळ इत्यादी तयार करणेकामी कोटेशन्स मागविण्यात यावेत याकामी येणारे अंदाजे रक्कम रुपये ९४,८८,०००/- चे खर्चास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही-चौकशी व निवासस्थान विभागप्रमुख /अधिक्षक, भक्तनिवास/धर्मशाळा विभागप्रमुख)

**विषय नं.४८ मुंबई, दिल्ली व हैद्राबाद येथे सुरु करण्यात आलेल्या माहिती केंद्रावर लाईव्ह दर्शनासाठी टी.व्ही लावणेस परवानगी देणे बाबत.**

**निर्णय क्र.४६१ (अ)** मा. व्यवस्थापन समितीचे दिनांक १४/१०/२००६ रोजीचे सभेतील निर्णय क्र. ८५६ नुसार संस्थानचे वेबसाईटवर इंटरनेटव्दारे व्हीएसएनएल, मुंबई यांचेमार्फत ऑनलाईन दर्शन सुविधा उपलब्ध करुन देणेस मान्यता देण्यात आली असून, त्यानुसार संस्थानचे अधिकृत वेबसाईट www.sai.org.in वर श्रींचे ऑनलाईन दर्शन सुविधा सुरु करण्यात आलेली आहे. वेबसाईटवर ऑनलाईन दर्शन सुविधा सुरु केल्यामुळे ज्या साईभक्तांकडे इंटरनेट सुविधा उपलब्ध आहे अशा साईभक्तांना घरबसल्या श्रींचे दर्शनाचा लाभ घेता येत आहे. श्रींचे ऑनलाईन दर्शन सुविधा ही टिव्ही चॅनेलवरही सुरु करण्यात यावी, अशी साईभक्तांची मागणी असल्यामुळे मा. व्यवस्थापन समितीचे दिनांक ११/०८/२००७ रोजीचे सभेतील निर्णय क्रमांक ६६१ नुसार व्हीएसएनएल, मुंबई यांचेमार्फत श्रींचे टिव्हीवर ऑनलाईन दर्शन सुविधा सुरु करण्यात आलेले आहे. सदर दोन्ही सुविधा सुरु करणेसाठी व्हीएसएनएल, मुंबई यांचेशी स्वतंत्र करारनामे करण्यात आलेले आहे. टिव्हीवर ऑनलाईन

दर्शन सुविधेव्दारे संस्थानला व्हीएसएनएल, मुंबई यांचेकडून प्रतिवर्षी रुपये ७५,००,०००/- (Exclusive) इतकी रॉयल्टी मिळत आहे.

**(ब)** श्री साईभक्तांना श्रींविषयी व संस्थान पुरवित असलेल्या सेवा सुविधांविषयी माहिती देणेसाठी संस्थानमार्फत मुंबई, दिल्ली व हैद्राबाद येथे माहिती-सुविधा केंद्रे सुरु करण्यात आलेली आहे. सदर माहिती-सुविधा केंद्रांवर श्रींचे ऑनलाईन दर्शन दिसणारे टिव्ही लावणेस परवानगी मिळणेसाठी Nebula Advertising Pvt. Ltd., Indore यांनी त्यांचे दिनांक ३१ मार्च, २००८ रोजीचे पत्रान्वये कळविलेले आहे. व्हीएसएनएल, मुंबई हे टिव्हीवर श्रींचे ऑनलाईन दर्शन सुविधा ही टाटास्काय या डिटीएच ऑपरेटकडून श्री साईभक्तांना पुरवित आहे व डिटीएच ऑपरेटर यांनी सदर सुविधेची जाहिरात करणेसाठी Nebula Advertising Pvt. Ltd., Indore या कंपनीस नेमलेले आहे.

**(क)** संस्थानमार्फत मुंबई, दिल्ली व हैद्राबाद येथे सुरु करण्यात आलेल्या माहिती-सुविधा केंद्रांवर श्रींचे टिव्हीवर ऑनलाईन दर्शन दाखविणेसाठी आवश्यक टिव्ही व इतर सर्व साहित्य हे Nebula Advertising Pvt. Ltd., Indore यांचे असणार असून, यासाठी येणारा खर्च हा Nebula Advertising Pvt. Ltd., Indore करणार आहेत. परंतु, सदरील सेवा उपलब्ध करुन देतांना ते सदर सेवा टाटा स्काय उपलब्ध करुन देत असलेचे बॅनर लावणार आहेत. यासाठी संस्थानमार्फत त्यांना फक्त सदर केंद्रांवर टिव्ही बसविणेसाठी जागा उपलब्ध करुन द्यावयाची आहे. संस्थानने जागा दिल्यास श्रींचे कार्याचा प्रचार व प्रसार करणेस मदत होईल व त्याठिकाणी येणाऱ्या सर्व साईभक्तांना श्रींचे लाईव्ह दर्शन सुविधेचा लाभ घेता येईल. यासाठी Nebula Advertising Pvt. Ltd., Indore यांना मुंबई, दिल्ली व हैद्राबाद येथील संस्थानचे माहिती-सुविधा केंद्रांवर लाईव्ह दर्शन दिसणेसाठी टिव्ही लावणेस परवानगी देण्यात यावी, असे नम्र मत आहे.

**उपरोक्त नमुद केलेप्रमाणे, Nebula Advertising Pvt. Ltd., Indore यांना मुंबई, दिल्ली व हैद्राबाद येथे संस्थानमार्फत सुरु केलेल्या माहिती-सुविधा केंद्रांवर लाईव्ह दर्शन दिसणेसाठी टिव्ही लावणेस परवानगी देणेस मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, तो अमान्य करण्यात आला.** (कार्यवाही-आय.टी.विभागप्रमुख)

**विषय नं.४९** **मोबाईलवर श्रींचे ऑनलाईन दर्शन सुविधा सुरु करणे बाबत.**

**निर्णय क्र.४६२** **(अ)** ई-टेम्पल प्रकल्पांतर्गत भक्तांना पुरविण्यात येणाऱ्या सेवा-सुविधांतर्गत संस्थानची इंग्रजी भाषेतील पहिली वेबसाईट नोव्हेंबर, १९९९ मध्ये विकसीत करण्यात आली. तद्नंतर ऑक्टोबर, २००३ मध्ये या वेबसाईटचे नुतनिकरण करुन Boardband Website तयार करुन प्रक्षेपीत करण्यात आलेली आहे. या वेबसाईटवर भक्तांना संस्थानविषयीची संपूर्ण व परिपूर्ण माहिती देण्यात आलेली आहे. नुतणीकरण करण्यात आलेली ही वेबसाईट विविध दृकश्राव्य (Audio Visual) माहिती व Online Services साठी युक्त अशी बनविण्यात आलेली आहे. या वेबसाईटवर जगभरातील साईभक्तांना श्री साईबाबा, शिरडी तिर्थक्षेत्र, व्यवस्थापन समिती व प्रशासन, संस्थानची विविध प्रकाशने, आवश्यक माहितीसह श्री साईबाबांच्या शिकवणूकीतील विविध घटना चित्ररुपाने तसेच श्री साईबाबांची व मंदिर परिसरातील विविध छायाचित्रे पाहण्यासाठी-तथा-डाऊनलोड करण्यासाठी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे.

**(ब)** मा. व्यवस्थापन समितीचे विविध निर्णयांनुसार संस्थानचे वेबसाईटवर इंटरनेटव्दारे व्हीएसएनएल, मुंबई यांचेमार्फत संस्थानचे अधिकृत वेबसाईट www.sai.org.in वर श्रींचे ऑनलाईन दर्शन सुविधा सुरु करण्यात आलेली आहे. वेबसाईटवर ऑनलाईन दर्शन सुविधा सुरु केल्यामुळे ज्या साईभक्तांकडे इंटरनेट सुविधा उपलब्ध आहे अशा साईभक्तांना घरबसल्या श्रींचे दर्शनाचा लाभ घेता येत आहे. श्रींचे ऑनलाईन दर्शन सुविधा ही टिव्ही चॅनेलवरही सुरु करण्यात यावी, अशी साईभक्तांची मागणी असल्यामुळे मा. व्यवस्थापन समितीचे दिनांक ११/०८/२००७ रोजीचे सभेतील निर्णय क्रमांक ६६१ नुसार व्हीएसएनएल, मुंबई यांचेमार्फत श्रींचे टिव्हीवर ऑनलाईन दर्शन सुविधा सुरु करण्यात आलेले आहे. सदर दोन्ही सुविधा सुरु करणेसाठी व्हीएसएनएल, मुंबई यांचेशी स्वतंत्र करारनामे करण्यात आलेले आहे. टिव्हीवर ऑनलाईन दर्शन सुविधेव्दारे संस्थानला व्हीएसएनएल, मुंबई यांचेकडून प्रतिवर्षी रुपये ७५,००,०००/- (Exclusive) टॅक्स वजा जाता रॉयल्टी मिळत आहे. यामुळे निश्चितच संस्थानचे उत्पनात भर पडत आहे.

**(क)** सध्याच्या काळात संपर्कासाठी भ्रमणदूरध्वनींचा वापर सर्व स्थरामधील जनतेत मोठ्या प्रमाणावर होत आहे. श्रीसाईंच्या दर्शनास येणारे बहुसंख्य साईभक्त सुशिक्षित असल्याने ते संपर्कासाठी भ्रमणदूरध्वनींचा वापर करतात. संस्थान वेबसाईटवर व टिव्ही चॅनेलवर सुरु केलेली श्रींची ऑनलाईन दर्शन सुविधा ही मोबाईलवरही सुरु करण्यात यावी, अशी श्रीसाईभक्तांकडून मागणी होत आहे. मोबाईलवर ऑनलाईन दर्शन सुविधा सुरु केल्यास देश-विदेशातील सर्व स्तरातील साईभक्त कोठेही असले तरी त्यांना श्रींचे ऑनलाईन दर्शन सुविधेचा फायदा घेता येईल.

मोबाईलवर श्रींचे ऑनलाईन दर्शन सुविधा सुरु करणेसाठी टाटा कम्युनिकेशन्स, मुंबई या कंपनीने प्रस्ताव सादर केला आहे. त्याचा थोडक्यात गोषवारा पुढीलप्रमाणे-

जगभरात मोबाईल सुविधा पुरविणाऱ्या विविध मोबाईल ऑपरेटरशी टाटा कम्युनिकेशन्स, मुंबई हे मोबाईलवर ऑनलाईन दर्शन सुविधा पुरविणेसाठी करारनामा करतील. सदरील करारनामा हा दोन प्रकारे असेल.

०१. वर्षभराच्या ऑनलाईन सेवेसाठी मोबाईल ऑपरेटरशी केलेला करारनामापोटी एक रक्कमी रक्कम स्विकारण्यात येईल.

०२. करारनामा केलेल्या मोबाईल ऑपरेटरच्या प्रत्यक्ष वापराबद्दल मासिक रक्कम मिळेल.

सदर सुविधेसाठी त्यांनी नमुद केलेल्या पत्रान्वये, मोबाईल ऑपरेटरचा हिस्सा (भाग) वजा जाता उर्वरित रक्कमेच्या ८०% रक्कम ही संस्थानला तर २०% रक्कम ही टाटा टेलिकम्युनिकेशन्स, लि., यांना त्यांनी पुरविलेल्या तंत्रज्ञानापोटी मिळेल. संस्थानला मिळणारी ८०% रक्कम ही टॅक्स वजा जाता मिळणार आहे. तसेच सदर सुविधा पुरविणेसाठीचा करारनामा श्री साईबाबा संस्थान व टाटा टेलिकम्युनिकेशन्स यांचेमध्ये एक वर्षासाठी करता येईल.

सदर सुविधा पुरविणेसाठी लागणाऱ्या तंत्रज्ञानापोटी संस्थानला कोणताही खर्च करावा लागणार नाही. सदर सुविधा सुरु करणेसाठी येणारा सर्व खर्च टाटा कम्युनिकेशन्स लि., मुंबई हे करणार असून, सदर खर्च ते विविध मोबाईल ऑपरेटरकडून मिळणाऱ्या रक्कमेतील मोबाईल ऑपरेटरचा हिस्सा वगळता मिळणाऱ्या रक्कमेच्या २० % रक्कम तंत्राज्ञानापोटी घेणार आहेत. शिवाय सदरील सेवा सुरु झालेनंतर, संस्थानचे वार्षिक उत्पन्नात निश्चितच भर पडणार आहे व देश-विदेशातील श्रीसाईभक्तांना त्यांचे मोबाईलवरच श्रींचे ऑनलाईन दर्शनाचा लाभ घेता येईल.

**उपरोक्त विवेचनानुसार, देश-परदेशातील श्रीसाईभक्तांचे मोबाईलवर टाटा कम्युनिकेशन्स, लि. मुंबई यांचेमार्फत श्रींचे ऑनलाईन दर्शन सुविधा सुरु करणेस मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली**. (कार्यवाही-आय.टी. विभागप्रमुख)

**विषय नं.५०** **माहिती तंत्रज्ञान विभागासाठी संगणक सिस्टम ऑटोमेशन तंत्रज्ञाची नेमणूक करणेबाबत.**

**निर्णय क्र.४६३** (अ)संस्थानमधील सर्व विभागात चालणाऱ्या कार्यालयीन कामकाजामध्ये सुसुत्रता यावी, तसेच वेळेचा व श्रमांचा अपव्यय टाळता यावा, यासाठी संस्थानचे सर्व विभागात संगणके, बसविण्यात आलेली आहे. विविध विभागांचे मागणीनुसार नविन संगणक आज्ञावली तयार करणे, कार्यान्वीत असलेल्या संगणक आज्ञावली अद्ययावत करणे, आवश्यक बदल करणे, तसेच विविध विभागांना येणाऱ्या दैनंदिन अडचणी सोडविणे, संस्थानचे वेबसाईट संदर्भात कामकाज, संगणके व संगणकीय साहित्यांची दुरुस्ती देखभाल, संस्थान दूरध्वनी यंत्रणा हाताळणी आदि. कामे करण्यात येत आहे. संस्थानचे विविध विभागांचे दैनदिन कामकाजासाठी आयआयएमव्ही, पुणे यांचेकडून तयार करुन घेण्यात आलेले १२ सॉफ्टवेअर व माहिती तंत्रज्ञान विभागातील कर्मचाऱ्यांनी तयार केलेले ०६ सॉफ्टवेअर असे एकूण १८ सॉफ्टवेअर विविध विभागांमध्ये कार्यान्वीत आहे.

(ब) कार्यालयीन संगणकीकरणांच्या प्रकल्पांसाठी माहिती तंत्रज्ञान विभागामार्फत वेळोवेळी संगणकीय यंत्रसामुग्री खरेदी करणे, संगणकीय कार्यप्रणाली विकशीत करणे आदि कामे पार पाडावी लागतात. ही कामे सुरळीतपणे होण्याच्या दृष्टीने संस्थानमधील संगणकीकरणासंबंधित प्राप्त परिस्थितीची संपूर्ण माहिती असणारे तांत्रिक अर्हता उपलब्ध असलेले मनुष्यबळ संस्थान आस्थापनेकडे खूपच कमी आहे. तसेच संगणक क्षेत्रातील बाजारपेठेत उपलब्ध असलेल्या संगणकीय उत्पादनांची माहिती व दर्जा आपल्याकडे त्वरीत उपलब्ध होत नाही. यादृष्टीने संगणकीकरणाचे प्रकल्प व्यवस्थितरित्या कार्यान्वीत व्हावे म्हणून प्रकल्पाची कार्यवाही सुरु असतांना तसेच आवश्यक तेथे तांत्रिक सल्ला-तथा-अभिप्राय तात्काळ उपलब्ध होण्याच्या दृष्टीने, विशेषतः संगणकीय कार्यप्रणालींचे झपाटयाने होत असलेले अद्यायवतीकरण, बाजारातील उपलब्धता व गुणवत्तेबाबत सखोल ज्ञान असलेल्या व्यक्तीची सल्लागार म्हणून नेमणूक करणे आवश्यक आहे. संस्थानमध्ये कार्यान्वीत असलेल्या सॉफ्टवेअरमध्ये आवश्यक ते बदल करणे व नवीन सॉफ्टवेअर विकशीत करणे, संगणकीय साहित्य खरेदी करणेसाठी योग्य सल्ला सदर व्यक्तीकडून घेता येईल.

(क) संगणकीय कार्यक्षेत्रात कार्यरत असलेली Nyati Infosys, पुणे यांनी संस्थानकडील संगणकीय कामकाजात योग्य सल्ला देणेसाठी आपला प्रस्ताव संस्थानकडे सादर केला आहे. त्यांचे प्रतिनिधी श्री तेजांश न्याती यांनी संस्थानचे सर्व विभागांना भेटी देऊन, विभागांना आवश्यक असलेल्या सुविधांबाबत पाहणी केली आहे. त्यांना या क्षेत्रातील कामाचा चांगला अनुभव आहे. श्री तेजांश न्याती (Nyati Infosys, Pune) यांची एक वर्षासाठी सल्लागार म्हणून नेमणूक केल्यास, त्यांचेकडून संस्थानमध्ये कार्यान्वीत असलेल्या सॉफ्टवेअरमध्ये योग्य बदल करणे, नवीन सॉफ्टवेअर विकशीत करणे, संगणकीय साहित्य खरेदी करणेसाठी योग्य सल्ला घेता येईल. तसेच श्री न्याती यांनी पिंपरी

चिंचवड महानगर पालिकेत संगणक तांत्रिक सल्लागार म्हणून काम पाहिले आहे. त्यांचे मार्गदर्शनाखाली बनविलेल्या संगणक प्रणालींना आशिया खंडात उत्कृष्ठ संगणक प्रणाली म्हणून पारितोषिक प्राप्त झालेले आहे. त्याचप्रमाणे ते नागपूर पोलिस कमीशनर ऑफिस, नागपूर डिस्ट्रीक्ट सेंट्रल को-ऑप बॅन्क (८९ शाखांसाठी) संगणक प्रणाली बनवून दिलेल्या आहेत. भूसावळ व पूणे महानगर पालिकाही त्यांनी बनविलेल्या असून, बऱ्याचशा ठिकाणी ते संगणक सल्लागार म्हणून काम पाहत आहेत. त्यांनी सादर केलेल्या प्रस्तावात त्यांनी प्रकल्पाच्या किंमतीच्या ३ % + टॅक्सचे चार्जेसची मागणी केली आहे.

श्री तेजांश न्याती यांची "संगणक सिस्टिम ॲटोमेशन तंत्रज्ञ" म्हणून नेमणूक झाल्यास प्रामुख्याने पुढील गोष्टींवर भर देऊन अधिकाधिक संस्थानचे संगणकीकरण अद्ययावतीकरण करता येईल.

०१.संस्थानचे इंट्रानेटवर ऑनलाईन डोनेशन, रुम रिझर्वेशन तथापि, सर्व माहिती केंद्रे व मुंबई कार्यालय शिर्डी कार्यालयास जोडण्याचा प्रस्तावास मा. व्यवस्थापन समितीने साधारणतः १,०३,००,०००/- मात्रचे खर्चास तत्वतः मान्यता दिलेली आहे. त्यानुसार कार्यवाही करणेसाठी निविदा बनविणे त्यांचे तांत्रिक विश्लेषण करणे साहित्यांची खरेदी करणे आदि. कामांसाठी या क्षेत्रातील अनुभव असलेल्या एक तांत्रिक सल्लागार-तथा-तंत्रज्ञाची आवश्यकता आहे.

०२.संस्थानचे संगणकीकृत करण्यात आलेले सॉफ्टवेअरचे अद्ययावतीकरण करण्याची आवश्यकता आहे. तथापि, बऱ्याचशा विभागांमधील सिस्टिमस् या मॅन्युअल पदध्तीने राबविल्या जात असून, त्यांचे संगणकीकरण होणे गरजेचे आहे. संगणकीकरण करणेसाठी संगणक क्षेत्रातील सर्व ज्ञान संपन्न तंत्रज्ञाची आवश्यकता आहे.

०३.डेटा आणि सिक्युरिटी अशा महत्वपूर्ण विषयांवर अद्यापपावेतो बरेचशे काम होणे बाकी आहे. यासाठीसुध्दा अद्ययावत तंत्रज्ञानाचा उपयोंग करुन संस्थानचा महत्वपूर्ण डेटा व सिक्युरिटी संगणकाला पुरविली जाईल.

उपरोक्त विवेचनानुसार असे निदर्शनास येते की, श्री तेजांश न्याती (Nyati Infosys, Pune) यांना या सर्व कामांचा अनुभव आहे. तसेच त्यांनी बऱ्याचशा शासकीय कार्यालयांत संगणक प्रणालींचे कामांचा अनुभव आहे. त्यांची माहिती तंत्रज्ञान विभागाकडे " संगणक सिस्टिम ॲटोमेशन तंत्रज्ञ" म्हणून एक वर्षाचे कालावधीसाठी नेमणूक करणेस व त्यांचे प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे, प्रत्यक्ष प्रकल्प खर्चाच्या ३%+ टॅक्स इतकी रक्कम त्यांचेमार्फत पुरविण्यात येणाऱ्या तंत्रज्ञानापोटी देण्यात यावी, असे नम्र मत आहे.

**उपरोक्त परिच्छेदांत नमुद केलेप्रमाणे, श्री तेजांश न्याती (Nyati Infosys, Pune) यांची माहिती तंत्रज्ञान विभागाकडे "संगणक सिस्टिम ॲटोमेशन तंत्रज्ञ" म्हणून एक वर्षाचे कालावधीसाठी नेमणूक करणेस व त्यांचे प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे, प्रत्यक्ष प्रकल्प खर्चाच्या ३%+ टॅक्स इतकी रक्कम त्यांचेमार्फत पुरविण्यात येणाऱ्या तंत्रज्ञानापोटी देणेस मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही-आय.टी.विभागप्रमुख)

**विषय नं.५१** **ट्रेन्ड मायको अँटीव्हायरस (सॉफ्टवेअर) ५१ युझरचे नविन पॅकेज खरेदी करणेबाबत.**

**निर्णय क्र.४६४** **(अ)** संस्थानमधील कार्यालयीन कामकाजाचे बहुतेक करुन संगणकीकरण करण्यात आले आहे. संगणकीकरण कार्यक्रमांतर्गत संस्थानमध्ये सध्या १२५ संगणक नेटवर्कींगच्या साहाय्याने जोडलेले आहेत. या संगणकावर रोखीचे व्यवहार होणारे सर्व देणगी काऊंटर, मध्यवर्ती रुम बुकींग सुविधा, प्रसादालय तिकीट विक्री, कॅन्टीन तिकीट विक्री, चेक / डीडी, मनीऑर्डर, कापडकोठी, पुस्तक विक्री, लेखाशाखेची संगणक प्रणाली, आवक-जावक विभाग, यासोबत सर्व कार्यालयातील संगणकासाठी मराठी आयएसएम फॉन्टची कार्यप्रणाली इ. जोडलेली आहे. अंतर्गत दूरध्वनी व्यवस्थाही याच नेटवर्कमध्ये जोडण्यात आलेली आहे. हे सर्व सुरळीत चालण्यासाठी व माहिती साठवणूक होण्यासाठी माहिती तंत्रज्ञान विभागातील सर्व्हर रुममध्ये डाटाबेस सर्व्हर, डोमेन सर्व्हर, बॅकअप सर्व्हर, आएसएम सर्व्हर, डेमो सर्व्हर व वेबसाईट सर्व्हर असे एकूण सहा सर्व्हर बसविण्यात आले आहेत.

**(ब)** नेटवर्कमध्ये चालू असणाऱ्या संगणक प्रणालीला संगणक व्हायरसचा प्रादूर्भाव होऊ नये, साठविण्यात आलेली माहिती सुरक्षित रहावी, नेटवर्क पूर्ण क्षमतेने सतत कार्यान्वीत रहावे यासाठी मा. व्यवस्थापन समितीच्या दिनांक १८/१२/२००५ रोजीच्या सभेतील निर्णय क्रमांक ७६७ प्रमाणे TREND MICRO ANTI VIRUS ५१ युजर्ससाठी चालणारे सॉफ्टवेअर खरेदी करण्यात आलेले आहे. हे सॉफ्टवेअर नेटवरुन सतत अपडेट करावे लागते. याची मुदत मार्च, २००७ संपल्याने, सदर सॉफ्टवेअर पुढील कालावधीसाठी नुतनिकरण करणे आवश्यक असल्याने, उपरोक्त संदर्भ क्रमांक ०२ चे निर्णयानुसार TREND MICRO ANTI VIRUS सॉफ्टवेअरचे पुढील तीन वर्षासाठी नुतनिकरण करुन घेण्यात आलेले आहे.

**(क)** सध्या उपरोक्त TREND MICRO ANTI VIRUS सॉफ्टवेअर ५१ युजर्ससाठी घेण्यात आलेले आहे. तर संस्थानमधील विविध विभागांतील साधारणतः १२५ संगणके हे नेटवर्कींगमध्ये जोडण्यात आलेले असल्याने, सदर युजर्सची क्षमता ही कमी पडत आहे. त्यामुळे नेटवर्कीमधील बहुतेक महत्वाचे विभागांतील संगणके TREND MICRO ANTI VIRUS सॉफ्टवेअरशी जोडण्यात आलेले नसल्याने, सदर संगणकांना येणारा व्हायरस काढता येत नाही. संगणक प्रणालीला व्हायरसचा प्रादूर्भाव होऊ नये, साठविण्यात आलेली माहिती सुरक्षित रहावी, नेटवर्क पूर्ण क्षमतेने सतत कार्यान्वीत रहावे यासाठी TREND MICRO ANTI VIRUS सॉफ्टवेअरचे ५१ युजर्सची क्षमता असलेले पॅकेज तीन वर्षाचे कालावधीसाठी खरेदी करण्यात यावे, असे नम्र मत आहे. सदर कामी अंदाजे रुपये २,२०,०००/- + टॅक्स इतका खर्च अपेक्षित असून, खरेदीची कार्यवाही विहीत पध्दतीने विविध पुरवठादारांकडून सिलबंद दरपत्रके मागवून करता येईल.

**(ड)** TREND MICRO ANTI VIRUS सॉफ्टवेअर चालू ठेवणेसाठी एका अद्ययावत संगणक संचाची गरज आहे. सदर कामाकरिता एक संगणक संच ठेवण्यात आला असून, त्याची कार्यक्षमता वाढविणे अत्यावश्यक झालेले आहे. TREND MICRO ANTI VIRUS सर्व्हर बनविणेकामी साधारणपणे खालील तपशीलप्रमाणे संगणक संच आवश्यक आहे.

| Sr. No. | Description | Qty | Approx Amount |
|---|---|---|---|
| 01. | Intel core2Duo Processior 2.0 or Higher,<br>160 GB Hard Disk, 2 GB RAM,<br>17" LCD Monitor,<br>48X CD ROM & No Floppy Drive,<br>Optical Mouse & Keyboard,<br>1 Parallel, 1 COM port & USB ports,<br>10/100/1000 LAN Card,<br>Windows 2003 Std. Edition,<br>3 Years on site warrenty.<br>*Make*- HP | 01 | 52,000/-+ Tax |

उपरोक्त तपशीलाप्रमाणे संगणक संच खरेदी करणेसाठी अंदाजे रक्कम रुपये ५२,०००/- चा खर्च अपेक्षित असून, खरेदी कार्यवाही विहित पध्दतीने करता येईल.

**उपरोक्त परिच्छेद 'क' मध्ये नमुद केलेप्रमाणे TREND MICRO ANTI VIRUS सॉफ्टवेअरचे ५१ युजर्सचे पॅकेज तीन वर्षाचे कालावधीसाठी विविध पुरवठादारांकडून विहित पध्दतीने सिलबंद दरपत्रके मागवून न्यूनतम दरपत्रकधारकाकडून खरेदी करणेस व त्यासाठी येणारे अंदाजे रक्कम रुपये २,२०,०००/- + टॅक्सच्या खर्चास मान्यता मिळणेस तसेच परिच्छेद 'ड' मध्ये नमुद केलेप्रमाणे, TREND MICRO ANTI VIRUS सॉफ्टवेअर सर्व्हरसाठी एक संगणक संच खरेदी करणेस व त्यासाठी येणारे अंदाजे रक्कम रुपये ५२,०००/- + टॅक्सचे खर्चास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही-आय.टी.विभागप्रमुख)

**विषय नं.५२ माहिती तंत्रज्ञान विभागात तांत्रिक कर्मचाऱ्यांची नेमणूक करणेबाबत.**

**निर्णय क्र.४६५** सदरहू विषयावरील चर्चा पूढे ढकलण्यात आली.

**विषय नं.५३ जुनी वाहने जाहीर लिलावाने विक्री करुन नविन वाहने खरेदी करणेबाबत.**

**निर्णय क्र.४६६** संस्थानचे वाहन विभागाकडे उपलब्ध असलेली खालील प्रमाणे कार्यालयीन, रूग्णवाहिका तसेच मालवाहतुक वाहने बरीच जुनी असल्यामुळे त्यांचे देखभाली वरील खर्च मोठया प्रमाणात होत आहे.

यापुर्वी, शासन पत्र क्रं. सासंवि-२००५/३८७/(११७)-का.सोळा, दि.२९/०६/२००६ नुसार, श्री साईबाबा संस्थान विश्वस्त व्यवस्था, शिर्डी प्रस्तावात नमुद केलेल्या तसेच जुनी वाहने निर्लेखित करण्यासाठी असलेल्या शासनाच्या नियमाचे पालन करण्याचे अटीस अधिन राहुन ०५ वर्ष किंवा त्या पेक्षा अधिक जुनी असेलेली किंवा ०१ लाख किलोमिटरपेक्षा जास्त धाव झालेल्या वाहनांच्या जाहीर लिलाव विक्रीस शासनाने मान्यता दिलेली होती. त्यानुसार, खालील प्रमाणे जुनी वाहने शासनाची मान्यता मिळाले नंतर जाहीर लिलाव करता येईल.

| अ. नं | संगणक कोड नं. | वाहन क्रमांक | वाहन प्रकार | वापर | खरेदी दिनांक | खरेदी किंमत | झालेले वर्ष-महिने | झालेले कि.मी |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1. | VEH-6015 | MH-17-H-401 | **व्हायझर, व्हॅन** | **बंद स्थितीत** | 28/02/2000 | 4,71,957/- | **08-01** | **104134** |
| 2. | VEH-6025 | MH-17-K-6281 | टाटा कं. सुमो ॲम्ब्युलस SE; | ॲम्ब्युलस | 29/03/2002 | 4,31,000/- | 06-00 | **319794** |
| 3. | VEH-6028 | MH-17-N-301 | **महिंद्रा स्कॉर्पिओ,** TURBO 2.6. | **कार्यालयीन** | 22/06/2002 | 6,05,366/- | 05-08 | **237916** |

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 4. | VEH-6034 | MH-17-T-601 | **ॲम्बेसॅडोर कार क्लासिक 200** | **कार्यालयीन** | 11/04/2005 | 4,01,276/- | 02-10 | **134876** |
| 5. | VEH-6027 | **MH-17-K-6651** | ओमनी मारूती XL-URO. | ॲम्ब्युलस | **20/05/2002** | 282,862/- | **05-09** | **95614** |
| 6. | VEH-6021 | MH-17-K-5501 | TATA L.P.T.709 TURBO ट्रक | मालवाहतुक | 07/12/2000 | 5,79,061/- | 07-02 | **175320** |
| 7. | VEH-6010 | MH-17-C-7381 | TATA 407 टॅम्पो | मालवाहतुक | 20/05/1999 | 3,76,313/- | 08-09 | **160650** |

उपरोक्त वाहनांपैकी अं.न.०१ व ०२ या वाहनांचा दि.०५/०६/२००७ चे जुन्या वाहनांच्या जाहीर लिलावात अपेक्षीत किंमत न आल्याने सदर दोन वाहनांचा लिलाव तहकुब करण्यात आला होता.

अ.नं.०१ ते ०५ या पाच वाहनां बदली नवीन वाहने खरेदी करण्याची आवश्यकता नाही.

अ.नं.०६ व ०७ ही वाहने मालवाहतुकी करीता असलेने त्यांचे बदली टाटा-११०९ व टाटा-४०७ ही नवीन दोन वाहने खरेदी करावी लागतील. सदर वाहने खरेदीच्या संस्थानचे विहीत कार्यपध्दतीनुसार खरेदी करण्यात येतील. या कामी अंदाजे रू.२० लाख मात्र खर्च अपेक्षीत आहे.

वरील अ.नं.०१ ते ०७ वाहनांची जाहीर लिलावाने विक्री करणेपुर्वी अधिनियम-२००४ चे कलम १७(०४) अन्वये शासनाची मान्यता घ्यावी लागेल.

वरील प्रमाणे अ.नं. ०१ ते ०७ वाहने जाहीर लिलावाने विक्री तसेच नवीन दोन मालवाहतूक वाहने खरेदी करणेस मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

**यावर सविस्तर चर्चा होऊन, शासनाने यापूर्वी पत्र क्र.सासंवि २००५/३८७/११७-का - सोळा विधी व न्याय विभाग, मुंबई दिनांक २९.०६.२००६ नुसार दिलेल्या जून्या वाहनांच्या लिलावाने विक्रीस दिलेल्या मान्यतेतील मार्गदर्शक नियमावलीनुसार असल्याने उपरोक्त अ.नं.०१ ते ०७ वाहने जाहिर लिलावाने विक्री करण्यात यावी व या वाहनाऐवजी एक स्कार्पिओ, २ माल वाहतूक वाहने व एक कार्डीयाक व्हॅन खरेदी करण्यात यावी व शासनाचे माहितीसाठी कळविण्यात यावे, असे ठरले.** (कार्यवाही-वाहन विभागप्रमुख)

## दिनांक २४.०५.२००८ रोजी झालेल्या व्यवस्थापन समितीचे सभेतील निर्णयाची कामापूरती नक्क्ल-

**विषय नं.५४** **न्यासाच्या /समितीच्या वाहनांचा खाजगी कारणासाठी वापराबाबत.**

**निर्णय क्र.४६७** दि.१९-२० जानेवारी, २००२ चे मा. व्यवस्थापन मंडळाचे सभेतील निर्णय क्रं.४२ अन्वये, मा. विश्वस्त व अधिकारी हे अकस्मित प्रसंगी वाहनांचा खाजगी कामासाठी वापर करीत असतात. या वाहनांचे वापरा करीता ए.सी. वाहनांसाठी प्रति कि.मी. रू.५/- व नॉन ए.सी. वाहनांसाठी प्रति कि.मी. रू.४/- प्रमाणे दर निश्चित करण्यात येऊन दि.२१ जानेवारी, २००२ पासून अंमलात आणण्यात यावेत. असा ठराव करण्यात आलेला आहे. या निर्णयाच्या अनुशंगाने, उपलब्ध असलेली वाहने मा. सदस्य / अधिकारी यांचे मागणीनुसार खाजगी कामाकरीता देण्यात येतात. तसेच निश्चित केलेल्या दरानुसार कि.मी. प्रमाणे झालेला सेवाआकार त्यांचेकडून वसुल करण्यात येतो.

विधी व न्याय विभागाने त्यांचेकडील शासनाचे पत्र जा.क्रं.संकिर्ण-२००७/२०३/(३२)-का.सोळा दि.०२ जून २००७ चे पत्रान्वये न्यासाचे / समितीचे कोणते ही वाहन न्यासाच्या / समितीच्या सदस्यांना / कर्मचाऱ्यांना कोणत्याही खाजगी कामाकरीता वापरता येणार नाही. असे कळविले होते.

शासनाकडील जा.नं.एसएसएस/वाहन/९४८६/दि.१९/०६/२००७चे परिपत्रक मा.अध्यक्ष / मा.उपाध्यक्ष / मा.सदस्य तसेच अधिकारी / कर्मचारी यांना न्यासाच्या/समितीच्या वाहनांचा खाजगी कारणासाठी वापर करता येणार नाही. असे कळविलेले होते.

न्यासाच्या / समितीच्या वाहनांचा वापर खाजगी कामाकरीता न करणे बाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी मा. व्यवस्थापन समितीच्या दि.२९/०६/२००७ चे सभेत सादर केला होता. त्यावर शासनाकडून उपरोक्त दि.१९/०६/२००७ चे पत्रास अनुसरून मान्यता येईपर्यन्त आकस्मित प्रसंगी मा.विश्वस्त व अधिकारी यांचेसाठी पूर्वीचे कार्यपध्दतीनुसार वाहनांचा वापर चालू ठेवावा व त्यासाठी ए.सी. वाहनांकरीता रू.६/- प्रति कि.मी. व नॉन ए.सी. वाहनांकरीता रू.५/- प्रति कि.मी. असे सुधारित दर निश्चित करण्यात आले. सदर आदेशाची कार्यवाही दि.०१/०७/२००७ पासून करण्यात यावी. असा निर्णय झालेला आहे.

मा.प्रधान सचिव विधी व न्याय विभाग यांना इकडील पत्र क्रं.९४६४ दि.१९/६/२००७ ने खाजगी वाहने अकस्मित प्रसंगी उपलब्ध होत नसलेने मा.अध्यक्ष / मा.उपाध्यक्ष / मा.सदस्य तसेच अधिकारी / कर्मचारी यांना अकस्मित प्रसंगी न्यासाच्या / समितीच्या वाहनांचा खाजगी कामाकरीता वाहन वापरण्यास मान्यता देणे बाबत पुनर्रविचार होणे बाबत पत्र देण्यात आलेले आहे.

यावर विधी व न्याय विभाग यांनी जा.नं.सासंवि-२००८/३२५/(२)-का.सोळा, दि.१९/०३/२००८ चे पत्रानुसार खालील प्रमाणे मान्यता दिलेली आहे.

न्यासाच्या वाहनांचा खाजगी वापर योग्य ते कार्यपध्दती वापरून संबंधित व्यक्तीकडून उपरोक्त शासन निर्णय वित्त विभाग क्रमांक प्रवास-१००५/प्र.क्र.३३/सेवा-५ दिनांक ०८/०७/२००५ च्या वित्त

विभागाच्या शासन निर्णया प्रमाणे पेट्रोल वा डिझेलवर चालणाऱ्या सर्व शासकीय वाहनांच्या खाजगी वापरासाठी रू.८/- (रू.आठ मात्र) प्रति किलोमिटर या दराने वसुली करण्यात यावी. तसेच या दरात वेळोवेळी शासन निर्णयानुसार होणाऱ्या बदलांच्या अनुषंगाने कार्यवाही करण्यात यावी.

वित्त विभाग, शासन निर्णय क्रं.प्रवास-२००५/प्र.क्र.३३/सेवा-५, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२ दि.०८जुलै, २००५ मध्ये खालील प्रमाणे नमुद केलेले आहे.

**शासन निर्णय**

०१) शासकीय वाहनांच्या खाजगी वापरासाठी आकारावयाचे दर दि.१७ ऑक्टोबर १९९० च्या आदेशान्वये विहीत करण्यात आले आहेत. या दरात सुधारणा करण्याचा प्रश्न शासनाच्या विचाराधीन होता.

०२) याविषयी शासन आता असे आदेश देत आहे की, पेट्रोल वा डिझेलवर चालणाऱ्या सर्व शासकीय वाहनांच्या खाजगी वापरासाठी यापुढे सरसकट रू.८/- (रूपये आठ) प्रति किलोमीटर या दराने वसुली करण्यात यावी.

शासकीय वाहनांच्या खाजगी वापरासाठी घालण्यात आलेली प्रति माह २५० किलोमीटर ही कमाल मर्यादा लागू राहील. या मर्यादेपेक्षा अधिक खाजगी वापरास परवानगी देण्यात येऊ नये.

०३) शासकीय वाहन खाजगी वापरात असतांना, त्यासाठी असलेला खोळंब्याचा (Detention) दर यापुढे प्रति तास रू.३/- व कमाल रू.३०/- प्रति दिवस इतका असेल. खोळंब्याचा काळ मोजतांना पूर्वीप्रमाणेच पहिल्या तिन तासांचा वापर सोडण्यात यावा.

०४) हे आदेश सार्वजनिक क्षेत्रातील उपक्रम, मंडळे इत्यादींकडील वाहनांच्या खाजगी वापरासाठीही लागू आहेत. मंत्रालयातील संबंधीत प्रशासकीय विभागांनी त्यांच्या नियंत्रणाखाली असलेल्या सार्वजनीक क्षेत्रातील उपक्रम, मंडळे इत्यादींच्या नजरेस हे आदेश आणावेत.

०५) हे आदेश दि.०१ ऑगस्ट २००५ पासून अंमलात येतील.

**यावर सविस्तर चर्चा होऊन, दिनांक ०१.०६.२००८ पासून रुपये ८/- प्रति कि.मी.दराने प्रचलित पध्दतीनुसार आकारणी करणेत यावी असे ठरले.** (कार्यवाही-वाहन विभागप्रमुख)

**विषय नं.५५ परिसरातील व स्थानिक ग्रामस्थांना मंदीरात प्रवेश देणेबाबत.**

**निर्णय क्र.४६८** श्री साईबाबांचे दर्शनाकरिता स्थानिक ग्रामस्थांची संख्या दिवसेंदिवस वाढत आहे. तसेच गुरुवारी राहाता, कोपरगाव व परिसरातील लहानमोठया खेडयातील ग्रामस्थ दर्शनासाठी येत असतात. यामध्ये पायी येणारे स्त्री-पुरुष व इतर साधनाने येणारेही आहेत. दर्शनाकरीता मंदिराचे कार्यालयाचे पुर्वेकडील गेटने (गावकरी गेट) स्थानिकांना प्रवेश दिला जातो. परंतू गर्दीचे वेळी गुरुस्थान गेट किंवा नारळी गेटने प्रवेश देणेबाबत आग्रह धरतात व प्रसंगी वादीवाद होतो.

परिसरातील गावातील म्हणजेच कोपरगाव, पिंपळवाडी, राहाता, नांदुर्खी, कनकुरी, डोऱ्हाळे, निमगाव-निघोज, सावळी विहीर या ठिकाणाहून येणारे भाविकांचे संख्येत लक्षणीय वाढ झलेली आहे. गुरुवारी ही संख्या खूपच मोठी असतो. या भाविकांची मंदिरात झटपट प्रवेशाची मागणी असते, विशेषतः गावकरी गेटनेच सोडावे असा त्यांचा आग्रह असतो.

सशुल्क दर्शन पासेसचा प्रस्ताव सध्या विचाराधीन आहे. त्यावेळी याबाबींचा विचार होणे आवश्यक आहे. दर्शन प्रवेशासाठी एक गेट यासाठी निश्चित करणे गरजेचे असलेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

**यावर सविस्तर चर्चा होऊन, परिसरातील व स्थानिक ग्रामस्थांना प्रवेशाबाबत शिर्डीतील गावकऱ्यांची एकत्रित बैठक घेऊन याबाबत अंतिम निर्णय घेण्यात यावा असे ठरले.**

(कार्यवाही- अधिक्षक, मंदिर विभाग/जनसंपर्क अधिकारी)

**विषय नं.५६ शैक्षणिक संकुलातील खेळाडूंकरिता ३५ सिटर्स व्हॅन खरेदी करणेबाबत.**

**निर्णय क्र.४६९** श्रीसाईबाबा संस्थान संचलित शैक्षणिक संकुलातील श्री साईबाबा इं.मि.स्कूल, आय.टी आय, कन्या विदया मंदीर व कनिष्ठ महाविदयालयातील खेळाडू दर वर्षी विविध क्रीडा स्पर्धेत तालुका, जिल्हा, विभाग, राज्यस्तरीय व राष्ट्रीय पातळीवर श्री साईबाबा संस्थानचे प्रतिनिधित्व करत असतात. स्पर्धा कालावधीत हे खेळाडू नागपूर ते कोल्हापूर असे महाराष्ट्रातील विविध जिल्हयात स्पर्धा वेळापत्रकाप्रमाणे संस्थान वाहनातून (सुमो / स्कूल बसने ) प्रवास करत असतात. परंतु वाहन विभागाला त्यामुळे बऱ्याच वेळा अडचणीचा सामना करावा लागतो.प्रत्येक वेळी स्कूल बसचे R.T.O. कडून परमिट काढणे, परवानगी घेणे,खेळाडू यादी जमा करणे तसेच परवाना शुल्क इत्यादी बाबी कराव्या लागतात. तसेच स्पर्धा काळात शाळेकडे उर्वरीत विदयार्थ्यांच्या शाळेत जाणे / येणे करण्याचा प्रश्न निर्माण होतो व त्यामुळे शाळेच्या वेळेत बदल करावा लागतो.

त्याकरीता **संस्थान वाहन विभागा मार्फत शैक्षणिक संकुलातील खेळाडूकरिता कायम स्वरूपी स्पोर्टस व्हॅन (मिनीबस ३५ सिटस)खरेदी केल्यास व तिचे कायम स्वरूपी ऑल इंडिया परमिट काढून घेतल्यास वाहन विभागाची व शैक्षणिक संकूलातील खेळाडूंची गैरसोय दूर होईल व दरवेळी स्कूलबस R.T.O. परमिट करिता येणारा खर्च व वेळ वाचेल. तसेच सदर स्पोर्टस व्हॅनचा (मिनी बस) उपयोग शाळेकडील शैक्षणिक सहलीकरता ही होऊ शकेल.या कामी अंदाजे**

**रुपये १०,००,०००/-( रुपये दहा लाख मात्र) इतका खर्च अपेक्षित असून त्यास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, तो अमान्य करण्यात आला.** (कार्यवाही-वाहन विभागप्रमुख/प्राचार्या,इंग्लिश मिडीयम स्कूल)

**विषय नं.५७ राज्य व राष्ट्रीय स्पर्धेत नैपुण्य मिळविलेल्या विद्यार्थी/विद्यार्थीनींचे शैक्षणिक शुल्क माफ होणेबाबत.**

**निर्णय क्र.४७०** श्री साईबाबा संस्थान संचलित श्री साईबाबा इंग्लिश मिडीयम स्कूल, औदयोगिक प्रशिक्षण केंद्र,कन्या विद्या मंदिर व कनिष्ठ महाविदयालयाचे विदयार्थी / विदयार्थिनीं दरवर्षी क्रीडा वक्तृत्व,संगीत, चित्रकला,विज्ञान प्रदर्शन इत्यादी स्पर्धेत राज्य,राष्ट्रीय व आखिल भारतीय पातळीवर महाराष्ट्र राज्याचे प्रतिनिधित्व व नेतृत्व करुन श्री साईबाबा संस्थानचे नाव उज्वल करण्याचा प्रयत्न करत असतात त्यांनी मिळविलेल्या नेत्रदिपक व दैदिप्यमान यशाचा श्री साईबाबा संस्थान मा.व्यवस्थापन मंडळ व प्रशासनाला सदैव सार्थ अभिमान वाटत आला आहे.

वेळोवेळी मा.व्यवस्थापन मंडळ व प्रशासनाने अशा विद्यार्थ्यांचा यथोचित सत्कार व गुणगौरव केलेला आहे. परंतु अशा होतकरु विदयार्थ्यांना कायम स्वरुपी मदत व्हावी या उद्देशाने जर संस्थानने अशा राज्य पातळीवरील प्रतिनिधित्व करणाऱ्या विदयार्थ्यांचे पन्नास टक्के शैक्षणिक शुल्क व राष्ट्रीय पातळीवर प्रतिनिधित्व करणारे विदयार्थ्यांचे शंभर टक्के शैक्षणिक शुल्क माफ केल्यास (शैक्षणिक वर्षात जो विदयार्थी / विदयार्थिनी राज्य व राष्ट्रीय स्पर्धेत प्राविण्य मिळविल फक्त त्यालाच शैक्षणिक शुल्क वरील प्रमाणे माफ होईल) विद्यार्थी व पालकांमध्ये क्रीडा व इतर विषयाची आवड निर्माण होईल व विद्यार्थ्यांचा स्पर्धेत सहभाग वाढेल. त्यामुळे निश्चितच संस्थानचे विद्यार्थी आंतरराष्ट्रीय पातळीवर चमकतील व मा.व्यवस्थापन मंडळ व प्रशासना मार्फत अशा होतकरु विद्यार्थ्यांच्या सर्वागिण विकासाच्या दृष्टीने चांगला उपक्रम संस्थान मार्फत सुरु करता येईल.या स्वरुपाची मदत शैक्षणिक संकुलातील खेळाडूंना व कलाकारांना (शैक्षणिक शुल्क माफ) मिळाल्यास हे विदयार्थी शैक्षणिक संकुलाचे नावलौकीक उंचावतील असे वाटते.

तरी अशा राज्य पातळीवर प्रतिनिधित्व करणाऱ्या विदयार्थ्यांचे पन्नास टक्के शैक्षणिक शुल्क व राष्ट्रीय पातळीवर तसेच अखिल भारतीय पातळीवर प्रतिनिधित्व करणाऱ्या विदयार्थ्यांचे शंभर टक्के शैक्षणिक शुल्क (क्रीडा, संगीत, वक्तृत्व,चित्रकला इत्यादी ) माफ करुन त्यांच्या कला क्रीडा गुणांचा गौरव करावा असे वाटते. तसेच इयत्ता दहावी मधील विद्यार्थी राज्य व राष्ट्रीय पातळीवरील स्पर्धेत सहभागी झाल्यास त्यांनी संस्थान शैक्षणिक संकुलातील ज्युनिअर (कनिष्ठ) कॉलेजकडे प्रवेश घेतला तरच त्यांचे सदर शैक्षणिक वर्षाचे शुल्क माफ होईल, असा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

**यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्तावास तत्वतः मान्यता देण्यात आली. याकामी नियमावली तयार करुन त्यास व्यवस्थापन समितीची मान्यता घेण्यात यावी असे ठरले.**

(कार्यवाही-प्राचार्या, इंग्लिश मिडीयम स्कूल)

**विषय नं.५८ शिर्डी- रुई पोहेगांव स्कुलबस मार्गात बदल करणे बाबत**

**निर्णय क्र.४७१** आपल्या श्री साईबाबा इंग्लिश मिडीयम स्कूलमध्ये विद्यार्थी / विद्यार्थ्यीनींना शाळेत जाणे-येणेकरिता स्कूलबस सुविधा आपण उपलब्ध करुन दिलेली आहे. शिरडी परिसरातील नांदुर्खी, पिंपळवाडी, राहाता, कनकुरी, रुई, पोहेगाव आदी भागात बस सुविधा आपण सुरु केलेली आहे. परंतु शिर्डी- रुई- पोहेगांव या मार्गावरील स्कुलबसचा विचार करता संस्थानला दरवर्षी सर्वसाधारण रु.१,२७,५८२/- नुकसान होत आहे. या मार्गावरुन फक्त १७ विद्यार्थी पोहेगाव व ४ विद्यार्थी रुई येथुन आपल्या शाळेत येतात. त्यांच्याकडून आपण नाममात्र स्कुल बस फी घेतो. त्यांची एकूण स्कुलबस फी रु.४०,२५०/- होते. गाडीचा खर्च तपशिल आपणाकरीता देत आहोत.

| बस स्टॉप | शिरडी-सावळीविहीर | सावळीविहीर - रुई | रुई-शिंदेवस्ती | शदेवस्ती-बोरावकेवस्ती | बोरावकेवस्ती - चांदेकसारे | चांदेकसारे - झगडेफाटा | झगडेफाटा-पोहेगाव |
|---|---|---|---|---|---|---|---|
| कि.मी. | ०५ | ०४ | ०६ | ०७ | ०२ | ०२ | ०४ |
| विद्यार्थी संख्या | १५ | १८ | ०४ | ०२ | ०३ | ०५ | ०७ |

खालील तपशिलात दिलेल्या मार्गावरील स्कुलबस बंद करणेबाबत विचार आहे.

| बस स्टॉप | रुई-शिंदेवस्ती | शदेवस्ती-बोरावकेवस्ती | बोरावकेवस्ती - चांदेकसारे | चांदेकसारे - झगडेफाटा | झगडेफाटा-पोहेगाव |
|---|---|---|---|---|---|
| कि.मी. | ०६ | ०७ | ०२ | ०२ | ०४ |
| विद्यार्थी संख्या | ०४ | ०२ | ०३ | ०५ | ०७ |

रुई ते शिंदेवस्ती व शिंदेवस्ती ते पोहेगाव मार्गावरील स्कुलबसमुळे होणारे वार्षिक नुकसान तपशील खालीलप्रमाणे-

| एकूण कि.मी. | शाळा एकूण | डिझेल खर्च | दररोज तोटा | विद्यार्थी संख्या | विद्यार्थी वार्षिक | एकुण वार्षिक | वार्षिक डिझेल एकूण खर्च | वार्षिक एकूण तोटा (रु.) |
|---|---|---|---|---|---|---|---|---|

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| दररोज | दिवस सरासरी | (रु.) दररोज | (रु.) | | एकुण फी (रु.) | स्कुलबस कि.मी. प्रवास | | |
| (२१x०४) ८४ कि.मी. दररोज | २२२ | ७५६ | ५७४ | १७- पोहेगाव, ०४- शिंदेवस्ती- रुई | ४०,२५०/- | १८,६४८ | १,६७,८३२/- | १,२७,५८२/- |
| | | | | | | | | |

वरील सर्व बाबींचा विचार करता.

०१. शाळेची बस फक्त सावळीविहीर व रुई पर्यंतच चालु ठेवावी.

०२. पोहेगाव-चांदेकसारे-झगडेफाटा-बोरावके वस्ती वरील १७ पालकांनी आपल्या पाल्यास सावळीविहीर येथे घेऊन जावे-यावे.

०३. रुई मार्गावरील शिंदे वस्ती (बारहाते वस्ती) येथील ४ पालकांनी आपल्या पाल्यास रुई येथे घेऊन जावे-यावे.

वास्तविक वरील सर्व ठिकाणी कोपरगाव व राहाता शहरातील इंग्रजी माध्यमातील शाळांच्या स्कुलबस ये-जा करतात. त्यामुळे विद्यार्थ्यांची अडचण होणार नाही. तसेच शिरडी गावातील विद्यार्थी संख्या आपल्या शाळेत पुरेशी असल्याने आपणास इतक्या दुरवर स्कुलबस पाठवुन विद्यार्थी गोळा करण्याची आवश्यकता नाही. (नुकसान सहन करुन) तसेच झगडेफाटा ते पोहेगाव व रुई ते शिंदेवस्ती येथील रस्ता प्रचंड खराब असल्याने गाडीचा देखभाल दुरुस्ती खर्च वाढतो.

शिरडी-रुई-पोहेगाव स्कुलबसचा मार्ग बदलून तो शिरडी-सावळीविहीर-रुई पर्यंतच मर्यादित ठेवल्यास सस्थानचे होणारे आर्थिक नुकसान (वर्षासाठी रु.१,२७,५८२/- मात्र) टाळता येईल. शाळेतील विद्यार्थी संख्या ही मर्यादीत राहील. उपरोक्त नमुद केलेला स्कुलबसचा मार्ग शिरडी-सावळीविहीर-रुई पर्यंतच असावा असा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

**यावर सविस्तर चर्चा होऊन, शिर्डी- रुई पोहेगांव स्कुलबस मार्गात बदल करणेबाबत मा.स्थानिक विश्वस्तांचे सभेत अंतिम निर्णय घेण्यात यावा असे ठरले.**

(कार्यवाही-प्राचार्या, इंग्लिश मिडीयम स्कूल)

**विषय नं.५९ बिबट्याचे बंदोबस्तासाठी पिंजरे देणे बाबत**

**निर्णय क्र.४७२** मा.श्री.सुरेश वाबळे, विश्वस्त यांनी त्यांच्या पत्रात नमुद केले आहे की, वनक्षेत्रपाल, राहुरी यांनी समक्ष भेटुन राहुरी तालुक्यात बिबटयांचा उपद्रव दिवसेंदिवस वाढत आहे. त्यामुळे तालुक्यात बरेच ठिकाणी बिबटे स्त्री-पुरुष- मुले यांचेवर प्राणघातक हल्ले असुन बिबटे जेरबंद करण्यासाठी ०२ पिंजरे अत्यंत आवश्यक आहे.

संस्थानमार्फत खास बाब म्हणून ०२ पिंजरे तयार करुन देण्यात यावेत म्हणजे भविष्यात बिबटयाचा नागरी क्षेत्रात होणारा उपद्रव कमी होईल. मनुष्यहाणी व जनावरांची हानी होणार नाही, असे त्यांच्या पत्रात विनंती केलेली आहे.

यापुर्वी उपवनरक्षक, अ.नगर वनविभाग, अहमदनगर यांच्या कार्यालयाकडून पत्र क्र.-ब/वजी/ पिंजरे/ २३०९/ सन २००७-२००८ दि.१८.०८.२००७ नुसार ५ पिंजऱ्यांची संस्थानमार्फत उपलब्ध करुन देण्याबाबतची मागणी केलेली आहे. या पत्रान्वये आयटीआय/ आस्था/ ३९४/ ०७ दि.०४.१०.२००७ च्या टिपणीन्वये ०५ पिंजरे बनविण्यासाठी एकुण अंदाजे खर्च रु.१,३५,०००/- इतका अपेक्षित असून त्यास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

**यावर सविस्तर चर्चा होऊन, उपवनरक्षक, अ.नगर वनविभाग, अहमदनगर यांना संस्थानमार्फत बिबट्याचे बंदोबस्तासाठी पाच पिंजरे तयार करुन देण्यात यावे याकामी येणारे अंदाजे रक्कम रुपये १,३५,०००/- चे खर्चास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही-प्राचार्य, आय.टी.आय)

**विषय नं.६० जुनी पेट्रोल फियाट वाहन देणगी स्विकारणेबाबत**

**निर्णय क्र.४७३** श्री. सुभाष कृष्णराव सप्तर्षी, पुणे यांनी त्यांच्या मालकीची पेट्रोल फियाट एप्रिल १९८५ चे वाहन मॉडेल (एम.जी.जी. ५०४६) असलेली श्री साईबाबा चरणी अर्पण करावयाची इच्छा व्यक्त केलेली आहे.

सदरचे वाहन हे सन १९८५ सालाचे असल्याने ते वाहन, वाहन विभागात चालणार नाही. सदर वाहन आय.टी.आय. विभागाकडे मेकॅ. मोटार व्हेईकल व्यवसायातील विद्यार्थ्यांकरीता ड्रायव्हिंग शिकविणेकामी करीता येईल, असे वाहन विभाग प्रमुख यांनी शेरा दिलेला आहे.

त्यानुसार सदरचे पत्र इकडे आलेले असून त्या गाडीच्या उपयोगीते बाबत संस्थेचे मेकॅ. मोटार व्हेईकल ट्रेडचे निदेशक व संबंधीत गटनिदेशक यांच्याशी चर्चा करुन सदरची गाडी मेकॅ. मोटार व्हेईकल ट्रेडच्या प्रशिक्षणासाठी वापरता येईल.

संबंधीत साईभक्त श्री.सप्तर्षी यांचेशी टॅक्स, इन्शुरन्स व डिलेव्हरी संदर्भात दूरध्वनी वरुन माहिती घेतली असता त्यांनी सांगितलेले आहे की, आपणास गाडी देणगी देताना संपूर्ण आर.टी.ओ. व इन्शुरन्स पूर्ण करुन शिर्डी येथे संस्थेमध्ये पोहच करुन देऊ.

**तरी सदरचे वाहन देणगी म्हणून स्वीकारणेस मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, तो अमान्य करण्यात आला.** (कार्यवाही-प्राचार्य,आय.टी.आय)

**विषय नं.६१ महत्वाचे/अतिमहत्वाचे व्यक्तिंना देण्यात येत असलेल्या पासेसवर नियंत्रण ठेवणेबाबत.**

**निर्णय क्र.४७४** सदरहू विषयावर चर्चा पूढे ढकलण्यात आली. (कार्यवाही-जनसंपर्क अधिकारी)

**विषय नं.६२ ट्रायकलर सिक्यूरिटी एजन्सी यांना साईमंदीर सुरक्षिततेसाठी तयार करण्यात आलेल्या प्राथमिक रिपोर्टबाबत.**

**निर्णय क्र.४७५** ट्रायकलर सिक्युरिटी एजन्सीने साईमंदिर सुरक्षिततेसाठी दिलेला प्राथमिक अहवाल स्विकारणेत येऊन पुढील आवश्यक कार्यवाहीस मान्यता देण्यात आली. (कार्यवाही-संरक्षण विभागप्रमुख)

**विषय नं.६३ डेडस्टॉक निरुपयोगी अनावश्यक भंगार वस्तूची विल्हेवाट करणे बाबत.**

**निर्णय क्र.४७६** संस्थानचा कारभार दिवसेंदिवस वाढत आहे.सातत्याच्या वापराने डेडस्टॉक साहित्य निरूपयोगी भंगार होते.अशा डेडस्टॉक साहित्याची वेळच्या वेळी विल्हेवाट लावावी लागते. 'डेडस्टॉकचे साहीत्य डेडस्टॉक मधून कमी करतांना मा.व्यवस्थापन समितीची मान्यता घ्यावी ' असे वैधानिक लेखापरिक्षक यांनी त्यांच्या अहवालात नमूद केले आहे.त्यानुसार जा.नं.एसएसएस/वशी-दप्तर/८५/७८१९/०६ दि.१५/०६/२००६अन्वये आदेश पारीत करण्यात आलेला आहे.

संस्थानच्या वेगवेगळया विभागाकडून वेळोवेळी निरुपयोगी भंगार साहित्य, अभिलेख कक्ष विभागाकडे जमा होत असते. असे साहित्य साठवून ठेवण्यास जागा अपूरी पडते, काही साहित्याच्या साठवणुकीमुळे दुर्गंधी सुटते, सार्वजनिक आरोग्याचे प्रश्न निर्माण होतात. वेळच्या-वेळी असे निरुपयोगी/अनावश्यक भंगार साहित्य विक्री केल्यास त्याची रक्कम वेळोवेळी संस्थानमध्ये जमा करता येते. हे साहित्य जडजवाहीर दागीने इतर मौल्यवान जंगम मालमत्ता या स्वरुपातील नाहीत. असे साहित्य दरवर्षी कोटेशनच्या उच्चतम वार्षिक दराने अशा वस्तूची नेहमीच्या प्रथेप्रमाणे विक्री करून विल्हेवाट लावण्यास हरकत नसावी अशी धारणा आहे ती पक्की होणेस विनंती असा इकडील जा.नं.एसएसएस/वशी-दप्तर/८५/७८१९/०६ दि.१५/०६/२००६ चा प्रस्ताव विधी व न्याय विभागाकडे सादर केला होता.

विधी व न्याय विभागाने त्यांचेकडील जा.नं.सासंवि २००६/५१२/(९०)-का.सोळा,विधी व न्याय विभाग,मंत्रालय,मुंबई.दि.१८/०५/२००७ चे पत्राने "श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी,अधिनियम-२००४ च्या कलम १७(४) मध्ये नमूद केल्यानुसार रू.५०,०००/- मुल्याच्या आतील सादिल स्वरूपाच्या दैनंदिन वापरामुळे जमा होणा-या टाकऊ,निरूपयोगी वस्तू वार्षिक दराने स्थानिक परिसरातील खरेदीदाराकडून निविदा मागवून व्यवस्थापन समितीने ठराव करून त्याबाबत योग्य तो निर्णय घेणे योग्य होईल."याप्रमाणे कळविले आहे.

मा.व्यवस्थापन समितीच्या दि.२९/०६/२००७ च्या सभेत "यावर्षी नेहमीच्या प्रचलीत पध्दतीनुसार कार्यवाही करावी असा निर्णय झालेला आहे."

असे साहित्य डेडस्टॉक मधून कमी करतांना मा.व्यवस्थापन समितीची मान्यता घेणेकामी वेळोवेळी संबंधीत विभागाकडून विहीत नमून्यात नियमानुसार अंतर्गत तपासनीस यांचेमार्फत प्रस्ताव सादर केले जातात.सदरचे कामकाज रूटीन स्वरूपाचे आहे.मा.व्यवस्थापन समितीसमोर इतर महत्वाचे अनेक प्रस्तावाचा अजंडा असतो त्यामुळे असे किरकोळ स्वरूपाचे प्रस्ताव वेळेच्या मर्यादेमुळे पुढे ढकलले जातात. पर्यायाने किरकोळ व रूटींन स्वरूपाचे काम खोळंबून पडते.

सन २००४ च्या अधिनियम १४ मधे खालीलप्रमाणे तरतूदी आहेत

**<u>समितीचे कर्तव्ये व अधिकार</u>**

**१७(२)(झ)-**सर्वसाधारणपणे विश्वस्तव्यवस्थेची मालमत्ता व तिचे कामकाज यांचे योग्य प्रकारे व्यवस्थापन,देखभाल व प्रशासन करण्याच्या प्रयोजनासाठी आवश्यक असतील अशा सर्व गोष्टी करील.

**१७(४)-** "विश्वस्त संस्थेमध्ये निहित केलेले पन्नास हजार रुपयांपेक्षा अधिक किमतीचे कोणतेही जडजवाहीर दागिने व इतर मौल्यवान जंगम मालमत्ता राज्य शासनाच्या लेखी पूर्व मंजूरी असेल त्याखेरीज समितीकडून विकण्यात येणार नाही.तारण म्हणून ठेवण्यात येणार नाही किंवा अन्यथा अन्यसंक्रमीत करण्यात येणार नाहीत." असे निर्देश आहेत.

**<u>समितीच्या अधिका-यांचे अधिकार व कर्तव्ये</u>**

**१४(१)-** कार्यकारी अधिकारी हा समितीचा मुख्य प्रशासकीय अधिकारी असेल,त्यास समितीच्या सर्वसाधारण नियंत्रणास अधीन राहून,या अधिनियमाच्या तरतुदीनुसार समितीचे निर्णय अंमलात आणण्याचे अधिकार असतील.

**१४(२)(ड)-** जी कृत्ये व गोष्टी करण्यासाठी समितीने त्यास अधिकार प्रदान केलेले आहेत किंवा विनियमान्वये असे अधिकार प्रदान करण्यात आलेले आहेत.ती इतर सर्व कृत्ये व गोष्टी करण्याचे अधिकार असतील.

**१४(३)-** समितीचे इतर अधिकारी व कर्मचारी समितीकडून किंवा कार्यकारी अधिका-याकडून किंवा विनियमान्वये त्यांना वेळोवेळी नेमून देण्यात येतील अशा अधिकारांचा वापर करतील आणि अशी कर्तव्ये व कामे पार पाडतील.

**कलम १७(४) खेरीजचे स्क्रॅप डेडस्टॉक साहीत्याची दरपत्रक मागवून वार्षीक उच्चतम दराने वेळोवेळी विक्री करण्याचे व विक्रीतून येणारी रक्कम संस्थान फंडात जमा करून घेण्याचे तसेच अशा साहित्याच्या नोंदी दप्तरातून कमी करण्याचे समितीचे अधिकार उपरोक्त नमूद केलेल्या तरतूदीच्या आधारे मा.कार्यकारी अधिकारी यांना प्रदान केल्यास येणा-या अडचणीचे निराकरण होईल असा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही-अधिक्षक,अभिलेखाकक्ष)

**विषय नं.६४** **श्रीसाई सेवाभावी संस्था,शिर्डी ता.राहाता जि.अहमदनगर यांना साईबाबा भक्तनिवासस्थान येथे गाळा भाडे तत्वावर मिळणेबाबतचे पत्राबाबत.**

**निर्णय क्र.४७७** श्री साई सेवाभावी संस्था, शिर्डी ता राहाता जिल्हा अहमदनगर यांचे दि ०९/०१/२००८ रोजीचे पत्र इकडील कार्यालयास दिनांक १२/०१/२००८ प्राप्त झालेले आहे. सदर पत्रात त्यांनी श्री साईबाबा भक्तनिवासस्थान येथे गाळा भाडे तत्वावर मिळणेबाबत विनंती केलेली आहे.

प्रस्तुतचे पत्रात त्यांनी संस्थानचे साईबाबा भक्तनिवासस्थान येथे बरेचशे गाळे रिक्त आहेत. सदरचे गाळयामध्ये श्री साईभक्तांचे सेवेसाठी टॉवेल,बनियान , रुमाल साबण व इतर जिवनाश्यक वस्तू तसेच श्री साईबाबांच्या कॅसेटस व सी.डी त्वरीत उपलब्ध होणेकरिता ना नफा ना तोटा या तत्वावर गाळा सुरु करणेचा मानस आहे. संस्थान नियमानुसार मी सदर गाळयाचा होणारा सेवाआकार व विद्युत आकार तसेच विहीत नमुन्यातील करारनामा करून देणेस तयार आहे. तरी साईबाबा भक्तनिवासस्थान येथे आतील बाजूस एक गाळा साईभक्तांचे सेवेसाठी भाडोत्री तत्वावर मिळणेबाबत सहानुभुतिपूर्वक विचार होणेस विनंती आहे असे प्रस्तुत पत्रात म्हटलेले आहे.

श्री साईबाबा भक्तनिवासस्थान ५०० रुम व २०० रुम मधील काही गाळे शासकीय उपक्रम, सहकारी संस्था व खाजगी लिलावधारक तसेच पतपेढी व इतर यांना लिव्ह अॅन्ड लायसेन्स तत्वावर १ वर्ष मुदत पावेतो देण्यात आलेले आहे. याबाबत त्यांचेकडून डिपॉझीट रुपये १०,०००/- पासून रुपये ५०,०००/- ते रुपये ३,१८,०००/- पर्यत घेऊन लिव्ह अॅन्ड लायसेन्स फी मासिक परवाना फी रुपये ६०५, रुपये-पासून ८८७/ ते रुपये ४५००/- पावेतो आकारणेत आलेली आहे. **लिव्ह अॅन्ड लायसेन्स तत्वावर गाळे देण्यात आलेले आहे.** त्याची माहिती खालील प्रमाणे आहे.

**संस्थानचे ५०० रुम परिसरात दिलेले गाळे बाबत माहिती तक्ता**

| अक्रं | सुविधेचे नांव | मासिक भाडे रुपये | कालावधी | ठिकाण |
|---|---|---|---|---|
| १) | **क्लोक रुम**<br>अ) सुलभ-क्लोकरुम<br>ब)भक्तनिवास-क्लोकरुम<br>क)साईप्रसाद-क्लोकरुम | २,३४०/-<br>(एकत्रित मासिक फी ) | ०१/०६/२००७<br>ते<br>३१/०५/२००८ | सुलभ शौचालय इमारत- स्टॉल<br>भक्तनिवास मेनगेटजवळ-स्टॉल<br>चौकशी कार्यालय शेजारी-स्टॉल |
| २) | **प्रसाद नॉव्हेल्टी**<br>अ) नॉव्हेल्टी स्टोअर नं.१<br>ब) नॉव्हेल्टी स्टोअर नं.२<br>क) प्रसाद स्टोअर नं.१ | ९७६/-<br>९७६/-<br>९७६/- | ०१/०६/२००७<br>ते<br>३१/०५/२००८ | भक्तनिवास डी ब्लॉक नं.३ - गाळा<br>भक्तनिवास डी ब्लॉक नं.२ - गाळा<br>भक्तनिवास डी ब्लॉक नं.४ - गाळा |
| ३) | महात्मा फुले कृषी विद्यापीठ, राहुरी | -- | -- | भक्तनिवास डी विंग गाळा **नं.११**<br>**( मुदतवाढ रद्य )** |
| ४) | महाराष्ट्र राज्य हातमाग महामंडळ मुंबई | -- | -- | भक्तनिवास डी विंग गाळा **नं.११**<br>**( मुदतवाढ रद्य )** |
| ५) | एस.टी.डी.बुथ<br>श्री.जगधने<br>**(डिपॉझीट रु, ३,१८,०००/-)** | १७३१/- | ०१/११/२००७<br>**ते**<br>३१/१०/२००८<br>**११ महिने** | **भक्तनिवास अे विंग गाळा नं ०३** |
| ६) | जनरल स्टोअर्स-<br>श्री.नंदूकोळपकर, शिरडी<br>**(डिपॉझीट रु, १,२५,०००/-)** | **४२५९/-** | १३/०६/२००७<br>ते<br>१२/०६/२००८<br>**१२ महिने** | **भक्तनिवास अे विंग गाळा नं. ०६** |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ७) | प्रवरा फळे व भाजीपाला उत्पादक प्रकीया संस्था लि. **(उिपॉझीट १०,०००/- )** | २०००/- | ३०/११/२००७ **ते** २९/११/२००८ **१२ महिन** | ५०० रुम परिसर- गाळा |
| ८) | साईगंगा (मिनरल वॉटर) /ब्राम्हणगांव फळ उत्पादक सोसा. कोपरगांव **(उिपॉझीट १०,०००/- )** | २४२०/- | दि १०/१०/२००७ ते दि ०९/०९/२००८ ११ महिने | **भक्तनिवास डी विंग गाळा नं ०८** |
| ९) | श्री. प्रविण अशोक शिंदे राहणार शिर्डी, ता राहाता जिल्हा अहमदनगरTop 'N Town Ice Cream( रुपये १,००,०००/- डिपॉझीट ) | **२०००/-** | १६/१०/२००७ **ते** १५/०९/२००८ **११ महिने** | **५०० रुम येथे एक गाळा** |
| १०) | श्रीरामपूर दूध जिल्हा मध्यवर्ती सहकारी दूध व्याव. संध, लि.बाभळेश्वर ता - राहातादूग्धजन्य पदार्थ विक्री **(उिपॉझीट ५०,०००/- )** | ४५००/- | ताब्यात घेतलेपासून २० /१२/२००७ १ वर्षाकरिता | **५०० रुम येथे एक गाळा** |

श्री साई सेवाभावी संस्था, शिर्डी ता राहाता जिल्हा अहमदनगर यांचे दि ०९/०१/२००८ रोजीच्या पत्रान्वये सदर गाळयामध्ये श्री साईभक्तांचे सेवेसाठी टॉवेल, बनियान रुमाल, साबण व इतर जिवनाश्यक वस्तू तसेच साईबाबांचे कॅसेटस व सी.डी.त्वरीत उपलब्ध होणेकरिता ना नफा ना तोटा या तत्वावर गाळा सुरु करणेचा मानस आहे.

उपरोक्त गाळे लिलावामध्ये भाग घेणारे गाळाधारकांस तसेच सहकारी संस्थेस तसेच अपवादात्मक परिस्थितीत खाजगी व्यक्तींस १ वर्षाचे कालावधीसाठी लिव्ह ॲन्ड लायसेन्सी तत्वावर देणेत आलेली आहेत. महात्मा फुले कृषी विद्यापीठ, राहूरी व महाराष्ट्र राज्य खादी ग्रामोद्योग,मुंबई यांचा ५०० रुम गाळा परवाना मुदतवाढ बाबत रद्द केलेला असून देखील त्यांनी सदर गाळा असाच सोडलेला नाही.

यापूर्वी नविन भक्तनिवास परिसरातील गाळे लिव्ह ॲन्ड लायसेन्स तत्वावर देणेत आलेले आहेत. गाळयाबाबत सोबतचे तक्त्यानुसार लायसेन्स फी आकारणेत आलेली आहे. तसेच डिपॉझिट रक्कम कमीत कमी रुपये १०,०००/- व जास्तीत जास्त रुपये ३,१८,०००/- आकारणी केलेली आहे. लायसेन्स फी कमीत कमी रुपये ९७६/-व जास्तीत जास्त ४२५९/-अशी आकारणी मा.व्यवस्थापन समितीचे ठरावाप्रमाणे / निर्णयाप्रमाणे आकरणेत आलेली आहे.

सदरची श्री साई सेवाभावी संस्था, शिर्डी ता राहाता ही रजिस्टर्ड संस्था आहे. तसेच सदर संस्थेव्दारे साईबाबा भक्तनिवासस्थान इमारतीत उतरणारे साईभक्त यांचे करिता व त्यांचे सेवेसाठी आवश्यक असणारे वस्तू टॉवेल, बनियान रुमाल, साबण व इतर जिवनाश्यक वस्तू तसेच साईबाबांचे कॅसेटस व सी.डी.त्वरीत उपलब्ध होणेकरिता ना नफा ना तोटा या तत्वावर विक्री करून त्यांना त्या ठिकाणीच उपलब्ध करून देणेचा सदर संस्थेचा मानस व इच्छा आहे. या सर्व बाबीचा विचार करता या संस्थेस श्री साईबाबा भक्तनिवासस्थान ५०० रुम इमारतीतील एक गाळा लिव्ह ॲन्ड लायसेन्सी तत्वावर लिलांवासाठी विचारधीन असलेल्या व उपलब्ध असलेल्या असलेल्या गाळयापैकी १ गाळा लिव्ह ॲन्ड लायसेन्स तत्वावर देता येईल. त्यांचेकडून **एका गाळयास डिपॉझीट रुपये १,००,०००/- ( अक्षरी रुपये एक लाख मात्र ) आकारून व एका गाळयास मासिक परवाना लायसेन्सी फी रुपये ३०००/- ( अक्षरी रुपये तीन हजार मात्र ) आकारुन तसेच विद्युत बील मीटर रिडीगप्रमाणे येणारे वेगळे आकारुन एक गाळा देता येईल. सदरचा गाळा त्यांनी ताब्यात घेतलेपासून एक वर्षासाठी लिव्ह ॲन्ड लायसेन्स तत्वावर देता येईल व सदरचे गाळयात त्यांना सदरच्या वस्तू ना नफा ना तोटा या तत्वावर विक्रीकामी परवानगी देता येईल असा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, तो अमान्य करण्यात आला.**

(कार्यवाही-विधी अधिकारी)

**विषय नं.६५** **महाराष्ट्र स्टेट खादी ॲण्ड व्हिलेज इंडस्ट्रीज बोर्ड, फोर्ट मुंबई यांना संस्थानचे जागेत विक्री केंद्राकरीता जागा उपलब्ध करुन देणे बाबत.**

**निर्णय क्र.४७८** महाराष्ट्र स्टेट खादी ॲण्ड व्हिलेज इंडस्ट्रीज बोर्ड, फोर्ट मुंबई यांनी त्यांचे पत्रात त्यांनी महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळाची स्थापना सन १९६० चा मुंबई अधिनियम क्रमांक १९ मुंबई खादी व ग्रामोद्योग अधिनियम १९६० अन्वये करण्यात आली असून, सन १९६२ पासून मंडळ कार्यरत आहे.

ग्रामीण बेरोजगारांना स्थानिक पातळीवर रोजगार उपलब्ध करून देणे बलुतेदार कारागीरांना त्यांचे उत्पादनरिता अर्थसहाय्य उपलब्ध करून देणे, ग्रामोद्योगास प्रोत्साहन देवून संघटन, विकास व विनिमय करणे अशा प्रकारची महत्वाची कार्य मंडळ करीत आहे मंडळाचे मधमाशापालन संस्था, महाबळेश्वर सातारा येथे खातेनिहाय केद्रं कार्यरत असून तेथे मधाचे उत्पादन होते. आपले संस्थानकडे भाविकांचा ओघ कायम वाढत आहे. संस्थानला भेट देणा-या भाविकासांठी आपले संस्थानच्या जागेत विक्री केंद्र सुरु करण्याचा मंडळास मानस आहे. मंडळातर्फे अर्थसहाय्य उपलब्ध करून दिलेल्या अनेक नोंदणीकृत संस्थानी उत्पादीत केलेली उत्पादने या विक्री केंद्रांवर विक्रीसाठी ठेवण्यात येतील. त्यामुळे मंडळाने नोंदणी केलेल्या संस्थसपी बलुतेदार संस्थांनी उत्पादीत केलेल्या मालास बाजारपेठ उपलब्ध होवून त्यांना आर्थक मदत होईल. तसेच मधमाशापालन संस्था महाबळेश्वर येथे उत्पादीत करण्यात येणा-या मधाची या विक्री केद्रांवर विक्री झाल्यास या संस्थेस त्यायोगे उत्पन्न मिळण्यास मदत होईल. तरी आपणांस विनंती करण्यात येते की, वरीलप्रमाणे संस्थानचे जागेत केंद्र उभारण्याकरिता जागा उपलब्ध दयावी अशी त्यांनी पत्राव्दारे विनंती केलेली आहे.

संस्थानचे जागेत केद्रं उभारण्याकरिता जागा उपलब्ध करून दयावी अशी त्यांनी मागणी केलेली आहे. व सदर पत्रात किती मोकळी जागा केंद्र उभारणीकरिता आवश्यक आहे याचा उल्लेख केलेला नाही.

श्री साईबाबा भक्तनिवासस्थान ५०० रुम व २०० रुम मधील काही गाळे शासकीय उपक्रम,सहकारी संस्था व खाजगी लिलावधारक तसेच पतपेढी व इतर यांना लिव्ह ॲण्ड लायसेन्स तत्वावर ११ महिने व एक वर्ष मुदत पावेतो देण्यात आलेले आहे याबाबत त्यांचेकडून डिपॉझिट रुपये १०,०००/- पसून रुपये ५०,०००/- ते रुपये ३,१८,०००/- पर्यन्त घेऊन लिव्ह ॲण्ड लायसेन्स तत्वावर मासिक परवाना फी रुपये ६०५/- पासून रुपये ४५००/- पावेतो आकारण्यात आलेले आहे . लिव्ह ॲण्ड लायसेन्स तत्वावर गाळे देण्यात आलेले आहे त्याची माहिती खालीलप्रमाणे

| अक्रं | सुविधेचे नांव | मासिक भाडे रुपये | कालावधी | ठिकाण |
|---|---|---|---|---|
| १) | **क्लोक रुम**<br>अ) सुलभ-क्लोकरुम<br>ब)भक्तनिवास-क्लोकरुम<br>क)साईप्रसाद-क्लोकरुम | २,३४०/-<br>एकत्रित मासिक फी) | ०१/०६/२००७<br>ते<br>३१/०५/२००८ | सुलभ शौचालय इमारत- स्टॉल<br>भक्तनिवास मेनगेटजवळ-स्टॉल<br>चौकशी कार्यालय शेजारी-स्टॉल |
| २) | **प्रसाद नॉव्हेल्टी**<br>अ) नॉव्हेल्टी स्टोअर नं.१<br>ब) नॉव्हेल्टी स्टोअर नं.२<br>क) प्रसाद स्टोअर नं.१ | ९७६/-<br>९७६/-<br>९७६/- | ०१/०६/२००७<br>ते<br>३१/०५/२००८ | भक्तनिवास डी ब्लॉक नं.३ - गाळा<br>भक्तनिवास डी ब्लॉक नं.२ - गाळा<br>भक्तनिवास डी ब्लॉक नं.४ - गाळा |
| ३) | महात्मा फुले कृषी विद्यापीठ, राहुरी | -- | -- | भक्तनिवास डी विंग गाळा **नं.११**<br>( मुदतवाढ रद्य ) |
| ४) | महाराष्ट्र राज्य हातमाग महामंडळ मुंबई | -- | -- | भक्तनिवास डी विंग गाळा **नं.११**<br>( मुदतवाढ रद्य ) |
| ५) | एस.टी.डी.बुथ श्री.जगधने<br>**(डिपॉझीट रु, ३,१८,०००/-)** | १७३१/- | ०१/११/२००७<br>**ते**<br>३०/०९/२००८<br>**११ महिने** | नविन भक्तनिवास अे विंग गाळा नं ०३ |
| अक्रं | सुविधेचे नांव | मासिक भाडे रुपये | कालावधी | **ठिकाण** |
| ६) | जनरल स्टोअर्स-<br>श्री.नंदूकोळपकर, शिरडी<br>**(डिपॉझीट रु, १,२५,०००/-)** | **४२५९/-** | १३/०६/२००७<br>ते<br>१२/०६/२००८<br>**१२ महिने** | नविन भक्तनिवास अे विंग गाळा नं. ०६ |
| ७) | श्री. अजय अनिल बोरावके,<br>गुरुकृपा सेल्स, कोपरगांव<br>साईगंगा ( मिनरल वॅाटर )<br>**(डिपॉझीट १०,०००/- )** | २४२०/- | दि १०/१०/२००७<br>ते<br>दि ०९/०९/२००८<br>११ महिने | नविन भक्तनिवास डी विंग गाळा नं ०८ |
| ८) | श्री. प्रविर्ाि अशोर्ाि शिंदे<br>राहर्ाारि शिर्डी, ता राहाता<br>जिल्हा अहमदनर्ाारि Top 'N Town Ice Cream<br>**(डिपॉझीट रुपये १,००,०००/-)** | **२०००/-** | १६/१०/२००७<br>**ते**<br>१५/०९/२००८<br>**११ महिने** | ५०० रुम येथे एक गाळा<br>( नविन भक्तनिवासस्थान ) |
| ९) | श्रीरामपूर दूध जिल्हा मध्यवर्ती सहर्ाारी दूध व्याव. संध, | ४५००/- | २० /१२/२००७<br>ते | ५०० रुम येथे एक गाळा<br>( नविन भक्तनिवासस्थान ) |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | लि.बाभळेश्वर ता - राहातादुग्धजन्य पदार्थ विक्री **(डिपॉझीट ५०,०००/- )** | | १९/१२/२००८ **१२ महिने** | |

महाराष्ट्र स्टेट खादी ॲन्ड व्हिलेज इंड्रस्ट्रीज बोर्ड ,फोर्ट, मुंबई यांचे कार्यासन ७/ दि १०/०३/२००८ रोजीचे पत्रान्वये सदर जागेमध्ये मंडळाने अर्थसहाय्य उपलब्ध करून दिलेल्या अनेक नोंदणीकृत संस्थेने उत्पादीत केलेले उत्पादने व उत्पादीत करण्यात येणा-या मधाची विक्री या केद्रांवर करून भाविकांना सुविधा देणेचा मानस आहे. असे नमूद करणेत आलेले आहे.

यापूर्वी नविन भक्तनिवास परिसरातील गाळे मा. व्यवस्थापन समितीचे निर्णयानुसार लिव्ह ॲन्ड लायसेन्स तत्वावर देण्यात आलेले आहेत. गाळयाबाबत सोबतचे माहिती तक्त्यान्नुसार लायसेन्स फी आकारणेत आलेली आहे. तसेच डिपॉझीट रक्कम कमीत कमी रुपये १०,०००/- व जास्तीत जास्त रुपये ३, १८,०००/- आकारणेत आलेली आहे. लायसेन्स फी कमीत कमी रुपये ९७६/-व जास्तीत जास्त ४२५९/-अशी आकारणेत मा.व्यवस्थापन्न समितीचे ठरावाप्रमाणे / निर्णयाप्रमाणे आकारणेत आलेली आहे.

सदरची महाराष्ट्र स्टेट खादी ॲन्ड व्हिलेज इंड्रस्ट्रीज बोर्ड ,फोर्ट, मुंबई यांना सदर ठिकाणी मंडळाने अर्थसहाय्य उपलब्ध करून दिलेल्या अनेक नोंदणीकृत संस्थेने उत्पादीत केलेले उत्पादने व उत्पादीत करण्यात येणा-या मधाची विक्री या केद्रांवर करून भाविकांना सुविधा देणेचा मानस आहे.व या श्री साईभक्तांना मिळणा-या सुविधा विचार करता या संस्थे**स श्री साईबाबा भक्तनिवासस्थान्न ५०० रुम इमारतीतील लिलावासाठी विचारधीन असलेल्या व उपलब्ध असलेल्या गाळयापैकी एक गाळा संस्थानचे सोईने लिव्ह ॲड लायसेन्सी तत्वावर देता येईल. त्यांचे कडून एका गाळयास डिपॉझीट रुपये १०,०००/- ( अक्षरी रुपये दहा हजार मात्र ) मासिक परवाना लायसेन्सी फी रुपये १०००/- ( अख्ररी रुपये एक हजार मात्र ) आकारून व तसेच विद्युत बील मीटर रिडींग प्रमाणे येणारे वेगळे आकारुन देता येईल. सदरचा गाळा संस्थेने ताब्यात घेतलेपासून एक वर्षासाठी लिव्ह ॲड लायसेन्स तत्वावर देता येईल असा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली.**

याचवेळी महात्मा फूले कृषी विद्यापीठ राहूरी यांना भक्तनिवासस्थान परिसरात देण्यात आलेल्या गाळयाची मुदत दिनांक २४.०२.२००७ रोजी संपल्याने या गाळयाचा संस्थानला व साईभक्तांना होत असलेला उपयोग पहाता त्यांना मुदतवाढ देण्यात येऊ नये असे व्यवस्थापन समितीचे दिनांक २८.७.२००७ चे सभेत निर्णय क्र.६०७ अन्वये ठरलेले आहे. तथापि या गाळयास पूर्वीचेच अटी व शर्तीवर लायसेन्स फी रकमेत १०टक्के वाढ करुन दिनांक २५.०२.२००७ पासून ११ महिने कालावधीसाठी मुदतवाढ देण्यात यावी असे ठरले. (कार्यवाही-विधी अधिकारी)

**विषय नं.६६** **कार्यक्रमासाठी जागा व इतर सुविधा देणेसाठी धोरण ठरविणेबाबत**

**निर्णय क्र.४७९** श्रीसाईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, (शिर्डी) कडे शिबीर, परिषदा, सांस्कृतिक कार्यक्रम, अखंड हरिनाम सप्ताह, उद्घाटन समारंभ, पुण्यतिथी कार्यक्रम, हळदी-कुंकू कार्यक्रम तसेच विविध कार्यक्रमासाठी जागा, मंडप, स्टेज, सतरंज्या, खुर्च्या, विद्युत पुरवठा, ध्वनीक्षेपण, निवास व भोजन व्यवस्था इ. ची सोय विनामुल्य होणेबाबत मागणी केली जाते. यापुर्वी अश्याप्रकारची मागणी आलेस संस्थानमार्फत कार्यक्रमासाठी जागा, मंडप, स्टेज, सतरंज्या, खुर्च्या, विद्युत पुरवठा, ध्वनीक्षेपण, निवास व भोजन व्यवस्था इ. ची सोय विनामुल्य करण्यात येत होती. व त्याची मंजूरी मा.व्यवस्थापन समितीचे सभेत घेतली जात असे.

बरेच साईभक्त मंडळ ही अखंड साईनाम सप्ताहासाठी तसेच पालखी ठेवणेसाठी लेंडीबागेची मागणी करतात व त्याचवेळी मंडप, स्टेज, बैठकव्यवस्था, विद्युत व्यवस्था, ध्वनीक्षेपण व्यवस्था, तसेच निवास व भोजन व्यवस्था संस्थानमार्फत होणेबाबत विनंती करत असतात. त्यावेळी संबंधीतांना मंडप, स्टेज, ध्वनीक्षेपण इ. व्यवस्था स्वखर्चाने करणेबाबत तसेच निवास व भोजनव्यवस्था संस्थान नियमानुसार व उपलब्धतेनुसार देण्यात येईल असे कळवित असतो. संस्थानमार्फत फक्त बैठकव्यवस्था म्हणजे सतरंजी इ. व विद्युत व्यवस्था करीत असतो. सदर बाबतीत मा.कार्यकारी अधिकारी यांचे परवानगीनेच कार्यवाही केली जात असे. आता साईभक्तांची गर्दी, जागेअभावी व सुरक्षिततेच्या दृष्टीने साईनाम सप्ताह हे कार्यक्रम जुन्या मराठी शाळेच्या मैदानावर घेणेस परवानगी देणेत येते. तसेच अशाप्रकारे उपरोक्त दर्शविलेले विविध कार्यक्रम विविध संस्थेनी आयोजित केलेवर संस्थानचे विविध विभागांवर त्या त्या कामाची जबाबदारी टाकावी लागते व त्यामुळे संबंधीत विभागावर तो अतिरिक्त भार पडतो.

तसेच आता वर्षभरात साधारणपणे १५०-२०० पालख्या ह्या पदयात्रीसह येत असून पदयात्रींची संख्या साधारणपणे १०० ते १,००० चे दरम्यान असते. बहुतेक पालखीधारक हे लेंडीबागेत दत्तमंदिर परिसरात उतरविणेसाठी परवानगी मागतात. पुर्वी पालख्यांची संख्या कमी होती तसेच गर्दीचे प्रमाणही कमी होती म्हणून संस्थान लेंडीबागेत पालखी ठेवणेस परवानगी देत असे. आता पालख्यांची संख्या वाढत असलेने तसेच गर्दीचे प्रमाणही वाढत असलेने तसेच सुरक्षिततेच्यादृष्टीने पालख्या लेंडीबागेत ठेवणेस बंदी घालावी लागेल असे नम्र मत आहे. संबंधीत पालखीधारकांची पालखी ठेवण्याची व्यवस्था इतरत्र करावी लागेल जेणेकरुन कुठल्याही प्रकारचा त्रास इतर साईभक्तांना व दर्शन घेणा-या साईभक्तांना होता कामा नये.

यापुर्वी उपरोक्त कार्यक्रमाबाबत तसेच पालखी लेंडीबागेत उतरविणेबाबत व त्यांची इतरत्र व्यवस्था करणेबाबत कोणत्याही प्रकारचे धोरण व्यवस्थापन सभेत ठरविण्यात आलेले नाही व तशी आवश्यकताही भासलेली नाही.

तरी संस्थान संबंधीत म्हणजे संस्थानचे स्वतःचे कार्यक्रमाव्यतिरिक्त मंदिर परिसर अगर मंदिरालगतचे संस्थान जागेत परवानगी देऊ नये जेणेकरुन संस्थानचे दैनंदिन कार्यक्रमास व्यत्यय येणार नाही. तसेच संस्थानने आयोजित केलेल्या अगर संस्थानचा सहभाग असलेल्या कार्यक्रमाव्यतिरिक्त (अधिनियमातील तरतुदीस आधीन राहून) इतरांचे कार्यक्रमास लाईट, ध्वनीक्षेपक, बिछायत, खुर्च्या इ. द्यावे किंवा देऊ नये याबाबत धोरण निश्चित करणे आवश्यक आहे, जेणेकरुन उपरोक्त कार्यक्रमाबाबत प्रशासनास योग्य ते निर्णय तातडीने घेऊन संबंधीतांनी मागणी केलेल्याबाबत संबंधीतांना सविस्तर कळविता येईल व जेणेकरुन प्रशासनास कोणाचाही रोष पत्करावा लागणार नाही असा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

**यावर सविस्तर चर्चा होऊन,संस्थानचे लेंडीबागेत पालखी, भजन इत्यादींसाठी परवानगी देऊ नये. तसेच शिर्डी गावातील सार्वजनिक कार्यक्रमासाठी साईनगर परिसरात आकार घेऊन मोकळे मैदान द्यावे व विजपूरवठा करणेत यावा असे ठरले.** (कार्यवाही-प्रशासनशाखा वशी-०३)

**विषय नं.६७ गर्दीचे नियोजन पालखी दर्शन व्यवस्थेबाबत.**

**निर्णय क्र.४८०** रविवार, दि.२७/०१/२००८ रोजी रात्रौ ८.०० चे दरम्यान मा.अध्यक्ष, मा.उपाध्यक्ष, स्थानिक विश्वस्त, सर्व प्रशासकीय अधिकारी यांची सभा गर्दीचे नियोजन, गर्दीत कराव्या लागणा-या साईभक्तांच्या सोयी सुविधा इ. बाबतीत आयोजित करण्यात आली होती.

त्यात वर्षभरातील गर्दीचा कालावधी उदा. दुसरा व चौथा शनिवार, रविवारला जोडुन येणा-या सार्वजनिक सुट्या, नाताळची सुट्टी - १० दिवस, दिवाळीची सुट्टी - १५ दिवस, उन्हाळ्याची सुट्टी, श्री रामनवमी, श्री गुरुपौर्णिमा, श्री पुण्यतिथी उत्सव इ.चा एक सर्वसाधारण आराखडा तयार करुन त्यानुसार साईभक्तांची दर्शन व्यवस्था, निवास व्यवस्था, भोजन व्यवस्था इ. बाबत नियोजन करणेबाबत व त्या अनुषंगाने करावयाच्या व्यवस्थेबाबतचे नियोजन करणेबाबत सुचना देण्यात आल्या.

बहुतांशी पालख्या या सायंकाळी खंडोबा मंदिरापासून मंदिराकडे मिरवणूकीने निघतात व मंदिर परिसरात सायंकाळी धूपारती ते शेजारतीचे दरम्यान पोहोचतात ती वेळ अत्यंत गर्दीची असते. पदयात्रींना दर्शनास नेहमी प्राधान्य देणेत येत असल्याने इतर भक्तांची मोठी कुचंबना होते. पालख्यांची संख्या एकापेक्षा जास्त असल्यास सर्व सामान्य भक्तांवर अन्याय झाल्यासारखे होते. **उपरोक्त कालावधीत तसेच इतर वेळीही दर्शनासाठी म्हणून ठराविक वेळ निश्चित करणे आवश्यक असून त्यानुसार दर्शनाची वेळ साधारणपणे दुपारी ३.०० ते ५.०० यावेळेतच असावी, असे नम्र मत आहे. तसेच उत्सवात येणा-या पालख्या या उत्सव सुरु होणेचे आदले दिवशी पोहचणे आवश्यक आहे, कारण उत्सव सुरु झालेवर आलेल्या पालख्यांमुळे पूर्व निर्याजित कार्यक्रमात बाधा येते. दर्शनाची वेळ उपरोक्त प्रमाणे अथवा संस्थानचे सोयीनुसार ठरवून त्या आशयाचे पत्र संबंधीत पालखीधारकांना पाठविण्यास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही-प्रशासनशाखा वशी-०३)

**विषय नं.६८ शिधा सामुग्री मिळणेबाबत बाल विकास प्रकल्प अधिकारी, एकात्मिक बाल विकास सेवा योजना, राहूरी यांचे पत्राबाबत.**

**निर्णय क्र.४८१** बाल विकास प्रकल्प अधिकारी,एकात्मिक बाल विकास सेवा योजना, राहुरी, जि.अहमदनगर यांनी , एकात्मिक बाल विकास सेवा योजना, राहुरी, अंतर्गत माहे डिसेंबर ०७ अखेर श्रेणी ३ व ४ ची अनुक्रमे ६५ मुले असून कुपोषण निर्मुलन करणेसाठी खालील किटस् चा वापर करणेचा आहे, ७ महिने ते ३ वर्षे प्रति लाभार्थी प्रति दिन ३० ग्रॅम व ३ ते ६ वर्षे प्रति लाभार्थी प्रति दिन ४० ग्रॅम असे एकूण ६० दिवसाकरीता अमायलेजयूक्त व सोयासातुयुक्त पिठ बनवून देण्यासाठी **खालील शिधा व वस्तू मदत म्हणून मिळणेस केलेली विनंती अमान्य करण्यात आली.**

| अ.नं. | तपशील | प्रमाण | दर | एकूण रक्कम |
|---|---|---|---|---|
| ०१. | गहु | १०० कि. | रु. १६/- | ०१,६००.०० |
| ०२. | मुग | २५ कि. | रु. ४८/- | ०१,२००.०० |
| ०३. | सोयाबीन | ०९ कि. | रु. २०/- | ००,१८०.०० |
| ०४. | साखर | १३२ कि. | रु. १५/- | ०१,९८०.०० |
| ०५. | तेल | ८४ कि. | रु. ७०/- | ०५,८८०.०० |
| ०६. | दुध | ६६० लि. | रु. १५/- | ०९,९००.०० |
|  | एकूण |  |  | २०,७४०.०० |
| ब | जी.आर.डी.पावडर | ११७ कि. | रु. ७४०/- | ८६,५८०.०० |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| क | पॅराशूट तेल | ३९ कि. | रु. १७५/- | ०६,८२५.०० |
| ड | वजन काटे | १० नग | रु. ६,०००/- | ६०,०००.०० |
| | | | एकूण खर्च अ+ब+क+ड | ०१,७४,१४५.०० |

(कार्यवाही-प्रशासनशाखा वशी-५)

**विषय नं.६९** **श्रीगुरुपौर्णिमा उत्सव- २००८ चे खर्चाबाबत.**

**निर्णय क्र.४८२** श्रीक्षेत्र शिर्डी येथे सालाबादप्रमाणे श्रीगुरुपौर्णिमा उत्सव यावर्षी गुरुवार दिनांक १७/०७/२००८ ते शनिवार दिनांक १९/०७/२००८ ( आषाढ शुक्ल-१४ शके १९३० ते आषाढ कृष्ण ०१ शके १९३०) असा तीन दिवस साजरा करण्यात यावा, या उत्सवासाठी प्रामुख्याने खालील गोष्टींची तयारी करावी लागेल,ज्यास मान्यता देण्यात आली व खालीलप्रमाणे इतर अनुषंगिक निर्णय घेण्यात आले.

**०१) उत्सव निमंत्रण पत्रिका :-** संस्थानचा कारभार चालविणेसाठी तयार करण्यात आलेल्या योजनेच्या तरतुदीमध्ये दुरुस्ती झाल्या प्रमाणे भक्त मंडळाचे आजीव व आश्रयदाते सभासदांना उत्सवाच्या निमंत्रण पत्रिका पाठवाव्या लागतील. यंदाचे श्री गुरुपौर्णिमा उत्सवात सभासदांची वाढती संख्या धरुन १,३५,००० निमंत्रण पत्रिका तसेच मा.अध्यक्ष, सर्व विश्वस्त व सन्माननीयांना खास पत्रिका पाकीटासह २००० पत्रिका छपाई करुन घ्याव्यात, तसेच नेहमी प्रमाणे प्रेस नोट (न्यूज ॲटम) म्हणून वर्तमानपत्रातून प्रसिध्दी देण्यात यावी.

**०२) निमंत्रीत कलाकार कार्यक्रम :-** दिनांक १७/०७/२००८ ते दिनांक १९/०७/२००८ या तीन दिवसाचे निमंत्रीत कलाकारांचे कार्यक्रम निश्चित करण्याचे अधिकार मा.अध्यक्ष यांना प्रदान करण्यात आले. तसेच पावसाची शक्यता लक्षात घेऊन कार्यक्रम समाधी मंदिराशेजारील स्टेजवर घेण्यात यावेत. दिनांक १७/०७/२००८ ते दिनांक १९/०७/२००८ या तीन दिवसाकरीता नारदीय पद्धतीने कीर्तन करणाऱ्या कीर्तनकाराचे कीर्तन कार्यक्रम ठरविण्यात यावा.

**०३) श्री साईसत्यव्रत(सत्यनारायण)पूजा व अभिषेक पूजाः-** उत्सव काळात दि.१७/०७/२००८ ते दि.१९/०७/२००८ अखेर श्री साईसत्यव्रत (सत्यनारायण)पूजा व अभिषेक पूजा चालू राहतील.

**०४) अखंड पारायण व्यवस्थाः-** उत्सव काळात दिनांक १७/०७/२००८ रोजी सकाळी श्री द्वारकामाई मंदिरात श्रीसाईचरित्राचे अखंड पारायणास सुरुवात होईल. दिनांक १८/०७/२००८ रोजी सकाळी त्याची समाप्ती होईल. मा.व्यवस्थापन समितीचे पाच सदस्य पहिले पाच अध्याय वाचतील व राहिलेले ४८ अध्याय प्रत्येकी एक असे ४८ साईभक्त वाचतील. इच्छूक भक्तांची नांवे दि.१६/०७/२००८ रोजी मंदिर कार्यालयात नोंदविली जातील व त्याच दिवशी सायंकाळी त्यांच्या - नावाच्या चिठ्या काढून (ड्रॉ पध्दतीने) पारायणाकरीता नांवे निश्चित केली जातील. पारायणात भाग घेणा-या प्रत्येक भक्तास प्रसाद म्हणून एक श्रीफळ देण्यात यावे.

मा.सदस्यांच्या या सर्व कार्यक्रमातील सहभागाबाबत उचित निर्णय घेण्याचे अधिकार मा.अध्यक्ष यांना देण्यात आले.

**०५) पालखी व रथ मिरवणूकः-**उत्सवाचे पहिले दिवशी गुरुवार दिनांक १७/०७/२००८ रोजी गुरुवारची चावडी व श्रींचे पालखीची गांवातून मिरवणूक होईल, शुक्रवार दिनांक १८/०७/२००८ रोजी रात्रौ ०९.१५ वाजता रथाची गांवातून मिरवणूक होईल.

**०६) विद्युत रोषणाईः-** समाधी मंदिर, श्रीद्वारकामाई, श्रीचावडी, श्रीगुरुस्थान व मंदिर परिसरात सोईप्रमाणे विद्युत रोषणाई करण्यात यावी. श्रीगुरुपौर्णिमा उत्सवात श्रीसाईराज डेकोरेटर्स,मुंबई विनामुल्य रोषणाई करीत असतात त्यांना ट्रक भाडे व येण्या-जाण्याचा खर्च त्यांना द्यावा देण्यात यावा. तसे विद्युत विभागामार्फत त्यांना पत्र देण्यात यावे. ते न आल्यास संस्थानमार्फत विद्युत रोषणाई करण्यात यावी. तसेच महावितरण संस्थेला विजपुरवठा विनाखंडीत रहाणेबाबत विनंतीवजा पत्र पाठविण्यात यावे.

**०७) संरक्षण व्यवस्थाः-** उत्सव काळात मंदिर परिसरात बंदोबस्त ठेवणेकामी संरक्षण विभागात ठेकेदारी पध्दतीने जादा गार्ड नेमण्यात यावेत. तसेच शांतता व सुव्यवस्था राखणेसाठी पुरेसा बंदोबस्त ठेवणेकामी मा.पोलीस अधिक्षक, अहमदनगर यांना विनंतीवजा पत्र संरक्षण विभागांमार्फत पाठविण्यात यावे.

**०८) प्रसाद-भोजन व्यवस्थाः-** उत्सव काळात प्रसादालयात मिष्टांन्नासह रु.५.०० या दराने भक्तांना प्रसाद भोजन दिले जावे. मा.व्यवस्थापन समितीतील सदस्यांचे कुटुंबीय व नातेवाईक तसेच इतर सन्माननीय व्यक्तींना स्वतंत्र प्रसाद भोजनाची व्यवस्था करण्यात यावी. पोलीस कर्मचारी व उत्सवात काम करणेकरीता मदतीस येणाऱ्या व्यक्तींची प्रसाद भोजन व्यवस्था स्वतंत्र मंडप टाकून करण्यात यावी. साईभक्तांचे सोईसाठी अन्नपाकिटे, चहा, कॉफी , दुध व बिस्कीटे इ.कॅंटीनमध्ये २४ तास सुविधा उपलब्ध आहे. लाडू प्रसाद तसेच तीनही दिवस मिष्टान्न प्रसाद नेहमीचे दराने देण्यात यावे. उत्सव काळात लाडू प्रसाद विक्री दोन ते तीन ठिकाणी चालू करण्यात यावी. तसेच श्रीरामनवमी उत्सवात

पालखीधारकांना आलेल्या दिवशी एकवेळचे जेवण दिले होते त्यानुसार श्रीगुरुपौर्णिमा उत्सवात येणाऱ्या पालखीधारकांना एकवेळचे जेवण देण्यात यावे.

**०९) लिलावः-** श्रींना अर्पण केलेली पवित्र वस्त्रे व इतर वस्तूंची प्रसाद रुपाने जाहीर लिलावाने विक्री तीनही दिवस करण्यात यावी.

**१०) जादा कंत्राटी कर्मचारी:-** उत्सवाचे पूर्व तयारी करणेकामी व उत्सव पार पडणेकरीता लागणारा जादा कर्मचारी वर्ग आवश्यकतेनुसार ज्या त्या खात्यात नेमण्यात यावा. विविध खात्याकडून आलेल्या मागणीची छाननी करुन योग्य ते आदेश कामगार विभागामार्फत पारीत करण्यात यावेत.

**११) मंडप व कमानीः-** उत्सवात आवश्यकतेनुसार मंडप व स्टेज टाकण्यात यावेत.

**१२) सर्व साधारण व्यवस्थाः-** नेहमीप्रमाणे भक्तांची स्वागत व्यवस्था, मदत केंद्र, प्रथमोपचार केंद्र, निवास व्यवस्था, आरोग्य व्यवस्था, इ.व्यवस्था ठेवण्यात यावी. स्वयंसेवी म्हणून काम करु इच्छिणाऱ्या कर्मचारी व इतर व्यक्तींना नेहमीप्रमाणे संधी देण्यात यावी. देणगी स्वीकारणेकामी जादा काऊंटर्स उघडण्याची व्यवस्था करण्यात यावी. निमंत्रीत कलाकारांची निवास, भोजन, मानधन व्यवस्था करण्यात यावी. कलाकारांसाठी वास्तव्य व्यवस्था गरजेनुसार संस्थानचे निवासात करण्यात यावी.

**१३) पालखी व्यवस्थाः-** श्रीगुरुपौर्णिमा उत्सवात पुणे येथील व इतर ठिकाणांहून पालख्या येत असतात. उत्सवात येणाऱ्या पालख्या ठेवण्याची व्यवस्था स्वतंत्र मंडप टाकून जुन्या मराठी शाळेच्या परिसरात करण्यात यावी व पालखी सोबत येणाऱ्या भक्तांची व्यवस्था मंगल कार्यालय, साईउद्यान इमारतीत करण्यात येते. यावर्षीही ती व्यवस्था मा.व्यवस्थापन समितीचे निर्देशानुसार करण्यात येईल. पालख्यांचे स्वागताकरीता मा.विश्वस्तांची एक कमिटी असावी व या कमिटीने पालख्यांचे स्वागत करावे.

त्याचप्रमाणे यावर्षीचा उन्हाळा गंभीर स्वरुपाचा असल्याने पायी येणा-या भक्तांची पिण्याचे पाण्याची व्यवस्था करावी लागेल. आवश्यकतेनुसार शिंगवे, गुहापाट, पिंप्री निर्मळ येथे संस्थानतर्फे टँकरने पाणी पुरविण्यात यावे.

**१४) भक्तांची निवास व्यवस्थाः-** संस्थानचे साईप्रसाद नं.१ व नं.२, साईउद्यान, धर्मशाळा नं.२, भक्तनिवासस्थान या इमारतीमधून करण्यात यावी.

**१५) पाणीपुरवठाः-** पाटबंधारे खात्यास उत्सवकाळात कॅनॉल चालू ठेवणेबाबतचे विनंतीवजा पत्र पाणीपुरवठा विभागांमार्फत नेहमीप्रमाणे पाठविण्यात यावे. नियमीत पाणीपुरवठा राहिल, याची व्यवस्था करण्यात यावी.

**१६) कार्यक्रमाची सांगताः-** गोपाळ काल्याचे कीर्तनाने उत्सवाची सांगता होईल. काल्याचे कीर्तन निमंत्रीत कीर्तनकार करतील.

**१७) खर्चाचे अंदाज पत्रकः-** श्रीगुरुपौर्णिमा सन २००८ करीता **अंदाजपत्रकीय रक्कम रु.३०,२५,०००.०० (अक्षरी रु. तीस लाख पंचवीस हजार मात्र) चे खर्चास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- प्रशासन शाखा,वशी-०५)

**विषय नं.७०** **अध्यक्ष,सप्ताह उत्सव समिती श्री संत ज्ञानेश्वर महाराज मंदिर व श्री साईबाबा वारकरी शिक्षण संस्था, निमगांव यांना देण्यात आलेल्या शिध्यास कार्योत्तर मंजूरी देणेबाबत.**

**निर्णय क्र.४८३** खाली दर्शविलेल्या संस्थेने मा. कार्यकारी अधिकारीसाहेब, श्री साईबाबा संस्थान विश्वस्त व्यवस्था, शिर्डी यांना श्री साईबाबा संस्थानमार्फत शिधा मदत मिळणेबाबत अर्ज केलेला आहे. त्याचा तपशील खालीलप्रमाणे -

| अ.नं | नांव व पत्ता | तपशील | मदतीचे स्वरुप |
|---|---|---|---|
| ०१. | अध्यक्ष, सप्ताह उत्सव समिती, श्री संत ज्ञानेश्वर महाराज मंदिर व श्री साईबाबा वारकरी शिक्षण संस्था, निमगांव ( शिर्डी) , ता.राहाता , जि.अहमदनगर (अर्ज आवक दि.०८/०५/२००८) | सालाबादप्रमाणे दि.०४/०५ ते दि.११/०५/०८ अखेर होणा-या अखंड हरिनाम सप्ताहाचे महा - प्रसादासाठी शिधा स्वरुपात मदत. | शिधास्वरुपात मदत मिळणेबाबत अर्ज. |

**सदरच्या पत्रावर मा.अध्यक्ष यांचा श्री मोरे/साबळे, नेहमीप्रमाणे स्थानिक कार्यक्रम असल्याने शिधा द्यावा, असा शेरा असून अध्यक्ष, सप्ताह उत्सव समिती, श्री संत ज्ञानेश्वर महाराज मंदिर व श्री साईबाबा वारकरी शिक्षण संस्था, निमगांव ( शिर्डी) , ता.राहाता , जि.अहमदनगर यांना मा.अध्यक्ष यांचे सुचनेनुसार व संस्थान नियमावलीतील अ.नं.९ मधील तरतुदीनुसार रु.११,०००/- पर्यंतचा शिधा देणेत आलेला असून त्यास कार्योत्तर मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही-प्रशासनशाखा वशी-०५)

**विषय नं.७१** **संस्थान सेवेत कायम करुन वेतनश्रेणी देणेबाबत.**

**निर्णय क्र.४८४** सदरहू विषयाबाबत आस्थापना उपसमिती सभेत निर्णय घेण्यात यावा असे ठरले.

(कार्यवाही-अधिक्षक,आस्थापना विभाग)

**विषय नं.७२ श्रीसाईबाबा हॉस्पिटलकडील बायोकेमिस्ट,ई.सी.जी.टेक्निशियन, परिचारीका(बी.एस्ससी), एम.आर.आय. टेक्निशियन यांचे वेतनश्रेणीबाबत**

**निर्णय क्र.४८५** सदरहू विषयाबाबत आस्थापना उपसमिती सभेत निर्णय घेण्यात यावा असे ठरले.

(कार्यवाही-अधिक्षक,आस्थापना विभाग)

**विषय नं.७३ श्रीसाईनाथ हॉस्पिटलकडील विविध पदावरील कर्मचाऱ्यांना वेतनश्रेणी देणेबाबत**

**निर्णय क्र.४८६** सदरहू विषयाबाबत आस्थापना उपसमिती सभेत निर्णय घेण्यात यावा असे ठरले.

(कार्यवाही-अधिक्षक,आस्थापना विभाग)

**विषय नं.७४ प्रयोगशाळा तंत्रज्ञ पदनाम व वेतनश्रेणीबाबत.**

**निर्णय क्र.४८७** सदरहू विषयाबाबत आस्थापना उपसमिती सभेत निर्णय घेण्यात यावा असे ठरले.

(कार्यवाही-अधिक्षक,आस्थापना विभाग)

**विषय नं.७५ डॉ.संजय पटवर्धन यांची श्री साईनाथ रुग्णालयाकडे वैद्यकीय अधिकारी या पदावर बदली करणे बाबत**

**निर्णय क्र.४८८** सदरहू विषयाबाबत आस्थापना उपसमिती सभेत निर्णय घेण्यात यावा असे ठरले.

(कार्यवाही-अधिक्षक,आस्थापना विभाग)

**विषय नं.७६ सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांना सेवेत घेणे बाबत.**

**निर्णय क्र.४८९** सदरहू विषयाबाबत आस्थापना उपसमिती सभेत निर्णय घेण्यात यावा असे ठरले.

(कार्यवाही-अधिक्षक,आस्थापना विभाग)

**विषय नं.७७ श्री.निवृत्ती माधव कांगोणे, मानधन व मुदतवाढीबाबत.**

**निर्णय क्र.४९०** श्री निवृत्त माधव कांगोणे यांची जा.नं.एसएसएस-वशी०१-४६८-२००७ दिनांक ०९.१.२००७ अन्वये मदतनीस या पदावर प्रथम सहा महिन्यासाठी प्रति महा रुपये ३०००/- एकत्रित मानधनावर नेमणूक करण्यात आलेली असून ते दिनांक ११.०१.२००७ रोजी कामावर हजर झालेले आहेत.

उपरोक्त सहा महिन्याचा कालावधी संपुष्टात आल्यानंतर मा.व्यवस्थापन समितीच्या सभेतील निर्णयानुसार जा.नं.एसएसएस-वशी०१-२३२८-२००७ दिनांक ३०.०८.२००७ अन्वये दिनांक ११.०७.२००७ पासून पुढे सहा महिन्यांसाठी वाढविण्यात आलेला कालावधी दिनांक १०.०१.२००८ अखेर संपुष्टात येत आहे.

श्री निवृत्ती माधव कांगोणे यांनी दिनांक १३.१२.२००७ रोजी अर्ज करुन त्यात "मी गेल्या एक वर्षापासून प्रकाशने विभागात मदतनीस म्हणून कार्यरत आहे मला दरमहा रुपये ३,०००/- मानधन दिले जाते. सदरहू मानधन हे सध्याचे महागाई लक्षात घेता अत्यंत अल्पसे आहे. त्यामूळे आपणास विनंती की माझे मानधनात वाढ करावी "अशी विनंती केली असून त्यास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

**यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री.निवृत्ती माधव कांगोणे,मदतनीस (प्रत्यक्ष काम मा.अध्यक्ष महोदय यांचे स्विय सहाय्यक ) यांची दिनांक १०.०१.२००८ पासून पूढे एक वर्ष कालावधीसाठी मुदतवाढ देऊन रुपये ४०००/-एकत्रित मानधन देण्यात यावे असे ठरले.**

(कार्यवाही-अधिक्षक,आस्थापना विभाग)

**विषय नं.७८ श्री साईलीला संपादकीय कार्यालय स्थलांतराबाबत.**

**निर्णय क्र.४९१** श्री साईबाबा संस्थान विश्वस्त व्यवस्था, शिरडी चे मार्फत श्री साईलीला द्वैमासिक अंक प्रसिध्द केला जात असून सदरचा अंक मुंबई कार्यालयातील श्री साईलीला संपादकीय कार्यालयामार्फत पाठविला जातो. मा.व्यवस्थापन समितीचे दि.२७/१२/२००४ रोजीच्या सभेमध्ये निर्णय क्र.१९० श्री साईलीला द्वैमासिक शिरडी येथील कार्यालयातून प्रकाशीत करावे असा पारित झाला आहे. त्यानुसार मुंबई येथील श्री साईलीला संपादकीय कार्यालय व सदर कार्यालयातील संबंधीत कर्मचारी शिरडी येथे स्थलांतरित करणेबाबत संबंधीतांना कळविण्यात आलेले आहे.

तथापी सदर अंक शिरडी येथून प्रकाशीत करणेकामी श्रीरामपूर पोष्ट ऑफिसची परवानगी घेणेकामी कागदपत्रांची पूर्तता करणे, तसेच श्री साईलीला संपादकिय कार्यालयात काम करणारे कर्मचारी यांच्या वैयक्तीक /घरगुती तसेच नैसर्गिक अडचणीमुळे सदर कार्यालय शिरडी येथे स्थलांतरित करता येत नसलेबाबत त्यांनी कळविले आहे.

आता जा.नं.एसएसएस/वशी-०१/४१६/२००८ दि. १२/०२/२००८ अन्वये पुन्हा संबंधीतांना निश्चित शिरडी येथे कधी हजर होणार याबाबत विचारणा करण्यात आलेली आहे.

त्यानुसार संबंधीत कर्मचा-यांनी त्यांचे दि.२१/०२/२००८ चे पत्रान्वये "रजिस्ट्रार ऑफ न्यूजपेपर्स फॉर इंडिया, दिल्ली यांयाकडून रुपांतरित रजिस्ट्रेशन सर्टिफिकेट मिळावयाचे अद्याप बाकी आहे. मा.कार्यकारी अधिकारी साहेब बदलल्याने त्यानुसार डिक्लरेशन ॲडिशनल चीफ मेट्रोपॉलीटियन मॅजिस्टेट यांच्यासमोर करणे क्रमप्राप्त असून बदललेले डिक्लरेशन रजिस्ट्रार ऑफ न्युजपेपर्स फॉर

इंडिया, दिल्ली यांच्याकडे पाठवून त्यानुसार त्यांच्याकडून रुपांतरित रजिस्ट्रेशन सर्टिफिकेट प्राप्त करावे लागणार आहे. त्यासाठी काही कालावधी लागणार असून दरम्यानच्या काळात उल्लेखीत रजिस्ट्रेशन सर्टिफिकेटच्या प्राप्तीसाठी पाठपुरावा करणे व श्री साईलीला सह त्याव्यतिरिक्त सुवर्णांकित श्री साईचरित्र प्रकाशन आदि चालू असलेली कामे मुंबई कार्यालयातून करणे संयुक्तिक होईल.
श्री साईलीला द्वैमासिक कामकाजमुंबई येथून शिरडी येथे स्थलांतराने विधायक असे काहीच साध्य होणार नसून उलट सदर कामकाजाला ते बाधक ठरणार आहे. हे श्री साईलीलाच्या कामकाजाच्या आजवरच्या अनुभवावरुन येथे नम्रपणे नमूद करावेसे वाटते. याचबरोबर स्थिर स्थावर असलेल्या सदर कार्यालयातील कर्मचा-यांना यामुळे मानसिक व शारिरीक त्रास आणि आमचे अर्थिक नुकसान होईल ते वेगळेच" असे कळविले आहे.

श्री साईलीला अंक शिरडी येथून प्रसारित करणेकामी छपाईतील अडचणी, संपुर्ण भारतभर व भारताबाहेर अंक पाठविणेसाठी शिरडी पोष्ट ऑफिसला येत असलेल्या अडचणी तसेच श्री साईलीला कार्यालयामध्ये काम करत असलेल्या कर्मचा-यांना शिरडी येथे स्थलांतरित होणेकामीच्या अडचणी, या बाबींचा विचार केल्यास सदर कार्यालय शिरडी येथे स्थलांतरित करणे योग्य नाही असे वाटते तरी सदर कार्यालय मुंबई येथून शिरडी येथे स्थलांतरित न करता मुंबई येथेच ठेवून सध्याप्रमाणेच साईलीला द्वैमासिक अंक छपाई, प्रकाशन व वितरण मुंबई येथूनच करणेस मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

**यावर सविस्तर चर्चा होऊन, वर्तमानपत्रात जाहिरात देऊन कार्यकारी संपादक, साईलीला या पदासाठी अर्ज मागविण्यात यावेत. तसेच पूर्वी ठरलेप्रमाणे श्री साईलीला संपादकीय कार्यालय शिर्डी येथे स्थलांतरीत करण्यात यावे असे ठरले.**

(कार्यवाही-अधिक्षक,आस्थापना विभाग/प्रकाशने विभागप्रमुख)

**विषय नं.७९** **श्रीरामपुर कक्ष व कक्षाकडील कर्मचारी यांच्या मुदतवाढीबाबत.**

**निर्णय क्र.४९२** मा.उपविभागीय अधिकारी, श्रीरामपूर यांनी त्यांचे दि.०७/०४/२००८ रोजीचे पत्रान्वये श्रीरामपूर कक्षात सद्या भूमीसंपादन प्रस्तावाव्यतिरिक्त २५ रस्त्यांची कामे महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ, पुणे यांचे मार्फत करावयाची असल्यामुळे रस्त्याचे भूसंपादन विषयक कामासाठी उपरोक्त कक्षास व त्यातील कर्मचारी यांना एक वर्षे मुदतवाढ देणेबाबत विनंती केली आहे.

तसेच भु-संपादन कक्ष श्रीरामपुर भाग श्रीरामपुर विभागाकडील कर्मचारी सर्वश्री भास्कर वाव्हळ,रामचंद्र नागरे,शिवाजी का.जाधव,काशिनाथ सदाफळ,प्रशांत कुलकर्णी इत्यादी कंत्राटी कर्मचा-यांनी त्यांना देण्यात येत असलेले मानधनात वाढ करुन मिळणेबाबत विनंती अर्ज सादर केलेले आहे.

**श्रीरामपूर कक्षाकडील माहिती खालीलप्रमाणे :-**

संस्थानकरीता भू-संपादन करणेकामी दि.१५-१६-१७ जुलै २००० रोजी झालेल्या मा.व्यवस्थापन मंडळाचे सभेतील निर्णय क्र.२३८ नुसार मा.उपविभागीय अधिकारी महसूल श्रीरामपूर यांचे पर्यवेक्षणाखाली दि.०२/०८/२००० पासून एक कक्ष सुरु करण्यात आलेला आहे.या कक्षाकडे कंत्राटी पध्दतीने खालील कर्मचारी देण्यात आलेले आहेत.

| अ.नं. | कर्मचाऱ्यांचे पद | हुद्दा | संख्या | मासिक एकत्रीत वेतन / मानधन रुपये |
|---|---|---|---|---|
| ०१. | नायब तहसिलदार संवर्गातील | कंन्सलटंट | ०१. | रु. ७,०००/- |
| ०२. | अव्वल कारकुन संवर्गातील | अव्वल कारकुन | ०१ | रु. ४,५००/- |
| ०३ | लिपीकाचे कामासाठी | कंत्राटी कुशल कामगार | ०२ | रु. ४,०००/- |
| ०४. | कार्यालयीन कामकाजासाठी शिपाई | कंत्राटी अकुशल कामगार | ०१. | किमान वेतनानुसार हजेरी |
| | | **एकूण** | **०५.** | |

सदरहू कक्षाकडे भू-संपादनासाठी एकूण सहा प्रकरणे कार्यवाहीसाठी देण्यात आलेली आहेत. या कक्षाला वेळोवेळी मुदतवाढ देण्यात आलेली असून दि.३१/०८/२००५ अखेर कक्षाची मुदत संपल्यानंतर हा कक्ष बंद होता.तदनंतर मा.व्यवस्थापन समितीचे निर्णयानुसार सदरच्या कक्षाची मुदत व तसेच सदर कक्षाकडे नेमणूक करण्यात आलेल्या व सध्या कामास असलेल्या कर्मचाऱ्यांची मुदत त्यांना यापुर्वी देण्यात आलेल्या नेमणूक आदेशातील अटी-शर्तीस अनुसरुन दि.०१/०५/२००६ पासून पुढे सहा महिन्यांसाठी वाढविण्यात आलेली मुदत संपलेवर,मा.उपविभागीय अधिकारी यांनी,क्रमांक कावि/भूसं-२/२८४१/२००६ दि.२७/१२/२००६ अन्वये,संस्थानची एकूण नऊ भू-संपादन विषयक प्रकरणे चालू असून सदर प्रकरणांचे निर्गतीसाठी एक वर्षाचा कालावधी लागेल असे कळविलेले होते त्यास अनुसरुन कक्षाला दि.३१/१०/२००७ अखेर मुदतवाढ देण्यात आली. सदरची मुदतवाढ संपुष्टात आल्यानंतर पुन्हा मा. व्यवस्थापन समितीचे सभेतील निर्णय क्र.८३८ नुसार सदर कक्षास व कक्षामध्ये काम करत असलेले कर्मचारी (कन्सलटंट-०१,अव्वल कारकुन ०१,कंत्राटी कुशल कामगार/लिपीक कामासाठी २+२ (तात्पुरते अतिरिक्त)= ४ व कंत्राटी अकुशल कामगार-१) यांची मुदत दि.०१/११/२००७ पासून पुढे सहा महिन्यांसाठी (३०/०४/२००८अखेर) वाढविण्यात आलेली आहे.

सदरची मुदत ३०/०४/२००८ अखेर संपुष्टात येत आहे.सदर कर्मचारी यांनी खालील प्रमाणे वेतनात एकत्रीत वाढ करुन मिळणेबाबत विनंती केली असून त्यास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

| अ.नं. | नांव | पदनांम | मासिक मंजूर वेतन | वाढीव मागणी |
|---|---|---|---|---|
| ०१. | श्री बी.आर.वाव्हळ | कन्सलटंट | रु.७,०००/- | रु.९,५००/- |
| ०२. | श्री आर.बी.नागरे | अव्वल कारकुन | रु.४,५००/- | रु.७,५००/- |
| ०३. | कुशल (लिपीक वर्गीय) २+२ = ४ | | रु.४,०००/-प्रत्येकी | रु.५,५००/- प्रत्येकी |

**यावर सविस्तर चर्चा होऊन, श्रीरामपुर कक्ष व कक्षाकडील कर्मचारी यांना दिनांक ३०.०४.२००८ पासून पूढे एक वर्षाकरीता पूर्वीचे अटी शर्ती व मानधनावर मुदतवाढ देण्यात यावी असे ठरले.** (कार्यवाही-अधिक्षक,आस्थापना विभाग)

**विषय नं.८० श्री साईबाबा हॉस्पिटलकडील वैद्यकिय अधिकारी यांचे नेमणूकीस मान्यता देणेबाबत.**

**निर्णय क्र.४९३** श्रीसाईबाबा संस्थानचे हॉस्पीटलकडे वैद्यकिय अधिकारी या पदावर नोकरी मिळणे बाबत डॉ. अनुप खर्डे, डॉ. मनोज रायते, डॉ. दत्तात्रय अंदुरे, डॉ. संजीव वर्मा, डॉ. समीर धारराव डॉ. दिपाली गांधाळे यांनी अर्ज केलेले आहेत. संबंधीत वैद्यकिय अधिकारी यांच्या वैद्यकिय संचालक श्री साईबाबा हॉस्पीटल, शिरडी यांनी समक्ष मुलाखती घेतलेल्या असून त्यांना संस्थान चे हॉस्पीटलकडे नेमणूका देणेबाबत अभिप्राय दिलेले आहेत.

सदर उमेदवाराच्या मुलाखती घेतल्या असून त्यांना ०१ वर्षासाठी बॉड करुन घेऊन २१/०४/२००८ पासून कामावर घेण्यास हरकत नाही असे अभिप्राय मा. विश्वस्त डॉ. गोंदकर यांनी दिले आहेत.

**त्यानुसार संबंधीतचे बाबत मा. विश्वस्त डॉ. गोंदकर यांचे आभिप्राय मा. व्यवस्थापन समितीचे दि. १६/०३/२००८ रोजीच्या झालेल्या सभेतील निर्णयाचे अधिन राहून खालील दर्शविलेल्या आर.एम.ओ. व वैद्यकिय अधिकारी स्त्रीरोग व प्रसूती तज्ञ यांच्या हॉस्पीटलकडे रिक्त जागी आवश्यकतेनुसार तात्पुरत्या नेमणूका करण्यात आलेल्या असून त्यास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली.**

| **अ.नं.** | **वैद्यकीय अधिकारी नांव** | **शैक्षणिक पात्रता** | **नेमणूक आदेश नंबर व हॉस्पीटलचे नांव** | **दिलेले पदनांम व एकत्रीत मानधन /वेतन** |
|---|---|---|---|---|
| **०१.** | डॉ. खर्डे अनुप लहानूभाऊ संगमनेर | एम.बी.बी.एस. | जा.नं.एसएसएस/वशी-०१/६०२७ /२०० दि. २१/०४/२००८ श्री साईबाबा हॉस्पीटल शिरडी | वैद्यकिय अधिकारी (आर.एम.ओ ) एकत्रित वेतन **प्रतिमहा रु. १७०००/-** |
| **०२.** | डॉ. रायते मनोज अशोक निफाड | एम.बी.बी.एस. | जा.नं.एसएसएस/वशी-०१/६०२८/२०० दि. २१/०४/२००८ श्री साईबाबा हॉस्पीटल शिरडी. | वैद्यकिय अधिकारी (आर.एम.ओ )एकत्रित **वेतन प्रतिमहा रु. १७०००/-** |
| **०३.** | डॉ. अदुरे दत्तात्रय चंद्रकान्त जामखेड | एम.बी.बी.एस. | जा.नं.एसएसएस/वशी-०१/६०२९/२०० दि. २१/०४/२००८ श्री साईबाबा हॉस्पीटल शिरडी. | वैद्यकिय अधिकारी (आर.एम.ओ )एकत्रित **वेतन प्रतिमहा रु. १७०००/-** |
| **०४.** | डॉ. संजीव हरिलाल वर्मा पुणे | एम.बी.बी.एस. | जा.नं.एसएसएस/वशी-०१/६०३०/२०० दि. २१/०४/२००८ श्री साईबाबा हॉस्पीटल शिरडी. | वैद्यकिय अधिकारी (आर.एम.ओ )एकत्रित **वेतन प्रतिमहा रु. १७०००/-** |
| **०५** | डॉ. दिपाली दत्तात्रय गांधाळे, अहमदनगर | एम.बी.बी.एस एमएस | जा.नं.एसएसएस/वशी-०१/७४३१/२०० दि. २१/०५/२००८ श्री साईनाथ हॉस्पीटल शिरडी. | वैद्यकिय अधिकारी (स्त्रीरोग व पसूती तज्ञ ) एकत्रित **वेतन प्रतिमहा रु. २१०००/-** |
| **०६.** | डॉ. समीर बाळासाहेब धारराव, नाशिक | एम.बी.बी.एस. | जा.नं.एसएसएस/वशी-०१/७४३२/२०० दि. २१/०५/२००८ श्री साईबाबा हॉस्पीटल शिरडी. | वैद्यकिय अधिकारी (आर.एम.ओ )एकत्रित **वेतन प्रतिमहा रु. १७०००/-** |

(कार्यवाही-अधिक्षक,आस्थापना विभाग)

**विषय नं.८१ श्रीसाईबाबा हॉस्पिटलकडील मेडीकल व पॅरा मेडीकल कर्मचारी मुदतवाढीबाबत.**

**निर्णय क्र.४९४** संस्थानचे श्रीसाईबाबा हॉस्पीटलकरीता तसेच श्री साईनाथ रुग्णालयाकरीता आवश्यक असलेल्या वैद्यकीय अधिकारी/कर्मचारी यांच्या मा.व्यवस्थापन समितीचे सभेतील निर्णयानुसार एक वर्षाचे कालावधीसाठी नेमणूका करण्यात आलेल्या आहेत.त्यांचा सदरचा नेमणूकीचा कालावधी त्यांचे नांवासमोर दर्शविलेल्या तारखेस संपुष्टात येत आहे.

त्यानुसार वैद्यकीय संचालक तसेच वैद्यकीय अधिक्षिका यांचेकडे उपरोक्त वैद्यकीय अधिकारी यांचे सदर कालावधीमध्ये काम व वर्तणूका कशा आहेत तसेच ते हुकूमाप्रमाणे व योग्य रितीने कामे

करतात किंवा कसे ? त्यांची पुढील मुदतवाढ करावी अगर कसे ? करावयाची असल्यास किती महिने /वर्षे करावी याबाबत अहवाल प्रशासकीय अधिकारी (रुग्णालये) यांचेमार्फत मागविण्यात आला होता त्यानुसार वैद्यकीय संचालक/वैद्यकीय अधिक्षिका यांनी त्यांचेबाबत दिलेले अभिप्राय त्यांचे नावांसमोर दर्शविले आहेत. सदरचा तपशील पुढील प्रमाणे

| अ. नं. | नांव व पदनांम | नेमणूक तारीख | ०१ वर्ष कालावधी संपुष्टात येत असल्याची तारीख | वैद्यकीय संचालक /वैद्यकीय अधिक्षिका यांचे अभिप्राय |
|---|---|---|---|---|
| ०१) | डॉ.किरण चंद्रकांत खांदे मॅक्सिलोफेसियल सर्जन | ०६/०४/२००७ | ०५/०४/२००८ अखेर ०१ वर्ष | यांचे काम समाधानकारक असून वर्तणूक चांगली आहे.ते हुकुमाप्रमाणे व योग्यरितीनें कामे करतात.त्यांचे विषयी काहीही प्रकरण चालू नाही.त्यांना पुढील मुदतवाढ देण्यास हरकत नाही. |
| ०२) | डॉ. शांता चंद्रकात हंडाळ वैद्यकीय अधिकारी (आर.एम.ओ.) | ०५/०६/२००७ | ०४/०६/२००८ अखेर ०१ वर्ष | यांचे काम समाधानकारक असून वर्तणूक चांगली आहे.त्या हुकुमाप्रमाणे व योग्यरितीनें कामे करतात.त्यांचे विषयी काहीही प्रकरण चालू नाही.त्यांना पुढील मुदतवाढ देण्यास हरकत नाही. |
| ०३) | डॉ. रोहीनी पोपटराव दानवे वैद्यकीय अधिकारी आर.एम.ओ. | ०६/०४/२००७ | ०५/०४/२००८ अखेर ०१ वर्ष | डॉ.दानवे ह्या दि.२३/०८/०७ ते दि.२४/०२/०८ अखेर १८९ दिवस आजारी रजेवर होत्या दि.२५/०२/०८ पासून अद्यापपावेतो कामावर गैरहजर आहेत.त्यांची खाजगी प्रॅक्टीस संगमनेर येथे सुरु असल्याचे कळते. |
| ०४) | डॉ. रमा मारोतराव घोनमोडे वैद्यकीय अधिकारी आर.एम.ओ. | ०२/०६/२००७ | ०१/०६/२००८ अखेर ०१ वर्ष | यांचे काम समाधानकारक असून वर्तणूक चांगली आहे.त्या हुकुमाप्रमाणे व योग्यरितीनें कामे करतात.त्यांचे विषयी काहीही प्रकरण चालू नाही.त्यांना पुढील मुदतवाढ देण्यास हरकत नाही. |

**तरी वैद्यकीय संचालक,श्री साईबाबा हॉस्पीटल व वैद्यकीय अधिक्षिका,श्री साईनाथ रुग्णालय यांचे उपरोक्त अ.नं.०१,०२ व ०४ यांचेबाबतचे अभिप्राय विचारात घेवून,मा.सचिव विधी व न्याय विभाग महाराष्ट्र शासन यांचेकडील आकृतीबंधातील मान्यतेनुसार व त्यांना देण्यात आलेल्या नेमणूक आदेशातील अटी-शर्ती कायम ठेवून त्यांचे नावांसमोर दर्शविलेल्या तारखेपासून पुढे एक वर्षे मुदत वाढविणेबाबत विचार करता येईल.**

**अ.नं.०३ वरिल डॉ.दानवे ह्या दि.२५/०२/२००८ पासून गैरहजर आहेत शिवाय त्यांची संगमनेर येथे खाजगी प्रॅक्टीस चालू असल्याबाबत वैद्यकीय अधिक्षिका यांनी कळविलेले आहे.त्यामुळे त्या संस्थान रुग्णालयात सेवा करण्यास इच्छुक नाहीत असे वाटते तरी त्यांना तसे पत्र देवून त्यांचे नांव रुग्णालयाचे आस्थापनेवरुन कमी करणेस मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही-अधिक्षक,आस्थापना विभाग)

**विषय नं.८२** **निमगाव कोऱ्हाळे येथील गट नं.१६९ मध्ये बांधण्यात आलेले निवासस्थान कर्मचाऱ्यांना तात्पुरत्या स्वरुपात देणेबाबत.**

**निर्णय क्र.४९५** श्री साईबाबा संस्थान विश्वस्त व्यवस्था शिरडीकडे कायम सेवेत असलेल्या कर्मचा-यांना संस्थान मार्फत तात्पुरत्या स्वरुपात लायसेन्सी तत्वावर निवासस्थाने देण्यात आलेली असून सदर निवासस्थाने देतांना खालीलप्रमाणे मार्गदर्शक तत्वे ठरविण्यात आलेली आहेत.

०१) उपलब्ध होणारी निवासस्थाने कर्मचा-यांच्या पदनिहाय सेवाजेष्ठतेनुसार देण्यात यावीत.

०२) निवासस्थाने वाटप करतांना शिरडी गावांत अथवा शिरडी पासून १५ किलोमिटर अतंरात ज्यांची स्वतःची अथवा कुटूंबाची जागा आहे. व भाडोत्री जागेत रहात नसतील अशा संबंधीतांना निवासस्थाने देण्यात येणार नाहीत.

०३) ज्या कर्मचा-याचे निवासासाठी संस्थानचे निवासस्थान दिलेले आहेत. त्या संबंधीताने स्वतःचे घर बांधल्यास संस्थानचे निवासस्थान खाली करुन देणे त्यांचेवर बंधनकारक राहील तसे लेखी अंडरटेकींग त्यास प्रथम द्यावे लागेल.

त्यानुसार यापूर्वी संस्थानकडे उपलब्ध असलेली निवासस्थाने तत्कालीन मा.व्यवस्थापन मंडळाचे सभेतीत ठरविण्यात आलेल्या मार्गदर्शक तत्वानुसार देण्यात आलेली आहेत.

| इमारत | वर्गवारी | सेवा आकार प्रतिमाह |
|---|---|---|
| (०१) साईसहवास-१/२/३/४ | प्रशासकिय अधिकारी /वैद्यकिय अधिकारी | रु. १५०/- |
| (०२) साईस्मरण -१/२/३ | प्रशासकिय अधिकारी /वैद्यकिय अधिकारी व इतर | रु. १५० /- |

| | | |
|---|---|---|
| (०४) साईचिंतन -बी- १/२ | खाते प्रमुख ( अधिक्षक /विभाग प्रमुख ) | रु. १५० /- |
| (०५) साईचिंतन -बी-३/४ | रुग्णालयाकडील व इतर तांत्रिक कर्मचारी व खोल्याचे उपलब्धतेनुसार वर्ग-०३ कर्मचारी | रु. १५० /- |
| (०६) साईध्यान नं. ०१/०२ | वर्ग-०३ कर्मचारी (विभागप्रमुख-११५वरिष्ठ-लिपीक-७५लिपीक-टंकलेखक-६०) | |
| (०७) साईनाथ छाया | अधिकारी वर्ग | रु. १५० /- |
| (०८) साईनगर /समर्पण | वर्ग-०३ /४ कर्मचारी | रु. १२/- |
| (०९) सेवाधाम | वर्ग-०४ कर्मचारी | रु. ०५/- |

उपरोक्त निवासस्थाने -कर्मचा-यांना देतांना त्यामधील सुविधा पाहून त्यावेळी उपरोक्त प्रमाणे सेवा आकार ठरविण्यात आला होता-

आता मौजे निमगांव को-हाळे, येथे नव्याने एकूण ०८ इमारती ( तळमजला + दोन मजले ) प्रत्येक इमारतीमध्ये एकूण - १२ खोल्या असून सर्व मिळून एकूण -९६ निवासस्थाने बांधण्यात आलेली आहेत. सदर निवासस्थानाचा बिल्टअप एरिया एकूण -४७४ चौरस फूट इतका आहे.(एक बेडरुम- ९.६ बाय ९.९ फूट/ एक हॉल- ९.६ बाय ९.६ फूट / किचन-९.६ बाय ९.६ फूट / संडास ३ बाय ४ फूट / बाथरुम- ७ बाय ७ फूट ) सदर एकूण आठ इमारतींना ओ/बी/सी/डी/ई/एफ/जी/एच असे नांवे देण्यात आलेली असून पूर्व बाजूला - ई/एफ/जी/एच व पश्चिम बाजूला - ओं/ बी/सी/डी अशा इमारती आहेत.

सध्या उपरोक्त श्री साईनाथ छाया या इमारतीचे जागी नव्याने इमारत बांधण्यात आलेली असून सदर इमारतीमध्ये रहात असलेले अधिकारी यांना उपरोक्त नव्याने बांधण्यात आलेल्या इमारती ( साईसहवास / तसेच ए टाईप /बी टाईप या इमारतीमध्ये निवासासाठी स्थलांतरित करण्यात आलेले आहेत.

निवासस्थाने वाटपा संदर्भात उपरोक्त तयार करण्यात आलेली मार्गदर्शक तत्वे अ.नं. ०३ बाबत काटेकोरपणे अंमलबजावणी केल्यास बरीचसी निवासस्थाने रिक्त होतील व व आवश्यकतेनुसार सेवाजेष्ठ कर्मचा-यांना निवासस्थाने उपलब्ध होतील. व ब-याच कर्मचा-यांचा निवासस्थानाबाबतचा प्रश्न निकाली निघणेस मदत होईल.

उपरोक्त प्रमाणे नमूद केलेले निमगांव को-हाळे येथील गट नं.१६९ मध्ये बांधण्यात आलेली निवासस्थाने ही वर्ग-४ कर्मचा-यांसाठी बांधण्यात आलेली आहेत. सेवाधाम इमारतीतील निवासस्थाने ही फारच लहान व गैरसोयीची असल्याने ( १० बाय १० फूट चे खोलीत पती पत्नी, मुले, भांडी, पलंग, टी व्ही अभ्यास पुस्तके, बाथरुम, इत्यादिंच्या सोई होऊ शकत नाहीत. ) त्यांचा विचार करुनच सदर निवासस्थाने बांधण्यात आलेली आहेत, व या इमारती मधील सध्याचे कर्मचा-यांनी निवासस्थान बदलून मिळणेबाबत विनंती अर्ज केलेला आहे. तसेच श्री साईबाबा हॉस्पीटल व श्री साईनाथ रुग्णालयाकडील वैद्यकिय अधिकारी व पॅरामेडीकल स्टाफ परिचारीका व संस्थान कर्मचारी यांनी निवासस्थानांची मागणी केलेली आहे. ती खालील प्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| ०१ . सध्या सेवाधाम इमारती मध्ये रहात असलेले वर्ग-४ कर्मचारी | - | ४६ |
| ०२. श्री साईनाथ रुग्णालय सन-२००० च्या परिचारीका | - | ०४ |
| ०३. संस्थान सेवेतील इतर वर्ग-४ कर्मचारी | - | १६ ( अंदाजे ) |
| ०४. श्री साईबाबा/ साईनाथ हॉस्पीटलकडील वैद्यकिय अधिकारी | - | ३८ |
| ०५. श्री साईबाबा हॉस्पीटलकडील विविध मॅनेजर व इतर | - | ०६ |
| ०६. श्री साईबाबा हॉस्पीटलकडील परिचारीका | - | ७२ |
| ०७. श्री साईबाबा हॉस्पीटलकडील फार्मासिस्ट/लॅब टेक्निशियन | - | १० |
| | | ------- |
| | | १९२ |

प्रथम सेवाधाम इमारतीमधे रहात असलेले वर्ग-०४ चे एकूण ४६ कर्मचारी यांना प्राधान्याने निवासस्थाने देणेबाबतची कार्यवाही करावी लागेल. त्यानंतर सेवाजेष्ठता व आवश्यकता यात श्री साईनाथ/साईबाबा हॉस्पीटलकडील वैद्यकिय अधिकारी तसेच पॅरामेडीकल कर्मचारी (मॅनेजर/फार्मासिस्ट/परिचारीका/ टेक्निशियन ( लॅब/ एक्स-रे /एम.आर.आय/सिटी स्कॅन ) यांना निवासस्थान देणेबाबत विचार करावा लागेल.

सार्वजनिक बांधकाम विभागाकडील खोल्यांचे भाडे सन-२००७-०८ करीता ठरविण्याच्या पध्दतीनुसार इमारतीतील एका सदनिकेचे भाडे रु. १४३०/- मात्र प्रति महिना येते. इमारत बांधकामासह वीज, पाणी,रस्ता या सर्व बाबींवर प्रत्यक्ष झालेल्या खर्चानुसार रु. २५८६/- मात्र असे भाडे येते. फक्त सेवा आकार म्हणून आकारणी करावयाची असल्यास यापूर्वी संस्थान इमारतीकरीता ठरविण्यात आलेल्या दरानुसार सेवा आकारणी करण्यात यावी असे वरिष्ठ उपमुख्य अभियंता यांनी अभिप्राय दिले आहेत.

तरी वरिष्ठ उपमुख्य अभियंता यांचे अभिप्रायानुसार व यापूर्वीचे प्रमाणेच वर्गवारीनुसार निवासस्थानांचे सेवा आकार खालीलप्रमाणे असावा असे मत आहे.

| | |
|---|---|
| ०१) वर्ग-४ कर्मचारी (रु. २५५०-३२००) | रु. १००/- प्रतिमहा |
| ०२) वर्ग -३ (३०५०-४५९०/४०००-६०००/४५००-७०००) | रु. १२५/- प्रतिमहा |
| ०३) स्टाफनर्स /इतर ( ५०००-८०००/५५००-९०००) | रु. १५०/- प्रतिमहा |
| ०४) मॅनेजर व इतर (६५००-१०५००) | रु. २००/- प्रतिमहा |

**उपरोक्त निवासस्थाने सेवाधाम येथील कर्मचा-यांना प्राधान्याने वाटप करुन उर्वरित निवासस्थाने संबंधीतांचे सेवेची आवश्यकता व सेवाजेष्ठता यांचा विचार करुन आर.एम.ओ., तंत्रज्ञ, इतर अधिकारी, परिचारीका इत्यादींना वाटप करता येईल असा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही-अधिक्षक,आस्थापना विभाग)

**विषय नं.८३** **मयत अनुकंपा तत्वावर सेवेत घेणेबाबत.**

**निर्णय क्र.४९६** श्री सोपान निवृत्ती हिवाळे हे संस्थानचे स्वच्छता विभागाकडे सफाई कामगार या पदावर सेवेत असतांना त्यांचे **दि.१८/०३/२००८** रोजी निधन झालेले असून त्यांच्या झालेल्या सेवेबाबतची माहिती खालील प्रमाणे

०१) दिवंगत कर्मचाऱ्यांचे नांव :- कै.सोपान निवृत्ती हिवाळे

०२) मृत्युचे वेळी हुद्या व विभाग :- सफाई कामगार, स्वच्छता विभाग

०३) संस्थानमधील सेवेचा कालावधी :- दि.०६/०३/१९८९ ते दि.१७/०३/२००८

एकूण सेवा १९ वर्षे ११ दिवस

०४.मृत्यु दिनांक :- १८/०३/२००८

श्री सोपान निवृत्ती हिवाळे **यांचे दि.१८/०३/२००८** रोजी निधन झाल्याने त्यांची वारसदार पत्नी नामे श्रीमती जिजाबाई सोपान हिवाळे यांनी संस्थानमध्ये पतीचे जागी अनुकंपा तत्वावर सेवेत घेणेबाबत अर्ज केला असून त्यांचे बाबत माहिती खालील प्रमाणे

**०१. अर्जदाराचे नांव :- श्रीमती जिजाबाई सोपान हिवाळे**

०२. मयत कर्मचाऱ्याशी नाते :- पत्नी

०३. वारसदार अर्जदाराची जन्मतारीख व वय :- दि.०२/०७/१९६९ (वय ३८वर्षे ०८ महिने)

०४. शैक्षणिक व शारीरीक पात्रता :- ०२ री

महाराष्ट्र शासन निर्णय क्र.अकंपा-१०००-प्र.क्र.२०/२०००,आठ मंत्रालय मुंबई ३२ दि.२८/०३/२००१ व महाराष्ट्र शासन निर्णय क्र.अकंपा-१००४-प्र.क्र.५१/२००४,आठ मंत्रालय मुंबई ३२ दि.२२/०८/२००५ सुधारीत शासन निर्णय २ (२) नुसार शासकीय सेवेत असतांना दिवंगत झालेल्या कर्मचाऱ्यांचे एका पात्र नातेवाईकांस अनुकंपाकारणास्तव शासकीय सेवेत घेण्याची तरतूद आहे.त्यास अनुसरुन संस्थान सेवेत असतांना दिवंगत झालेल्या कर्मचाऱ्यांचे एका पात्र नातेवाईकास मानवतेच्या दृष्टीकोणातून यापुर्वी अनुकंपाकारणास्तव संस्थान सेवेत घेण्यात आलेले आहे.त्यानुसार श्रीमती जिजाबाई सोपान हिवाळे (पत्नी) यांनी अर्ज सादर केलेला आहे.

दिवंगत श्री सोपान निवृत्ती हिवाळे यांची पत्नी नामे श्रीमती जिजाबाई सोपान हिवाळे हया शासन निर्णयातील तरतुदीनुसार पात्र ठरत असल्याने त्यांना मानवतेच्या दृष्टीकोनातून अनुकंपा तत्वावर वर्ग-४ चे पदावर नेमणूक देणेस मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

**यावर सविस्तर चर्चा होऊन, सदरहू विषयावर आस्थापना उपसमितीने निर्णय घ्यावा,असें ठरले.**

(कार्यवाही-अधिक्षक,आस्थापना विभाग)

**विषय नं.८४** **श्री.अतुल वाघ, कंत्राटी कनिष्ठ अभियंता (दुरुस्ती व देखभाल) यांचे मुदतवाढीबाबत.**

**निर्णय क्र.४९७** मा.व्यवस्थापन समितीचे दि.१९/०८/२००६ रोजीच्या सभेतील निर्णय क्र.६२६ नुसार सर्वश्री अजय शिवराम पांडे,गिरीश ए.चोळके,मधुकर प.गव्हाणे,गंगाधर शंकर जाधव, स्वप्नील बा.गायकवाड यांच्या कनिष्ठ अभियंते (स्थापत्य) या पदावर व श्री अमृत गंगाधर जगताप कनिष्ठ अभियंता (मशिनरी दुरुस्ती व देखभाल) या पदावर एक वर्षे कलावधीसाठी कंत्राटी पध्दतीने संस्थान कामगार कायदेशीर सल्लागार ॲड.अशोक पाटील यांचे सल्ल्यानुसार नेमणूका देण्यात आलेल्या आहेत.

त्यांचेप्रमाणेच मा.व्यवस्थापन समितीचे दि.२०/०५/२००७ रोजीच्या सभेतील निर्णय क्र. ४३७ नुसार जा.नं.एसएसएस/वशी-०१/ १४८०/२००७ दि.०९/०६/२००७ अन्वये श्री. अतुल एकनाथ वाघ, यांची वाहन विभागाकडे कंत्राटी पध्दतीने कनिष्ठ अभियंता ( मशिनरी दुरुस्ती व देखभाल ) या पदावर एक वर्षासाठी तात्पुरती नेमणूक करण्यात आलेली आहे. त्यांचे बाबतचा तपशील खालील प्रमाणे

| अ.नं. | नांव व हुद्दा | नेमणूकीची तारीख | एक वर्षे कालावधी संपुष्टात येत असल्याची तारीख | देण्यात आलेले एकत्रीत मासिक मानधन |
|---|---|---|---|---|

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ०१. | श्री अतुल एकनाथ वाघ<br>कंत्राटी कनिष्ठ अभियंता<br>(मशिनरी दुरुस्ती व देखभाल )<br>वाहन विभाग | ०९/०६/२००७ | ०८/०६/२००८ | रु.७०००/- |

उपरोक्त कंत्राटी कनिष्ठ अभियंता (मशिनरी दुरुस्ती व देखभाल ) यांचा त्यांचे नावांसमोर दर्शविलेल्या तारखेस एक वर्षे कालावधी संपुष्टात येत आहे.सदर कालावधीमध्ये त्यांचे यांचे काम,वर्तणूक व त्यांना यापुढे मुदतवाढ द्यावयाची झाल्यास किती कालावधीसाठी द्यावी याबाबत प्र. वाहन विभाग प्रमुख अभिप्राय मागविण्यात आले असता त्यांनी " श्री. अतुल वाघ कंत्राटी पध्दतीने कनिष्ठ अभियंता ( दुरुस्ती व देखभाल ) यांची दि.०९/०६/२००७ ते आजपावेतो वर्तणूक चांगली आहे. ते हुकूमाप्रमाणे व योग्य रितीने काम करीत आहेत. त्यांचे बाबत काही प्रकरणे चालू अथवा प्रस्तावित नाहीत. त्यांना संस्थान नियमाप्रमाणे मुदतवाढ देणेस हरकत नाही असे अभिप्राय दिलेले असून त्यावर प्रशासकिय अधिकारी ( वाहन विभाग) यांची संमती दर्शक स्वाक्षरी आहे.

उपरोक्त श्री. अतुल वाघ कनिष्ठ अभियंता (मशिनरी दुरुस्ती व देखभाल) यांचेबाबत प्र. वाहन विभाग प्रमुख व संबंधीत प्रशासकीय अधिकारी यांचे अभिप्राय विचारात घेता श्री. वाघ यांचा एक वर्षांचा कालावधी संपुष्टात येत असलेल्या तारखेपासून पुढे एक वर्षे कालावधीसाठी मुदतवाढ देणस मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

**य़ावर सविस्तर चर्चा होऊन, श्री. अतुल वाघ कनिष्ठ अभियंता (मशिनरी दुरुस्ती व देखभाल) यांना पूर्वीचेच अटी शर्तीवर एक वर्षाचे कालावधीसाठी रुपये ९,०००/- एकत्रित मानधनावर मुदतवाढ देण्यात यावी असे ठरले.** (कार्यवाही-अधिक्षक,आस्थापना विभाग)

**विषय नं.८५ सिस्टर इनचार्ज पदावर पदोन्नती देणेबाबत.**

**निर्णय क्र.४९८** सदरहू विषयाबाबत आस्थापना उपसमिती सभेत निर्णय घेण्यात यावा असे ठरले.
(कार्यवाही-अधिक्षक,आस्थापना विभाग)

**विषय नं.८६ श्री संजय गहिनीनाथ कोते यांचा फिजिओथेरॅपिस्ट पदावर फेर नेमणूकीबाबत**

**निर्णय क्र.४९९** श्री संजय गहिणीनाथ कोते यांची श्री साईबाबा हॉस्पीटलसाठी फिजीओथेरापिस्ट या पदावर रु.८५००/- या एकत्रित मानधनावर नेमणूक करण्यात आलेली होती. त्यानुसार ते दि.०९/०६/२००६ रोजी कामावर हजर झाले होते. तद्‌नंतर ते दि.१८/०२/२००७ पासून विनापरवानगी आजपावेतो गैरहजर राहील्याने त्यांना एक महिना नोटीस पे पोटी त्यांची संस्थानकडे शिल्लक रक्कम रु. ३६४६/- जमा करुन उर्ववरीत रक्कम रु.४८५४/- संस्थानच्या लेखाशाखेत जमा करणेबाबत व त्यांचे नांव आस्थापनेवरुन कमी करण्यात येत आहे असे कळविण्यात आले होते. तथापि त्यांनी याबाबत इकडील कार्यालयास लेखी अथवा तोंडी स्वरुपात काहीही कळविलेले नाही तसेच दिनांक १४.७.२००७रोजी त्यांना नोटीस पे पोटी जमा करण्यास सांगितलेली रक्कम त्यांनी संस्थान जमा केलेली नाही. ही बाब नेमणूक आदेशातील अटी शर्तीचा भंग करणारी आहे. त्यांनी सदरची रक्कम लेखाशाखेत जमा केलेली नसल्याने त्यांचे नांव आस्थापनेवरुन आपोआप कमी झालेले आहे.

आता त्यांनी दि. ०१/०३/२००८ रोजी इकडील कार्यालयास अर्ज सादर करुन त्यात "मी भौतिक उपचार तज्ञ म्हणून पदवी घेतली असून मी दि.०९/०६/२००६ पासून श्री साईबाबा हॉस्पीटल मध्ये काम करत होतो. काही घरघुती कारणास्तव मी दि. १२/०२/२००७ पासून सुट्टी घेतली होती व आज पर्यंत मी या कामावर हजर होवू शकलो नाही. माझे पद रिक्त असून माझी त्या पदासाठी परत नेमणूक करावी. हि विनंती. " असे कळविलेले आहे. त्यावर मा.आ.श्री राधाकृष्ण विखे पा. विश्वस्त, यांनी " कृपया पूर्ववत कामावर हजर करुन घ्यावे. जागा रिक्त आहे. " असे अभिप्राय दिलेले आहे.

तसेच मा.अध्यक्ष महोदय यांनीही मिटींग पुढे ठेवावे असे अभिप्राय दिलेले आहे.

सदरच्या अर्जावर वैद्यकीय संचालक श्री साईबाबा हॉस्पीटल यांनी " सध्या महाराष्ट्र शासनाचे मंजूर आकृतीबंधामध्ये फिजिओथेरापिस्टची दोन पदे मंजूर आहेत, त्यानुसार एका पदावर सध्या श्री नवसुपे , फिजिओथेरापिस्ट हे कार्यरत असून श्री कोते यांचे जागेवर कुणाचीही नेमणूक करणेत आलेली नसुन फिजिओथेरापिस्ट या पदाचे एक पद रिक्त आहे. अशा परिस्थितीत श्री कोते यांची पुन्हा श्री साईबाबा हॉस्पीटलमध्ये फिजिओथेरापिस्ट या पदावर नेमणूक होणेबाबत योग्य तो मर्जिनुरुप आदेश होणेस विनंती. " असे अभिप्राय दिलेले आहे.

तसेच डॉ. सी.एस.बोबडे, वैद्यकीय संचालक, श्री साईबाबा हॉस्पीटल यांनी "सध्यचा वर्कलोड कार्यरत असलेले फिजिओथेरापिस्ट यांना पुरेसा आहे. सबब नव्याने फिजिओथेरापिस्ट नियूक्त करण्याची आवश्यकता वाटत नाही. "असे अभिप्राय दिलेले आहे.

श्री कोते यांनी अर्जात दि.१२/०२/२००७ पासून सुट्टी घेतलेली होती असे नमूद केलेले आहे. तथापि याबाबत त्यांनी कुठल्याही प्रकारे रजेचा अर्ज दिलेला नाही. ते विनापरवाना गैरहजर असल्याने त्यांनी नेमणूक आदेशातील अटी-शर्तीचा भंग केलेला असून प्रशासनाने कळविले नुसार रक्कम संस्थान जमा केलेली नाही. हे सेवानियमानुसार गैरवर्तन ठरते. तरी श्री कोते यांनी त्यांच्या अर्जात

केलेल्या विनंती व अर्जावरील मा.अध्यक्ष तसेच सदस्य यांचे अभिप्रायानुसार श्री कोते यांना पूर्ववत कामावर हजर करुन घेणेस मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, तो **अमान्य करण्यात आला.** (कार्यवाही-अधिक्षक,आस्थापना विभाग)

**विषय नं.८७ प्रशासकीय अधिकारी पदावर नेमणूकीबाबत.**

**निर्णय क्र.५००** संस्थान आस्थापनेवर प्रशासकीय अधिकारी यांची एकूण ५ पदे आहेत. पैकी श्री.एस.के.जगताप हे वयास ६० वर्षे पूर्ण झाल्याने दिनांक ३०.६.२००७ रोजी सेवानिवृत्त झालेले आहेत. त्यांना कंत्राटी पद्धतीने १ वर्ष मुदतीसाठी नेमणूक देणेत आलेली होती. तथापि त्यांनी दिनांक ८.४.२००८ चे अर्जाने दिनांक ३०.४.२००८ पासून पदमुक्त करण्याची विनंती केल्याने त्यांना पदमुक्त करण्यात आलेले आहे. त्यामुळे प्रशासकीय अधिकारी हे एक पद रिक्त झालेले आहे.

यापूर्वी प्रशासकीय अधिकारी पदासाठी वेळोवेळी जाहीरात देऊन मुलाखतीद्वारे नेमणूक करण्यात आलेली आहे. त्यासाठी पदवीधर तसेच प्रशासकीय कामाचा १५ वर्षे अनुभव पैकी कक्ष अधिकारी अथवा पर्यवेक्षकीय कामाचा किमान ५ वर्षे अनुभव अशी अट दिलेली होती.

श्री.जगताप सेवानिवृत्त होत असल्याने प्रशासकीय अधिकारी पदासाठी नियुक्ती होणेकामी खालीलप्रमाणे संस्थान अधिकाऱ्यांनी अर्ज केलेले आहेत.

०१. श्री.प्र.भि.बोरावके, अधिक्षक,खरेदी विभाग
०२. श्री.बी.डी.साबळे,अधिक्षक,आस्थापना विभाग
०३. श्री.एस.एन.चित्रे,अधिक्षक,साईनाथ रुग्णालय
०४.श्री.एस.एन.गर्कल,विधी अधिकारी
०५. श्री.ए.एम.काळे,लेखाधिकारी

तसेच श्री.प्र.भि.बोरावके यांचे नाव यापूर्वी २००३ मध्ये दि.१४.०३.२००३ रोजी सदर पदासाठी झालेल्या मुलाखतीमध्ये वेटींग लिस्टला ठेवण्यात आलेले होते. तथापि दोन्ही उमेदवार हजर झाल्याने त्यांना नेमणूक करणेची आवश्यकता निर्माण झाली नाही. त्यांनी सदर पदावर पदोन्नतीसाठी मा.हायकोर्ट खंडपीठ,औरंगाबाद येथे रिट पिटीशन क्र.४५७२/२००७ दाखल केलेले असून त्यावर मा.कोर्टाचे आदेश झालेले नाहीत.

तसेच श्री.बी.डी.साबळे,अधिक्षक आस्थापना यांनीही सदर पदावर शासनाच्या आरक्षणाच्या नियमानुसार पदोन्नती मिळावी यासाठी मा.हायकोर्ट खंडपीठ,औरंगाबाद येथे रिट पिटीशन क्र.१५१७/२००८ दाखल केलेले असून,त्यावर मा.कोर्टाचे आदेश झालेले नाहीत.

मागासवर्ग आरक्षणाबाबत सन २००४ चा महाराष्ट्र अधिनियम क्र.०८ संस्थानमध्ये लागू करणेबाबत मा.व्यवस्थापन मंडळ सभा दिनांक २७.१२.२००४ निर्णय क्र.१७० नुसार निर्णय झालेला आहे. अधिनियमातील कलम नं.०५ नुसार पदोन्नतीतील आरक्षण हे सर्व टप्यावर असेल असे नमूद केलेले असून, अधिनियमानुसार नेमणूका व पदोन्नतीबाबत कार्यवाही करणेत येत आहे असे यापूर्वी जा.क्र.६९४१/०७ दिनांक ३०.४.२००७ अन्वये मा.अवर सचिव सामान्य प्रशासन,मंत्रालय,मुंबई यांना कळविण्यात आलेले आहे.

तथापि दिनांक १६.५.२००८ रोजी मा.सचिव व वरिष्ठ विधी सल्लागार, विधी व न्याय विभाग, मंत्रालय,मुंबई हे पहाणी दौऱ्यावर शिरडी येथे समक्ष आले असता, संस्थानचा आकृतीबंध अद्याप विधी व न्याय विभागाने मान्य केलेला नसल्याने आरक्षण लागू करता येणार नाही,अशी चर्चा झालेली आहे.

तरी रिक्त प्रशासकीय अधिकारी पदावर नेमणूकीसाठी विधि व न्याय विभागाकडून आरक्षण धोरणाबाबत लेखी अभिप्राय घेऊन पुढील कार्यवाही करावी लागेल असा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

**यावर सविस्तर चर्चा होऊन, विधि व न्याय विभागाकडून आरक्षण धोरणाबाबत लेखी अभिप्राय घेण्यात यावा. तसेच संस्थानचा दिवसेंदिवस वाढता व्याप व नवीन संगणकीय माहिती तंत्रज्ञानाचा वापर इत्यादी विचारात घेता रिक्त होणाऱ्या प्रशासकीय अधिकारी या पदांवर शासनाकडून महाराष्ट्र लोकसेवा आयोग यांचे मार्फत निवड करण्यात आलेल्या तहसिलदार पदावरील कर्मचाऱ्यांना प्रतिनियुक्तीवर घेण्यात यावे असे ठरले.** (कार्यवाही-अधिक्षक,आस्थापना विभाग)

**विषय नं.८८ डॉ.मोहम्मद पटेल,स्पीच ॲण्ड ऑडिओलॉजिस्ट यांचे नेमणूकीबाबत**

**निर्णय क्र.५०१** संस्थानचे श्री साईनाथ रुग्णालयाकडे तत्कालीन मा.व्यवस्थापन मंडळाचे दि.३१ जुलै व ०१ ऑगष्ट २००४ चे सभेतील निर्णय क्र. ४०० नुसार जा.नं.एसएसएस/वशी-०१/८४२८/२००४ दि. २५/०८/२००४ अन्वये इएनटी (नाक,कान, घसा) विभागाकडे डॉ. राहुल वैद्य, नाशिक यांची मानद स्पीच ॲण्ड ऑडिओलॉजिस्ट म्हणून प्रथम पुढील आदेश होईपावेतो महिन्यातून एक दिवस व प्रति व्हिजीटसाठी रु. १५००/- एकत्रित मानधनावर नेमणूक करण्यात आलेली होती. त्यानंतर त्यांची मा. व्यवस्थापन समितीच्या सभेतील निर्णयानुसार वेळोवेळी मुदतवाढ करण्यात येऊन जा.नं.एसएसएस/वशी-०१/२६२८/२००६ दि.२३/०९/२००६ अन्वये एक वर्षासाठी मुदत वाढ करुन

त्यांना देण्यात येणारे प्रति व्हिजीट मानधन रु.१५००/ ऐवजी प्रति व्हिजीट रु. २२००/- इतके वाढविण्यात आलेले होते .

त्यानंतर डॉ. राहुल वैद्य, नाशिक यांनी दि. १६/०६/२००७ रोजीच्या अर्जाने " श्री साईनाथ रुग्णालयात प्रत्येक व्हिजीट चे वेळी साधारण ३७ ते ३८ रुग्ण तपासत असल्याने प्रति रुग्ण रु. १००/- याप्रमाणे रु. ३,७५०/- मानधन ( म्हणजे सध्या त्यांना देत असलेल्या मानधानात रु. २२००/- मध्ये रु. १५५०/- इतके वाढवून मानधन ) वाढवून मिळणेबाबत विनंती केली होती.

सदर अर्जावरील वैद्यकिय अधिक्षिका यांचे अभिप्राय व मा. व्यवस्थापन समितीचे दि. २८/०७/२००७ रोजीचे सभेतील निर्णयानुसार डॉ. राहुल वैद्य नाशिक यांची आहे त्याच प्रति व्हिजीट एकत्रित रु. २२००/- एकत्रित मानधनावर दि. ०१/०९/२००७ पासून पुढे दि. ३१/०८/२००८ अखेर एक वर्षाकरीता मुदतवाढ करण्यात आलेली आहे.

आता वैद्यकिय अधिक्षिका श्री साईनाथ रुग्णालय यांनी दि. २८/०१/२००८ रोजी टिपणी सादर करुन "डॉ. राहुल वैद्य नाशिक यांनी दि. १५/०१/२००८ रोजी चे पत्राने श्री साईनाथ रुग्णालयात देत असलेली व्हिजीट त्यांचे वैयक्तीक कारणामुळे बंद केलेली असून त्यांनी दि.१९/०१/२००८ पासून रुग्णालयात भेट दिलेली नाही.

डॉ.मोहम्मद अशफाक कासम पटेल, थेरगांव चिंचवड पुणे यांनी दि. १६/०१/२००८ रोजी अर्ज करुन श्री साईनाथ रुग्णालयात महिन्यातून एक किंवा दोन व्हिजीट देण्यास तयार असलेबाबत कळविले असून ते सन १९९२ मध्ये स्पीच ॲण्ड ऑडिओलॉजी पास झालेले आहेत. श्री साईनाथ रुग्णालयात कार्यरत असलेले वैद्यकिय अधिकारी ( इएनटी) यांनी डॉ. पटेल यांना महिन्यातून दोन वेळेस पहिल्या व तिस-या शनिवारी बोलविणेबाबत शिफारस केलेली आहे. डॉ. मोहम्मद पटेल पुणे यांना श्री साईनाथ रुग्णालयात महिन्यातून दोन वेळेस पहिल्या व तिस-या शनिवारी बोलविणेस तसेच पटेल यांना प्रति व्हिजीटसाठी प्रवास खर्चासहीत एकूण रु. २५००/- इतके मानधन देणेस हरकत नाही. असे कळविले आहे.

तरी **डॉ. राहूल वैद्य, स्पीच ॲण्ड ऑडिओलॉजीस्ट नाशिक यांनी व्हिजीट देणे बंद केलेले असल्याने संबंधीत आजाराचे रुग्ण यांची गैर सोय होऊ नये म्हणून डॉ. पटेल यांनी अर्जात केलेली विनंती व नाक कान घसा या विभागाचे वैद्यकिय अधिकारी डॉ. कुलकर्णी व वैद्यकिय अधिक्षिका श्री साईनाथ रुग्णालय यांचे उपरोक्त अभिप्रायानुसार डॉ. पटेल, थेरगांव, चिंचवड पुणे यांना संस्थानचे श्री साईनाथ रुग्णालयात महिन्यातून दोन व्हिजीट, प्रति व्हिजीट रु. २५००/- ( प्रवास खर्चासह ) एकत्रित मानधनावर एक वर्षासाठी मानद स्पीच ॲण्ड ऑडीओलॉजीस्ट म्हणून नेमणूक देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही-अधिक्षक,आस्थापना विभाग)

**विषय नं.८९** **श्री शिवलींग बसवण्णप्पा पटणे, प्राचार्य आय.टी.आय यांनी मा.व्यवस्थापन समितीचे सभेत झालेल्या तडजोडीप्रमाणे समझोता ॲफिडेव्हीट करुन न दिले बाबत.**

**निर्णय क्र.५०२** श्री.शिवलींग बसवण्णपा पटणे यांची नेमणूक दि.०९-०९-१९९१ पासून श्री साईबाबा औद्योगिक प्रशिक्षण संस्था, शिरडी येथे "प्राचार्य" या पदावर करण्यात आलेली होती. श्री.पटणे हे सेवेत असतांना त्यांचे विरुध्द गैरशिस्त वर्तनाबाबत जा.नं.एसएसएस/वशी-७ए/३२६३/९७ दि.२४-०३-१९९७ अन्वये आरोपपत्र ठेऊन त्यांची खातेचौकशी पुर्ण करण्यात आली. त्रिसदस्य चौकशी समितीने श्री.पटणे यांची खातेचौकशी पुर्ण करुन त्यांनी त्यांचा खातेचौकशी निष्कर्ष अहवाल दि.२४-०७-२००२ रोजी सादर केला. खातेचौकशीमध्ये श्री.पटणे यांचेविरुध्द ठेवण्यात आलेले आरोप सिध्द झाल्याने श्री.पटणे यांना जा.नं.एसएसएस/वशी-७ए/११७७०/२००२ दि.२०-१२-२००२ चे आदेशान्वये सेवेतून कमी (टर्मिनेट) करण्यात आले.

सदर टर्मिनेशन आदेशासंदर्भात श्री.पटणे यांनी संस्थानचे विरुध्द मा.पिठासीन अधिकारी, अतिरिक्त शाळा न्यायाधिकरण, सोलापूर यांचे कोर्टात अपील क्र.४/२००३ दि.१८-०१-२००३ रोजी दाखल केले होते. सदर अपीलामध्ये मा.पिठासीन अधिकारी, अतिरिक्त शाळा न्यायाधिकरण पुणे विभाग सोलापूर यांनी दि.२०-०९-२००३ रोजी संस्थानचे विरुध्द अंतिम आदेश (जज्जमेंट) दिले होते.

मा.पिठासीन अधिकारी, अतिरिक्त शाळा न्यायाधिकरण, सोलापूर यांनी अपील क्र.४/२००३ मध्ये दि.२०-०९-२००३ रोजी दिलेल्या आदेशासंदर्भात संस्थानने श्री.एस.बी.पटणे यांचे विरुध्द मा.उच्च न्यायालय, खंडपीठ, औरंगाबाद येथे दि.१६-१०-२००३ रोजी रिट पिटीशन क्र.४७२३/२००३ दाखल केले. सदर रिट पिटीशनमध्ये मा.उच्च न्यायालय, खंडपीठ, औरंगाबाद यांनी दि.२८-०४-२००४ रोजी " Respective Parties waive Service, It is made clear that there will be stay to the back wages from the date of filing appeal before the school Tribunal, till the date of decision which is challenged in this petition." असा अंतरीम आदेश दिला.

उपरोक्त आदेशासंदर्भात संस्थानने श्री.एस.बी.पटणे यांचेविरुध्द मा.उच्च न्यायालय, खंडपीठ, औरंगाबाद येथे दि.०७-०६-२००४ रोजी लेटर्स पेटंट अपील क्र.९४/२००४ दाखल केले. सदर लेटर्स

पेटंटस अपील मा.उच्च न्यायालय, खंडपीठ, औरंगाबाद यांनी दि.२९-०६-२००५ रोजी आदेश देऊन रिजेक्ट केले आहे. त्यामुळे सध्या श्री.एस.बी.पटणे यांचेविरुध्द संस्थानने दाखल केलेले रिट पिटीशन क्र.४७२३/२००३ हे मा.उच्च न्यायालय, खंडपीठ, औरंगाबाद येथे न्यायप्रविष्ठ असून, प्रलंबीत आहे.

दरम्यानचे काळात श्री.एस.बी.पटणे व संस्थान या उभय पक्षामध्ये रिट पिटीशन क्र.४७२३/२००३ या कोर्ट केस संदर्भात मा.न्यायालयाबाहेर तडजोड होऊन मा.व्यवस्थापन समितीचे दि.१८-०७-२००५ रोजीचे सभेतील निर्णय क्र.३७० अन्वये " श्री.एस.बी.पटणे यांना श्री साईबाबा औद्योगिक प्रशिक्षणसंस्थेमध्ये प्राचार्य या पदावर पुर्ववत कामावर हजर करुन घेऊन, कोर्ट आदेशानुसार त्यांना मागील काळातील वेतन फरकापोटी सुमारे रु.६,२५,०००/- मात्र एवढी रक्कम आदा करणेत यावी " असे ठरले.

त्यास अनुसरुन श्री.एस.बी.पटणे यांना जा.क्र.एसएसएस/वशी-७ए/१८११/२००५ दि.१७-०८-२००५ अन्वये नेमणूक पत्र देणेत आले. त्याप्रमाणे श्री. एस. बी. पटणे हे श्री.साईबाबा औद्योगिक प्रशिक्षण संस्थेमध्ये दि.१८-०८-२००५ पासून प्राचार्य या पदावर पुर्ववत कामावर रुजू झालेले आहे. तसेच श्री.एस.बी.पटणे यांना मा.कोर्ट आदेशा नुसार मागील काळातील वेतन (बॅक वेजेस) ची रक्कम रु.५,६९,५१०/-(अक्षरी रुपये पाच लाख एकोणसत्तर हजार पाचशे दहा ) मात्र संस्थानकडून आदा करणेत आलेली आहे. तसेच श्री.पटणे यांना विद्यार्थी संख्येशी निगडीत वेतनश्रेणी व आश्वासित योजनेअंतर्गत वरिष्ठ वेतनश्रेणी जा.नं.एसएसएस/वशी-१/८८७/२००७ दि.१६-०४-२००७ व जा.क्र. एसएसएस/वशी-०१/१७८/२००८ दि.१९-०१-२००८ रोजीचे आदेशान्वये देणेत आलेली आहे.

रिट पिटीशन क्र.४७२३/२००३ संदर्भात उभय पक्षामध्ये झालेल्या तडजोडीस अनुसरुन सदर कोर्टकेस मा.उच्च न्यायालय, खंडपीठ, औरंगाबाद येथून काढून घेणेकामी संस्थान हायकोर्ट ॲडव्होकेट श्री.आर.एन.धोर्डे, औरंगाबाद यांचेकडून कन्सेन्ट ॲफिडेव्हीट (समझोता ॲफिडेव्हीट) चा मसुदा तयार करुन घेणेत आलेला आहे. सदर मसुदयाप्रमाणे सुपरिटेंन्डट, ॲडिशनल डिस्ट्रीक्ट कोर्ट, कोपरगाव येथे संस्थानचे तत्कालीन कार्यकारी अधिकारी श्री.बी.आर. वाकचौरे यांनी स्वाक्षरी करुन, समझोता ॲफिडेव्हीट करुन दिलेले आहे. तथापी, श्री.एस.बी.पटणे यांना अनेकवेळा सुचना देऊन देखील तसेच दि.६-११-२००६, दि.१०-११-२००६, दि.१५-०२-२००७, दि.१७-०३-२००७ व दि.१०-१२-२००७ रोजीचे पत्रान्वये लेखी कळवून देखील त्यांनी, समझोता/कन्सेंट ॲफिडेव्हीट करुन दिलेले नाही. त्यामुळे रिट पिटीशन क्र.४७२३/२००३ ही कोर्ट केस अद्याप मा.उच्च न्यायालय, खंडपीठ, औरंगाबाद येथे प्रलंबीत आहे. उभय पक्षात झालेल्या तडजोडीमध्ये ठरलेप्रमाणे तसेच नेमणूक पत्रातील अटी शर्तीस अनुसरुन श्री.एस.बी.पटणे यांनी समझोता ॲफिडेव्हीटवर स्वाक्षरी करुन देणे आवश्यक होते व त्यांचेवर बंधनकारक आहे असे असतांनाही त्यांनी अद्यापपर्यंत समझोता ॲफिडेव्हीट करुन दिलेले नाही. यावरुन श्री.एस.बी.पटणे हे समझोता ॲफिडेव्हीट करुन देणेस मुद्दाम टाळाटाळ करुन, प्रशासनास जाणून बुजून अडचणीत आणणेचा प्रयत्न करीत असल्याचे दिसून येते. श्री.एस.बी.पटणे हे इकडील कार्यालयीन पत्रांना, आदेशांना व वरिष्ठांनी वेळोवेळी दिलेल्या सुचनांना जुमानत नाही तसेच ते सदर कार्यालयीन पत्रांचा, आदेशांचा व वरिष्ठांमार्फत वेळोवेळी देणेत आलेल्या सुचनांचा अवमान करत आहेत. त्यांचे सदरचे कृत्य हे जाणून बुजून वेळकाढूपणाचे असून, ते प्रशासनास वेठीस धरणारे आहे. सदर रिट पिटीशन क्र.४७२३/२००३ हे मा.उच्च न्यायालय, खंडपीठ, औरंगाबाद येथे लवकरच सुनावणी कामी बोर्डावर येण्याची शक्यता आहे. त्यावेळी श्री.एस.बी.पटणे यांचे समझोता ॲफिडेव्हीट करुन न देण्याचे धोरणामुळे संस्थान व प्रशासन अडचणीत येण्याची शक्यता आहे.

म्हणून सदर प्रकरणाबाबत चर्चा करणेकामी श्री.आर.एन.धोर्डे, हायकोर्ट ॲडव्होकेट, औरंगाबाद यांनी त्यांचे कार्यालयात दि.०५-०९-२००७ रोजी बोलाविले होते. त्यांनी श्री.एस.बी.पटणे हे तडजोडीमध्ये ठरलेप्रमाणे समझोता ॲफिडेव्हीट (कन्सेन्ट ॲफिडेव्हीट) करुन देत नाहीत. ते प्रशासनास वेठीस धरत आहेत. अशा परिस्थितीत मा.न्यायाधिश, हायकोर्ट औरंगाबाद हे श्री.एस.बी.पटणे यांना कामावर कां ठेवले ? अशी सुनावणीचे वेळेस प्रशासनास विचारणा करेल व त्यावेळी मा.न्यायालयास उत्तर देणे अडचणीचे होईल. त्यामुळे, श्री.एस.बी.पटणे यांना तात्काळ संस्थान सेवेतून बडतर्फ (डिसमीस) करण्यात यावे असे चर्चेअंती सांगितले होते.

म्हणून श्री.एस.बी.पटणे यांना एक महिन्याचे लेखी नोटीशी ऐवजी एक महिन्याचा नोटीस पे रक्कम देवून संस्थान सेवेतून बडतर्फ (डिसमीस) करणेबाबत प्रस्ताव निर्णयासाठी मा.व्यवस्थापन समितीचे दि.०८-१२-२००७ रोजीचे सभेमध्ये सादर करणेत आला होता. सदर प्रस्तावावर चर्चा होऊन, श्री.एस.बी.पटणे यांना कोर्ट केस मागे घेणेकामी कन्सेंन्ट ॲफिडेव्हीट (समझोता प्रतिज्ञापत्र) करुन देऊन कोर्टकेस मा. उच्च न्यायालय, खंडपीठ, औरंगाबाद येथून काढून घेंणेकामी जानेवारी-२००८ अखेर लेखी मुदत देण्यात यावी. या कालावधीत त्यांनी कन्सेन्ट ॲफिडेव्हीट (समझोता प्रतिज्ञापत्र) दाखल करुन, कोर्ट केस मागे घेणेबाबत पुर्तता न केल्यास त्यांचेबाबत फेर प्रस्ताव व्यवस्थापन

समितीचे पुढील सभेपुढे सादर करावा. असा आयत्या वेळेचा निर्णय क्र.८३१ मा.व्यवस्थापन समितीचे दि.०८-१२-२००७ रोजीचे सभेमध्ये संमत झालेला आहे.

तसेच मा.व्यवस्थापन समितीचे दि.१०-०१-२००८ रोजीचे सभेमध्ये दि.०८-१२-२००७ रोजी झालेल्या व्यवस्थापन समितीचे सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणेचे वेळी पुन्हा यावर सविस्तर चर्चा होवून, उपरोक्त निर्णयाऐवजी " श्री.एस.बी.पटणे यांना कोर्टकेस मागे घेणेकामी समझोता/कंन्सेन्ट ॲफिडेव्हीट करुन देऊन, कोर्ट केस मा.उच्च न्यायालय, खंडपीठ, औरंगाबाद येथून काढून घेणेकामी जानेवारी-२००८ अखेर लेखी मुदत देणेत यावी. या कालावधीत त्यांनी समझोता/कंन्सेन्ट ॲफिडेव्हीट दाखल करुन, कोर्ट केस मागे घेणेबाबत पुर्तता न केल्यास त्यांचेबाबत श्री.आर.एन.धोर्डे, हायकोर्ट ॲडव्होकेट, औरंगाबाद यांचा सल्ला घेऊन पुढील कारवाई करणेत यावी " असा निर्णय क्र.४ (०२) मा.व्यवस्थापन समितीचे दि.१०-०१-२००८ रोजीचे सभेमध्ये संमत झालेला आहे.

उपरोक्त निर्णयास अनुसरुन श्री.एस.बी.पटणे यांना दि.३१-०१-२००८ अखेर समझ ोता/कंन्सेन्ट ॲफिडेव्हीट करुन दयावे व सदर रिट पिटीशन मा. उच्च न्यायालय, खंडपीठ, औरंगाबाद येथून काढून घेणेकामी योग्य ती पुर्तता करुन दयावी. त्यांनी मुदतीत समझोता/कंन्सेंट ॲफिडेव्हीट करुन न दिल्यास, त्याचे विरुध्द पुढील योग्य ती कारवाई करणेत येईल असे जा.नं.एसएसएस/वशी-७ए/१७०/२००८ दि.१९-०१-२००८ रोजीचे पत्रान्वये लेखी कळविणेत आले आहे. तरी देखील श्री.एस.बी.पटणे यांनी अद्यापपर्यंत उभयपक्षात ठरलेप्रमाणे समझोता/कंन्सेन्ट ॲफिडेव्हीट करुन दिलेले नाही. तसेच सदर कोर्टकेस मा. उच्च न्यायालय, खंडपीठ, औरंगाबाद येथून काढून घेणेकामी योग्य ती पुर्तता करुन दिलेली नाही. त्यामुळे रिट पिटीशन क्र.४७२३/२००३ हि कोर्ट केस अद्याप मा. उच्च न्यायालय, खंडपीठ, औरंगाबाद येथे प्रलंबीत असून, न्यायप्रविष्ठ आहे. यावरुन श्री.एस.बी.पटणे हे इकडील कार्यालयीन पत्रांना तसेच मा.व्यवस्थापन समितीचे निर्णयांना देखील जुमानत नाहीत. हे स्पष्ट होते.

मा.व्यवस्थापन समितीचे दि.१०-०१-२००८ रोजीचे सभेत संमत झालेल्या निर्णय क्र.४ (०२) ला अनुसरुन श्री.एस.बी.पटणे यांचे प्रकरणाबाबत पुन्हा संस्थान हायकोर्ट ॲडव्होकेट श्री.आर.एन.धोर्डे, औरंगाबाद यांचा दि.०८-०४-२००८ रोजी सल्ला घेणेत आला. त्यावेळी त्यांनी श्री.एस.बी.पटणे हे प्रत्येक वेळेस काहीतरी नविन कारण सांगून, ॲफिडेव्हीटमध्ये बदल करणेची मागणी करतात. ॲफिडेव्हीटचा मसूदा मी तयार करुन दिलेला असून तो बरोबर आहे. त्यात बदल करण्याची आवश्यकता नाही. श्री.एस.बी.पटणे यांना माहे-जानेवारी-२००८ अखेर समझोता/कन्सेन्ट ॲफिडेव्हीट करुन देऊन, कोर्ट केस काढून घेणेबाबत अंतीम मुदत देणेत आली होती. तरी देखील त्यांनी अद्यापपर्यंत समझोता/कन्सेन्ट ॲफिडेव्हीट करुन देऊन, कोर्ट केस काढून घेणेबाबत योग्य ती पुर्तता केलेली नाही. त्यामुळे श्री.एस.बी.पटणे यांना लेखी आदेश न देता तोंडी सुचना देऊन तात्काळ संस्थान सेवेतून कमी (टर्मिनेट) करणेत यावे. असा तोंडी सल्ला हायकोर्ट ॲडव्होकेट श्री.आर.एन.धोर्डे, औरंगाबाद यांनी दिलेला आहे.

सबब, **श्री.शिवलिंग बसवण्णपा पटणे, प्राचार्य, आय.टी.आय. हे उभयपक्षात ठरलेप्रमाणे समझोता/ कन्सेन्ट ॲफिडेव्हीट करुन देत नाही. तसेच कोर्ट केस काढून घेणेबाबत योग्य ती पुर्तता करुन देत नाहीत. म्हणून त्यांना लेखी आदेश न देता, तोंडी सुचना देऊन तात्काळ संस्थान सेवेतून कमी (टर्मिनेट) करणेस मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही-कामगार अधिकारी )

**विषय नं.९०** **श्री मच्छिंद्र दिगंबर धनेश्वर, कनिष्ठ कामगार अधिकारी यांनी मा.व्यवस्थापन समितीचे सभेत झालेल्या तडजोडीप्रमाणे समझोता ॲफिडेव्हीट करुन न दिले बाबत.**

**निर्णय क्र.५०३** श्री.मच्छिंद्र दिगंबर धनेश्वर यांची नेमणूक दि.१३-१०-१९८६ पासून संस्थानचे प्रशासन शाखेत कनिष्ठ कामगार अधिकारी या पदावर करणेत आली होती. ते संस्थान सेवेत कार्यरत असतांना त्यांनी गंभीर गैरशिस्त वर्तन केले होते. त्याबाबत त्यांना जा.नं.एसएसएस/वशी-१/१३१५९/१९९३ दि.०९-१२-१९९३ अन्वये आरोपपत्र देऊन, त्यांची खातेचौकशी करणेत आली होती. खातेचौकशीमध्ये श्री.म.दि.धनेश्वर यांचेविरुध्द ठेवलेले आरोप सिध्द झाल्यामुळे त्यांना जा.नं.एसएसएस/वशी-७ए/ ७९३३/९४ दि.०२-०८-१९९४ चे आदेशान्वये दि.०२-०८-१९९४ पासून संस्थान सेवेतून बडतर्फ (डिसमीस) करणेत आले होते.

सदरचे बडतर्फी आदेशासंदर्भात श्री.धनेश्वर यांनी मा.कामगार न्यायालय, अहदनगर येथे तक्रार (यु.एल.पी.) क्र.१४/१९९६ ही कोर्टकेस दाखल केली. त्यामध्ये मा.कामगार न्यायालयाने दि.१८-०७-२००० रोजी दिलेल्या आदेशासंदर्भात संस्थानने श्री.म.दि.धनेश्वर यांचेविरुध्द रिव्हीजन (यु.एल.पी.)क्र.४०/२००० तसेच श्री.म.दि.धनेश्वर यांनी संस्थान विरुध्द रिव्हीजन (यु.एल.पी.) क्र. ४७/ २००० मा.औद्योगिक न्यायालय, अहमदनगर येथे दाखल केले होते. सदरचे दोन्ही रिव्हीजनमध्ये मा.औद्योगिक न्यायालय, अहमदनगर यांनी दि.२८-०९-२००४ रोजी कॉमन जज्जमेंट/आदेश दिला

होता. सदर आदेशासंदर्भात संस्थानने श्री.म.दि.धनेश्वर यांचेविरुध्द मा.उच्च न्यायालय खंडपीठ, औरंगाबाद येथे रिट पिटीशन क्र.६१६/२००५ दाखल केलेले आहे.सदर रिट पिटीशन संदर्भात संस्थानतर्फे मा.उच्च न्यायालय खंडपीठ, औरंगाबाद येथे दि.३१-०३-२००५ रोजी रक्कम रुपये ३,७९,२९०/-(अक्षरी रुपये तीन लाख एकोणऐन्सी हजार दोनशे नव्वद) मात्र डिपॉझिट करणेत आलेली आहे. तसेच मा.दिवाणी न्यायालय (सि.डी.) कोपरगाव येथे दावा स्पे.मु.नं.५६/२००२ ही कोर्टकेस दाखल केलेली आहे.

सदर कोर्ट केस संदर्भात उभय पक्षात दि.२५-१२-२००४ रोजी मा.श्री ए.बी.खांबेकर,विश्वस्त, मा.डॉ.श्री. ए.बी.गोंदकर, विश्वस्त, मा.कार्यकारी अधिकारी व सर्व मा.प्रशासकीय अधिकारी यांचे उपस्थितीत तडजोड होऊन, श्री.म.दि.धनेश्वर यांना सदर कोर्टकेसेस विनातक्रार मा.न्यायालयातून काढून घेऊन, त्यांना पुन्हा कनिष्ठ कामगार अधिकारी या पदावर सेवेत घेणेत यावे असे ठरले व तसा निर्णय मा.व्यवस्थापन समितीचे दि.१३-०३-२००५ रोजीचे सभेत आयत्या वेळेचा निर्णय क्र.१३६ (०८) अन्वये संमत झालेला आहे. त्यास अनुसरुन श्री.म.दि.धनेश्वर यांना जा.नं.एसएसएस/वशी-७ए/१७६५/२००५ दि.१०-०८-२००५ अन्वये नेमणूक आदेश देणेत आलेला आहे. त्याप्रमाणे श्री.म.दि.धनेश्वर हे दि.११-०८-२००५ पासून कनिष्ठ कामगार अधिकारी म्हणून संस्थान सेवेत कामावर हजर झालेले आहेत. तसेच उभय पक्षात झालेल्या तडजोडीस अनुसरुन श्री.म.दि.धनेश्वर यांनी कोर्ट केसेसबाबत पुन्हा कोणत्याही प्रकारे वाद उपस्थित करणार नाहीत व यापुढे गैरशिस्तवर्तन घडणार नाही. असे रुपये ५० चे स्टॅम्प पेपरवर दि.१०-०८-२००५ रोजी हमीपत्र (अंडरटेकींग) करुन दिलेले आहे.

तथापी त्यांनी अदयापपर्यंत समझोता /कंन्सेट ॲफिडेव्हीट करुन न दिल्यामुळे, रिटपिटीशन क्र.६१६/२००५ ही कोर्टकेस मा.उच्च न्यायालय, खंडपीठ, औरंगाबाद येथे प्रलंबीत असून न्यायप्रविष्ठ आहे. त्यास श्री.म.दि.धनेश्वर हेच व्यक्तीशः जबाबदार आहेत.

सदर रिट पिटीशन/कोर्टकेस संदर्भात उभय पक्षामध्ये झालेल्या समझोता/ तडजोडीस अनुसरुन श्री.म.दि.धनेश्वर यांनी रिट पिटीशन क्र.६१६/२००५ मा.उच्च न्यायालयातून काढून घेणेकामी,दाखल करावयाचे समझोता / कन्सेंट ॲफिडेव्हीटवर संस्थानतर्फे यापुर्वीच तत्कालीन मा.कार्यकारी अधिकारी श्री.बी.आर वाकचौरे यांनी स्वाक्षरी केलेली आहे. तसेच समझोता/ कंन्सेट ॲफिडेव्हीटवर मा.अतिरिक्त जिल्हा व सत्र न्यायालय, कोपरगाव येथे उपस्थित राहून सुपरिटेंन्डट यांचेसमोर स्वाक्षरी करुन देणेबाबत श्री.म.दि.धनेश्वर यांना दि.०६-११-२००६, दि.१०-११-२००६, दि.१५-०२-२००७, दि.१७-०३-२००७ व दि.१०-१२-२००७ रोजीचे पत्रान्वये लेखी कळविणेत आलेले आहे. त्याचप्रमाणे त्यांना वेळोवेळी समक्ष तोंडी सुचना देखील देणेत आलेल्या आहेत. असे असतांनाही त्यांनी अदयापर्यंत समझोता/कंन्सेट ॲफिडेव्हीटवर स्वाक्षरी करुन दिलेली नाही. श्री.म.दि.धनेश्वर यांना मा.व्यवस्थापन समितीची सभा दि.१३-०३-२००५ आयत्या वेळेचा निर्णय क्र.१३६ (०८) ची प्रत, मा.उच्च न्यायालय, खंडपीठ, औरंगाबाद येथे डिपॉझीट केलेली रक्कम रु.३, ७९, २९०/- मात्र बाबत महीनावाईज तक्ता, कंन्सेट ॲफिडेव्हीटचे मसुदयाची प्रत इत्यादी कागदपत्रे यापुर्वीच देणेत आलेली आहे. तरी देखील श्री.म.दि.धनेश्वर यांनी जाणून बुजून, हेतुपुरस्करपणे संस्थान प्रशासनास अडचणीत आणण्याचे हेतूने, अद्यापपर्यंत समझोता ॲफिडेव्हीट करुन दिलेले नाही व संस्थान प्रशासनास त्यांनी वेठीस धरलेले आहे.

उभय पक्षात झालेल्या तडजोडीमध्ये ठरलेप्रमाणे तसेच नेमणूक पत्रातील अटी शर्तीस अनुसरुन श्री.म.दि.धनेश्वर यांनी समझोता /कंन्सेट ॲफिडेव्हीट करुन देणे आवश्यक होते व त्यांचेवर बंधनकारक आहे असे असतांनाही त्यांनी अद्यापपर्यंत समझोता/कंन्सेट ॲफिडेव्हीट करुन दिलेले नाही. यावरुन श्री.म.दि.धनेश्वर हे समझोता/कंन्सेट ॲफिडेव्हीट करुन देणेस मुद्दाम टाळाटाळ करुन, प्रशासनास जाणून बुजून अडचणीत आनणेचा प्रयत्न करीत असल्याचे दिसून येते. श्री.म.दि.धनेश्वर हे इकडील कार्यालयीन पत्रांना, आदेशांना व वरिष्ठांनी वेळोवेळी दिलेल्या सुचनांना जुमानत नाही तसेच ते सदर कार्यालयीन पत्रांचा, आदेशांचा व वरिष्ठांमार्फत वेळोवेळी देणेत आलेल्या सुचनांचा अवमान करत आहेत. त्यांचे सदरचे कृत्य हे जाणून बुजून वेळकाढूपणाचे असून, ते गैरशिस्तवर्तनात मोडते. सदर रिट पिटीशन क्र.६१६/२००५ हे मा.उच्च न्यायालय, खंडपीठ, औरंगाबाद येथे लवकरच सुनावणीकामी बोर्डावर येण्याची शक्यता आहे. त्यावेळी श्री.म.दि.धनेश्वर यांचे समझोता ॲफिडेव्हीट करुन न देण्याचे धोरणामुळे संस्थान व प्रशासन अडचणीत येण्याची शक्यता आहे. म्हणून सदर प्रकरणाबाबत चर्चा करणेकामी श्री.आर.एन.धोर्डे, हायकोर्ट ॲडव्होकेट, औरंगाबाद यांनी त्यांचे कार्यालयात दि.०५-०९-२००७ रोजी बोलाविले होते. त्यांनी श्री.म.दि.धनेश्वर हे तडजोडीमध्ये ठरलेप्रमाणे समझोता/ कन्सेन्ट ॲफिडेव्हीट करुन देत नाहीत. ते प्रशासनास वेठीस धरत आहेत. अशा परिस्थितीत मा.न्यायाधिश, हायकोर्ट औरंगाबाद हे श्री.म.दि.धनेश्वर यांना कामावर कां ठेवले ? अशी सुनावणीचे वेळेस प्रशासनास विचारणा करेल व त्यावेळी मा.न्यायालयास उत्तर देणे अडचणीचे होईल.

त्यामुळे श्री.म.दि.धनेश्वर यांना तात्काळ संस्थान सेवेतून बडतर्फ (डिसमीस) करण्यात यावे असे चर्चेअंती सांगितले होते.

त्यानंतर श्री.म.दि.धनेश्वर यांना एक महिन्याचे लेखी नोटीशी ऐवजी एक महिन्याचा नोटीस पे रक्कम देवून संस्थान सेवेतून बडतर्फ (डिसमीस) करणेबाबत प्रस्ताव निर्णयासाठी मा.व्यवस्थापन समितीचे दि.०८-१२-२००७ रोजीचे सभेमध्ये सादर करणेत आला होता. सदर प्रस्तावावर चर्चा होऊन, श्री.म.दि.धनेश्वर यांना कोर्ट केस मागे घेणेकामी कन्सेंन्ट ॲफिडेव्हीट (समझोता प्रतिज्ञापत्र) करुन देऊन कोर्ट केस मा.उच्च न्यायालय, खंडपीठ, औरंगाबाद येथून काढून घेंणेकामी जानेवारी-२००८ अखेर लेखी मुदत देण्यात यावी. या कालावधीत त्यांनी कन्सेन्ट ॲफिडेव्हीट (समझोता प्रतिज्ञापत्र) दाखल करुन, कोर्ट केस मागे घेणेबाबत पुर्तता न केल्यास त्यांचेबाबत फेर प्रस्ताव व्यवस्थापन समितीचे पुढील सभेपुढे सादर करावा. असा निर्णय क्र.८३२ मा.व्यवस्थापन समितीचे दि.०८-१२-२००७ रोजीचे सभेमध्ये संमत झालेला आहे.

तसेच मा.व्यवस्थापन समितीचे दि.१०-०१-२००८ रोजीचे सभेमध्ये दि.०८-१२-२००७ रोजी झालेल्या व्यवस्थापन समितीचे सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणेचे वेळी पुन्हा यावर सविस्तर चर्चा होवून, उपरोक्त निर्णयाऐवजी " श्री.म.दि.धनेश्वर यांना कोर्ट केस मागे घेणेकामी समझोता/कंन्सेन्ट ॲफिडेव्हीट करुन देऊन, कोर्ट केस मा.उच्च न्यायालय, खंडपीठ, औरंगाबाद येथून काढून घेणेकामी जानेवारी-२००८ अखेर लेखी मुदत देणेत यावी. या कालावधीत त्यांनी समझोता/कंन्सेन्ट ॲफिडेव्हीट दाखल करुन, कोर्ट केस मागे घेणेबाबत पुर्तता न केल्यास त्यांचेबाबत श्री.आर.एन.धोर्डे, हायकोर्ट ॲडव्होकेट, औरंगाबाद यांचा सल्ला घेऊन पुढील कारवाई करणेत यावी." असा निर्णय क्र.४ (०३) मा.व्यवस्थापन समितीचे दि.१०-०१-२००८ रोजीचे सभेमध्ये संमत झालेला आहे.

उपरोक्त निर्णयास अनुसरुन श्री.म.दि.धनेश्वर यांना दि.३१-०१-२००८ अखेर समझोता/ कंन्सेन्ट ॲफिडेव्हीट करुन दयावे व सदर रिट पिटीशन मा. उच्च न्यायालय, खंडपीठ, औरंगाबाद येथून काढून घेणेकामी योग्य ती पुर्तता करुन दयावी. त्यांनी मुदतीत समझोता/कंन्सेंट ॲफिडेव्हीट करुन न दिल्यास, त्याचे विरुध्द पुढील योग्य ती कारवाई करणेत येईल असे जा.नं.एसएसएस/वशी-७ए/१६९/२००८ दि.१९-०१-२००८ रोजीचे पत्रान्वये लेखी कळविणेत आले आहे. तरी देखील श्री.म.दि.धनेश्वर यांनी अद्यापपर्यंत उभयपक्षात ठरलेप्रमाणे समझोता/कंन्सेन्ट ॲफिडेव्हीट करुन दिलेले नाही. तसेच सदर कोर्टकेस मा. उच्च न्यायालय, खंडपीठ, औरंगाबाद येथून काढून घेणेकामी योग्य ती पुर्तता करुन दिलेली नाही. त्यामुळे रिट पिटीशन क्र.६१६/२००५ हि कोर्ट केस अद्याप मा. उच्च न्यायालय, खंडपीठ, औरंगाबाद येथे प्रलंबीत असून, न्यायप्रविष्ठ आहे. यावरुन श्री.म.दि.धनेश्वर हे इकडील कार्यालयीन पत्रांना तसेच मा.व्यवस्थापन समितीचे निर्णयांना देखील जुमानत नाहीत. हे स्पष्ट होते.

मा.व्यवस्थापन समितीचे दि.१०-०१-२००८ रोजीचे सभेत संमत झालेल्या निर्णय क्र.४ (०३) ला अनुसरुन श्री.म.दि.धनेश्वर यांचे प्रकरणाबाबत पुन्हा संस्थान हायकोर्ट ॲडव्होकेट श्री.आर.एन.धोर्डे, औरंगाबाद यांचा दि.०८-०४-२००८ रोजी सल्ला घेणेत आला. त्यावेळी त्यांनी श्री.म.दि.धनेश्वर हे प्रत्येक वेळेस काहीतरी नविन कारण सांगून, ॲफिडेव्हीटमध्ये बदल करणेची मागणी करतात.तथापि, ॲफिडेव्हीटचा मसूदा मी तयार करुन दिलेला असून तो बरोबर आहे. त्यात बदल करण्याची आवश्यकता नाही. श्री.म.दि.धनेश्वर यांना माहे-जानेवारी-२००८ अखेर समझ ोता/कन्सेन्ट ॲफिडेव्हीट करुन देऊन, कोर्ट केस काढून घेणेबाबत अंतीम मुदत देणेत आली होती. तरी देखील त्यांनी अद्यापपर्यंत समझोता/कन्सेन्ट ॲफिडेव्हीट करुन देऊन, कोर्ट केस काढून घेणेबाबत योग्य ती पुर्तता केलेली नाही. त्यामुळे श्री.म.दि.धनेश्वर यांना लेखी आदेश न देता तोंडी सुचना देऊन तात्काळ संस्थान सेवेतून कमी (टर्मिनेट) करणेत यावे. असा तोंडी सल्ला हायकोर्ट ॲडव्होकेट श्री.आर.एन.धोर्डे, औरंगाबाद यांनी दिलेला आहे.

सबब, **श्री.मच्छिंद्र दिगंबर धनेश्वर, कनिष्ठ कामगार अधिकारी हे उभयपक्षात ठरलेप्रमाणे समझोता/ कन्सेन्ट ॲफिडेव्हीट करुन देत नाही. तसेच कोर्ट केस काढून घेणेबाबत योग्य ती पुर्तता करुन देत नाहीत. म्हणून त्यांना लेखी आदेश न देता, तोंडी सुचना देऊन तात्काळ संस्थान सेवेतून कमी (टर्मिनेट) करणेस मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही-कामगार अधिकारी)

**विषय नं.९१** **श्री नाना महिपती मेढे, मदतनीस प्रसादालय विभाग यांचे गैरशिस्त वर्तनाबाबत.**

**निर्णय क्र.५०४** श्री.नाना महिपती मेढे, मदतनीस प्रसादालय विभाग हे दि.२६-०४-२००७ पासून पुर्व परवानगीशिवाय व रजा अर्जाशिवाय विनापरवानगी कामावरुन गैरहजर आहेत. त्यांनी दि.१७-०५-२००७ रोजी दि.२६-०४-२००७ ते दि.१५-०५-२००७ या कालावधीसाठीचा खाजगी मेडीकल प्रॅक्टीशनर यांचे वैद्यकिय प्रमाणपत्रसह आजारी रजेचा अर्ज सादर केला. परंतु त्यानंतरही ते सतत, सलग प्रदिर्घकाळ विनापरवानगी गैरहजर आहेत. श्री.मेढे यांचा संस्थान सेवेतील पुर्व इतिहास बघता त्यांना यापूर्वी

विनापरवानगी गैरहजर राहीलेबद्दल १८ वेळा शासन झालेले आहे. परंतु त्यांचे वर्तनात सुधारणा न होता. उलटपक्षी झालेल्या शिक्षेस न जुमानता ते विनापरवानगी गैरहजर राहतात. त्याबद्दल जा.नं.एसएसएस/वशी-७ए/१६१५/२००७ दि.२३-०६-२००७ अन्वये त्यांचेवर आरोपपत्र ठेवून स्वतंत्र खातेचौकशी अधिकारी ॲडव्होकेट श्री.बी.वाय.काळवाघे, कोपरगांव यांचेसमोर खातेचौकशी करण्यात आली. चौकशी अधिकारी यांनी चौकशी पुर्ण करुन दि.०६-०७-२००७ रोजीचा निष्कर्ष अहवाल संस्थानला सादर केला आहे. त्यात श्री.मेढे यांचेवरील आरोप शाबीत झालेने ते दोषी आढळून आले आहेत.

श्री.मेढे हे दि.१६-०३-१९८२ पासून संस्थान सेवेत आहेत. त्यांना रजा अर्जाशिवाय कामावरुन गैरहजर राहणे, उशिरा कामावर येणे अशा प्रकारच्या गैरशिस्त वर्तनाबद्दल यापूर्वी सक्त ताकीद, विनावेतन रजा धरुन ताकीद, गैरहजेरी अनाधिकृत धरुन दंड, निलंबीत, खातेचौकशी करुन वार्षीक वेतन वाढ बंद करणे. अशा १८ वेळा शिक्षा झालेल्या आहेत. यापूर्वी श्री.मेढे हे २५० दिवस विनापरवानगी गैरहजर राहीलेबद्दल त्यांना आरोपपत्र बजावले आहे. खातेनिहाय चौकशी करुन, दि.२०-०४-२००५ चे आदेशान्वये त्यांना बडतर्फी ऐवजी तीन वार्षिक वेतनवाढी कायमच्या बंद करण्याची शिक्षा देण्यात आलेली आहे.

दि.इंडस्ट्रियल एम्प्लॉयमेंट (स्टँडींग ऑर्डर्स) रुल्स १९५९ चे कलम नं.२५ (१) नुसार गैरवर्तनाबाबत दोषी असलेल्या कामगारास/कर्मचाऱ्यास खालील प्रमाणे शिक्षा सुचित केलेल्या आहेत. अ) ताकीद दयावी किंवा ठपका दयावा किंवा ब) पेमेंट ऑफ वेजेस ॲक्ट १९३६ यांच्या तरतुदीच्या मर्यादेत राहुन आणि त्यानुसार दंड करावा(एकुण वेतनाचे ३%) किंवा क) चार दिवसांपेक्षा जास्त नाही. इतका काळ त्याला व्यवस्थापनाच्या सहीच्या लेखी आदेशाने संस्पेंड करावे. किंवा ड) नोटीशी शिवाय बडतर्फ करावे.

श्री.नाना महिपती मेढे यांना दि.इंडस्ट्रियल एम्प्लॉयमेंट (स्टँडींग ऑर्डर्स) रुल्स १९५९ चे कलम नं.२५ (१) (ड) अन्वये संस्थान सेवेतुन बडतर्फ करता येईल. त्यासाठी श्री. मेढे यांचेविरुध्द मा.उच्च न्यायालय, खंडपीठ औरंगाबाद, मा.कामगार न्यायालय, अहमदनगर, मा.औद्योगिक न्यायालय, अहमदनगर, मा.दिवानी न्यायालय (कनिष्ठ स्तर) राहाता, मा.दिवानी न्यायालय (वरिष्ठ स्तर) कोपरगांव यांचेसमोर संस्थानतर्फे कॅव्हेट अर्ज दाखल केलेले आहेत. तसेच इकडील जा.नं.एसएसएस/वशी-७ए/२३६८/२००७ दि.०१-०९-२००७ अन्वये श्री.मेढे यांना सेकंड शोकॉज नोटीस पाठवून संस्थान सेवेतून कमी का करणेत येऊ नये? याबाबत त्यांचा लेखी खुलासा मागविणेत आलेला आहे. सदरचे नोटीशीबरोबर त्यांना खातेचौकशीचा दि.०६-०७-२००७ रोजीचा निष्कर्ष अहवाल पाठविणेत आलेला आहे. श्री.मेढे यांना दि.०३-०९-२००७ रोजीचा लेखी खुलासा सादर केलेला आहे. त्यामध्ये त्यांनी आरोपपत्रातील सर्व आरोप मान्य केलेले आहे. यापुढे आरोपपत्रातील नमूद केलेल्या आरोपांची पुनरावृत्ती होऊ देणार नाही, वेळेवर कामावर येईल, पुर्व परवानगीशिवाय गैरहजर राहणार नाही. असे म्हटलेले आहे. तसेच त्यांनी सुधारणेसाठी एक वेळ संधी देऊन संस्थान सेवेत हजर करुन घ्यावे. अशी विनंती केली आहे.

**सबब, श्री.नाना महिपती मेढे, मदतनीस, प्रसादालय विभाग यांचा संस्थान सेवेतील पुर्व इतिहास तसेच आरोपपत्रातील आरोपांचे गांभिर्य विचारात घेता त्यांना दि.इंडस्ट्रियल एम्प्लॉयमेंट (स्टँडींग ऑर्डर्स) रुल्स १९५९ चे कलम नं.२५ (१) (ड) अन्वये संस्थान सेवेतुन बडतर्फ (डिसमिस) करणेस मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही-कामगार अधिकारी)

**विषय नं.९२** **श्री हरीलाल दशरथ चरभरे, स्वच्छता कामगार यांचे गैरशिस्त वर्तनाबाबत.**

**निर्णय क्र.५०५** श्री.हरीलाल दशरथ चरभरे हे संस्थानमध्ये स्वच्छता कामगार म्हणून दि.०६-०३-१९८९ पासून सेवेत होते. त्यांना यापूर्वी गैरशिस्त वर्तनाबाबत आरोपपत्र देऊन, त्यांची खातेचौकशी करणेत आली होती. खाते चौकशीमध्ये त्यांचे विरुध्द ठेवलेले आरोप सिध्द झालेने त्यांना यापुर्वी शिस्तभंगाचे कारवाईखली दि.१२-०७-२००३ पासून संस्थान सेवेतून कायम स्वरुपी बडतर्फ (Dismiss) करण्यात आले होते. जा.नं.एसएसएस/वशी-७ए/११४९/२००६ दि.०२-०५-२००६ अन्वये श्री.चरभरे यांचे दि.०१-०४-२००५ रोजीचे विनंती अर्जान्वये दि.०१-०४-२००६ रोजीचे मा.व्यवस्थापन समितीचे सभेत श्री.चरभरे यांचे बडतर्फी बाबत चर्चा होऊन निर्णय क्र.२२४ नुसार त्यांची बडतर्फी कायम करणेत आली आहे. केवळ सहानुभुतीपुर्वक, मानवतावादी दृष्टीकोनातून श्री.चरभरे हे असे कृत्य व गैरवर्तणुक पुन्हा करणार नाहीत, सदैव सर्वार्थाने शिस्त पाळतील असे श्री.चरभरे यांनी दि.२४-०४-२००६ रोजीचे बंधपत्र दिलेले असलेने श्री.चरभरे यांची दोन वर्षे परिविक्षाधीन कालावधीत रु.२०००/- दरमहा मासिक नियत वेतनावर पुन्हा नेमणुक करण्यात आलेली आहे. त्याप्रमाणे श्री.चरभरे हे दि.०४-०५-२००६ रोजी नव्याने कामावर रुजु झाले आहे.

श्री.हरीलाल दशरथ चरभरे, स्वच्छता कामगार हे दि.१०-०५-२००६ पासून सतत, सलग, प्रदीर्घकाळ विनापरवाना गैरहजर राहीले आहेत. त्यांना वेळोवेळी दि.२७-०६-२००६, दि.०२-०८-२००६ दि.११-११-२००६ रोजी कारणे दाखवा नोटीस काढून त्यांचा लेखी खुलासा मागविणेत आला होता. परंतू त्यांनी लेखी खुलासा सादर केलेला नाही व कामावरही हजर झालेले नाहीत. दि.११-११-२००६ ची नोटीस श्री.चरभरे यांना रजि.ए.डी.पोस्टाने पाठविणेत आली होती. परंतु सदरची नोटीस " मालक घेत नाही, परत रवाना " अशा पोस्टाचे शे-यासह परत आलेली आहे. श्री.चरभरे यांना प्रदीर्घकाळ विनापरवाना गैरहजर रहाणेची सवय झाली आहे.

श्री.चरभरे हे दि.१०-०५-२००६ पासून ते अद्यापपर्यंत सतत, सलग,विनापरवानगी गैरहजर आहेत. यावरुन असे स्पष्ट होते की, श्री.चरभरे यांचे वर्तणुकीत सुधारणा झालेली नाही व सुधारणा होणेची शक्यता नाही. ते संस्थान सेवेत रहाणेस इच्छुक नाहीत.स्वच्छता विभाग प्रमुख यांचेकडे चौकशी केली असता, श्री.चरभरे यांना दृष्टी दोष असल्याने त्यांना काम होत नाही. असे समजते.

सदर प्रकरणी संस्थान कामगार कायदा सल्लागार श्री.अशोकराव पाटील, ॲडव्होकेट, अहमदनगर यांनी असा सल्ला दिला आहे की, श्री.चरभरे हे परिविक्षाधीन कालावधीमध्ये काम करीत असल्यामुळे त्यांचे काम असमाधानकारक असल्याचे दर्शवून त्यांना संस्थान सेवेतून कमी करता येईल. तथापि, कमी करतेवेळी त्यांना एक महिन्याचा नोटीस पे रुपये २०००/- आदा करणेत यावा.

सबब, **श्री.हरीलाल दशरथ चरभरे, स्वच्छता कामगार, स्वच्छता विभाग यांना एक महिन्याचे नोटीसी ऐवजी एक महिन्याचा नोटीस पे रक्कम रुपये २०००/-(अक्षरी रुपये दोन हजार ) मात्र आदा करुन संस्थान सेवेतून कमी (टर्मिनेट) करणेस मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता,त्यास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही-कामगार अधिकारी)

**विषय नं.९३** **श्री रमेश तुळशीराम डांगे, वर्ग-४ कर्मचारी वाहन विभाग यांचे गैरशिस्त वर्तनाबाबत.**

**निर्णय क्र.५०६** दि.०२-११-२००६ रोजी श्री.रमेश तुळशीराम डांगे, वर्ग ४ चे कर्मचारी, वाहन विभाग यांची डयुटी वाहन चालक म्हणून नेमलेली होती. ते मा.विश्वस्त श्री.सुरेशराव वाबळे पा.यांना सायंकाळी ५-०० चे दरम्यान गुहा येथे त्यांचे निवासस्थानी सोडून ॲम्बेसेडर कार एम एच-१७ टी ६०१ ही गाडी परत शिरडी येथे घेऊन येण्यास निघाले होते. सदर गाडी परत येत असतांना साधारणतः सायंकाळी ५-३० वाजेचे दरम्यान बाभळेश्वर जवळ श्री.डांगे यांचेकडून अचानक बंद पडली. तसे त्यांनी शिरडीस वाहन विभागात कळविले. त्यामुळे वाहन विभाग प्रमुख यांनी मॅकेनिक श्री.गणेश थोरात व श्री.बाळासाहेब पाचोरे यांना त्वरीत घटनास्थळी पाठविले. त्यांनी सदर गाडीची बाहेरुन पहाणी केली असता रोडवर ऑईल पडलेले होते. व इंजिनवर ऑईल सांडलेले होते. मॅकेनिक यांनी चेंबर व ऑईल पाईप चेक केला असता त्यांना रबरी ऑईल पाईप फुटलेला व इंजिनमध्ये ऑईल नसल्याचे दिसून आले. त्यामुळे सदर गाडी दुरुस्त होऊन चालू होणार नसल्याने ती गाडी दुस-या गाडीस टोचन करुन रात्री ८-०० वाजता वाहन विभागात आणण्यात आली.

दुस-या दिवशी दि.०३-११-२००६ रोजी बोनेट उघडून पाहीले असता अल्टरनेटर जवळील ऑईल प्रेशर पाईप फुटुन इंजिनमधील सर्व ऑईल निघून गेले होते. त्या अनुषंगाने मॅकेनिक यांनी ऑईल चेंबर खोलले, एक नंबरचा कनेक्टींग कॅप खोलून पाहीला असता,कनेक्टींग वरील बेअरींग पकडलेली होती. तसेच क्रँक कनेक्टींग जरनल, कॅम शॉप्ट खराब झाल्याचे आढळून आले. त्यामुळे इंजिन लॉक होऊन बंद पडले होते.

कारचे डॅश बोर्डवर ऑईल इंडिकेटर, टेंम्प्रेचर मिटर असतांनाही श्री.डांगे हे चालवित असलेले संस्थानचे सदर कारमधील अल्टरनेटर ऑईल प्रेशर पाईप फुटुन इंजिनचे ऑईल गळून गेल्याचे, व इंजिनचे तापमान वाढल्याचे श्री.डांगे यांचे लक्षात आलेले नाही. यात श्री.डांगे यांची चुक असून त्यांनी कामात हलगर्जीपणा व निष्काळजीपणा केलेला असल्याचे दिसून येते. त्यामुळे सदर गाडी दुरुस्तीसाठी व इंजिन ओव्हरऑल साठी रु.५४,७२२/- इतका खर्च आलेला आहे. सदरच्या नुकसानीस श्री.रमेश तुळशीराम डांगे हे जबाबदार असल्याचे दिसून आले. त्याबद्दल त्यांना इकडील जा.नं.एसएसएस/वशी-७ए/२७/२००७ दि.०६-०१-२००७ अन्वये कारणे दाखवा नोटीस काढून त्यांचा लेखी खुलासा मागविणेत आला होता. श्री.डांगे यांनी दि.०८-०१-२००७ रोजीचे लेखी खुलाशात क्षमा याचना केलेली आहे. श्री.रमेश तुळशीराम डांगे,वर्ग ४ कर्मचारी वाहन विभाग यांचे उपरोक्त गैरशिस्त वर्तनाबाबत त्यांचेवर जा.नं.एसएसएस /वशी-७ए/४४१/२००७ दि.२४-०२-२००७ अन्वये ठेवण्यात आलेल्या आरोप पत्रातील आरोपांची खाते चौकशी ॲडव्होकेट श्री. बी. वाय.काळवाघे, कोपरगांव, चौकशी अधिकारी यांनी पूर्ण करुन दि.१४-११-२००७ रोजीचा निष्कर्ष अहवाल संस्थानला सादर केलेला आहे.त्यामध्ये त्यांचेवरील आरोप शाबीत झालेने ते दोषी आढळून आले आहे.

श्री.डांगे हे दि.०४-१२-२००६ पासून संस्थान सेवेत आहे. त्यांना अद्यापपर्यंत कुठल्याही प्रकारचे शासन झाले नाही. दि.इंडस्ट्रियल एम्प्लॉयमेंन्ट (स्टँडींग ऑर्डर्स) रुल्स १९५९ चे कलम नं.२५ (१) नुसार गैरवर्तनाबद्दल दोषी असलेल्या कामगारास/कर्मचा-यास खालीलप्रमाणे शिक्षा सुचित केलेल्या आहेत. त्यांना खालीलपैकी एक शिक्षा देता येईल.

अ) ताकीद द्यावी किंवा ठपका द्यावा.

ब) पेमेंट ऑफ वेजेस ॲक्ट १९३६ यांच्या तरतुदींच्या मर्यादेत राहून आणि त्यानुसार दंड करावा.

क) चार दिवसांपेक्षा जास्त नाही इतका काळ त्याला व्यवस्थापकाच्या सहीच्या लेखी आदेशाने संस्पेंड करावे.

ड) नोटीशी शिवाय बडतर्फ करावे.

अ.नं. **ड** प्रमाणे शिक्षा देणेची असल्यास संस्थानच्या वतीने श्री.डांगे यांचे विरुध्द मा.उच्च न्यायालय, खंडपीठ, औरंगाबाद, कामगार न्यायालय, औद्योगिक न्यायालय, अहमदनगर तसचे दिवानी न्यायालय (कनिष्ठ स्तर), कोपरगांव/राहाता येथे कॅव्हेट अर्ज दाखल करावे लागेल.

तसेच मा.व्यवस्थापन समितीचे दि.०६-०१-२००७ रोजीचे सभेतील निर्णय क्र.९४ अन्वये ॲम्बेसेडर कार एमएच-१७ टी-६०१ दुरुस्तीसाठी एकुण खर्च रुपये ५४,७२२/- झालेला आहे. पैकी इन्शुरंन्स कंपनीकडून रुपये २२,५००/- रक्कमेचा क्लेम मंजूर झालेला आहे. उर्वरीत रक्कम रुपये ३२, २२२/- खर्च संस्थानला करावा लागला आहे. सदरचा उर्वरीत खर्च रुपये ३२, २२२/- त्यांचेकडून वसुल करता येईल.

श्री.रमेश तुळशीराम डांगे,वर्ग ४ कर्मचारी वाहन विभाग यांना नियमानुसार दि.१४-११-२००७ रोजीचे खातेचौकशी निष्कर्ष अहवालाची प्रत पाठवावी लागेल.तसेच प्रस्तावीत केली जाणारी शिक्षा त्यांना का करु नये? याबाबत लेखी कळवावे लागेल.

तसेच श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, (शिर्डी) अधिनियम २००४(२००४ चा)महाराष्ट्र अधिनियम क्र.१४) याच्या कलम १६ मध्ये च्राज्य शासनाच्या पुर्व मान्यतेखेरीज त्या व्यक्तीचे (कर्मचा-याचे) अहित होईल अशा रितीने समितीकडून कोणताही बदल करण्यात येणार नाही आणि अशा व्यक्तीला(कर्मचा-याला)सेवेतून काढून टाकण्यात येणार नाही ”अशी तरतूद आहे.उपरोक्त तरतुदीस अनुसरुन श्री.डांगे यांना “ **ड** ” प्रमाणे शिक्षा देणेची असल्यास श्री.डांगे यांचे **“ बडतर्फी ”**संदर्भात मान्यतेसाठी राज्य शासनाकडे प्रस्ताव सादर करावा लागेल.

तरी श्री.रमेश तुळशीराम डांगे, वर्ग-४ कर्मचारी वाहन विभाग यांचेकडून याकामी संस्थानचे झालेले आर्थिक नुकसान रुपये ३२,२२२/- वसुल करावे किंवा कसे? तसेच त्यांना उपरोक्त अ,ब,क,ड पैकी कोणती शिक्षा करणेत यावी.याबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

**यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री.रमेश तुळशीराम डांगे, वर्ग-४ कर्मचारी वाहन विभाग यांचेकडून याकामी संस्थानचे झालेले आर्थिक नुकसान रुपये ३२,२२२/- रक्कम त्यांचे पगार पत्रकातुन ३० समान हप्त्यात वसुल करण्यात येऊन त्यांना शिक्षा म्हणून "ताकीद" देण्यात यावी असे ठरले.**

(कार्यवाही- कामगार अधिकारी )

**विषय न.९४** **श्रिया नितीन विव्दांस,मुंबई जागतिक मैदानी स्पर्धेसाठी निवड झाल्याने येणाऱ्या खर्चासाठी मदत मिळणेबाबत.**

**निर्णय क्र.५०७** सदरहू विषय छाननी समितीचे मान्यतेसाठी सादर करण्यात यावा असे ठरले.

(कार्यवाही-प्रशासनशाखा वशी-०३)

**विषय नं.९५** **शासन निर्देशानुसार तालुकास्तरीय लघू पशुवैद्यकीय सर्व चिकित्सालये व तालूका स्तरीय पशुवैद्यकीय दवाखाने यांना आर्थिक मदत देण्याच्या प्रस्तावावर पुनर्विचार होणेबाबत .**

**निर्णय क्र.५०८** सदरहू विषय छाननी समितीचे मान्यतेसाठी सादर करण्यात यावा असे ठरले.

(कार्यवाही-प्रशासनशाखा वशी-०३)

**विषय नं.९६** **शासन निर्देशानुसार ग्रामपंचायतींना सौर पथदिवे बसविणेकामी आर्थिक मदत देण्याच्या प्रस्तावावर पुनर्विचार होणेबाबत.**

**निर्णय क्र.५०९** सदरहू विषय छाननी समितीचे मान्यतेसाठी सादर करण्यात यावा असे ठरले.

(कार्यवाही-प्रशासनशाखा वशी-०३)

**विषय नं.९७** **वादळाने नुकसान झालेल्या जिल्हा परिषदेच्या नेवासा व नगर तालूक्यातील शाळांना आर्थिक मदत देणे बाबत**

**निर्णय क्र.५१०** सदरहू विषय छाननी समितीचे मान्यतेसाठी सादर करण्यात यावा असे ठरले.

(कार्यवाही-प्रशासनशाखा वशी-०३)

**विषय नं.९८** **विश्वशांती गुरुकुल आश्रम,केरळी ता.किनवट जि.नांदेड यांना बांधकामासाठी आर्थिक मदत देणेबाबत**

**निर्णय क्र.५११** सदरहू विषय छाननी समितीचे मान्यतेसाठी सादर करण्यात यावा असे ठरले.

(कार्यवाही-प्रशासनशाखा वशी-०३)

**विषय नं.९९** **स्व.आत्माराम डोंगरचंद शहा सेवा संस्था कोल्हापूर यांना रुग्णालयाचे उभारणीसाठी आर्थिक मदत देणेबाबत**

**निर्णय क्र.५१२** सदरहू विषय छाननी समितीचे मान्यतेसाठी सादर करण्यात यावा असे ठरले.

(कार्यवाही-प्रशासनशाखा वशी-०३)

**विषय नं.१००** **कोपरगांव,पुणतांबा व राहाता शहरांच्या पिण्याचे पाणीपुरवठा योजनेकरीता आर्थिक मदत देणेबाबत**

**निर्णय क्र.५१३** सदरहू विषय छाननी समितीचे मान्यतेसाठी सादर करण्यात यावा असे ठरले.

(कार्यवाही-प्रशासनशाखा वशी-०३)

**विषय नं.१०१** **जगदाळे मामा हॉस्पिटल बार्शी, ट्रामा युनिटच्या विकासार्थ आर्थिक मदत देणेबाबत**

**निर्णय क्र.५१४** सदरहू विषय छाननी समितीचे मान्यतेसाठी सादर करण्यात यावा असे ठरले.

(कार्यवाही-प्रशासनशाखा वशी-०३)

**विषय नं.१०२** **न.पा.वाडी ता.राहाता यांना पिण्याचे पाण्याची पाईपलाईन व पाण्याची टाकीचे बांधकामासाठी आर्थिक मदत देणेबाबत**

**निर्णय क्र.५१५** सदरहू विषय छाननी समितीचे मान्यतेसाठी सादर करण्यात यावा असे ठरले.

(कार्यवाही-प्रशासनशाखा वशी-०३)

**विषय नं.१०३** **ज्ञानेश्वर महाराज जन्मस्थान, आपेगाव येथे विकास कामासाठी आर्थिक मदत देणेबाबत.**

**निर्णय क्र.५१६** सदरहू विषय छाननी समितीचे मान्यतेसाठी सादर करण्यात यावा असे ठरले.

(कार्यवाही-प्रशासनशाखा वशी-०३)

**विषय नं.१०४** **सत्यसाईबाबा हॉस्पिटल, पंढरपुर यांना बांधकामासाठी आर्थिक मदत देणेबाबत.**

**निर्णय क्र.५१७** सदरहू विषय छाननी समितीचे मान्यतेसाठी सादर करण्यात यावा असे ठरले.

(कार्यवाही-प्रशासनशाखा वशी-०३)

**विषय नं.१०५** **श्रीसाईबाबा मंदीर फलटण, जि.सातारा यांना सांस्कृतिक भवनाच्या बांधकामास आर्थिक मदत देणेबाबत.**

**निर्णय क्र.५१८** सदरहू विषय छाननी समितीचे मान्यतेसाठी सादर करण्यात यावा असे ठरले.

(कार्यवाही-प्रशासनशाखा वशी-०३)

**विषय नं.१०६** **डी.एल.बी.बहुउद्देशीय प्रतिष्ठान, अहमदनगर यांना बुद्धीबळ स्पर्धेस आर्थिक मदत देणेबाबत.**

**निर्णय क्र.५१९** सदरहू विषय छाननी समितीचे मान्यतेसाठी सादर करण्यात यावा असे ठरले.

(कार्यवाही-प्रशासनशाखा वशी-०३)

**विषय नं.१०७** **निमगाव-कोऱ्हाळे, ता.राहाता येथील खंडोबा मंदीराचे जिर्णोद्धारास आर्थिक मदत देणेबाबत.**

**निर्णय क्र.५२०** सदरहू विषय छाननी समितीचे मान्यतेसाठी सादर करण्यात यावा असे ठरले.

(कार्यवाही-प्रशासनशाखा वशी-०३)

**विषय नं.१०८** **रोटरी सेवा ट्रस्ट, उस्मानाबाद, यांना नेत्र रुग्णालयासाठी आर्थिक मदत देणेबाबत**

**निर्णय क्र.५२१** सदरहू विषय छाननी समितीचे मान्यतेसाठी सादर करण्यात यावा असे ठरले.

(कार्यवाही-प्रशासनशाखा वशी-०३)

**विषय नं.१०९** **क्रिकेट दौऱ्यासाठी इंग्लड येथे जाण्यासाठी आर्थिक मदत मिळणेबाबत श्री अझरद्दीन जमालखॉ इनामदार रा.लाख ता.राहूरी जि.अहमदनगर यांचे अर्जाबाबत**

**निर्णय क्र.५२२** सदरहू विषय छाननी समितीचे मान्यतेसाठी सादर करण्यात यावा असे ठरले.

(कार्यवाही-प्रशासनशाखा वशी-०३)

**विषय नं.११०** **तिर्थक्षेत्र विकास कार्यक्रमाअंतर्गत शिर्डी नगरपंचायत हद्दीतील विकास कामासाठी लोकवर्गणीची रक्कम देणेबाबत**

**निर्णय क्र.५२३** सदरहू विषय छाननी समितीचे मान्यतेसाठी सादर करण्यात यावा असे ठरले.

(कार्यवाही-प्रशासनशाखा वशी-०३)

**यानंतर मा.अध्यक्ष यांचे परवानगीने आयत्या वेळेच्या विषयावर चर्चा सुरु करण्यात आली.**

**आयत्या वेळेचा**

**विषय नं. ०१** **गुंतवणूकीबाबत**

**निर्णय क्र.५२४** एप्रिल- मे, २००८ या महिन्यात साईभक्तांचे गर्दीचे प्रमाण वाढल्याने दक्षिणापेटीतील मोजणीतून प्रत्येक आठवडयाला सरासरी १.३० कोटी इतकी रक्कम प्राप्त झाली असल्याने, आज अखेर संस्थानच्या बचत खात्यात एकूण ९ कोटीपर्यंत रक्कम शिल्लक आहे. या रकमेतून दैनंदिन खर्च व इतर मोठी देयके वजा जाता रु. ६ कोटी इतकी रक्कम गुंतवणूकीसाठी उपलब्ध होत आहे.

उपरोक्तप्रमाणे उपलब्ध होणारी रक्कम ही नियमित सेवा देणा-या बँकेकडे उच्चतम व्याज दराने गुंतविल्यास त्यांचेकडून संस्थानला जास्तीत-जास्त सेवाही मिळविता येतील. विश्वस्तव्यवस्थेचे सन २००५-०६ व २००६-०७ चे वैधानिक लेखापरिक्षण करतेवेळी गुंतवणूकीसाठी उपलब्ध होत असलेली रक्कम ही स्थानिक राष्ट्रीयीकृत/सेवा देणा-या बँकेकडेच जास्तीत-जास्त व्याजदराने गुंतविण्यात यावी असे लेखापरिक्षक यांनी सुचविले असल्याने, संस्थानला प्रामुख्याने सेवा देणा-या

खालील बँकांकडून व्याजदर मागवुन जास्तीत-जास्त व्याजदर देणा-या बँकेकडे सदरची गुंतवणूक करता येईल असा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

१) युनियन बँक ऑफ इंडीया, शिर्डी
२) सेंट्रल बँक ऑफ इंडीया, शिर्डी
३) आंध्र बँक, शिर्डी
४) स्टेट बँक ऑफ इंडीया, शिर्डी-कोपरगांव
५) बँक ऑफ बरोडा, कोपरगांव
६) बँक ऑफ बरोडा, नासिक
७) बॅक ऑफ महाराष्ट्र, शिर्डी
८) विजया बँक, शिर्डी

**वरील अ. नं. १ ते ८ या बँकांकडून व्याजदर मागवुन या व्याजदराचा तपशीलवार तक्ता आजचे सभेत सादर करण्यात आला होता. यामध्ये बँक ऑफ महाराष्ट,शिर्डी यांनी एक वर्षासाठी ९.३०% इतका सर्वाधिक व्याजदर देऊ केलेला आहे. सदर व्याजदर इतर बँकांनाही देणेबाबत विनंती करावी. ज्या बँका ९.३०% व्याजदर देऊ करतील त्यांचेकडे गुंतवणूकीसाठी उपलब्ध होणारी रक्कम सम प्रमाणात गुंतविण्यात यावी असे ठरले** (कार्यवाही-मुख्य लेखाधिकारी )

**आयत्या वेळेचा**
**विषय नं. ०२** **बुकस्टॉल मधील ॲल्यूमिनियम पार्टीशनचे बीलाबाबत.**
**निर्णय क्र.५२५** प्रकाशने विभागाचे नवीन बूक स्टॉल सुरु करण्यात आले आहे. सदरचे बूकस्टॉल दोन शिफ्टमध्ये ६ ते १४ व १४ ते २२ मध्ये चालू करण्यासाठी मा.अध्यक्ष महोदय व मा.विश्वस्त सुरेश गोरक्षनाथ वाबळे यांनी सुचना केल्या होत्या. दोन शिफ्ट मध्ये बूक स्टॉल चालू करण्यासाठी सदर ठिकाणी अल्यूमिनियम पार्टीशन करुन मिळावे अशी विनंती प्रकाशने विभागप्रमुख यांनी केली होती. प्रकाशने विभागातील पार्टीशन करणेबाबत व्यवस्थापन समितीचे दिनांक १०.०१.२००८ चे सभेत चर्चा झाली आहे. त्यानुसार सदरचे काम तातडीचे असल्याने विहित पध्दतीने कोटेशन मागवून काम निम्नतम दराचे ठेकेदार यशश्री ॲल्यूमिनियम ॲण्ड ग्लास सेंटर कोपरगांव यांचेकडून पूर्ण करुन घेण्यात आले असून **याकामी रुपये २८,८६७.६५ खर्च आला असून त्यास कार्योत्तर मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली.**(कार्यवाही-बांधकाम विभागप्रमुख)

**आयत्या वेळेचा**
**विषय नं. ०३** **मौजे निमगाव- को-हाळे येथील गट ११६/२,११६/३ व ११६/६ मधील जमीन खरेदीबाबत**
**निर्णय क्र.५२६** **(अ)**मा.व्यवस्थापन समितीचे दिनांक १० जानेवारी, २००८ रोजीचे सभेतील निर्णय क्रमांक ४७ (०१) अन्वये खालील तक्त्यात नमुद केलेल्या खातेदारांच्या जमिनी रुपये २,७०,०००/- प्रती आर (अक्षरी रुपये दोन लाख सत्तर हजार मात्र) या दराने खरेदी बाबत निर्णय झालेला आहे.

| अ. नं. | जमीन मालकाचे नांव | गट नंबर | ७/१२ नुसार खरेदी करावयाचे क्षेत्र हेक्टर-आर-चौमी |
|---|---|---|---|
| ०१ | श्री.काशिनाथ गोविंद फटांगरे<br>श्री.आशिष सुरेश दौंड<br>श्री.दिपक गंगाधर साबदे | ११६/२ | ०० हे ०६ आर ०० चौमी |
| ०२ | श्री.काशिनाथ गोविंद फटांगरे | ११६/३ | ०० हे ०७ आर ०० चौमी |
| ०३ | श्री.आशिष सुरेश दौंड<br>दिपक गंगाधर साबदे | ११६/६ | ०० हे ०७ आर ०० चौमी |

मा.व्यवस्थापन समितीच्या निर्णयानुसार, संबंधित खातेदारांना व त्याचे प्रतिनिधी श्री. रोहिदास रेवजी गुंजाळ, राहणार संगमनेर यांना इकडील दिनांक १२ फेब्रुवारी, २००८ व दिनांक २१ जानेवारी, २००८ रोजीच्या पत्राने सदरहू जमिनीचे खरेदीखत करण्याच्या दृष्टीने व इतर कायदेशीर बाबींची पूर्तता व्हावी म्हणून आवश्यक असणारी कागदपत्रे व माहिती इकडील कार्यालयास सादर करणेबाबत कळविण्यात आलेले होते. संबंधित खातेदारांचे प्रतिनिधी श्री. गुंजाळ यांना जमिनीचा मोजणी नकाशा, खातेदारांचे संमतीपत्र, विसार पावती रद्द केल्याबाबतचा करारनामा याबाबतची पूर्तता करणेबाबत सांगणेत आलेले होते. तद्नंतर वेळोवेळी खातेदारांचे प्रतिनिधी श्री. गुंजाळ यांचेशी दूरध्वनीवरुन संपर्क साधून तसेच समक्ष कार्यालयातील भेटींमध्ये कागदपत्रांची पूर्तता करणेबाबत विनंती करण्यात आलेली होती. तथापि, संबंधित खातेदारांनी अथवा त्यांचे प्रतिनिधी श्री.गुंजाळ यांनी संपूर्ण कागदपत्रे व माहिती दिली नाही.

दरम्यानचे कालावधीत, दिनांक २४ जानेवारी, २००८ रोजी संस्थान वकील ॲड. जे.के. गोंदकर यांना सदरहू जमिनीचा सर्च रिपोर्ट घेणेबाबत व जमीन खरेदीविषयी अभिप्राय देणेबाबत पत्र देण्यात आले. संस्थान वकील ॲड. गोंदकर यांनी सदरहू जमिनीचा सर्च रिपोर्ट घेऊन दिनांक ०२ फेब्रुवारी, २००८ रोजी सर्च रिपोर्ट व खरेदीखताच्या मसुद्यासह आपला अभिप्राय इकडील कार्यालयास

सादर केला. संस्थान वकिलांच्या अभिप्रायानुसार संबंधित खातेदारांना व त्यांचे प्रतिनिधी श्री.गुंजाळ यांना वर परिच्छेदात नमुद केलेले दिनांक १२ फेब्रुवारी, २००८ रोजीचे पत्र देण्यांत आलेले होते.

संबंधित खातेदार व त्यांचे प्रतिनिधी श्री. गुंजाळ यांनी दिनांक २० फेब्रुवारी, २००८ रोजी पत्र देऊन, काही अपूर्ण कागदपत्रे इकडील कार्यालयास सादर केली. सदरहू पत्रामध्ये संबंधितांनी अकार्यालयीन भाषेमध्ये यानंतर कोणतेही कागदपत्रे मिळणार नाहीत, श्री.गुंजाळ यांची विसार पावती रद्द करुन मिळणार नाही, तसेच सदरहू व्यवहार दिनांक २८ फेब्रुवारी, २००८ पर्यन्त पूर्ण करावा, असे कळविले.

श्री. गुंजाळ यांनी सादर केलेल्या कागदपत्रांचे अवलोकन केले असता असे निदर्शनास आले की, गट नंबर ११६/२ मधील ०३ खातेदारांमध्ये जमीन ही प्रत्येकाचे वेगवेगळे क्षेत्र खरेदीखताने घेतलेले आहे व त्याची नोंद खरेदीखतात आहे. मात्र कामगार तलाठी, निमगांव कोऱ्हाळे यांनी वेगवेगळया क्षेत्राची नोंद न करता सर्वांचीच नावे ७/१२ला दाखल केली होती. तसेच गट नंबर ११६/६ मध्ये फक्त आशिष सुरेश दौंड यांचे नांव लागलेले होते परंतु सूची क्रमांक २ मध्ये श्री. दिपक गंगाधर साबदे यांचीही नोंद आढळून आली. त्यामुळे कामगार तलाठी, निमगांव कोऱ्हाळे यांचेशी संपर्क साधून त्यांचेकडून खरेदीखताचे सुची क्रमांक ०२ प्रमाणे नोंदी करण्यात येऊन गट नंबर ११६/२ व गट नंबर ११६/६ चे सुधारीत ७/१२ चे उतारे तयार करवून घेण्यात आले.

सदरहू नोंदीबाबत माहिती देणेकामी व संबंधित खातेदारांनी दिलेल्या २० फेब्रुवारी, २००८ रोजीच्या अर्जानुसार श्री. गुंजाळ यांना समक्ष कार्यालयामध्ये बोलावून त्यांचेशी जमीन खरेदीविषयी चर्चा करण्यात आली असता, सदरहू चर्चेचे वेळेस संबंधित खातेदारांचे प्रतिनिधी श्री. गुंजाळ यांनी मा.व्यवस्थापन समितीच्या निर्णयाप्रमाणे १० टक्के रक्कम राखीव ठेवून त्याप्रमाणे खरेदीखत करणेस तयार नाही, त्याऐवजी जमिनीची मोजणी करुन देतो, त्याप्रमाणे जमिनीची संपूर्ण रक्कम मिळावी, असे सांगितले. श्री. गुंजाळ यांचे सांगणेप्रमाणे प्रथम बिनशेती कामासाठी करण्यात आलेल्या पूर्वीच्या सन २००५ मध्ये झालेल्या मोजणीचे नकाशे उपलब्ध करुन घेणेबाबत मा.तालुका निरीक्षक, भूमि अभिलेख, कोपरगांव यांचेकडेस कार्यालयामार्फत प्रयत्न करण्यात आले. तथापि सदरहू जमिनीचे पूर्वीचे मोजणी नकाशे प्राप्त झाले नाहीत.

पूर्वीचे मोजणी नकाशे प्राप्त न झाल्याने संबंधित खातेदारांना व त्यांचे प्रतिनिधींना इकडील दिनांक ०७ मार्च, २००८ रोजीचे पत्रान्वये कळविण्यात आले. तद्नंतर संबंधित खातेदारांनी सदरहू जमीन मोजणी कामी मोजणी शुल्क दिनांक २४ मार्च, २००८ रोजी भरले. त्यानंतर कार्यालयामार्फत भूमी अभिलेख कार्यालयाशी संपर्क साधून सदरहू जमिनीची मोजणी प्राधान्याने दिनांक ०८ एप्रिल, २००८ रोजी संस्थानच्या कंत्राटी मोजणीदाराच्या समक्ष करुन घेण्यात आली. तद्नंतर पुन्हा एकदा भूमी अभिलेख कार्यालयामार्फत मोजणीत आढळून आलेल्या त्रुटी दूर करणेसाठी दिनांक ०८ मे, २००८ रोजी पुन्हा मोजणी करण्यात आली.

त्यानंतर दिनांक १६ मे, २००८ रोजी इकडील कार्यालयामार्फत भूमि अभिलेख कार्यालयाकडून सदरहू जमिनीचे मोजणी नकाशे प्राप्त करवून घेण्यात आले.

**(ब)** मा.तालुका निरीक्षक, भूमि अभिलेख, कोपरगांव यांचेकडून प्राप्त झालेल्या उपरोक्त जमिनीच्या मोजणी नकाशांचा अहवाल खालीलप्रमाणे :

अर्जदारांनी इकडील कार्यालयास सादर केलेल्या उपरोक्त मोजणी नकाशांचे अवलोकन केले असता, खालीलप्रमाणे बाबी स्पष्ट होत आहेत :

| अ. नं. | खातेदाराचे नांव | गट नंबर | ७/१२ नुसार क्षेत्र हेक्टर-आर-चौमी | मोजणी रजिष्टर नंबर | मोजणी नुसार ताब्यात मिळणारे क्षेत्र |
|---|---|---|---|---|---|
| **०१** | **श्री.काशिनाथ गोविंद फटांगरे<br>श्री.आशिष सुरेश दौंड<br>श्री.दिपक गंगाधर साबदे** | **११६/२** | **०० हे ०६ आर ०० चौमी** | **८७८/२००८** | **०० हे ०६ आर ०० चौमी** |
| ०२ | श्री.काशिनाथ गोविंद फटांगरे | ११६/३ | ०० हे ०७ आर ०० चौमी | ८७७/२००८ | ०० हे ०७ आर ०० चौमी |
| ०३ | श्री.आशिष सुरेश दौंड<br>श्री.दिपक गंगाधर साबदे | ११६/६ | ०० हे ०७ आर ०० चौमी | ८७६/२००८ | ०० हे ०२ आर ४१ चौमी |

उपरोक्त तक्त्याचे अवलोकन केले असतां,

०१. अ.नं. ०१ मधील गट नंबर ११६/२ चे क्षेत्र ७/१२चे उताऱ्यावर नोंद असलेप्रमाणे भरत असून, ते मोजणी / मोजमापानुसार ताब्यात घेणे योग्य राहिल.

०२. अ.नं. ०२ मधील गट नंबर ११६/३ चे क्षेत्र ७/१२ चे उताऱ्यावर नोंद असलेप्रमाणे भरत असून, ते मोजणी / मोजमापानुसार ताब्यात घेणे योग्य राहिल.

०३. अ.नं. ०३ मधील गट नंबर ११६/६ चे क्षेत्र ७/१२ चे उताऱ्यावर ०७ आर आहे. परंतु दिनांक १० एप्रिल, २००८ रोजीचे मोजणीनुसार सदरहू क्षेत्र फक्त ०२ आर ४१ चौमी भरत आहे. म्हणजेच ०४ आर ५९ चौमी कमी आहे.

वर नमुद केलेल्या खातेदारांपैकी श्री.आशिष सुरेश दौंड व श्री. दिपक गंगाधर साबदे यांचे गट नंबर ११६/६ चे ७/१२ प्रमाणे क्षेत्र ०० हे ०७ आर चौमी आहे. मात्र मोजणीमध्ये सदरहू क्षेत्र ०० हे ०२ आर ४१ चौमी भरले म्हणजे ०० हे ०४ आर ५९ चौमी क्षेत्र कमी भरते. कायदेशीरदृष्टया ७/१२चे उताऱ्यावर असलेल्या संपूर्ण क्षेत्राची नोंद करुन, प्रत्यक्ष ताब्यात मिळालेल्या जमिनीची किंमत आदा करुन खरेदीखत करणे आवश्यक राहिल. तसेच कमी भरलेल्या क्षेत्राची रक्कम संस्थानकडे राखून ठेवणे आवश्यक राहील. संबंधित खातेदारांनी संपूर्ण क्षेत्र उपलब्ध करुन दिलेनंतर राखून ठेवलेली रक्कम देता येईल.

या बाबींचा उल्लेख खरेदीखतात करुन खरेदीखताची कार्यवाही करणेत यावी किंवा कसे याबाबत चर्चा करणेकरीता श्री. गुंजाळ यांना दिनांक १९ मे, २००८ रोजी कार्यालयात बोलविण्यांत आले होते. त्यांचेशी मा.कार्यकारी अधिकारी यांचे कक्षात सविस्तर चर्चा करण्यात आली. तद्नंतर श्री. गुंजाळ यांनी सर्व खातेदारांच्या वतीने खालील आशयाचा अर्ज इकडील कार्यालयास दिला :

" .. .. निमगांव कोऱ्हाळे येथील सर्व्हे नंबर ११६/२/३/६ एन.ए. प्लॅाटचा व्यवहार आपणांबरोबर मागील ०६ महिन्यांपूर्वी ठरलेला होता. सदरचा व्यवहार हा वेळेत पूर्ण न झाल्यामुळे या पूर्वीची ठरलेली प्रती आरची किंमत आम्हांला मान्य नाही.

त्यामुळे आजच्या बाजारभावानुसार आम्हाला प्रती गुंठा ५,००,०००/- (अक्षरी रुपये पाच लाख मात्र) प्रमाणे मिळणेस विनंती आहे. सदरचा व्यवहार हा दिनांक ३०-५-२००८ पर्यन्त पूर्ण करण्यात यावा. "

**(क)** श्री. गुंजाळ यांनी त्यांचे अर्जात सदरचा व्यवहार हा वेळेत पूर्ण न झाल्यामुळे या मागील ०६ महिन्यांपूर्वी ठरलेली रक्कम रुपये २,७०,०००/- मात्र प्रति आर ही किंमत आम्हांस मान्य नाही, असे नमूद केलेले आहे. परंतु प्रत्यक्षात वर नमुद केलेल्या पूर्वपीठीकेतील परिच्छेद अ व ब मधील बाबींचे अवलोकन करता असे दिसून येईल की, संबधित खातेदार अथवा त्यांचे प्रतिनिधी श्री. गुंजाळ यांनी पूर्णपणे कुठलेही कागदपत्र सादर केलेले नाहीत तसेच मा.व्यवस्थापन समितीच्या निर्णयाप्रमाणे १० टक्के रक्कम राखून ठेवून खरेदी व्यवहार करणेस ही त्यांनी संमती दिलेली नाही. तसेच मोजणी होऊन मोजणी नकाशे प्राप्त होणेस संबंधित खातेदारांकडून उशीर लागल्याने इकडील कार्यालयामार्फत संपूर्ण सहकार्य करुन ही सदरचा व्यवहार पूर्ण होऊ शकलेला नाही.

आता, श्री. गुंजाळ यांनी दिनांक १९ मे, २००८ रोजी दिलेल्या अर्जानुसार, त्यांना प्रति गुंठा / आर रुपये पाच लाख मात्र किंमत हवी आहे व सदरहू व्यवहार दिनांक ३० मे, २००८ पूर्वी पूर्ण करण्यात यावा, असे कळविलेले आहे.

याबाबत सविस्तर चर्चा करणेकामी उपरोक्त संबंधित खातेदारांचे प्रतिनिधी श्री. रोहिदास रेवजी गुंजाळ यांना आजचे सभेपुढे बोलविण्यांत आलेले आहे.

उपरोक्त परिच्छेदांमध्ये नमूद केलेल्या विवेचनास अनुसरुन गट नंबर ११६ पैकी मधील संबंधित खातेदार यांनी मागणी केलेली प्रती आर रुपये ५,००,०००/- मात्र (अक्षरी रुपये पांच लाख मात्र) इतकी किंमत देण्यांत यावी किंवा कसे, तसेच गट नंबर ११६/६ मधील कमी भरत असलेले क्षेत्राची रक्कम राखून ठेवून, ७/१२ चे उताऱ्यावर नोंद असलेल्या संपूर्ण क्षेत्राची खरेदीखतात नोंद करुन, खातेदाराने कमी भरत असलेले क्षेत्र उपलब्ध करुन दिलेनंतर राखून ठेवलेली रक्कम आदा करण्यात यावी किंवा कसे याबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केलेला होता.

उपरोक्तप्रमाणे मा. कार्यकारी अधिकारी यांनी सादर केलेल्या प्रस्तावावर साधकबाधक चर्चा करणेत आलेली. विषयांकित जमिनीचे म्हणजेच मौजे निमगांव कोऱ्हाळे गट नंबर ११६ पैकीच्या लगतच्या संस्थान मालकीच्या क्षेत्रात गट नंबर १७२ मध्ये शिर्डी साई ट्रस्ट, चेन्नई यांच्या आर्थिक देणगीतून उभारण्यात येणाऱ्या साईआश्रम प्रकल्प भाग २ चे बांधकाम प्रगतीपथावर आहे. तसेच गट नंबर १७२ मधील उर्वरित क्षेत्रामध्ये भक्तांच्या निवासासाठी भक्तनिवासस्थान इमारतीच्या बांधकामासाठी आर्थिक सहाय्य करण्यास काही देणगीदार संस्था / व्यक्तींनी तयारी दर्शविलेली आहे. त्यामुळे गट नंबर १७२ मध्ये सुलभरितीने व विनासायास जाणे-येणेसाठी लगतच्या गट नंबर ११६ पैकी मधील उपरोक्त विषयांकित गट नंबर ११६/२, ११६/३ व ११६/६ मधील २० आर जमीन खरेदी करणे अत्यंत आवश्यक आहे. तसेच संस्थान मालकीच्या गट नंबर १७२ मध्ये भक्तांच्या सुविधेसाठी रहिवास बांधकाम करतांना, सदरहू

क्षेत्रामध्ये सुलभरित्या जाणे-येणेसाठी रस्ता नसल्याने, सदरहू क्षेत्रात रहिवास बांधकामास परवानगी देण्यास अडचणी येत असल्याचे नगररचना कार्यालयाने कळविलेले आहे. या सर्व बाबींचा विचार करुन विषयांकित गट नंबर ११६ पैकी मधील २० आर क्षेत्र खरेदी करणे अत्यंत आवश्यक आहे. प्रस्तावात नमूद केल्याप्रमाणे विषयांकित जमिनींच्या मालकांनी सदरहू क्षेत्राची मोजणी केली असता, एकूण २० आर क्षेत्रांऐवजी फक्त १५ आर ४१ चौमी क्षेत्र भरले व त्याप्रमाणे ते ताब्यात मिळणार होते. त्यानुसार ताब्यात न मिळणारे ०४ आर ५९ चौमी क्षेत्राची किंमत राखून ठेवून खरेदी खत करणेबाबत संबंधित जमीनमालकांना तोंडी कळविण्यांत आले. त्यानंतर संबंधित जमीनमालकांनी व त्यांचे प्रतिनिधी श्री.गुंजाळ यांनी अर्ज देऊन, रक्कम रुपये ५ लाख प्रति आर किंमत मिळावी, अशी विनंती केली होती. त्याबाबत श्री. गुंजाळ आजचे सभेपुढे चर्चा करणेसाठी उपस्थित होते.

विषयांकित जमिनीचे खरेदीसाठी श्री.गुंजाळ यांचेशी चर्चा केली असतां, श्री.गुंजाळ यांनी असे सांगितले की, सदरहू जमीन बिनशेती झालेली आहे. मोजणीमध्ये जरी क्षेत्र कमी भरत असलेतरी, ते क्षेत्र लगतच्या चारीमध्ये गेलेले आहे. त्यामुळे २० आरचे खरेदीखत करुन, संपूर्ण क्षेत्राची रक्कम मिळावी. सदरहू जमिनीची सरकारी मोजणी करुन घेणेमध्ये बराच कालावधी गेलेला आहे. सदरच्या कालावधीत सदरहू जमिनीच्या भोवतालच्या जमिनींचे भाव साधारणतः ४ ते ५ लाख रुपये प्रति गुंठा झ ाालेले आहेत. तसेच सदरहू सर्व जमीन एकत्रितरित्या विकावयाची आहे. जमिनीच्या वाढलेल्या किंमती विचारात घेऊन पूर्वी ठरलेली प्रति आर रुपये २,७०,०००/- मात्र ही किंमत रद्द करुन त्याऐवजी प्रति आर रुपये ५,००,०००/- मात्र याप्रमाणे एकत्रित २० आरची पण प्रत्यक्ष ताब्यात मिळणारे क्षेत्राची किंमत रक्कम रुपये १,००,००,०००/- मात्र मिळावी. थोडक्यात श्री. गुंजाळ यांनी ताब्यात मिळणारे १५ आर ४१ चौमीची एकूण किंमत रुपये १,००,००,०००/- मात्र मिळावी, अशी अपेक्षा व्यक्त केली. तसेच श्री. गुंजाळ यांनी पुढे असे सांगितले की, सदरहू जमिनी जमीनमालकांनी एकत्रित मिळून विकत घेतलेल्या असून, तीन ही प्लॉटचा सलग एकच प्लॉट आहे, फक्त व्यवहाराच्या सोयीच्या दृष्टीने खरेदीखत वेगवेगळे केलेले आहेत. त्यामुळे संस्थानला जमीन विकणेसाठी ७/१२ उताऱ्यानुसार जरी वेगवेगळे खरेदीखत केले तरीदेखील मिळणारी रक्कम आम्ही जमीनमालक एकत्रित वापरणार आहोत.

श्री. गुंजाळ यांनी केलेल्या विनंतीवर सविस्तर चर्चा करुन, विषयांकित गट नंबर ११६ पैकी मधील २० आर क्षेत्राची संस्थानला रहिवास बांधकाम परवानगी मिळण्याच्या दृष्टीने अत्यंत आवश्यकता आहे. सदरहू क्षेत्र खरेदी केल्याशिवाय संस्थान मालकीचे गट नंबर १७२ मधील क्षेत्रामध्ये सुलभरित्या जाणे-येणे शक्य होणार नाही तसेच कायदेशीर वहिवाटीचा रस्ता उपलब्ध नाही. भूसंपादनाच्या पर्यायाचा विचार करता, भूसंपादन करण्यास साधारणतः २ ते ३ वर्षाचा कालावधी लागणार आहे. भूसंपादन पूर्ण होईपर्यन्त सदरहू जमिनीची किंमतही वाढलेली असेल. तसेच ७/१२ नुसार २० आर क्षेत्राची खरेदी होणार असल्याने, विषयांकित जमिनीचा वापर रस्त्याबरोबरच, या ठिकाणी बांधण्यात येणाऱ्या निवासस्थानांमध्ये उतरणाऱ्या भक्तांच्या वाहनांसाठी वाहनतळ म्हणून उपयुक्त ठरणार आहे. या बाबींचा विचार करतां, सदर क्षेत्राच्या खरेदीसाठी पूर्वी ठरलेल्या किंमतीऐवजी विषयांकित गट नंबर ११६ पैकी मधील २० आर जमिनीची पण प्रत्यक्ष ताब्यात मिळणारे १५ आर ४१ चौमी या क्षेत्रासाठी एकत्रित रक्कम रुपये ५६,००,०००/- मात्र इतकी किंमत देणेस हरकत नाही. मात्र खरेदीखत ७/१२ वर नमूद करण्यात आलेल्या संपूर्ण क्षेत्राचे करण्यात यावे. ताब्यात मिळणारे एकूण क्षेत्र १५ आर ४१ चौमीसाठी रक्कम रुपये ५६,००,०००/- मात्र आदा करण्यात यावेत. खरेदीखतात उर्वरित क्षेत्र नंतर संस्थानच्या ताब्यात मिळाल्यास त्याची वेगळी रक्कम आदा केली जाणार नाही तसेच संबंधित जमीनमालकांचा या उर्वरित क्षेत्रावर कुठलाही प्रकारचा हक्क राहणार नाही, याची नोंद करण्यात यावी. तसेच मा.व्यवस्थापन समितीच्या दिनांक १० जानेवारी, २००८ रोजीचे सभेत ठरल्यानुसार, **सदरहू क्षेत्राची खरेदी करणे व इतर अनुषंगिक कायदेशीर बाबी पूर्ण करणेसाठी येणाऱ्या योग्य त्या सर्वसमावेशक खर्चास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही-बांधकाम विभागप्रमुख)

**आयत्या वेळेचा**
**विषय नं. ०४** **श्रीसाईबाबा व श्रीसाईनाथ रुगणालयासाठी सन २००८-०९ या वर्षातील वार्षिक औषधे खरेदीकामी प्राप्त झालेल्या निविदा उघडणेबाबत**

**निर्णय क्र.५२७** श्री साईनाथ रुग्णालय व श्री साईबाबा रुग्णालयासाठी सन २००८-२००९ या वर्षाकरीता लागणाऱ्या वार्षिक औषधे खरेदीकामीचा अंदाजे रु. ११,२३,९१,६५५/- चे खर्चाचा प्रस्ताव मा.व्यवस्थापन समिती सभा दि.१५/०४/२००८ चे सभेपुढे मान्यतेसाठी ठेवण्यात आला होता. सदरचे सभेतील मंजुरीनुसार वार्षिक औषधे खरेदीकामी संस्थानचे विहीत पध्दतीने वर्तमान पत्रात जाहिरात देण्यात येऊन थेट उत्पादक कंपन्यांना संस्थान खर्चाने पत्र देखील पाठविण्यात यावे, असे ठरले होते.

त्यानुसार उपरोक्त वार्षिक औषधे खरेदीकामी दैनिक टाईम्स ऑफ इंडिया - मुंबई आवृत्ती, दैनिक सकाळ - पुणे (टुडे) आवृत्ती, लोकसत्ता- मुंबई आवृत्ती, लोकमत -औरंगाबाद (शहर) आवृत्ती,

दैनिक सामना - मुंबई आवृत्ती, दैनिक पुढारी - कोल्हापूर आवृत्ती इत्यादी वर्तमान पत्रात जाहिरात प्रसिध्द करण्यात आलेली होती. त्यानुसार दि.२३/०४/२००८ ते दि. १३/०५/२००८ अखेर संस्थानचे शिर्डी व मुंबई येथील कार्यालयात निविदा फॉर्म विक्रीसाठी ठेवण्यात आलेले होते. निविदा स्विकारण्याची अंतिम मुदत दि.१५/०५/२००८ अखेर ठेवण्यात आलेली होती.तसेच एकुण २१३ कंपन्याना इकडील पत्र क्र.५८१८ दि. १७/०४/२००८ अन्वये जाहिरातीबद्दल अवगत करणेबाबत कळविण्यात आले होते. शिर्डी येथील कार्यालयात १७५ निविदा विक्रीसाठी ठेवण्यात आल्या होत्या, तर मुंबई येथील कार्यालयात १२५ निविदा विक्रीसाठी ठेवण्यात आल्या होत्या. सदरच्या जाहिरातीस अनुसरुन शिर्डी व मुंबई कार्यालयात एकूण २६२ निविदांची विक्री झालेली आहे व १७६ सिलबंद निविदा प्राप्त झालेल्या आहेत. त्या खालील प्रमाणे-

| S.N. | Name of Supplier | S.N. | Name of Supplier |
|---|---|---|---|
| 1 | Advance Cardiologix, Mumbai | 89 | Bio-medicon Systems (I) Pvt.Ltd., Mumbai |
| 2 | Advanced Technologies, Thane (W) | 90 | Biomerieux India Pvt.Ltd.,Mumbai |
| 3 | Advanced Vascular Technologies, Thane (W) | 91 | Bora Agencies, Ahmednagar |
| 4 | Alkem Laboratories Ltd, Mumbai | 92 | Capro Labs Exports India Pvt.Ltd., Bangalore |
| 5 | Almet Healthcare Pvt.Ltd., Mumbai | 93 | Cardiac Care, Kolhapur |
| 6 | Alpha Enterprises, Mumbai | 94 | Cardio Products, Mumbai |
| 7 | Anand Marketing Co., Dombivali West | 95 | Centaur Pharmaceuticals Pvt.Ltd., Mumbai |
| 8 | Arcom Medical Devices (P) Ltd., Hyderabad | 96 | Chaitanya Pharmaceuticals Pvt. Ltd.,Nashik |
| 9 | Atul Medical, Pune | 97 | Chetna Enterprises, Ahmednagar |
| 10 | Aura Medical Techonologies, Mumbai | 98 | Choksi Imaging Limited, Thane |
| 11 | Austin Healthcare, Pune | 99 | Cosmos Enterprises, Mumbai |
| 12 | B. Braun Medical (India) Pvt.Ltd., Mumbai | 100 | Critical Care Systems, Pune |
| 13 | B.L.Lifesciences Pvt.Ltd., New Delhi | 101 | D. Vijay Pharma Pvt. Ltd., Nashik |
| 14 | Balaji Medicos, Sangamner | 102 | Datt Mediproducts Ltd., New Delhi |
| 15 | Becton Dickinson India Pvt.Ltd., Mumbai | 103 | Deo Enterprises, Pune |
| 16 | Bhairavprasad Life Savings, Ahmednagar | 104 | Edwards Lifesciences (I) Pvt. Ltd., Mumbai |
| 17 | Bharat Serum & Vaccinces Ltd., Mumbai | 105 | Elite Healthcare India Pvt.Ltd., New Delhi |
| 18 | Emergent Meditech (I) Pvt. Ltd., Mumbai | 106 | Kundan Surgicals, Ahmednagar. |
| 19 | Everest Laboratories, Meerut | 107 | Lancer Medical Tenchnology Pvt.Ltd., Ahmedabad |
| 20 | Franco Indian Pharmaceuticals Pvt.Ltd., Mumbai | 108 | Laxmi Medical Stores, Bidri |
| 21 | Fresenius Kabi India Pvt. Ltd., Mumbai | 109 | Life Care Medical Systems, Pune |
| 22 | Galaxy Medical Devices Pvt. Ltd., Mumbai | 110 | Life Line Surgicals & Pharmaceuticals, Kopargaon |
| 23 | Galpha Lab. Ltd., Chhattisgarh | 111 | LifeCare Devices Private Limited, Mumbai |
| 24 | H & H Pharmaceuticals Pvt. Ltd., Mumbai | 112 | Mahesh Surgical & Pharmaceuticals, Pune |
| 25 | Hansraj Nayar Medical India, Mumbai | 113 | Mantri Agencies, Ahmednagar |
| 26 | Harmony Bio-medicals, Mumbai | 114 | Mariyam Medicals & Generals Stores, Shrirampur |
| 27 | Healthpro Pharmaceuticals Pvt.Ltd., Pune | 115 | Mauli Pharma & Surgical Distributors, Kopargaon |
| 28 | Heart Beat Intervention Pvt. Ltd., Mumbai | 116 | Maureen Surgical Company, Aurangabad |
| 29 | Hem Agenices, Kopargaon | 117 | Mil Laboratories Pvt.Ltd., Mumbai |
| 30 | Hestar Diagnostics Pvt.Ltd., Mumbai | 118 | Milan Enterprises, Ahmednagar |
| 31 | Hindustan Healthcare, Nashik | 119 | MRK Healthcare, Mumbai |
| 32 | Hindustan Latex Ltd. Mumbai | 120 | N.P. Agencies, Mumbai |
| 33 | Hindustan Photofilm Mfg. Co. Ltd, Mumbai | 121 | Nachiketa Enterprises, Soygaon - Malegaon |
| 34 | ICPA Health Products Pvt. Ltd, Mumbai | 122 | Nagarjun Marketing Services, Nashik |
| 35 | Imaging Products Ind. Ltd., Mumbai | 123 | Navkar Ethicals, Lingur |
| 36 | Indoco Remedies Ltd., Mumbai | 124 | Navshakti Ayurvedalaya (P) Ltd., Bhusawal |
| 37 | Indu Pharma, Jejuri | 125 | Neha Agencies, Ahmednagar |
| 38 | Inpharm Services, Pune | 126 | Neha Enterprises, Pune |
| 39 | Intermedics, Mumbai | 127 | Nero Fire Services, Aurangabad |
| 40 | Interventional Technologies Pvt.Ltd., Mumbai | 128 | Nidhi Life Care, Mumbai |

| | | | |
|---|---|---|---|
| 41 | IVES Drugs (India) Pvt. Ltd., Indore | 129 | Nipro Medical India Pvt.Ltd., Chennai |
| 42 | J.B. Chemicals & Pharmaceuticals Ltd, Mumbai | 130 | Nirmal Agencies, Ahmednagar |
| 43 | J.S.P.Surgical, Nashik | 131 | Olympic Pharmacare Pvt.Ltd., New Delhi |
| 44 | Jaya Enterprises, Latur. | 132 | Om Medical & General Stores, Shrirampur |
| 45 | Jayant Medical Agencies, Nashik | 133 | Omni Lens Pvt.Ltd., Ahmedabad |
| 46 | Jayant Medical Agencies, Nashik | 134 | Panacea Biomedicals, Pune |
| 47 | JCPL Pharma Pvt. Ltd., Jalgaon | 135 | Pankaj Pharma, Pune |
| 48 | Jeevan Medicals & Agencies, Shrirampur | 136 | Parenteral Drug (India) Ltd., Indore |
| 49 | K. Praveen Medical & General Stores, Jalgaon | 137 | Perk Pharmaceuticals Services, Mumbai |
| 50 | Kabra Medicals, Jalgaon | 138 | Pest Control (India) Pvt.Ltd., Pune |
| 51 | Kanchan Drugs Pvt.Ltd., Pune | 139 | Pharmacea Link, Pune |
| 52 | Kapil Medicals, Jalgaon | 140 | Pharmaco, Pune |
| 53 | Karwa Agencies, Sangamner | 141 | Pinnacle Biomed Pvt.Ltd., Mumbai |
| 54 | Kaustubh Enterprises, Mumbai | 142 | Prabhat Agencies, Sangamner |
| 55 | Kemwell Enterprises, Pune | 143 | Prince Medical & Gen. Stores, Nashik |
| 56 | Keps Pharma, Mumbai | 144 | R.R. Diagnostics, Dhule |
| 57 | Krishna Enterprises, Aurangabad | 145 | Rahul Brothers, Mumbai |
| 58 | Kumar Brothers Pharma Pvt. Ltd., Mumbai | 146 | Raman & Weil Pvt. Ltd., Mumbai |
| 59 | Regalia Pharmaceuticals (I) Pvt.Ltd., Pune | 147 | Siddhi Medical Distributors, Aurangabad |
| 60 | Renuka Surgical Systems, Aurangabad | 148 | Sinocare Surgicals Pvt.Ltd., Mumbai |
| 61 | Rishabh Trading Co. Mumbai | 149 | Sinsan Pharmaceuticals, Pune |
| 62 | S.P. Distributors, Pune | 150 | Spandan Biotech, Aurangabad. |
| 63 | S.S. Pharma Agency, Mumbai | 151 | Spandan Enterprises, Nashik |
| 64 | S.S. Scientific Co., Dhule | 152 | Summit Healthcare Pvt.Ltd., Mumbai |
| 65 | Sai Medical Systems, Jalgaon | 153 | Surgilink, Shrirampur |
| 66 | Saikrupa Medicals, Kopargaon | 154 | Surya Surgi Pharma, Nashik |
| 67 | Saili Surgicals, Shirdi | 155 | Suyash Pharmaceuticals, Shrirampur |
| 68 | Saitrons Medical Equipments, Loni | 156 | Tarun Pharmaceuticals, Aurangabad |
| 69 | Sandeep Agencies,Kopargaon | 157 | Three S. Distributors, Pune |
| 70 | Sandhya Agencies, Nashik | 158 | Tirupati Enterprises, Pune |
| 71 | Sanghavi Enterprises, Mumbai | 159 | Transasia Bio-Medicals Ltd., Mumbai |
| 72 | Sanjay Agencies, Ahmednagar. | 160 | Trilok Agency, Shrirampur |
| 73 | Sanjay Medical & General Stores, Pimpri-Pune | 161 | TTK Healthcare Limited, Mumbai |
| 74 | Sanjivani Agency, Ahmednagar | 162 | UNIBIO, Mumbai |
| 75 | Sanjivani Medical & Gen. Stores, Ahmednagar | 163 | United Distributors, Nashik |
| 76 | Sanket Enterprises, Solapur | 164 | Universal Chemicals, Nashik |
| 77 | Sarv Healthcare Pvt. Ltd., Mumbai | 165 | Vaibhav Agency, Pune |
| 78 | Scimed Technologies Pvt.Ltd., Mumbai | 166 | Vardhaman Generics, Pune |
| 79 | Shafa Med. & Gen. Stores, Rahuri | 167 | Vascular Concepts Ltd., Mumbai |
| 80 | Shalaks Pharmaceuticals Pvt.Ltd., New Delhi | 168 | Vasmed Technologies, New Delhi |
| 81 | Shivkrupa Medical & General Stores, Sinnar | 169 | Veritaz Healthcare Limited, Hyderabad |
| 82 | Shree Distributors, Aurangabad | 170 | Vet-Med Chemical, Nashik |
| 83 | Shree Enterprises, Pune | 171 | Vishal Agencies, hmednagar. |
| 84 | Shree Pacetronix Ltd., Pune | 172 | Xion Pharmaceuticals, Pune |
| 85 | Shree Sai Surgicals, Beed | 173 | Yash Enterprises, Beed |
| 86 | Shreeji Agency, Shrirampur | 174 | Yoga Enterprises, Pune |
| 87 | Shreya Enterprises, Ahmednagar | 175 | Zenith Surgical Co., Mumbai |
| 88 | Shriniwas Agencies, Ahmednagar | 176 | Zyphars Pharmaceutics Pvt.Ltd., Pune |

**उपरोक्तप्रमाणे प्राप्त झालेल्या निविदा आजचे सभेत समक्ष उघडण्यात आल्या. या निविदांचा तुलनात्मक तक्ता तयार करुन तो व्यवस्थापन समितीचे सभेपूढे निर्णयार्थ सादर करावा असे ठरले.**

(कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

**आयत्या वेळेचा**

**विषय नं. ०५** **श्रीसाईबाबा रुग्णालयातील प्रयोगशाळा विभागातील Minividas मशिनचे केमिकल खरेदीबाबत.**

**निर्णय क्र.५२८** श्री साईबाबा रुग्णालयातील प्रयोगशाळा विभागासाठी दि. १३/०१/२००८ रोजीचे मा. व्यवस्थापन समिती सभेतील मंजुरी अन्वये मे. बायोमेरीयुक्स इंडीया प्रा. लि., नवी दिल्ली यांना इकडील पत्र क्र. १७५५ दि. २९/०१/२००८ अन्वये मिनी विडास मशिनचा रु. १५,५०,०००/- चा पुरवठा आदेश देण्यात आलेला असून त्यांनी आदेशाप्रमाणे मशिनचा पुरवठा केलेला आहे.

सदरचे मशिन कार्यान्वित करण्यात आलेले असून सदर मशिनवर थायरॉईड, फर्टीलिटी, टुमर, ॲलर्जी, एचआयव्ही तसेच इन्फेक्शनच्या तपासण्या करणेकामी प्रयोगशाळा विभागाने दि. ०४/०४/२००८ रोजी खालीलप्रमाणे किटची मागणी केलेली आहे. सदर मिनीविडास हे बायोमेरीयुक्स या कंपनीचे असून सदर मशिनकरीता त्याच कंपनीचे केमीकल्स लागतात. त्यामुळे मे. बायोमेरीयुक्स इंडीया प्रा. लि., नवी दिल्ली यांचेकडून सदर किट खरेदीकामी फॅक्सव्दारे दर मागविण्यात आले होते. त्यामध्ये त्यांनी त्यांचेकडून सदरची केमीकल्स उपलब्ध होतील असे कळविले आहे. त्या चा तपशिल खालीलप्रमाणे -

| SR.NO. | DESCRIPTION | TEST | Qty. | RATE PER | TOTAL IN RS. |
|---|---|---|---|---|---|
| | **AIDS** | | | | |
| 1 | VIDAS HIV ULTRA SENSITIVE | 60 | 1 Kit | 7502.00 | 7502.00 |
| | **SEROLOGY** | | | | |
| 1 | VIDAS CMV IgG | 60 | 1 Kit | 7563.00 | 7563.00 |
| 2 | VIDAS CMV IgG AVIDITY | 30 | 1 Kit | 1694.00 | 1694.00 |
| 3 | VIDAS CMV IgM | 30 | 1 Kit | 5082.00 | 5082.00 |
| 4 | VIDAS RUB IgG II | 60 | 1 Kit | 7381.00 | 7381.00 |
| 5 | VIDAS RUB IgM | 30 | 1 Kit | 5082.00 | 5082.00 |
| 6 | VIDAS TOXO IgG AVIDITY | 30 | 1 Kit | 4235.00 | 4235.00 |
| 7 | VIDAS TOXO IgG II | 60 | 1 Kit | 7381.00 | 7381.00 |
| 8 | VIDAS TOXO IgM | 60 | 1 Kit | 8107.00 | 8107.00 |
| | **THYROID** | | | | |
| 1 | VIDAS T3 | 60 | 2 Kit | 3600.00 | 7200.00 |
| 2 | VIDAS T4 | 60 | 2 Kit | 3600.00 | 7200.00 |
| 3 | VIDAS TSH | 60 | 2 Kit | 3600.00 | 7200.00 |
| | **ANEMIA** | | | | |
| 1 | VIDAS FERRITIN | 60 | 1 Kit | 8954.00 | 8954.00 |
| | **REPRODUCTION / FERTILITY** | | | | |
| 1 | VIDAS ESTRADIOL II | 60 | 1 Kit | 8954.00 | 8954.00 |
| 2 | VIDAS FSH | 60 | 1 Kit | 7865.00 | 7865.00 |
| 3 | VIDAS HCG | 60 | 1 Kit | 7744.00 | 7744.00 |
| 4 | VIDAS LH | 60 | 1 Kit | 7865.00 | 7865.00 |
| 5 | VIDAS PROGESTERONE | 60 | 1 Kit | 8954.00 | 8954.00 |
| 6 | VIDAS PROLACTIN | 60 | 1 Kit | 7744.00 | 7744.00 |
| 7 | VIDAS TESTOSTERONE | 30 | 1 Kit | 6050.00 | 6050.00 |
| | **ALLERGY** | | | | |
| 1 | **VIDAS TOTAL IGE** | 60 | 1 Kit | 9075.00 | 9075.00 |
| | **TUMOR MARKERS** | | | | |
| 1 | VIDAS AFP | 60 | 1 Kit | 11755.00 | 11755.00 |
| 2 | VIDAS CA 125™ | 30 | 2 Kit | 9196.00 | 18392.00 |
| 3 | VIDAS CA 15-3$^0$ | 30 | 1 Kit | 8107.00 | 8107.00 |
| 4 | VIDAS CA 19-9™ | 30 | 1 Kit | 8107.00 | 8107.00 |
| 5 | VIDAS CEA | 60 | 1 Kit | 12070.00 | 12070.00 |
| 6 | VIDAS TPSA | 60 | 2 Kit | 11253.00 | 22506.00 |
| | **CARDIOVASCULAR DISEASE** | | | | |
| 1 | VIDAS CK-MB | 30 | 1 Kit | 4840.00 | 4840.00 |
| 2 | VIDAS TROPONIN I | 60 | 1 Kit | 16002.00 | 16002.00 |
| 3 | VIDAS D-DIMER EXCLUSION | 60 | 1 Kit | 20570.00 | 20570.00 |
| 4 | VIDAS PROTEIN C | 30 | 1 Kit | 9075.00 | 9075.00 |
| 5 | VIDAS VWF | 30 | 1 Kit | 12826.00 | 12826.00 |
| | | | **Total in Rs.** | **293082.00** | |

वरील किटची वार्षिक औषधे खरेदी सन २००८-०९ मध्ये मागणी केलेली असून सदरच्या किट उपलब्ध होण्यास अजुन २-३ महिन्याचा कालावधी लागणार आहे. तेंव्हा सध्या दोन महिने पुरु शकेल इतक्या किट खरेदी करण्याचा प्रस्ताव असून, सदरचे खरेदीकामी रु. २,९३,०८२/- इतका खर्च अपेक्षित आहे.

तरी **वरीलप्रमाणे मिनीविडास या मशिनकरीता लागणारे केमीकल्स मे. बायोमेरीयुक्स इंडीया प्रा. लि., नवी दिल्ली यांचेकडून खरेदी करण्यास व याकामी येणाऱ्या रु. २,९३,०८२/- चे खर्चास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

**आयत्या वेळेचा**

**विषय नं. ०६** **श्रीसाईनाथ रुग्णालयात Stapedectmy & Functional Endoscopic Sinus & Skull Base Surgery Camp चे आयोजन करणेबाबत.**

**निर्णय क्र.५२९** डॉ.मिलींद नवलाखे, के.ई.एम.हॉस्पिटल,मुंबई यांनी त्यांचे दिनांक २८.४.२००८ चे पत्रान्वये श्री साईनाथ रुग्णालयात डॉ.रविंद्र कुलकर्णी, वरिष्ठ वैद्यकीय अधिकारी यांनी अशी विनंती केली आहे की, Stapedectmy & Functional Endoscopic Sinus & Skull Base Surgery Camp चे श्री

साईनाथ रुग्णालयात आयोजन करण्याचे विचाराधीन असून सदर शिबीरातील शस्त्रक्रिया आपण कराव्यात असे कळविले आहे.

त्यानुसार डॉ.मिलींद नवलाखे हे दिनांक २१.०६.२००८ ते दिनांक २३.०६.२००८ अखेर तीन दिवस श्री साईनाथ रुग्णालयात येऊन सदर शिबीरातील रुग्णांच्या शस्त्रक्रिया करण्यास तयार आहेत त्यासाठी त्यांनी प्रती रुग्ण रुपये १,०००/- याप्रमाणे मानधनाची अपेक्षा केलेली आहे किंवा अपण ठरवाल ते प्रती रुग्ण याप्रमाणे मानधन घेण्यास तयार आहे तसेच ते यापूढेही साईनाथ रुग्णालयास मानधन तत्वावर व्हिजीट देऊन अश प्रकारच्या नवनवीन शस्त्रक्रिया करण्यास उत्सूक आहेत.

यापूर्वी एप्रिल २००४ मध्ये श्री साईनाथ रुग्णालयात डॉ.नवलाखे यांचे सहकार्यातून Nasal Endoscope व D C R या शिबीराचे आयोजन करण्यात आले होते. सदर शिबीराचा ३० रुग्णांनी लाभ घेतला होता व सदर शिबीरात त्यांनी सेवाभाव म्हणून टी.ए.डी.ए. फक्त रुपये २,०००/- घेतला होता.

या शिबीरात दैनंदिन ओपीडीत रुग्णांची तपासणी करुन रुग्ण निवड करता येईल निवड झालेल्या रुग्णांना या शिबीरात सहभागी करुन घेतले जाईल. सदर रुग्णांची तपासणी व Endoscopy करुन निदान झालेल्या रुग्णांवर Skull base या आजाराव उपचार तसेच कानाच्या शस्त्रक्रिया केल्या जातील अशा रुग्णांना या शिबीराचा फायदा घेता येईल. याउलट जर या शिबीराची जाहिरात दिल्यास परिसरातील गरजू रुग्णही या शिबीराचा फायदा घेऊ शकतील. या शिबीरात अंदाजे ३० रुग्णांची तपासणी व शस्त्रक्रिया केल्या जातील. यासाठी संस्थानला खालीलप्रमाणे खर्च करावा लागेल.

| अ.नं. | तपशिल | अंदाजे रक्कम रुपये |
|---|---|---|
| ०१ | जाहिरात खर्च - या शिबीराची जाहिरात करणेसाठी बॅनर छपाई तसेच न्यूज पेपरला जाहिरात देण्याऐवजी न्यूज अॅटम देता येईल फक्त बोर्ड खर्च स्थानिक प्रिंटरकडून करुन घेता येईल. | २,०००/- |
| ०२ | फ्री अॅडमिशन- या शिबीरातील रुग्ण रुग्णालयात फ्री अॅडमिट करुन घ्यावे लागेल त्यासाठी लॅब व इतर तपासणी, शस्त्रक्रिया मोफत करावया लागतील त्यासाठी अप्रत्यक्ष खर्च | ३०,०००/- |
| ०३ | शस्त्रक्रिया खर्च- या शिबीरात येणारे तज्ञ डॉ.नवलाखे यांना प्रत्येक केसेससाठी रुपये १,०००/- प्रमाणे मानध्न आदा करावे लागेल या शिबीरात अंदाजे ३० रुग्णांवर शस्त्रक्रिया केली जाणार आहे त्यासाठी अंदाजे खर्च | ३०,०००/- |
| ०४ | औषधे - या शिबीरासाठी स्टोअर विभागामार्फत Teflon Pistons Netcell pack व काही औषधे खरेदी करावी लागेल. सदर स्थानिक पुरवठाधारकाकडून खरेदी करता येईल त्यासाठी अंदाजे खर्च | २०,०००/- |
| ०५ | उद्घाटन खर्च- या शिबीराचे उद्घाटनासाठी अंदाजे खर्च | २,०००/- |
| ०६ | चहा-भोजन- या शिबीरात आलेल्या रुग्णांना तीन दिवसासाठी चहा व जेवणाची व्यवस्था नित्याचे रुग्णाप्रमाणे करावी लागेल त्यासाठी अंदाजे खर्च | १,२००/- |
| | एकूण अंदाजे खर्च रुपये | ८५,२००/- |

**तरी उपरोक्तप्रमाणे** Stapedectmy & Functional Endoscopic Sinus & Skull Base Surgery Camp **संस्थानमार्फत हे दिनांक २१.०६.२००८ ते दिनांक २३.०६.२००८ अखेर तीन दिवस श्री साईनाथ रुग्णालयात आयोजित करण्यास व त्याकामी येणारे अंदाजे रुपये ८५,२००/- चे खर्चास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही-वैद्यकीय अधिक्षका, साईनाथ रुग्णालय)

**आयत्या वेळेचा**
**विषय नं. ०७** **कु.धनश्री देहाडराय,पुणतांबा हिचे मृत्यू प्रकरणी नुकसान भरपाई मिळणेबाबत.**
**निर्णय क्र.५३०** सदरहू विषय तूर्त स्थगित करण्यात यावा,असें ठरलें. (कार्यवाही-वैद्यकीय संचालक))

**आयत्या वेळेचा**
**विषय नं. ०८** **युरोच्या विनीयम दरात झालेल्या वाढीमुळे येणाऱ्या वाढीव खर्चास मान्यता मिळणेबाबत.**
**निर्णय क्र.५३१** श्रीसाईबाबा हॉस्पिटल साठी मशिनरी खरेदी कामी विहित पध्दतीने वर्तमानपत्रामधे जाहिरात देऊन निविदा मागविण्यात येतात त्यावर मा.व्य.स.सभेत पुरवठादारांशी चर्चा/वाटाघाटी होऊन खरेदी बाबत निर्णय घेण्यात येतो. चर्चा/वाटाघांटीमध्ये मशिनरीची मुळ किंमत युरो/डॉलर मध्ये निश्चित करुन एल.सी व्दारे पेमेंट करण्याबाबत ठरविले जाते. राष्ट्रीय कृत बँकेत येरो/डॉलरच्या प्रचलीत दराप्रमाणे येणा-या रकमेच्या ११०% रक्कम डिपॉझिट म्हणुन ठेवण्यात येते व मशिनरी आयात झाल्यानंतर पोर्ट वरुन सोडवुन घेताना सदर डिपॉझिट मधुन कंपनीला

खरेदी आदेशात देऊ केलेले युरो/डॉलर त्यावेळी असलेल्या विनिमय दरानुसार रक्कम वजावट होऊन उर्वरीत रक्कम संस्थानच्या खात्यात जमा केली जाते.

अशाप्रकारे ठरावाप्रमाणे खरेदी आदेशात कंपनीला मुळ किंमत युरोमधे देण्याचे निश्चित करण्यात आले होते व त्या वेळी असलेल्या विनिमय दराप्रमाणे भारतीय रुपयात रकमेचा उल्लेख केला होता. सदर ठरावाची प्रत दि.२८/०४/२००८ रोजी प्राप्त झाली आहे. दरम्यानच्या कालावधीत अर्थव्यवस्थेमध्ये झालेल्या घडामोडीमुळे युरोचा विनिमय दर रु.५६/- पासुन ते रु.६७/- वाढला आहे. दिनांक १६.३.२००८ रोजीचे मा.व्यवस्थापन समितीचे सभेतील निर्णयानुसार खालील नमुद केलेल्या मशिनरीचे पुरवठा आदेश देण्यात आलेले आहे व त्यासाठी आपणास राष्ट्रीयकृत बँकेमध्ये खरेदी आदेशात नमुद केल्याप्रमाणे युरो/डॉलरची एल.सी. उघडवयाची आहे. युरो/डॉलरच्या किंमतीत झालेल्या वाढीमुळे एल.सी. उघडणेकामी अंदाजे आजचे दरानुसार रु.९,५८,५६७/- इतका जादा खर्च येणार आहे.

| अ.न. | पुरवठादाराचे नांव | निश्चित केलेले युरो | विनिमय दर रु. | एकुण किंमत रु. | सध्याचा विनिमय दर रु. | वाढीव खर्च रु. | एल.सी व्दारे खरेदी मुळे कस्टम डयुटी **बचत** |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | मे इएसबी डायनामेड | १०६९९ | ६४.५० | ६.९०,०८५.०० | ६६.७९ | २४,५०१.०० | ६७,०२८.०० |
| २ | मे लॅब इंडिया | २०३६८ | ५८.०० | ११,८१,३४४.०० | ६६.७९ | १,७९,०३४.०० | ४,४८,९२५.०० |
| ३ | मे इएसबी डायनामेड | ७००९९ | ५६.०० | ३९,२५,५४४.०० | ६६.७९ | ७,५५,०३२.०० | ६,८५,०९३.०० |
| | | | | एकुण रक्कम रु.- | | ९,५८,५६७.०० | १२,०१,०४६.०० |

विनीमय दरातील वाढ/घट हि बाब संस्थान व कंपनीच्या नियंत्रणा बाहेर असल्यामुळे जादा खर्च येत आहे. परंतु युरोच्या विनिमय दरात वाढ होऊन सुदधा एल.सी. व्दारे पेमेंट करून केंद्रशासनाकडे सिमाशुल्क माफिचा प्रस्ताव सादर करून संस्थानची रु.१२,०१,०४६/- इतकी बचत होईल.

**तरी याकामी येणा-या वाढीव खर्चास मान्यता मिळुन संस्थानच्या नावे मशिनरी आयात करुन एल.सी ओपन करुन त्या त्या वेळी असणाऱ्या विनिमय दराप्रमाणे खरेदी करण्यास व यापुढे अशा प्रकारे एल.सी.व्दारे देण्यात येणाऱ्या खरेदी आदेशास त्या त्या वेळी असणाऱ्या विनिमय दराप्रमाणे एल.सी.उघडून करुन खरेदी करण्यास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता,त्यास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

**आयत्या वेळेचा**

**विषय नं. ०९** **श्रीसाईप्रसादालय इमारतीमध्ये मुख्य किचन,बुंदी किचन,चपाती किचन या ठिकाणी वायुविजनची व्यवस्था करणेसाठी येणाऱ्या खर्चाचे एस्टिमेटबाबत.**

**निर्णय क्र.५३२** श्री साई प्रसादालय इमारतीचे बांधकाम पुर्ण करण्यात आले आहे. सदर इमारतीमध्ये मुख्य किचन, बुंदी किचन, स्टोअर व इतर आवश्यक ठिकाणी यांत्रिक स्वरुपाची वायुवीजनची व्यवस्था करणेसाठी प्रसादालय विभागामार्फत मा.व्यवस्थापन समितीसमोर प्रस्ताव सादर करण्यात आला होता. त्यानुसार हा प्रस्ताव दिनांक १०-०१-२००८ च्या मा.व्यवस्थापन समितीच्या सभेत मान्य करण्यात आल्यानुसार वर्तमानपत्रात जाहिरात दिल्यानंतर तीन निविदा प्राप्त झाल्या होत्या. प्राप्त झालेल्या निविदा दिनांक ११-०३-२००८ रोजी झालेल्या मा.व्यवस्थापन समितीच्या सभेत, निविदा सादरकर्त्यांचे कमर्शिअल बीडस समक्ष उघडण्यात येऊन निविदासादरकर्त्यांशी समक्ष चर्चा/वाटाघाटी केल्या असता त्यांनी खालीलप्रमाणे दर देऊ केले होते.

| अ.नं | निविदासादरकर्त्यांचे नांव | निविदेतील दर रुपये | चर्चा/वाटाघाटीमध्ये देऊ केलेले दर रुपये |
|---|---|---|---|
| ०१ | मे. डिझाईन ईंजिनिअर्स, मुंबई | एकुण प्रकल्प खर्चाच्या १.२६ टक्के | ३,०१,०००.०० |
| ०२ | मे. विराज बिल्डिंग इंजिनिअरींग सर्व्हिस प्रा.लि., मुंबई | ५,००,००० + विमान खर्च + टॅक्सी भाडे + ड्रॉईंग + इतर खर्च | ३,५०,०००.०० |
| ०३ | मे. मार्क कंसल्टिंग इंजिनिअर्स, मुंबई | ५,००,०००.०० | ४,००,०००.०० |

यावर दिनांक १६.०३.२००८ रोजी झालेल्या मा.व्यवस्थापन समितीच्या सभेत निर्णय क्र. २२३ अन्वये सविस्तर चर्चा होऊन, श्री साई प्रसादालय इमारतीमध्ये मुख्य किचन, बुंदी किचन, चपाती किचन याठिकाणी वायुवीजनची व्यवस्था करणेसाठी मे. डिझाईन ईंजिनिअर्स, मुंबई यांची निम्नतम दराची निविदा स्विकारणेत येऊन त्यांना संस्थान जा.क्र.एसएसएस - विद्युत - ४५१३/२००८ दिनांक २७-०३-२००८ अन्वये रक्कम रु. ३,०१,०००.०० इतक्या रकमेचा कार्यादेश देण्यात आलेला आहे.

आता मे. डिझाईन ईंजिनिअर्स, मुंबई यांनी या कामासाठी रु. ४,२५,००,०००.०० इतका खर्च कळविला असून श्री साई प्रसादालय इमारतीमध्ये मुख्य किचन, बुंदी किचन, चपाती किचन याठिकाणी वायुवीजनची व्यवस्था करणेसाठी अंदाजे रक्कम रुपये ४,२५,००,०००.०० ( रु. चार कोटी पंचवीस लाख मात्र ) इतका खर्च अपेक्षित आहे.

ऊपरोक्त प्रस्तावावर विचार होऊन श्री साई प्रसादालय इमारतीमध्ये मुख्य किचन, बुंदी किचन, चपाती किचन याठिकाणी वायुवीजनची व्यवस्था करणेसाठी येणाऱ्या उपरोक्त अपेक्षित

खर्चास तसेच या कामासाठी वर्तमानपत्रात जाहिरात देऊन टेंडर मागविणेस मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

**यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साई प्रसादालय इमारतीमध्ये मुख्य किचन, बुंदी किचन, चपाती किचन याठिकाणी वायुवीजन व्यवस्था करणेकामी मा.विश्वस्त श्री.शैलेश श्रीहरी कुटे यांचे अध्यक्षतेखाली समिती नेमण्यात येऊन त्यांनी पहाणी करुन आपला अहवाल व्यवस्थापन समितीस सादर करावा,असे ठरलें.** (कार्यवाही-अधिक्षक प्रसादालय/विद्युत विभाग प्रमुख)

**आयत्या वेळेचा**

**विषय नं. १०** **समाधी मंदिरातील व चारही महाद्वारात स्टेनलेस स्टील रेलिंग तयार करुन बसविणेकामी कार्यादेश दिलेल्या ठेकेदाराने काम करावयास नकार दिल्याने सेकंड लोएस्टला कार्यादेश देणेबाबत.**

**निर्णय क्र.५३३** समाधी मंदिरातील व चारही महाव्दारात स्टेनलेस स्टील रेलींग तयार करुन बसविणेबाबत व त्यासाठी येणा-या रक्कम रुपये २४,५३,२३१.०० इतक्या खर्चाचा प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीचे दिनांक २८-०७-२००७ चे सभेतील विषय क्र.५७ निर्णय क्र. ५६८ अन्वये मान्य करण्यात आला असून या कामासाठी आलेली टेंडर्स मा.व्यवस्थापन समितीचे दिनांक १०-०१-२००८ रोजी शिर्डी येथे झालेल्या सभेत उघडण्यात आली. उपरोक्तप्रमाणे प्राप्त झालेल्या निविदा सभेत उघडण्यात येऊन निविदासादकर्त्यांना समक्ष चर्चा/वाटाघाटीसाठी बोलविण्यात आले असता त्यांनी खालीलप्रमाणे दर देऊ केलेले होते.

| अ.क्र. | पार्टीचे नांव | टेंडरमधील दर रुपये | चर्चा / वाटाघाटीअंती देऊ केलेले दर रुपये |
|---|---|---|---|
| ०१. | मे.साई इंजिनिअर्स , अंबड, नाशिक | २४,१९,६१७.०० | १८,१४,७१३.०० |
| ०२. | मे. श्री समर्थ इंडस्ट्रीज, भोसरी, पुणे. | २८,३९,७०२.०० | २६,९७,७१७.०० |
| ०३. | मे. शेखर जे.साळवे, संगमनेर | २९,०७,५१७.०० | २८,३४,५३८.०० |
| ०४ | मे.प्रथमेश कन्स्ट्रक्शन्स, कल्याण | १८,१४,६२३.०० | १७,२३,८९२.०० |

यावर सविस्तर चर्चा होऊन, मे.प्रथमेश कन्स्ट्रक्शन्स, कल्याण यांची निम्नतम दराची निविदा स्वीकारण्यात येऊन त्यांना तातडीने कार्यादेश देण्यात यावा असे ठरले.

मा.व्यवस्थापन समितीचे दिनांक १०-०१-२००८ रोजी शिर्डी येथे झालेल्या सभेत उपरोक्त निर्णय क्र.२१ अन्वये समाधी मंदिरातील व चारही महाव्दारात स्टेनलेस स्टील रेलींग तयार करुन बसविणेबाबत मे.प्रथमेश कन्स्ट्रक्शन्स, कल्याण यांनी दिलेले दर रु. १७,२३,८९२.०० ( मूळ दर रु. १८,१४,६२३.०० वजा ५ % डिस्काऊंट रु.९०,७३१.०० = रु. १७,२३,८९२.०० ) मान्य करण्यात आले होते. त्यानुसार मे.प्रथमेश कन्स्ट्रक्शन्स, कल्याण यांना संस्थान जा. क्र. एसएसएस-विद्युत-१८७०-२००८ दि.३१-०१-२००८ अन्वये कार्यादेश देण्यात आला होता.

कार्यादेश मिळाल्यानंतर मे.प्रथमेश कन्स्ट्रक्शन्स, कल्याण यांनी संस्थानकडे कोणत्याही प्रकारचा संपर्क साधला नाही. तसेच दूरध्वनीवरून संस्थानने संपर्क साधला असता कामाबाबत समाधाकारक माहिती देऊ शकले नाही. काम चालू न केल्याने संस्थान पत्र क्र. एसएसएस-विद्युत-४९८९-२००८ दि.०३-०४-२००८ अन्वये मे.प्रथमेश कन्स्ट्रक्शन्स, कल्याण यांना लवकरात लवकर काम चालू करण्यास कळविण्यात आले होते.

आता मे.प्रथमेश कन्स्ट्रक्शन्स, कल्याण यांनी दिनांक ०८-०४-२००८ रोजी एक पत्र पाठवून हे काम करण्यास ते तयार नसल्याचे व त्यांची ऑर्डर रद्द करावी म्हणून विनंती केली आहे.

वरील मे.प्रथमेश कन्स्ट्रक्शन्स, कल्याण यांची अर्नेस्ट मनी डिपॉझीटची रक्कम रू. २४,०००.०० ( रु. चोवीस हजार मात्र) संस्थान कडे जमा आहे. त्यांनी आता काम करण्यास नकार दिला आहे.

तरी **मे.प्रथमेश कन्स्ट्रक्शन्स, कल्याण यांना दिलेला कार्यादेश रद्द करून निगॉशिएशननुसार सेकंड लोएस्ट असलेले मे. साई इंजिनिअर्स,अंबड, नाशिक यांना रु. १८,१४,७१३.०० इतक्या रकमेचा कार्यादेश देणेची तसेच मे.प्रथमेश कन्स्ट्रक्शन्स, कल्याण यांना दिलेला कार्यादेश रद्द केल्यानंतर संस्थानने दिलेले काम करण्यास नकार दिल्याबद्दल मे.प्रथमेश कन्स्ट्रक्शन्स, कल्याण यांची अर्नेस्ट मनी डिपॉझीटची रक्कम रू.२४,०००.०० ( रु. चोवीस हजार मात्र) जप्त करून संस्थानमध्ये जमा करून घेण्यास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही-विद्यूत विभागप्रमुख)

**आयत्या वेळेचा**

**विषय नं. ११** **पोस्टेज स्टॉकमधुन भेट देण्यात आलेली प्रकाशने किमतीसह कमी करणेबाबत.**

**निर्णय क्र.५३४** प्रकाशने विभागाद्वारा मा. कार्यकारी अधिकारी व मा. प्रशासकीय अधिकारी यांनी वेळोवेळी दिलेल्या मान्यता प्राप्त आदेशानुसार संस्थानअंतर्गत ज्या त्या खात्याचे संबंधीत संपर्कातील अधिकाऱ्यांना तसेच वेगवेगळया क्षेत्रातील अतिमहत्त्वाच्या व्यक्तिंना त्यांचे शिर्डी भेटीअंती जनसंपर्क कार्यालयामार्फत यात उच्चपदस्थ शासकीय अधिकारी, सिने कलावंत , नामांकित लेखक, आंतरराष्ट्रीय खेळाडू, विविध दुरचित्र वाहिन्यांचे व वृत्तपत्रांचे प्रतिनिधी याप्रमाणे मान्यवरांना भेट म्हणून खालील दर्शविल्याप्रमाणे पुस्तके/फोटो व कॅसेट/सी.डी.दैनंदिनी/दिनदर्शिका प्रकाशने विभागाकडून माहे एप्रिल २००७ ते माहे मार्च २००८ या कालावधीत मोफत देण्यात आलेली आहेत.

**पुस्तके-**

| अ.न. | पुस्तकाचे नांव | भाषा | मोफत दिलेले नग संख्या | छपाई दर रुपये पैसे | छपाई किंमतीने होणारी रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| पीयुबी ०१ | श्री साई सच्चरित | मराठी | १८२ | ५९.९० | १०,९०१.८० |
| पीयुबी ०२ | श्री साई सत्चरित्र | हिंदी | ७६ | २१.७० | १,६४९.२० |
| पीयुबी ०३ | श्री साई सत्चरित्र | इंग्रजी | ५० | २३.३० | १,१६५.०० |
| पीयुबी ०४ | श्री साई सत्चरित्र | गुजराथी | ५ | २८.९० | १४४.५० |
| पीयुबी ०५ | श्री साई सत्चरित्र | कन्नड | ३ | २१.२३ | ६३.६९ |
| पीयुबी ०६ | श्री साई सत्चरित्र | तेलगू | ५ | २६.०० | १३०.०० |
| पीयुबी ०७ | श्री साई सत्चरित्र | तामिळ | ७ | ३१.८४ | २२२.८८ |
| पीयुबी १० | साईलिलामृत | मराठी | १ | ९.२० | ९.२० |
| पीयुबी १२ | साईलिलामृत | गुजराथी | १ | १२.७५ | १२.७५ |
| पीयुबी १४ | श्री साई सगुणोपासना आरती | मराठी | १ | १.६८ | १.६८ |
| पीयुबी २१ | श्री साई स्तवन मंजरी | इंग्रजी | १ | २.९० | २.९० |
| पीयुबी २३ | अर्वाचिन भक्त व संत लिलामृत यातील चार अध्याय | मराठी | १ | ३.९० | ३.९० |
| पीयुबी २४ | रुद्राध्याय (११ वा अध्याय) | मराठी | १ | १.८४ | १.८४ |
| पीयुबी २७ | श्री साईनाथ भजनमाला | हिंदी | १ | २४.७० | २४.७० |
| पीयुबी २८ | विष्णू सहस्त्रनामावली | मराठी | २ | १.९० | ३.८० |
| पीयुबी २९ | मुलांचे साईबाबा | मराठी | ४ | ४.०० | १६.०० |
| पीयुबी ३३ | मुलांचे साईबाबा | कन्नड | १ | ३.०० | ३.०० |
| पीयुबी ३५ | मुलांचे साईबाबा | तामिळ | १ | ५.०० | ५.०० |
| पीयुबी ३६ | साई दि. सुपरमॅन | इंग्रजी | १ | ६.४० | ६.४० |
| पीयुबी ३९ | खापर्डे डायरी | इंग्रजी | १ | ९.०० | ९.०० |
| पीयुबी ४० | श्री साईबाबा चित्रावली | मराठी/इंग्रजी | ३ | ५.६० | १६.८० |
| पीयुबी ४२ | श्री साई सतचरित्र पोथी | कन्नड | १ | ७३.०० | ७३.०० |
| पीयुबी ४३ | श्री साईचे सत्य चरित्र | मराठी | ७ | ६६.९० | ४६८.३० |
| पीयुबी ४८ | खापर्डे डायरी | मराठी | १ | ८.१५ | ८.१५ |
| पीयुबी ४९ | श्री साईनाथ सगुणो. आरती (झरिन) | इंग्रजी | ३ | ९.५० | २८.५० |
| पीयुबी ५० | श्री साईबाबा १०८ नामावली, झरीन | इंग्रजी | १ | ३.४४ | ३.४४ |
|  | दैनंदिन साईबोध | मराठी | ८ | ५८.०० | ४६४.०० |
| पीयुबी ५६ | श्री सदगुरु साई. सगुणो.मराठी आरतीचा हिंदी अनुवाद | हिंदी | १ | ६.०० | ६.०० |
| पीयुबी ५९ | शिलधी | मराठी | ३ | ३.०० | ९.०० |
| पीयुबी ६० | श्री साईबाबांची शिकवण तत्त्वज्ञान | मराठी | २ | ९.८३ | १९.६६ |
| पीयुबी ६२ | श्री साई चरित्र | बंगाली | ३ | २७.०० | ८१.०० |
| पीयुबी ६५ | श्री साईसच्च चरित्र, तेलगू पोथी | तेलगू | २ | ६१.६० | १२३.२० |
| पीयुबी ६६ | चिल्ड्रेन्स साईबाबा (विकास मेहता ) | इंग्रजी | १० | ४७.०० | ४७०.०० |
| पीयुबी ६७ | श्री साई चरित्र हिदी दोहावली | हिंदी | १०२ | ६१.७५ | ६,२९८.५० |
| पीयुबी ६८ | चिल्ड्रेन्स साईबाबा (विकास मेहता ) | हिंदी | १० | ५९.०० | ५९०.०० |
| पीयुबी ७३ | एक फकीर की पाठशाला | हिंदी | १२ | ३५.०० | ४२०.०० |
|  |  |  |  | **एकूण पुस्तके रक्कम** | **२३,४५६.७९** |

**फोटो-**

| अ.नं. | फोटोचे नांव | आकार | मोफत दिलेले नग संख्या | छपाई दर रुपये पैसे | छपाई किंमतीने होणारी रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| पीयुबी १०१ | दगडावर बसलेले बाबा (काळा/पांढरा) | १४"x२०" | १ | १.९४ | १.९४ |
| पीयुबी १०२ | दगडावर बसलेले बाबा चार रंगात | १४"x२०" | १ | १.९४ | १.९४ |
| पीयुबी १०४ | भिंतीलगत उभे असलेले बाबा (काळा/पांढरा) | १४"x२०" | २ | १.२८ | २.५६ |
| पीयुबी १०५ | द्वाराकामाई चार रंगात | १४"x२०" | १ | २.१५ | २.१५ |
| पीयुबी १०६ | द्वाराकामाई चार रंगात | १०"x १४" | २ | १.४५ | २.९० |
| पीयुबी १०७ | द्वाराकामाई चार रंगात | ०७"x१०" | २ | ०.६७ | १.३४ |
| पीयुबी १०८ | द्वारकामाईत बसलेले बाबा चार रंगात | १४"x२०" | १ | १.९२ | १.९२ |
| पीयुबी १०९ | द्वारकामाईत बसलेले बाबा ४ रंगात | १०"x१४" | २ | १.२३ | २.४६ |
| पीयुबी ११० | द्वारकामाईत बसलेले बाबा ४ रंगात | ०७"x१०" | ३ | ०.६५ | १.९५ |
| पीयुबी ११२ | पालखी फोटो चार रंगात | ०७"x१०" | ३ | ०.६८ | २.०४ |
| पीयुबी ११३ | मुर्ती फोटो चार रंगात | १४"x२०" | ३ | १.९९ | ५.९७ |
| पीयुबी ११४ | मुर्ती फोटो चार रंगात | १०"x१४" | २ | १.२० | २.४० |
| पीयुबी ११५ | मुर्ती फोटो चार रंगात | ०७"x१०" | २ | ०.५५ | १.१० |
| पीयुबी ११७ | द्वारकामाई कृष्णधवल | ०७"x१०" | १ | ०.२५ | ०.२५ |
| पीयुबी १२० | दगडावर बसलेले बाबा चार रंगात | ०७"x१०" | ३ | ०.०७ | ०.२१ |
| पीयुबी १२३ | दगडावर बसलेले बाबा चार रंगात | १०"x १४" | २ | १.२० | २.४० |
| **एकूण फोटो रक्कम** | | | | | **३३.५३** |

## कॅसेट/सीडी

| अ.नं. | सी.डी/आरती कॅसेट चे नांव | प्रकार | मोफत दिलेले नग संख्या | निर्मिती दर रुपये पैसे | निर्मिती किंमतीने होणारी रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| पीयुबी २०१ | श्री साईबाबा आरती कॅसेट (४ कॅसेटचा संच) | कॅसेट | १ | ४३.६८ | ४३.६८ |
| पीयुबी २०३ | आरती ऑडीओ | सी.डी. | ४ | २२.७८ | ९१.१२ |
| पीयुबी २०४ | गुरुपाठाचे अभंग | सी.डी. | ५ | २१.४२ | १०७.१० |
| पीयुबी २०५ | ओंकार साधना (मार्गदर्शिका) | व्हीसीडी | १ | २५.४७ | २५.४७ |
| पीयुबी २०७ | साईबाबा ग्रेट संत ऑफ शिर्डी | सी.डी.रोम | १ | १२.१० | १२.१० |
| पीयुबी २०८ | साईबाबा आरती व्हीसीडी | व्हीसीडी | १६ | २२.२० | ३५५.२० |
| पीयुबी २०९ | शिर्डी श्री साईबाबा की | व्हीसीडी | १३ | १७.०० | २२१.०० |
| पीयुबी २१० | श्री साईबाबा आरती (गिलीप्स ऑफ श्री साईबाबा) | डीव्हीडी | १४ | ३५.५१ | ४९७.१४ |
| **एकूण कॅसेट/सीडी रक्कम** | | | | | **१,३५२.८१** |

## दैनंदिनी/दिनदर्शिका-

| अ.नं. | श्री साई दैनंदिनी / दिनदर्शिका | मोफत दिलेले नग संख्या | निर्मिती दर | निर्मिती किंमतीने होणारी रक्कम |
|---|---|---|---|---|
| पीयुबी ३०३ | श्री साईबाबा दैनंदिनी २००७ | १९ | ४९.५० | ९४०.५० |
| पीयुबी ३०४ | श्री साईबाबा दैनंदिनी २००८ | ४३६८ | ५०.०० | २१८,४००.०० |
| पीयुबी ४०६ | श्री साईबाबा दिनदर्शिका ८ पानी २००७ | १ | १६२.०० | १६२.०० |
| पीयुबी ४०७ | श्री साईबाबा दिनदर्शिका ८ पानी २००८ | ११९ | १५९.०० | १८,९२१.०० |
| पीयुबी ४०८ | श्री साईबाबा दिनदर्शिका एक पानी २००८ | २७३४ | ४.७५ | १२,९८६.५० |
| पीयुबी ४०९ | श्री साईबाबा दिनदर्शिका ६ पानी २००८ | १८०२ | ८.४० | १५,१३६.८० |
| | | | **एकूण दैनंदिनी/दिनदर्शिका रक्कम** | **२६६,५४६.८०** |

| | |
|---|---|
| मोफत दिलेल्या पुस्तकांची रक्कम | २३,४५६.७९ |
| मोफत दिलेल्या फोटोंची रक्कम | ३३.५३ |
| मोफत दिलेल्या कॅसेट/सी.डी./डीव्हीडी ची रक्कम | १,३५२.८१ |
| मोफत दिलेल्या दैनंदिनी/दिनदर्शिकांची रक्कम | २६६,५४६.८० |
| एकूण रक्कम | २९१,३८९.९३ |

**उपरोक्तप्रमाणे माहे एप्रिल २००७ ते माहे मार्च २००८ या कालावधीत वेळोवेळी संस्थान प्रकाशित पुस्तके/फोटो,कॅसेट/सी.डी. व दैनंदिनी/दिनदर्शिका पोस्टेज स्टॉकमधून भेट म्हणून देण्यात आलेली असून त्यासाठी पूर्णांकित रक्कम रु. २,९१,३९०/- इतका खर्च आला आहे. तरी त्यास कार्योत्तर मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही-प्रकाशने विभागप्रमुख)

**आयत्या वेळेचा**

**विषय नं. १२** **देणगी मारुती ओमनी रुग्णवाहिका स्वीकारणेबाबत.**

**निर्णय क्र.५३५** श्रीसाईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डीचे अंगिकृत असलेल्या श्री साईनाथ हॉस्पिटल व श्रीसाईबाबा हॉस्पिटलमध्ये अल्पदरात गरीब व गरजु रुग्णांवर उपचार केले जातात. दोन्ही हॉस्पिटलकडे रूग्ण ने-आण करणे कामी खालील प्रमाणे रूग्णवाहिका वापरात आहे.

| अ.नं. | वाहन क्र. | वाहन प्रकार |
|---|---|---|
| ०१ | एमएच१७/टी-७१०१ | टाटा ४०७ रुग्णवाहिका |
| ०२ | एमएच१७/टी-७१६१ | टाटा सुमो रुग्णवाहिका |
| ०३ | एमएच१७/के-६६५१ | ओमनी मारुती रुग्णवाहिका |
| ०४ | एमएच१७/टी-८९१० | ओमनी मारुती रुग्णवाहिका |
| ०५ | एमएच१७/के-९५०१ | टेम्पो ट्रॅव्हलर कार्डीयाक रुग्णवाहिका |
| ०६ | एमएच१७/टी-७१४१ | टाटा ४०७ शववाहिका |
| ०७ | एमएच१७/टी-७१३१ | टाटा ४०७ शववाहिका |
| ०८ | एमएच१७/के-६२८१ | टाटा सुमो शववाहिका |

रूग्णवाहिका क्रं.एमएच-१७/टी-८९१० हे वाहन दि.०७/०६/२००७ रोजी मुंबई येथील साईभक्त सौ. दुर्गा शंकर चैनानी यांनी त्यांचे चिरंजीव कै.निलेश शंकर चैनानी यांचे स्मरणार्थ एक मारूती ओमनी रूग्णवाहिका (पेट्रोल) देणगी दिलेली आहे.

**दि.१२/०५/२००८चे फॅक्सपत्रान्वये सौ.दुर्गा शंकर चैनानी यांनी पुन्हा एक मारूती ओमनी रूग्णवाहिका देणगी देणेची इच्छा प्रकट केलेली असून ती स्विकारणेस मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, तो मान्य करण्यात आला.**

(कार्यवाही-वाहन विभागप्रमुख)

**आयत्या वेळेचा**

**विषय नं. १३** **श्रीसाईबाबा समाधी मंदिरात व मंदीर परिसरात फुलांची सजावट करणेबाबत.**

**निर्णय क्र.५३६** गुरुपौर्णिमा उत्सव २००८ निमित्त संस्थान मार्फत समाधी मंदिर,गुरुस्थान,चावडी व व्दारकामाई या सर्व ठिकाणी दर्शनी बाजूने फुलांची सजावट करावयाची आहे.त्यात फुलांची तोरणे,बास्केट,बुके इ.वापरुन करण्यात येणार आहे. या सजावटीसाठी जरबेरा,ॲस्टर,कार्नेशन,झेंडू ,शेवती इत्यादी जातीची फुले वापरण्यात येणार आहे. त्यामध्ये प्रामुख्याने खालील प्रमाणे सजावट करावयाची आहे.

०१ समाधी मंदिर : समाधी मंदिरातील आतील सर्व व्दारांना तारेणे लावणे व मुर्तीच्या बाजूने फुलांची सजावट करणे.

०२ व्दारकामाई : व्दारकामाई समोरील बाजूने तोरणे लावण्यात येतील.व्दारकामाईतील आतील फोटो व शीळेवरील फोटोसाठी फुलांच्या माळा सोडवयाच्या आहे.व व्दारकामाईतील आतील दरवाजास तोरण व फुलांची बुके लावण्यात येणार आहे.

०३ गुरुस्थान : गुरुस्थानच्या चारही बाजूने तोरणे लावणे व आतील फोटोजवळील बाजूने फुलांची बुकें लावण्यात येणार आहे.

०४ चावडी : चावडीच्या समोरील बाजूने तोरण लावणे पीलरसाठी फुलांचे बुके व "श्रींचे" फोटोसाठी फुलाच्या माळा लाववयाच्या आहे.

तसेच मंदिर परिसरातील चारही महाव्दारांना व शनी मंदिर,गणपती मंदिर व महादेव मंदिर यांच्या दरवाजांना तोरणे लावून सजावट करावयाची आहे. याकामी सजावट करणारे कुशल कारागीरांकडून कोटेशन मागवून सजावट करण्यात येईल.

गुरुपौर्णीमा उत्सव २००८ करीता सन २००८-२००९ मध्ये उत्सव खर्चासाठी ४,००,०००.०० रुपये ची तरतूद बजेट मध्ये धरली आहे. याकामी अंदाजे २,००,०००.०० रुपये खर्च येणार आहे.

तरी **गुरुपौर्णीमा उत्सव २००८ करीता समाधी मंदिर, व्दारकामाई, चावडी, गुरुस्थान या सर्व ठिकाणी फुलांची सजावट करणेस व याकामी येणारे अंदाजे रक्कम रुपये २ लाखचे खर्चास**

**मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही-बगीचा विभागप्रमुख)

**आयत्या वेळेचा**

**विषय नं. १४** **लाडू प्रसाद बुंदी बनविणेस थर्मिक फ्लूड हिटर यंत्रणेचा वापर करणे बाबत**

**निर्णय क्र.५३७** साईभक्तांना श्री ंचा प्रसाद म्हणून घरी घेउन जाणेसाठी संस्थानमार्फत गावराण तुपाचे मोतीचूर लाडू बनविले जातात व माफक दरात त्याची विक्री केली जात आहे. सदर लाडू (३ नग) पॅकेट बनविणेसाठी सर्व खर्चासह रु.९.९० पर्यंत खर्च येतो व संस्थान साईभक्ताकडून रु.१०.०० घेत आहे.

मोतीचूर लाडू प्रसाद पाकीटाची गर्दीचे प्रमाणानुसार दैनंदिन २५,००० ते १,२५,००० पर्यंत पाकीट विक्री होत आहे. गेल्या २० वर्षापासून प्रसाद लाडू बनविणेसाठी इंधन म्हणून एल.पी. गॅसचा वापर करीत आहोत. दिवसेंदिवस एल.पी. गॅसच्या किंमतीमध्ये मोठया प्रमाणात वाढ होत आहे. तसेच एल.पी. गॅस भट्टयांचा वापर करीत असतांना एल.पी. गॅस जळतांना उष्णता तयार होते, व तुप / तेल तापल्यानंतर त्यापासूनही उष्णता तयार होते. अशाप्रकारे दुहेरी उष्णतेमुळे भट्टयांवर प्रत्यक्ष काम करणा-या कामगारांना अतिशय त्रास होतो आहे.

प्रसाद लाडू तयार करतांना कर्मचा-यांना उष्णतेचा त्रास कमी व्हावा व इंधनामध्ये बचत व्हावी याकरीता नवीन अत्याधुनिक यंत्रणा अन्यत्र कुठे उपलब्ध आहे काय ? असल्यास त्याची माहीती घेण्याचा प्रयत्न होता. त्यानुसार संस्थान चिफ इंजिनीअर मा.श्री आर. बी. आहेर हे इतर कामानिमीत्त मुंबई येथे गेले असता त्यांना थर्मिक फ्लुड हिटर यंत्रणेची माहीती मिळाली. त्यांनी सदर यंत्रणा उत्पादक सदानंद ॲप्रोटेक प्रा.लि. यांचे इंडस्ट्रीला भेट दिली आणि सदानंद ॲप्रोटेक प्रा.लि. यांचे श्री उदय खरे यांना प्रथमत: शिर्डी येथे समक्ष येउन संस्थानचे पारंपारीक बुंदी बनविणेची पध्दतीची पहाणी करणेस सांगितले. त्यानुसार सदानंद ॲप्रोटेक प्रा.लि. यांचे श्री उदय खरे व इतर टेक्नीशियन यांनी शिर्डी येथे येउन पारंपारीक पध्दतीने बुंदी बनविणेची यंत्रणा पाहीली व सांगितले की, या पारंपारीक पध्दतीने बुंदी बनविणेऐवजी थर्मिक फ्लुड हिटर सिस्टीमचा वापर केल्यास इंधनात बचत होईल, कर्मचा-यांचा त्रास कमी होईल व कमी वेळेत जास्त काम होईल असे सांगितले. त्यानुसार सदानंद ॲप्रोटेक्ट प्रा.लि. मुंबई यांनी एस.ए.पी.एल/श्री साईबाबा संस्थान/एल/आर/१०९/२००७-२००८ दि.०७/०३/२००८ चे पत्राद्वारे कळविलेले आहे की,

'New Technology of Thermic Fluid Application For Making Boondi-Laadu' तंत्रज्ञानानुसार आम्ही आमचे स्वखर्चाने प्रायोगिक व चाचणी तत्वावर याकामी आवश्यक असणारी मशिनरी शिर्डी येथे बसवून त्याचे प्रात्यक्षिक देणेस तयार आहोत. तरी सदरहू मशिनरी शिर्डी येथील संस्थानचे लाडू प्रसाद तयार होणा-या ठिकाणी स्थापित करण्यास सदरहू मशिनरीद्वारे शुध्द गावराण तुपातील बुंदी बनविणेचे प्रात्यक्षिक दाखविणेस व प्रायोगिक तत्वावर चाचणी घेण्यास मान्यता द्यावी.

सदानंद ॲप्रोटेक्ट प्रा.लि. मुंबई यांचे दि.०७/०३/२००८ चे विनंती पत्रानुसार इकडील जा.नं.एसएसएस/वशि/प्रसाद/४१२२/०८ दि.१९/०३/२००८ अन्वये थर्मिक फ्लुड हिटर यंत्रणेचे प्रात्यक्षिक व प्रायोगिक तत्वावर चाचणी घेण्यासाठी कळविणेत आलेले होते. त्यानुसार सदानंद ॲप्रोटेक्ट प्रा.लि. मुंबई यांनी उपरोक्त यंत्रणा १५ दिवस प्रायोगिक तत्वावर प्रसादालयातील लाडू किचनमध्ये वापरणेसाठी बसविलेली होती. सदर यंत्रणेचा वापर करीत असतांना तेथे काम करणा-या कर्मचारी व कॉन्ट्रक्टर यांना पारंपारिक यंत्रणा व नविन यंत्रणेमध्ये खालीलप्रमाणे तफावत आढळून आलेली आहे.

| अ.नं. | पारंपारिक एल.पी.जी भट्टया | थर्मिक फ्लुड हिटर यंत्रणा |
|---|---|---|
| ०१. | एल.जी. गॅस भट्टीची व तेल / तुपाचे उष्णतेमुळे कर्मचा-यांना फार त्रास होतो. | या यंत्रणेतील भट्टी बाहेरील बाजूने अजिबात गरम होत नसल्याने उष्णतेचा त्रास अतिशय कमी प्रमाणात होत असे. |
| ०२. | ५ भट्टयांवर ८ तासात ७ ते ८ क्विंटलची बुंदी तयार होते. | २ भट्टयांवर ८ तासात ७ ते ८ क्विंटलची बुंदी तयार होते. |
| ०३. | भट्टीभोवती वीट / मातीची भिंत असल्याने स्वच्छता ठेवण्यास अडचण येते. | भट्टी ३ पायावर उभी असल्याने त्याखालून स्वच्छता करणे सोपे असल्याने स्वच्छता चांगली ठेवता येते. |

इंधन बचतीची निश्चीतता आजमाविणेसाठी स्वतंत्र गॅस फ्लो मीटर नसल्याने याबाबतची निश्चीतता अजमावीता आलेली नाही. मात्र सदानंद ॲप्रोटेक प्रा.लि. यांनी अनुभवानुसार खालीलप्रमाणे तुलनात्मक माहीती कळविलेली आहे.

COMPARISION OF
TRADITIONAL V/S MODERN METHOD OF BUNDI MANUFACTURING

| SR. NO. | PARTICULARS | TRADITIONAL METHOD | MODERN METHOD |
|---|---|---|---|
| 01. | Bundi Output<br>Chasni Output | 2000 kgs.<br>1000 kgs. Sugar<br>3000 kgs. | 2000 kgs.<br>1000 kgs. Sugar<br>3000 kgs. |
| 02. | Time Taken | 8 Hours | 8 Hours |
| 03. | Quantity of Vessel | 11 Kadhai | 8 Jkt Pan |
| 04. | Type of Vessels | M.S.(Mild Steel) | 100 % Stainless Steel |
| 05. | Veg / Ghee Saving | --- | 5% |
| 06. | Size of Frying Pans: 32" Dia X 12" Deep<br>52" Dia X 18" Deep | 10 Nos<br>01 Nos | 07 Nos<br>01 No. |
| 07. | Method of Heating | Direct Heating | Centralised Heating |
| 08. | Hygienic Standard | Unhygienic | Very Good |
| 09. | Fuel Control / Temp. Control | Manual | Automatic |
| 10. | Fuel Consumption LPG-ON NCV 11500 k-cal/kg | 360 kg/day | 161 kg/day |
| 11. | Electrical Consumption | N.A. | 7.5 HP (5.63 KW) |
| 12. | Cost of power per day @ Rs.5/kw X 8 Hours<br>Cost of Fuel @ Rs.60/- per kg X 8 Hours<br>Total = | NIL<br>21,600<br>21,600 | Rs.281/-<br>9,660/-<br>9,941/- |
| 13. | Cost of per kg. of Bundi | Rs.7.20 per kg. | Rs.3.30 per kg. |
| | NET SAVING IN 8 HOURS Rs. 11,659/- (Rs.21,600/- less Rs.9,941/-) | | |

**Pay Back Period Calculation for 8 Hrs.**

Cost of Project — Rs.27,00,000/- (Rupees Twenty Seven Lacs)
Interest cost of project / year-10% P.A. — Rs.2,70,000/-
Rs.2,70,000/-

No of Days of working required to cover The project cost of Rs.29.70 lacs — Rs.29,70,000/- / Rs. 11,659/- = 254 days

= 254 days / 30 days = 8.46 Months

**Say 9 Months.**

सदानंद ॲप्रोटेक प्रा.लि. यांनी कळविलेल्या तुलनात्मक माहीतीनुसार सदर यंत्रणा किफायतशीर वाटते. मात्र सदर यंत्रणा खरेदी करुन प्रत्यक्ष कार्यान्वीत करणेकामी सेकंडक्लास ग्रेडचे ३ ऑपरेटर (कुशल कामगार) नियुक्त करणे गरजेचे राहील. त्याचप्रमाणे यंत्रणेसाठी वापरण्यात येणारे हायथम ६०० ग्रेडचे ऑईल वापरण्यात येते. एकावेळी ६३० लिटर ऑईल लागते. त्याची सध्याचे बाजार भावाने रु.१७,०००/- प्रति बॅरल प्रमाणे रु ५१,०००/- किंमत होईल. दर २-३ वर्षांनी जेवढे ऑईल जळेल तेवढे ऑईल टाकावे लागेल. अथवा ऑईलचा फ्लॅश पॉईंट - फायर पॉईंट तपासून कमी आढळल्यास ऑईल संपूर्ण बदलावे लागेल.

थर्मिक फ्लुड ऑईल यंत्रणा बसविल्यानंतर लगेचच बिघडणार नाही. मात्र एखादे भट्टीत बिघाड झाल्यास संपूर्ण यंत्रणा बंद ठेवावी लागणार आहे. त्यामुळे पर्यायी व्यवस्था म्हणून पारंपारीक एल.पी. गॅसचे कनेक्शन हे करुन ठेवावे लागतील. थर्मिक फ्लुड यंत्रणा बंद पडल्यास एल. पी. गॅसच्या भट्टया जोडून काम चालू ठेवावे लागेल.

एकंदरीत थर्मिक फ्लुड हिटर यंत्रणा किफायतशीर वाटते. शिवाय कर्मचा-यांना उष्णतेचा त्रास होत नाही व कमी वेळेत जास्त काम होते. त्यामुळे पारंपारिक एल.पी. गॅस यंत्रणेला पर्याय म्हणून ८ भट्टयांची बॉयलर व त्या अनुषंगिक (१ सेट) यंत्रणा खरेदी करणे सोईस्कर होईल. त्या यंत्रणेची अंदाजे किंमत रु.२७,००,०००/- कळविलेली आहे.

उपरोक्त थर्मिक फ्लुड हिटर यंत्रणेबाबत अधिक माहीती असावी म्हणून मे. कलाकृती स्टील फर्निचर, कोल्हापूर यांचेशी तोंडी चर्चा केली असता त्यांचेकडून सांगणेत आले की, मी अशाप्रकारे थर्मिक फ्लुड हिटर यंत्रणा गुळाचे गु-हाळासाठी बनवून दिलेली आहे व अत्यंत उपयुक्त अशी आहे असे सांगितलेले आहे.

सध्या फक्त मोतीचूर लाडू बुंदी बनविणेसाठी थर्मिक फ्लुड हिटर यंत्रणा (८ भट्टयांसह) खरेदी करावी त्याचा सखोल अभ्यास / अनुभव घेतल्यानंतर लाडू बुंदीसाठी आणखी एक व नाष्टापाकीटासाठी एक असे दोन सेट खरेदी करता येतील. अशा प्रकारे यंत्रणा बनविणा-या कंपन्या बाजारात असल्याने वृत्तपत्रात जाहिरात प्रसिध्द करुन यंत्रणा खरेदी करता येईल.

त्याचप्रमाणे पारंपारीक एल.पी.जी. भट्टीवर बुंदी लाडू तयार करण्यासाठी स्टे. स्टील फेब्रीकेटेड किचन इक्वीपमेंट खरेदीमध्ये मेटल फेब्रीकेटर्स ऑफ इंडिया लि. मुंबई यांना हेवी डयूटी लाडू मेकींग भट्टया बनविणेचा पुरवठा आदेश देण्यात आलेला आहे. मात्र थर्मिक फ्लुड हिटर यंत्रणा खरेदीचा निर्णय झाल्यास तुर्त भट्टया बनवू नये असे कळविण्यात आलेले आहे. जर आधुनिक पध्दतीचे थर्मिक फ्लुड हिटर यंत्रणा खरेदी करणेची मान्य झाल्यास सदरचा पुरवठा आदेश रद्द करणेबाबत मेटल फॅब्रीकेटर्स ऑफ इंडिया लि. यांना कळविता येईल.

तरी **पारंपारिक एल.पी. गॅस भट्टयांना पर्यायी आधुनिक पध्दतीची थर्मिक फ्लुड हिटर यंत्रणा खरेदीस अंदाजे रुपये रु.२७,००,०००/- (अक्षरी रु.सत्तावीस लाख मात्र ) खर्च अपेक्षित आहे. तरी उपरोक्त यंत्रणा खरेदीकामी वर्तमानपत्रात जाहिरात देऊन निविदा मागविणेस मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही-अधिक्षक,प्रसादालय विभाग)

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.१५** **श्री.एम.ई.लोहोकरे कंत्राटी पद्धतीने ऑफिसर ऑन स्पेशल ड्यूटी यांचे मुदतवाढीबाबत.**

**निर्णय क्र.५३८** मा. व्यवस्थापन समितीचे दि.०६/०८/२००५ रोजीचे सभेतील निर्णयानुसार संस्थान पत्रव्यवहार, शासकिय पत्रव्यवहार व विविध प्रस्तावावर शासकिय मान्यता मिळणेकामी पाठपुरावा करणे मराठी, हिंन्दी, इंग्रजी पत्रव्यवहार स्वतंत्ररित्या पहाणे कामी जा.नं.एसएसएस/वशी-०१/१२१३३/२००७ दि. ०१/०८/२००७ अन्वये, श्री. एम.ई लोहोकरे, यांची संस्थानकडे मुंबई कार्यालयात ११ महिन्यांसाठी प्रतिमहा रु. १५०००/- एकत्रित मानधनावर कंत्राटी पध्दतीने नेमणूक करण्यात आलेली असून ते दि.०१/०८/२००७ रोजी मुंबई कार्यालयात कामावर हजर झाले असून सध्या संस्थान विषयक कामे करत आहेत. **श्री. लोहोकरे, यांचा ११ महिन्यांचा कालावधी दि.३०/०६/२००८ अखेर संपुष्ठात येत असून श्री लोहकरे, कंत्राटी पध्दतीने ऑफिसर ऑन स्पेशल डयुटी, यांची पूर्वीचेच अटी शर्तीवर ११ महिन्याचे कालावधीसाठी मुदतवाढ देणेस मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही-अधिक्षक,आस्थापना विभाग)

**आयत्या वेळेचा**

**विषय नं. १६** **डॉ.रविराव घोगरे,आर.एम.ओ. यांचेबाबत.**

**निर्णय क्र.५३९** डॉ.रविराज घोगरे,आर.एम.ओ.यांची जा.नं.एसएसएस वशी ०१/२२५/२००८ दि. ०४/०१/२००८ अन्वये श्री साईबाबा हॉस्पीटल मध्ये आर.एम.ओ. या पदावर नेमणूक करण्यात आली होती त्यानुसार ते दि.०७/०१/२००८ रोजी कामावर हजर झाले होते.त्यानंतर डॉ.घोगरे यांना हॉस्पीटल व्यवस्थापनाच्या सोईच्या दृष्टीने श्री साईनाथ रुग्णालयाकडे काम पाहण्यास सांगण्यात आले आहे.

आता उपरोक्त संदर्भीय टिपणी अन्वये डॉ.घोगरे यांचे गैरवर्तनाबाबत वैद्यकीय अधिक्षीका,श्री साईनाथ रुग्णालय व वैद्यकीय संचालक, श्री साईबाबा हॉस्पीटल,शिर्डी यांनी खालील प्रमाणे कळविलेले आहे.

०१. डॉ.घोगरे हे डिसचार्ज कार्ड भरत नसलेमुळे अनेक रुग्णांची गैरसोय कुचंबना झालेली असून हया वस्तुस्थितीची अनेकवेळा शहानिशा झालेली आहे.

०२. डॉ.घोगरे हे अंर्तरुग्णाच्या केसपेपरवर जरुर त्या नोंदी करत नसल्याने अनेक वेळा त्यांना तोंडी ताकीद दिली गेलेली असूनही त्यांच्या कामकाजात कुठल्याही प्रकारचा फरक आढळून आला नाही.

०३. डॉ.घोगरे यांनी शस्त्रक्रीया झालेल्या रुग्णांचे ड्रेसिंग करण्यास नकार दिलेला असल्यामुळे डॉ. गोरे यांनी तोंडी तक्रार सादर केली होती.

०४. डॉ.घोगरे हे स्वत:ला स्त्री-रोग तज्ञ समजत असून पुरुष रुग्णांच्या कॅथेटरायजेशन , सक्शन, इ.प्रोसिजर करण्यास नकार दिलेला होता व तसे त्यांनी तोंडी स्पष्ट केले होते. यामुळे पुरुष रुग्णांच्या उपचारांमध्ये अनेकवेळा मोठया अडचणी निर्माण झालेल्या होत्या व अशा रुग्णांना जास्त प्रमाणांत त्रास सहन करावा लागला होता.

०५. वरील प्रकारचे वर्तवणूकीमुळे रुग्ण तथा नातेवाईकांनी परिचारीकांना अनेक वेळा धारेवर धरले होते व त्यामुळे १४ परिचारीकांना लेखी तक्रार दि. ३०/०१/२००८ रोजी सादर केली आहे व प्राथमिक चौकशी अंती त्यात तथ्य असल्याचे आढळून आले आहे.

०६. दि.३०/०१/२००८ रोजी सुमारे स ०८.०० वा. लेखी सुचना देऊनसुध्दा डॉ.घोगरे यांनी पेशंटसह ॲम्ब्युलंसमध्ये जाण्यास नकार दिला व त्यामुळे हॉस्पीटल प्रशासन मोठया अडचणीत सापडले होते. यानंतर त्याच दिवशी डॉ.घोगरे यांनी मस्टरवर सही करुनसुध्दा कुठेही डयूटी केली नाही.

०७. डॉ.घोगरे स्वत:ला स्त्रीरोग तज्ञ समजत असल्यामुळे त्यांना तात्पुरत्या तत्वावर श्री साईनाथ रुग्णालयात दि.२७/०२/२००८ रोजी वर्ग केले होते परंतु तेथील वैद्यकीय अधिक्षीका यांनी त्यांचे असमाधानकारक कामकाज पाहुन दि. ०१/०३/२००८ रोजी श्री साईबाबा हॉस्पीटलमध्ये परत पाठविले आहे.

**निष्कर्ष :-**

०१ डॉ.घोगरे यांनी दि.०७/०३/२००८ रोजी दिलेले स्पष्टीकरण हे असत्य व असमाधानकारक असून यात त्यांचा अप्रमाणिकपणाही स्पष्ट होत आहे.

०२. डॉ.घोगरे यांची वर्तणूक निष्काळजीपणा, हलगर्जीपणा, बेपर्वाई व उध्दटपणा अशी असल्यामुळे तत्कालीन वैद्यकीय संचालक डॉ.टिंगरे यांनी दि.०१/०३/२००८ व दि.२४/०३/२००८ रोजी डॉ.घोगरे यांना सेवामुक्त करण्याची शिफारस केलेली आहे.

०३. श्री साईनाथ रुग्णालयाच्या मा.वैद्यकीय संचालीका यांचीसुध्दा डॉ.घोगरे यांचे बाबतीत श्री साईबाबा हॉस्पीटलच्या प्रशासनाशी सहमत दिसून येत आहे.

**तात्पर्य**

डॉ.घोगरे यांना सत्वर सेवामुक्त करुन त्यांचे जागी नविन आर.एम.ओची नियुक्ती करण्यात यावी " असे नमूद केलेले आहे.तसेच श्री घोगरे सध्या प्रॉब्लेममध्ये आहेत.त्यांना सेवेतून कमी करता येईल असे प्रशासकीय अधिकारी रुग्णालये यांनी अभिप्राय दिलेले आहे.

तरी वैद्यकीय संचालक,श्री साईबाबा हॉस्पीटल तसेच वैद्यकीय अधिक्षिका,श्री साईनाथ रुग्णालय व प्रशासकीय अधिकारी रुग्णालये यांचे उपरोक्त अभिप्राय विचारात घेता,श्री घोगरे यांची वर्तणूक तसचे त्यांचे कामाबाबतची उदासिनता लक्षात घेता त्यांना सेवेत ठेवणे संस्थानचे तसेच रुग्णालयाचे हिताचे दृष्टीने हितावह नाही.

तरी डॉ.रविराज घोगरे,आर.एम.ओ.यांना देण्यात आलेल्या नेमणूक आदेशातील अट क्र.०४ व ०९ अधीन राहून त्यांना संस्थान सेवेतून सक्तीने सेवामुक्त करणेस मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

**यावर सविस्तर चर्चा होऊन, डॉ.रविराज घोगरे, आर.एम.ओ., श्री साईबाबा हॉस्पिटल यांना एक महिन्याचे नोटीसीऐवजी एक महिन्याचा नोटीस पे रक्कम अदा करुन, त्यांची सेवा संपुष्टात आणावी असे ठरले.** (कार्यवाही-अधिक्षक,आस्थापना विभाग/ कामगार अधिकारी)

**आयत्या वेळेचा**

**विषय नं. १७** **श्रीसाई संस्थान एम्पलॉईज क्रेडिट को-ऑप सोसायटी लि., शिर्डी यांचेमार्फत चालविण्यात येणारे व्यवसायास व याकामी देण्यात आलेले गाळे व स्टॉलला मुदतवाढ देणेबाबत.**

**निर्णय क्र.५४०** श्री साई संस्थान एमप्लॉईज क्रेडीट को ऑप सोसायटी लि. शिर्डी यांचे मार्फत मा. व्यवस्थापन समितीचे निर्णयानुसार लिव्ह अॅन्ड लायसेन्सी तत्वावर सोबतचे तक्त्यात दर्शविल्याप्रमाणे ५ व्यवसाय चालविले जात आहेत. सदरचे विविध व्यवसाय समाधी मंदीर परिसर, साईप्रसाद परिसर, नविन भक्तनिवासस्थान परिसर, स्वागत कक्ष परिसर, धर्मशाळा परिसर,साईउद्यान व हॉस्पिटल परिसर या ठिकाणी चालविले जात आहे. याकामी सस्थानचे परिसरात गाळे /पतपेढीचे स्टॉल यामध्ये चालविले जातात.

मा. व्य. समितीचे निर्णयास अधिन राहून सदरचे व्यवसाय / गाळयाची मुदत दिनांक ०१/०६/२००५ पासून दि ३१/०५/२००८ अशी तीन वर्षाचे कालावधीसाठी दिलेली आहे प्रत्येक वर्षी परवाना फी मध्ये १० टक्के वाढ करून मुदतवाढ देण्यात आलेली आहे. सदर गाळयाची व व्यवसायाची मुदत दि ३१/०५/२००८ रोजी संपत असलेने श्री साई संस्थान एमप्लॉईज क्रेडीट को ऑप सोसायटी शिर्डी यांनी दि १५/०४/२००८ रोजीचे पत्राव्दारे विनंती केली की, संस्थानचे मान्यतेने संस्थानचे परिसरात चालवित असलेल्या क्लोकरुम,कारपार्कीग , प्रसाद नॉव्हेल्टी स्टोअर्स , एस.टी.डी. बुथ तसेच थंडपेय व दुग्धजन्य पदार्थ या व्यवसायाची मुदत दिनांक ३१/०५/२००८ रोजी पूर्ण होत आहे. तरी सदर व्यवसायास संस्थेस पुढील पाच वर्षाकरिता मुदतवाढ मिळावी अशी विनंती केलेली आहे.

मा. व्य. समितीचे निर्णयास अधिन राहून श्री साई संस्थान एमप्लॉईज क्रेडीट को ऑप सोसायटी लि. शिर्डी यांना जा.न एसएसएस/वशी ०२/१३०३२/२००७ दि १८/०७/२००७ रोजीचे आदेशाने दि ०१/०६/२००७ ते दि ३१/०५/२००८ या कालावधीकरिता ( तिसरे वर्षाकरिता ) परवानगी देण्यात आलेली आहे. त्यांचेकडून याकामी खालीलप्रमाणे मासिक परवाना फी आकारणी करण्यात येत आहे.

( तिसरे वर्षाकरिता ) **दि.०१/०६/२००७ ते दि.३१/०५/२००८ या कालावधीची प्रत्येक व्यवसायाची मासिक परवाना फी-**

| अ. नं. | सुविधेचे नांव | मासिक भाडे रुपये तिसरे वर्षाकरीता | मागील कालावधी | ठिकाण |
|---|---|---|---|---|
| १ | **कार पार्किंग** | | | |
| | अ) साईप्रसाद | **१७,७१७/-** | **०१/०६/२००७** | साईप्रसाद परिसर - मोकळी जागा |
| | ब) नविन भक्तनिवास | **३८,९७५/-** | **ते** | भक्तनिवास परिसर - मोकळी जागा |
| | क) धर्मशाळा (२०० रुम) | **९,७४५/-** | **३१/०५/२००८** | धर्मशाळा परिसर - मोकळी जागा |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| २ | **क्लोकरुम**<br>अ) सुलभ क्लोकरुम<br>ब)भक्तनिवास क्लोकरुम<br>क) साईप्रसाद क्लोकरुम | <br><br>२,३४०/-<br>एकत्रित फी | <br>०१/०६/२००७<br>ते<br>३१/०५/२००८ | <br>सुलभ शौचालय इमारत - रुम<br>भक्तनिवास मेन्न गेट जवळ- रुम/ग<br>जुने चौकशी कार्यालय शेजारी - रुम |
| ३ | **एस टी डी**<br>अ) एस टी डी-१<br>ब) एस टी डी-२<br>क) एस टी डी-२ | <br>९७६/-<br>९७६/-<br>५८६/- | <br>०१/०६/२००७<br>ते<br>३१/०५/२००८ | <br>साईप्रसाद पॉ.हाऊस.समोर-सं.स्टॉल<br>धर्मशाळा परिसर,२०० रुम- गाळा<br>शांती निवास उत्तर गेट-संस्थेचा स्टॉल |
| ४ | **प्रसाद नॉव्हेल्टी**<br>अ) नॉव्हेल्टी स्टोअर नं.-१<br>ब) नॉव्हेल्टी स्टोअरनं.-२<br>क) प्रसाद स्टोअर नं.-१<br>ड ) नॉव्हेल्टी स्टोअरनं.-३<br>इ) प्रसाद स्टोअरनं.-२ | <br>९७६/-<br>९७६/-<br>९७६/-<br>९७६/-<br>९७६/- | <br>०१/०६/२००७<br>ते<br>३१/०५/२००८ | <br>भक्तनिवास डी ब्लॉक नं.३-गाळा<br>भक्तनिवास डी ब्लॉक नं.२-गाळा<br>भक्तनिवास डी ब्लॉक नं.४-गाळा<br>धर्मशाळा ब्लॉक नं.१,२०० रुम-गाळा<br>धर्मशाळा ब्लॉक नं.२,२०० रुम-गाळा |
| ५ | **दुध स्टॉल**<br>अ) दुध स्टॉल नं.-१<br>ब) दुध स्टॉल नं.-२<br>क) दुध स्टॉल नं.-३<br>ड) दुध स्टॉल नं.-४<br>इ) दुध स्टॉल नं.-५<br>ई) दुध स्टॉल नं.-६<br>उ) दुध स्टॉल नं.-७<br>ऊ) दुध स्टॉल नं.-८ | <br>९७६/-<br>९७६/-<br>८,०५४/-<br>९७६/-<br>९७६/-<br>९७६/-<br>९७६/-<br>९७६/- | <br>०१/०६/२००७<br>ते<br>३१/०५/२००८ | <br>कॅन्टीन शेजारी गाळा-गाळा<br>साईप्रसाद परिसर-संस्थेचा स्टॉल<br>उत्तर गेट पश्चिमेस-गाळा<br>भक्तनिवास कॅन्टीन शेजारील-मोकळी जागा<br>स्वागत कक्ष स्टॉल-संस्थेचा स्टॉल<br>उत्तर गेट पुर्वेस स्टॉल-संस्थेचा स्टॉल<br>शांतिनिवास दर्शन लाईन गेट-गाळा.<br>भक्तनिवास दर्शन लाईन-मोकळी जागा |

श्रीसाईसंस्थान एम्प्लॉईज केडिट को.ऑप सोसायटी लि. शिरडी यांना विविध व्यवसायाकामी दिलेल्या गाळयाची व स्टॉलची मुदत दिनांक ३१/०५/२००८ रोजी पूर्ण होत आहे. याबाबतचा विचार करिता तसेच सोसायटीकडून अशा सुविधा भक्तांना पुरविल्या जातात या बाबी विचारात घेता, सोसायटी यांनी सदर व्यवसायास पाच वर्षाची मुदतवाढ बाबत मागणी केलेली आहे. त्यांना तशी मुदतवाढ देणेस हरकत नाही. मात्र पूर्वीचेच अटीस व शर्तीस अनुसरून मागील प्रतिवर्षी परवाना फी मध्ये / भाडयामध्ये १० टक्के वाढ करून मुदतवाढ देता येईल. सदर मुदतवाढ पाच वर्षाकरिता देणेस हरकत नाही. मात्र प्रतिवर्षी सोसायटीस ११ महिनेचे करार करुन मुदतवाढ देणेस हरकत नाही. त्यांची मुदत ३१/०५/२००८ रोजी सपंत असलेने प्रथम वर्षी दि ०१/०६/२००८ पासून पुढे पाच वर्षे या मुदतीकरिता मागील वर्षाचे प्रत्येक व्यवसायचे गाळयाचे /स्टॉलचे मासिक परवाना फी मध्ये प्रतिवर्षी १० टक्के वाढ करून व मिटर रिडींगप्रमाणे विद्युत बिल वेगळे आकारुन लिव्ह ॲन्ड लायसेन्स तत्वावर मुदतवाढ देता येईल.

तरी **सोसायटीस १) कार पार्कीग २) क्लोकरुम ( एकत्रित ) ३) एसटीडी ४) प्रसाद-नॉव्हेल्टी ५) दुध स्टॉल या व्यवसायास व याकामी दिलेले गाळे / स्टॉल यांना लिव्ह ॲन्ड लायसेन्स तत्वावर पाच वर्षाकरिता चालविण्यास मुदतवाढ देण्यास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.**

**यावर सविस्तर चर्चा होऊन, अधिनियमातील तरतूदीनुसार एक वर्ष मुदतवाढ द्यावी असे ठरले.** (कार्यवाही-विधी अधिकारी)

**आयत्या वेळेचा**
**विषय नं. १८** **श्रीसाई संस्थान एम्पलॉईज क्रेडिट को-ऑप सोसायटी लि., शिर्डी यांचेमार्फत चालविण्यात येणारे एस.टी.स्टॅण्ड, शिर्डी समोरील स्वागतकक्ष येथील क्लोकरुमला मुदतवाढ देणेबाबत.**

**निर्णय क्र.५४१** नगर-मनमाड रोडचे पश्चिम बाजूस असलेले संस्थान मालकीचे सर्व्हे नं ११४ मधील पोलीस स्टेशनचे वापरांतील इमारतीचे नव्याने नुतनीकरण करणेत आले असून जुने पोलीस स्टेशन ऐवजी दिनांक २१/१०/२००४ पासून तिथे साईभक्तांचे सोयीसाठी स्वागतकक्ष सुरु करणेत आले आहे पोलीस स्टेशनची पर्यायी व्यवस्थेत बदल करणेत आला असून आता प्रस्तुतचे ठिकाणी पोलीस स्टेशन नाही.

श्री साईबाबांचे दर्शन घेवून पुढील प्रवास ज्या साईभक्तांना करावयाचा असतो अशा साईभक्तांचे सामान ठेवणेची व्यवस्था नुतनीकरण केलेल्या उपरोक्त स्वागत कक्षाचे येथील जागेत क्लोकरुम मध्ये करणेत आलेली असून सदरचा व्यवसाय चालविणेस श्री साई संस्थान एम्प्लॉईज क्रेडीट को ऑप सोसायटी लि शिर्डी यांना यापूर्वी खालीलप्रमाणे मुदतवाढ देण्यात आलेली आहे.

- दिनांक २२/०९/२००५ रोजी पासून दिनांक २१/०८/२००६ अखेर ११ महिने
- दिनांक २२/०८/२००६ रोजी पासून दिनांक २१/०७/२००७ अखेर ११ महिने

➢ दिनांक २२/०७/२००७ रोजी पासून दिनांक २१/०६/२००८ अखरे ११ महिने

श्री साईभक्तांचे सामान /लगेज सुरक्षित ठेवणे कामी क्लोकरुम चालविणेस लिव्ह ॲन्ड लायसेन्सी तत्वावर परवानगी देणेत आलेली आहे. उपरोक्त कालावधीचा करारनामा मुदतीत मा. दुय्यम निबंधक कार्यालय, राहाता येथे कार्यालयात करण्यात आलेला आहे. सध्या दिनांक २२/०७/२००७ रोजी पासून दिनांक २१/०६/२००८ अखरे ११ महिने कालावधी करिता क्लोकरुम लिव्ह ॲन्ड लायसेन्सी तत्वावर चालविणेकामी परवानगी मासिक भाडे रुपये ४००/- आकारुन व मिटर रिडींग प्रमाणे विद्युत आकार वेगळे आकारुन सोसायटीस परवानगी देण्यात आलेली आहे.

आता सदर व्यवसाय / गाळयाची मुदत दिनांक २१/०६/२००८ रोजी संपत असल्याने पुढील मुदतीत चालविणेसाठी श्री साई संस्थान एमप्लॉईज क्रेडीट को ऑप सोसायटी लि शिर्डी यांना दि १५ /०४/२००७ रोजीचे पत्राने मुदतवाढ मिळणेस विनंती केलेली आहे. त्यात त्यांनी श्री साई संस्थान एमप्लॉईज क्रेडीट को ऑप सोसायटी लि. शिर्डी ही नोंदणीकृत सहकारी संस्था असून संस्था कर्मचा-यांचीच संस्था आहे. संस्था आपले संस्थान मान्यतेने श्री साईभक्तांचे सेवेसाठी व सोईसाठी अनेक व्यवसाय चालवित आहे आता एस.टी. स्टॅन्ड समोरील आपले संस्थानचे स्वागतकक्ष इमारतीत (माहिती व सुविधा केंद्र ) श्री साईभक्तांच्या सेवेसाठी व सोईसाठी क्लोकरुम हा व्यवसाय चालवित असून सदर व्यवसायाची ११ महिन्याची मुदत दि २१/०६/२००८ रोजी पूर्ण होत आहे. तरी श्री साईभक्तांच्या सेवेसाठी व सोईसाठी सदर व्यवसाय संस्थेस पुढील पाच वर्षाकरिता चालविण्यास मुदतवाढ मिळावी ही विनंती केली आहे.

**श्रीसाईसंस्थान एमप्लॉईज क्रेडीट को ऑप सोसायटी लि. शिरडी यांना** एस.टी. स्टॅन्ड समोरील देण्यात आलेल्या स्वागतकक्ष येथील क्लोकरुमची मुदत दिनांक २१/०६/२००८ रोजी पूर्ण होत आहे. याबाबतचा विचार करता तसेच सोसायटी कडून अशा सुविधा भक्तांना पुरविल्या जातात या बाबी विचारात घेता, सोसायटीस पूर्वीचेच अटीस व शर्तीस अनुसरून **सदर व्यवसायाचे मागील परवाना फी / भाडयामध्ये १० टक्के वाढ करून व मिटर रिडींग प्रमाणे विद्युत बील वेगळे आकारुन पुढील पाच वर्षे करिता प्रति ११ महिने कराराने मुदत वाढ देणेस हरकत नाही. सदर मुदतवाढ दि २२/०६/२००८ पासून पुढील पाच वर्षाकरिता या मुदतीचे कालावधीकरिता मागील मासिक परवाना फी रुपये ४०० /- मध्ये प्रतिवर्षी १० % वाढ करून मासिक परवाना फी आकारुन व मिटर रिडींगप्रमाणे विद्युत बिल वेगळे आकारून लिव्ह ॲन्ड लायसेन्स तत्वावर सदरचे स्वागत कक्ष येथील क्लोकरुम चालविणेस मुदतवाढ देता येईल असा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.**

**यावर सविस्तर चर्चा होऊन, श्रीसाई संस्थान एम्पलॉईज क्रेडिट को-ऑप सोसायटी लि., शिर्डी यांचेमार्फत चालविण्यात येणारे एस.टी.स्टॅण्ड, शिर्डी समोरील स्वागतकक्ष येथील क्लोकरुमला अधिनियमातील तरतूदीनुसार एक वर्ष मुदतवाढ द्यावी असे ठरले.** (कार्यवाही-विधी अधिकारी)

**आयत्या वेळेचा**

**विषय नं. १९** **निरुपयोगी/खराब लोखंडी खुर्च्या /टेबल/कपाट वार्षिक उच्चतम दराने विक्री करणेस व डेडस्टॉक मधुन कमी करणेस मंजुरी मिळणेबाबत.**

**निर्णय क्र.५४२ खालीलप्रमाणे प्रशासन विभागाकडे निरुपयोगी झालेल्या वस्तू डेडस्टॉकमधुन कमी करणेस व त्या अभिलेख विभागामार्फत स्क्रॅप मालाची विक्री करणेसाठी मंजूर केलेल्या वार्षिक उच्चतम दराने विक्री करण्यास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता,त्यास मान्यता देण्यात आली.**

| अ.नं. | संगणक कोड नं. | वस्तूचे वर्णन | ॲसेट टाईप | डेडस्टॉक रजिस्टर | | नग | अंदाजे किंमत | घसारा वजा जाता - किंमत |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | पा.न | अ.नं. | | | |
| ०१. | CHR/79 to CHR/83 | फोल्डींग चेअर्स- ब्राऊन कलर विथ कुशन | FURN. | १३ | १४ | ५ | १,६००/- | २१०/- |
| ०२. | CUB/008 | स्टील कबर्ड झेनिथ कं. (५ फूटी लहान) | FURN. | २८ | ०८ | १ | ००,८००/- | ००,०४४/- |
| ०३. | TAB/044 | सामायका स्टील टेबल ग्रे कलर (३ ड्रॉवरचा) | FURN. | ५७ | १९ | १ | ०१,६५०/- | ००,१८६/- |
| ०४. | CHR/065 | मॉडर्न चेअर विथ आर्मस् क्रोम प्लेटेड | FURN. | १३ | ११ | १ | ००,३८०/- | ००,०३८/- |
| ०५. | CHR/066 | मॉडर्न चेअर विथ आर्मस् क्रोम प्लेटेड | FURN. | १३ | ११ | १ | ००,३८०/- | ००,०३८/- |
| ०६. | CHR/059 to CHR/061 | मॉडर्न चेअर | FURN. | १२ | ४,५,६ | ३ | ०१,१४०/- | ००,११५/- |
| ०७. | CHR/091 | फोल्डींग चेअर्स- अपोलो कंपनि | FURN. | १४ | १७ | ६ | ००,७२०/- | ००,१७१/- |

| अ.नं. | संगणक कोड नं. | वस्तूचे वर्णन | ॲसेट टाईप | डेडस्टॉक रजिस्टर | | नग | अंदाजे किंमत | घसारा वजा जाता - किंमत |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ०८. | CHR/292 | स्टील चेअर ब्ल्यू कलर | FURN. | १९ | ५२ | २ | ००,९५०/- | ००,३०१/- |
| ०९. | CUB/012 | स्टील कबर्ड झेनिथ कं. | FURN. | २८ | ११ | १ | ००,८००/- | ००,०४४/- |
| १०. | CUB/045 | स्टील कबर्ड | FURN. | ३१ | ३३ | १ | ००,५२०/- | ००,०५८/- |
| ११. | MCN/201 | डॉक्समेंट मशिा(पेपर स्त्रेडर) | MCN. | ७८ | ११ | १ | ०८,०७५/- | ०१,२०१/- |
| १२. | CHR/290 | व्हील चेअर | FURN. | १८ | ४८ | १ | ०६,०००/- | ०२,४६३/- |
| १३. | CHR/264 | व्हील चेअर | FURN. | १६ | ३३ | १ | ०२,०००/- | ००,७१७/- |

(कार्यवाही-प्रशासनशाखा वशी-५/अधिक्षक,अभिलेखा विभाग)

**आयत्या वेळेचा**

**विषय नं. २०** **श्रीविठ्ठल मंदीर संस्थान,येवला या मंदीराचे बांधकामास आर्थिक मदत देणेबाबत.**

**निर्णय क्र.५४३** सदरहू विषय छाननी समितीचे सभेपूढे निर्णयार्थ सादर करावा असे ठरले. (कार्यवाही-प्रशासनशाखा वशी-०३)

**आयत्या वेळेचा**

**विषय नं. २१** **बळीराजाचं राज्य येऊ या चित्रपटास आर्थिक मदत देणेबाबत.**

**निर्णय क्र.५४४** सदरहू विषय छाननी समितीचे सभेपूढे निर्णयार्थ सादर करावा असे ठरले.(कार्यवाही-प्रशासनशाखा वशी-०३)

**आयत्या वेळेचा**

**विषय नं. २२** **मुलींचे झाबवाला आफ्टर केअर होम,बोरीवली या अनाथ निराधार मुलींचे वसतीगृहास देणगी देणेबाबत.**

**निर्णय क्र.५४५** सदरहू विषय छाननी समितीचे सभेपूढे निर्णयार्थ सादर करावा असे ठरले.(कार्यवाही-प्रशासनशाखा वशी-०३)

**आयत्या वेळेचा**

**विषय नं. २३** **नांदुर्खी बु।।,ता.राहाता या गावाचे विकास कामे करणेबाबत.**

**निर्णय क्र.५४६** सदरहू विषय छाननी समितीचे सभेपूढे निर्णयार्थ सादर करावा असे ठरले.(कार्यवाही-प्रशासनशाखा वशी-०३)

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.२४** **शैक्षणिक शुल्क समितीने निश्चित केलेल्या रकमेप्रमाणे पाल्याचे शैक्षणिक फी परताव्याची मागणी शासनाने अमान्य केल्याबाबत**

**निर्णय क्र.५४७** गत मा.व्यवस्थापन मंडळाचे दि.२१/०४/९६ चे सभेतील निर्णय क्र.८९ (१) शैक्षणिक फीचा परतावा, शासनाने / विद्यापीठांनी केवळ गुणवत्तेच्या निकाषावर भरण्यात येणा-या (सुमारे ५० टक्के पर्यंतच्या) जागांवर प्रवेश दिल्या जाणा-या विद्यार्थ्यांसाठी (निम्न दराने) निर्धारित केलेल्या फी दर रक्कमेपर्यंतच मर्यादित राहील, असा पारित झालेला आहे. त्यास अनुसरुन सन २००६-२००७ पर्यंत शासनाने गुणवत्तेच्या निकाषावर प्रवेश मिळालेल्या विद्यार्थ्यांकरीता निर्धारित केलेल्या रक्कमेपर्यंत फीचा परतावा देण्यात येत होता. (सोबत व्य.मंडळाचे निर्णय तथा नियमावली जोडली आहे. )

खाजगी शैक्षणिक संस्थांची फी ठरविणे करीता शासनाने शिक्षण शुल्क समितीची नियुक्ती केलेली असुन सदरच्या समितीने, संस्था विद्यार्थ्यांना देत असलेल्या सोयी-सुविधेनुसार वेगवेगळया विद्यालयांची वेगवेगळी फी ठरविलेली आहे. अशी फी विद्यालये विद्यार्थ्यांकडुन घेत असते.

कर्मचाऱ्यांना पाल्यांची महाविद्यालयामध्ये द्यावी लागणारी फी व संस्थानकडुन मिळणाऱ्या फीचा परतावा, या दोन्ही रक्कमेमध्ये फार मोठी तफावत असल्यामुळे पाल्यांना उच्च शिक्षण घेणे अवघड झालेले आहे. त्यामुळे शिक्षण शुल्क समितीने ठरविलेल्या रक्कमेचा परतावा मिळावा, अशी कर्मचाऱ्यांकडुन सतत मागणी होत होती.

कर्मचाऱ्यांच्या मागणीस अनुसरुन व्यवस्थापन समितीचे दि.१९/०८/२००६ चे सभेतील निर्णय क्र.६२० अन्वये शैक्षणिक फी परतावा धोरणाबाबत, शिक्षण शुल्क समितीने ठरवून दिलेल्या नियमावलीप्रमाणे संस्थान कर्मचाऱ्यांना शैक्षणिक फीचा परतावा देणेबाबत प्रस्ताव तयार करुन राज्य शासनाची मान्यता घेण्यात यावी, तो पर्यंत पुर्वीचे प्रथेप्रमाणे फी परतावा देण्यात यावा, असे ठरले होते. त्यास अनुसरुन इकडील जा.नं.वशी-६/ ३६६९/०७,दि.०८/०३/२००७ अन्वये शासनास प्रस्ताव सादर केलेला होता. सदरच्या प्रस्तावास अनुसरुन शासन पत्र क्र. सासंवि २००७ /२४२/(६०) का सोळा, दि.जुन २००७ मंत्रालय मुंबई, अन्वये "सदर प्रस्तावाच्या अनुषंगाने विविध बाबींचा विचार करुन धोरणात्मक निर्णय घेणे आवश्यक असल्याने व शैक्षणिक वर्ष सुरु होत असल्याने आपणांस विनंती आहे की, या विषयाबाबत शासनाकडुन कोणतेही स्पष्ट आदेश प्राप्त होईपर्यंत प्रचलित असलेली कार्यपध्दती, पूर्वीप्रमाणेच चालु ठेवण्यात यावी," असे निर्देश दिलेले होते.

तद्नंतर शासन पत्र क्र. सासंवि २००७ /२४२/(६०) का सोळा, दि.२६/०६/२००७ अन्वये संस्थानच्या किती कर्मचाऱ्यांच्या पाल्यांनी विचाराधीन कालावधीत, गुणवत्तेच्या आधारावर विद्यापीठात प्रवेश मिळवला आहे. याबाबतची शासनाने माहीती मागविली होती. सदरची माहीती इकडील

जा.नं.वशी-६/१२५८७/२००७, दि.१३/०८/२००७ अन्वये पाठविण्यात आलेली होती. त्याबाबत शासनाकडे निर्णय प्रलंबित होता.

तथापी मा.व्यवस्थापन समितीचे दि.२२/०९/२००७ रोजीचे सभेतील निर्णय क्र.७३९ व दि.१०/०१/२००८ रोजीचे सभेतील निर्णय क्र.०१ अन्वये शासनाकडून स्पष्ट आदेश प्राप्त होईपर्यत, कर्मचाऱ्यांचे मागणीप्रमाणे शिक्षणशुल्क समितीने निश्चित केलेल्या शैक्षणिक शुल्काचा परतावा सन २००४-२००५ पासुन देण्यात यावा. जेथे शिक्षण शुल्क समितीने शुल्क निश्चिती केलेली नाही त्या ठिकाणी शासन / शासनमान्य विद्यापीठ यांनी ठरविलेले शिक्षण शुल्क विचारात घ्यावे. असा झालेला आहे. त्यास अनुसरुन सन २००७-२००८ चा फी परतावा नविन प्रस्तावाप्रमाणे व सन २००४-२००५ , २००५-२००६ व सन २००६-२००७ च्या फी परताव्यातील फरक असा रु.४६,९९,७७४/- (रुपये शेहेचाळीस लाख नव्हयान्नव हजार सातशे चौऱ्याहत्तर मात्र)शुल्काचा परतावा देण्यात आलेला आहे.

तथापी इकडील कार्यालयाचे दि.०८/०३/२००७ व दि.१३/०८/२००७ चे दोन्ही पत्रास अनुसरुन शासन पत्र क्र. सासंवि २००७ /२४२/(६०) का सोळा, दि.२५/०३/२००८ अन्वये, शिक्षण शुल्क समितीने ठरविलेल्या फीचा परतावा देण्याबाबतचा प्रस्ताव शासनाने अमान्य केला आहे, असे कळविले आहे, **त्याची नोंद घेण्यात आली. याबाबत मा.अध्यक्ष महोदय यांनी मा.प्रधान सचिव, विधी व न्याय विभाग यांचेशी चर्चा करावी असे ठरले.** (कार्यवाही-प्रशासनशाखा वशी-०३)

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.२५** **ईगल आय एंटरप्राईजेस,वापी,गुजरात, सिक्यूरिटी कॉन्ट्रॅक्टर यांचे मार्फत माजी सैनिकामधुन पुरविण्यात येणारे सुरक्षा कर्मचाऱ्यांचे वेतनवाढीबाबत.**

**निर्णय क्र.५४८** मे.ईगल आय एंटरप्राईज, वापी,(गुजरात) सिक्युरिटी कॉन्ट्रॅक्टर यांचेमार्फत संस्थानचे श्री साईमंदिर महाव्दार व परिसराचे सुरक्षेकामी माजी सैनिकांमधून कंत्राटी पध्दतीने सुरक्षा कर्मचारी दि.११-०८-२००६ पासून ते दि.१०-०८-२००७ अखेर १ वर्षे कालावधीसाठी पुरविणेत येत होते. सदर कॉन्ट्रॅक्टची मुदत दि.१०-०८-२००७ अखेर संपुष्ठात आली होती.

म्हणून दि.२७-०७-२००७ रोजीचे पत्रान्वये मे.ईगल आय एंटरप्राईज, वापी (गुजरात) सिक्युरिटी कॉन्ट्रॅक्टर यांनी दि.११-०८-२००७ पासून ते दि.१०-०८-२००८ या एक वर्ष कालावधीसाठी सिक्युरिटी कॉन्ट्रॅक्टचे नुतनीकरण करुन मुदतवाढ मिळावी अशी मागणी केली होती. मा.व्यवस्थापन समितीचे दि.२८-०७-२००७ रोजीचे सभेमध्ये मे.ईगल आय एंटरप्राईज,वापी (गुजरात ) सिक्युरिटी कॉन्ट्रॅक्टर यांचे दि.२७-०७-२००७ रोजीचे प्रस्तावावर चर्चा होऊन, त्यांचे ठेकेदारीस व करारास सध्याचे कंत्राटा संबंधातील अटी व शर्ती, तसेच दरपत्रक यास अधीन राहून दि.११-०८-२००७ पासून ते दि.१०-०८-२००८ पर्यंत या एक वर्ष कालावधीसाठी मुदतवाढ देणेचा निर्णय, आयत्या वेळेचा निर्णय क्र.६३० अन्वये संमत झालेला आहे.

त्यांस अनुसरुन मे.ईगल आय एंटरप्राईज, वापी (गुजरात) सिक्युरिटी कॉन्ट्रॅक्टर यांना संस्थानचे श्रीसाईमंदिर महाव्दार व परिसराचे सुरक्षेकामी माजी सैनिकांमधून कंत्राटी पध्दतीने सुरक्षा अधिकारी-०१, सुरक्षा सुपरवायझर-०३, सशस्त्र सुरक्षा रक्षक - १५, व सुरक्षा गार्ड-५० असे एकूण ६९ कंत्राटी सुरक्षा कर्मचारी दि.११-०८-२००७ पासून ते दि.१०-०८-२००८ पर्यंत या कालावधीसाठी पुरविणेकामी जा.नं.एसएसएस/वशी-७ए/२१४५/२००७ दि.१०-०८-२००७ व जा.नं. एसएसएस/वशी-७ए/२८८४/२००७ दि.२१-१०-२००७ रोजीचे पत्रान्वये लेखी कळविणेत आलेले आहे. त्याप्रमाणे त्यांचेमार्फत माजी सैनिकांमधून कंत्राटी पध्दतीने सुरक्षा कर्मचारी पुरविणेत येत आहे.

मे.ईगल आय एंटरप्राईज, वापी,(गुजरात) सिक्युरिटी कॉन्ट्रॅक्टर यांचेमार्फत दि.११-०८-२००६ पासून माजी सैनिकांमधून पुरविणेत येणा-या कंत्राटी सुरक्षा कर्मचा-यांना खालीलप्रमाणे वेतन दर देणेत येत आहे.

| अ.नं. | वर्गवारी | वेतनदर/ किमान वेतन दर (रुपये) प्रति.दिनी. | सर्व्हीस चार्जेस कॉ.३ चे रक्कमेवर ११.५० % | संस्थान पी.एफ़ एडीएम चार्जेससह कॉ.३चे रक्कमेवर १३.६१% | सर्व्हीस टॅक्स कॉ.३ ते ५ चे रक्कमेवर १२.२४ % | एकूण वेतन दर (रुपये) प्रति दिनी |
|---|---|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) |
| १) | **सुरक्षा अधिकारी** (माजी सैनिक) | ३००.०० | ३४.५० | ४०.८३ | ४५.९४ | ४२१.२७ |
| २) | **अ) सुरक्षा सुपरवायझर** (माजी सैनिक) | २२३.२५ | २५.६७ | ३०.३८ | ३४.१९ | ३१३.४९ |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| ३) | **ब) सशस्त्र सुरक्षा रक्षक,** (माजी सैनिक) | १८४.५५ | २१.२२ | २५.१२ | २८.२६ | २५९.१५ |
| ४) | **अ) सुरक्षा गार्ड** (माजी सैनिक) | १६६.७५ | १९.१८ | २२.६९ | २५.५४ | २३४.१६ |

त्यानंतर मे.ईगल आय एंटरप्राइज, वापी,(गुजरात) सिक्युरिटी कॉन्ट्रॅक्टर यांनी त्यांचेमार्फत माजी सैनिकांमधून पुरविणेत येणा-या कंत्राटी सुरक्षा कर्मचा-यांचे वेतन वाढवून मिळणेबाबत दि.१४-०४-२००८ रोजीचे पत्रान्वये मागणी केलेली आहे. त्यात त्यांनी , "आमचे सुरक्षा एजन्सी मार्फत संस्थानचे महाव्दारावर साईभक्तांचे चेकींगकामी माजी सैनिक, सुरक्षा कर्मचारी, पुरविणेत येत आहे. तरी सदर डयुटी कठोर मेहनतीची असल्याने माजी सैनिक व्यक्ती सहजासहजी उपलब्ध होत नाहीत कामावर आलेले कर्मचारी जास्त दिवस थांबत नाहीत. कारण येथील पगारपेक्षा बाहेर जास्त पगार (सुरक्षा गार्ड-रुपये ८०००/- व बंदुकधारी रुपये ९०००/-) मिळतो यास्वत वेतनात खालीलप्रमाणे ३० % वाढ झाल्यास पाहिजे असलेले संख्याबळ सहज उपलब्ध होईल.

| **अ.नं.** | **वर्गवारी** | **वेतनदर/ किमान वेतन दर (रुपये) प्रति.दिनी.** | **सर्व्हीस चार्जेस कॉ.३ चे रक्कमेवर ११.५० %** | **संस्थान पी.एफ़ एडीएम चार्जेससह कॉ.३चे रक्कमेवर १३.६१%** | **सर्व्हीस टॅक्स कॉ.३ ते ५ चे रक्कमेवर १२.२४ %** | **एकूण वेतन दर (रुपये) प्रति दिनी** |
|---|---|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) |
| १) | **सुरक्षा अधिकारी** (माजी सैनिक) | ३९०.०० | ४४.८५ | ५३.०७ | ५९.७२ | ५४७.६४ |
| २) | **अ) सुरक्षा सुपरवायझर** (माजी सैनिक) | २९०.२२ | ३३.३७ | ३९.४९ | ४४.४४ | ४०७.५२ |
| ३) | **ब) सशस्त्र सुरक्षा रक्षक,** (माजी सैनिक) | २३९.९१ | २७.५८ | ३२.६५ | ३६.७३ | ३३६.८७ |
| ४) | **अ) सुरक्षा गार्ड** (माजी सैनिक) | २१६.७७ | २४.९२ | २९.५० | ३३.१९ | ३०४.३८ |

तरी उपरोक्तप्रमाणे कंत्राटी सुरक्षा कर्मचा-यांचे वेतनात ३० टक्के प्रतिदिनी वाढ हावी " असे म्हटलेले आहे. मे.ईगल आय एंटरप्राईजस, सिक्यूरिटी कॉन्ट्रॅक्टर यांनी त्यांचेमार्फत माजी सैनिकामधुन पुरविण्यात येणाऱ्या कंत्राटी सुरक्षा कर्मचाऱ्यांचे वेतनात २० टक्के प्रतिदिन वाढ करण्यात यावी, अशी यापूर्वी दिनांक ११.१.२००८ रोजीच्या पत्रान्वये मागणी केली होती. सदरचा विषय व्यवस्थापन समितीचे दिनांक २०.१.२००८ चे सभेमध्ये निर्णयासाठी सादर करण्यात आला होता. त्यावर चर्चा होऊन, मे.ईगल आय सिक्यूरिटी कॉन्ट्रॅक्टर यांची मागणी अमान्य करण्यात आली होती.

**सबब,** मे.ईगल आय एंटरप्राईज, वापी (गुजरात) सिक्युरिटी कॉन्ट्रॅक्टर यांचेमार्फत माजी सैनिकांमधून संस्थानचे श्रीसाई मंदिर महाव्दार व परिसराचे सुरक्षेकामी पुरविणेत येणाऱ्या कंत्राटी सुरक्षा अधिकारी, सुरक्षा सुपरवायझर, सशस्त्र सुरक्षा रक्षक व सुरक्षा गार्ड यांना सध्या देण्यात येणा-या वेतन दरात ३० टक्के वाढ करुन उपरोक्तप्रमाणे प्रतिदिनी सुधारित वेतन दर दि. ०१-०५-२००८ पासून देणेस मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

यावर सविस्तर चर्चा होऊन,मे.ईगल आय इंटरप्राईज,वापी(गुजरात) सिक्यूरिटी कॉन्ट्रॅक्टर यांचे मार्फत माजी सैनिकांमधुन संस्थानचे श्रीसाईमंदीर, महाद्वार व परिसराचे सुरक्षेसाठी पुरविण्यात येणाऱ्या कंत्राटी सुरक्षा कर्मचारी यांना सध्या देण्यात येणाऱ्या वेतनदरात २० टक्के वाढ करुन खालीलप्रमाणे प्रतिदिन सुधारित वेतनदर दिनांक १.०५.२००८ पासून देण्यात यावे,असें ठरले.

| **अ.नं.** | **वर्गवारी** | **वेतनदर/ किमान वेतन दर (रुपये) प्रति.दिनी.** | **सर्व्हीस चार्जेस कॉ.३ चे रक्कमेवर ११.५० %** | **संस्थान पी.एफ़ एडीएम चार्जेससह कॉ.३चे रक्कमेवर १३.६१%** | **सर्व्हीस टॅक्स कॉ.३ ते ५ चे रक्कमेवर १२.२४ %** | **एकूण वेतन दर (रुपये) प्रति दिनी** |
|---|---|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| १) | **सुरक्षा अधिकारी** (माजी सैनिक) | ३६०.०० | ४१.४० | ४८.९९ | ५५.१२ | ५०५.५१ |
| २) | **अ) सुरक्षा सुपरवायझर** (माजी सैनिक) | २६७.९० | ३०.८० | ३६.४६ | ४१.०२ | ३७६.१८ |
| ३) | **ब) सशस्त्र सुरक्षा रक्षक,** (माजी सैनिक) | २२१.३५ | २५.४५ | ३०.१२ | ३३.८९ | ३१०.८१ |
| ४) | **अ) सुरक्षा गार्ड** (माजी सैनिक) | २००.१० | २३.०१ | २७.२३ | ३०.६४ | २८०.९८ |

(कार्यवाही-कामगार अधिकारी )

**आयत्या वेळेचा**
**विषय नं.२६** **श्री.एस.सी.वाखुरे,कन्सलटंट यांचा मुदतवाढ मिळणेबाबतचा अर्ज.**
**निर्णय क्र.५४९** श्री.चंद्रभान सिताराम वाखुरे यांची जा.नं.एसएसएस/वशी-०१/१०५५०/२००५ दि.२३/०९/२००५ अन्वये कंत्राटी पध्दतीने कन्सल्टंट या पदावर दरमहा रु.७०००/- या एकत्रित मानधनावर सहा महिने (दि.२१/१०/२००५ ते २०/०४/२००६ अखेर) कालावधीसाठी नेमणूक करण्यात आलेली असून मा.व्यवस्थापन समितीचे सभेतील निर्णयानुसार वेळोवेळी त्यांची नेमणूकीची मुदतवाढ करण्यात आलेली आहे.

जा.नं.एसएसएस/वशी -१/१३३३/२००७ दि. ३०/०५/२००७ अन्वये देण्यात आलेली मुदतवाढ दि. २०/०४/२००८ अखेर संपुष्ठात येत आहे. श्री. वाखुरे यांनी दि.२०/०२/२००८ रोजी अर्ज करुन आणखी दीर्घ कालावधीसाठी मुदतवाढ मिळणेबाबत विनंती केलेली आहे.श्री. वाखुरे यांची जन्मतारीख दि.१९/०८/१९३९ अशी असून नेमणूकीचे वेळी त्यांचे वय ६५ वर्ष होते आज रोजी त्यांचे वय -६८ वर्षे ०७ महिने आहे.

सध्या माहितीच्या अधिकाराचे कामकाज प्रशासकिय अधिकारी श्री. प्र.प्र. देशपांडे यांचे अधिपत्याखाली चालू असून श्री.वाखूरे हे त्यांचे अखत्यारित काम पहात आहेत. श्री.वाखुरे यांचे मुदत वाढीबाबत त्यांचेकडे विचारणा केली असता श्री.वाखुरे यांना महितीचा अधिकार नियमाबाबत कायदेशीर माहिती असून त्यांच्या सेवा उपयुक्त ठरु शकतात. असे अभिप्राय दिले आहेत तरी त्यांना पुढील एक वर्ष मुदतवाढ देणेस मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

**यावर सविस्तर चर्चा होऊन, सदरहू विषयावर आस्थापना उपसमितीने निर्णय घ्यावा,असें ठरले.** (कार्यवाही-अधिक्षक,आस्थापना विभाग)

**आयत्या वेळेचा**
**विषय नं.२७** **कनिष्ठ महाविदयालयासाठी बेंचेस खरेदी..**
**निर्णय क्र.५५०** मा.व्यवस्थापन समिती सभा दि.२८.०७.२००७ मधील निर्णय क्र.६०४ नुसार कन्या विदया मंदिर व कनिष्ठ महाविदयालयासाठी आवश्यक असणारे बेचेंस, संगणक व इतर साहित्य पुरविणेकामी वर्तमानपत्रात जाहिरात देऊन निविदा मागविणेत आलेल्या होत्या. तसेच संबंधितांना मा.व्यवस्थापन उपसमिती सभा दि.०७.११.२००७ मध्ये संबंधित निविदाधारकांना आमंत्रित करणेत येऊन निर्णयाअंती न्युनतम दरधारकांना पुरवठा आदेश देणेत आलेले आहेत. त्यास मा.व्यवस्थापन समिती सभा दि.१०.०१.२००८ मधील निर्णय क्र.१०(८-क) अन्वये मान्यता मिळालेली आहे.

निविदेतील साहित्यापैकी ४०० नग बेंचेस खरेदीकामी मे.स्टील फॅब कार्पोरेशन, पुणे यांना जा.क्र.७६४ दि.१२.०१.२००८ अन्वये रु.२२९०/-प्रती नग या न्युनतम दराने पुरवठा आदेश देणेत आलेला होता. पुरवठा आदेशातील अटीनुसार एक बेंचेसचा नमुना प्राचार्या,कनिष्ठ महाविद्यालयाकडून मान्य करुन घ्यावयाचा होता. त्यानुसार मे.स्टील फॅब कार्पोरेशन, पुणे यांनी एक नमुना सादर केलेला होता. त्यात प्राचार्यांनी काही बदल सुचविल्याने पुन्हा दुसरा नमुना सादर केलेला होता. मात्र नमुना बनविणे व मान्य करणे यामध्ये दोन महिन्याचा कालावधी गेल्याने व स्टीलचे दर वाढल्याने मे.स्टील फॅब कार्पोरेशन, पुणे यांनी त्यांचे दि.३१.०३.२००८ चे पत्राने २०% दरवाढ मागितलेली आहे. याबाबत द्वितीय न्युनतम दरधारक यांना त्यांचे मंजूर दराने बेंचेस देण्याची विनंती केली असता, त्यांनी स्टीलचे दर २५ ते ४०% वाढल्याने पुरवठा करणेस असमर्थता दर्शविलेली आहे. मे.स्टील फॅब, पुणे यांना दि.१०.०५.२००८ रोजी मा.व्यवस्थापन उपसमितीचे सभेत पुन्हा चर्चेसाठी आमंत्रित करणेत आलेले होते. मात्र त्यांनी मुळ मंजूर दरात पुरवठा करणेस असमर्थता दर्शविलेली आहे.

त्यावर मे.स्टील फॅब कार्पोरेशन, पुणे यांनी बेंचेसचा पुरवठा करणेस असमर्थता दर्शविल्याने त्यांचा पुरवठा आदेश रद्द करणेत येऊन त्यांची सुरक्षा अनामत रक्कम रु.१०,०००/- संस्थान जमा करावी व कनिष्ठ महाविदयालयाचे वर्ग जूनमध्ये सुरु होत असल्याने, तातडीने बेंचेस मिळणेसाठी अहमदनगर येथील बेंचेस तयार करणारे मे.डि.एम.सरोदे तिजोरीवाला व प्रगती इंडस्टीज, संगमनेर

यांना दूरध्वनी करुन दर व नमुने मागवून पुढील सभेत निर्णय घ्यावा असे ठरले. त्यानुसार मे.सरोदे, अहमदनगर व प्रगती इंडस्टीज, संगमनेर यांनी नमुने व दर दिलेले आहेत. त्यांचे दरांचा तपशील खालीलप्रमाणे-

| | | |
|---|---|---|
| ०१. | मे.डि.एम.सरोदे तिजोरीवाला, अहमदनगर<br>टॉपसाठी - सी.आर.सी शिट | रु.१८००/-+ १२.५% व्हॅट = रु.२,०२५.००<br>(लोखंडी बेंच) |
| ०२. | प्रगती इंडस्ट्रीज, संगमनेर | रु.२०३६/- + १२.५% व्हॅट = रु.२,२९०.५०<br>टॉपसाठी - सागवानी फळी |

उपरोक्त दरधारकांनी सादर केलेले बेंचेसचे नमुने आजचे सभेतील मा.विश्वस्तांनी समक्ष पहाणी केली असता, प्रगती इंडस्ट्रीज,संगमनेर यांचे नमुन पसंत पडले. प्रगती इंडस्ट्रीज, संगमनेर हे समक्ष उपस्थित होते. त्यांनी देऊ केलेल्या मूळ किंमतीत प्रती नग रुपये १००/- प्रमाणे दर कमी केलेले आहे.

**यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रगती इंडस्ट्रीज, संगमनेर यांचे दर स्वीकारणेत येऊन, त्यांना रुपये १९३६.०० + १२.५% व्हॅट प्रती नग या दराने बेंचेस पुरविणेकामी कार्यादेश देण्यात यावा,असें ठरलें.** (कार्यवाही-अधिक्षक,खरेदी विभाग)

**आयत्या वेळेचा**
**विषय नं.२८** **श्री साईबाबा हॉस्पिटलसाठी Mortuary Cabinets साठी रुमचे बांधकाम करणेबाबत**

**निर्णय नं.५५१.** श्रीसाईबाबा हॉस्पिटल यांनी उपरोक्त संदर्भिय पत्रान्वये असे कळविले आहे की, रुग्णालयात दाखल होणारे रुग्ण हे बहुदा हृदय, किडणी किंवा इतर मोठ्या आजाराने त्रस्त / पिडीत असतात काही वेळेस यातील काही रुग्णांची स्थिती गंभीर किंवा अति गंभिर असल्यास त्यांचा उपचारादरम्यान मुत्यु ओढावतो अशा मुत्यु झालेल्या रुग्णांना शवागारात ठेवणेकामी सहा ड्रॉव्हर असलेली Mortuary Cabinets खरेदी करणेकामी इकडील कार्यालयामार्फत पत्र क्र. ३२९९ दि. ०४/०३/२००८ अन्वये पुरवठा आदेश देण्यात आलेला आहे. सदर Mortuary Cabinets ठेवण्यासाठी रुम तयार करणे आवश्यक आहे. तरी बांधकाम विभगामार्फत रुग्णालयातील कॅज्युलीटीचे बाजुकडील श्री साईनाथ हायस्कुलचे दक्षिणेकडील त्रिकोणी जागेची समक्ष पहाणी करुन मॉरच्युरीच्या कॅबिनेट बसविणेकामी योग ते बांधकाम करणेची कार्यवाही करण्यात यावी.

उपरोक्त प्रमाणे इकडील विभागामार्फत समक्ष पहाणी करण्यात आली असून **सदरहू १६' x १८' या मापाच्या रुमचे आर.सी.सी. बांधकाम करणेसाठी प्राथमिक ढोबळ अंदाजानुसार रुपये २,६५०००/- मात्र इतका खर्च अपेक्षीत आहे. सदर काम हे मोठ्या स्वरुपाचे असल्यामुळे संस्थान पॅनलवरील आर्किटेक्ट यांचेकडून प्लॅन एस्टिमेट व निविदा तयार करुन घेणेस तसेच सदरचे काम स्थानिक बांधकाम ठेकेदारांकडून कोटेशन्स मागवून करुन घेणेस मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देणेत आली.**

(कार्यवाही-बांधकाम विभाग प्रमुख)

**आयत्या वेळेचा**
**विषय नं.२९** **नविन बेंच खरेदी करणेबाबत.**

**निर्णय नं.५५२.** श्रीसाईबाबा इंग्लिश मिडीयम स्कूलमध्ये सन-१९९० पासून केजी विभाग सुरु करण्यात आलेला आहे. ज्यु.केजीसाठी चाली शैक्षणिक वर्ष-२००८-०९ मध्ये एकूण २३१ विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतले आहेत. या वर्गासाठी विद्यार्थी संख्या वाढल्याने लहान साईज बेंचची संख्या कमी पडत असून त्यासाठी नवीन बेंच खरेदी करावे लागणार आहेत. दोन वाढीव तुकड्या सुरु करावयाच्या झाल्यास १०० नग बेंचेसची आवश्यकता लागणार आहे. केजी विभागासाठी ३०"x२६"x२५" (लांबी, रुंदी,उंची) या मापाचे बेंच (लहान साईज ३ ते ४ वर्ष वयोगटासाठी) असून एका बेंचची अंदाजे किंमत रुपये १८००/- प्रमाणे एकूण रुपये १,८०,०००/-इतका अंदाजे खर्च अपेक्षित आहे.

श्रीसाईबाबा इंग्लिश मिडीयम स्कुलकरीता तातडीची गरज म्हणून १०० नग बेंचेस कोटेशन्स मागवून खरेदी करणेस व याकामी येणारे अंदाजे रक्कम रुपये १,८०,०००/- चे खर्चास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

**यावर सविस्तर चर्चा होऊन, संस्थानचे कनिष्ठ महाविद्यालयासाठी मे.डि.एम.सरोदे तिजोरीवाला, अहमदनगर, मे.प्रगती इंडस्ट्रीज, संगमनेर यांनी निविदा सादर केलेल्या आहेत. त्यांचेशी चर्चा करण्यात आली असता, मे.प्रगती इंडस्ट्रीज, संगमनेर यांनी व्हॅटसह रुपये १७००/- प्रति नग दराने पुरविण्यास मान्यता दिल्याने त्यांना १०० बेंचेससाठी कार्यादेश देण्यात यावा असे ठरले.** (कार्यवाही-अधिक्षक खरेदी)

**आयत्या वेळेचा**
**विषय नं.३०** **लहान मुलांमधील अंधत्वाचे प्रमाण कमी करण्यासाठी दृष्टी संरक्षण कॉन्फरन्स.**

**निर्णय क्र.५५३** मा.कमांडर के.आर.गिरवलकर, डायरेक्टर, राष्ट्रीय अंधत्व निवारण संस्था, भारत यांचे उपरोक्त संदर्भीय पत्राने सोमवार, दि.०९/०६/२००८ रोजी सकाळी १०.०० वा. शिर्डी येथे लहान मुलांचे दृष्टी संरक्षणाबाबत कॉन्फरन्स घेणेबाबत कळविलेले आहे. सदरचे कॉन्फरन्स शिर्डी येथे घेणेबाबत

संस्थानचे मा.अध्यक्ष ससाणेसाो. यांची मुंबई येथे मा.डॉ.शांतीलालजी सोमैय्या, यांचेशी बोलणे झालेले आहे, व या कार्यक्रमाचे अध्यक्ष मा.श्री. ससाणेसाो. भुषविणार आहे. तरी या कार्यक्रमासाठी आवश्यक ते नियोजन करावे, अशी मागणी त्यांनी केलेली आहे.

उपरोक्त कॉन्फरन्सबाबत अधिक चर्चा करणेसाठी सोमैय्या ऑर्गेनो केमिकल्स, साकरवाडी यांचे मॅनेजर श्री पालवे, व कमांडर के.आर.गिरवलकर हे दि.२३/०५/२००८ रोजी संस्थान कार्यालयात आले असतांना या कॉन्फरन्सबाबत त्यांचेशी चर्चा करुन कॉन्फरन्सची संकल्पना व उद्देश समजावुन घेतले असता, त्यांनी सांगितले की, देशातील अंध लोकांची संख्या दिड कोटी आहे, त्यामध्ये सुमारे ८० % लोक ग्रामीण भागातील आहे. देशात दर ४ मिनिटाला १ बालक अंध होऊन जन्माला येते, यासाठी प्रतिबंधात्मक उपाय योजना म्हणून याबाबत काय करता येणे शक्य आहे, यावर विचार विनिमय करणेसाठी ही कॉन्फरन्स भरविण्यात येणार आहे.

या कॉन्फरन्ससाठी सुमारे १५० मान्यवर व्यक्त हजर रहाणार असून त्यामध्ये शुगर फॅक्टरीचे मॅनेजर, चेअरमन, रोटरी व लायन्स क्लबचे गव्हर्नर, प्रेसिडेंट, मेडीकल कॉलेज/मॅनेजमेंट कॉलेजचे प्राचार्य, नाशिक, नगर जिल्ह्यातील बालरोग तज्ञ, सिव्हील सर्जन, जॉईंट कमिशनर इ. उपस्थित रहाणार आहेत. कॉन्फरन्स २ तासाची आहे, असे त्यांनी सांगितले आहे.

सोमैय्या ऑर्गेनो केमिकल्स, साकरवाडी यांचे मॅनेजर श्री पालवे, व कमांडर के.आर.गिरवलकर हे आजचे व्यवस्थापन समितीच्या सभेच्या दिवशी सभागृहात समक्ष येऊन भेटले, त्यानुसार संस्थानमार्फत सदरची कॉन्फरन्स घेणेबाबत मा.अध्यक्ष यांनी सुचना केली.

सोमैय्या ऑर्गेनो केमिकल्स, साकरवाडी यांचे मॅनेजर श्री पालवे, व कमांडर के.आर.गिरवलकर हे शिर्डी येथे आले असता, संस्थानचे सर्वश्री दिनकर देसाई-अभियंता, बांधकाम विभाग, प्रल्हाद शेळके, पाणिपुरवठा विभागप्रमुख, श्री अनिल भणगे-कृषि सहाय्यक, बगीचा विभाग, शशिकांत कुलकर्णी, ध्वनिक्षेपण विभागप्रमुख, श्री विजय मते -लिपीक,चौकशी कार्यालय, श्री दिलीप उगले-अधिक्षक,प्रसादालय विभाग रामदास कोते-वरिष्ठ लिपीक, प्रसादालय विभाग, बलभिम वसंतराव जोशी- वरिष्ठ लिपीक, प्रशासन शाखा यांचे समवेत नविन प्रसादालय इमारतीमध्ये समक्ष जाऊन जागेची पहाणी करुन संबंधित अधिका-यांची कार्यक्रमाबाबत चर्चा केलेली आहे. झालेल्या चर्चेत कॉन्फरन्ससाठी खालीलप्रमाणे खर्च सोमैय्या ग्रुप मार्फत केला जाईल, असे श्री.पालवे यांनी सांगितले आहे.

मान्यवरांची स्वागत व्यवस्था, स्टेज डेकोरेशन (हार-गुच्छ फुलांसह व्यवस्था), रांगोळी, कार्यक्रमाचे सुत्र संचलन, कार्यक्रमासाठी -२०० खुर्च्या, मान्यवरांचे जेवणासाठी भाड्याने टेबल खुर्च्या घेण्याचा खर्च, जेवण व निवास व्यवस्था सशुल्क, प्रसिध्दीचे बोर्ड, फोटोग्राफी, व्हि.डी.ओ.शुटींगची व्यवस्था ते करणार आहेत.

**सदर कार्यक्रमासाठी संस्थानमार्फत स्वच्छता, सुरक्षा, सशुल्क निवास व दुपारचे-भोजन, ध्वनिक्षेपण, दर्शन इ. व्यवस्था तसेच स्टेजसाठी लागणारे टेबल इ. व मान्यवरांचे चहा पाण्याची व्यवस्था इ.व्यवस्था करावी लागेल असा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही-प्रशासनशाखा वशी-०५)

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.३१ श्री साईबाबा हॉस्पिटलमध्ये ट्रामा युनिट सुरु करणे बाबत.**

**निर्णय क्र.५५४** नगर-मनमाड रस्ता व शिर्डी सिन्नर रस्त्यावर मोठ्या प्रमाणावर वाहतूक वाढल्याने या रस्त्यावर आपघाताचे प्रमाणे वाढलेले आहे. याकरीता श्री साईबाबा हॉस्पिटलमध्ये तातडीची सेवा म्हणून २४ तास येथे कायमस्वरुपी एक स्वतंत्र रुग्णवाहीका व ड्रायव्हर ठेवण्यात यावा. त्यास एक स्वतंत्र फोन नंबर देण्यात यावा. सदरचा फोन नंबर नगर-मनमाड व शिर्डी-सिन्नर रस्त्यावर ठिकठिकाणी फलकावर लावण्यात यावा. आपघातनंतर फोन आल्यानंतर सदरची रुग्णवाहिका तातडीने पाठवून रुग्णास रुग्णालयात आणण्यात येऊन उपचार करण्यात यावे. (कार्यवाही-वैद्यकीय संचालक/आय.टी.विभागप्रमुख)

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.३३ तुकाराम महाराज ट्रस्ट देहू यांना आर्थिक मदत देणे बाबत.**

**निर्णय क्र. ५५५** तुकाराम महाराज ट्रस्ट देहू यांना रुपये ५० लाख आर्थिक मदत करणेत यावी, त्यांस छाननी समितीची मान्यता घेण्यात यावी असे ठरले. (कार्यवाही-प्रशासनशाखा वशी-०३)

**दिनांक २४.०५.२००८**

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.३३ शिर्डी येथील रेल्वे प्रकल्पामूळे बाधित झालेल्या भुधारकांना रोजंदारीवर घेण.**

**निर्णय क्र. ५५६** शिर्डी येथील रेल्वे प्रकल्पामूळे बाधीत झालेल्या रुई येथील ४६ भूधारकांना रोजंदारीवर संस्थानमध्ये घेण्यात यावे असे ठरले. (कार्यवाही-प्रशासनशाखा वशी-०३)

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.३४ मा.श्री र.ग.कर्णिक, सरचिटणीस, राज्य सरकारी कर्मचारी मध्यवर्ती संघटना, महाराष्ट्र स्थापित भगीरथ प्रकल्प यांचे दिनांक २३.५.२००८ चे पत्राबाबत.**

**निर्णय क्र.५५७** मा.श्री र.ग.कर्णिक, सरचिटणीस, राज्य सरकारी कर्मचारी मध्यवर्ती संघटना, महाराष्ट्र स्थापित भगीरथ प्रकल्प यांचे दिनांक २३.५.२००८ चे पत्रान्वये ग्रामविकासाच्या कार्यालया सहाय्य करता यावे या हेतूने भगीरथ प्रकल्प ही संस्था राज्य सरकारी कर्मचारी मध्यवर्ती संघ्टनेने स्थापन केलेली आहे ही संस्था सोसायटी म्हणून १८६० च्या सोसायटी रजिस्ट्रेशन ॲक्ट अन्वये नोंदणीकृत करण्यात आली असून पब्लिक ट्रस्ट म्हणूनही १९८२ मध्ये नोंदणीकृत करण्यात आलेली आहे.

नाशिक जिल्ह्यातील सहा आदिवासी गावे संस्थेने दत्तक घेतलेली आहेत त्या गावातील पाणलोट विकासाचे कार्य संस्थेने पूर्ण केले आहे. आदिवासी विद्यार्थ्यांना वह्या आणि पाठ्यपूस्तकांचा पुरवठाही संस्था विनामूल्य करत आहे.

दत्तक घेतलेली सहाही गावे नाशिक पासून ५० कि.मी. च्या परिघात आहेत त्या गावांना वेळोवेळी भेटी देऊन विकास कार्याला गती देण्यासाठी संस्थेकडे एक जीप होती. परंतू ती एका अपघातामूळे निकामी झाल्याने भंगारात काढावी लागली. संस्थेस एका वाहनाची गरज असून संस्थानचे काही वाहने लिलावात काढण्यात येणार आहे त्यापैकी एक वाहन भगीरथ प्रकल्पास देणगी दाखल द्यावे अशी विनंती केली असून त्यास मान्यता द्यावी असा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

यावर सविस्तर चर्चा होऊन, संस्थानकडील लिलावात काढण्यात येत असलेल्या वाहनांपैकी एक वाहनांची किंमत ठरवून ती भगीरथ प्रकल्पास देणगी म्हणून देण्यात यावी असे ठरले.

(कार्यवाही-वाहन विभागप्रमुख/अधिक्षक,अभिलेखा कक्ष)

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.३५ संस्थान सेवेत असतांना मयत झालेल्या कर्मचाऱ्याचे वारसास अनुकंपा कारणस्तव संस्थान सेवेत घेणे बाबत.**

**निर्णय क्र.५५८** दिनांक ११.०८.२००७ चे आस्थापना उपसमितीचे सभेत ठरलेनुसार संस्थान सेवेत असतांना मयत झालेल्या कर्मचाऱ्यांचे खालील वारसांना अनुकंपा कारणास्तव संस्थान सेवेत घेण्यात यावे असे ठरले.

| अ.नं. | संस्थान सेवेत असतांना मयत झालेल्या कर्मचाऱ्याचे वारसाचे नांव |
|---|---|
| ०१. | श्री साईदास निवृत्ती शिंदे |
| ०२ | श्रीमती उषा सुरेश शिंगाडे |
| ०३ | श्री विजय चंपालाल उपाध्ये |
| ०४ | श्री साईप्रसाद साहेबराव वाघ |
| ०५ | श्रीमती शशिकला नानासाहेब डांगे |
| ०६ | श्री सचिन अशोक गिते |
| ०७ | कु. प्रियंका सुभाष वर्मा |
| ०८ | श्री.गणेश शिवकुमार बोलशेट्टी |
| ०९ | कु.वैशाली विलास कोते |

(कार्यवाही-अधिक्षक,आस्थापना विभाग)

वरील निर्णय क्र ४१४ ते ५५८ सर्वानु मते घेण्यात आले आहेत.

यानंतर सभा समाप्तीची घोषणा करण्यात आली.

(किशोर रा.मोरे)
कार्यकारी अधिकारी
श्रीसाईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी)

(जयंत मुरलीधर ससाणे )
अध्यक्ष
श्रीसाईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी)